

# कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं

## संत मुक्ताबाई : व्यक्ती आणि वाङ्मय

डॉ.केतकी मोडक

# कडकडोनि वीज
# निमाली ठायींचे ठायीं
## संत मुक्ताबाई : व्यक्ती आणि वाङ्मय

डॉ. केतकी मोडक

**कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं**

संत मुक्ताबाई : व्यक्ती आणि वाङ्मय

**© डॉ.केतकी मोडक**

**प्रकाशक**

महेश मोडक

'ग्रेस', फ्लॅट नं. १, श्रीराम अपार्टमेंट्स,

२४३/८ शुक्रवार पेठ,

पुणे ४११००२

फोन : ०२०-२४४६०५२०

**प्रथमावृत्ती**

४ ऑक्टोबर, २००५

घटस्थापना

**द्वितीय आवृत्ती**

१६ मार्च, २०१०

गुढीपाडवा

**इंटरनेट आवृत्ती**

३ नोव्हेंबर २०१४

कार्तिक शुद्ध एकादशी

**मुखपृष्ठ**

महेश मोडक

**मूल्य : ३९० रूपये**

ईश्वरी शक्तीचे माध्यम बनण्यास शिकविणाऱ्या

आणि

त्याचा सुंदर प्रत्यय देऊ करणाऱ्या

योगी श्रीअरविंद व श्रीमाताजी यांना

सर्वभावे समर्पित

# अनुक्रमणिका

अंतरंग........................................................०७
संशोधिकेचे मनोगत.............................................१२
ऋणनिर्देश.....................................................१७

## विभाग एक

### मुक्ताबाईचे चरित्र

चित्कला मुक्ताबाई.............................................२१
धाडा बोलावणे गोरोबाला.....................................४६
गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला...............................५४
मुक्ताबाईचा अज्ञातवास.......................................७४
तववरी तिचे शरीर चिरकाळ अभंग निरंतर...................७८

## विभाग दोन

### मुक्ताबाईची प्रभावळ

मुक्ता सख्यत्व आम्हा अर्था प्रसवू लागे.........................९१
(मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ यांच्यातील अनुबंध)
ज्ञानराज ओवाळी अहो मुक्ताबाई...............................९६
(मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांच्यातील अनुबंध)
सोपानदेवास कृपा तिची.......................................१०२
(मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील अनुबंध)
मुक्ताईने बोध खेचरासी केला..................................१०५
(मुक्ताबाई आणि विसोबा खेचर यांच्यातील अनुबंध)
लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी...............................१११
(मुक्ताबाई आणि नामदेव यांच्यातील अनुबंध)
मुक्ताई सांगे खूण वटेश्वरा.....................................११६
(मुक्ताबाई आणि वटेश्वर यांच्यातील अनुबंध)

मुक्ताई जीवन चांगया दिधले..............................................१२१
(मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील अनुबंध)
मुक्ताबाईबद्दल गौरवपर उद्गार..........................................१२८

## विभाग तीन

### मुक्ताबाईचे वाङ्मय

सनद दिली स्वतंत्र सद्गुरुराजे............................................१३५
(श्रीज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेली सनद)
ताटीचे अभंग – ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत.......................१४४
ज्ञानबोध ग्रंथ – एक अपूर्व उपलब्धी.......................................१५१
मुक्ताबाईचे 'अभंग'..................................................१७१
मुक्ताबाई सार्थ गाथा.................................................१८०
मुक्ताबाईचे संकलित अभंग...............................................२१०

## विभाग चार

### परिशिष्ट

पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस....................................२६५
(मुक्ताबाई एक की दोन या प्रश्नाचा चिकित्सक विचार)
लोकसाहित्यातील मुक्ताबाई..............................................२७५
मुक्ताबाईचा जीवनपट.................................................२८२
मुक्ताबाईच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या स्थळांचा नकाशा.................२८३
मुक्ताबाईची जन्मकुंडली................................................२८४
सार्थ अभंगांची सूची..................................................२८५
संकलित अभंगांची सूची................................................२८७
प्रकरणशः संदर्भसूची..................................................२९६
संदर्भ ग्रंथ सूची......................................................३१८

**

# अंतरंग

'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं' या पुस्तकाची विभागणी प्रमुख चार विभागांमध्ये केली आहे. पहिल्या विभागामध्ये मुक्ताबाईच्या चरित्राचा आढावा घेतला आहे. दुसरा विभाग हा मुक्ताबाईच्या प्रभावळीचा आहे. तिसऱ्या विभागामध्ये मुक्ताबाईच्या एकंदर सर्व वाङ्मयाचा विचार करण्यात आला आहे. विभाग चारमध्ये मुक्ताबाई एक की दोन या विषयावरील संशोधिकेचे मत मांडले आहे; लोकसाहित्यात मुक्ताबाईचे दिसणारे प्रतिबिंब, व इतर आनुषंगिक तपशीलही या भागात आला आहे.

या समग्र पुस्तकातील आशयाची थोडक्यात ओळख व्हावी यादृष्टीने यातील प्रकरणांचा क्रमशः विचार येथे करु.

**विभाग एक : मुक्ताबाईचे चरित्र**

**चित्कला मुक्ताबाई :** या प्रकरणामध्ये मुक्ताबाईचे चरित्र मांडण्यात आले आहे. मुक्ताबाई व तिचे समकालीन यांनी तिच्यासंबंधी लिहिलेल्या अभंगांचा आधार घेऊन ते चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मुक्ताबाईचे जीवन केंद्रस्थानी मानून इतर घटनांचे चित्रण करण्यात आले आहे.

**धाडा बोलावणे गोरोबाला :** नामदेवांची परीक्षा गोरोबांनी म्हणजे गोरा कुंभारांनी केली आणि मडके कच्चे आहे असा निर्णय दिला असे सामान्यत: मानले जाते. परंतु ही परीक्षा गोरक्षनाथांनी घेतली असावी असे मत येथे मांडले आहे. असा अंदाज करण्यासाठी गोरा कुंभारांनी ती परीक्षा का घेतली नसावी याची काही कारणे येथे नमूद करण्यात आली आहेत. तर गोरक्षनाथांनीच ती परीक्षा घेतली असावी याला आधार म्हणून दाखविता येतील अशी काही कारणे दाखविली आहेत.

**गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला :** मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांची भेट हा एक गूढ स्वरूपाचा असा अनुभव आहे. ह्या भेटीचे स्वरूप काय असावे? ही भेट कशी घडून आली असावी ? ही भेट झाली असे म्हणण्यास नेमका आधार काय आहे ? या भेटीचा परिणाम काय झाला ? यासंबंधी मुक्ताबाई आणि इतर भावंडे यांची प्रतिक्रिया नेमकी काय होती ? या साऱ्याचा

खुलासेवार विचार येथे करण्यात आला आहे.

**मुक्ताबाईचा अज्ञातवास :** ज्ञानेश्वर आणि नामदेव तीर्थयात्रेला गेले असताना मुक्ताबाई आपल्या निवडक शिष्यांसमवेत अज्ञातवासात उच्च साधनेसाठी गेल्या असाव्या असा अंदाज या प्रकरणामध्ये मांडला आहे. या अंदाजास बळकटी देतील असे काही पुरावे अभ्यास करताना आढळून आले. त्याच्या आधारावर हा अंदाज केला आहे आणि हे अज्ञातवासाचे ठिकाण म्हणजे आळंदीच्या पूर्वेस असलेले 'सोळू' गाव असावे असाही अंदाज अभ्यासांती व्यक्त केला आहे.

**तववरी तिचे शरीर अभंग चिरकाळ निरंतर :** मुक्ताबाईचे स्वरूपाकार होणे, तिच्या देहाचे चिरकाळ निरंतर अभंग अस्तित्व कसे आहे, ही नेमकी काय वस्तुस्थिती आहे याचा विचार या प्रकरणात केला आहे.

## विभाग दोन : मुक्ताबाईच्या प्रभावळीतील संत

स्वत:च्या आध्यात्मिक अधिकाराच्या योग्यतेवर मुक्ताबाईने समकालीन सर्व संतांमध्ये स्वत:चे असे एक स्थान निर्माण केले होते. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव ही सारी मंडळी मुक्ताबाईकडे 'माय' या भूमिकेतून पाहत होती हे आपल्या लक्षात येते आणि ही सारी मंडळी तिच्या प्रभावकक्षेतील आहेत असे आपल्याला जाणवते. तेव्हा या साऱ्यांचे तिच्याशी असलेले अनुबंध समजावून घेण्याचा प्रयत्न या विभागामध्ये केला आहे.

**मुक्ता सख्यत्व आम्हा अर्था प्रसवू लागे :** निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई यांच्यातील अनोख्या नातेसंबंधाचे दर्शन या प्रकरणातून घडते.

**ज्ञानराज ओवाळी अहो मुक्ताबाई :** या प्रकरणामध्ये ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्या नात्याचा वेध घेतला आहे.

**सोपानदेवास कृपा तिची :** या प्रकरणामध्ये मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील अनुबंधाचा शोध घेतला आहे.

**मुक्ताईने बोध खेचरासी केला :** मुक्ताबाई आणि विसोबा खेचर यांच्यातील आध्यात्मिक स्तरावरील संबंधाचे चित्रण यात केले आहे. विसोबा खेचरांचे नेमके गुरु कोण ? ज्ञानेश्वर, मुक्ताबाई की सोपानदेव ? या रहस्याचा उलगडाही या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी :** नामदेवांची मुक्ताबाईबाबतची सुरुवातीची प्रतिक्रिया आणि नंतर त्यात झालेला बदल या सगळ्याचा खुलासेवार उलगडा यात केला आहे. नामदेवांच्या जीवनातील मुक्ताबाईचे महत्त्वपूर्ण स्थान आणि मुक्ताबाईच्या जीवनातील नामदेवभेटीचा प्रसंग याचे स्थान ह्या गोष्टीचा खुलासाही येथे केला आहे.

**मुक्ताबाई सांगे खूण वटेश्वरा :** वटेश्वर हे चांगदेवांचे केवळ उपास्य दैवत नसून ते चांगदेवांचे पूर्वीचे गुरु असल्याचा अंदाज या प्रकरणामध्ये अभ्यासांती नोंदविला आहे.

**मुक्ताबाई जीवन चांगया दिधले :** मुक्ताबाई आणि तिचा शिष्योत्तम चांगदेव यांच्यातील हृद्य नात्याचे दर्शन या प्रकरणामध्ये घडविले आहे. गोरक्षनाथांनंतर गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – मुक्ताबाई अशी परंपरा न सांगता गोरक्षनाथ – मुक्ताबाई अशी आपली परंपरा चांगदेव का सांगत असावेत याचा खुलासा या प्रकरणात केला आहे.

**मुक्ताबाईबद्दल गौरवपर उद्गार :** मुक्ताबाईच्या समकालीन संतांपासून ते आजतागायत अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तींनी मुक्ताबाईबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. ते उद्गार येथे संकलित करण्यात आले आहेत. यामध्ये जनाबाई, कान्होपात्रा, सेना न्हावी, चोखामेळा आणि इतर अनेकांच्या उद्गारांचा समावेश आहे.

## विभाग तीन : मुक्ताबाईचे समग्र वाङ्मय

**सनद दिली स्वतंत्र सद्गुरुराजें :** मुक्ताबाईने विचारलेल्या शंकांचे समाधान ज्ञानेश्वरांनी कसे केले हा सर्व भाग 'श्रीज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेल्या सनदी'मध्ये येतो. त्यातील आशयाचा विस्तृत विचार येथे केला आहे. मुक्ताबाईच्या आध्यात्मिक वाटचालीचे दर्शन यामधून घडते.

**ताटीचे अभंग – ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत :** ताटीचे अभंग निर्माण होण्यास उपस्थित झालेली परिस्थिती, ज्ञानेश्वरांची अवस्था, ह्यामधून मुक्ताबाईने केलेला बोध या साऱ्याचा विचार करून ताटीचे अभंग हे ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत असल्याचे स्पष्ट प्रतिपादन येथे केले आहे. या अभंगांचे महत्त्व केवढे अनन्यसाधारण आहे याची कल्पना त्यातून येईल.

**ज्ञानबोध ग्रंथ – एक 'अपूर्व' उपलब्धी :** मुक्ताबाईचा ज्ञानबोध ग्रंथ ही मुक्ताबाईची एक खास स्वतंत्र अशी रचना आहे. त्या ग्रंथाचा परिचयात्मक विचार या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे. निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला मार्गदर्शन करण्यासाठी केलेली विनवणी, तिला विचारलेले प्रश्न आणि त्याला मुक्ताबाईने दिलेली उत्तरे असे या ग्रंथाचे स्वरूप आहे.

**मुक्ताबाईचे अभंग :** या प्रकरणामध्ये मुक्ताबाईच्या अभंगांचे काही गटामध्ये वर्गीकरण करून त्या त्या गटानुसार विचार केलेला आहे. मुक्ताबाईच्या अभंगांची साहित्यिक दृष्टीने वैशिष्ट्येही यामध्ये नोंदविली आहेत. मुक्ताबाईच्या अभंगांचा आजवर जो विचार होत होता तो प्रकाशित ४२ अभंगांच्या आधारेच होत होता. मुक्ताबाईच्या समग्र अभंगांचा विचार इथे प्रथमच होत आहे असे येथे नमूद करावेसे वाटते.

**मुक्ताबाईची सार्थ गाथा :** मुक्ताबाईचे सकलसंतगाथेमध्ये आजवर ४२ अभंगच प्रकाशित झालेले आहे. मुक्ताबाईच्या अभंगांचा अर्थ लावण्याचे काम आजवर मराठी साहित्यामध्ये झालेले नव्हते. तेव्हा ती अडचण जाणवून मुक्ताबाईच्या अभंगांचा शाब्दिक स्तरावर परंतु त्यातील भावाशी इमान राखण्याचा प्रयत्न करून अर्थ लावण्याचे काम आपल्यापरीने प्रस्तुत संशोधिकेने केले आहे.

**मुक्ताबाईच्या संकलित अभंगांची गाथा :** मुक्ताबाईचे दोनशे ते अडीचशे अभंग असल्याची नोंद वेगवेगळ्या कोशांमधून करण्यात आली होती. मात्र प्रचलित अभंगगाथेमध्ये फक्त ४२ अभंगच समाविष्ट केलेले आढळतात. तेव्हा इतर अभंग जे पूर्वी प्रकाशित झालेले आहेत मात्र विखुरलेल्या स्वरुपात असल्याने जे अलक्षित राहिले होते त्या साऱ्या अभंगांचे संकलन करण्याचा प्रयत्न येथे संशोधिकेने केला आहे. प्रकाशित अभंगांव्यतिरिक्त २०२ अभंग उपलब्ध होऊ शकले आहेत.

## विभाग चार : परिशिष्ट

**पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस :** गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईपेक्षा वेगळी होती आणि गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईचा पूर्वावतार होती असे एक मत ज्येष्ठ संशोधक

डॉ.रा.चिं.ढेरे यांनी मांडले होते आणि त्यामुळे मुक्ताबाई एक की दोन यासंबंधीची मतमतांतरे निर्माण झाली होती. या प्रश्नाचा चिकित्सक विचार या प्रकरणामध्ये केला आहे. आणि ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई हिलाच गोरक्षनाथांचा अनुग्रह लाभला होता. तेव्हा या दोघी जणी भिन्न नाहीत असे साधार विवेचन या प्रकरणामध्ये केले आहे.

**लोकसाहित्यातील मुक्ताबाई :** लोकमानस मुक्ताबाईकडे कोणत्या भावनेतून पाहते याचे स्पष्ट प्रतिबिंब लोकसाहित्यामध्ये पडलेले दिसते. त्याचा संकलनात्मक स्वरूपाचा विचार येथे केला आहे.

या विभागामध्ये पुढे, मुक्ताबाईचा जीवनपट, मुक्ताबाईच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या ठिकाणांचे नकाशातील स्थान, मुक्ताबाईची कुंडली, अभंगांची सूची यांचा समावेश केला आहे.

ज्ञानेश्वरांची भगिनी म्हणूनच ज्ञात असलेल्या मुक्ताबाईचे स्वतंत्र कार्यकर्तृत्व, तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व या पुस्तकाच्या निमित्ताने प्रकाशात येईल असा विश्वास संशोधिकेस वाटतो. मुक्ताबाईच्या अधिकाराची, तिच्या योग्यतेची सुस्पष्ट जाण अभ्यासकांना या निमित्ताने होईल असे वाटते.

मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांची भेट हा एकंदरच महाराष्ट्राच्या आध्यात्मिक इतिहासातील एकमेवाद्वितीय प्रसंग होय. तेव्हा त्याची महत्ता, त्या भेटीचा इतरांवर झालेला परिणाम याचा विस्तृत विचार या पुस्तकात केला आहे. किंबहुना, ह्या भेटीतील महत्त्वपूर्णता हाच या पुस्तकाच्या लेखनाचा केंद्रीय विचार आहे. अभ्यासकांना वेळोवेळी जे प्रश्न पडलेले दिसतात त्याचाही काही खुलासा या अनुषंगाने येथे आला आहे. मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांच्या भेटीचा नीट उलगडा झाल्याने, या साऱ्या भावंडांच्या व समकालीनांच्या संबंधांवर एक वेगळा प्रकाश पडतो. असा प्रयत्न या पुस्तकाद्वारे प्रथमच होत आहे हे समाधानाने नमूद करावेसे वाटते.

**

# संशोधिकेचे मनोगत

माझ्या पीएच्.डीच्या संशोधनाचा विषय 'मराठी संतसाहित्यातील नाथप्रतिपादित सोऽहम् साधना' असा असल्यामुळे साहजिकच मराठी संतांच्या वाङ्मयाचे परिशीलन करावे लागले. ते करत असताना ज्ञानेश्वरांच्या अभंगगाथेबरोबरच निवृत्ति, सोपान, मुक्ताबाई यांच्या अभंगांची गाथाही अभ्यासण्याची आवश्यकता निर्माण झाली. या सर्वच वाङ्मयातील भाषा ही जुन्या वळणाची असल्याने त्यांच्यावरील सार्थ, सटीप विवरणांचा आधार घ्यावा लागतो. ज्ञानेश्वरांच्या अभंग गाथ्याचा अर्थ लावण्याचे काम आजवर झालेले आहे. त्याच्या नवीन, सुधारित आवृत्तीही निघत आहेत. म्हणून त्यांच्या अभंगांचा अर्थ लावताना फारशी अडचण भासत नाही. परंतु हे सारे करत असताना इतर तिघा भावंडांच्या गाथ्याचे सार्थ विवरण आजवर झालेले नाही असे आढळून आले. अनेक ठिकाणी शोध घेऊनही असे विवरण उपलब्ध असल्याचे संशोधिकेस आढळले नाही.

स्वत:च्या पीएच्.डी.च्या संशोधनासाठी म्हणून मुक्ताबाईच्या अभंगगाथ्याचा अभ्यास करत असताना, त्या अभंगांचे काही अर्थ आतून आकलन होत जावेत असा विलक्षण अनुभव आला आणि या अनुभवामुळेच मुक्ताबाईच्या सर्व अभंगांचा अर्थ लिहून ठेवण्याचे काम करण्याची प्रेरणा मनात निर्माण झाली. मुक्ताबाईच्या अभंगांचा समीक्षात्मक विचार आजवर झालेला आहे पण सार्थ विवेचन केलेले आढळत नाही, तेव्हा असे काही काम आपल्या हातून घडले तर अभ्यासकांच्या दृष्टीने त्याचा निश्चित उपयोग होईल अशा भावनेने हे कार्य हाती घेतले.

मुक्ताबाई आणि विद्युल्लता यांचे काही घनिष्ट नाते असल्याचे त्यांच्या चरित्रावरून व वाङ्मयावरून आढळते. ते नाते संशोधिकेस एका वेगळ्या प्रकाराने प्रतीत झाले ते असे, विद्युल्लता एका क्षणात येते आणि अवघा प्रांत काबीज करून जाते तसेच काहीसे या लिखाणाबाबत घडले असे येथे म्हणावेसे वाटते. झाले असे की, स्वत:च्या प्रबंधकार्याचा एक आंशिक भाग म्हणून मी या विषयाकडे वळले होते. परंतु मुक्ताबाईचे अभंग वाचताना जणू तिने माझे मन,

चित्त काबीज करावे असे झाले. मुक्ताबाईच्या अभंगांच्या निमित्ताने तिचे चरित्र, तिच्याबद्दल समकालीन व्यक्तींनी काढलेले गौरवपूर्ण उद्गार यातून मुक्ताबाईबद्दल एक विलक्षण ओढ निर्माण झाली. याविषयाने मी इतकी भारावले गेले की काही काळपर्यंत पीएच्.डी चे संशोधनकार्यही बाजूला पडले. नामदेवांनी ज्ञानदेव-नामदेव भेटीचा वर्णन केलेला प्रसंग, मुक्ताबाईची समाधी हे सारे वाचताना त्यातून काही रहस्यांची उकल होत आहे असे वाटू लागले. या सर्व संतसाहित्याचा केवळ ऐतिहासिक, बौद्धिक दृष्टीने विचार करणे पुरेसे नाही, ही गोष्ट त्यांच्याबद्दलच्या आजवर झालेल्या समीक्षेतून उघड होत होती. तेव्हा याही गोष्टी मांडाव्यात ह्या भूमिकेतून हे लिखाण केले आहे. 'फोडिले भांडार धन्याचा हा माल । मी तो हमाल भारवाही ।।' हा अनुभवच जणू मला या काळात आला.

मुक्ताबाई-गोरक्षनाथ यांची भेट हा मुक्ताबाईच्या जीवनचरित्रातील एक अत्यंत निर्णायक असा प्रसंग आहे. हा प्रसंग नीट लक्षात न घेतला गेल्यामुळे मुक्ताबाई एक की दोन असे काही प्रश्न अभ्यासकांमध्ये निर्माण झाले होते. गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेशभगिनी मुक्ताबाईपेक्षा भिन्न होती असे मतही रूढ झाले होते. या साऱ्याचा चिकित्सक विचारही या निमित्ताने येथे होत आहे.

मुक्ताबाईसंबंधी सर्व मुद्रित साहित्य अभ्यासत असताना एक महत्त्वपूर्ण भाग हाती लागला. मुक्ताबाईच्या अभंगांचा विचार करताना बहुतांश सर्व अभ्यासक, समीक्षकांनी त्यांच्या उपलब्ध बेचाळिस अभंगांचाच विचार केला आहे. १९२७ सालच्या 'मुमुक्षू' च्या अंकामध्ये श्री.ल.रा.पांगारकर यांनी ज्ञानेश्वरादी मंडळीचे अप्रसिद्ध पण नवोपलब्ध अभंग प्रकाशित केले होते. त्याची फारशी दखल अभ्यासक घेताना दिसत नाहीत. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ग्रंथालयात जीर्ण अवस्थेत उपलब्ध झालेले हे अभंग पुन्हा छापील स्वरूपात मांडले तर ते सर्वांना सहज उपलब्ध होऊ शकतील आणि त्याची आयुर्मर्यादाही वाढेल या भावनेने ते सर्व अभंग येथे जसेच्या तसे समाविष्ट करत आहे.

विविध कोशांमध्ये मुक्ताबाईसंबंधी अशी माहिती दिलेली आढळते की मुक्ताबाईचे दोनशे-अडीचशे अभंग आहेत. तेव्हा वरील उपलब्ध अभंगांखेरीज इतरत्र कोठे हे अभंग आढळतात का तेही शोधण्याचा प्रयत्न केला. अशा

प्रयत्नामध्ये आजवर प्रकाशित झालेले पण विखुरलेले असल्याने दुर्लक्षित राहिलेले असे अभंगही मिळाले. ते येथे संकलित केले आहेत. त्यामध्ये मुक्ताबाईच्या 'ज्ञानबोध' या ग्रंथाचाही समावेश आहे. मात्र त्या ग्रंथात निवृत्तिनाथांनी जे प्रश्न मुक्ताबाईसमोर उपस्थित केले आहेत त्याचा समावेश येथे जागेअभावी केला नाही.

मुक्ताबाईचे चरित्र हाही या पुस्तकाचा एक महत्त्वपूर्ण असा भाग म्हणावा लागेल. आजवर मुक्ताबाईचे चरित्र लिहिण्याचे तुरळक प्रयत्न झालेले आहेत. त्यामध्ये समाजात प्रचलित असलेल्या आख्यायिका, कथा यांचा आधार घेऊन हे लिखाणकाम झालेले आढळते. मुक्ताबाईच्या योग्यतेचा विचार न करता, त्या त्या प्रसंगांची तिच्या आयुष्यातील शक्याशक्यता लक्षात न घेता काही प्रसंग या चरित्रकारांनी रंगवून सांगितले आहेत. त्यामध्ये नग्नस्थितीतील मुक्ताबाईला चांगदेवांनी पाहणे आणि त्याचा निगुऱ्या म्हणून तिने उल्लेख करणे हा प्रसंग बहुतेक सर्व चरित्रकारांनी रंगविला आहे याचे सखेद आश्चर्य वाटते. श्यामजी मरुद्गण आणि महिपती यांनी हा प्रसंग रंगविला असल्याने सर्वांनी तो खरा असावा असे गृहित धरून लिखाण केले आहे. परंतु स्वतःच्या तर्काच्या कसोटीवर या प्रसंगाची शक्याशक्यता पडताळून न पाहता सर्वांनी त्याला मान्यता द्यावी ही गोष्ट खेदजनक वाटते. म्हणून मुक्ताबाईचे चरित्र तिच्या स्वतःच्या व तिच्या समकालीनांच्या अभंगांमधूनच कसे उलगडत जाते हे पाहण्याचा एक वस्तुनिष्ठ प्रयत्न प्रस्तुत संशोधिकेने केला आहे. असा प्रयत्न करणे गरजेचे वाटले ह्याचे दुसरे कारण असे की, ज्ञानेश्वरांच्या कार्यकर्तृत्वाच्या प्रकाशाने मुक्ताबाईचे चरित्र झाकोळून जावे असे काहीसे आजवर घडलेले आढळले. पण येथे मुक्ताबाई एक स्वतंत्र अस्तित्व या भूमिकेतून तिच्या चरित्राचा विचार केला आहे.

मुक्ताबाईच्या चरित्राचा विचार करत असताना, तिच्या सहवासात आलेल्या इतर व्यक्ती, तिच्या पदस्पर्शाने पावन झालेली ठिकाणे, लोकसाहित्यात तिचे उमटलेले प्रतिबिंब, मुक्ताबाई आणि तिची जन्मकुंडली यासारख्या अनेक अंगांनी तिचा वेध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे. मुक्ताबाई ज्या ठिकाणी वावरल्या त्या ठिकाणांना स्वत: भेट देऊन त्यासंबंधी माहिती मिळविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, हे येथे नमूद करावेसे वाटते.

हे सारे करत असताना ह्या पुस्तकामध्ये काही त्रुटीही राहून गेल्या आहेत त्याचीही मला जाणीव आहे. सर्व लेखनामध्ये अभंगांचा केलेला वापर हा वाजवीपेक्षा जास्त आहे, असे वाटण्याचीही शक्यता आहे. परंतु हे करत असताना त्यामागे भूमिका आहे ती अशी; मुक्ताबाईचा काळ आणि आज आपण ज्या काळात वावरत आहोत तो काळ यामध्ये फार मोठा कालावधी निघून गेलेला आहे. तेव्हा आपल्याला आज जर मुक्ताबाईसंबंधी एखादे विधान करावयाचे झाले तर त्यांच्या अभंगांचा आधार घेऊनच बोलावे लागणार हे उघड आहे. हे लिखाण शक्य तेवढे वस्तुनिष्ठ आणि वस्तुस्थितीला धरून व्हावे या हेतूने अभंगांचा आधार घेतघेतच हे लिखाण केले आहे. दुसरी त्रुटी म्हणजे यामध्ये काही ठिकाणी पुनरावृत्तीही झाली आहे. परंतु त्या त्या ठिकाणी तो विचार करणे प्रकरणांच्या दृष्टीने गरजेचे ठरल्याने तो दोष पत्करूनही ते लिखाण केले आहे.

आणखी एका गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. श्री.का.अ.जोशी सकलसंतगाथेच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''इतर क्षेत्रात जसे संशोधन झाले आहे तसे संतवाङ्मयातही झाले आहे व होत आहे. पण सामान्यपणे संशोधकांची दृष्टी शब्दप्रामाण्यावर असते, त्याप्रमाणे या अभंगांचे संशोधन करण्यातही बहुधा संशोधक शब्दप्रामाण्यावरच जास्त भर देतात. पण अभंग हे उत्स्फूर्त आलेले असतात. त्यामुळे नुसत्या शब्दांच्या अर्थावरून केलेले तर्क पुष्कळ वेळा विसंगत ठरतात. ज्या भावातून अभंग निर्माण झाले त्या भावात जर आपण गेलो तरच त्या त्या शब्दांचा अर्थ आपल्याला लागेल. खरोखरच ती एक अनुभूती आहे. नुसते शब्दांचे अर्थ लावून त्यावरून तर्क काढून आपण कोठेही पोहोचू शकणार नाही. त्या भावात राहून अर्थ लावला आणि त्यावरून तर्क केले तर ते सुसंगत ठरतील. शाब्दिक कीस काढून काही उपयोग होणार नाही.''

याच मनोभूमिकेशी साधर्म्य राखत हे काम करण्याचा आपल्या परीने पण प्रामाणिकपणाने प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. असे करत असताना, मुक्ताबाई ज्या उच्च मनोभूमिकेतून प्रतिपादन करत आहेत तो अर्थ नीट लक्षात न येणे ही शक्यताही येथे नाकारता येत नाही. मात्र अर्थाचा अनर्थ होणार नाही एवढी खबरदारी बाळगण्याचा येथे जरूर प्रयत्न केला आहे. मुक्ताबाईची उच्च स्थिती समजून घेण्यासाठी तशीच अधिकारी व्यक्ती पाहिजे हे निर्विवाद सत्य पण तरीही

अभ्यासक या नात्याने, त्यामागील भाव जाणून अभंगांचा अर्थ लावण्याचा प्रयास संशोधिकेने केला आहे. त्याहूनही सरस प्रकारे अर्थ लावण्याचे काम करताना उद्या एक पाऊलवाट म्हणून हे काम उपयोगी पडले तर या कामाचे निश्चित चीज झाले असे वाटेल. एवढ्या साध्या भूमिकेने हे लिखाण केले आहे.

उपलब्ध आधाराच्या साहाय्याने शक्य होईल तेवढा जास्तीत जास्त मुक्ताबाईच्या जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून सत्याचे काही कवडसे हाती लागल्यासारखे वाटतात. परंतु हे संशोधनही अंतिम नाही याची जाणीव मला आहे. उद्या अधिक पुरावे समोर आले तर दुसऱ्या एखाद्या संशोधकास त्या पुराव्यांच्या प्रकाशात सत्याच्या अधिक जवळ जाता येईल, असेही घडू शकेल. विज्ञानात जसे सातत्याने संशोधन चालूच राहते, तसेच या क्षेत्रातील संशोधनाबाबतही सत्य आहे असे म्हणावेसे वाटते. आजचे सत्य हे उद्या खोटेही ठरू शकते कारण नवीन प्रकाशात उपलब्ध पुराव्यांचा काही अधिक चांगला उलगडा होऊ शकतो.

प्रस्तुत पुस्तकामध्ये अभ्यासांती जे निष्कर्ष संशोधिकेने नोंदविले आहेत त्याबद्दल इतरांची मते भिन्न असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु अशा प्रकारच्या वैचारिक मंथनामधूनच संशोधन अधिक पूर्णत्वाला जाते असा संशोधिकेचा विश्वास आहे.

अध्यात्मशास्त्राचा आजवर झालेला विकास आणि पुढे अपेक्षित असलेला विकास यासंबंधीचे शास्त्रीय विवेचन श्रीअरविंदांनी आपल्या तत्त्वज्ञानात केले आहे. मुक्ताबाईच्या जीवनाचा उलगडा होण्यासाठी मला पाँडिचेरीच्या श्रीअरविंद आणि मदर यांच्या तत्त्वज्ञानाचा फार उपयोग झाला. त्या आधाराशिवाय मला मुक्ताबाईच्या आध्यात्मिक जीवनाची उकल होणे केवळ अशक्य होते हे पुन:पुन्हा जाणवत राहिले.

मुक्ताबाईसंबंधी अजूनही पुष्कळसे संशोधनकार्य बाकी आहे, हे सातत्याने जाणवत राहिले. भावी काळात या आजवर उपेक्षित राहिलेल्या महत्त्वपूर्ण भागाकडे संशोधकांचे लक्ष वळेल अशी आशा वाटते.

**

# ऋणनिर्देश

'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं' ह्या ग्रंथाचे काम करीत असताना मला अनेकानेक व्यक्तींचे सहकार्य लाभले.

या सर्व कामामध्ये मला प्रामुख्याने मोलाची मदत झाली ती पुण्यातील पुढील ग्रंथालये आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांची : जयकर ग्रंथालय, भांडारकर इन्स्टिटट्यूट, रामकृष्ण मठ, मातृस्मृती, नगर वाचन मंदिर, महाराष्ट्र साहित्य परिषद, भारत इतिहास संशोधक मंडळ, गरवारे वाणिज्य महाविद्यालय. मुक्ताबाईसंबंधी मला आवश्यक असलेली पुस्तके या सर्व ग्रंथालयातून मला वेळोवेळी उपलब्ध होऊ शकली त्यामुळेच हे संशोधन शक्य झाले.

मुक्ताबाईच्या वाङ्मयाचा अभ्यास करताना ज्या ग्रंथावाचून तो अभ्यास पूर्णच होऊ शकला नसता असा ग्रंथ म्हणजे 'ज्ञानबोध'. नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाचे श्री. सुरेश जोशी व त्यांचे कुटुंबिय यांच्या साहाय्याने मला तो ग्रंथ प्राप्त झाला.

'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायी' या पुस्तकाचा, मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांची भेट हा गाभाभूत असा विचार आहे. या भेटीला आधार म्हणून दाखविता येतील असे अभंग कै.ल.रा.पांगारकर यांना हस्तलिखित स्वरूपात मिळाले. आणि ते त्यांनी 'मुमुक्षू'च्या १९२७ सालच्या अंकांमध्ये प्रकाशित केले होते. तेव्हा त्यांच्याविषयीची कृतज्ञताही माझ्या मनात जागी होते.

डॉ.रा.चिं.ढेरे, डॉ.सुशीला पाटील यांसारख्या अभ्यासक मंडळींनी मुक्ताबाईसंबंधी जे आजवर लिखाण केले, त्या अभ्यासातून जे अनेक प्रश्न उपस्थित केले, लोकांसमोर मांडले त्या प्रश्नांमुळेही संशोधिकेच्या अभ्यासाला एक दिशा मिळाली म्हणून त्यांचाही कृतज्ञतेने उल्लेख या ठिकाणी मला करावासा वाटतो.

मला विशेष उल्लेख करावासा वाटतो तो माझे पीएच्.डी.चे मार्गदर्शक असलेल्या डॉ.अशोक कामत सरांचा. स्वत:ची स्वतंत्र मते मांडण्यासाठी त्यांनी दिलेले स्वातंत्र्य हे मला विशेष महत्त्वाचे वाटते. या त्यांच्या वृत्तीचे एक अभ्यासक म्हणून मी निश्चितच स्मरण ठेवले पाहिजे असे मला वाटते.

तत्त्वज्ञानाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री.मो.प्र.मराठे यांनी केलेले मार्गदर्शनही मला मोलाचे वाटते. या सर्व कामामध्ये मला माझ्या कुटुंबियांचे व माझ्या मित्रपरिवाराचे सहकार्य लाभले. या सर्वच लिखाणासाठी मला ज्ञातअज्ञात अशा अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले. मुक्ताबाईच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर,

**म्हणे मुक्ताबाई जाणली न जाणती**
**असो सर्वभूती नमन माझे ।।**

अशा भावनेने सर्वांना वंदन करून ही कृतज्ञता व्यक्त करते.

**डॉ.केतकी मोडक**

**

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

संत मुक्ताबाईवरील या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन होऊन आता सुमारे पाच वर्षं झाली. या पाच वर्षांकडे मागे वळून पाहताना मला जाणवते की या पुस्तकाने मला खूप काही दिले आहे. पुस्तक लेखन, प्रकाशन, वितरण, पुरस्कार, प्रसिद्धी या साऱ्या प्रवासातून मुक्ताबाईने मला अनुभवांनी खूप समृद्ध केले.

संत मुक्ताबाईवरील हे संशोधनपर काम ! तसे म्हटले तर हा अभ्यासविषय आंतरविद्याशाखीय आहे. तत्त्वज्ञान, साहित्य, इतिहास, अध्यात्म या साऱ्यांनाच स्पर्श करणारा हा विषय आहे. या पुस्तकाची दखल या सर्वच क्षेत्रातील विद्वतजनांनी, त्यातील नामांकित संस्थांनी घेतली. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद, संगमनेर इतिहास संशोधन संस्था, पुणे नगर वाचन मंदिर, ज्ञानप्रबोधिनी निगडी या पाच विख्यात संस्थांचे पुरस्कार या पुस्तकाला लाभले.

पावसच्या स्वामी स्वरूपानंदांच्या आशीर्वादस्वरूपात, माझी योगायोगाने श्री.मधुभाऊ पटवर्धन आणि श्री.पद्माकर नांदुरकर यांची भेट झाली. आणि या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचा योग अनपेक्षितपणे जुळून आला. वरवर दिसणाऱ्या धकाधकीच्या जीवनप्रवाहाच्या आतमधून शांतपणे, नि:शब्दपणे मुक्ताबाईचे कार्य आजही चालू आहे याची एक प्रचितीच या साऱ्याच्या माध्यमातून आली. या परते अधिक काय बोलावे ? व्हावे समर्पित हेचि बरे !

**डॉ.केतकी मोडक**

# विभाग एक

## मुक्ताबाईचे जीवन

मोतियांचा चुरा फेंकिला अंबरी । विजूचिया परी कीळ झालें ।।

जरी पितांबरे नेसविली नभा । चैतन्याचा गाभा नीळबिंदू ।।

तळीपरी परसे शून्याकार झालें । सर्पाचींहि पिलें नाचूं लागे ।।

कडकडोनी वीज निमाली ठायींचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ।।

ज्ञानदेव म्हणे कैसी झाली भेट । ओळखिलें अविट आपुलेंपण ।।

# चित्कला मुक्ताबाई

'तैसी दशेचि वाट न पाहता । वयसेचिया गावा न जाता ।
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।।'

असे ज्यांच्याबद्दल यथार्थपणे म्हणता येते अशी ज्ञानेश्वरादी चार भावंडे. या सर्वच भावंडांचे जीवन एका अलौकिक प्रभेने तेजाळलेले दिसते. भौतिकातील अडीअडचणी, निंदा, उपेक्षा, बहिष्कृत जीवन इ. गोष्टी वाट्याला येऊनही त्यामुळे विचलित न होता स्वत:च्या आत्मसामर्थ्याच्या प्रकाशात वाटचाल करणारी ही भावंडे. स्वत: तरुन विश्व तारणारी ही भावंडे. आध्यात्मिक योग्यतेच्या दृष्टीने सममेळ असणारी निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई ही भावंडे; परंतु ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व जनमानसावर इतक्या प्रभावीपणे ठसावले गेले की इतर तिन्ही भावंडे त्यापुढे काहीशी अलक्षित वाटतात. मुक्ताबाई हे या भावंडांमधील एक आगळे व्यक्तिमत्व. त्यांच्या चरित्राचा वेध घेण्याचा हा एक प्रयत्न.

मुक्ताबाईचा जन्म, त्यांचे जीवन, त्यांची समाधी या साऱ्या गोष्टी म्हणजे एक स्वयंभू चमत्कार आहे. अशा या अद्वितीय जीवनाच्या मूळाकडे दृष्टी टाकली तर त्यांचे अलौकिकत्व कळण्यास थोडी मदत होईल. संन्याशाची मुले म्हणून लोकजीवनाच्या दृष्टीने ही भावंडे निंदेला पात्र झाली आणि शास्त्राच्या दृष्टीने ती व्रतबंधाला अपात्र ठरली, तरी या भावंडांच्या पित्याच्या संन्यस्त वृत्तीतच त्यांचे अलौकिकत्व साठवलेले दिसून येते. त्यांचे वडील विठ्ठलपंत. ते मूळचे आपेगावचे, वृत्ती संन्यस्त, आंतरिक ओढ तपाकडे, घरदार संसार याबाबत निरासक्त, वेदविधानांचा दांडगा अभ्यास व तीर्थयात्रेची ओढ. अल्प काळात ते शास्त्रवेत्ते झाले. जवळपास संपूर्ण भारतभर भ्रमण करून भगवत्‌चिंतनात आळंदीला येऊन पोहोचले.

तेथे राहणाऱ्या सिद्धोपंतांना त्यांच्या कन्येसाठी वर म्हणून विठ्ठलपंतांची मूर्ती डोळ्यांत भरली. आग्रहाने सिद्धोपंतांनी त्यांना भोजनास बोलाविले. त्याच रात्री सिद्धोपंतांना पांडुरंगाचा दृष्टान्त झाला व आपली मुलगी त्यांना अर्पण करून सालंकृत कन्यादान करण्याचा आदेश मिळाला.

विठ्ठलपंतांनाही दुसऱ्या दिवशी असा आदेश मिळाला, 'विठ्ठलपंता, तुझ्या ठिकाणी ज्ञान, भक्ती व वैराग्य पूर्णरूपाने आहे. तुझ्यापासून सिद्धोपंतांच्या कन्येच्या उदरी ब्रह्मा, विष्णू व महेश या तीन देवता आणि आदिशक्ती जन्माला येणार असल्यामुळे तिच्याशी विवाह करावा.' त्यानुसार त्यांचे लग्नही झाले. पण पुढे विठ्ठलपंतांना वैराग्य प्राप्त झाल्यामुळे, ते पत्नीच्या अनुमतीवाचून संन्यास घेऊन काशीस जाऊन राहिले. परंतु ज्या थोर ब्रह्मनिष्ठ यतीच्या हस्ते संन्यासदीक्षा घेतली, त्याच यतीच्या आदेशावरून संन्यासाश्रम सोडून पुन्हा गृहस्थाश्रमी झाले. काशीहून आळंदीस येऊन राहिले व बारा वर्षे गृहस्थाश्रमाचे आचरण केले. ही सर्व नियतीचीच योजना की, एका निर्विकार व निवृत्त जीवाच्या ठिकाणी प्रवृत्तीचा कोंब उगवून, ब्रह्माला व आदिशक्तीला आपले निर्गुण रूप सोडून सगुण रूपात अवतरित व्हावे लागले. निर्गुण व निराकार अशाला सगुण साकारात येण्याकरता गंगेप्रमाणे पवित्र व निर्मळ बीजाची आवश्यकता असणे उघड आहे. म्हणून त्यांच्या संन्यस्त वृत्तीतच त्यांच्या संसाराचे श्रेष्ठत्व साठवलेले दिसून येते. विठ्ठलपंतांच्या निरिच्छ वृत्तीतूनच निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई या भावंडांचा जन्म झाला.

विठ्ठलपंताचे सर्वच जीवन दु:ख व आपत्तीत व्यतीत झालेले दिसते. परंतु त्याही अवस्थेत श्रेष्ठ व ज्ञानी विद्वज्जनांचा त्यांनी कधी अवमान केला नाही. इतकेच नव्हे तर देहान्त प्रायश्चित्ताची आज्ञा झाल्यावर तीही त्यांनी शिरसावंद्य मानली. स्वत:च्या लहान बालकांना थोरल्या निवृत्तिनाथांवर सोपवून समाजजीवनातून बहिष्कृत अशा अवस्थेत त्यांना सोडून, त्रिवेणीत आत्मोत्सर्ग करण्याकरता ते निघून गेले. एवढे विलक्षण साहस, तेही ज्ञानाच्या, संयामाच्या व धैर्याच्या आधारावर ! 'केवळ चिदंशाचा पाईक' अशी शुद्ध जाण असल्याशिवाय असे धैर्य येणे शक्य नाही. 'शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।' याचा साक्षात् प्रत्यय म्हणजे ही चार भावंडे.[१]

शके ११९५ मध्ये निवृत्ति, शके ११९७ मध्ये ज्ञानेश्वर, शके ११९९ मध्ये सोपान तर मुक्ताबाई शके १२०१ मध्ये या भूतलावर प्रकटली.[२] (जन्मशकाबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. निवृत्तिनाथांचा जन्म ११९० साली, ज्ञानेश्वरांचा ११९३ मध्ये, सोपानदेवांचा ११९६ मध्ये तर मुक्ताबाईचा

जन्म ११९९ मध्ये झाला असे परंपरा मानते.) आदिशक्तीरूप असणारी मुक्ताबाई जन्मली तीही आश्विन शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच नवरात्राच्या पहिल्या दिवशी !

मातापित्यांनी देहत्याग केला तेव्हा मुक्ताबाई अवघी चार वर्षांची होती. त्र्यंबकेश्वरी आईवडिलांसह केलेले भ्रमण ही मुक्ताबाई आणि त्यांचे मातापिता यांच्या संबंधातील महत्त्वपूर्ण घटना म्हणून सांगता येते. त्यातही निवृत्तिनाथांच्या शोधासाठी निर्माण झालेली अस्वस्थता, मुलांना धर्मात प्रवेश मिळावा यासाठी असणारी दुश्चित्तता यामध्ये मातापिता व्यग्र असणार. तेव्हा मुक्ताबाईस त्यांच्या प्रेमळ वात्सल्याचा आलेला अनुभवही तुटपुंजाच असणार, हेही उघड आहे. तीन ज्ञानी भावंडांच्या पाठीवर जन्माला आलेली मुक्ताबाई आईवडिलांच्या मृत्यूनंतर अशा परिस्थितीत एकदम प्रौढ न बनली तरच नवल ! आई आणि वडील जेव्हा या भावंडांना सोडून गेले तेव्हा निवृत्ति आणि ज्ञानेश्वर कोरान्न आणायला जात असत आणि सोपानदेव मुक्ताबाईला सांभाळत असत. आईवडिलांविना पोरकी झालेली ही भावंडे, त्यांच्यावर मायेची पाखर घालण्याचे कार्य सर्वात लहान असूनही मुक्ताबाईने केलेले आढळते. लहानशी मुक्ता बालपण फारसे न अनुभवताच एकदम पोक्त झाली.

बिकट अशा परिस्थितीमुळे मुक्ताबाई भौतिकदृष्ट्या एकदम पोक्त झाली तर दुसरीकडून सद्गुरु निवृत्तिनाथांनी नाथसंप्रदायाची दीक्षा दिल्याने ती आध्यात्मिकदृष्ट्याही प्रौढ बनली.

'आसनाचिया पाउटी । प्रौढ व्हावे सद्गुरुच्या पोटी ।
तेथे आत्मगुह्याचिया गोष्टी । संपादाव्या ।।' [३]

हा मुक्ताबाईचा स्वत:चा अनुभव होता. अशा रीतीने अगदी लहान वयातच मुक्ता ही मुक्ताबाई बनली, मुक्ताई बनली.

निवृत्तिनाथ हे मुक्ताबाईचे दीक्षागुरु. ज्ञानेश्वरांनाही निवृत्तिनाथांनीच दीक्षा दिली होती त्यामुळे ज्ञानेश्वर व मुक्ताबाई या दोघांमध्ये आता केवळ लौकिक बहिणभाऊ असे नाते शिल्लक राहिले नव्हते. तर ते आता गुरुबंधुभगिनी बनले होते. सद्गुरु केंद्रस्थानी मानून त्यांच्याभोवती प्रेम, आदर, भक्ती, ज्ञान इ.ची गुंफण या दोघांमध्ये समानतेने घडत होती. आणि म्हणूनच

केवळ कौटुंबिक नात्यामधून येणाऱ्या जवळिकीपेक्षा या दोघांमध्ये विशेष असा अनुबंध निर्माण होत गेला. ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्यामध्ये एक समजदार गुंफण होत होती. निवृत्तिनाथांनी दिलेल्या साधनामार्गावरून दोघेही सहप्रवास करीत होते. मुक्ताबाईला आलेल्या शंका तिने ज्ञानेश्वरांना विचाराव्यात आणि ज्ञानेश्वरांनी तिचे समाधान करावे, ज्ञानेश्वरांच्या मार्गदर्शनाने मुक्ताने पुढची वाटचाल सुरु करावी असे सारे चालले होते.

''मूळद्वारी दादा स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ती कैशी झाली ।।
मायेचा बंबाळ जाये एकसरा । इच्याही आधारा सांगा दादा ।।
ब्रह्मांड व्यापिले आकाश कवळिले । सर्व काही व्यापिले मायेनेचि ।।
माया कैशी दादा सांगता निर्गुण । मुक्ताबाई म्हणे भिन्न फोडा ।।'' ४

अशा प्रकारचे गूढ, गहन, गंभीर प्रश्न मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना विचारत असे.तिची जिज्ञासा पाहून ज्ञानेश्वरही तिला भरभरून ज्ञान बोध देत असत. मुक्ताबाई त्याआधारे रोजच्या रोज स्वत:ची उन्नती करून घेत होती. असे चालू असतानाच एक दिवस मुक्ताबाईला एक विलक्षण अनुभव आला. त्या अनुभवाबद्दल ती ज्ञानेश्वरांना सांगू लागली,

''सहज समाधि लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी न चले पुढे ।।
खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।।
गळाली इंद्रिये राहिलेसे मन । झाले महाशून्य एकाएकी ।।'' ५

ज्ञानेश्वरांना मुक्ताबाईने प्राप्त करून घेतलेल्या उच्च दशेची जाणीव झाली आणि मुक्ताबाईस त्यांनी अत्यंत समाधानाने म्हटले,

''आठवे समाधिचे अंग आले तुज । आता नाही काज आणिकांसी ।।
ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । निवृत्तिचे पायी सर्व सुख ।।'' ६

एक निश्चित अशी उच्च दशा प्राप्त झाल्यावर ज्यांच्यामुळे हे घडते त्यांच्याबद्दल तिच्या मनात अपार अशी कृतज्ञतेची भावना निर्माण झाली.

''वरी निवृत्तिकृपा । पुढे ज्ञाननंदादीपा ।
सोय जाली मूल सरिता । लंघावया ।।'' ७

असे उद्गार तिच्या मुखातून नकळत प्रस्फुटित झाले.

सद्गुरुबद्दलची ही तिची कृतज्ञता तिच्या प्रत्येक लहानसहान

कृतीमधूनही व्यक्त होत होती. सद्गुरुचा कोणताही शब्द ती खाली पडू देत नसे. आणि एक दिवस निवृत्तिनाथांनी सहज तिच्यापाशी मांडे खाण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा मुक्ताबाईने मांडे तयार करण्यासाठी लागणारी सारी पूर्वतयारी केली आणि मातीचे परळ आणण्यासाठी कुंभारवाड्यात गेली. परळ घेऊन निघालेल्या मुक्ताबाईला वाटेतच विसोबा चाटीने हटकले. तिच्या हातातील परळ हिसकावून घेतले, ते फोडून टाकले आणि आता पुन्हा कोणीही मुक्ताबाईला परळ देऊ नये अशी ताकीदही कुंभारवाड्यात त्याने सर्वांना दिली. विसोबा हे त्या गावातील मोठे प्रस्थ होते. अडीअडचणीला सर्वांना पैश्यासाठी त्याचेच पाय धरावे लागत. तेव्हा त्यांचा उगाच रोष नको म्हणून सर्वांनीच विसोबांची ही आज्ञा पाळली. मुक्ताबाई निराश होऊन घरी परतली. सद्गुरुंची एक साधीशी इच्छाही आपणास पुरी करता येऊ नये याचे तिला विलक्षण दु:ख झाले होते. तिचा उतरलेला चेहरा पाहून तिच्या मन:स्थितीची कल्पना ज्ञानेश्वरांना आली. मुक्ताबाईची अडचण सोडविण्यासाठी मग त्या योग्याने योगप्रक्रियेने स्वत:चा जठराग्नि प्रज्वलित केला आणि त्यावर मुक्ताबाईने मांडे भाजले. या भावंडांची फजिती पाहावी या हेतूने आलेले विसोबा हा सारा प्रकार पाहून आश्चर्यचकित झाले. या मुलांच्या असामान्यतेची त्यांना कल्पना आली. त्यांचे उच्छिष्ट सेवन केल्याने आपल्या पापांचे प्रायश्चित होऊन आपला उद्धार होईल या कल्पनेने विसोबा त्यांचे उष्टे अन्न खाऊ लागले. ''विसोबा, तू खेचराप्रमाणे (भूताप्रमाणे) उष्टे का खातोस ?'' असा प्रश्न मुक्ताबाईने तेव्हा केला. तर ज्ञानेश्वरांनी त्यांना 'परता सर' असे म्हटले. 'परता सर' हे ज्ञानेश्वरांचे शब्द ऐकताच, तोच जणू गुरुपदेश असे मानून, तेच शब्द प्रमाण मानून विसोबा

---

टीप : येथे मुक्ताबाईच्या जीवनाचा विचार करत असताना सर्वरूढ असलेल्या अशा काही आख्यायिकांचा आधार घेतला आहे. ज्ञानेश्वरांच्या पाठीवर मुक्ताबाईने मांडे भाजणे, ज्ञानेश्वरांनी भिंत चालविणे, किंवा रेड्यामुखी वेद वदविणे हे प्रसंग आख्यायिकेच्या रूपाने जनमानसात रूढ आहेत. त्यापाठीमागच्या वैज्ञानिक किंवा आध्यात्मिक रहस्याचा शोध येथे घेतलेला नाही. कारण या आख्यायिका प्रामुख्याने ज्ञानेश्वरांच्या जीवनाशी निगडीत आहेत. तेव्हा मुक्ताबाईच्या चरित्रामध्ये त्या फक्त संदर्भादाखलच घेतल्या आहेत, हे येथे नमूद करावेसे वाटते.

परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी यांच्या पलीकडे सरकले. परेच्याही परते जाऊन स्थिरावले. आता ते 'विसोबा खेचर' या नावाने ओळखले जाऊ लागले. निमित्त होते छोट्याशा प्रसंगाचे पण त्यातूनच केवढा महान परिणाम साधला गेला होता.

आता आळंदी केव्हाच मागे पडली होती. आळंदीकर ब्राह्मणांचे पत्र घेऊन चारही भावंडे शुद्धिपत्र मिळविण्यासाठी पैठणला आली. ब्रह्मसभेपुढे या भावंडांनी आपापली नावे सांगितल्यावर सर्वांनी त्यांची खिल्ली उडविली.

'निवृत्ति नाम आणि प्रवृत्ती बांधला । सोपान अवघडला प्रत्यवाई ।
मुक्ताबाई आणि मुक्तीची सुराणी । ज्ञानदेवो आणि पातित्य भोगी ।।' [८]

अशा प्रकारच्या हेटाळणीला त्यांना तोंड द्यावे लागले. स्वाभिमानी अशा मुक्ताबाईस ही अवहेलना जिव्हारी लागून राहिली असावी. मात्र याप्रसंगी तिने आपले स्वत:चे मूळ रूप उघड करून दाखविले नाही. 'ज्ञाना' हेच नाव असणाऱ्या रेड्याकडून वेद म्हणून दाखवावेत असा आव्हानात्मक प्रसंग ज्ञानेश्वरांपुढे उभा ठाकला. निवृत्तिच्या आज्ञेने आणि मुक्ताबाई व सोपान यांच्या प्रोत्साहनाने ज्ञानेश्वरांनी ते आव्हान लीलया पेलले. पशुमुखातून वेद ऐकण्यास मिळाल्यावर मात्र सारेजण आश्चर्यचकित न झाले तरच नवल !

'हे तिन्ही अवतार तीन देवाचे । आदिमाता मुक्ताई मुक्तपणे अवतरली ।।' [९]

अशा शब्दात त्या साऱ्या ब्रह्मवृंदाची प्रतिक्रिया व्यक्त झाली. या भावंडांना क्षुद्र लेखणाऱ्या पैठणकरांनीच

'ज्ञानेशो भगवान विष्णु: निवृत्तिर्भगवान हर: ।
सोपान भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ।।' [१०]

असा त्यांचा गौरव केला. पैठणमध्ये अनेक ग्रंथांचे अवलोकन या भावंडांनी केले. कालिकेचे दर्शन, वेदांतव्याख्यानप्रवचने असा त्यांचा दिनक्रम पैठणमध्ये चालू होता. पुराण, हरीकिर्तन या साऱ्यामुळे त्यांनी पैठणकरांची मने जिंकून घेतली होती. मुक्ताबाई मात्र जेव्हा पाहावे तेव्हा तुर्यावस्थेतच दिसे. 'तुर्यावस्थारता सुता मुक्ता' [११] असेच मुक्ताबाईचे सर्वांना दर्शन घडत होते.

स्वत:च्या शब्दपांडित्याच्या आधारावर स्वत:ला ज्ञानी म्हणवून घेणारी विद्वत्मंडळी, आणि केवळ त्यांच्या कोरड्या, पोकळ शब्दांनीसुद्धा त्यांच्या भजनी लागणारी सामान्य जनता, चमत्काराने भारावून जाणारी सामान्य जनता,

या साऱ्यांचे एक व्यापक स्वरूपाचे दर्शनच जणू येथे ज्ञानदेवांना घडत होते. विद्वज्जनांच्या क्षेत्रातच शब्दज्ञानाची, पोकळ पांडित्याची शुद्धज्ञानावर होणारी कुरघोडी ते उघड्या डोळ्यांनी पाहत होते. शब्दशास्त्राने विलक्षण क्लेश झालेले ज्ञानेश्वर, वारंवार चिंतनमग्न झालेले मुक्ताबाई पाहत होती. ज्ञानेश्वरांमधला हळूहळू होत चाललेला बदल तिच्या सूक्ष्म नजरेला जाणवत होता. ज्ञानाची कवाडे ते मिटून घेत आहेत आणि दिवसेंदिवस जास्त जास्तच आत्ममग्न होत चालले आहेत हे तिला जाणवत होते. साऱ्या जगावरच रुष्ट झाले असावे असे ज्ञानेश्वरांचे हे वागणे पाहून मुक्ताबाईला त्यातील गांभीर्य लक्षात आले. दोघांच्या नात्यातील लडिवाळपणाचा आधार घेत मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना समजावले,

“योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।
विश्वरागे झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ।
लडीवाळ मुक्ताबाई । जीव मुदल ठायीचे ठायी ।
तुम्ही तरुनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।” [१२]

मुक्ताबाईच्या विनवणीचा अचूक परिणाम ज्ञानेश्वरांवर झाला. आपले आत्ममग्नतेचे स्वत:भोवती आखलेले परिघ ओलांडून ज्ञानेश्वर ‘ब्रह्मविद्येचा सुकाळ’ करण्याच्या हेतूने आता कार्यप्रवृत्त झाले. नेवासे येथे ‘भावार्थदीपिके’च्या निर्मितीने या कार्यास प्रारंभ झाला. भावार्थदीपिकेच्या (ज्ञानेश्वरी) निर्मितीचे एक समाधान बाळगत ही सारी भावंडे आता आपल्या गावी परत निघाली होती. वाटेत चालताचालताही कोणाकोणाला कवित्वाची स्फूर्ती यावी, त्याने ते म्हणून दाखवावे, दुसऱ्याने ते उतरवून घ्यावेत अशा रीतीने मजल दरमजल करत सारी जण आळंदीस परतली. शुद्धिपत्र मिळवून आलेल्या या भावंडांबद्दलची आळंदीकरांची सुरुवातीची तीव्र निषेधात्मक प्रतिक्रिया आता बदलली होती. त्याची जागा आता आदराने घेतली होती.

ज्ञानेश्वरांनी पैठणात दाखविलेल्या चमत्काराचे वृत्त कर्णोपकर्णी चांगदेवांच्या कानावर गेले. ‘वंचूनिया काळा रक्षिले शरीर । बहुत दिस भार वाढविला । परी हे सामर्थ्य नाही आम्हा अंगी ।’ [१३] याची जाणीव चांगदेवांना मनोमन झाली. ज्ञानेश्वरादी भावंडांच्या भेटीविषयी कुतूहल त्यांच्या मनात जागे झाले. परंतु भेटीपूर्वी पत्र पाठवावे या हेतूने ते पत्र लिहावयास बसले. ज्ञानेश्वरांना

उद्देशून तीर्थरूप लिहावे का चिरंजीव लिहावे या संभ्रमात पडलेल्या चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना कोरेच पत्र पाठवून दिले. ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांच्या आज्ञेने चांगदेवांना पासष्ट ओव्यांचे पत्र पाठवून दिले. हे पत्र वाचूनही चांगदेवांना काहीच अर्थबोध झाला नाही. तेव्हा आता या भावंडांची समक्ष भेट घेतल्याशिवाय तरणोपाय नाही हे जाणून चांगदेव वाघावर बसून भेटीसाठी आले. निवृत्तिनाथांनी ज्ञानदेवांना चांगदेवांची योग्यता समजावून सांगितली आणि चांगदेवांच्या भेटीसाठी त्यांना सामोरे जाण्याची आज्ञा केली. स्वत:च्या सिद्धीसामर्थ्याचे प्रदर्शन करत येणाऱ्या चांगदेवांना पाहून मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना म्हणाली,

''विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाईकु । तयाचा विवेक जाळी परता ।
षट्शास्त्रवक्ता आणि वितंडवादकु । तयाचा विवेक जाळी परता ।
योगिया म्हणवी आणि इंद्रियांचा रंकु । तयाचा विवेक जाळी परता ।
मुक्ताई म्हणे जयाचा परमार्थ माइकु । तयाचा विवेक जाळी परता ।।'' [१४]

चांगदेवांचा अहंकार समूळ नष्ट व्हावा या हेतूने मग ज्ञानेश्वरांनीही एक क्लृप्ती केली. चांगदेवांच्या भेटीसाठी ज्ञानेश्वरादी भावंडे भिंतीवर बसूनच सामोरी गेली. भिंत चालवलेली पाहून चांगदेवांचा उरलासुरला अहंकारही नष्ट झाला. ते शरण आले. ''वरदहस्त आता मस्तकी ठेवावा'' [१५] अशी विनवणी त्यांनी केली. निवृत्तिनाथ, सोपानदेव, ज्ञानेश्वर या तिघांनीही चांगदेवास मुक्ताबाईकडे सोपवले. ''यासी करा प्रतीत आत्मज्ञानी ।।'' [१६] असे निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला सांगितले. मुक्ताबाईच्या चरणी लागलेल्या चांगदेवांच्या माथ्यावर मुक्ताबाईनी हात ठेवला. चांगदेवाला निजबोध प्राप्त करून दिला. बहुता वर्षांचा राजयोगी क्षणांचाही विलंब न लागता मुक्ताईकृपेमुळे जीवन्मुक्त झाला. येथेच मुक्ताबाईनी चांगदेवांना चांगदेवपासष्टीचा अर्थ समजावून दिला. नव्हे, चांगदेवांना जणू त्याचा अर्थ सर्वांगी लेवविला. चांगदेव जणू अर्थरूपच बनले. मुक्ताबाई सद्गुरुपदी आरुढ झाली होती आणि तिचे परमशिष्य चांगदेव म्हणत होते,

''चांगदेव म्हणे आजिची जन्मलो । गुरुपुत्र झालो मुक्ताईचा ।
मागील चौदाशे झाली जन्मांतरे । आजी जन्म खरे सार्थकाचे ।।'' [१७]

आपली ही कृतकृत्यता व्यक्त करावी या हेतूने चांगदेवाने सद्गुरु मुक्ताबाईची

आणि इतर तिन्ही भावंडांची पूजा केली. ‘मुक्ताई मुक्तरूप मुक्तीची चित्कळा । नित्य मुक्तलीळा दावी अंगी ।।’ [१८] या भावनेने चांगदेवांनी ही पूजा आरंभिली होती. वेदपठण, मंगलवाद्ये यांच्या उत्तम घोषामध्ये ही पूजा पार पडली. सुवर्ण दक्षिणा, गोदान देऊन नगरवासियांना भोजन दिले गेले. एक प्रकारचा अद्‌भुत असा सोहळा या निमित्ताने लोकांना पाहावयास मिळाला.

ज्ञानेश्वरादी भावंडांची कीर्तिकथा पंढरपूरातील नामदेवांच्या कानावर एव्हाना येऊन पोहोचली होती.  या मंडळींच्या भेटीसाठी जावे असे नामदेवाला पंढरपूरच्या विठ्ठलानेही सुचविले होते. आणि म्हणून त्यांची भेट घ्यावी या उद्‌देशाने एक दिवस नामदेव या भावंडांकडे आले.

भक्तीच्या बळावर देवाला वश करून घेतलेला अशी थोर भक्त म्हणून नामदेवाचीही सर्वत्र ख्याती होती. तेव्हा असा भक्त आपल्याकडे आला म्हणून निवृत्ति, सोपान, ज्ञानेश्वर यांनी त्यांचे उत्तम स्वागत केले. निवृत्तिनाथांनी नामदेवांना वंदन केले तेव्हा; ‘देवाचे जवळ आपण कायम असतो,  स्वत: परब्रह्म माझ्याजवळ असते तेव्हा यांनी आपल्याला वंदन करणे योग्यच आहे’ असा समज नामदेवांनी करून घेतला व आपण मात्र त्यांच्या पाया पडण्याची काहीच आवश्यकता नाही असे नामदेवांचे मत झाले.

नंतर ज्ञानेश्वरांनीही नामदेवांना वंदन केले, तेव्हा आपण यांच्यापेक्षा वयाने वडील तेव्हा ज्ञानेश्वरांनी आपल्याला नमस्कार करणे योग्यच आहे असे त्यांच्या मनात आले. सोपानदेवांनी आपले जणू काही मायबापच भेटले अशा भावनेने नामदेवांना वंदन केले.

निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान यांनी नामदेवांना केलेले नमन आणि त्यावर नामदेवांची झालेली प्रतिक्रिया याचे सूक्ष्म अवलोकन मुक्ताबाई दूर उभी राहून करत होती. नामदेवांचा अहंकार तिच्या चाणाक्ष नजरेने लगेचच हेरला आणि तिने नामदेवांचे दर्शन घेण्याचे नाकारले. नामदेवाबद्‌दल तिचे जे मत तयार झाले ते तिने स्पष्ट शब्दात आपल्या भावंडांजवळ व्यक्त केले.

‘‘अखंड जयाला देवाचा शेजार । का रे अहंकार नाही गेला ।
मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असता दिवा हाती घेसी ।
परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ । आंधळ्या डोळे डोहळे का बा झाले ।

कल्पतरु तळवटी इच्छिली ते गोष्टी । अद्यापि नरोटी राहिली का ।।'' [१९]

असा रोकडा सवाल तिने नामदेवांना केला. एका थोर भक्तापुढे मुक्ताबाईने असे वक्तव्य करावे ही गोष्ट तिन्ही भावंडांना अनपेक्षित अशीच होती. नामदेवांसारख्या भक्ताची पायधूळ कपाळाला लावली तर वंशही समूळ उद्धरून जातात असे सांगून निवृत्ति आदी भावंडांनी मुक्ताबाईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. भक्तीपेक्षा इतर दुसरे काही श्रेष्ठ नाही असे नामदेवांनीही मुक्ताबाईस ऐकविले. मुक्ताबाईने त्यास प्रत्युत्तर देत म्हटले,

''झालासी हरिभक्त तरी आम्हा काय । आतली ती सोय ठाऊकी नाही ।
घेऊनी टाळ दिंडी हरिकथा करिसी । हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणे ।
गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष । होशील मुमुक्षू साधक तू ।
आत्मतत्त्वी दृष्टी नाहीच पा केली । तववरी ब्रह्मबोली बोलूनी काय ।
तुझे रूप तुवा नाही ओळखिले । अहंतेते धरिले कासयासी ।
ऐकरे नामया होई आत्मनिष्ठ । तरीच तू श्रेष्ठ ज्ञानी म्हणे ।।'' [२०]

अशा प्रकारे गुरु केल्याशिवाय तुला मोक्षप्राप्ती होणार नाही हे सत्य मुक्ताबाईने निर्भिडपणे नामदेवाला कथन केले. ''उसाचे शेजारी येरंडाचे झाड । नाही त्याचे पाडे गोडी आली ।।'' [२१] अशी नामदेवाची अवस्था असल्याचे मुक्ताबाईने म्हटले. ''कर्पुरासी झाला दीपाचा शेजार । काय गुणे हीर राहिल त्याचा ।। सागरी लवण टाकिले नेऊन । काय गुण खडेपण उरले त्याचे ।। तैसा नामदेव विठोबाच्या जागा । काय गुणे दादा कोरेपण ।।'' [२२] असा सवाल ती आपल्या भावंडांना करते आणि पुढे स्वत:च त्याचे उत्तरही देते. नामदेवाची परिस्थिति अशी का झाली याचे कारण देताना ती म्हणते, ''म्हणे मुक्ताबाई चंदनाचे झाड । अहंता सर्प वेढे गुंडाळिले ।।'' [२३] ''चांगदेवा वाणी । भाजावा सज्जनी नामदेव ।।'' [२४] असा सल्लाही तिने आपल्या भावंडांना दिला आहे.

निवृत्तिनाथ आता वडिलकीच्या नात्याने मुक्ताबाईची समजूत घालू लागले. आपल्या घरी भाग्यानेच असे संत येतात, संतांचा सन्मान करण्यास आपण कधीही चुकू नये, आपण आपले स्वहित करावे, या नामदेवांच्या प्रेमामुळे विठ्ठलसुद्धा वेडा झाला आहे तेव्हा त्यांच्याबरोबर अशी अरेतुरेची भाषा योग्य नाही असे निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईस हरप्रकारे समजावले. परंतु मुक्ताबाई

आपल्या मतावर ठाम होती. ''म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण । आपणा दर्शन न लगे त्याचे ।।'' [२५] हेच मुक्ताबाईचे त्यावरचे उत्तर होते.

मुक्ताबाई येथे आपल्या वडिलबंधूंना, सद्गुरुला विरोध करताना दिसते. यावरून त्यांचे वागणे हे आढ्यतेचे असल्यासारखेही कदाचित वाटण्याची शक्यता आहे पण त्यांच्या वागण्यामागील भाव पाहिला म्हणजे या साऱ्या कृतीमागे नामदेवाविषयी अपार करुणाच कशी त्यांच्या मनात भरलेली आहे याचा प्रत्यय येईल.

मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणाली, ''कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती । काय साहे संगती पाणियाची ।। मेणाची पुतळी घेता करी बरी । अग्नीचे शेजारी राहे कैशी ।।'' [२६] तेव्हा नामदेवासारख्या सज्जनाला असे वाया जाऊ देऊ नये, असे ती म्हणते. ''म्हणे मुक्ताबाई जाऊ देऊ नये । ऐसे सरिसे काय भांडे करा ।।'' [२७] नामदेव हरीपाशी निशीदिनी वरदळ लावतो म्हणून पांडुरंगानेच तुम्हापाशी त्याला पाठविले आहे. त्याचा उद्धार तुम्ही संतजन तत्काळ कराल म्हणूनच पांडुरंगाने नामदेवाला तुमच्यापाशी पाठविले आहे. तेव्हा आता तुम्ही तुमचे ब्रीद सार्थ करून दाखवा, नामदेवाला पावन करून घ्या, अशी विनवणी मुक्ताबाई आपल्या भावंडांना करीत आहे. यामध्ये तिचा अहंकार नाही, आढ्यता नाही, आहे ती फक्त नामदेवाच्या उद्धाराविषयीची अपार कळकळ ! एका अहंकारापायी नामदेवासारखा उत्तम भक्त वाया जात आहे हे तिला पाहवत नाही आणि म्हणूनच तिने वरीलप्रमाणे विनवणी केली आहे. नामदेवासारख्या श्रेष्ठ भक्ताला काही सांगावे एवढी आपली योग्यता आहे की नाही याविषयीची शंका या भावंडांनी मुक्ताबाईपाशी व्यक्त केली असावी. तेव्हा सर्वांनाच मान्य होईल अशी गोष्ट मुक्ताबाईने मांडली. मुक्ताबाईने सुचविले, ''धाडा बोलावणे गोरोबाला । म्हणे मुक्ताबाई भाजले की कोरे । काकाचे उत्तर सत्य मानू ।।'' [२८] गोरोबा सर्वांची परीक्षा करतील आणि ते जो निर्णय देतील तो सर्वांनी मान्य करावा असे एकमताने निश्चित झाले.

हे गोरोबाकाका कोण ? नामदेवांची परीक्षा घेण्यासाठी तेवढीच अधिकारी व्यक्ती परीक्षक म्हणून असली पाहिजे हे उघड होते. तेव्हा आपल्या गुरुपरंपरेतील विख्यात आचार्य गोरक्षनाथ यांनाच मुक्ताबाईने याप्रसंगी निमंत्रण

दिले. अव्यक्त स्वरूपातील गोरक्षनाथांची मुक्ताबाईनी स्वत:च्या योगसामर्थ्याच्या बळावर भेट घेतली.

'मोतियांचा चूर फेकिला अंबरी । विजुचिया परी कीळ झाले ।
जरी पितांबरे नेसविली नभा । चैतन्याचा गाभा निळबिंदू ।
तळीपरी पसे शून्याकार झाले । सर्पाचीही पिले नाचू लागे ।
कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ।।' [२९]

अशा प्रकारे मुक्ताबाई गोरक्षनाथांना भेटली. मुक्ताबाईचे वैराग्य पाहून गोरक्षनाथ अंत:करणापासून समाधानी झाले आणि तिच्यासाठी, तिच्या वैराग्यावर प्रसन्न होऊन ते स्वत:ला प्रकट करते झाले. मात्र हे प्रकट होणे म्हणजे देहरूपात प्रत्यक्षात ते तेथे उपस्थित झाले असतील किंवा नाही हे सांगता येत नाही. मात्र त्यांच्या अस्तित्वाचा अनुभव तेथे उपस्थित असलेल्या सर्वांना आला असावा हे निश्चित. त्यावेळी मुक्ताबाईने सुचविले की, ''घालू द्या लोटांगण । जाऊ द्या शरण अव्यक्तासी ।।'' [३०]

त्याप्रसंगी निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून सारी भावंडे ध्यानस्थ बसली. भ्रमरगुंफेच्या ठिकाणी जाऊन ही भावंडे तिथे स्थिरावली. त्या अवस्थेत त्या साऱ्यांना विलक्षण असे अनुभव आले.

'रक्तश्वेत पीत नीळ वर्णाकार । नक्षत्राची वर पूजा केली ।
प्रकाशमय तत्त्व ज्योतिमय पाहणे । दीप त्रिभुवनी एक झाला ।।' [३१]

अशा प्रकारे आपले अनुभव परस्परांनी परस्परांना सांगितले. भक्त नामदेवांना या योगानुभवांची काहीच कल्पना नव्हती. नामदेवांची त्यावेळी अवस्था कशी होती? ते म्हणत होते,

'कैकाड्यावाणी करिती गुडगुड । मजला हे गूढ उमजेना ।
नामा म्हणे गाती प्रकाशाचे गाणे । आम्हा अघोरवाणे दिसतसे ।।' [३२]

सारी भावंडे ध्यानस्थ बसलेली असताना नामदेव इकडे तिकडे पाहत होते. या भावंडांच्या घरातील अठराविश्वे दारिद्र्याचे त्यांना तिथे दर्शन झाले. 'हातात नरोटी जीर्णाचे ते भार । परळ भोपळ्यामाजी गृहामाजी संपत्ती । खर्चायला कवडी थार नसे ।।' [३३] अशी या साऱ्या भावंडांची अवस्था आहे हे त्यांना दिसले. पण असे असूनही दु:खाची कोठेही साधी निशाणीही घरात दिसत नव्हती.

उलट आनंदाला पारावार नाही, सगळे ब्रह्मांड हाताशी असावे असे एकीकडे त्यांचे बोलणे होते. याही परिस्थितीत आनंदाने डुलणारी ही भावंडे पाहून, त्यांच्या चर्चा ऐकून हे काहीतरी पाखंड असावे अशी नामदेवांची समजूत झाली.

नामदेवासारखा महान भक्त भ्रमरगुंफेमध्ये, तेथपर्यंत येऊ शकत नाही हे पाहून निवृत्तिनाथांनाही खंत वाटत होती. सोपानाने गोरक्षांना विनवणी केली,

''नामदेव पाहुणा आला असे । मुक्तिकेचे पारखी तुम्ही आहा देवा ।
भाजुनी जीवा शिवा ब्रह्म करा ।।'' [३४]

मुक्ताबाईही विनवणी करत म्हणाली, ''म्हणे मुक्ताबाई हेरोनिया हेरा । हिरा किंवा गारा नेणो बापा ।।'' [३५]

तेव्हा अनुभवाचे थापटणे हाती असलेल्या गोरक्षनाथांनी सर्वांची परीक्षा घ्यावयास सुरुवात केली. गोरक्षनाथांनी निवृत्तिनाथांवर कृपावर्षाव केला असता ते परब्रह्माशी एकरुप झाले. ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी अजिबात कोरेपण शिल्लक नसल्याचे दिसले, सोपानदेवांच्या बाबतीतही तसेच झाले. मुक्ताबाईला जेव्हा तो अनुभव दिला तेव्हा तिला अमृत संजीवनी उतू आल्याचा अनुभव आला. वैराग्याच्या या कसोटीवर नामदेव मात्र उतरू शकले नाहीत. त्यांना तो घाव सहन झाला नाही. गोरक्षनाथांची कृपा स्वीकारण्यासाठी आवश्यक होती तेवढी त्यांची आध्यात्मिक तयारी झाली नव्हती म्हणून तो भार ते पेलू शकले नाहीत. ''गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई । शून्यभर नाही भाजिले कोठे ।।'' [३६] या शब्दामध्ये गोरोबांनी आपला निर्णय जाहीर केला.

सर्व संतमंडळीपुढे अवमानित झालेल्या नामदेवांना कधी एकदा आपण तेथून बाहेर पडतो असे झाले. या साऱ्या प्रकारानंतर मुक्ताबाई म्हणू लागली,

''अंतर बाहेर भाजू आम्ही कुंभ । भरु निरालंब सगळेची ।
अहं सोऽहं दोन्ही उर्ध्व लावू फुंकणी । नवद्वारे फुंकोनि जाळ करु ।
जीवित्व काढुनी शिव घडू अंगा । प्रिय पांडुरंगा आवडेल ।।'' [३७]

मुक्ताबाईचे हे वक्तव्य ऐकून तर नामदेव मनातून चांगलेच घाबरले. या लोकांना काहीएक न सांगता, विचारता नामदेव त्या ठिकाणाहून तातडीने पंढरपूरला आले. मनात मुक्ताबाईबद्दल राग खदखदत होता.

''मुक्ताबाईने तेथे माजविली कळी । हे संतमंडळी कपटी तुझी ।

लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी । केले देशोधडी महान संत ।।'' [३८]

असे मुक्ताबाईविषयी गाऱ्हाणे नामदेवांनी विठ्ठलापाशी गायले. पुढे विठ्ठलानेही मुक्ताबाईचे हे सारे वागणे योग्यच आहे, नामदेवांनी गुरु करणे आवश्यक कसे आहे हे समजावून सांगितले. विसोबा खेचर हेच तुझे सद्गुरु आहेत असा स्पष्ट संकेतही विठ्ठलाने नामदेवांना दिला.

नामदेवांच्या चरित्राच्या दृष्टीने जसे या साऱ्या प्रसंगाचे महत्त्व आहे, तितकेच, किंबहुना त्यापेक्षाही त्याचे अधिक महत्त्व मुक्ताबाईच्या जीवनाच्या दृष्टीने आहे. या प्रसंगाच्या निमित्ताने जशी नामदेवांची परीक्षा झाली तशीच एक प्रकारे मुक्ताबाईचीही याप्रसंगी परीक्षा झाली. मुक्ताबाईला स्वत:च्या आध्यात्मिक सामर्थ्याची प्रचीती यानिमित्ताने आली. तर आपल्या धाकट्या बहिणीचे असामान्य कर्तृत्व या प्रसंगाच्या निमित्ताने तिच्या भावंडांनाही ज्ञात झाले. आपल्या बहिणीची योग्यता यामुळे तिच्या भावंडांना पुरेपूर समजून चुकली. मुक्ताबाईचा आध्यात्मिक स्तर येथे पालटला.

गोरक्षकृपेचा अनुभव जिच्यामुळे आपल्याला आला तिचे, सारी भावंडे एकप्रकारे कौतुक करू लागली. मुक्ताबाईचे आदिमायेचे असलेले स्वरूप याप्रसंगी उघड झाले. धाकटी बहीण, सत्शिष्य, गुरुभगिनी ही सारी नाती एका क्षणात आता मागे पडली आणि मुक्ताबाई मुक्तामाता, माय या रूपात सर्वांना प्रतीत होऊ लागली. निवृत्तिनाथ मुक्ताबाईस म्हणू लागले, ''तेथ माय मी प्रांजळ । उपकार मानी बहु सबळ । बरवे दाविले स्थळ । विश्रांतीचे ।।'' [३९] ज्ञानेश्वर म्हणाले, ''तुम्ही जेविला अमृत भोजने । आम्ही ही पंक्तिचे पाहुणे । गुह्य गूढ बोलणे । मौन्य जाले ।।'' [४०] सोपानदेव म्हणत होते, ''हे आदिअनादी भवानी । आदिपुरुषाची मोहिनी । गुरुकृपे आणिता ध्यानी । विश्व वश्य ।।'' [४१]

या प्रसंगी उपस्थित असलेल्या विसोबा खेचरांच्या प्रश्नावर मुक्ताबाईने त्यांना सांगितले, ''दुजेपण पाहता काहीच न दिसे । उपमेचे भाषे कांही न भाषे । मुक्ताई म्हणे विसोबा खेचरा । मी तू नाही तेथे । कैचा दुसरा ।।'' [४२] मुक्ताबाईच्या या बोलण्याचा प्रयत्न विसोबांनाही आला. तेही म्हणाले, ''शब्द ना विशब्द कवणाचे कवण । आत्मज्ञान बोध जाले निर्माण । मुक्ताबाई वटेश्वर तेथे कैचे चांगपण ।।'' [४३] निर्गुणाच्या या विलक्षण अनुभवाने सगुणाचे महत्त्व

नाकारु पाहणाऱ्या विसोबांना सोपानदेव म्हणाले, ''मुक्त ज्ञानेविण तुम्हा कवण आनंद ।।'' [४४] मुक्ताबाईची श्रेष्ठता सोपानदेवांनी येथे स्पष्ट करून सांगितली.

या साऱ्यांच्या नजरेत मुक्ताबाईचे स्थान आता उंचावले होते. मुक्ताबाईच्या आंतरिक जीवनाच्या दृष्टीनेही आता फार मोठा बदल झाला होता. अमृत-संजीवनी उतू आल्याचा अनुभव म्हणजे नाथांचा वरदहस्त तिच्या मस्तकी असल्याची निदर्शक अशी ती खूण होती. मुक्ताबाईचे शरीर चिरकाळ अभंग निरंतर राहील ही गोष्ट याचप्रसंगी निर्धारित झाली होती. मुक्ताबाई अधिकाधिक काळ आत्ममग्न अशा अवस्थेत राहू लागली.

'आपण होऊनि अगोचर । लावूनि नेत्रद्वार ।
मन करावे स्थिर । हृदयामाजि ।।
दृष्टि काही न पहावे । मन अढळ राखावे ।
उत्तर कवणा न द्यावे । मुद्रा मौन्य ।।' [४५]

अशी मौन्य मुद्रा धारण करून मुक्ताबाईचे दिवसच्या दिवस जाऊ लागले.

''ज्ञानासि लाधले निवृत्ति फावले । सोपान घडले दिनकाळ । ते हे रे सखया खेचरासी पुसे । गुरुनामी विश्वासे ब्रह्मरुपे ।।'' [४६] असे म्हणत निवृत्तिनाथांनी नामदेवाला सद्‌गुरुला शरण जाण्यास सांगितले. नामदेवाला सद्‌गुरुची आवश्यकता पटवून देण्यासाठी माध्यम बनलेली मुक्ताबाई मात्र आता या साऱ्यापासून अलिप्त झाली होती. नामदेव विसोबा खेचरांना शरण जाणार ही गोष्ट आता निश्चित झाली होती. तिचा कार्यभाग पूर्ण झाला होता.

निवृत्तितटाके निघालेल्या मुक्ताबाईच्या हृदयामध्ये हरिराज सामावला होता. 'मुक्ताईस अवघेचि वैकुंठ निघोट रया ।।' [४७] असा अनुभव येत होता. 'मुक्ताई दिवस अवघा हृषीकेश । केशवेविण वास शून्य पैसे ।।' [४८] ही तिची अनुभूती होती.

परमेश्वराच्या भेटीसाठी इतरत्र कोठेही जाण्याची आवश्यकता मुक्ताबाईला आता भासत नव्हती. 'का आपुला ठावो न सांडिता । आलिंगिजे चंद्रु प्रकटता । हा अनुरागु भोगिता । कुमुदिनी जाणे ।।' [४९] ही कुमुदिनीची कला मुक्ताबाईस साध्य झाली होती. या साऱ्या अवस्थेमुळे तिचा संसाराशी अबोला झाला होता. कोणाशी काही बोलू नये, आपल्या आत्मस्थितीमध्ये मग्न राहावे ही

ओढ दिवसेंदिवस वाढत चालली होती.

अशातच एक दिवस ज्ञानेश्वरांनी नामदेवांबरोबर तीर्थयात्रेला जाण्याची इच्छा प्रदर्शित केली.

''वेदाचिया मते तीर्थी देव आहे । देशोदेशी काय उणा जाला ।
अष्टोत्तरशते तीर्थे जयाच्या भीतरी । तो तुझे अंतरी आत्माराम ।'' [५०]

असे तिने ज्ञानेश्वरांनाही समजाविण्याचा प्रयत्न केला. ''न लगती तीर्थे हरिरुपे मुक्त । अवघेचि सूक्त जपिनले ।।'' [५१] असे सांगून तिने तीर्थयात्रेला न येण्याचा स्वत:चा निर्णयही उघड केला. मुक्ताबाई, चांगदेव, वटेश्वर आदी काही मंडळी तीर्थयात्रेस न जाता तेथेच थांबली. मुक्ताबाईच्या उपदेशामुळे, गहन मार्ग आता मोकळा होत चालला आहे, सोपा होत चालला आहे असे शिष्यांना जाणवू लागले.

'मुक्त होतासि तो का बद्ध झालासी । आपल्या बंधने आपण बांधलासी ।
सांडी बंधन सोय धरी गव्हारा । जाई मूळस्थाना आपुलिया ।
तेथीच्या तेथे राही परियेसी । चांगया बोले मुक्ताईशी ।।' [५२]

मुक्ताबाईच्या जवळ वावरणाऱ्या शिष्यांना, साधकांना मुक्ताबाईचे आता एक वेगळेच दर्शन घडू लागले होते. कोणत्या तरी साध्या व्यावहारिक गोष्टीचे निमित्त घडावे आणि त्या साध्या प्रसंगाच्या निमित्ताने मुक्ताबाईने, त्याच्या आधारे फार मोठे गहन तत्त्वज्ञान मांडावे, त्याची चर्चा करावी असे आता घडू लागले.

मुक्ताबाईला ध्यानावस्थेमध्ये उच्चतर असे अनुभव यावेत आणि तिने ते चांगदेवाजवळ बोलून दाखवावेत असेही वारंवार घडत असे.

''मुंगी उडाली आकाशी । तिणे गिळिले सूर्याशी ।
थोर नवलाव जाला । वांझे पुत्र प्रसवला ।
विंचू पाताळाशी जाय । शेष माथा वंदी पाय ।
माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हासली ।।'' [५३]

मुक्ताबाईचे असे एकाहून एक लोकविलक्षण अनुभव ऐकून आजूबाजूची शिष्यमंडळी स्तिमित होऊन जात असत. आध्यात्मिक अवस्थेच्या दृष्टीने तिच्यापेक्षा निम्न अवस्थेत असणारी ही मंडळी तिच्या अवस्थेचा मनाने अंदाज बांधत असत. ही सारी मंडळी मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील संवाद

कानात प्राण आणून ऐकत बसत. प्रसन्न मन:स्थितीत असलेली मुक्ताबाई कधी चांगदेवाला कोड्यातही टाकत असे.

‘‘टेकावरी टेक त्यावरी टेकुली । तेथे एक बाळी विस्मो करी ।
तिचे नाव काय त्याचे नाव काय । विचारोनि पाहे मनामाजी ।
डोळियांतील बाहुली जालिसे गरुवारु । तिशी सुईण मेळवा अरुवारु ।
सुईचे आणीवर रचिले पाठार । मुक्ताई म्हणे चांगया सांग याचा विचार ।।’’ ५४

मुक्ताबाईच्या सहवासात असलेल्या शिष्यांना रोजच असे काहीना काही नवे प्रबोधनपर असे ऐकावयास मिळत असे. असेच कित्येक दिवस निघून गेले.

इकडे नामदेव आणि ज्ञानेश्वर तीर्थयात्रा करून पुन्हा पंढरपूरास आले. निवृत्ति, सोपान, विसोबा खेचर, नरहरी सोनार, गोराकुंभार, चोखामेळा इत्यादींच्या समवेत तीर्थयात्रेचे उद्यापनही झाले. तीर्थयात्रेतील अनुभव यानिमित्ताने ज्ञानेश्वरांनी साऱ्यांना कथन केले. ज्ञानेश्वर तेथे उपस्थित असलेल्या वारकऱ्यांना सांगत होते,

‘‘नलगे तीर्थाटन काया क्लेश जाण । नलगे अनुष्ठान करणे बहु ।
साधनावाचुनी मार्ग सोपा जाण । करावे कीर्तन रामकृष्ण ।
सर्वकाळ कथा संतांची संगती । वाचे नाम कीर्ति सर्वकाळ ।
तो हा राजमार्ग सर्वांहोनी चांग । सदा संतसंग वाचे नाम ।।’’ ५५

वारकरी संप्रदायाची एक सुनिश्चित अशी व्यवस्थाच जणू याप्रसंगी ज्ञानेश्वरांनी लावून दिली.

हा सारा आनंदकल्लोळ चालू असतानाच, ज्ञानेश्वरांनी आपण समाधि घेणार असल्याचा आपला निर्णय बोलून दाखविला. साऱ्यांनाच या गोष्टीचे अपार दु:ख झाले. ज्ञानेश्वर, नामदेव आदी सारी मंडळी ज्ञानेश्वरांच्या समाधिसाठी म्हणून आळंदीला परतली. आळंदीला जाण्यापूर्वी ही सारी जण आळंदीपासून पाच कोसावर असलेल्या सोळू या गावी थांबली; जेथे मुक्ताबाई, चांगदेव ही मंडळी वास्तव्य करून होती.

‘‘पंढरीचा पोहा आला अलंकापुरी । पंच कोसावरी साधुजन ।
पांडुरंगा संगे वैष्णवांचे भार । दिंड्या ते बाहेर निघाल्यासे ।
पताकांचे भार निघाले बाहेर । भेटती ऋषीश्वर पांडुरंगा ।

अवघिया भेटी झाल्या त्या बाहेरी । मग अलंकापुरी येते झाले ।।'' [५६]

असे या प्रसंगाचे वर्णन नामदेवांनी केले आहे. मुक्ताबाईलाही ज्ञानेश्वरांचा समाधिचा निर्णय ज्ञात झाला. तो ऐकून तिचे चित्त विकल झाले. 'आवरली माया पुरातन आपुली' [५७] ही गोष्ट ज्ञानेश्वरांच्या समाधिच्या निर्णयाने निवृत्ति, मुक्ताबाई, सोपान यांना कळून चुकली. आपले अवतारकार्य संपत आल्याची ही सूचना होती. 'मार्ग हा मोकळा आम्हा झाला' [५८] ही उरलेल्या तिघांची त्यामागची भूमिका होती.

ज्ञानेश्वरांच्या समाधिप्रसंगी ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाची स्तुती आरंभली. त्यानंतर निवृत्ति, सोपान यांनीही तसेच केले. मुक्ताबाई विठ्ठलाला म्हणाली,

''सत्य सत्य जनार्दन । सत्य सत्य नारायण ।
सत्य सत्य आमुचे तू धन । जगज्जीवन जगदाकार ।
तुजवाचोनी त्रिभुवनी । दुजा न देखो नायको कानी ।
वेद शास्त्र पुराणी । अगाध महिमा तुझा ।
तू देवाधिदेवो उत्तम । तू निजभक्तांचा विश्राम ।
तू शंकराचा आत्माराम । ऐसा नेम वेदाचा ।
तरी भक्तांचा कोंवसा । पावसी तू हृषीकेशा ।
नाही तुजवीण भरवसा । निश्चय ऐसा साच तू ।
तू परत्रीचे तारू । तुझा आगम निगम विचारु ।
तुझ्या चिंतने पारु । उतरे संसारु दुर्घट ।।''

अशा प्रकारे मुक्ताबाईने विठ्ठलाची स्तुती करून त्याचे चरण वंदिले. तेव्हा पांडुरंग प्रसन्न होऊन तिला म्हणाले, ''मन समर्पिले माझे ठायी । तयासी जन्ममरण नाही ।।'' [५९] याचप्रसंगी मुक्ताबाईच्या समाधिविषयी पांडुरंगाने कथन केले ते असे की,

''तरी नाथाचा हात ईचा शिरी । यालागी ते सत्यसनातन अवधारी ।
महाकल्पाचा अवश्वरी । हे सोडील देह ।
तववरी तिचे शरीर । अभंग चिरकाळ निरंतर ।
महद्माया योगिणी साचार । मुक्ताबाई उद्धवा ।।'' [६०]

यानंतर मग प्रत्यक्षात अत्यंत अवघड प्रसंग येऊन ठेपला. ज्ञानेश्वरांची समाधिची

वेळ जवळ येत चालली होती. निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, सोपान यांच्या मनात ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाची आठवण जागी होत होती. 'छळिले ब्राह्मणे प्रतिष्ठानी जाता । रेड्यामुखी वेदांता बोलाविले ।। आला चांगदेव व्याघ्र वहान घेऊन । नेला अभिमान ज्ञानेदेवे ।।' [६१] अशा आठवणी निघत होत्या.

मातापित्यांच्या निर्याणाच्या वेळी मुक्ताबाई वयाने लहान होती. तेव्हा मातापित्यांच्याप्रमाणे तिचा सांभाळ निवृत्ति-ज्ञानेश्वरांनी केला होता. आता ज्ञानेश्वर समाधिस्थ होणार हे पाहून तिला विलक्षण दु:ख दाटून आले. ''आम्हा मातापिता नित्य ज्ञानेश्वर । नाही आता थार विश्रांतीसी ।।'' [६२] अशी मुक्ताबाईची त्यावरची प्रतिक्रिया होती.

चौघा भावंडांची आता ताटातूट होणार होती. निवृत्तिनाथांना यानिमित्ताने चौघांचे जीवन आठवत होते. ते आठवून ते म्हणाले,

''त्रिवेणीचा ओघ जैसा एकेठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
ब्रह्माविष्णूहर जैसे एकेठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
रज तम गुण सत्व गुणाठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
भूचरी खेचरी चाचरी ते पाही । अगोचरी ठायी मुक्तगंगा ।।'' [६३]

निवृत्तिनाथांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न इतर संतजन करीत होते परंतु त्यांचे मन काही केले तरी शांत होत नव्हते. आईवडिलांनी या भावंडांचा त्याग केला तेव्हाही झाले नाही एवढे दु:ख निवृत्तिनाथांना याप्रसंगी होत होते.

ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले. आता आपलेही या भूलोकातील कार्य संपले आहे, तेव्हा आता आपणही हा देह रक्षू नये अशी मुक्ताबाईच्या मनाची अवस्था झाली. तेव्हा पांडुरंगाने तिला सांगितले, ''सोपान जाईपर्यंत स्थिर असा.'' मुक्ताबाईनीही ती गोष्ट मान्य केली. ज्ञानेश्वरांच्या समाधिदिनानंतर सारी जण तेथे नऊ दिवसपर्यंत राहिली.

ज्ञानेश्वरांच्या समाधिनंतर निवृत्तिनाथ, मुक्ताबाई व सोपानदेव आणि इतर शिष्यवर्ग कौंडण्यपूर या गावी अंबिकेची सेवा करण्याच्या हेतूने राहिले. नंतर ही सारी मंडळी सासवड येथे आली. सोपानदेव आणि वटेश्वर यांच्या समाधिचे हे स्थळ नेमलेले होते. समाधि घेण्यापूर्वी हे दोघेही जण निवृत्तिनाथ व मुक्ताबाई यांच्या जवळ आले. या दोघांनी निवृत्तिनाथांना वंदन केले. मुक्ताबाईने या

दोघांची अवस्था ओळखून म्हटले, ''म्हणे मुक्ताबाई जाती दोघेजण । ऐसे नारायणे बुझाविले ।।'' [६४] या दोघांचे परमेश्वराशी झालेले ऐक्य मुक्ताबाई पाहू शकत होती.

विसोबा खेचर, निवृत्ति, मुक्ताबाई, परीसा भागवत, चांगदेव आदी सारी मंडळी शोक करू लागली. निवृत्ति, मुक्ताबाई यांच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडू नये इतके ते दुःखातिशयाने व्याकुळ झाले होते. सोपानदेवांनी हे पाहिले आणि त्यांचे सांत्वन करावे या हेतूने ते निवृत्तिनाथांना म्हणाले, ''मुक्ताबाई सखी तुम्हापाशी'' [६५] सोपान व वटेश्वर समाधिस्थ झाले. समाधिची शिळा घातली. निवृत्ति, मुक्ताबाई यांनी समाधिस वंदन केले आणि त्यांची देहभान शुद्धीच हरपली. त्रयोदशी ते अमावस्या या दिवसामध्ये त्या साऱ्यांनी मिळून तेथे भजनकीर्तन केले.

वटेश्वरांच्या समाधिस्थ होण्यानंतर चांगदेवांनीही आपली समाधी घेण्याची इच्छा बोलून दाखविली. गोदातीरावर जाण्याच्या उद्देशाने निवृत्ति, मुक्ताबाई, चांगदेव ही मंडळी प्रतिपदेच्या दिवशी बाहेर पडली.

मजलदरमजल करत करत ही सारी मंडळी भुलेश्वरास आली. तेथे तीन दिवसपर्यंत राहिली. भुलेश्वराची यथासांग पूजाअर्चा केली. सिद्धेश्वरास जाऊन सारी जण कपिलेश्वर येथे आली. दहा दिवसपर्यंत सारी तेथेच राहिली.

पुढे सगळा पौष महिना त्यांनी कचेश्वर येथे घालविला. माघ महिन्याच्या प्रतिपदेस निघून पुणतांबे येथे आल्यावर पौर्णिमेपर्यंत ते तेथेच राहिले.

दशमीपासून चांगदेवांच्या समाधिचे वेध साऱ्यांना लागले. गोदातीरावर हा सारा समारंभ चालू होता, भजनकीर्तन यात दिवस जात होते. सर्व समुदायाबरोबर निवृत्तिनाथ, मुक्ताबाई आता मंडपात आले. चांगदेवांनी त्या दोघांना नमस्कार केला. आपल्या साऱ्या आयुष्याचा जीवनपटच जणू चांगदेवांच्या डोळ्यांसमोरून सरकत होता. चवदाशे वर्ष शरीरधारण करूनही न गेलेले अज्ञान, अहंकार, अभिमान या साऱ्यासाऱ्याची उजळणी जणूकाही होत होती. आपल्या पातकांचा काही अंतच नाही असे त्यांचे अंतर्मन त्यांना सांगत होते. पश्चातापाने त्यांचे मन जणू पेटून उठले होते. तेव्हा ''योगीराज यास नाही पापदोष ।। केला उपदेश मुक्ताईने ।।'' [६६] चांगदेवाला मुक्ताबाईने उपदेश

केलेला असल्याने त्याला आता पापदोष लागत नाही असे नामदेवांना वाटत होते.

मुक्ताबाईबद्दलची कृतज्ञतेची भावना चांगदेवांच्या मनात आता दाटून आली.

''कृपावंत झाली मुक्ताबाई जेव्हा । स्वरूप दिशा दाही दाखविले ।
पाठी पोटी स्वरूप केले सद्गुरुने । तव अभिमान गेला माझा ।
याच्या उपकाराची काय वर्णू थोरी । ज्यांच्या संगे हरी जोडियेला ।।'' ६७

अशा प्रकारे चांगदेव सद्गुरु मुक्ताबाईचे वर्णन करू लागले. मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ यांची पूजा चांगदेवांनी केली. ''नमो सद्गुरु मुक्ताबाई । नमो स्वस्वरूप ठायी । नमो वंदितसे पायी । नमो नमो परमपद ।।'' ६८ असे म्हणून चांगदेवांनी मुक्ताबाईस नमन केले. मुक्ताबाईचे डोळे ओसंडले. तिने न राहवून चांगदेवांना पोटाशी घेतले. नंतर चांगदेव समाधिस्थ झाले तेव्हा निवृत्तिनाथ म्हणाले, ''आता मुक्ताबाई जाईल की ।।'' ६९ वद्य त्रयोदशीला चांगदेव समाधिस्थ झाल्यानंतर फाल्गुन शुद्ध पंचमीपर्यंत सारे जण तेथेच राहिले आणि नंतर तेथून नेवासे या गावी जाण्यासाठी त्यांनी प्रस्थान ठेवले.

नेवासे येथे दहा दिवसपर्यंत वास्तव्य केले. तेथून पुढे टोकेश्वरतीर्थावर गेले. निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून नंतर सारे जण प्रतिष्ठानी (पैठण) आले. या चौघा भावंडांची मायभूमी असलेल्या आपेगावी जाण्याची इच्छा नामदेवांच्या मनात निर्माण झाली. तेव्हा त्यासाठी म्हणून ते आपेगावी गेले. आपल्या मूळ गावी परत आल्यावर निवृत्ति आणि मुक्ताबाई दोघांच्याही मनात बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या.

'तात आणि मात गेलीसे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा ।
निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मजलागी ।
तुझ्या योगे हरि क्रमियेले काळा ।।'

अशा आठवणींनी मुक्ताबाईचे डोळे भरून आले. आता मात्र यातले निवृत्ति आणि आपणच राहिलो आहोत हे लक्षात येऊन ती पुढे म्हणाली, ''फुटलासे मेळा तापसांचा ।।'' ७०

शिवरात्रीसाठी वेरुळला, घृष्णेश्वराला जाण्याच्या हेतूने दशमीच्या दिवशी सारे जण जाण्यास निघाले. मुक्ताबाई आता दिवसेंदिवस उदास होत

चालली होती. आता हे शरीर रक्षू नये अशी इच्छा प्रबळ झाली होती. त्या प्रेरणेतूनच आता तिने अन्नपाण्याचाही त्याग केला होता. निवृत्तिनाथ मात्र तिची ही अवस्था पाहून मनातल्या मनात तळमळत होते.

वेरुळची यात्रा यथासांग झाली, मात्र मुक्ताबाई काही देहभानावर नव्हती. स्वरुपामध्ये निमग्न होती. गोरक्षनाथकृपेच्या वेळी जो अनुभव तिला आला होता त्याच्या आधारावर ती आता वेगाने आध्यात्मिक मार्गक्रमण करत होती. निवृत्तिनाथही आपल्याला आलेला तो दिव्य अनुभव पुन्हा यावा म्हणून तळमळत होते. मुक्ताबाईने ज्या साधनेच्या आधारे गोरक्षनाथांची कृपा संपादन केली होती, तो साधनामार्ग आपल्यालाही मिळावा म्हणून ते व्याकुळ झाले होते. अत्यंत आर्ततेने ते मुक्ताबाईची विनवणी करत होते. पण मुक्ताबाई आपली मौन्यमुद्रा सोडण्यास तयार होत नव्हती. अखेर निवृत्तिनाथांनी केलेल्या दीर्घकाळ विनवणी नंतर तिने उत्तर द्यावयास सुरुवात केली. यातूनच 'ज्ञानबोध' या ग्रंथाची निर्मिती झाली. [७१]

मुक्ताबाईची दिवसेंदिवस वाढत चाललेली आत्ममग्न अवस्था पाहून एक दिवस निवृत्तिनाथांनी ''गमन कोणे दिवशी आरंभिले'' [७२] असा प्रश्न मुक्ताबाईस केला. तेव्हा मुक्ताबाईने उत्तर दिले,

''जावे यावे कोठे । अवघे निघोट स्वरूप स्वामी ।
आमुच्या स्वस्थानी नाही पा अंधार । अवघी चराचर प्रकाशत्वे ।
उदय आणि अस्तु नाही स्वरुपासी । ऐसे मुनी ऋषी जाणताती ।
आम्ही कधी आलो स्वरूप सोडोन । जावे पालटोन जेथिल तेथे ।
अंतर बाहेर स्वामीचे स्वरूप । स्वये नंदादीप उजळिलो ।।'' [७३]

मुक्ताबाईची ही उच्च आध्यात्मिक अवस्था पाहून निवृत्तिनाथ समाधानी झाले.

मुक्ताबाईला जपावे म्हणून निवृत्तिनाथ साऱ्यांना विनवत होते. निवृत्तिनाथ मुक्ताबाईचा हात धरून तिला जपून चालवित नेत होते. चालत चालत सारे जण आता तापी तीरावर आले. इतरत्र सर्वत्र वैशाख वणवा पेटलेला असताना महत्ग्राम मात्र वृक्षराजींमुळे शांत वाटत होते. मार्कंडेय ऋषींनी तपश्चर्या केलेले ते स्थान अतिशयच रमणीय होते.

वैशाख महिन्यातील वद्य दशमी. सारे जण नेहमीप्रमाणे तापीतीरावर

स्नानासाठी गेले. साऱ्यांनी स्नान केले आणि भजनसंकीर्तन करावे ह्या हेतूने ते तापीतीरावर आले. टाळविणा, मृदंग यांच्या कल्लोळामध्ये सारेजण जणू देहभान हरपले होते. तापसांच्या मेळ्यातील ज्ञानेश्वर, सोपानदेव, वटेश्वर, चांगदेव हे केव्हाच समाधिस्थ झाले होते. या साऱ्यांच्या आठवांनी साऱ्यांचीच मने एकप्रकारे कातर अशी झाली होती आणि त्यामुळे भजनामध्येही एक विलक्षण आर्तता निर्माण झाली होती.

सकाळपासून नामगजरामध्ये दंग असणाऱ्या या मंडळींना मध्यान्ह कधी झाली हेही कळले नाही. आता मात्र वातावरणात अचानक बदल घडून आला. भर दुपारीच आकाशात मेघांनी गर्दी केली. प्रलयकाळच्या वीजांप्रमाणे विजा चमकू लागल्या. प्रचंड वारा सुटला, वाऱ्याच्या वेगामुळे धूळ गगनापर्यंत जाऊ लागली. समोरचे काहीच दिसेनासे झाले, अंधकार दाटून आला. वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे साऱ्यांच्याच देहलता विलक्षण रीतीने थरथरत होत्या. वारा, वादळ, पाऊस, वीजा यांचे जणू काही तांडवनृत्यच सुरु झाले होते. पृथ्वी आणि गगन एकमेकांत मिसळून गेल्यासारखे भासत होते. या साऱ्या प्रकारामुळे कोणालाच काही दिसत नव्हते. कोणाचेच डोळे उघडत नव्हते अशी काही विलक्षण परिस्थिती निर्माण झाली होती. देहदृष्ट्या अत्यंत विकल झालेल्या मुक्ताबाईची अवस्था आता अधिकच बिकट असणार हे जाणून निवृत्तिनाथ मुक्ताबाईला धरून ठेवा म्हणून इतरांना विनवत होते. त्यांचे ते शब्द वादळवाऱ्यातच विरून गेले.

वीजेचा विलक्षण असा कडकडाट चालू असतानाच मध्ये एकदम घंटा वाजत असल्याचे नाद सर्वांच्या कानी आले. परंतु नेमके काय घडत आहे हे कोणालाच कळत नसल्याने त्या घंटानादाचाही काही अर्थबोध कोणाला झाला नाही. काही वेळाने आकाश आभुट निवारले गेले, मळभ निघून गेले, आकाश पुन्हा पूर्ववत स्वच्छ झाले. वारावादळवीजा यांचे तांडवनृत्य थांबले, तेव्हा साऱ्यांनीच डोळे उघडले. आपल्या अवतीभोवती काय झाले आहे यादृष्टीने सारे पाहू लागले. निवृत्तिनाथांनी पहिला प्रश्न केला तो मुक्ताबाईसंबंधी. ती कोठे आहे याची विचारणा केली. साऱ्यांनी इकडे तिकडे पाहिले, परंतु खूप शोधाशोध करूनही मुक्ताबाई कोठे सापडली नाही. ''मुक्ताबाई डोळा पाहिली नाही ।

आम्हा मुक्ताबाई बोलली नाही ।।'' [७४] असा साऱ्यांनीच शोक व्यक्त केला.

मघाशी झालेल्या घंटानादाचा अर्थ आता निवृत्तिनाथांच्या ध्यानात आला. त्यांनी सर्वांना समजावले,

''कडाडली वीज निरंजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।
वैकुंठी लक्ष घंटा वाजती एकघाई । झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ।
एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनी । जेव्हा निरंजनी गुप्त झाली ।।'' [७५]

निवृत्तिनाथांनी धीर राखून साऱ्यांना ही गोष्ट सांगितली मात्र नंतर त्यांना शोक आवरेना. ''आली गेली कैसी आम्हा कळले नाही । कोठे मुक्ताबाई विसर्जिली । काही कोणावरी नाही पडले ओझे ।।'' [७६] अशा हरप्रकारे निवृत्तिनाथ शोक करू लागले. मागे एकट्या उरलेल्या निवृत्तिनाथांच्या मनात वारंवार साऱ्या भावंडांच्याच आठवणी येऊ लागल्या. त्यातही मुक्ताबाईच्या जाण्याचे त्यांना विलक्षण दु:ख झाले. ''अवघ्यापरीस कष्टी केले मुक्ताईने । काहीच बोलणे घडले नाही ।।'' [७७] असे निवृत्तिनाथ म्हणत होते. मुक्ताबाईच्या वागण्याबोलण्याचे स्मरण निवृत्तिनाथांना होत होते.

'अविट बोलणे बोलावे अनादि । ते गुह्य वेदी सापडेना ।
कीर्ति वैराग्य केले सामराज्य । घडविला विलास अध्यात्माचा ।
नाशिवंत शरीर केले अविनाश । घडविला विलास अध्यात्माचा ।
तुझ्यामुळे हरि चालतो उगला । देहा आधी गेला प्राण माझा ।।' [७८]

मुक्ताबाईच्या परमपावन आठवणी काढत सारे जण तेथेच एक महिनाभर राहिले. निवृत्तिनाथांची अवस्था पाहून नामदेवांना जाणीव झाली, 'देवा करिता ऐसा थोर । सांडील शरीर निवृत्तिराज ।।' [७९] आणि ही गोष्ट खरीच होती. देहातून प्राणच निघून गेल्यावर देह तरी कसा शिल्लक राहिल ? पुढे निवृत्तिराजही थोड्याच दिवसात समाधिस्थ झाले. या साऱ्या प्रसंगामध्ये उपस्थित असलेले नामदेव म्हणत होते,

''गेले दिगंबर ईश्वर विभूति । राहिल्या त्या कीर्ति जगामाजी ।
वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानी । आता ऐसे कोणी होणे नाही ।
सांगतील ज्ञान म्हणतील खूण । नयेची साधन निवृत्तिचे ।
परब्रह्म डोळा दावू ऐसे म्हणती । कोणा नये युक्ति ज्ञानोबाची ।

करतील अर्थ सांगतील परमार्थ । नये पां एकांत सोपानाचा ।
नामा म्हणे देवा सांगूनिया काही । न ये मुक्ताबाई गुह्य तुझे ।।'' ८०

मुक्ताबाईचे स्वरूपाकार होणे, नाशिवंत शरीर केले अविनाश या गोष्टी नेमक्या कशा काय घडल्या असतील ? ही वस्तुस्थिती नेमकी काय आहे ? याचे गुह्य मुक्ताबाईखेरीज नेमके कोणाला उलगडणार ? ही किमया मुक्ताबाईखेरीज कोणाला कशी साधणार ? या साऱ्या गोष्टींचे गूढ मनात तसेच कायम राहते आणि नामदेव महाराजांचे बोलच कानात घुमत राहतात,

'नामा म्हणे देवा सांगूनिया काही । न ये मुक्ताबाई गुह्य तुझे ।।'

**

# धाडा बोलावणे गोरोबाला

मडके कच्चे का पक्के ? याबाबतीतली नामदेवाची केलेली परीक्षा हा नामदेवांच्या जीवनचरित्रामधील एक अत्यंत महत्त्वपूर्ण भाग होय. या प्रसंगाच्या निमित्ताने अध्यात्ममार्गातील सद्गुरुची असणारी आवश्यकता नामदेवांना पटली आणि त्यातून पुढे त्यांना विसोबा खेचर यांचा अनुग्रह प्राप्त झाला. नामदेवांच्या दृष्टीने हा भाग जितका महत्त्वपूर्ण आहे तितकाच, नव्हे त्याहूनही अधिक महत्त्व मुक्ताबाईच्या जीवनचरित्राच्या दृष्टीने या प्रसंगाचे आहे. कारण हा सर्व प्रसंग घडवून आणण्यास कारणीभूत ठरली ती मुक्ताबाईच. 'मुक्ताबाईने कळ माजविली' असे या प्रसंगाचे नामदेवांनी वर्णन केले आहे. आणि दुसरी गोष्ट अशी की, यानिमित्ताने मुक्ताबाईच्या आध्यात्मिकतेचाही कस येथे लागला. आणि त्या कसोटीवर मुक्ताबाईही पुरेपूर पात्र ठरली. एवढेच नव्हे तर तिच्या तिन्ही भावंडांनाही यामुळे तिची एक वेगळी ओळख पटली. म्हणूनच या सर्व प्रसंगाचा सखोल विचार करणे प्राप्त आहे. (याचा सविस्तर विचार 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' प्रकरणात केला आहे.)

निवृत्ति, ज्ञानेश्वरादी भावंडे आणि संत नामदेव यांची पहिली भेट झाली तेव्हाची ही घटना आहे. नामदेवांची योग्यता जाणून निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान या तिघांनी नामदेवांना वंदन केले. परंतु नामदेवांनी मात्र त्या तिघांची योग्यता जाणूनही त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. विठ्ठलाचा अखंड शेजार असूनही नामदेवांचा अहंकार नाहीसा झालेला नाही हे या प्रसंगावरून मुक्ताबाईच्या चाणाक्ष नजरेला लगेच जाणवले आणि अशा अभिमानी, अहंकारी व्यक्तीच्या दर्शनासाठी मी जाणार नाही असा आपला ठाम निर्धार मुक्ताबाईने व्यक्त केला. तेव्हा तिला इतर तिघा भावंडांनी समजावण्याचा प्रयत्न केला. भक्तिच्या बळावर नामदेवांनी देव वश करून घेतला आहे, असे समजावून सांगितले. नामदेवांनीही भक्तिपेक्षा दुसरे अधिक काही श्रेष्ठ नाही, असे मुक्ताबाईला सांगितले.

'आतली सोय' ठाऊक नसेल तर हरिभक्त असूनही त्याचा काही उपयोग नाही हे मुक्ताबाईने यावेळी स्पष्ट केले. तेव्हा 'आतली सोय' हा कशाचा निर्देश आहे हे पाहणे आवश्यक आहे. परमेश्वरप्राप्तीची आपल्याच ठिकाणी

असलेली सोय म्हणजे 'सोऽहम्श्वास' आपला नेहमीचाच श्वास विशिष्ट पद्धतीने घेतला तर त्यातून परमेश्वरप्राप्ती होऊ शकते. नव्हे ती व्यक्ती स्वत:च परब्रह्मस्वरूप होऊ शकते. ही आतली सोय तोपर्यंत नामदेवांना ठाऊक नव्हती. ते नाथसंप्रदायाचे दीक्षित नसल्याने त्यांना ही सोय माहीत नसणे स्वाभाविक होते. ही आतली सोय, त्याची पद्धत ही गुरुगम्यच असते. तेव्हा सद्‌गुरुशिवाय मोक्ष कदापि मिळणार नाही हे मुक्ताबाई येथे स्पष्ट करतात.

'देवाचे जवळी असतो नित्य आम्ही' या गोष्टीचा सूक्ष्म अहंकार नामदेवांना झाला होता, असे दिसते. अध्यात्ममार्गातील सद्‌गुरुची आवश्यकता मुक्ताबाईना नामदेवांना पटवून द्यावयाची होती. परंतु नामदेव वयाने वडील आणि मुक्ताबाई धाकटी; असे असूनही मुक्ताबाईने स्वत:च्या विचारांशी ठाम राहून आपले म्हणणे वेगवेगळ्याप्रकारे नामदेवांना पटवून देण्याचा प्रयत्न केला.

परिसावर खापराचे झाकण ठेवले तर ते आतून बावनकशी होत नाही, पोवळ्यापेक्षा रानगुंजा अधिक चांगल्या दिसतात पण त्या शृंगारासाठी वापरल्या जात नाहीत. उसाच्या शेजारी एरंडाचे झाड लावले तर त्यास काही गोडी येत नाही. कापराला दिव्याचा शेजार झाला तर त्याचे वेगळेपण शिल्लक उरत नाही ही व अशी अनेक उदाहरणे मुक्ताबाईनी नामदेवांना दिली. ''कल्पतरू तळवटी इच्छिली ते गोष्टी । अद्यापि नरोटी राहिली का ।।'' [१] असा रोकडा सवालही तिने नामदेवांना केला. नामदेवांनी अहंतेचा खुंट वाढविला आहे, त्याला संतांची संगती सहन होत नाही, अहंता सर्पाने त्याला वेढलेले आहे इतक्या स्पष्ट रीतीने मुक्ताबाईने नामदेवांना सांगून पाहिले पण एवढे सांगूनही त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. नामदेवांचा अहंकार तीळमात्र कमी झाला नाही. तेव्हा मुक्ताबाईने आपल्या सर्व बंधुंनादेखील विनंती करून पाहिली. परंतु त्यावर निवृत्तिनाथ म्हणाले ''आपले स्वहित करावे आपण । संतांच्या सन्माना चुको नये ।।'' [२] श्रीनिवृत्तिनाथांचे हे उत्तर ऐकून आपला हा मार्गही खुंटला असल्याचे मुक्ताबाईच्या लक्षात आले. नामदेवांना गुरुमार्गात आणण्याची तिची तळमळ काहीच परिणाम साधू शकली नाही. तेव्हा आता आपला हेतू साध्य करण्यासाठी काहीतरी युक्ती योजली पाहिजे हे तिच्या लक्षात आले.

तेव्हा मुक्ताबाईने सांगितले, ''धाडा बोलावले गोरोबाला । मुक्ताबाई

म्हणे भाजले की कोरे । काकाचे उत्तर सत्य मानू ।।'' [३]

याठिकाणी मुक्ताबाईने गोरा कुंभारांना नामदेवांची परीक्षा घेण्यासाठी बोलाविले असे सामान्यत: समजले जाते. परंतु गोरा कुंभारांनी ती परीक्षा केली नसावी हे खालील कारणांवरून स्पष्ट होते.

१) नामदेव व ही भावंडे यांच्या भेटीच्या प्रसंगाचा नीट विचार केला असता असे लक्षात येते की – आता यापुढे नामदेवांची जी परीक्षा होणार आहे ती परीक्षा मुक्ताबाईचे म्हणणे इतरांना पटवून देणारी ठरणार आहे. तेव्हा मुक्ताबाईच्या दृष्टीने ही परीक्षा महत्त्वपूर्ण ठरणार होती. तेव्हा जो पारखी आहे, परीक्षक आहे तो निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान आणि नामदेव या सर्वांच्याच दृष्टीने आदरणीय असा असावयास हवा हे उघड होते. प्रचलित मताचा विचार करता असे वाटते की, गोरा कुंभारांनी केलेली परीक्षा मान्य व्हावी असे त्यांचे नेमके कोणते सामर्थ्य मुक्ताबाईला जाणवले ?

दुसरी गोष्ट अशी की, गोरोबा काका वयाने वडील म्हणून त्यांना हा अधिकार मिळावा तर त्यांच्यापेक्षा वयाने कितीतरी वडील असणारे चांगदेव त्यांच्या पाहण्यात होते. तेव्हा गोरोबांना परीक्षा करण्याचा अधिकार देण्याचे नेमके कारण दिसत नाही. तेव्हा या चारही भावंडांपेक्षा अधिक अधिकारी व्यक्तीची परीक्षक म्हणून मुक्ताबाईने निवड करणे उचित होते. अशी योग्य व्यक्ती गोरक्षनाथच असणार हे उघड आहे.

२) नामदेवांनी गोरा कुंभाराचे जे चरित्र लिहिले आहे त्यात या घटनेचा साधा नामोल्लेखही येत नाही. घडला प्रसंग अगदी यथार्थपणे आणि अगदी वस्तुनिष्ठपणे रंगविणारे नामदेव गोरा कुंभाराच्या चरित्रात मात्र या घटनेचा उल्लेख करत नाहीत ही बाब असंभवनीय वाटते. याचाच अर्थ असा की ही परीक्षा गोराकुंभारांनी केलेली नसणार.

३) 'गोरा बोलाविला जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे ।।' [४] असा उल्लेख या संदर्भात केलेला आढळतो. म्हणजे गोरा काका म्हणून जी व्यक्ती आहे तिचे स्वरूप 'जुनाट पै जुना' असे आहे. हे वर्णनही गोरा कुंभारांशी जुळणारे नाही. कारण त्यांचा जन्म शके ११८९ मधील तर नामदेवांचा शके ११९२ मधील.[५] म्हणजेच दोघांच्या वयामध्ये फक्त तीन

वर्षांचेच अंतर आहे. गोरोबा कुंभार तीनच वर्षांने वडील असताना त्यांचे वर्णन 'जुनाट पै जुना' असे करणे असंभव वाटते.

४) नामदेव हे निवृत्ति आदी भावंडांचाच ज्ञानाधिकार मान्य करण्यास तयार नव्हते. तेव्हा ते गोरा कुंभारांकडून आपली स्वत:ची परीक्षा करवून घेतील ही गोष्टही अशक्य वाटते.

५) कीर्तनाच्या वेळी नामदेवांनी हात वर करून भगवंताचे अनुसंधान करण्यास सांगितले तेव्हा थोटे हात असल्यामुळे गोरा लाजला आणि नामदेवांच्या कृपेमुळे त्यांना हात फुटले असा उल्लेख गोरा कुंभारांच्या अभंगामध्ये आहे. [६] त्या प्रसंगामुळे गोरा कुंभारच स्वत: नामदेवांपुढे नतमस्तक आहेत. असे गोरा कुंभार नामदेवांची, आपल्या आदरस्थानी असलेल्या व्यक्तीची अशी परीक्षा करतील ही गोष्ट संभवत नाही.

६) गोरा कुंभाराच्या हातात त्यांच्या व्यवसायामुळे थापटणे असणार हे उघड आहे. पण मातीची मडकी भाजली गेली की नाही याची परीक्षा पाहू शकणारे थापटणे हे एखादी व्यक्ती अध्यात्मप्रांतात परिपक्व झाली किंवा नाही ह्याची परीक्षा कशी करू शकेल ? तेव्हा ही गोष्ट तर्कबुद्धीस पटणारी नाही. येथे साध्या थापटण्याचा उल्लेख नसून 'अनुभवाचे थापटणे' अभिप्रेत आहे.

निवृत्तिनाथांच्या मस्तकावर जेव्हा थापटणे मारले गेले तेव्हा ते स्वत: परब्रह्मस्वरूपच झाले. 'आता कैचे कोरे उरे' अशी परिस्थिती ज्ञानदेवांची झाली. सोपानदेवांच्याही बाबतीत तेच घडले. मुक्ताबाईवर जेव्हा थापटणे मारले तेव्हा 'अमृतसंजीवनी उतो आली' [७] असा अनुभव तिला आला आणि नामदेवावर जेव्हा हा प्रयोग झाला तेव्हा तो मात्र डोके चोळू लागला, रडू लागला.

हे सर्व संदर्भ भौतिक स्वरूपाचे नाहीत. ते आध्यात्मिकतेचा निर्देश करतात. 'थापटणे' हा शब्दप्रयोग संतवाङ्मयात सद्‌गुरुने शिष्याला केलेले शक्तिप्रदान या अर्थाने वापरला जातो. ''म्हणे मुक्ताबाई करार केला चित्ता । थापटला माथा सद्‌गुरुने ।।'' [८] असा उल्लेख मुक्ताबाईने याच अर्थाने इतरत्र केला आहे. तेव्हा हे शक्तिप्रदान म्हणजे अनुभवाचे थापटणे होय.

ही अशी परीक्षा करण्याचे सामर्थ्य गोरक्षनाथांचेच असणार हे उघड आहे. आता ही सर्व परीक्षा गोरक्षनाथांनीच केली असावी असे म्हणण्यास

कोणता आधार सापडतो का ? ते विचारात घेऊ. 'श्रीज्ञानेश्वरदर्शन' या ग्रंथात 'ज्ञानेश्वरांचा नाथपंथ' ह्या सरदार मिरीकर यांच्या लेखात त्याचे सविस्तर विवेचन आले आहे. [९] प्रस्तुत संशोधिकेस ही कल्पना अधिक योग्य वाटते.

सरदार मिरीकर यांनी यासंबंधी कोणते विचार मांडले आहेत त्या मुद्द्यांचा आधी विचार करू. 'नामदेवास थापटणे मारणारा गोरा कुंभार होता असे महिपती सांगतात. व त्याचाच अनुवाद अद्याप होत आहे....... कुंभार या शब्दावरून महिपतीचा तसा समज झाला असावा पण हे पद जातिवाचक नसून अधिकारदर्शक आहे....... नाथपंथात असे लाक्षणिक शब्द वापरण्यात येतात. शिवदिनकेसरींच्या मठात मिळालेल्या नवनाथांच्या यादीत गोरक्षनाथांना 'घट व्यापंति गुरु गोरक्षनाथ' असे म्हटले आहे. गोरक्षनाथ घट व्यापणारे होते व त्या अर्थाने कुंभार हा शब्द योजलेला दिसतो...... या अभंगात सर्व योगमार्गाचे सिद्धान्त दर्शविले आहेत. तेरढोकीचे गोराकुंभार केवळ भक्तिमार्गी होते. त्यांच्यात हे योगज्ञानप्रावीण्य होते असे म्हणणे धाडसाचे आहे. उलट गोरक्षनाथ हे 'योगाब्जिनीसरोवर' होते असे ज्ञानेश्वर म्हणतात. त्यामुळे ही मुक्ताबाईची भेट – जिच्यात आपुले अविटपणच ओळखले गेले – योगेश्वर गोरक्षनाथांशीच झाली हे प्रमाण मानावे लागते. 'योगियांच्या खुणा योगी जाणे' अशी ही भेट आहे. या अभंगात निरनिराळ्या अवस्थांविषयी ज्या योग्यांच्या खुणा दिल्या आहेत त्यांचा उलगडा योगमार्गियांसच होऊ शकेल.' [१०]

आता प्रस्तुत संशोधिकेचे याविषयावरील मत विचारात घेऊ.

१ ) 'गोरा बोलाविला जुनाट पै जुना', या अभंगातील परब्रह्म म्हातारा, वैराग्याचे वरी पाल्हाळला, सोऽहमशब्दे विरक्ती, अव्यक्त हे सर्व शब्दप्रयोग गोरक्षनाथांना लागू पडतील असेच आहेत. 'विषयविध्वंसकवीर' म्हणून ज्ञानेश्वरांनी केलेले त्यांचे वर्णन गोरक्षनाथांच्या वैराग्याची साक्ष देणारे आहे. ही विरक्ती सोऽहममधून आली आहे की जी नाथसंप्रदायाची साधनापद्धती आहे. निवृत्तिनाथमहाराज यांनी समाधीपूर्वी केलेल्या नमनात गोरक्षनाथांचा उल्लेख 'नमो जुनाट युगादी तुज नमो' असाच केला आहे. [११]

२ ) गोरोबाकाकांना बोलाविणे भौतिक स्तरावरून सहजशक्य असताना मुक्ताबाईला 'मोतियांचा चूर फेकिला' अशा पद्धतीने त्यांची भेट

घेण्याची काहीच आवश्यकता नव्हती. अभंगामध्ये मात्र मुक्ताबाई – गोरोबा भेटीचा उल्लेख ‘कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं’ [१२] असा आला आहे. हे सर्व ध्यानावस्थेतील उच्चतम स्वरूपाचे अनुभव आहेत.

३ ) या भेटीबाबत ज्ञानदेव मुक्ताबाईला ‘भेट कशी झाली ?’ असा प्रश्न विचारतात तेव्हा मुक्ताईने ‘‘ओळखिले अवीट आपुलेपण’’ [१३] असे उत्तर दिले. गुरुपरंपरेतील आद्य आचार्यांची भेट या दृष्टीने हा उल्लेख अधिक समर्पक वाटतो. गोरक्षभेटीचे वर्णन करताना मुक्ताबाईच्या अभंगात ‘भेटविले मूळिचे सुखधामा ऐसे जाले ।।’ [१४] असा उल्लेख येतो. तोही याला मिळताजुळता आहे.

४ ) नामयाची दासी असणारी जनाबाई गोरक्षनाथांना उद्देशून पाळणा म्हणते, ‘‘जो जो जो जो रे गोरक्षा – जगदोद्धारा जगदीशा’’ [१५] जनाबाईचा सर्व संतमंडळींशी जो संबंध आला आहे तो नामदेवांच्या माध्यमातूनच आला आहे. तेव्हा नामदेव गोरक्षनाथांशी संबंधित असल्याशिवाय अशा रीतीने तिने पाळणा लिहिणे अशक्य वाटते. ही गोष्टही वरील म्हणण्यास पुष्टी देणारी आहे.

५ ) राई येवढे पाखरू ... अशी सुरुवात असणारा नामदेवांचा एक अभंग आहे. हा सर्व अभंग या प्रसंगाचे वर्णन करणारा आहे. यात केलेला पुढील उल्लेख अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

‘ऐसे ते पाखरु गोरक्षराये वळखिलेंरे ।
पिंडी ब्रह्मांडी मछिंद्रनाथे देखियलेंरे ।
त्याचियेनि अंगसंगे सद्गुरुनाथे दाखविलेंरे ।
त्याचियाची प्रसादे नामा शिंप्याने गाईलेंरे ।।’ [१६]

याठिकाणी गोरक्षनाथांचा आलेला उल्लेख या प्रसंगाचा स्पष्ट संकेत देणारा आहे.

६ ) नामदेव परीक्षेचे वर्णन जेथे आले तेथे ‘निवृत्तिदेवे म्हणे’ या अभंगातील पुढील उल्लेख महत्त्वपूर्ण आहे. ‘गैनीची मिरास घेतली प्रमाण । पूर्वभूमी जतन करित आस ।।’ [१७] हा तो उल्लेख होय. येथे ‘मिरास’ या शब्दाचा अर्थ नीट लक्षात घेतला की त्यांनी निवाड्यासाठी, परीक्षेसाठी गोरक्षनाथांनाच प्रमाण कसे मानले आहे ते स्पष्ट होईल. ‘मिरास’ हा शब्द ‘वडिलोपार्जित’ या

अर्थानेही वापरला जातो. आणि तोच अर्थ येथे बरोबर ठरतो. गैनीची मिरास म्हणजे गोरक्षनाथ यांचा हा उल्लेख आहे.

७ ) डॉ.रा.चिं.ढेरे यांना पुणतांबे येथील चांगा केशवदास यांच्या मठात चांगावटेश्वरांचे 'नाथगुरुपरंपरा' नामक एक लघुप्रकरण उपलब्ध झाले. त्यामध्येही

'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला । पंथ सांगितला नाथाचा हा ।
मुक्ताई उपदेशी चांगा वटेश्वर । नाथपंथ साचार आमुचा असे ।।' [१८]

असा स्पष्ट उल्लेख आला आहे.

८ ) रत्नाकराने आपल्या 'दीपरत्नाकर' या ग्रंथामध्ये 'गोरक्षीने मुक्ताबाई । नाना परी बोधिले पाही ।।' अशी साक्ष दिली आहे. तसेच रत्नाकराचा नातू एकनाथ आणि रत्नाकराचे गुरुबंधू कबीर यांचा शिष्य भोळानाथ या दोघांनी रचलेल्या परंपरेच्या दोन आरत्यात गोरक्षनाथांनीच मुक्ताबाईला बोध केल्याचे म्हटले आहे, अशी नोंद डॉ.ढेरे करतात. [१९]

९ ) मत्स्येंद्रनाथांकडून प्राप्त झालेला ज्ञानसुधारस गोरक्षनाथांना मिळाला आणि त्यांच्याकडून तो पुढे कसा प्रवाहित झाला हे नाथपरंपरेतील एक ग्रंथकार शिवकल्याण यांनी 'नित्यानंदैक्यदीपिका' या ग्रंथात सांगितले आहे. आदिनाथ, मत्स्येन्द्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्ति, ज्ञानेश्वर हा एक प्रवाह होय, असे वर्णन येथे आले आहे.

आता दुसरा प्रवाह सांगितला तो असा –

'असोहेएकाहेलावयाचिमातु । आतांतोचिश्रीगोरक्षनाथु । जोश्रीआदिनाथाचा नातु । मच्छेंद्रद्वारा ।। तोतैसाचिरसुवोसंडला । तवमुक्ताबाईयाप्राशिला । प्राशुनतैसाचिउरला । तोश्रीवटेश्वरांदिधला ।। वटेश्वरीहूनिचक्रपाणि । लाधिलीहेअमृतसंजीवनी । विमळानंदतेथूनि लाधते जाले ।।' [२०]

जो रस ज्ञानेश्वरांना गहिनी–निवृत्ति यांच्या माध्यमातून मिळाला तोच रस मुक्ताबाईला गोरक्षनाथांकडून प्राप्त झाल्याची ही स्पष्ट नोंद आहे. यातील अमृतसंजीवनी हा उल्लेखही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नामदेवपरीक्षेच्या वेळी गोरोबाने जी परीक्षा घेतली आहे त्यावेळी मुक्ताबाईला आलेला अनुभव 'तेचि थापटणे मुक्ताबाईला हाणी । अमृतसंजिवनी उतो आली ।।' [२१] असा नामदेवांनी

नोंदविला आहे.

वरील सर्व विवेचन लक्षात घेता, नामदेवांची परीक्षा गोराकुंभाराने केली नसून गोरक्षनाथांनी केली असावी या गोष्टीला येथे निश्चित आधार प्राप्त होतो.

**

# गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला

## (मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांच्या भेटीचा वेध)

नामदेवांची परीक्षा गोरक्षनाथांनी केली ह्याचा विचार आपण 'धाडा बोलावणे गोरोबाला' या प्रकरणात केला आहे. नामदेवांचे मडके कच्चे असल्याचा निर्णय गोरक्षनाथांनी दिला त्याचवेळी उपस्थित असलेल्या इतरांनाही काही सुंदर असे आध्यात्मिक अनुभव आले. त्याचे सविस्तर वर्णन निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, विसोबा खेचर यांनी करून ठेवले आहे. त्याचा विचार आपण या प्रकरणात करत आहोत. हा सारा भाग मुळातून अभ्यासत असताना असे लक्षात येते की, हा साराच प्रसंग आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.हा प्रसंग केवळ या भावंडांच्याच किंवा नामदेवांच्याच दृष्टीने महत्त्वाचा आहे असे नाही तर एकूणच महाराष्ट्रीय संतपरंपरेत अशा प्रकारचा प्रसंग 'एकमेवाद्वितीय' आहे म्हणून या प्रसंगाचा सखोल विचार होणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेच्या इतिहासातील हा एक अत्यंत महत्त्वाचा असा क्षण आहे.

ह्या साऱ्या प्रसंगाचे रहस्य केवळ वैचारिक पातळीवरून आकलन होऊ शकणार नाही असे लक्षात आले. तेव्हा अध्यात्मशास्त्राच्या आधारे या प्रसंगाची काही उकल होते का ते पाहण्याचा प्रयत्न केला. तशी उकल होत आहे असे काहीसे प्रस्तुत संशोधिकेस जाणवले. त्याचा विचार येथे करू.

या सर्व प्रसंगाला पार्श्वभूमी लाभली आहे ती नामदेवांच्या परीक्षेची. ज्ञानेश्वरादी भावंडांच्या चरित्राचा विचार करता असे लक्षात येते की, नामदेवांच्या परीक्षेपूर्वी अशाच एका महान तपस्व्याशी त्यांची गाठ पडली होती. तो तपस्वी म्हणजे चांगदेव. चांगदेव योगसामर्थ्याने बलाढ्य असूनदेखील प्रत्यक्ष गोरक्षनाथांना पाचारण करावे लागावे असा प्रसंग त्यांच्यावेळी निर्माण झाला नाही. आणि नामदेवांच्याबाबतीत मात्र एवढी आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली यामागील रहस्य काय असावे ? याचा काही उलगडा करावा लागेल. चांगदेवांचा जो अहंकार होता तो 'सिद्धाईचा' होता. आपल्या सिद्धीसामर्थ्याचा

अहंकार त्यांच्या मनात वास करून होता. सजीवांवरील सत्तेच्या सामर्थ्याचा अहंकार, ज्ञानदेवांनी जडभिंतीवरील सत्ता दाखवून हरण केला आणि चांगदेव शरण आले. चांगदेवांचा हा अहंकार राजस स्वरूपाचा होता परंतु नामदेवांच्या बाबतीत ही परिस्थिती अधिकच बिकट होती. कारण त्यांच्या अहंभावाचे स्वरूप सात्विक होते. 'आम्ही देवाजवळ नित्य असतो' असा सात्विक अहंभाव त्यांच्या मनात होता. तामसिक किंवा राजसिक अहंभावापेक्षा सात्विक अहंभाव नाहीसा होणे अधिक अवघड असते. नेमकी तीच परिस्थिती नामदेवांबाबत होती, तेव्हा तो अहंभाव घालविण्यासाठी योजना झाली ती गोरक्षनाथांची !

**मडके कच्चे असण्यातील धोका –** ज्ञानदेव-नामदेव भेटीच्या वेळी, नामदेवाचे मडके कच्चे असल्याचे मुक्ताबाईच्या लक्षात आले आहे आणि ते पक्के व्हावे ही तिची तळमळ आहे. मुक्ताबाई या साऱ्या प्रकरणात काहीशी आग्रही बनलेली दिसते. ती आपल्या सद्गुरुशी, भावंडांशीही याबाबतीत प्रतिवाद करताना दिसते. याचे कारण ती या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आहे. नामदेव तसेच कोरे राहिले तर त्यांचे आध्यात्मिकदृष्ट्या फार मोठे नुकसान होऊ शकेल हे तिला जाणवत आहे. आणि म्हणून ती हा परीक्षेचा प्रसंग घडवून आणण्याबाबत आग्रह धरताना दिसते.

मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणाली, ''कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती । काय साहे संगती पाणियाची ।। मेणाची पुतळी घेता करी बरी । अग्नीचे शेजारी राहे कैशी ।।'' [१] म्हणजे याचा भावार्थ असा की साधनेतील उच्च स्तरावरील अनुभव पेलावयाचे असतील तर शरीर तपश्चर्येने भाजावे लागते. तपश्चर्येची आग सहन केलेले शरीरच उच्चदशेतील अनुभव पेलू शकते. कच्च्या मडक्यात घातलेला दिव्य सोमरस ते मडके धरून ठेवू शकले नाही अशी कथा वेदांमध्ये आहे. ''म्हणे मुक्ताबाई जाऊ देऊ नये । ऐसे सरिसे काय भांडे करा ।।'' [२] असे जेव्हा मुक्ताबाई म्हणते, तेव्हा तिच्या मनात ह्या कथेचा संदर्भ असावा असे दिसते. वेदोपनिषदांचे अध्ययन केलेल्या आपल्या भावंडांनाही केवळ या कथेच्या नुसत्या उल्लेखावरून त्यातील गांभीर्य लक्षात येईल अशी तिची अपेक्षा आहे. तिच्या या सांगण्यामागील आध्यात्मिक अर्थ काय ह्याचा काही विचार करू.

या भेटीपूर्वी नामदेवांची अवस्था कशी होती ? विठ्ठलावर अपंरपार श्रद्धा असलेले नामदेव अशी त्याची सर्वदूर प्रसिद्धी होती. ईश्वराच्या सान्निध्याचा त्यांना अनुभवही आला होता. पण हे सारे अनुभव म्हणजे मनुष्याला शक्य असलेल्या आध्यात्मिक विकासाचा अंतिम टप्पा नव्हे हे मुक्ताबाईला ज्ञात आहे. आलेल्या काही अनुभवांच्या आधारावरच नामदेव अल्पसंतुष्ट झाले असल्याचे तिला समजले असावे, अल्पस्वल्प अनुभवाच्या आधारावर त्यांच्या मनात आलेली अहंताही तिला जाणवली. तेव्हा ही गोष्ट नामदेवांच्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येणारी आहे हे जाणवून ती आपल्या भावंडांना विनंती करते आहे.

**धाडा बोलावणे गोरोबाला –** ज्ञानेश्वरादी भावंडांच्या भेटीचा खरा लाभ नामदेवांना जर घ्यायचा असेल तर नामदेवांची आधी काही आध्यात्मिक तयारी होणे आवश्यक होते. कारण त्यांना 'आतली सोय' ठाऊक नव्हती. परमेश्वरप्राप्तीचे व स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतीचे स्वत:च्या शरीरांर्गत असलेले मार्ग तोपर्यंत नामदेवांना माहीत नव्हते.

मुक्ताबाई व इतर भावंडे त्याकाळात उच्चावस्थेत वावरत होती. त्यांच्या संगतीचा आध्यात्मिक लाभ नामदेवांना व्हावा ही तिची इच्छा आहे. ह्या काळात मुक्ताबाईची आत्यंतिक समर्पित भावाने सोऽहम् साधना चालू असावी. ती सद्गुरुपाशी नि:शेष समर्पित झाली असावी. आता मुक्ताबाईला उच्च शक्तीचा निदिध्यास लागलेला आहे. आता त्या 'दिव्य शक्तीच्या' अवतरणाची वेळ निकट आली आहे हेही तिला जाणवत असावे. तेव्हा त्या साऱ्याचा लाभ व्हायचा असेल तर नामदेवांनीचीही तशी क्षमता असणे आवश्यक होते. नाहीतर त्या उच्च दिव्य शक्तीअवतरणाचा काहीच लाभ त्यांना होणार नाही किंवा असेही होईल की ती दिव्य शक्ती पेलता न आल्याने काही विपरीत परिणामही घडू शकेल. तेव्हा असे होऊ नये ही तिची तळमळ आहे.

तुम्ही तुमचे ब्रीद सार्थ करून दाखवा, नामदेवाला पावन करून घ्या, अशी विनवणी मुक्ताबाई आपल्या भावंडांना करीत आहे. एका अहंकारापायी नामदेवासारखा उत्तम भक्त वाया जात आहे हे तिला पाहवत नाही आणि म्हणूनच तिने तशी विनवणी केली आहे.

मुक्ताबाईने सुचविले, ''धाडा बोलावणे गोरोबाला । म्हणे मुक्ताबाई भाजले की कोरे । काकाचे उत्तर सत्य मानू ।।'' [३] गोरोबा सर्वांची परीक्षा करतील आणि ते जो निर्णय देतील तो सर्वांनी मान्य करावा असे एकमताने निश्चित झाले.

**मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ भेट –** आपल्या गुरुपरंपरेतील विख्यात आचार्य गोरक्षनाथ यांनाच मुक्ताबाईने याप्रसंगी निमंत्रण दिले. अव्यक्त स्वरूपातील गोरक्षनाथांची मुक्ताबाईनी स्वत:च्या योगसामर्थ्याच्या बळावर भेट घेतली.

'मोतियांचा चूर फेकिला अंबरी । विजुचिया परी कीळ झाले ।
जरी पितांबरे नेसविली नभा । चैतन्याचा गाभा निळबिंदू ।
तळीपरी पसे शून्याकार झाले । सर्पाचीही पिले नाचू लागे ।
कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ।।' [४]

अशा प्रकारे मुक्ताबाई गोरक्षनाथांना भेटली. आध्यात्मिक दृष्ट्या उच्च दर्जाचे असे हे अनुभव आहेत. 'सोहं शब्दे विरक्ती उरली अंबरी । पाती अुणभरी पाहिले पण ।।' [५] ही भेट कशी शक्य झाली याचे उत्तर आपल्याला मुक्ताबाईच्या अभंगातच पाहावयास मिळते.

'का मनी निजध्यास आला जाण । स्वामी दिल्हे की फार श्रम ।
की त्या जपणे जाण । जी आम्ही ।।
भेटी लागला । अगम्याच्या ।।' [६]

गोरक्षनाथांशी, अगम्याशी झालेली भेट ही निजध्यासातून घडून आली आहे असे येथे नमूद केले आहे. मुक्ताबाई म्हणत आहे,

'तेथे अनंत बाळाची हातवटी । सद्गुरु बांधिला गाठी ।
सुकृत आपुले हे निवटी । ऐसे जाले ।।
विरक्तीयोगाने शोधिले । दया तुमची मन बांधिले ।
जाणो भाग्य आमुचे उरले । आजि बापा ।।
सोहं ब्रह्माची काठी करी । प्रळये निवळली सारी ।
तुमच्या बोधाची शिदोरी । बांधिली वरुती ।।' [७]

ही प्रत्यक्ष भेट घडून येण्यासाठी, येण्यापूर्वी मुक्ताबाईने किती अपार कष्ट घेतले असतील, केवढी प्रचंड साधना केली असेल याचा अंदाज वरील अभंगातून

येतो. सद्गुरुने दिलेल्या साधनेच्या बळाच्या आधारावर मुक्ताबाईने एक निश्चित स्वरूपाची अशी काही उच्च अवस्था प्राप्त करून घेतली आहे. परंतु या पुढील प्रगतीसाठी मात्र आता ती वरील उच्च दिव्य शक्तीच अवतरणे आवश्यक झाले असावे. आणि त्यासाठी हे गोरक्षनाथांच्या रूपातले अवतरण घडून आले आहे.

**गोरक्षनाथांच्या प्रकट होण्याचे कारण –** गोरक्षनाथांच्या उपस्थितीचे वर्णन असे आले आहे, 'परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पाल्हाळला ।।' [८] 'विषयविध्वंसकवीर' असणारे गोरक्षनाथ मुक्ताबाईचे वैराग्य पाहून पाल्हाळले म्हणजे स्वत:ला प्रकट करते झाले.

अव्यक्त असलेले गोरक्षनाथ मुक्ताबाईच्या साधनेमुळे मूर्तरूप धारण करून तिच्या समोर उभे ठाकले आहेत. मुक्ताबाईला गोरक्षनाथ समोर साक्षात दिसत आहेत. आता हे कसे घडले असावे ? याला अध्यात्मशास्त्रात काही आधार आहे का ? तर असा आधार जरुर सापडतो. भक्ताच्या श्रद्धेमुळे जेव्हा ईश्वर प्रकट होतो तेव्हा तो भक्ताचे आराध्य स्थान, आराध्य दैवत जे असेल त्याच्या रूपात दर्शन देतो असे अध्यात्मशास्त्र सांगते. तेव्हा मुक्ताबाईला झालेले हे दर्शन अध्यात्मशास्त्राला सुसंगत असेच आहे. ती दिव्य शक्ती गोरक्षनाथांच्या रूपात मूर्त झाली.

आणखी एक गोष्ट अभ्यासांती आपल्याला जाणवत राहते की, हा जो दिव्यत्वाचा अनुभव मुक्ताबाईला आला, त्या दिव्य शक्तीचे एक मूर्त रूप म्हणजे गोरक्षनाथ. गोरक्षनाथांचे रूप धारण करून ती दिव्य शक्ती मुक्ताबाईसमोर मूर्त झाली. येथे गोरक्षनाथ या व्यक्तीलाही फारसे महत्त्व उरत नाही. कारण येथे गोरक्षनाथ व्यक्ती म्हणून नाही तर शक्ती म्हणून प्रकट झाले आहेत. मुक्ताबाईच्या अभंगातही एका ठिकाणी ह्याचा संकेत मिळतो. ती म्हणते, ''तुम्ही प्रगट ईश्वराच्या विभूती । आम्ही मंदमती नेणती ।।'' [९] पुढे ज्ञानबोध ग्रंथातही मुक्ताबाई म्हणत आहे, ''स्वरुपाचा अरुप स्वामी हा अकार । '' [१०]

मुक्ताबाई या प्रकट स्वरूपाची, गोरक्षनाथांची आरती करत आहे.

''अष्टभाव किरणें फाकती प्रभा । चंद्रसूर्य जैसी तारांगण नभा ।। तैसा हा सद्गुरु मजमाजी उभा । आदिनाथा आरती गोरक्षराजा ।। जय जय आरति येथे चंद्रमौळी । कृपाकरी देवभक्ता सांभाळी । जटा जूट गोदा वाहे कल्लोळी । तेचि प्रेमसुख या

भक्तांजवळी ।। कमळा कमळ जैसे ज्योतिस्वरूपा । निरंजनी दीप चांग्या पाहे पां । व्यक्त अव्यक्तरूपा अरूपा । सद्‌गुरुप्रसादें अनुभव सोपा ।। प्रात:काळ माध्यान्ह सायंकाळ आरति । अखंड न खंडे प्रेमाच्या ज्योति । अंतरा अंतर सोहंभाव प्रीति । प्रेमे ओवाळिले गिरजेचे पति ।। अमूर्तरूप हे मूर्तीसी आलें । नवें नित्य भरूनि चांग्या फावले । साधुसंत कृपावंत वटेश्वर बोले । बिजवट सामावलें मी माझें हरपलें ।। अव्यक्त लहरी प्रेमाचा पूर । तेथे पहुडला चांगा वटेश्वर । अनुहात ध्वनी सोहं नामें गजर । मुक्ताबाई म्हणे पुढती नाहीं संसार ।।'' [११]

ही भेट झाल्यानंतर ज्ञानेश्वरांनी प्रश्न विचारला आहे, कैसी झाली भेट ? या प्रश्नाचे उत्तर देताना मुक्ताबाई म्हणते, ''ओळखिले अवीट आपुलेपण'' [१२] तेव्हा प्रथम ही भेट फक्त मुक्ताबाई-गोरक्षनाथांची झाली असावी असे दिसते. 'तैसा हा सद्‌गुरु मज माजी उभा' [१३] हा मुक्ताबाईने केलेल्या आरतीतील उद्‌गार यादृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. पण नंतर मात्र तिने आपल्या या उच्च अनुभवात उपस्थित इतर सर्वांनाही सामील करून घेतले आहे असे दिसते. याप्रसंगी मुक्ताबाईची तिन्ही भावंडे, चांगदेव आणि विसोबा खेचर उपस्थित आहेत.

उपस्थित असलेल्या साऱ्यांना मुक्ताबाई येथे अधिकारवाणीने आणि आत्मविश्वासपूर्वक पण परखडपणे काही सांगत आहे असे दिसते. 'सद्‌गुरु वाटाड्या भला' याच्या आधारे मुक्ताबाई साधनेची वाटचाल करीत आहे आणि आता जो अनुभव तिला येतो आहे त्याचे निवेदन ती आपल्या सहप्रवाशांना करीत आहे आणि स्वत:प्रमाणेच या वाटचालीवरून पुढे पावले टाकीत यावे असे सांगत आहे. मुक्ताबाई सांगत आहे,

''स्थावर कुंडलिनी । गुंफिली असे कळिका ।
आज याचि देखा मूळमाया । भेडसाविले तेथे साधुयोगियांते ।
हिने महामहा संत झकाविले ।।
अध उर्ध्व पाहता । मावळोनि जाय ।
पाहता पाहता होय । सर्पाकार ।।
ते मुरडून असता तळी । नाना रंग सावळी ।
अकार संचली घालोनि बैसा ।।
म्हणे मुक्ताबाई । गुह्या द्यावी गवसणी ।

मनोहर आसनी । निवाडु द्यावा ।।'' [१४]

मुक्ताबाईच्या सांगण्यावरून, तिला आलेल्या ह्या अनुभवाच्या आधारे जेव्हा आता निवृत्तिनाथ मार्गक्रमण करू लागले तेव्हा ''प्रांत पुरुषाचे गुह्य कवाडे । उघडो लागे ।।'' [१५] असा अनुभव त्यांना आला. या 'अमृतवेळे'चा लाभ कसा करून घ्यावा हे निवृत्तिनाथ आता इतरांनाही सांगत आहेत. ''निवृत्तिदेव म्हणे चला गुंफेमधी । अचळ हे आदि समाधी असे ।। सद्‌गुरुप्रसादे बांधिली नेटकी । गुहे गौप्य ताटी आड केली ।।'' [१६] निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून इतर संतजनही या गुहेत शिरले म्हणजेच हा अनुभव घ्यावयास सिद्ध झाले. ''ऐसे गुंफेमध्ये नाहीं नामदेव । म्हणूनि माझा जीव थोडा होतो।।'' [१७] असे निवृत्तिनाथही आता म्हणत आहेत. मुक्ताबाईप्रमाणेच आता निवृत्तिनाथही नामदेवांविषयी व्याकुळ झालेले दिसतात.

या साऱ्या अनुभवाचे विश्लेषण आपल्या सीमित बुद्धीच्या आधारे करणाऱ्यांना मुक्ताबाई पुढे सांगत आहे, बुद्धी किंवा तर्काच्या आकलनाच्या पलीकडची ही गोष्ट आहे तेव्हा येथे कडसणीचे (कडसणी म्हणजे विचार, छाननी) काम नाही, ते निधान प्रत्यक्ष अनुभवून घ्या. ती म्हणते, ''कोणी कोणा येथे । चोरु नये कडसणी । निधान देखोनी । अनुभवा आणा ।। जलधराचा पडदा । फोडोनिया चढा । तेथेचि निवाडा । पडिला असे ।। देह देखण्याचा । सोडा अनुमान । निधान पाहणे आहे जेथे ।।'' [१८] म्हणजे सांगण्याचा भावार्थ असा की, कडसणीमुळे अनुभवापासून वंचित राहू नका. तर्कातीत, दिव्य स्वरूपाचा अनुभव तर्काच्या, बुद्धीच्या आधारे तावून सुलाखून घ्यावयाचा प्रयत्न केला तर हाती काहीच लागत नाही आणि त्या प्रयत्नात तो दिव्य अनुभवालाही मुकतो. असे होऊ नये म्हणून मुक्ताबाई असे येथे सांगत आहेत.

**सममेळ बोलणे चौघांचे –** मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ भेटीच्या वेळी नेमके काय घडले असावे, याचे नेमके असे वर्णन 'सममेळ बोलणे चौघांचे' या अभंगांमध्ये आले आहे. गोरक्षभेटीमुळे मुक्ताबाईला अमृतसंजीवनी उतू आल्याचा अनुभव आला म्हणजे नेमके काय झाले ? त्यावेळी इतर भावंडांना कोणते अनुभव आले या साऱ्याचे तपशीलवार वर्णन येथे आले आहे. (हे एकंदर ९७ अभंग कै.ल.रा.पांगारकर यांना सासवड येथील सोपानदेवांच्या मठात

मिळाले. ते त्यांनी 'मुमुक्षू' १९२७ मे-जून या अंकात प्रसिद्ध केले आहेत.) आणि आश्चर्य म्हणजे हे सारे अनुभव एकमेकांशी मिळतेजुळते तर आहेतच पण त्याची आंतरिक संगती नामदेवगाथ्यातील वर्णनांशीही लागते. तेव्हा हे अभंग गोरक्षनाथ भेटीच्यावेळी आलेले अनुभव वर्णन करणारे आहेत हे निश्चित.

**नामदेवाची परीक्षा –** त्याप्रसंगी निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून सारी भावंडे ध्यानस्थ बसली. भ्रमरगुंफेच्या ठिकाणी जाऊन ही भावंडे तिथे स्थिरावली. त्या अवस्थेत त्या साऱ्यांना विलक्षण असे अनुभव आले.

'रक्तश्वेत पीत नीळ वर्णाकार । नक्षत्राची वर पूजा केली ।
प्रकाशमय तत्त्व ज्योतिमय पाहणे । दीप त्रिभुवनी एक झाला ।।' [१९]

अशा प्रकारे आपले अनुभव परस्परांनी एकमेकांना सांगितले. भक्त नामदेवांना या योगानुभवांची काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे नामदेवांची यावेळी अवस्था अशी होती की,

'कैकाड्यावाणी करिती गुडगुड । मजला हे गूढ उमजेना ।
नामा म्हणे गाती प्रकाशाचे गाणे । आम्हा अघोरवाणे दिसतसे ।।' [२०]

नामदेवासारखा महान भक्त भ्रमरगुंफेमध्ये, तेथपर्यंत येऊ शकत नाही हे पाहून निवृत्तिनाथांनाही खंत वाटत होती. सोपानाने गोरक्षांना विनवणी केली,

''नामदेव पाहुणा आला असे ।
मुक्तिकेचे पारखी तुम्ही आहा देवा ।
भाजुनी जीवा शिवा ब्रह्म करा ।।'' [२१]

मुक्ताबाईही विनवणी करत म्हणाली, ''म्हणे मुक्ताबाई हेरोनिया हेरा । हिरा किंवा गारा नेणो बापा ।।'' [२२]

तेव्हा अनुभवाचे थापटणे हाती असलेल्या गोरक्षनाथांनी सर्वांची परीक्षा घ्यावयास सुरुवात केली.

**गोरक्षकृपेचा निवृत्तिनाथांचा अनुभव –** प्रथम निवृत्तिनाथांच्या माथ्यावर थापटणे हाणले. गोरक्षनाथांचा कृपावरद हस्त जेव्हा निवृत्तिनाथांच्या मस्तकी होता त्यावेळी त्यांना आलेल्या अनुभवाचे वर्णन आपण शब्दात कसे व्यक्त करू शकणार ? निवृत्तिनाथांच्या शब्दांमध्येच तो अनुभव लक्षात घेणे उचित ठरेल.

''सव्यभागी दिसो लागे । प्रकाश पुरुष पुढे मागे । कैसा वोसंडला बोधे । माझियावरी ।। ...... तेथे अनुभवाचे वाटे निडि भरले सुनीळ निघोटे । भरोनि उसळे कोंदाटे । एकसरे ।। तेथे स्वरुपाचे निर्मळ । निर्गुण निर्विकाराचा खेळ । तत्त्व पाहिले राऊळ । अगम्याचे ।। ते बैसले माझा डोळा । तेणे मज सारेचि बांधिले गळा । त्या सुखाचा सोहळा । बोलता नये ।।'' [२३]

'डेरा झाला निका परब्रह्म' अशा निवृत्तिनाथांचा हा अनुभव होता.

मुक्ताई-गोरक्षभेटीच्या वेळी निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान यांना हा जो अनुभव आला होता तो सहज अनुभव होता. मुक्ताबाईच्या संगतीचा परिणाम म्हणून आलेला होता. त्यांची स्वत:ची तशी कोणतीही मागणी नव्हती. निदिध्यास नव्हता; तरी केवळ गोरक्षनाथांच्या शक्तिस्पर्शाने तो अनुभव त्यांना प्राप्त झाला होता. आणि म्हणूनच निवृत्तिनाथ म्हणतात, '' तैसे आम्हा न कळे नमन । देहा कधी न दिल्हे श्रम । आश्रमा जान्हवी आली धांवोन । ऐसे जाले ।।'' [२४] निवृत्तिनाथांना आलेला अनुभव हा अकल्पितपणे, सहजी आलेला आहे असे दिसते.

**गोरक्षकृपेचा ज्ञानेश्वरांचा अनुभव –** याप्रसंगी गोरक्षकृपेच्या अनुभवाची महती वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी म्हटले, ''कैसी मनाची भ्रांती गेली । रोमांची ब्रह्मभावना जाली । हेचि शक्ती उजळली । ज्ञानाची ।। की अकल्पित लाभ जाला । प्रयत्नेविण ज्ञानयज्ञ केला । फळ येकांत फावला । सद्‌गुरुचा ।। कैसी दृष्टी जाली विचित्र । जगत्‌च दिसे सत्पात्र । ऐसा उजाडला विचार । अतिवैभवा ।। ब्रह्मांडभूषणाचे आले राज्य । विसरून गेला दरिद्रलाज । द्रष्ट द्रष्ट म्हणती माझे । आम जाण ।। कैसी भ्रांती निभ्रांत जाली । रंका इंद्रपदवी आली । तैसी आपुली कृपा जाली ।।'' [२५] मुक्ताबाईने या दिव्य शक्तीच्या अवतरणासाठी जसा निदिध्यास धरला होता, तसा तो निवृत्तिनाथ किंवा ज्ञानेश्वरांनी धरला नव्हता हे जे विधान आपण केले त्याला याही अभंगामध्ये आधार सापडतो. मुक्ताबाईनी केलेल्या श्रमांमुळे इतरांनाही प्रयत्नेविण अकल्पित लाभ झाला असे उद्‌गार येथेही आले आहेत.

मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथांच्या मार्गदर्शनावरून ज्ञानेश्वरांनी तो अनुभव घेतला. ज्ञानेश्वर म्हणतात, ''तुम्ही जेविला अमृतभोजने । आम्ही ही

पंक्तिचे पाहुणे । गुह्य गुढ बोलणें । मौन्य जाले ।। करूनि उद्‌धटपणाचा बोभाट। तुमची बोलणी आम्हां अचाट । मी त्याचा आदिअंत कळू पाहे ।।......अहो जी सद्‌गुरु शिकविले । निवृत्तीसी फळ आले । ज्ञानेश्वरा भूषण फुले । उपकार तुझा ।।'' [२६]

ज्ञानेश्वर मुक्ताबाईची आरती करताना म्हणत आहेत, ''अहो मुक्ताबाई तूं ब्रह्मीचे अंजन । तुझेनि प्रसादे सद्‌गुरू निधान ।। तुज आणि निवृत्ति नाहीं भिन्नता । तेचि तू आरती सारजामाता ।।'' [२७]

**गुह्य अनुभव –** ज्ञानेश्वर आपल्याला आलेल्या अनुभवाची गुह्यता सांगताना म्हणत आहेत, ''तेथे पुसतां नये वृत्तांतु । खालती सांगता नये मातु ।। जे जाले शब्दातीतू । गुह्य भाषा ।। '' [२८] ज्ञानेश्वर म्हणत आहेत, ''जे गुह्याचे मौन्यमाळा । ते मज केले करतळामळा ।।'' [२९]

**प्रकट गुह्य बोले –** ज्ञानेश्वरांना आलेल्या ह्या अनुभवानंतर त्यांनी त्यासंबंधी इतरांना मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वरांनी गुह्यार्थ प्रकट केला आहे. ''यज्ञ चाले ऐसे चिन्ह । अज्ञान होती विचक्षण । तै मूढां होय ज्ञान । विरक्तीचे ।। गेलियावीण तीर्थ सांपडे। उपमेरहित परिस जोडे। किंवा समागम घडे। सद्‌गुरुचा ।। अभक्त भक्त होती । श्रोतिया वक्त्या सायोज्यगति । राजविद्येची प्राप्ति । होय जया ।। वैराग्याविण मुक्ति जोडे । निदान वृत्ति हातां चढे । सोपा गुह्य जाला गूढ । ज्ञानदेवाचा ।।'' [३०] आपल्याला प्राप्त झालेली ही राजविद्या प्रकट केली तर सर्वांनाच त्याचा लाभ कसा होईल याचा विचार कदाचित ज्ञानदेवांच्या मनात असावा आणि म्हणून त्यांनी पुढीलांसाठी हे ज्ञान प्रकट केले असावे असे दिसते.

ज्ञानेश्वर चांगदेवांना म्हणत आहेत, ''मुक्ताई मुक्तकृपा हे परब्रह्मीची माया । जे अव्यक्तरूप ते तू पाहे चांगया ।। हा जडदेह मिरविसी काया । परतुनि पाहतां तुझा तूचि विलया ।। '' [३१] (हा अनुभवप्रवास कसा आहे, कोणत्या टप्प्यांनी साधक पुढे जातो याचे नेमके स्पष्टीकरण, मार्गदर्शन कालांतराने 'ज्ञानेश्वर तेहतिशी'मध्ये आलेले दिसते. हे मार्गदर्शन योगिराजाला म्हणजे चांगदेवांना केलेले आहे असे दिसते.) याबाबतीत, ज्ञानेश्वरांनी सोपानदेवांना व विसोबा खेचरांनाही मार्गदर्शन केले असावे असे दिसते. कारण सोपानदेवांनी या

गोरक्षकृपेच्या वेळी केलेल्या अभंगात, वारंवार ज्ञानदेवांचा उल्लेख केला आहे. हे गोरक्षकृपेच्या 'अनुभवाचे अमृत' आणि त्यांना आलेला हा 'अमृताचा अनुभव' ज्ञानेश्वरांनी साधकांसाठीही प्रकट केला असावा असे दिसते. आणि म्हणूनच ज्ञानदेवांचे वर्णन 'प्रकट गुह्य बोले' असे केले जात असावे असे वाटते.

ह्या साऱ्या प्रसंगातील या चार भावंडांचे स्थान ज्ञानेश्वरांनी एका सुंदर उपमेने स्पष्ट केले आहे. ''मुक्त प्रवाहाची नाव । निवृत्ति अवल्या सद्गुरुराव । सोपान वरी ज्ञानदेव । पार जाले ।।'' [३२] मुक्ताबाई प्रवाहात प्रवास करण्यासाठी असलेली नाव आहे, सद्गुरु निवृत्तिनाथ हे वल्ही आहेत आणि या दोघांच्या मदतीने सोपान आणि ज्ञानेश्वर पैलतीरी जाऊन पोहोचले असे ते म्हणतात.

**गोरक्षकृपेचा सोपानदेवांचा अनुभव –** ज्ञानेश्वरांनी केलेल्या मार्गदर्शनाच्या आधारे सोपानदेवही आता तो दिव्यकृपेचा अनुभव घेत आहेत. ''सद्गुरु ज्ञानेश्वराची कृपाफळे । दया होतील कुमुद कमळे । ते सोपानानें सत्य भाळे । वंदियेली ।।'' [३३] असे उद्गारही यासंदर्भात सोपानदेवांच्या अभंगांमध्ये येतात. सद्गुरुच्या आधारावर अनुभव आला तो असा, ''ऐसा डोळियांत डोळा फुटे । तेणें प्रकाशलें औटपीठे । ब्रह्मांड आणि घटमठें । सारखीचि जाली ।। १ ।। तेथे देहभाव विसरे । अवघा प्रकाश पसरे । अंगुष्ठ मात्र प्रमाण । ढळढळू लागे ।। २ ।। ...... ज्ञानेश्वराची परमभुली । सोपानाची गुरुमाऊली । विश्वभाग्याउदय जाली । समाधि बापा ।। ३ ।।'' [३४] अशा शब्दात सोपानदेवांनी आपला अनुभव व्यक्त केला. आणि मग तशी पावतीही त्यांना गोरक्षनाथांकडून मिळाली. सोपानदेवांना प्राप्त झालेली पावती अशी होती, ''तेचि थापटणे सोपानाचे डोई । यात लेश नाही कोरे कोठे ।।'' [३५]

**गोरक्षकृपेचा मुक्ताबाईचा अनुभव –** सद्गुरुने माथा थापटला असताना म्हणजे गोरक्षनाथांचा वरदहस्त मुक्ताबाईच्या माथ्यावर असताना त्यांना कोणता अनुभव आला ? 'निश्चळ निश्चळ । जाले सर्व काळ । अमृत उदय वेळ पातली असे ।। तेथे घट मठ आकाश । राहिले डोलता । अगम्याचे माथा । रिघाले तेव्हा ।।' [३६] अशी अमृतउदय वेळ तिच्या अनुभवास आली.

**योगानुभवातील मन आणि बुद्धीचे स्थान –** मुक्ताबाई येथे गोरक्षनाथांना विनवणी करत आहे, ''कल्पनेचा वारा । न लागू द्यावा आम्हां ।

स्वामीस प्रार्थना । केली असें ।।'' [३७] आलेल्या दिव्य अनुभवामध्ये मनाने कल्पनेची भेसळ करू नये म्हणून ही विनवणी आहे. दिव्य अनुभव हा मनबुद्धीच्या अतीत असलेल्या अतिचेतन प्रांतातून आलेला असतो. पण तो मनबुद्धीच्या प्रांतात शिरत असताना त्याच्यामध्ये मन आणि बुद्धीचे हीण मिसळते. तसे होऊ नये म्हणून ही विनवणी मुक्ताबाई करत आहे.

योगमार्गाचा ज्याचा काही अभ्यास आहे त्याला हे माहिती असते की, आपले अज्ञानी मन,बुद्धी, प्राण व शरीर ह्यांचे स्थान निम्न गोलार्धात असते आणि सत्, चित्, आनंद, विज्ञान ह्या साऱ्या गोष्टी वरील अतिचेतनाच्या प्रांतात येतात. या दोन्हीमध्ये एका पातळ पडदा असतो. त्या पडद्याने हे दोन प्रांत अलग झालेले असतात. योगसाधना जसजशी तीव्र होत जाते तसतसे या पडद्याला हळूहळू छिद्र पडू लागते. आणि त्यातून वरील दिव्य प्रकाश अनुभवाला यायला लागतो. अधिक तीव्र, उत्कट अशी साधना झाली तर जणू दारच उघडले जावे असा अनुभव येतो.

मुक्ताबाईचा या बाबतीतला अनुभव ती कसा व्यक्त करते पाहा. मुक्ताबाई निवृत्तिनाथांना सांगत आहे, ''मग रोमांच शृंखळा । तटस्थ पाती लागला डोळा ।। आकार छिद्र पडले बुबुळा । सिद्ध वेळा अनुभवा ।।'' [३८] आपला स्वत:चा अनुभव वर्णन करताना मुक्ताबाई म्हणते,''बाप भाग्याचा योगिंद्र । नभ गोसावी स्वये सार । सुनीळ गुह्याचे विवर । उघडिले असे ।।'' [३९] यातील 'सुनीळ गुह्याचे विवर उघडणे' हा अनुभव महत्त्वाचा आहे.

गुह्याचे विवर उघडल्यानंतर आलेल्या अनुभवाचे वर्णन करताना ती म्हणते, ''प्रकाश गुह्य तेथिला । मूर्तिमंत ।।'' [४०] मुक्ताबाईच्या या अभंगांमध्ये कुंकुमाकार कुंडलिनी, आदित्याची नानाचक्रे, विद्युल्लता, यासारखी अनेक वर्णने येतात की जी, तिला जे दर्शन होते आहे त्याचे वर्णन करणारी आहेत.

योगशास्त्रानुसार असे आहे की, आधी फक्त वरील अतिचेतन प्रांतातील दृश्याचे दर्शन घडते. मग साधना जशी प्रगत होते तसतसा साधक स्वत: हळूहळू त्या प्रांतात वर चढून जातो. त्याने आधी नुसते जे पाहिले होते त्याचा आता तो प्रत्यक्ष अनुभव घेतो. त्यादृष्टीने मुक्ताबाईचा हा पुढील अभंग पाहण्यासारखा आहे. ''तेथे आउतापरी । अनन्य कृपा केली वरी । मग पाहिली

वेधलो पायरी । अगम्याची ।। १ ।। आतां जी तुम्ही अंजन । पैल दाविले निधान । ते गुह्य की ब्रह्म । म्हणूं आता ।। २ ।। ते निवांता निवांत राहिले । मना पाहिले होते ते पाहिले । वरीवर्णन वहिले । काय करूं ।। ३ ।। दुजया पायरीच्या पायावर । पाय ठेविला भक्तिज्ञान धीर । पुढे स्थूल गिरीवर । उल्लंघू जाता ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । अग्र भागाचा दिवटा । नाचूं पहुडला सुखवाटा । आपुले पुढें ।। ५ ।।'' [४१] 'प्रकाशाचे राहणे प्रकाशचि पाहणे । सिद्ध साधक ब्रह्म स्वये जाले ।।' यासारख्या अभंगातून, मुक्ताबाई वरील असीम प्रकाशाचा अनुभव घेत असल्याचे आपल्या लक्षात येते. [४२] ''म्हणे मुक्ताबाई । तेथे न ये बोलता । रिगालिया माथा । अगम्याच्या ।।'' [४३] या शब्दातही हाच अनुभव व्यक्त होतो.

अशा प्रकारच्या अनुभवाने मुक्तीचा लाभ होऊ शकतो. चित्तशुद्धी होते. परंतु मुक्ताबाई या अल्प अनुभवाने समाधानी होत नाही. तिच्या दृष्टीसमोर अतिचेतन प्रांतातील क्षितीजे उलगडत चालली आहेत. ती पुढे पुढे मार्गक्रमण करतच राहते. आलेल्या अनुभवाने (तो कितीही उच्च पातळीवरील असला तरी) संतुष्ट होऊन तेथेच विसावणे तिला मंजूरच नाही असे दिसते आणि यातूनच ती उच्च, उच्चतर, उच्चतम प्रांतांकडे झेप घेत राहते असे दिसते.

आपण आतापर्यंत मन, बुद्धी, शरीर, प्राण या कमजोर साधनांचा विकास करण्याचा जो प्रयत्न करत होतो तो प्रयत्न अजूनही कमी पडतो आहे हे मुक्ताबाईला या प्रसंगाच्या निमित्ताने जाणवले आहे. यासंदर्भात असा एक अभंगही आलेला आहे. ती म्हणत आहे, ''तेथे शरीराचे पिसे । नेणो निवारिले कैसे । एकसरा मानसें । धावूं आले ।।'' [४४] तेव्हा तिला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, हा व यापुढचे अधिक उच्च असे अनुभव पेलायचे असतील तर मन, बुद्धी, प्राण व शरीर हे आत्ता जाणीवेच्या ज्या स्तरावर आहेत, त्या स्तरावरून ते पेलता येणार नाहीत. मडके अजून भाजले गेले पाहिजे, सरिसे झाले पाहिजे हे तिला या उच्च पातळीवर स्वत:च्या बाबतीत जाणवले असावे.

आणि आता त्या दृष्टीने पुढील काळात ती त्या दिशेने म्हणजे मन, प्राण, शरीराचे रूपांतरण करण्यासाठी प्रयत्न करणार हे आपल्या लक्षात येऊ लागते. परंतु मन, प्राण, शरीर यांचे रूपांतरण व्हावे असे जर वाटत असेल तर

अशा प्रकारचे अनुभव वारंवार यावे लागतात. अतिचेतनाच्या प्रांतात वर चढून जाणे आणि तेथून दिव्य ज्ञानाचा प्रकाश खालच्या प्रांतावर पडणे ही प्रक्रिया वारंवार घडावी लागते. असे झाले तरच हळूहळू खालील अचेतन अशा मन, प्राण, शरीर यांच्या जाणीवांचे रूपांतरण होत जाते.

**रुपांतरण –** मुक्ताबाई येथे सांगत आहे, ''तेथे कडसणीचे नव्हें काम । शरीर केले पाहिजे राम । स्वये सद्‌गुरु पुरुषोत्तम थापटू लागे ।।'' [४५] यातील 'शरीर केले पाहिजे राम' हे विधान महत्त्वाचे आहे. अध्यात्मशास्त्र असे सांगते की; मन, बुद्धी, प्राण आणि शरीर ही मूळात आत्म्याची साधने आहेत पण त्याचे भान ती विसरतात आणि जेव्हा स्वत:च्या तंत्राने ती चालू लागतात, तेव्हा अज्ञानीपणे वागतात. परंतु जेव्हा त्यांना स्वत:च्या मूळ रूपाचे स्मरण होते आणि ती या स्वरूपाच्या मार्गदर्शनाने वागू लागतात तेव्हा तीच साधने पूर्णत्वाला जातात. आणि हाच सारा अर्थ 'शरीर केले पाहिजे राम' यामागे आहे. हे रुपांतरण घडून येण्याची आवश्यकता येथे मुक्ताबाईने प्रतिपादित केली आहे.

**रुपांतरणाचे स्वरूप –** गोरक्षकृपेचा मुक्ताबाईवर परिणाम झाला तो असा की, ''तेथे देहशक्ति हरपली । नवी ज्ञानशक्ती आली । वरी विस्तारली धृति माया । म्हणे मुक्ताबाई करार केला चित्ता । थापटिला माथा सद्‌गुरुने ।।'' [४६] रुपांतराच्या प्रक्रियेचा स्पष्ट संकेतच मुक्ताबाईच्या वरील उद्‌गारात आला आहे. अध्यात्मशास्त्र असे सांगते की, या रूपांतरणाच्या प्रक्रियेसाठी आदिमायेचे साहाय्यही आवश्यक असते. ते साहाय्यही मुक्ताबाईला मिळालेले आहे. ''तेथे अनंत विद्युल्लता नयनीं। शुद्धता रूपे गोसाविणी । ब्रह्मांड भवानी देखणी । प्रगटली ।।'' [४७] मुक्ताबाईच्या या उद्‌गाराकडे नकळत आपले लक्ष वेधले जाते. मुक्ताबाईने उच्च स्तरावर चढून जाणे आणि तेथून अवतरित होणारी दिव्य कृपा अनुभवास येणे ही प्रक्रिया मुक्ताबाईच्या बाबतीत वारंवार घडत असावी असे दिसते. ती म्हणते, ''तेथे नर ना ईश्वर । ब्रह्म जाले नश्वर । सडसडती तुषार । अनुभवाचे ।।'' [४८]

या साऱ्या प्रक्रियेतून, साधनेतून जीवाच्या ठिकाणी एक नवीनच जाणीव उदित होऊ लागते. बुद्धिच्याही वरील पातळीवरील स्फूर्तिमय जाणीव उदित होऊ लागते. विज्ञानमय विश्वाचा प्रांत पुढे सुरु होतो. मुक्ताबाईच्या

वाङ्मयात  वारंवार येणारा 'विज्ञान' हा शब्द आता आपले लक्ष वेधून घेतो. (येथे विज्ञान म्हणजे शास्त्र हा आजचा अर्थ अभिप्रेत नाही तर अन्नमय, प्राणमय, मनोमय, आनंदमय आणि विज्ञानमय कोश ह्यातील विज्ञानाशी संबंधित हा शब्द येतो.)

आनंदमय, विज्ञानमय कोशाशी संबंध आला, त्यामध्ये साधक प्रवेश करू शकला तर त्याचा परिणाम म्हणून शरीर, मन, बुद्धीही हळूहळू रुपांतरीत होऊ लागतात. त्यातूनच मग पुढे अमरत्व हा केवळ विश्वासाचा, श्रद्धेचा किंवा कल्पनेचा विषय राहत नाही. तर नित्याची अनुभूती अमर आत्म्याचीच अनुभूती असल्यामुळे अशा आत्मरूप झालेल्या जीवाला अमरत्वाचा लाभ होतो.

अमरतेचा हा अनुभव  मुक्ताबाईला आला होता, असे दिसते. अमृत-संजीवनी उतू आल्याचा हा अनुभव म्हणजे नाथांचा वरदहस्त तिच्या मस्तकी असल्याची निदर्शक अशी ती खूण होती.

'नाथाचा हात ईचा शिरी । यालागी ते सत्यसनातन अवधारी ।
महाकल्पाचा अवश्वरी । हे सोडील देह ।
तववरी तिचे शरीर । अभंग चिरकाळ निरंतर ।
महद्माया योगिणी साचार ।।' [४९]

ही गोष्ट याचप्रसंगी निर्धारित झाली होती.

गोरक्षकृपेचा अनुभव वास्तविक या चारही भावंडांना आला होता पण येथे इतर तीन भावंडे आणि मुक्ताबाई यांच्या स्तरात फरक पडला आहे असे दिसते. याचे एक कारण आपण यापूर्वीच पाहिले आहे ते म्हणजे दिव्यत्वाचा हा अनुभव घ्यावा ही आस मुक्ताबाईला लागली होती. तिने त्यासाठी धडपड केली होती. तर इतरांच्या दृष्टीने तो अकल्पित व श्रमाविण आलेला अनुभव होता.

तीन भावंडे आणि मुक्ताबाई यांच्यात फरक पडण्यास आणखी एक कारण असे की मुक्ताबाई आलेल्या कोणत्याच अनुभवाने समाधानी होऊन विसावत नाही. ती पुढे पुढे वाटचाल करतच राहते.

आणि येथेच मुक्ताबाईची समाधी इतरांपेक्षा वेगळी का याचा उलगडा होतो.

गोरक्षकृपेच्या या अनुभवानंतर मुक्ताबाई आता अधिकाधिक काळ

आत्ममग्न अशा अवस्थेत राहू लागली. आलेल्या अनुभवाच्या स्थिरीकरणासाठी व दृष्टीस दिसणारी नवनवीन क्षितीजे कवळण्यासाठी मुक्ताबाईस आता संपूर्ण एकांतसाधना आवश्यक वाटत असावी. दिव्य शक्तीच्या अवतरणाचा आलेला अनुभव पचवण्यासाठी, जीवाच्या ठिकाणी स्थिर करण्यासाठी एकांतवास आणि मौन या गोष्टी उपयुक्त ठरतात असे अध्यात्मशास्त्र सांगते. त्यानुसार, मुक्ताबाई आध्यात्मिक उच्च प्रगतीसाठी अज्ञातवासात राहिली असावी, असे वाटते.

'आपण होऊनि अगोचर । लावूनि नेत्रद्वार ।
मन करावे स्थिर । हृदयामाजि ।।
दृष्टि काही न पहावे । मन अढळ राखावे ।
उत्तर कवणा न द्यावे । मुद्रा मौन्य ।।' [५०]

अशी मौन्य मुद्रा धारण करून मुक्ताबाईचे दिवसच्या दिवस जाऊ लागले.

**अवतरणप्रक्रियेतील समर्पणाची आवश्यकता –** गोरक्षकृपेचा अनुभव स्वतःच्या साधनेने जणू मुक्ताबाईने खेचून आणला होता. आणि म्हणून या साधनेचे इंगित ती इतरांना सांगत आहे असे दिसते. अवतरणाच्या या अशा प्रकारच्या अनुभवामध्ये समर्पणाचे, शरणागतीचे मोलाचे स्थान आहे. शरणागतीने हा अनुभव सोपा होऊ शकतो आणि म्हणून ती तसे करावयास सांगत आहे. अशी 'सिद्ध वेळा' अनुभवावी यासाठी मुक्ताबाई इतरांना कळवळून सांगत होती, अव्यक्ताला शरण जा. गोरक्षनाथांची उपस्थिती जाणवल्यानंतर मुक्ताबाईने सर्वांना सुचविले की, ''घालू द्या लोटांगण । जाऊ द्या शरण अव्यक्तासी ।।'' [५१]

**गोरक्षकृपेचा नामदेवांचा अनुभव –** ध्यानमग्न झालेल्या या सर्वांना उच्च स्वरूपाचे योगानुभव आल्याचे वरील सर्व वर्णनावरून लक्षात येईल. परंतु या सर्व प्रकाराला अनभिज्ञ असणारे नामदेव मात्र या वर्णनामुळे, त्यांच्या बोलण्याने स्तंभित झाले. ''परस्परे गुह्य करिती भाषण । म्हणती महाधन गावा आला ।।'' [५२] या शब्दात नामदेवांची प्रतिक्रिया व्यक्त झाली आहे. 'महाधन गावा आला' हे गोरक्षनाथांसंबंधी केलेले विधान आहे. (निवृत्तिनाथांच्या अभंगामध्ये याला धरूनच एक उल्लेख येतो तो असा – 'अहो जी सद्गुरु महामती । तुम्ही अनाम अनुभवाच्या विभूती । कैसी दाविली सार युक्ति । माझिये

अंगी ।। तो मुक्त मंदिरीचा शोभाकरु । निवृत्ति स्वहिताचा विचारु । उघडिले महाधनु । अनादि याचे ।।' [५३] नामदेवगाथा आणि ज्ञानेश्वरमंडळाचे अप्रसिद्ध अभंग यात ही अशी आंतरिक सुसंगती आहे.)

गोरक्षकृपेचा अनुभव नामदेवांनाही मिळावा म्हणून मग मुक्ताबाईने गोरक्षनाथांना त्यांची परीक्षा करण्याची विनवणी केली. ''म्हणे मुक्ताबाई हेरोनिया हिरा । हिरा किंवा गारा नेणो बापा ।।'' [५४] नामदेवांच्या जीवाची अवस्था हिऱ्यासारखी आहे की गारगोटीसारखी आहे हे आम्हाला माहीत नाही. म्हणून त्यांनी त्याची पारख करावी अशी विनवणी येथे केली आहे.

नामदेवाला मात्र हा उच्च अनुभव ग्रहण करता आला नाही. कारण तोवर नामदेवांना सद्गुरुप्राप्ती झालेली नव्हती. ''तेचि थापटणे नामदेवावर । डोई चोळू मोहरे रडों लागे ।।'' [५५] अशा शब्दात नामदेवांनी स्वत:च्या अनुभवाचे वर्णन केले आहे. वैराग्य कसोटीवर नामदेव खरे उतरू शकले नाहीत. संतसंग झाला तर ही मंडळी आपल्याला भाजून काढतील अशी नामदेवांची भावना झाली. असे नामदेवांच्या बाबतीत का घडले असावे ? अशा प्रकारच्या अनुभवाचे अध्यात्मशास्त्रात काही स्पष्टीकरण मिळते. ते असे की, जीवाच्या एखाद्या अंगाची पुरेशी तयारी झाली नसेल आणि त्याआधीच जर दिव्य शक्ती त्या जीवामध्ये खाली उतरली तर त्या अपक्व अंगाकडून त्या शक्तीस विरोध होतो आणि त्यातून निर्माण होणारे संवेदन हे भाजल्यासारखे असते. नामदेवांच्या बाबतीतही असेच काहीसे झाले असावे.

'वैराग्य कसोटी सोसवेना घाव । पळावया पाव मागे काढी ।। झाले चाळाचूळ मनांत चंचळ । युगा ऐसे पळ वाटतसे ।।' [५६] हा नामदेवांचा अनुभव होता. नामदेवामधील एखादे अंग अजून पुरेसे विकसित झालेले नाही, त्याच्या ठिकाणी असणाऱ्या अहंतेमुळे त्याच्या विकासात अडथळा निर्माण होत आहे हे मुक्ताबाईला जे आधी जाणवले होते त्याची आता या परीक्षेने इतरांनाही खात्री पटली. नामदेवाच्या ठिकाणची उणीव दूर करण्यास आपण त्यांना साहाय्य करू असे मुक्ताबाई म्हणत आहे. नामदेवाचे कच्चे मडके भाजून पक्के करू असे ती इतरांना सुचवत आहे. मुक्ताबाई म्हणते, ''अंतर बाहेर भाजूं आम्ही कुंभ । भरू निरालंब सगळेची ।। १ ।। अहं सोहं दोन्ही ऊर्ध्व लावूं फुंकणी । नवद्वारें फुंकोनी

जाळ करूं ।। २ ।। जीवित्व काढूनि शिव घडूं अंगा । प्रिय पांडुरंगा आवडेल ।। ३ ।। म्हणे मुक्ताबाई पळायाचा पाही । आसन स्थिर नाही नामयाचें ।। ४ ।।'' [५७]

या प्रसंगामुळे नामदेवांना आपली चूक कळली. सद्गुरुची आवश्यकता त्यांना आता विशेषत्वाने प्रतीत झाली. ''साधुसंताघरी श्वान मी होईन । मग त्यांच्या पायी नित्य लोळेन । हरिभक्ति सोय ते मी लाधेन । तयाचे पोसणे कै मी होईन ।। ..... यांची कृपापूर्ण तरी सार्थक जन्म । नाहीं तरी निरर्थक होईल जाण । विष्णुदास नामा म्हणे मी तर अज्ञान । केशव चरणी मी केलें निर्वाण ।।'' [५८] असे ते आता म्हणत आहेत.

निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान यांना प्रतिनमस्कार करण्यास नाकारणाऱ्या नामदेवांचे त्यांच्याविषयी हे वरील उद्गार आहेत. आपल्या अज्ञानदशेची स्पष्ट जाणीव नामदेवांना झाली असल्याचे येथे लक्षात येते. मुक्ताबाईने ज्यासाठी 'कळी माजविली' होती तो कार्यभाग येथे सिद्ध झाला होता. पुढे कालौघात नामदेव विसोबा खेचरांना शरण गेले.

येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेणे जरुरीचे आहे. या सर्व प्रसंगी गोरक्षनाथांनी थापटणे मारले आहे ते चार भावंडांना व नामदेवांना. विसोबा खेचर व चांगदेव यांना थापटल्याचा उल्लेख नामदेवगाथेत येत नाही. पण ते दोघे या दिव्यशक्ती अवतरण प्रसंगी तेथे उपस्थित होते. सिद्ध वेळा त्यांनीही अनुभवली होती. प्रत्यक्ष थापटण्याचा अनुभव त्यांना स्वत:ला आलेला नव्हता. आणि म्हणून त्यांना त्या दिव्यशक्तीचा जो लाभ झाला होता तो प्रत्यक्ष नव्हता तर अनुषंगानेच झाला होता. दिव्यशक्तीच्या प्रभावक्षेत्रात ते उपस्थित होते म्हणून झालेला होता.

**विसोबा खेचरांचा अनुभव–** या प्रसंगी उपस्थित असलेले विसोबा खेचर मुक्ताबाईचे याबाबतीत मार्गदर्शन घेत आहेत. विसोबा खेचरांच्या प्रश्नावर मुक्ताबाईने त्यांना काही मार्गदर्शन केले. मुक्ताबाईच्या या बोलण्याचा प्रत्यय विसोबांनाही आला. तेही म्हणाले, ''शब्द ना विशब्द कवणाचे कवण । आत्मज्ञान बोध जाले निर्माण । मुक्ताबाई वटेश्वर तेथे कैचे चांगपण ।।'' [५९]

**चांगदेवांचा अनुभव –** चांगदेवांचा अनुभव आरतीच्या माध्यमातून

अभिव्यक्त होतो. ते म्हणत आहेत, ‘‘जय आरति प्रेमाच्या धारा । वर्षत अमृतराज गेला सागरा ।। ...... तेथे मुक्ताई तारु चांगा पोहणारु । गेला पैलथडी केला उतारू ।।’’ [६०]

**चालिले प्रेमभाव वैराग्याचे –** या सर्व अनुभवाच्या पूर्तीनंतर आता गोरक्षनाथ पुन्हा परतून चालले आहेत त्याचेही स्पष्ट वर्णन मुक्ताबाईने केलेल्या आरतीमध्ये येते. ती आरती मुळातूनच पाहणे इष्ट होईल.

‘‘भोईचे मार्दव । सांगे कोंभाची लवलव । चालिले प्रेमभाव वैराग्याचे । धन्य हे राउळी धन्य हे राउळी । प्रेम ते कमळी विसंचेना ।। १ ।। जय जय आरति । प्रेमभाव । अलक्षा ठाव । उरेचिना ।। धृ ।। दृश्याच्या दृष्टि ज्योतिप्रकाशा अव्यक्ताचा ठसा परब्रह्मी । मज मारुनि जीवविले सद्गुरुराया म्हणोनि लवलाह्मा पाय धरा ।। २ ।। तप्ति वाळुवंट रत्नाचा विखुरा । येथे याचक चकोरा तृप्ति जाली ।। राजहंस चारा निवडती क्षीरनीर । आपण वटेश्वर पुरवितसे ।। ३ ।। हिरियाच्या खाणी दिव्य तेज झळकत । मकरंद उधळत पुष्पयाति ।। ध्यानाचे ध्यान विसरले भ्रमर । आपण नारायण कळिका जाला ।। ४ ।। उपसतां विहिरां अमृताचा झरा । त्याने ते शंकरा पूजा करिती । मुक्ता मुक्त तुमचे लडिवाळ बाळक । मानिती कौतुक साधुसज्जन ।। ५ ।।’’ [६१]

ही घटना प्रत्यक्ष कोठे घडली याचा उल्लेखही वरील आरतीत मुक्ताबाईने केलेला दिसतो. याप्रसंगी उपस्थित असलेल्या चांगदेव, सोपान, नामदेव यांनी त्या प्रसंगी ज्या आरत्या केलेल्या आहेत, त्या सर्वच आरत्यांमध्ये या ना त्या रूपात तापीतीराचा उल्लेख आलेला आहे. तेव्हा (मुक्ताबाई–गोरक्षनाथ भेटीची) ही घटना तापीतीरावरच घडली असावी असे येथे दिसते. आणि त्यामुळेच अंतिम क्षणी मुक्ताबाईने स्वरूपाकार होण्यासाठी तापीतीराचीच निवड का केली असावी याचाही स्पष्ट उलगडा होतो.

**माय मुक्ताबाई –** गोरक्षकृपेचा अनुभव जिच्यामुळे आपल्याला आला तिचे, सारी भावंडे एकप्रकारे कौतुक करू लागली. मुक्ताबाईचे आदिमायेचे असलेले स्वरूप याप्रसंगी उघड झाले. धाकटी बहिण, सत्शिष्य, गुरुभगिनी ही सारी नाती एका क्षणात आता मागे पडली आणि मुक्ताबाई मुक्तामाता, माय या रूपात सर्वांना प्रतीत होऊ लागली. निवृत्तिनाथ

मुक्ताबाईस म्हणू लागले, ‘‘तेथ माय मी प्रांजळ । उपकार मानी बहु सबळ । बरवे दाविले स्थळ । विश्रांतीचे ।।’’ [६२] ज्ञानेश्वर म्हणाले, ‘‘तुम्ही जेविला अमृत भोजने । आम्ही ही पंक्तिचे पाहुणे । गुह्य गूढ बोलणे । मौन्य जाले ।।’’ [६३] सोपानदेव म्हणत होते, ‘‘हे आदिअनादी भवानी । आदिपुरुषाची मोहिनी । गुरुकृपे आणिता ध्यानी । विश्व वश्य ।।’’ [६४]

या साऱ्यांच्या नजरेत मुक्ताबाईचे स्थान तर उंचावले होतेच, पण मुक्ताबाईच्या आंतरिक जीवनाच्या दृष्टीनेही आता फार मोठा बदल झाला होता.

हे सारे घडत असताना, मुक्ताबाई मात्र आंतरिकदृष्ट्या गोरक्षनाथांनी एकरुप झालेली होती. मुक्ताबाई गोरक्षनाथांना मनोमन आळवित होती.

‘‘अष्टभाव किरणेफाकती प्रभा । चंद्रसूर्य जैसी तारांगण नभा ।।
तैसा हा सद्गुरु मजमाजी उभा । आदिनाथा आरति गोरक्षनाथा ।।
जय जय आरती येथे चंद्रमौळी । कृपाकरी देवभक्ता सांभाळी ।।
जटाजूट गोदा वाहे कल्लोळी । तेचि प्रेमसुख या भक्ताजवळी ।।
कमळा कमळ जैसे ज्योतीस्वरुपा । निरंजनी दीप चांग्या पाहे पा ।।
व्यक्त अव्यक्तरुपा अरुपा । सद्गुरुप्रसादे अनुभव सोपा ।।
प्रात:काळ मध्यान्ह सायंकाळ आरती । अखंड न खंडे प्रेमाच्या ज्योती ।।
अंतरा अंतर सोहंभाव प्रीति । प्रेमे ओवाळिले गिरजेचे पती ।।
अमुर्तरुपे हे मूर्तीसी आले । नवे नित्य भरुनि चांग्या फावले ।।
साधुसंत कृपावंत वटेश्वर बोले । बीजवट सामावले मी माझे हारपले ।।
अव्यक्त लहरी प्रेमाचा पूर । तेथे पहुडला चांगा वटेश्वर ।।
अनुहात ध्वनी सोहं नामे गजर । मुक्ताबाई म्हणे पुढती नाही संसार ।।’’ [६५]

**

# मुक्ताबाईचा अज्ञातवास

जेव्हा एखादा उच्चस्तरीय अनुभव साधकाला येतो तेव्हा त्या अनुभवाच्या स्थिरीकरणासाठी त्याला एकांतवासाची आवश्यकता असते असे अध्यात्मशास्त्र सांगते. गोरक्षनाथ भेटीच्या प्रसंगी जो दिव्य अनुभव मुक्ताबाईला आला त्याच्या स्थिरीकरणासाठी तिला एकांतवासाची गरज निर्माण झाली असावी. जात्याच अंतर्मुख स्वभावाची असलेली मुक्ताबाई ह्या गोरक्षभेटीच्या प्रसंगानंतर अधिकच आत्ममग्न झाली असावी आणि अधिक उच्च स्वरूपाची साधना करण्यासाठी आपल्या मोजक्या शिष्यांसमवेत ती अज्ञातवासामध्ये राहिली असावी, असा अंदाज आपण 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' या प्रकरणात वर्तवला आहे. वाङ्मयामध्ये या अंदाजाला पूरक असे कोणते दाखले मिळतात का त्याचा येथे सविस्तर विचार करू.

१ ) नामदेवगाथेमध्ये तीर्थावळीचे जे वर्णन आले आहे त्या भागा मध्ये निवृत्ति, सोपान, ज्ञानेश्वर या तिघांची नावे येतात मात्र मुक्ताबाईचा उल्लेख कोठेही येत नाही. तीर्थयात्रा करून परत पंढरपूरला आल्यावर उद्यापनाचा जो प्रसंग नामदेव वर्णन करून सांगतात त्यामध्येही या तिघा भावंडांबरोबरच सावता, जगमित्र, आसंद सुदामा, विसोबा, नरहरी सोनार, चोखामेळा, गोराकुंभार या सर्वांचा उल्लेख आलेला आहे. येथेही मुक्ताबाईचा उल्लेख नाही. तेव्हा सर्व प्रसंगाचे तपशीलवार वर्णन करणारे नामदेव मुक्ताबाईचा उल्लेख करावयाचे विसरले असे नसून मुक्ताबाई तेथे उपस्थित नव्हती हीच गोष्ट अधिक संयुक्तिक वाटते.

२ ) 'मातीची भिंताडे चालवितो मढी । सांडूनिया वेडी तीर्था जाती ।।' [१] या मुक्ताबाईकृत अभंगामध्ये तीर्थयात्रा करण्याविषयीची नापसंती स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. किंवा 'नलगती तीर्थे हरिरूपे मुक्त ।।' [२] या मुक्ताबाईच्या उद्‌गारामधूनही तोच भाव व्यक्त झाला आहे. तेव्हा असे विचार असणाऱ्या मुक्ताबाई ज्ञानेश्वर तीर्थयात्रेला गेलेले असताना मागेच राहिल्या असाव्यात असा अंदाज करता येतो.

३ ) चांगदेवाचे वर्णन करताना नामदेव म्हणतात, ''संतसमागम

फळला तुजला । एकांत फावला मुक्ताबाई ।।'' [३] यातील 'एकांत फावला मुक्ताबाई' हा उल्लेख मननीय आहे. मुक्ताबाई अज्ञातवासात राहिल्या असताना त्यांच्या समवेत चांगदेव व त्यासारखी काही निवडक शिष्य मंडळी असावीत असे वाटते.

याला आणखी एक आधार मिळतो तो असा की, तीर्थयात्रेच्या वर्णनात मुक्ताबाईप्रमाणेच चांगदेव, वटेश्वर यांचेही नामोल्लेख येत नाहीत.

४ ) पुढे एका प्रसंगी एका आरतीत असा उल्लेख केला आहे, ''कर्दळी बनीहुनी मात आली लवलाह्या । ऐक्य सुख केले तुजरे चांगया । दृष्टादृष्टी भेटी गेलीरे विलया । क्षणभरी न विसंबे अरे तया ।।'' [४] यातून कर्दळी बनीहुनी म्हणजेच तापीतीरावरून, गोरक्षनाथांच्या भेटीनंतर माता लगोलग परतली असा उल्लेख येतो.

५) 'ज्ञानेश्वरसमाधिमहिमा' या प्रकरणामध्ये तीर्थयात्रेवरून पंढरपूरहून आळंदीकडे परतत असताना वाटेत पंचकोसावर ज्ञानदेव मुक्ताबाईला भेटले असा उल्लेख येतो. तो असा, 'ज्ञानदेवे नमस्कारिले हरि निवृत्ति सोपान झडकरी । मुक्ताई भेटली लौकरी । ज्ञानदेवा करी धरियेले ।।' [५] या ठिकाणी मुक्ताबाई भेटल्या आणि ज्ञानदेवांनी त्यांना करी धरिले या उल्लेखावरून ते आधी एकत्र नव्हते, आणि मग भेट झाली असा संकेत मिळतो.

**मुक्ताबाईच्या अज्ञातवासाचे स्थळ : सोळू ? –** मुक्ताबाईचे अज्ञातवासात राहणे हा अंदाज एकदा जर मान्य केला तर पुढे असा विचार करावा लागतो की मग मुक्ताबाई अज्ञातवासात म्हणजे नेमक्या कोणत्या गावी राहिल्या असाव्यात ? त्याचे काही संदर्भ मिळतात का तेही पाहणे आवश्यक ठरते.

१ ) आळंदीच्या पूर्वेला, 'सोळू' या गावी मुक्ताबाईचे मंदिर आहे. मंदिराचा गाभारा जुन्या काळातील असावा असे प्रत्यक्ष पाहणीवरून लक्षात येते.

२ ) 'सोळू' हे या गावाचे हे नाव कसे पडले ? त्याची आठवण ग्रामस्थ सांगतात ती ऐकण्यासारखी आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधिपूर्वी मुक्ताबाई रुसून या गावी आली. मग ज्ञानेश्वरादी भावंडे त्यांची समजूत काढण्यासाठी या गावात आली. मुक्ताबाईचा रुसवा काढला आणि त्या निमित्ताने तेथे गावाने एक

आनंद सोहळा केला. तेव्हा सोहळा – सोवाळु – सोळू अशी या नावाची व्युत्पत्ति सांगतात. गावाच्या नावाशीच मुक्ताबाईसंबंधीचा कथाभाग निगडित झाला आहे इतके हे गाव मुक्ताबाईशी जुळलेले आहे याचीच ही साक्ष आहे.

३) लोकमानसाला उच्च स्तरावरील व्यक्तींच्या कृतीउक्तीचा संदर्भ जसाच्या तसा घेता येतोच असे नाही. तेव्हा त्यांच्या वागण्याबोलण्याचा आपल्या स्तरावरून काही अर्थ लावण्याचा प्रयत्न लोकमानस करत असते. मुक्ताबाईच्या अज्ञातवासाचे कारण नीटपणे समजू न शकलेल्या लोकांनी त्या येथे एकट्याच रुसून बसल्या असा लावला असणे सहज शक्य आहे. (ज्ञानेश्वरांच्या आत्ममग्नतेचेही स्पष्टीकरण ज्ञानेश्वर रुसले आणि ताटी लावून बसले असेच लोकांनी केले असल्याचे आपल्याला ज्ञात आहेच.)

४ ) सोळू हे गाव म्हणजे मुक्ताबाईचे घर आहे अशी समजूत आजही तेथील लोकांमध्ये रुढ असल्याचे दिसते. मुक्ताबाईसंबंधी तेथील लोकांनी तयार केलेल्या एका लोकगीतामध्ये या समजुतीचे स्पष्ट दर्शन घडते. 'मुक्ताई घरी मुक्त होऊ या चला '[६] असा उल्लेख या गीतामध्ये येतो. म्हणजेच मुक्ताबाईचे येथे वास्तव्य घडले असावे ही गोष्ट उघड आहे.

**स्थळाचा उल्लेख का नाही ? –** मुक्ताबाई अशा रीतीने एकांतवासामध्ये राहिल्या असल्या तर नामदेवांच्या अभंगांमध्ये या गावाचा उल्लेख का येत नाही ? असा प्रश्न मनात निर्माण होणे स्वाभाविकच आहे. पण याचे स्पष्टीकरण वेगळ्या रीतीने देता येईल.

१ ) ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधिपूर्वी पंढरपूरहून आळंदीला जाण्यापूर्वी सर्व साधुजन पाच कोस अलिकडे उतरले असल्याचे वर्णन नामदेवगाथेमध्ये येते.

''पंढरीचा पोहा आला अलंकापुरी । पंच कोसावरी साधुजन ।
पताकांचे भार निघाले बाहेर । भेटती ऋषीश्वर पांडुरंगा ।
अवघिया भेटी झाल्या त्या बाहेरी । मग अलंकापुरी येते झाले ।।''[७]

असे वर्णन नामदेवांनी केले आहे. अलंकापुरापासून पाच कोसावर साधुजन थांबले आहेत. अवघियांच्या भेटी झाल्या आहेत. हे सारे वर्णन सोळू या गावाशी निगडित असलेल्या आख्यायिकेशी मिळतेजुळते आहे. आळंदीपासून पाच

कोसावर असा अस्फुट निर्देश येथे केला आहे.

२ ) मुक्ताबाईचा अज्ञातवास हीच या गावाच्या इतिहासातील सुरुवातीची महत्त्वाची घटना होती. या प्रसंगामुळेच ज्या गावाला नाव मिळाले त्या गावाच्या नावाचा उल्लेख न येणे स्वाभाविकच आहे. म्हणजे असे असू शकेल की, त्यापूर्वी त्या गावाला स्वतंत्र असे अस्तित्व नव्हते. छोटीशी वस्ती असे त्याचे पूर्वी स्वरूप असावे.

३ ) आणखी एक गोष्ट अशी की मुक्ताबाई अज्ञातवासात असल्याने त्या नेमक्या कोठे होत्या याचा संदर्भ न देणेच स्वाभाविक आहे. अज्ञातवासात राहणारी व्यक्ती आपण कोठे राहतो ते इतरांना कळू नये अशी दक्षता घेत असते. आणि म्हणून नामदेवांनी मुक्ताबाईच्या या अज्ञातवासातील ठिकाणाचा जाहीर उल्लेख न करणेच सुसंगत ठरते. नामदेवगाथेमध्ये कोणत्याही गावाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख का येत नाही याची वरील कारणे संभवतात.

('पेशवे दप्तरा'त सोळू या गावाशी निगडीत असे एक दप्तर पाहावयास मिळाले. त्यात या मंदिराचा उल्लेख पाहिला असल्याचेही प्रस्तुत संशोधिकेस स्मरते. परंतु संशोधिकेचा मोडी लिपीचा अभ्यास नसल्याने त्याचा पुरेसा शोध घेता आला नाही, हे येथे नमूद करावेसे वाटते.)

प्रस्तुत संशोधिकेने केलेल्या या अंदाजाला ऐतिहासिक संशोधनाची जोड लाभली तर त्यासंबंधी काही निर्णायक मतापर्यंत येता येईल. ज्ञानेश्वर नामदेव तीर्थयात्रेला गेले असताना; चांगदेव व इतर काही निवडक अशा आपल्या शिष्यांसमवेत सोळू या गावी मुक्ताबाई अज्ञातवासामध्ये राहिल्या असाव्यात असा फक्त अंदाज करणेच तूर्त शक्य आहे.

**

# तववरी तिचे शरीर अभंग चिरकाळ निरंतर

तीर्थयात्रा करून निवृत्ति, ज्ञानेश्वर परतले आहेत. अवघियांच्या भेटी झाल्या आहेत. ज्ञानेश्वरांचा समाधिस्थ होण्याचा निर्णयही आता मुक्ताबाईला कळला आहे. नामदेवगाथेमध्ये 'श्रीज्ञानेश्वरसमाधीमहिमा' या नावाचे एक प्रकरण आहे; त्यात हा सर्व भाग आला आहे. निवृत्ति, ज्ञानेश्वर व सोपान यांच्या समाधीच्या स्थानांचा स्पष्ट उल्लेख केला गेला आहे आणि अशा वेळी मुक्ताबाईच्या समाधिस्थळाबाबत विठ्ठल काहीच सांगत नाही हे पाहून विठ्ठलाला तिची स्थिती कैसी ? असा प्रश्न केला गेला आहे. तेव्हा विठ्ठलाने जे उत्तर दिले ते मूळातूनच पाहण्यासारखे आहे.

''तरी नाथाचा हात ईचा शिरी । यालागी ते सत्यसनातन अवधारी ।
महाकल्पाचा अवश्वरी । हे सोडील देह ।
महद्माया योगिनी साचार । मुक्ताबाई उद्धवा ।।'' [१]

मुक्ताबाईच्या समाधिप्रसंगाच्या निमित्ताने नामदेवांनी ''कडाडली वीज निरंजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।।'' [२] असे वर्णन केले आहे. निवृत्तिनाथही मुक्ताबाईबद्दल उद्गार काढतात, ''नाशिवंत शरीर केले अविनाश । घडविला विलास अध्यात्माचा ।।'' [३] मुक्ताबाईचे हे गुप्त होणे, त्यांचे स्वरूपाकार होणे ही काय वस्तुस्थिती आहे ? त्यामागील नेमके रहस्य काय आहे ? याचा काही प्रमाणात उलगडा करून देणाऱ्या वरील ओळी आहेत असे जाणवल्यामुळे वरील गोष्टींचा येथे अधिक सविस्तर विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

नामदेवांनी वरील गोष्टीचा उल्लेख केला आहेच पण पुढील काळातही संत एकनाथमहाराजांनी मुक्ताबाईबाबतच्या याच गोष्टीचा पुनरुच्चार केला आहे.

'नाथाचे आश्रमी समाधिरहित । मुक्तता मुक्त नाम तुम्हा ।।
महाकल्पवरी चिरंजीव शरीर । कीर्ति चराचर त्रिभुवनी ।।
आनंद समाधि सदा ती उघडी । नामस्मरण घडोघडी मुखोद्गत ।।
एकाजनार्दनी तुमचे नाम गोड । त्रैलोकी उघड नामकीर्ति ।।' [४]

यातील 'नाथाचे आश्रम' या शब्दांचा अधिक सविस्तर विचार करू. आश्रम, मठ इत्यादी संज्ञाचा लौकिक अर्थाने विचार केला तर सद्गुरुच्या निवासस्थानाचा

संकेत देणाऱ्या या संज्ञा असतात. परंतु संतवाङ्मयात हेच शब्द वेगळे वजन घेऊन येतात. (ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातदेखील मठ हा शब्दप्रयोग स्वरूपस्थान या अर्थाने आलेला दिसतो. 'मुमुक्षू'१९२७ मध्ये प्रकाशित झालेल्या ज्ञानेश्वरांच्या एका अभंगात, 'पावोनि आलो आपुल्या मठा ।' असा उल्लेख येतो तो याच अर्थाने.) सद्गुरुंचा निवास भौतिक अर्थाने एकाद्या आश्रमात मठात असला तरी त्यांचा खऱ्या अर्थाने निवास स्वरूपस्थितीमध्ये असतो. सद्गुरु ज्या लोकामध्ये वावरत असतात, त्या लोकामध्ये शिष्यानेही प्रविष्ट होणे यालाच 'सलोकता मुक्ती' असे म्हणतात. आणि या अर्थाने मुक्ताबाई नाथाच्या आश्रमी समाधिरहित स्थितीत राहिल्या असा एकनाथांच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

दुसऱ्या अंगाने विचार केला तर आणखी एक गोष्ट लक्षात येते, नाथांचा आश्रम म्हणजे गोरक्षनाथांच्या कृपेचा अनुभव मुक्ताबाईला जेथे आला होता ती जागा. हा अनुभव तापी तीरावर आला असल्याचे एकमुखाने वर्णन त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनीच केले आहे. आणि म्हणूनच मुक्ताबाई स्वरूपाकार झाली तीही तापीतीरीच. मुक्ताबाईने स्वरूपाकार होण्यासाठी तापीतीराचीच निवड का केली असावी याचा उलगडा येथे होतो.

शरीराची कोणतीही निशाणी मागे न ठेवता, एकाएकी निरंजनी गुप्त होऊन जाणे आणि महाकल्पवरी चिरंजीव शरीर टिकून राहणे यामध्ये निश्चित असा संबंध असल्याचे वरील अभंगाच्या आधारे जाणवू लागते.

मुक्ताबाईच्या स्वरूपाकार होण्याचा, तिच्या देहसिद्धीचा विचार जेथे जेथे आला आहे तेथे तेथे गोरक्षनाथांचे नाव आवर्जून आलेले आहे हे ही आपल्या लक्षात येते.

मुक्ताबाईचे परमशिष्य चांगदेव आपल्या 'तत्त्वसार' या ग्रंथात म्हणतात, ''आदिनाथप्रसादे । उमास्वामीसंवादे । मछिंद्रप्रबोधे । प्रकट जाले । जो पदपिंडज्ञाता । निगाले करचरण दृष्टान्ता । तो जाण चौरंगी सिद्धांता कुळदिपकु ।। श्रीगोरक्षनाथु । देहसिद्धिसिद्धांत । परमतत्त्व विख्यात । आचार्ये जाण ।। श्रीमुक्तादेवी योगिनी । जे समस्तसिद्धशिरोमणी । तिये प्रसादे चक्रपाणि । ज्ञानसिद्धु ।।'' [५] येथे गोरक्षनाथांच्यानंतर लगोलग जो उल्लेख आला आहे तो मुक्ताबाईचा आहे.

याठिकाणी परंपरेतील गहिनी-निवृत्ति यांचा उल्लेख न येता मुक्ताबाईचा एकदम उल्लेख का येतो हे पाहण्याजोगे आहे. याठिकाणी गोरक्षनाथांना विशेषण वापरले आहे ते ‘ देहसिद्धीसिद्धांत । परमतत्त्व विख्यात । आचार्य ’ असे आहे. देहसिद्धीसाठी जे विख्यात असे आचार्य आहेत, त्या गोरक्षनाथांचा येथे उल्लेख आहे आणि देहसिद्धी प्राप्त असलेली त्या परंपरेतील पुढील व्यक्ती म्हणजे मुक्ताबाई आहे. आणि ही देहसिद्धीही तिला गोरक्षनाथांच्या कृपेनेच प्राप्त झाली आहे.

‘दीपरत्नाकर’ या ग्रंथात, रत्नाकराने केलेली नोंद देहसिद्धीच्या वरील मुद्याशी सुसंगत अशीच आहे, तेव्हा ती अधिक सखोलपणे येथे यथातथ्य स्वरूपात लक्षात घेऊ.

‘तेचि मच्छिंद्रनाथासी । प्राप्त झाले परियेसी ।
मछींद्रनाथे गोरक्षासी । अति आदरेसी सांगितले ।
गोरक्षीने मुक्ताबाई । नाना परि बोधिले पाही ।
जे देहीच झाले विदेही । विचरे मही जीवन्मुक्त ।।’ [६]

तसेच ‘तववरी तिचे शरीर । अभंग चिरकाळ निरंतर ।।’ या नामदेवगाथेत आलेल्या उद्गारातूनही मुक्ताबाईला प्राप्त झालेल्या देहसिद्धीची कल्पना येते.

निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर आणि सोपानदेव यांच्या समाधिप्रसंगामध्ये साम्य असल्याचे जाणवते. या तिघांनी पूर्वनियोजित पद्धतीने, विधीपूर्वक समाधी घेतली असल्याचे लक्षात येते. मात्र मुक्ताबाईची समाधी या तिघांपेक्षा भिन्न आहे. या समाधीचे वर्णन ‘उघडी समाधि’ असे करण्यात आले आहे. ‘मुक्ताबाईला दिलेली सनद’ या प्रकरणग्रंथामध्येही ‘उघडी समाधि घेई जगामाजी,’ असे ज्ञानेश्वरांनी तिला सांगितले आहे. ठराविक ठिकाणी पूर्वतयारी करून समाधीसाठी आत प्रवेश करणे आणि नंतर इतरांनी शिळा लावून घेणे ही संजीवनसमाधीची ज्ञानेश्वरादींची पद्धत दिसून येते. पण मुक्ताबाईच्या बाबतीत हा कोणताच प्रकार आढळत नाही. समाधी केव्हा घेणार ? ह्या प्रश्नावरही मुक्ताबाईनी दिलेले उत्तर वेगळेच आहे.

‘‘मुक्ताबाई म्हणे जावे यावे कोठे । अवघे निघोट स्वरूप ।।’’ [७]

हे तिचे उत्तरही गूढतेमध्ये भर टाकणारे आहे. वयाच्या अठराव्या वर्षी मुक्ताबाईचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला अशी एक समजूत महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतात आढळते. [८] परंतु जर खरोखरच असे असते, तर वीज पडल्यानंतर उर्वरित शरीराची काही निशाणी शिल्लक राहिलीच असती पण तसे असल्याचे नामदेवकृत वर्णनावरून दिसत नाही. निवृत्ति आणि नामदेव हे दोघेही मुक्ताबाईच्या एकाएकी गुप्त होण्यासंबंधी खंत व्यक्त करताना दिसतात. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला तर मुक्ताबाईच्या समाधिसंबंधीचे गूढ काही प्रमाणात आकलन होऊ शकेल.

अर्थातच हा सर्व प्रकार आपल्या तर्कबुद्धीच्या पलीकडचा असा आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता आकाशात एकदम झळकून जाणारी वीज आपल्या तोकड्या बुद्धीने पकडून ठेवण्यासारखा हा प्रकार असल्यामुळे आपल्याला रुढ अशा तर्कबुद्धीच्या पलीकडे जाऊनच याचा विचार करावा लागणार आहे. अर्थात तर्कातीतता म्हणजे तर्कदुष्टता नव्हे हेही लक्षात घेणे येथे जरुरीचे आहे.

'कडाडली वीज निरंजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।।' [९] किंवा 'एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनी । जेव्हा निरंजनी गुप्त झाली ।।' किंवा 'होती ऐसी नाही झाली मुक्ताबाई ।।' [१०] किंवा 'आली गेली कैसी आम्हा कळले नाही । मुक्ताबाई कोठे विसर्जिली ।।' [११] यासारखी नामदेवकृत विधाने मुक्ताबाईचे अचानक स्वरुपाकार होणे ही गोष्ट दर्शवून देतात. कोणतीही पूर्वकल्पना दिलेली नसताना त्यांचे हे निघून जाणे आहे. मात्र हे निघून जाणे म्हणजे रूढ अर्थाने ज्याला मृत्यू असे म्हटले जाते असेही ते नाही हे नामदेवांच्याच पुढील विधानांवरून लक्षात येईल. 'मावळला दीप ज्योत कोठे होती । सहज सामावती निरंजनी । गर्जता गगन कडाडली वीज । स्वरुपी सहज मिळयेली ।।' [१२] किंवा 'वैकुंठी लक्ष घंटा वाजती एकघाई । झाली मुक्ताबाई स्वरुपाकार ।।' [१३] यासारखे उल्लेख त्यांच्या मृत्यूचे वर्णन करत नसून त्यांच्या स्वरुपाकार होण्याकडे संकेत दाखविणारे आहेत. इतरांना या गोष्टीची पूर्वकल्पना नसली तरी मुक्ताबाईला मात्र आपल्या या स्वरुपाची निश्चित अशी जाणीव आहे याचा प्रत्यय आपल्याला येतो तो त्यांच्या पुढील विधानांवरून,

''आमुच्या स्वस्थानी नाही पां अंधार । अवघी चराचर प्रकाशत्वे ।

उदय आणि अस्तु नाही स्वरुपासी । ऐसे मुनी ऋषी जाणताती ।
आम्ही कधी आलो स्वरुप सोडोन । जावे पालटोन जेथिल तेथे ।
अंतर बाहेर स्वामीचे स्वरुप । स्वये नंदादीप उजळिला ।।'' [१४]

या शब्दांमध्ये मुक्ताबाईने आपली अवस्था येथे निवृत्तिनाथांना कथन केलेली आहे. ज्या स्थानी अंधार औषधालासुद्धा नाही; जेथे आनंद, प्रकाश, सत्य यांचेच जीवन आहे अशा स्वरूप स्थानाविषयी, सर्वसामान्यांना ज्ञात असलेल्या जाणिवेच्यापेक्षा एका वेगळ्या विश्वाविषयी मुक्ताबाई येथे संदर्भ देत आहेत. प्रकाशमय जीवनातील कायमस्वरुपी वास्तव्य, स्वतःच्या स्वरुपाचे कधीही न होणारे विस्मरण, अंतर्बाह्य ज्योतिर्मय स्वरुपाचे जीवन, देहाचे चिरंजीवीत्व - मुक्ताबाईच्या चरित्रातील या साऱ्या गोष्टी एका दिव्य जीवनाचा संकेत देणाऱ्या आहेत. 'तववरी तिचे शरीर अभंग चिरकाळ निरंतर' या नामदेवकृत विधानाचा उलगडा होण्यासाठी काही आधार सापडतो का ते पाहू.

मन, प्राण आणि शरीर ही म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आत्म्याच्या अभिव्यक्तीची, प्रकटीकरणाची साधने आहेत. मानवी जीवनात सद्यस्थितीत अपूर्ण अशी ही साधने आहेत. ही सर्व साधने आणि आपल्यामध्येच असलेला उच्च स्तरीय प्रांत यामध्ये एक पातळसा पडदा आहे. या पडद्याने खालील अपरेचा प्रांत आणि वरील परेचा प्रांत अलग केले आहेत. परंतु वरील प्रांतातील प्रकाश जर या खालच्या साधनांमध्ये उतरला तर ती साधनेच स्वयमेव रूपांतरित होऊ शकतात. आणि त्यांना पूर्णत्वप्राप्ती होऊ शकते; असे अध्यात्मशास्त्र सांगते.

त्यासाठी आपला आत्मा जो अमर असतो तशी स्थिती मन, प्राण आणि शरीर या साधनांची व्हायला हवी. आत्म्याचे 'अमरत्व' आपलेसे करण्यासाठी काही प्रमाणात तरी 'दिव्यत्व' या साधनांनी धारण करायला हवे. आत्म्याचे कालातील अस्तित्व हा अमरतेचा अर्थ आहे. तो आत्मा मी आहे, सोऽहम् अशी जाणीव जीवाला, साधनेच्या माध्यमातून कायमस्वरूपी आपलीशी करता येते.

एकेकाळी देहबुद्धीत वावरणारी जाणीव साधनेच्या साहाय्याने वाढून ती आत्मबुद्धीत रूपांतरित होऊ शकते. जाणीव ही सूक्ष्म असल्याने त्यातील

बदल हा मन, प्राण आणि शरीर या साधनांच्या तुलनेत अधिक वेगाने घडू शकतो. परंतु त्या बदलेल्या जाणीवेशी मिळतेजुळते घेण्याची क्षमता या साधनांमध्ये असतेच असे नाही. बदलेल्या जाणीवेच्या प्रमाणात मन, प्राण आणि शरीर त्या बदललेल्या उच्च जाणीवेशी सुसंगत असे परिवर्तन स्वत:मध्ये घडवून आणू शकत नाहीत. आणि मग रूपांतरित झालेली उच्च जाणीव आणि ही मागास अशी साधने (स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्यास असमर्थ) यांच्यात रस्सीखेच सुरु होते. ही संकल्पना स्पष्ट होण्यासाठी एक उदाहरण पाहू.

जोडीसाखळीच्या खेळात सर्व समान वेगानेच धावणारे असतील तर अडचण येत नाही. पण त्यातील एखादीच व्यक्ती जर इतरांच्या पुढे धावत असेल आणि ती जर ताकदवान असेल तर तिच्याबरोबर धावताना इतर दुर्बल व्यक्तींची मात्र ओढाताण होते. तसाच काहीसा प्रकार उच्चस्तरीय जाणीव आणि निम्नस्तरावरील मन, प्राण आणि शरीर यांच्या बाबतीत होत असतो. दिव्य शक्ती, उच्चस्तरीय जाणीव पचविण्याची या अंगांची ताकद कमी पडते. मन, प्राण, शरीर जुनेच जीवन पसंत करतात. जाणीवेतील हा उच्चस्तरीय बदल पेलण्याची मन, प्राण, शरीर यापैकी जर कोणा एकाचीही पुरेशी तयारी नसेल तर अशा जीवाला हे कार्य काही काळ तरी थांबवावे लागते. आणि यामुळेच समाधी घेण्याची निकड वाटली असणे शक्य आहे, असा अंदाज करता येतो.

परंतु अध्यात्मजीवनाच्या सुरुवातीपासूनच जाणीवेतील बदलाला अनुसरून ही साधनेही बदलविण्याचे काम जाणीवपूर्वक चालू असेल तर वाढत्या जाणीवेबरोबर ही साधनेही विकसित होऊ शकतात. त्यांच्यातील या परिवर्तनाने त्यांची उच्च जाणीव धारण करण्याची क्षमता विकसित होत जाते. आणि मन, प्राण, शरीर यांचा त्याग करण्याची, समाधि घेण्याची आवश्यकताही नाहीशी होते. ही रूपांतरणाची क्षमता जोपर्यंत मन, प्राण आणि शरीर या अंगांमध्ये आहे तोपर्यंत तो देह चिरकाळ टिकून राहू शकेल हेही शक्य आहे. हेच मुक्ताबाईच्या चिरकाळ अभंग शरीराचे रहस्य नसेल ना ? असा विचार मनात तरळून जातो.

मुक्ताबाईची आध्यात्मिक जीवनाची वाटचाल ही अशाच प्रकारची असावी अशी जाणीव आपल्याला मनोमन होऊ लागते. अगदी सुरुवातीपासूनच आपल्याला मुक्ताबाईच्या जीवनात याच्या पाऊलखुणा पाहावयास मिळतात.

अगदी सुरुवातीच्या काळात मुक्ताबाईने जे प्रश्न विचारून स्वत:चे शंकानिरसन करून घेतले आहे त्यातील म्हणजे ‘मुक्ताबाईस दिलेल्या सनदी’मधील प्रश्नांचे स्वरूप पाहिले तर तिची ही झेप तिथेच जाणवून जाते. ‘‘देहासी कैसी जाली मोक्षगती’’ [१५] हा तिचा प्रश्नच तिची आध्यात्मिक उंची दाखवून देणारा आहे. जाणीवेने मोक्ष प्राप्त करून घेणे हा सर्वात पहिला टप्पा आहे तर देह हा सर्वात जड असल्याने त्याला मोक्षप्राप्ती होणे हा विकासातील सर्वात शेवटी साध्य होणारा असा टप्पा आहे. असे असताना मुक्ताबाई प्राप्तीसाठी सर्वात अवघड अशा देहाच्या मोक्षाबाबतच प्रश्न विचारते आहे असे दिसते. तेव्हा जाणीवेनुरुप मन, प्राण आणि शरीर यांत बदल घडवून आणण्याची प्रक्रिया मुक्ताबाईने अगदी सुरुवातीपासूनच सुरु केली असावी असा अंदाज करता येतो.

मुक्ताबाई तिला आलेल्या अनुभवाचे कथन करत आहे, ‘‘सहज समाधि लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी न चले पुढे ।। १ ।। खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।। २ ।। गळालीं इंद्रिये राहिलेसे मन । झाले महाशून्य एकाएकी ।। ३ ।। विरालीसे शक्ती झालीसे निवृत्ति । झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई ।। ४ ।।’’ [१६] ह्याच अनुभवानंतर मुक्ताबाईला ‘उघडी समाधी घेई जगामाजी’ हे सांगण्यात आले आहे.

पुढे गोरक्षकृपेच्या वेळीही जे अनुभव मुक्ताबाईला आले आहेत त्याचे वर्णन करताना ती म्हणते, ‘‘...... तेथे देहा भरोनि ताट । ढळती कळस कुंभाचे कांठ । तेथे सद्गुरु समर्थ भेट । रक्षु लागे ।। तेथे शरिराचे पिसे । नेणो निवारिले कैसे । येकसरा मानसें । धावूं आले ।। म्हणे मुक्ताबाई । येकांताचे पाहणे । समाधीची चिन्हे । येणे रिती ।।’’ [१७]

गोरक्षभेटीच्या वेळी जो दिव्य शक्तीच्या अवतरणाचा अनुभव मुक्ताबाईला आला होता त्यामुळे तिच्या देहाचीही अवस्था बिकट झाली असावी असे वरील अभंगावरून लक्षात येते. ढळती कळस कुंभाचे काठ, किंवा शरीराचे पिसे या शब्दात तो अनुभव व्यक्त झाला आहे. परंतु लगेच पुढे जो संदर्भ आला आहे त्यामुळे त्याची लगेचच उकलही होते. या बिकट परिस्थितीतून सद्गुरुने, समर्थाने म्हणजेच स्वत: गोरक्षनाथांनीच तिला बाहेर काढले असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याबद्दल ती गोरक्षनाथांच्या आरतीमध्ये म्हणत आहे, ‘‘मज

मारुनि जीवविले श्रीगुरुराया म्हणोनि लवलाह्या पाय धरा'' [१८]

'म्हणे मुक्ताबाई खचिला माजीवटा' [१९] असाही उल्लेख पुढील एका अभंगामध्ये येतो. माजीवटा खचला म्हणजे मरणाची शेवटची घडी खचली. (जुन्या शब्दकोशांच्या आधारे 'माजीवटा' या शब्दाचा अर्थ शोधला असता त्याचे अनेक अर्थ दिलेले आढळले. त्यातील मरणाची शेवटची घडी हा अर्थ येथे बरोबर लागू पडतो.)

मुक्ताबाईच्या ज्ञानबोध ग्रंथातील विधानही या संदर्भात लक्षणीय आहे. ती निवृत्तिनाथांना सांगत आहे, ''मृत्यु नाही जेथे मुक्ति कोणे वाहावी । कल्पनाही नवी स्छापुं नये ।।'' [२०] किंवा ह्याच संवादात पुढे ती म्हणते, ''तव मरणाची वेथा सहज व्यापिली देही । जव अनुभव आपले ठाई आला नाही ।।'' [२१] ज्याला अनुभव आलेला नाही त्याच्या ठिकाणी मरणाबद्दलची व्यथा देहात व्यापणे सहज आहे. म्हणून अविनाशाचे गाणे गाण्यासाठी सुखाचे गौप्य गिवसावे असे ती सांगत आहे.

आत्म्याचे दिव्यत्व स्वत:मध्ये साठविण्यासाठी देह, प्राण व मन यांना दोन गोष्टींची आवश्यकता आहे. एक म्हणजे स्वत:चे दिव्यत्वात परिवर्तित करण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता त्यांनी बाळगून असणे. आणि दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे त्या क्षमतेचे पूर्णतेत परिवर्तन होण्यासाठी त्या चैतन्यतत्वाचा वरदहस्त लाभणे. या दोन गोष्टींमुळेच निम्न साधनांचे दिव्यत्वात रूपांतरण शक्य होते. या दोन्ही गोष्टी मुक्ताबाईनी स्वत:च्या अल्पायुष्यातच साध्य करून घेतलेल्या दिसतात. स्वत:च्या उच्च कोटीच्या साधनेतून देह, मन व प्राण सक्षम कसे करून घेतले हे आपण पाहिले आणि 'नाथाचा हात ईच्या शिरी' या विधानातून तिच्यावरील चैतन्यतत्त्वाच्या वरदहस्ताचीही कल्पना करता येते. उच्च निदिध्यास आणि दिव्यकृपा यांच्या संयोगामधून मुक्ताबाईनी आपले स्वत:चे जीवन विज्ञानमय पातळीवर नेले असल्याचे येथे जाणवते.

'विज्ञानेसी तेज सज्ञानेसी निज । निर्गुणेसी चोज केले सये ।।' या अभंगामधून तिच्या विज्ञानमय जीवनाचे पडसाद उमटताना स्पष्टपणे जाणवतात.

**केला उद्योग आवरी पंचभूतें –** आता मुक्ताबाईचे स्वरूपाकार होणे म्हणजे नेमके काय असावे ह्याचा काही विचार येथे करू. मुक्ताबाईचे

स्वरूपाकार होणे म्हणजे 'ज्याची त्याने शक्ती आटोपावी' [२२] असा प्रकार असावा असे जाणवू लागते. आपले येथील कार्य संपल्याचे लक्षात आल्यानंतर मुक्ताबाईने आपली पंचभूते स्वत: आवरली असावीत असा येथे संकेत मिळतो. हे शरीर पंचमहाभूतांचे बनलेले आहे. तेव्हा त्या पंचतत्त्वामध्ये स्वत:ला विलीन करणे हा प्रकार मुक्ताबाईने स्वत:च्या देहाबाबत केला असावा असे दिसते. ''शिवमाया तनु जालिया सारी । केला उद्योग आवरी पंचभूतें ।।'' [२३] असे उद्गार मुक्ताबाईच्या अभंगात आल्याचे आढळून येते.

मुक्ताबाईच्या स्वरूपाकार होण्याच्यावेळी कशी परिस्थिती निर्माण झाली याचे वर्णन नामदेवगाथेमध्येही आले आहे. ते मुळातूनच पाहू.

''......प्रळयीच्या विजा वर्षती अपार । झाला धुंधकार दाही दिशा ।। करोनिया स्नान बैसले बाहेर । म्हणती अंधकार फार झाला ।। झुंजाट सुटला वारा कांपू लागे धरा । नभची अंतरा कालवले ।। ......अवघियांचे डोळे झाकले एकदा । माध्यान्ही आंबुदा वळुनी आले ।। ......'' [२४] येथे पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या साऱ्या तत्वांचाच सहयोग झाला असल्याचे लक्षात येते. अशा परिस्थितीतच ती सर्वांमध्ये असताना पाहता पाहता स्वरूपाकार झाली. ही तिने घेतलेली 'उघडी समाधि' होय. पंचमहाभूतांच्या एकत्रीकरणातून जेव्हा शरीर तयार होते तेव्हा जडामध्ये आल्यामुळे त्यात अशुद्धताही मिसळते. परंतु संपूर्ण आयुष्यभर स्वत:च्या देहातील त्या प्रत्येक तत्त्वाच्या शुद्धीकरणाचे कार्य मुक्ताबाईने चालू ठेवले आणि शेवटी देहातील ती सर्व तत्त्वे शुद्ध करून, त्या त्या महाभूतांमध्ये तिने विलीन केली असावीत, समर्पित केली असावीत असा अंदाज करता येतो.

या अंदाजाला आणखी एक आधार विसोबा खेचरांच्या अभंगामध्ये पाहावयास मिळतो. विसोबा या अभंगात जे काही नामदेवांना सांगत आहेत त्यामध्ये आणि मुक्ताबाईच्या वरील प्रसंगामध्ये काही अनुबंध असावा असे धूसरपणे जाणवते. तो अभंग केवळ संदर्भादाखल येथे पाहू.

'आप तेज वायू पृथिवी गगन । मेलें तें कवण पांचामध्ये ।। १ ।। आम्हां मरण नाहीं मरशील काई । आत्मवस्तु पाही श्रीगुरुमुखें ।। २ ।। जिताची मरण आलेंसे हातां । मरण बोलतां लाज नये ।। ३ ।। खेचर विसा म्हणे आम्हां मरण नाहीं । कैसें

मरण पाही आलें नाम्या ।। ४ ।।' [२५]

अर्थात मुक्ताबाईच्या स्वरूपाकार होण्यासंबंधी केलेला हा सारा विचार म्हणजे एक अंदाज आहे. शेवटी आपल्यालाही नामदेवांप्रमाणे याबाबतीत असेच म्हणावे लागते,

''आली गेली कैसी आम्हा कळलें नाही । कोठे मुक्ताबाई विसर्जिली ।।'' [२६]

**

# विभाग दुसरा

## मुक्ताबाईची प्रभावळ

**'मुक्ताबाईची प्रभावळ'** हा शब्दप्रयोग वाचून आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे. आपल्याला प्रामुख्याने माहिती आहे ती ज्ञानेश्वरांची प्रभावळ, की ज्यामध्ये नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा असे सत्पुरुष आहेत. मुक्ताबाईची प्रभावळ म्हणत असताना याचा नेमका अर्थ काय तो समजावून घेणे उचित ठरेल.

'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' या पुस्तकात श्री.ल.रा.पांगारकर म्हणतात, ''जुन्या काळी देवघरात उपास्यदेवतेच्या मूर्तीच्या पाठीमागे चांदी वगैरे धातूंची जी महिरप केलेली असते तिला प्रभावळ असे नाव आहे. मुख्य मूर्तीच्या भोवती राहून ती प्रभावळ शोभते व मूर्तीस शोभा देते. श्रेष्ठ व्यक्तीच्या भोवती चमकणारी मंडळी असा प्रभावळीचा अर्थ याच नित्याच्या सहवासाने प्रकट झाला आहे.''

या अर्थाने प्रस्तुत लेखिकेने येथे 'मुक्ताबाईची प्रभावळ' हा शब्दप्रयोग योजलेला आहेच. परंतु त्याबरोबरच एक वेगळा अर्थ संशोधिकेस येथे अभिप्रेत आहे. तो असा की, मुक्ताबाईची प्रभावळ असे म्हणत असताना, त्या प्रभावळीतील संतमंडळी ही मुक्ताबाईच्या श्रेष्ठत्वाने कमीअधिक प्रमाणात प्रभावित झाली आहेत, मुक्ताबाईच्या 'प्रभावक्षेत्रा'तील ही सारी मंडळी आहेत. त्या प्रभावाचा स्पष्ट संकेत त्यांनी मुक्ताबाईबद्‌दल वेळोवेळी जे उल्लेख केले आहेत त्यातून दिसून येतो.

या प्रभावळीमध्ये निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, विसोबा खेचर, नामदेव, वटेश्वर, चांगदेव ही सारी मंडळी आहेत. मुक्ताबाईच्या प्रभावळीमध्ये त्यांचा समावेश केला म्हणजे मुक्ताबाईच तेवढी श्रेष्ठ आणि इतर सर्व गौण, असे म्हणण्याचा प्रस्तुत संशोधिकेचा अजिबात भाव नाही हे येथे स्पष्टपणे नमूद करावेसे वाटते. मात्र या सर्वच संतांनी मुक्ताबाईचे आपल्या जीवनातील महत्त्वपूर्ण स्थान ओळखून तिचा गौरव केला आहे. या अर्थाने ती मंडळी मुक्ताबाईच्या प्रभावळीतील आहेत असे संशोधिका मानते. आणि याच अर्थाने मुक्ताबाईच्या प्रभावळीतील सर्व संतांचा अनुबंध शोधण्याचा प्रयत्न या विभागामध्ये केला आहे.

**

# मुक्ता सख्यत्व आम्हा अर्था प्रसवू लागे

## (मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ अनुबंध)

नाथसंप्रदायाची परंपरा मुक्ताबाईपर्यंत येऊन पोहोचली ती श्रीनिवृत्तिनाथ यांच्यामार्फत. आणि म्हणून सद्‌गुरु म्हणून मुक्ताबाईच्या जीवनात निवृत्तिनाथ यांचे अनन्यसाधारण असे स्थान आहे. सद्‌गुरुबद्‌दल असलेली मुक्ताबाईची अनन्यशरणता त्यांच्या अनेक अभंगामधून व्यक्त झाली आहे. 'मुक्ताई चैतन्य अवघे चिद्‌घन । आदि अंतु खूण निवृत्तिची ।।' [१] किंवा 'मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल । निवृत्तिने चोखाळ दाखविले ।।' [२] या शब्दांमध्ये मुक्ताबाईने सद्‌गुरु निवृत्तिनाथांबद्‌दल आदरभाव व्यक्त केला आहे हे आपल्याला माहिती आहे.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांनी देहत्याग केल्यानंतर या चारही भावंडांनी कसा काळ कंठला याचे वर्णन करताना मुक्ताबाईने म्हटले आहे, निवृत्ति आणि ज्ञानेश्वर कोरान्न मागून आणत असत आणि सोपान मुक्ताबाईला सांभाळत असे. पुढे निवृत्तिनाथांनी एकदा मांडे खाण्याची इच्छा व्यक्त केली तो कथाभागही निवृत्ति आणि मुक्ताबाई यांच्यातील नातेसंबंधावर प्रकाश टाकणारा आहे. आणि अगदी शेवटी मुक्ताबाईच्या समाधिप्रसंगी तिचा देह विकल झालेला असताना निवृत्तिनाथांनी तिची केलेली जपणूक ह्यातून त्यांच्यातील बंधू आणि बहिण यांच्यातील हृद्य नात्याचे दर्शन घडते.

बंधू आणि बहिण, सद्‌गुरु आणि सत्शिष्य एवढ्या पुरताच या दोहोंचा नातेसंबंध मर्यादित होता असे दिसत नाही. मुक्ताबाईने आपल्या अधिकाराने धाकली बहिण आणि सत्शिष्य यांची चौकट ओलांडून या तिघाही भावंडांचे मातृत्व संपादन केले आहे असे सखोल विचारातून समजून येते. 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' ही एका सद्‌गुरुची सत्शिष्याकडून असणारी अपेक्षा आणि प्रत्यक्षात तसे घडून आल्यावर त्याचा सद्‌भावाने स्वीकार करण्याचा प्रांजळपणा या दोन्ही गोष्टी निवृत्तिनाथ व मुक्ताबाई यांच्यासंदर्भात जाणवून जातात. यातून निवृत्तिनाथांचे श्रेष्ठत्व जसे सिद्ध होते तसेच मुक्ताबाईचेही कर्तृत्व झळाळून उठते.

निवृत्तिनाथांनी नाथसंप्रदायाची साधना मुक्ताबाईला प्रदान केल्यानंतर

मुक्ताबाईने स्वत:च्या साधनेच्या जोरावर एवढी काही विलक्षण प्रगती करून घेतली की, 'दाता तव मागता' असे निवृत्तिनाथांना म्हणावे लागले. [३] मुक्ताबाई स्वत:च्या साधनेच्या आधारावर अध्यात्माच्या ज्या पायऱ्या चढून गेली होती त्या पायऱ्यांवर अजून त्यांचे सद्गुरुही आरुढ झाले नव्हते आणि पुढील मार्गदर्शनासाठी निवृत्तिनाथ मुक्ताबाईवर विसंबून राहिले होते हा भाग अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वरील विधान आपल्या परंपरागत कल्पनांना धक्का देणारे असल्याने कदाचित धाष्ट्यांचे वाटेल; पण असे घडू शकते असे अध्यात्मशास्त्र सांगते. पुढे दिलेल्या प्रमाणांवरून त्याची खात्रीही पटू शकेल.

मुक्ताबाईचे हे आध्यात्मिक सामर्थ्य व्यक्त झाले ते मुक्ताबाई - गोरक्षनाथ ह्या भेटीच्या माध्यमातून. (ह्या भागाचा सविस्तर विचार 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' या प्रकरणामध्ये केलेला आहेच.) 'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं।' [४] या पद्धतीने मुक्ताबाई - गोरक्षनाथ यांची भेट झाली. तेव्हा पुढील अनुभवांसाठी म्हणून मुक्ताबाई या सर्वांना मार्गदर्शन करू लागली. हा सर्व अनुभव घेत असताना निवृत्तिनाथांना असा प्रश्न पडला की हा अनुभव देणारी मुक्ताबाई जननी तिला वंदन करावे की आपल्या सद्गुरुंना वंदन करावे ? ''तेथे कवणासी नमावे । जननी जनक ते थोर म्हणावे । की जीवेभावे शरण जावे । सद्गुरुला ।।'' [५] तेव्हा मुक्ताबाईने त्यांना अधिकारवाणीने सांगितले की, ''जेथे जनिता जननी स्मरती मनी । ते विसरा कहाणी जन्मदु:ख ।।'' [६]

सद्गुरुने जेव्हा माथा थापटला तेव्हा देहशक्ती हरपून नवी ज्ञानशक्ती उदित झाल्याचा अनुभव मुक्ताबाईला आला. 'थापटोनिया निजहस्ते । दाविले दावी आणिक तेथे । स्फूर्तिचिया अनुमते । मागे घेई ।।' असा अनुभव तेव्हाच निवृत्तिनाथांना आला. परंतु या अनुभवाचा आधार घेऊन पुढे मार्गक्रमण करावे तर 'विराट देऊळात कैसे जावे ।।' [७] असा संदेह निवृत्तिनाथांना निर्माण झाला. कारण या विराट देवळाभोवती उदंड व भयंकर भोवरे असून त्याभोवती सहस्त्रफणीच्या नागेंद्राचा वेढा दिलेला आहे हे त्यांना जाणवत होते. [८] अशा परिस्थितीत नेमके काय करावे ? पुढे जाऊन पुढील अनुभव सोसावा ? की मागे जाऊन सद्गुरुस विचारावे ? या संभ्रमात निवृत्तिनाथ पडले. तेव्हा अशा संभ्रमावस्थेमध्ये मुक्ताबाईने त्यांना मार्गदर्शन केले, पुढे प्रवास करण्याचे धैर्य

त्यांच्यामध्ये बळकट केले असे निवृत्तिनाथ म्हणतात, ‘‘मुक्तधैर्याचे बांधोनि बळ । निवृत्ति मन करावे अचळ ।।’’ [९]

मुक्ताबाईने दिलेल्या धैर्याच्या आधारे निवृत्तिनाथ पुढे वाटचाल करू लागले आणि त्यांनी अगम्याचे राऊळ तत्त्व पाहिले. [१०] या सर्व अनुभवामुळे एक अनुपम्य असे सुख निवृत्तिनाथांच्या अनुभवास आले आणि इथेच त्यांना मुक्ताबाईची योग्यता आकलन झाली. मुक्ताबाईचे हे थोर कर्तृत्व पाहून (की जिच्यामुळे आपण एवढ्या थोर अनुभवाचे ग्रहण करू शकलो) निवृत्तिनाथ मुक्ताबाईसमोर नतमस्तक झाले आणि तिला म्हणाले, ‘‘तेथे माय मी प्रांजळ । उपकार मानी बहु सबळ । बरवे दाविले स्थान विश्रांतीचे ।।’’ [११] मुक्ताबाईने आपल्या या थोर अनुभवामध्ये सर्वांना सहभागी करून घेतले याबद्दलची कृतज्ञताच निवृत्तिनाथांनी येथे व्यक्त केली आहे.

या वरील ओवीमध्ये आलेला ‘माय’ हा उल्लेख महत्त्वपूर्ण आहे. मुक्ताबाई माय, माता, अशा स्वरूपामध्ये निवृत्तिनाथांना प्रतीत झाली.‘‘तेथे मुक्त बुबुळ जडित कोंदणी । निवृत्ती वैराग्याची कुळस्वामिणी । मूळमाया ।।’’ [१२] अशा शब्दात निवृत्तिनाथांनी आपली ही प्रचीती व्यक्त केली आहे. निवृत्ति हा ‘वैराग्याचा महामेरु’ तर त्या ‘वैराग्य कुळाची स्वामिनी’ मुक्ताबाई आहे असा आपला अनुभव निवृत्तिनाथांनी येथे व्यक्त केला आहे. मुक्ताबाईबद्दलची ही कृतज्ञता एकदा व्यक्त करून त्यांचे समाधान होत नाही म्हणून निवृत्तिनाथांनी वेगवेगळ्याप्रकारे ही गोष्ट मांडली आहे. ‘मुक्ताबाई ही मकर कमलाकार आहे तर निवृत्ति येकांताचा परागवर आहे.’ [१३] ‘ज्ञानेश्वराच्या वक्षस्थळावर शोभणारी मोहनमाळ म्हणजे मुक्ताबाई आहे.’ [१४] ‘मुक्ताबाई शाळिग्राम आहे तर तो शाळिग्राम हे निवृत्तिज्ञानेश्वरसोपान यांचे धाम झाले आहे.’ [१५] ‘मुक्ताबाई मनोहर चक्रवर्ती असून निवृत्तिज्ञानादींना तिने सोपी युक्ती दाखविली आहे.’ [१६] अशा प्रकारे निवृत्तिनाथांनी वारंवार मुक्ताबाईबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. मुक्ताबाई आपल्या भावंडांशी असलेल्या सख्यत्वामुळे, त्यांच्याबद्दलच्या जिव्हाळ्यामुळे हा अर्थ प्रसवू लागली आहे, म्हणजेच मुक्ताबाईने त्यांना आलेल्या अनुभवामध्ये सर्वांना सहभागी करून घेतले आहे. मातृत्वाच्या मंगल भावनेतून तिची ही कृती घडली आहे याची

जाणीव निवृत्तिनाथांना येथे झाली आहे आणि मुक्ताबाईचे आईपण, मातारुप त्यांच्या मनावर ठसावले आहे आणि म्हणूनच पुढे या सर्व प्रसंगानंतर इतर तिन्ही भावंडे मुक्ताबाईला 'माय' असे संबोधताना दिसतात.

मुक्ताबाईने दिलेल्या या अनुभवाचा संदर्भ मनात असल्यामुळे पुढे निवृत्तिनाथांनी तिच्याबद्दल काढलेले उद्गार लक्षात घेण्याजोगे आहेत.

''गहिनीनाथे मज सांगितले सार । केली ज्ञानेश्वरे व्याख्या त्याची ।
काढिला शोधून अनुभव मुक्ताईने । ते ज्ञान सोपाने संपादिले ।।'' [१७]

यातील 'काढिला शोधून अनुभव मुक्ताईने' या विधानाचा खरा अर्थ आता नीट उमगू शकेल.

या अनुभवाचा आधार असल्यामुळे निवृत्तिनाथ हे वास्तविक 'ज्ञानदाते' असूनही मुक्ताबाईजवळ 'ज्ञानमागते' झाले असल्याचे लक्षात येते. मुक्ताबाईच्या आध्यात्मिक अधिकाराची ओळख पटलेले निवृत्तिनाथ आता आपल्या शंकांचे निरसन मुक्ताबाईकडून करून घेताना दिसतात. ब्रह्म आणि मायेचा विस्तार यासंबंधीच्या निवृत्तिनाथांच्या मनातील शंका त्यांनी मुक्ताबाईला विचारलेल्या दिसतात. ज्ञानबोध ग्रंथात हा भाग आला आहे.

परंतु 'ज्ञानबोध ग्रंथ : एक अपूर्व उपलब्धी' या प्रकरणात आपण पुढे त्याचा सविस्तर विचार करणार असल्याने त्याची पुनरुक्ती येथे टाळली आहे.

या सर्व संवादांचा अभ्यास केला असता एक गोष्ट जाणवते की, गुरुशिष्य नात्यातील आदरयुक्त दुरावा दूर होऊन माता आणि बालक किंवा दोन गुरुबंधू यांच्यात असणारे सख्यत्व निवृत्ति आणि मुक्ताबाई यांच्यात प्रस्थापित झाले आहे. त्यांच्यामध्ये वारंवार होणाऱ्या अशा चर्चा मनात आठवूनच निवृत्तिनाथ मुक्ताबाईच्या समाधिनंतर व्याकुळ होऊन म्हणतात, ''ऐकावा हा अर्थ मुक्ताईच्या मुखी । आता ऐसी सखी नाही कोणी ।।'' [१८]

मुक्ताबाईच्या जाण्याने देहाआधी जणू प्राण जावा अशी निवृत्तिनाथांची अवस्था झाली आहे. तिची आठवण काढून ते म्हणतात,

''अविट बोलणे बोलावे अनादि । जे गुह्य वेदी सापडेना ।
कीर्ति वैराग्य केले सामराज्य । गुरुत्वासी लाज नाही आली ।
नाशिवंत शरीर केले अविनाश । घडविला विलास अध्यात्माचा ।

अविट बोलणी आठवती मनी । आता त्रिभुवनी दिसेनात ।।'' [१९]

मुक्ताबाईच्या समाधिनंतर विकल झालेले निवृत्तिनाथ नंतर थोड्याच दिवसांनी स्वत:ही समाधि स्वीकारतात. तिघा भावंडांच्या दृष्टीने मुक्ताबाईचे स्थान अभिव्यक्त करणारा निवृत्तिनाथांचा अभंग आपल्या मनाच्या गाभाऱ्यामध्ये घुमत राहतो.

''त्रिवेणीचा ओघ जैसा एकेठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
ब्रह्माविष्णुहर जैसे एकेठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
रज तम गुण सत्व गुणाठायी । तैसी मुक्ताबाई आम्हामध्ये ।
भूचरी खेचरी चाचरी ते पाही । अगोचरी ठायी मुक्तगंगा ।।'' [२०]

**

# ज्ञानराज ओवाळी अहो मुक्ताबाई
## (मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर अनुबंध)

मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांच्या अनुबंधामध्ये एक विलक्षण अशी हृद्यता आहे. वडील-बंधु आणि पाठची बहीण, गुरुबंधु-भगिनी आणि माताबालक या नातेसंबंधातून या दोघांमधील नात्याचा वेध घ्यावा लागतो. त्या दोघांमधील नात्याला अनेक पदर प्राप्त झाले आहेत आणि काळानुसार त्या नातेसंबंधांमध्ये एक विकसितपणा, परिपक्वता आलेली आहे.

बहीणभाऊ या लौकिक नात्याला काळाच्या ओघात लवकरच एक नवीन स्तर प्राप्त झाला. अध्यात्माच्या अलौकिक क्षेत्रामध्येही मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांच्यामध्ये गुरुबंधु-भगिनी असे हृद्य व प्रगल्भ नाते निर्माण झाले. या दुहेरी संबंधांमुळे लौकिक स्तरावरील नात्यामध्ये अधिक सघनता आली तर अलौकिक स्तरावरील नात्यामध्ये विलक्षण असा प्रेमा आला. ज्ञानेश्वरांनी 'मुक्ताबाईस दिलेली सनद' यामध्ये या नात्यातील गोडवा अनुभवास येतो.

अध्यात्ममार्गावरील सहप्रवासी या नात्याने दोन गुरुबंधूमध्ये विलक्षण असे सख्यत्व असते. सद्‌गुरु एका उच्च स्तरावर कायम आरुढ असल्याने त्यांना एकदम काही शंका विचारण्यापेक्षा आपल्यापेक्षा अधिक प्रगत अशा गुरुबंधूकडून शंका निरसन करून घेणे हे नेहमीच अधिक सोयीस्कर ठरत असते. तसाच काहीसा प्रकार मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांच्यामध्ये घडलेला दिसतो.

''इंद्रिया वेगळा, मनबुद्धि निराळा । सर्वात व्यापिला कळे कैसा ।
मुक्ताबाई म्हणे कैसे ज्ञानराजा । संदेह हा माझा फेडोनिया ।।'' [१]

असे तत्त्वज्ञान आणि साधना यासंबंधीचे प्रश्न मुक्ताबाईने विचारावेत आणि ''ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । सद्‌गुरुचे ठायी मन ठेवी ।।'' [२] अशा प्रकारे ज्ञानेश्वरांनी तिच्या शंकांचे निरसन करावे असे या प्रकरणग्रंथाचे स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांनी जो जो भाग मुक्ताबाईस निवेदन करावा तो तो भाग प्रत्यक्ष साधनेमध्ये तिच्या अनुभवास येत असावा असे वाटावे असे हे सारे वर्णन आहे.

ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्या नात्यातील लडिवाळपणाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणता येईल असा एक भाग म्हणजे मुक्ताबाईकृत 'ताटीचे

अभंग.' पोकळ शब्दपांडित्याचा बडिवार पाहून रुष्ट झालेले ज्ञानेश्वर जेव्हा ज्ञानाची कवाडे बंद करून, स्वत:च्या आत्मस्थितीतच निमग्न राहू लागले तेव्हा मुक्ताबाईने हळुवारपणे पण अधिकारवाणीने ज्ञानदेवांची समजूत घातली. मुक्ताबाईचे म्हणणे मान्य झालेले ज्ञानेश्वर स्वत:च्या आत्ममग्न अवस्थेच्या परिघातून बाहेर पडून पुन्हा समाजाभिमुख झाले; यातून मुक्ताबाईची थोरवी दिसून येते.

'विरालीसे शक्ती झालीसे निवृत्ति । झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई ।।' [३] याची जाणीव ज्ञानेश्वरांनाही झालेली दिसते. आणि म्हणून तिच्या या अवस्थेबद्दलचे समाधान ज्ञानेश्वरांनी पुढील शब्दात व्यक्त केले, ''आठवे समाधिचे अंग आले तुज । आता नाही काज आणिकांसी ।।'' [४] ज्ञानेश्वरांसारख्या महायोग्याने 'झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई' असा उल्लेख करावा यापरते आणखी भाग्य ते काय असणार ? आणि यापरते दुसरे कौतुक ते काय असणार ?

मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर यांचे चित्त परस्परांशी कसे विलक्षणरीतीने समरस झाले असावे याचे एक उदाहरण येथे जरुर लक्षात घेण्याजोगे आहे. चांगदेवाची भ्रांती दूर व्हावी या हेतूने ज्ञानेश्वरांनी त्यांना उद्देशून 'चांगदेवपासष्टी' या ग्रंथाची निर्मिती केली. त्याचा अर्थ लक्षात न आलेले चांगदेव ज्ञानदेवांना शरण आले तेव्हा त्यांनी चांगदेवांना मुक्ताबाईकडे सोपविले आणि 'लेवविला सर्वांगी पासष्टीचा अर्थ । होऊनि कृतार्थ ठेला पायी ।।' [५] अशी अवस्था चांगदेवांची मुक्ताबाईकृपेने झाली. पासष्टीचा अर्थ मुक्ताबाईकडून समजावून घ्यावा असे ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना सुचविणे ही गोष्टच विलक्षण बोलकी आहे.

'ज्ञानराज'च्या मुक्ताई विशेषांकामध्ये डॉ.सुशीला पाटील यांनी एक चांगला प्रश्न उपस्थित केला होता. तो आधी विचारात घेणे येथे जरुरीचे आहे. ''नामदेव, चांगदेव यांनी अभंगातून तिच्याबद्दल कृतज्ञता तरी व्यक्त केली, पण तिची भावंडे निवृत्तिनाथांनी चांगदेवास उपदेश कर एवढे फक्त तिला म्हणाले. बाकी ज्ञानदेवादींच्या शब्दात अशी समर्थ बहीण लाभल्याबद्दलची कृतार्थता दिसत नाही. कुठेही तिच्याबद्दल कौतुकाचे उद्गार नाहीत. गुरु

निवृत्तिनाथांबद्दलचा आदर ज्ञानदेवांनी भरभरुन व्यक्त केला आहे पण मुक्ताईबद्दल ज्ञानदेवांनी कुठे अवाक्षर काढलेले नाही. ती वयाने लहान म्हणून निवृत्तिनाथांप्रमाणे तिला वंदन नसले तरी कुठेतरी तिच्याबद्दल चार कोडकौतुकाचे शब्द का नसावे ? ज्ञानियांच्या राजाकडून मुक्ताईची अशी उपेक्षा का ? ती अनुल्लेखित का ?'' [६] हा तो प्रश्न होय.

डॉ.पाटील यांचा हा प्रश्न लक्षात घेऊन ज्ञानदेवगाथेचे जेव्हा वाचन केले तेव्हा त्यांच्या या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता येईल असे अभंग आढळून आले. एक तर असे की, ज्ञानेश्वरांनी निवृत्तिनाथांचा जो वारंवार उल्लेख केला आहे तो सद्‌गुरु या स्वरूपात केलेला आहे. ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांबद्दल बंधु या भूमिकेतून फारसा उल्लेख कधी करत नाहीत ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. आणखी एक गोष्ट याबाबतीत जाणवते ती अशी की, ज्ञानेश्वरांच्या अभंगांमधून त्यांच्या सभोवती वावरणारी संतमंडळी, त्यांचे नामोल्लेख, त्यांचा तपशील या गोष्टी येत नाहीत. कोणत्याही व्यक्तिमत्त्वापेक्षा ते त्या व्यक्तीमधील जीवाच्या अवस्थेला अधिक सामोरे जाताना दिसतात आणि म्हणून कदाचित त्यांच्या अभंगातून कोणत्याही व्यक्तीच्या नामोल्लेखाला महत्त्व दिलेले आढळत नाही. (याउलट, निवृत्तिनाथांच्या अभंगांमधून मात्र, त्यांच्या सभोवार वावरणाऱ्या व्यक्तींचे स्पष्ट नामोल्लेख आढळतात.) यादृष्टीने मुक्ताबाईच्या नावाचा उल्लेख न होणे ही गोष्टही ज्ञानेश्वरांच्या प्रकृतिधर्मानुसार स्वाभाविकच म्हणावी लागेल. मुक्ताबाईचा उल्लेख त्यांच्या अभंगांमध्ये न येण्याचे आणखीही एक महत्त्वाचे कारण आहे. ते असे,

गोरक्षनाथांच्या आशीर्वादाने मुक्ताबाईचा आध्यात्मिक स्तर उंचावला. हा सूक्ष्म बदल निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपानदेव यांच्या जाणीवेलाही संवेदित झाला. मुक्ताबाईची ही बदललेली अवस्था लक्षात घेऊन ज्ञानदेव कृतज्ञतापूर्वक म्हणाले, ''मुक्त प्रवाहाची नाव । निवृत्ती अवल्या सद्‌गुरुराव । सोपान वरी ज्ञानदेव । पार जाले ।।'' [७] ज्या ज्ञानेश्वरांकडून एके काळी ज्ञानग्रहण केले त्या ज्ञानेश्वरांच्याही पुढे मुक्ताबाई या प्रसंगाने निघून गेलेली दिसते आणि म्हणूनच ज्ञानेश्वर येथे मुक्ताबाईची मुक्तमनाने स्तुती करताना आढळतात.

या प्रसंगानंतर निवृत्ति, ज्ञानदेव या सर्वांनीच मुक्ताबाईला 'माय' या

भूमिकेतून पाहिले असल्याचे लक्षात येते. 'ऐसा हा संसार मायेने वेष्टिला । म्हणूनि दुरावला योगेश्वरा ।। ज्ञानदेव म्हणे या अर्थाची सोय । धरी माझी माय मुक्ताबाई ।।' [८] यासारख्या ज्ञानदेवकृत अभंगांमधून याचा स्पष्ट दाखलाही मिळतो. 'जिये मानिजे ऐसे नाही आमुते । सांगो कोणाते तुजवाचूनी । देठीहुनी सुटले जीवनासी आले । बापरखुमादेविवरे ऐसे केले गे माये ।।' [९] यासारख्या असंख्य अभंगांमधून ज्ञानेश्वर मुक्ताबाईला आपला अनुभव कथन करतात. आणि तेही 'सांगो कोणाते तुजवाचोनि' अशा एकनिष्ठ भावनेतून ! आपले सर्व उच्च पारमार्थिक अनुभव ज्ञानेश्वरमहाराज एकाच वेळी सखी आणि माय असलेल्या अशा मुक्ताबाईला कथन करताना दिसतात.

'अनुभव खूण मी बोले साजणी । निरंजनी अंजन लेईले अंजनी ।।' [१०] अशासारख्या ज्ञानदेवकृत अभंगांमधून मुक्ताबाई साजणी या भूमिकेतही आपल्याला पाहावयास मिळते. साजणी, सखी, माता या अनेकविध भूमिकांमधून ज्ञानेश्वरांच्या अभंगांमध्ये वारंवार डोकावते ती मुक्ताबाईच.

''निवृत्ती उफराट । पत्रिका करुनि उलटी । ज्ञानिया समसाठी । अंबर भरि गे माये ।।'' [११] या 'कल्याणपत्रिके'मध्ये वारंवार आलेल्या 'माय' या संबोधनावरुनही असे ग्रंथ लिहित असताना ज्ञानेश्वरांच्या नजरेसमोर मुक्ताबाई असावी असे लक्षात येते. तत्त्वज्ञान आणि साधना, त्यातील येणारे अनुभव यावर दोघांमध्ये वारंवार चर्चा होत असाव्यात असे अनेक उल्लेखांवरून लक्षात येते.

मुक्ताबाईने जी खूण तुला दाखविली आहे, जी सोय तुला दाखविली आहे ती सत्य आहे असा आपला अभिप्रायही ज्ञानदेवांनी एका शिष्याजवळ व्यक्त केलेला दिसतो. ''ज्ञानदेव म्हणे भली मुक्ताबाई । दाखविली सोयी साची असे ।।'' [१२] असे उद्गार ज्ञानदेवांनी याबाबत काढलेले दिसतात. मुक्ताबाईच्या ज्ञानाधिकाराचा सार्थ अभिमानच ज्ञानदेवांच्या बोलण्यातून प्रतीत होत नाही का ?

ज्ञानेश्वर मुक्ताबाई या भावंडांचे वागणे, बोलणे सममेळ आहे असे वरील सर्व विवेचनावरुन लक्षात येते. परंतु म्हणून दोघांमध्ये काही बाबतीत मतभेद झालेच नसतील असेही समजण्याचेही काही कारण नाही. तीर्थयात्रेच्या मुद्दयावरून कदाचित दोघांमध्ये मतभिन्नता असावी असे मुक्ताबाईच्या पुढील अभंगावरून वाटते; ''अष्टोत्तरशते तीर्थे जयाच्या भीतरी । तो तुझे अंतरी

आत्माराम ।।'' [१३] अशा शब्दात आपली प्रतिक्रिया मुक्ताबाईने येथे नोंदविलेली दिसते. ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रेला जाणे कदाचित मुक्ताबाईस मान्य नसावे की काय असे यावरून वाटते. ज्ञानेश्वरांबरोबर तीर्थयात्रेला न जाता, मुक्ताबाई मात्र मागे राहिली असावी असे नामदेवगाथ्यावरून दिसते. ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई येथे आयुष्यात प्रथमच एकमेकांपासून दीर्घकाळ दूर असे वास्तव्य करीत असल्याचे येथे लक्षात येते. पण मतभिन्नता आली म्हणून मनभेद झाला असे मात्र दोघांच्याबाबतीत घडले नाही. ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्या अभंगांचा तौलनिक विचार केला तर त्यातील भावसमरसता पाहून मन थक्क होते.

असे आणि एवढे सख्यत्व असणाऱ्या मुक्ताबाईला ज्ञानेश्वरांच्या समाधिचा निर्णय ऐकून काय वाटले असावे याची कल्पनादेखील करता येत नाही. ज्ञानेश्वरांचा समाधिचा निर्णय ऐकून मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना म्हणाली, ''मज विठोबासी निरवा । मजवरी लोभ असो द्यावा ।।'' [१४] ज्ञानेश्वरांवाचून जीवन कंठण्याचा विचार असह्य झालेली मुक्ताबाई येथे स्वत:चा लीन होण्याचा विचार लगेचच बोलून दाखविताना दिसते. ज्ञानेश्वर समाधिस्थ होणार या विचाराने मुक्ताबाई सोपान यांच्या मनात गतकाळातील स्मृती जाग्या झाल्या आणि आठवणीने उमाळा दाटून आला. ''आम्हा माता पिता नित्य ज्ञानेश्वर । नाही आता थार विश्रांतीसी ।।'' [१५] असे म्हणत मुक्ताबाई, सोपान स्फुंदू लागले. पांडुरंगानेच मग त्या सर्वांचे सांत्वन केले. मुक्ताबाईने आपला शोक आवरला. या प्रसंगाच्या निमित्ताने काही प्रबोधन करावे अशी विनंती तिने देवाला केली तेव्हा 'देव म्हणे तुज येणे जाणे नाही । अनुभवोनी पाही जीवन्मुक्ती ।।' असे पांडुरंगाने तिला सांगितले. मुक्ताबाई याप्रसंगी विलक्षण धैर्य बाळगून वावरताना दिसते.''म्हणे मुक्ताबाई सख्या ज्ञानेश्वरा । प्रार्थना तुम्ही करा देवालागी ।।'' [१६] असे ती ज्ञानेश्वरांना सुचविते. ज्ञानेश्वरसमाधिच्या वेळेपर्यंत तिने मनावर घातलेला संयमाचा बांध त्यांच्या समाधिनंतर मात्र सुटला. ''सोपान मुक्ताई सांडिती शरीरा ।।'' [१७] असे नामदेवांनी मुक्ताबाईच्या या अवस्थेचे वर्णन केले आहे.

ज्ञानेश्वरांच्या वियोगाने मुक्ताबाईच्या जीवाची कशी तगमग होत असेल याचे दर्शन एका अभंगामध्ये घडते, तो अभंग असा –

'आवेगे ज्ञानजननी ज्ञाना आईगे । ज्ञाननाथेगे ज्ञाने कामधेनु तू माझीये गे ।
ज्ञानाई तू माय माझीगे । ज्ञानाई तू बाप माझागे ।।
ज्ञानाई गुरुदेव ज्ञान ध्यान । साधन परत्रपावन ।
इह तुज वाचून आन मज कोण गे । बाई नुपेक्षीगे ज्ञानबहिणी ।।
राऊळीचे कऱ्हे हारपले हाटी । माणूसप्रति झाडा घेताती वोठी ।।' [१८]

ज्ञानेश्वरांच्या समाधिनंतर देहरक्षणाविषयी उदास होत जाणारी मुक्ताबाई थोड्याच कालावधीनंतर देह विसर्जित करती झाली. तरीही अभंगरुपाने ती आजही या भूलोकामध्ये शिल्लक उरली आणि या गोष्टीसाठी आपल्याला पुन्हा ज्ञानेश्वरांकडेच कृतज्ञतेने वळावे लागले. कारण मुक्ताबाईच्या अभंगांचे श्रेष्ठत्व ज्ञानदेवांनी ओळखले आणि त्यांनी ते स्वत: उतरवून ठेवले म्हणूनच तुम्हाआम्हाला आजही मुक्ताबाईच्या अभंगरुपाची प्रचिती येते. 'निवृत्तीचे बोल लिहिले सोपाने । मुक्ताईची वचने ज्ञानदेवे ।।' [१९] असा यासंबंधीचा स्पष्ट खुलासा संत जनाबाईने करुन ठेवला आहे. ज्ञानियांच्या योग्याने स्वत: जे अभंग उतरवून ठेवले त्याची योग्यता शब्दात वर्णन तरी कशी करणार ?

ज्ञानेश्वरांना मुक्ताईबद्दल किती पराकोटीचा आदरभाव होता, मुक्ताबाईकडे पाहण्याची त्यांची भूमिका कोणती होती हे त्यांच्या एका आरतीतून लक्षात येते. ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईची आरती केली आहे ही बाबच आश्चर्यचकित करणारी आहे. तेव्हा ज्ञानेश्वरांच्या शब्दातूनच मुक्ताबाईची योग्यता आपल्या मनात ठसवावी हेच अधिक उत्तम नाही का ? ज्ञानेश्वर आपल्या एका अभंगात मुक्ताबाईबद्दल असे म्हणतात,

''अहो मुक्ताबाई तू ब्रह्मीचे अंजन । तुझेचि प्रसादे सद्गुरु निधान ।
तुज आणि निवृत्ती नाही भिन्नता । तेचि तू आरती सारजामाता ।
मुक्ताई मुक्तकृपा हे परब्रह्मीची माया । जे अव्यक्तरुप ते तू पाहे चांगया ।
हा जडदेह मिरविसी काया । परतुनी पाहता तुझा तूचि विलया ।
सद्गुरुपरते आनु दैवत नाही । लागले लय लक्ष चांगया पाही ।
देहीच विदेहीबोलणे काही । ज्ञानराज ओवाळी अहो मुक्ताबाई ।।'' [२०]

**

# सोपानदेवास कृपा तिची

## (मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील अनुबंध)

निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई ही चारही भावंडे, त्यांचे वागणे बोलणे सममेळ होते. परंतु त्यातही मुक्ताबाईचे विशेष भावबंध जुळले ते ज्ञानेश्वरांशी. निवृत्तिनाथांशी सद्गुरु म्हणून आध्यात्मिक स्वरुपाचे नाते होतेच. आता मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील अनुबंधाचा वेध घ्यावयाचा आहे.

मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील संबंधाचा वेध घेणे हे तसे अवघडच काम आहे. कारण असे की मुक्ताबाई आणि सोपानदेव हे दोघेही जण एकमेकांबद्दल फारसे काही बोलत नाहीत.'तात आणि माय गेलीसे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा ।। निवृत्ती ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मजलागी ।।' [१] एवढाच उल्लेख मुक्ताबाई सोपानदेवांबद्दल करताना दिसते. यापलीकडे त्यांचा कोणताही उल्लेख तिच्या अभंगांमध्ये येत नाही.

शिवदिनकेसरींनी मात्र आपल्या 'ज्ञानप्रदीप' या ग्रंथामध्ये मुक्ताबाईचा शिष्य म्हणून सोपानदेवांचा उल्लेख केला आहे. तो अभंग मूळातूनच पाहू.

'पूर्वजन्मि मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस ।
पुन्हा ज्ञानजन्मि सरस । सोपानदेवास कृपा तिची ।।' [२]

या ठिकाणी पुढे 'दुजा शिष्य मुक्ताईचा । नाम विसोबा खेचर साचा ।।' असा उल्लेख आहे. तेव्हा सोपानदेव हेच मुक्ताबाईचे प्रथम शिष्य होत असे शिवदिनकेसरींना म्हणावयाचे असावे हे उघड आहे. परंतु याला नेमका कोणता आधार शिवदिनकेसरींनी घेतला आहे हे मात्र सांगितलेले नाही. वास्तविक सोपानदेव हे मुक्ताबाईचे शिष्य असतील तर तसा उल्लेख सोपानदेवांच्या अभंगांमध्येही यावयास हवा. पण मुक्ताबाई आपली सद्गुरु असल्याचे वर्णन सोपानदेवांच्या अभंगांमध्ये येत नाही. सकलसंतगाथेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या सोपानदेवांच्या अभंगांमध्ये एकदाही मुक्ताबाईचा साधा नामोल्लेखही येत नाही. तेव्हा सोपान व मुक्ताबाई यांच्या नातेसंबंधाबद्दल बोलत असताना आपल्याला सोपानदेवांच्या प्रकाशित गाथ्यावर विसंबून राहता येत नाही. 'मुमुक्षू'च्या अंकामध्ये ज्ञानेश्वरमंडळाचे अप्रसिद्ध अभंग समाविष्ट करण्यात

आले होते त्यामध्ये काही धागेदोरे सापडतात ते पाहू.

या सर्वच अभंगांना मुक्ताबाई - गोरक्षनाथ भेटीची जबरदस्त पार्श्वभूमी आहे. मुक्ताबाई ही आदिमाया आहे याची सुस्पष्ट जाण या प्रसंगामुळे सोपानदेवांना आलेली आहे. ते म्हणतात,

''ते निराकाराची जीवनकळा। ते साठवून असे मी निर्गुणजळा ।
सूर्या ऐसीच ज्वाळा । शीतळ बहू ।।
ते झळक चिदानंदाची वोतली । वेदश्रुतीची भूषणे ल्याली ।
अनाम अरुपाची माऊली । आदिमाऊली ।।'' [३]

तसेच मुक्तगंगा निर्विकार, हे मुक्ताईच्या मौन्य मुद्रा, मुक्त वैराग्य लखलखीत, मुक्त अंजन देखणी, मुक्तगंगा निर्विकार, मुक्ति ज्ञान समाधि कौतुक, मुक्तप्रभावळ, निवृत्ति सार जवळ, हे मुक्ताबाईबद्दल सोपानदेवांनी काढलेले उद्गार आहेत. असा मुक्ताबाईसंबंधी वारंवार केलेला उल्लेख सोपानदेवकृत अप्रसिद्ध अभंगांमध्ये आढळून येतो. मुक्ताबाईची स्वभाववैशिष्ट्ये, तिचे वागणेबोलणे यासंबंधी काही वैशिष्ट्ये सोपानदेवांनी काढलेल्या या उद्गारांमधून सहजच अधोरेखित होतात. मुक्ताबाई निर्विकार असून ती मौनमुद्रा धारण करून असते. तिचे वैराग्य लखलखीत आहे. तिची स्वतंत्र अशी प्रभावळ आहे, तसेच समाधिस्थ लेणे दाखवून देणारी ती अंजन आहे अशा स्वरूपात ही वैशिष्ट्ये येथे दृगोचर होतात. या सर्वातून सोपानदेवांचा मुक्ताबाईबद्दलचा आदरभावच व्यक्त होत आहे.

सोपानदेवांनी केलेल्या आरतीमध्ये मुक्ताबाईबद्दल कोणता उद्गार सापडतो तो पाहणेही उद्बोधक ठरावे. ''संतांची साऊली । अनाथाची माऊली । स्वर्ग मृत्यू तिन्ही ताळे उतरली । स्वर्गद्वार उघडोनि ते हे भारता आली । तेचि ज्ञानज्योती मुक्ताई माऊली ।।'' [४]

पुढे एका प्रसंगी सगुणाचे महत्त्व सोपानदेवांनी विसोबांना पटवून दिले. मुक्ताबाई, ज्ञानेश्वराशिवाय हा आनंदाचा अनुभव तुम्हाला मिळाला नसता हेही सोपानदेवांनी त्यांना स्पष्टपणे सांगितले. ''मुक्त ज्ञानेविण तुम्हा कवण आनंद । बाप निवृत्ती राजेविण लटकेच स्फुंदा ।।'' [५] या शब्दात सोपानदेवांनी एकप्रकारे मुक्ताबाईचा गौरवच केला आहे.

विसोबा खेचरांपाशी जसा मुक्ताबाईबद्दल आदर सोपानदेवांनी व्यक्त केला तसा चांगदेवांपाशीही व्यक्त केला आहे. ‘‘कर्दळी बनीहुनी मात आली लवलाह्या । ऐक्य सुख तुज केले रे चांगया । दृष्टादृष्टी भेटी गेलीरे विलया । क्षणभरी न विसंबे अरे तया ।।’’ [६] मुक्ताबाईसारखी व्यक्ती तुला क्षणभरसुद्धा दूर करत नाही तेव्हा तू किती भाग्यवान आहेस असे सोपानदेव चांगदेवांना उद्‌देशून म्हणत आहेत. ‘‘नामदेव चांगदेव तप्तीचे तीर । पूर्ण वोघ वाहे अमृतनीर । मध्यभागी शोभे देव वटेश्वर । धन्य वो मुक्ताई तुझा अवतार ।।’’ [७] या शब्दामध्ये मुक्ताबाईबद्‌दल धन्योद्‌गारही काढलेले दिसतात. पुढे सोपानदेवांच्या समाधिच्यावेळी निवृत्तिनाथ खंतावलेले पाहून सोपानदेव त्यांना सांगतात की ‘‘मुक्ताई सखी तुम्हापाशी ।।’’ [८] मुक्ताबाई निवृत्तिनाथांपाशी असल्याने एक प्रकारचा दिलासाच सोपानदेवांना मिळाला आहे. त्यामुळे ते स्वत: एक प्रकारे निश्चिंत आहेत असा भाव वरील उद्‌गारातून प्रतिबिंबित झाला असल्याचे लक्षात येते. परंतु वरील त्रुटित अशा उल्लेखांच्या पलीकडे सोपानदेव व मुक्ताबाई यातील भावबंध फारसा उलगडत नाही. या नात्याचा पुरेसा वेध घेता येत नाही याची खंत एकप्रकारे आपल्या मनात बोचत राहते.

✻✻

# मुक्ताईने बोध खेचरासी केला

## (मुक्ताबाई आणि विसोबा खेचर यांच्यातील अनुबंध)

मुक्ताबाई आणि विसोबा खेचर यांच्यातील अनुबंध तपासून पाहण्यापूर्वी विसोबा खेचर यांच्या चरित्रासंबंधी उपलब्ध माहिती लक्षात घेणे गरजेचे आहे.

ज्ञानदेवांनी 'परता सर' अशी आज्ञा विसोबांना केली. ती आज्ञा हाच गुरुपदेश आहे असे मानून विसोबा चहुवाचातीत अवस्थेत जाऊन पोहोचले. ह्या अर्थाने ज्ञानदेव हे विसोबांचे सद्गुरु ठरतात. 'मग खेचरु म्हणे मज ज्ञान हेचि गुरु ।' [१] असा उल्लेख स्वत: विसोबांनी केलेला आढळतो. तसेच 'महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ।।' किंवा 'अलंकापुरी राहिली । श्रीगरु ज्ञानाई माऊली ।।' [२] यासारख्या विसोबाकृत गणल्या जाणाऱ्या अभंगामध्येही सद्गुरु म्हणून ज्ञानदेवांचा उल्लेख केलेला आढळतो.

आता मुक्ताबाईसंदर्भात विचार करु. 'मुक्ताईने बोध खेचरासी केला। तेणे नामयाला बोधियेले ।।' [३] अशीही एक पारंपरिक नोंद आहे. तसेच 'ऐशी निद्रा तुज लागोरे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रा ।।' [४] या चांगदेवकृत अभंगामध्येही मुक्ताबाईने खेचराला उपदेश केल्याचा स्पष्ट उल्लेख येतो. त्यामुळे विसोबांचे गुरु ज्ञानेश्वर की मुक्ताबाई की सोपानदेव ? असा गहन प्रश्न अभ्यासकांना पडलेला दिसतो. त्याचा उलगडा एका ठिकाणी असा केलेला आढळतो की, ''ज्ञानदेव मंडळाशी चांगदेव आणि त्यांचे सर्व शिष्य-प्रशिष्य मंडळ संबंधित झाल्यावर विसोबांनी, त्या एकाहून एक विलक्षण पात्रतेच्या भावंडांविषयी अत्यंत भक्तीने आपल्या भावना व्यक्त केल्या, त्यांना आपल्या सद्गुरुच्या बरोबरीचे स्थान देऊन गौरविले. जर असे नसते, तर गुरु म्हणून कोणा तरी एकाच व्यक्तीचा उल्लेख केला गेला असता. तीनही भावंडांना गुरु म्हणून संबोधले नसते.'' [५]

प्रस्तुत संशोधिकेचे मत यापेक्षा निराळे आहे. पुढील विवेचनाच्या आधारे विसोबांच्या अनेक गुरुत्वाचा उलगडा होऊ शकेल असे वाटते. नेमके सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, ज्ञानेश्वर हेच विसोबांचे दीक्षागुरु

होते. मात्र विशेष स्वरूपाचे ज्ञान त्यांनी मुक्ताबाईकडून प्राप्त करून घेतले. त्या ज्ञानाच्या आधारावर ते स्वत: इतक्या उन्नत अवस्थेला जाऊन पोहोचले की सगुणाची आवश्यकता एवढेच काय पण त्याचे महत्त्वही त्यांना वाटेनासे झाले. तेव्हा उच्च पदावर जाऊनही, निर्गुण निराकाराचा साक्षात्कार होऊनही सगुण साकाराची आवश्यकता सोपानदेवांनी विसोबा खेचरांना पटवून दिली आणि त्यामुळे सोपानदेवांची आरती विसोबा खेचर करताना दिसतात. आता या साऱ्या स्पष्टीकरणाला आधार कोणता असा प्रश्न ओघानेच निर्माण होईल. त्याचा विचार आता आपण करू.

नामदेवांची मुक्ताबाईने जी परीक्षा करवली त्या परीक्षेच्या वेळी म्हणजे मुक्ताबाई – गोरक्ष भेटीच्या वेळी विसोबा खेचर तेथे उपस्थित असावेत असे दिसते. नामदेवांनी संतांचा केलेला अवमान, त्यांची झालेली परीक्षा, वैराग्य कसोटीवर उतरु न शकलेले नामदेव या साऱ्याची माहिती विसोबांना आहे आणि त्या सर्व गोष्टींना अनुरुप विसोबा नामदेवांना उपदेश करतात हे सहज लक्षात येते. ''संतसमुदाय मिळती जेथे जेथे । जाय तेथे तेथे लोटांगणी ।।'' [६] ''वैराग्य दृढ होई निरुता । कासया भितोसी चपेट खाता ।।'' [७] यासारखे विसोबांचे उद्‌गार ही गोष्ट स्पष्ट करतात.

मुक्ताबाईने दिलेल्या अनुभवामुळे विसोबा खेचर सिद्‌धदशेप्रत जाऊन पोहोचले असा स्पष्ट उल्लेखही नामदेवगाथेमध्ये येतो. मुक्ताबाईच्या समाधिनंतर निवृत्तिनाथ तिच्या आठवणीने व्याकुळ होऊन म्हणतात, ''काढिला शोधून अनुभव मुक्ताईने । ... विसोबा खेचर सिद्ध झाला ।।'' [८]

यामुळे असा अंदाज करता येतो की, विसोबा खेचर मुक्ताबाई – गोरक्ष भेटीच्या वेळी उपस्थित असावेत. याच वेळी खेचरही मुक्ताबाईला काही विचारु पाहात आहेत. ते काय याचा विचार करू.

'आहे आहे म्हणून पाहो गेलो । काही नाही ते पाहूनि आलो ।
कोठे गेलो कोठे धाविन्नलो । कोठे नाही ते पाहूनि आलो ।
खेचरविसा म्हणे मुक्ताबाई । काही नाही ते दाऊनि देई ।।' [९]

गोरक्षनाथ की ज्यांची अव्यक्त स्वरूपात भेट मुक्ताबाई घेऊ शकत आहेत, ते रुप आपणासही दिसावे अशी खेचरांची इच्छा येथे व्यक्त झाली आहे. त्यांनी पुष्कळ

प्रयत्न केला परंतु ते रूप दिसले नाही, तेव्हा ते दाखवावे अशी विनवणी खेचर मुक्ताबाईला करत आहेत. त्यावर मुक्ताबाईने उत्तर दिले,

‘‘आता सांगू मी सांगू मी काय । सांगू जात परी दाविता नये ।
दुजेपण पाहता काहीच न दिसे । उपमेचे भाषे काही न भाषे ।
मुक्ताई म्हणे विसोबा खेचर । मी तू नाही तेथे कैचा दुसरा ।।’’ [१०]

मुक्ताबाईच्या या उत्तराने विसोबा खेचरांचा प्रश्न मावळला. ‘मी तू नाही’ या अवस्थेत स्वत: खेचर निघून गेले. त्यांचा हा अनुभव नेमका पुढे एका आरतीमध्ये आलेला आहे.

‘आत्मज्ञान बोध जाले निर्माण । मुक्ताबाई वटेश्वर तेथे कैचे चांगपण ।।’ [११]

विसोबा खेचरांनी अव्यक्तरुपाला उद्देशून केलेल्या आरतीमध्ये वरील उद्‌गार आलेले आहेत.

निर्गुण निराकाराच्या साक्षात्कारामुळे विसोबा खेचर सगुणाचे महत्त्व नाकारु पाहतात तेव्हा सोपानदेवांनी त्यांना योग्य ती समज दिली आहे. ‘‘मृत्तिकेचेनि घटेविण केवी गंगाजळ स्थिर । तैसे देहाविण ज्ञान असार ।। मुक्त ज्ञानेविण तुम्हा कवण आनंद । बाप निवृत्तीराजेविण लटकेच स्फुंदा ।।’’ [१२] सगुणाचे महत्त्व सोपानदेवांनी विसोबांना इतके सुंदर रीतीने विशद केले की विसोबांनी न राहवून सोपानचरणांवर अवचित मस्तक ठेवले. आणि याच ठिकाणी ‘‘जयजय आरती जय सोपानदेवा । ओवाळी खेचरविसा जीविच्या जीवा ।।’’ [१३] अशी विसोबा सोपानदेवांची आरती करतात. या प्रत्येक भावंडांशी असलेले विसोबांचे अनुबंध लक्षात घेतल्यावर,विसोबांच्या अनेकगुरुत्वासंबंधीचे कोडे उलगडते.

गोरक्षभेटीचे वर्णन करताना नामदेवगाथेमध्ये असा उल्लेख येतो, ‘निवृत्तिदेव म्हणे कुलालाचे चक्र । अंतर बाहेर ऐसे केले ।।’ [१४] आणि नेमका ह्याचाच विसोबांच्या तोंडीही उल्लेख येतो.‘कुल्लाळकुसरी भ्रमत चक्र । आयुष्या आवर्त मापा करी ।।’ [१५] यावरूनही विसोबा त्याप्रसंगी उपस्थित असल्याचे सिद्ध होईल.

मुक्ताबाईच्या उपदेशानंतर प्राप्त झालेल्या उच्च स्थितीचे वर्णन विसोबा खेचरांनी नामदेवाजवळही केले असल्याचे दिसते. विसोबा खेचर

म्हणतात,

''येथोनि तेथवरी धावोनिया गेलो । काही नाही ते पाहुनिया आलो ।
कोठे गेलो कोठे धावुनिआलो । काही नाही ते पाहुनिया धालो ।।'' [१६]

या अनुभवाची तृप्ती त्यांच्या शब्दांतूनही निथळताना जाणवते आहे. तेव्हा असा अनुभव आपणासही प्राप्त व्हावा ही स्वाभाविक इच्छा नामदेवांना झाली. नामदेवांच्या या विनवणीचा स्वीकार विसोबांनी केला आणि त्यांनी जी दीक्षा नामदेवांना दिली ती देताना म्हटले,

''कुल्लाळकुसरी भ्रमत चक्र । आयुष्य आवर्त मापा करी ।
खेचर विसा म्हणे येथूनी काढिले । ते तुज दिधले जारे नाम्या ।।'' [१७]

मुक्ताबाईमुळे विसोबा खेचरांना एका उच्च आध्यात्मिक अवस्थेची प्राप्ती झाली होती आणि त्यामुळे मुक्ताबाईचे शिष्यत्व त्यांनी मोकळ्या मनाने स्वीकारले असे दिसते.

डॉ.रा.चिं.ढेरे यांनी 'गुरुमाऊली'च्या अंकामध्ये विसोबा खेचरांच्या 'षट्स्थल' (शडुस्छळि) या ग्रंथाची समग्र संहिता यथामूल स्वरूपात दिली आहे. तो ग्रंथ येथे विचारात घेणे अत्यावश्यक ठरते. (ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईने विसोबाखेचरांना उपदेश केला होता आणि हीच मुक्ताबाई गोरक्षनाथांची कृपांकित असल्याचे लक्षात घेऊन) विसोबा खेचर येथे मुक्ताबाईविषयी काय म्हणतात ते लक्षात घेणे उचित ठरेल.

ग्रंथारंभी गणेश, सरस्वती, सद्गुरु यांना वंदन करण्याची परंपरा आहे. या ग्रंथामध्येही गणेशवंदन झाल्यानंतर सरस्वतीचे नमन करण्यात आले आहे.

'हे साध्य केले मिननाथे गोरक्षी । मग मुक्ताईस लाविले लक्षी ।
तेचि चांगदेवासि साक्षी । उपदेसिले ।।....
....त्याकारणे मुक्ताईस नमिले । वौंसि गुरुचे प्रसन्नत्व लाधले ।
ते मुक्ताईच सारदा म्हणौनिया केले । नमन देखा ।।' [१८]

येथे एक गोष्ट लक्षात येते की विसोबा खेचरांच्या मनात मुक्ताबाईचे स्थान इतक्या वरच्या दर्जाचे आहे की त्यांच्या दृष्टीने माता मुक्ताबाई आणि सारदा माता किंवा सरस्वती यांच्यात भेद नाहीच (श्रीज्ञानेश्वरही मुक्ताबाईकडे 'सारजामाता' म्हणून पाहतात हा भाग ज्ञानदेवकृत आरतीमध्ये आपण पाहिलाच आहे.) आणि म्हणून

सरस्वतीचे स्तवन विसोबा खेचर कसे करतात हे पाहण्यासारखे आहे. सरस्वतीनमनपर एकंदर एकवीस ओव्या या ग्रंथात लिहिल्या गेल्या आहेत. त्या मुळातूनच पाहण्याजोग्या आहेत. विस्तारभयास्तव येथे त्यातील काहीच ओव्या देत आहे.

‘नमो ब्रह्मात्मके । चैतन्यरुप व्यापके ।
निरसून रुपेके । निरामय ।।
स्वरु असे मनोहरु । संतोसले संकरु ।
स्वराचा प्रकारु । दृष्य केले ।।
हाती घेऊनिया आळवनि । रंगि शोभली गायेनि ।
संतुष्ट जाले शूळपाणि । वरु दिधला ।।’ [१९]

सरस्वतीविषयी असा आत्यंतिक आदरभाव व्यक्त करणारे विसोबा

‘नमन ब्रह्मतनये । तू साक्षात्कारी प्रत्यक्ष होये ।
अमृतदृष्टी करी माये । ग्रंथ प्रकाशी ।।’ [२०]

अशी विनवणी करतात. त्यावर सरस्वतीने दिलेले उत्तर लक्षात घेण्याजोगे आहे.

‘मग म्हणे सरस्वती त्वरिता । तुवा संतोषविले सर्वथा ।
आम्ही तुज पूर्वी वरु या कवित्वा । प्रकाशु केलासे ।।’ [२१]

याठिकाणी सरस्वतीने विसोबांना पूर्वीच दिलेल्या वराचा उल्लेख आहे. तो कशाचा निर्देश आहे हे विचारात घेऊ. विसोबांच्या जीवनचरित्राचा शोध घेतला तर अशा प्रकारचा काही प्रसंग घडल्याचे दिसत नाही. सरस्वतीने वर दिला आणि त्याच्या आधारावर विसोबांनी विपुल कवित्वरचना केली असे काही आढळत नाही. तेव्हा याचा गूढार्थ लक्षात घेणे जरुरीचे आहे. यातील एकेक शब्द महत्त्वाचा आहे. याठिकाणी उल्लेख आहे तो या कवित्वाचा. या ग्रंथामध्ये जे कवित्व आहे, म्हणजेच या ग्रंथामध्ये जो विषय प्रतिपादन करण्यात आला आहे त्या विषयाबद्दल आम्ही तुला पूर्वीच वर देऊन प्रकाश टाकला आहे. म्हणजेच या ग्रंथातील प्रतिपाद्य विषय तुझ्या साक्षात अनुभवास आणून दिला आहे असे म्हणण्याचा येथे आशय आहे. ‘शिवयोगज्ञान’ म्हणजेच ‘जिवशिवऐक्य’ हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आहे आणि याचा साक्षात अनुभव मुक्ताबाईकृपेने विसोबा खेचरांना लाभला असल्याचे आपण याच प्रकरणामध्ये लक्षात घेतले

आहे. तेव्हा सरस्वतीच्या विधानाचा अर्थ येथे स्पष्ट व्हावा. ''तरी तुवा प्रकट होणे । शब्दरचनेसि ।।'' [२२] अशी विनवणी जेव्हा विसोबा करतात तेव्हा त्याला प्रतिसाद देते ती मुक्ताबाई !

''ते वेळी म्हणे ते मुक्ता । अरे अरे कृष्णाचिया सुता ।
जे काही बोलसि तत्त्वता । ते तू पावसील ।।'' [२३]

मुक्ताबाईप्राप्त अशा आशीर्वादानंतर विसोबांनी आपल्या ग्रंथाला आरंभ केला आहे. विसोबा खेचरांनी मुक्ताबाईस मूर्तिमंत सरस्वतीच्या स्वरूपात पाहिले आहे, आदिमायेच्या रूपात पाहिले आहे आणि ही गोष्ट मुक्ताबाईच्या सर्वमान्य स्वरूपाशी मिळतीजुळती अशीच आहे.

**

# लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी

## (मुक्ताबाई आणि नामदेव यांच्यातील अनुबंधाचा वेध)

मुक्ताबाईची स्तुती करताना एकनाथ महाराजांनी म्हटले आहे, ''अज्ञानासी बोध सज्ञानाची शुद्धी । तोडिली उपाधी सर्वत्रांची ।।'' [१] सर्वांची उपाधी तोडून त्यांना मोक्षमार्गावर प्रगत करण्याची विलक्षण हातोटी मुक्ताबाईला साध्य होती हे चांगदेव आणि नामदेव यांच्या उदाहरणावरून सहज लक्षात येण्याजोगे आहे. चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा ज्ञानी असणारा चांगदेव, सिद्धाईच्या अहंकारामुळे परमेश्वरप्राप्तीपासून दूर राहत आहे हे ओळखून त्या अहंकारालाच सोऽहमची जोड देऊन शुद्धी करवणारी मुक्ताबाईच. आणि नामदेवांचा भक्तीचा अहंकार दूर करू पाहणारीही मुक्ताबाईच !

वस्तुत: सर्वदेशनिवासे असणाऱ्या परमेश्वराला एका लहानशा मूर्तीतच पाहणारा नामदेव ! नामदेवाच्या या एकविध भावाचे गुणगान करावे तेवढे थोडेच, परंतु सर्वव्यापी असणाऱ्या पांडुरंगाला एका मूर्तीपुरतेच तेवढे सीमित समजणे हे एकप्रकारे अज्ञानच ना ? 'भक्तिहूनी श्रेष्ठ आणिक नाही' असे म्हणत ज्ञानपूर्व भक्तीमध्येच रमू पाहणारे नामदेव, केवळ एका अहंकारापायी वाया जात आहेत हे पाहून त्यांचा अहंकारही मुक्ताबाई घालवू पाहते.

नामदेवांच्या जीवनात मुक्ताबाईचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे, तसेच मुक्ताबाईच्या दृष्टीनेही नामदेव ही अशी एक आव्हानात्मक परिस्थिती होती की ज्यामध्ये तिचे सारे सामर्थ्य जणू पणाला लागले. तेव्हा या दोघांच्या अनुबंधामध्ये विलक्षण नाट्यमयता आहे. नामदेवगाथेच्या आधारे याचा वेध घेऊ.

नामदेव आणि पांडुरंग यांच्या भावबंधाची खुमारी काही औरच आहे. ''सोय सांडिली घराची । जोडी केली विठ्ठलाची । मायबापासी टाकिले । ध्यान देवाचे लागले । स्त्रीपुत्र बंधुबहिणी । केली सर्वांची सांडणी । गणगोत इष्टमित्र । सर्व जोडिले विठ्ठलपात्र ।।'' [२] नामदेवाची आई गोणाई हिच्या या उद्गारावरून नामदेवाची परमेश्वरप्रीती व्यक्त होते. पांडुरंगापुढे सारा संसार तृणवत वाटावा हे नामदेवाचे पांडुरंगावरील प्रेम विलक्षणच ! कदाचित या सख्यत्वामुळेच असेल परंतु एक प्रकारचे भ्रांतीचे, अभिमानाचे पडळ नामदेवांच्या दृष्टीपुढे आले.

'देवाचे जवळी आम्ही निरंतर' [३] याचाच एक सूक्ष्म अभिमान नामदेवांच्या वर्तनात आढळू लागला. या अभिमानाचे निराकरण झाल्याशिवाय परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाची ओळख नामदेवाला होणार नाही हे जाणून तो अभिमान दूर करण्याची योजना जणू परमेश्वरानेच आखली. आणि त्यात सूत्रधार बनविले ते मुक्ताबाईला ! ह्या सर्व भागाचा सविस्तर विचार या पुस्तकात वेळावेळी आला असल्याने त्याचा पुन्हा येथे सविस्तर विचार केलेला नाही. परंतु हे सर्वच अभंग मुळातूनच वाचण्याजोगे आहेत. नामदेवगाथेमध्ये 'नामदेवभक्तिगर्वनिरास' या मथळ्याखाली दिलेल्या अभंगांमधून हा सर्व प्रसंग वर्णन केला आहे.

मुक्ताबाईने आता आपले म्हणणे नामदेवाला स्पष्ट शब्दात ऐकविले. भक्तिचे मोल खूप असले म्हणून ज्ञान उणे ठरते असे नाही, ज्ञानाला कमी लेखण्याची गरज नाही हेच येथे मुक्ताबाईने स्पष्ट केले. मुक्ताबाईने धारिष्ट दाखवून नामदेवाशी प्रतिवाद केला. मोक्षप्राप्तीच्या मार्गातील सद्‌गुरुची आवश्यकता मुक्ताबाईने या निमित्ताने प्रथम कथन केली.

नामदेवाचा अधिकार 'चंदनाचे झाड' ही उपमा देऊन तिने सूचित केला आहे. स्वत:ला आत्मप्रचीती आलेली नसताना केवळ शब्दज्ञान वाढवित राहणे ही गोष्ट बेगडी आहे, वरवरची आहे याचीही जाणीव मुक्ताबाईने येथे करून दिली आहे. यावेळी मुक्ताबाईने नाथपंथीय दिव्य वारशाची आठवण आपल्या भावंडांना करून दिली. आणि या दिव्य वारशापासून नामदेव तेवढा अलिप्त कसा राहिला याबद्दल एकप्रकारची खंतही तिने व्यक्त केली. नामदेवासारखी अधिकारी व्यक्ती केवळ एका अहंतागुणाने वाया जात असलेली तिला बघवत नाही म्हणूनच त्या विशुद्ध कळवळ्याने केलेली ही विनवणी आहे.

या प्रसंगी, नामदेवांची परीक्षा गोरक्षनाथांकरवी करावयाची युक्तीही तिचीच आणि त्यासाठी आवश्यक असणारी तरतूदही पुढाकार घेऊन तिनेच केली. या प्रसंगाच्या निमित्ताने नामदेवाचे कोरेपण, अज्ञानीपण दिसून आले.

मुक्ताबाईच्या या वागण्याने अपमानित झालेले नामदेव तिच्यावर संतप्त झाले. ''अतीथि आदर केला मुक्ताबाई । लाकडाने डोई फोडिली माझी ।।'' [४] अशी तक्रारही त्यांनी भावंडांजवळ केली. देवाच्या भरीस पडून आपण येथे आलो हेच चुकले असे नामदेवांना वाटले. तेव्हा येथे आता थांबण्यात अर्थ

नाही, संतसंग झाला तर खरंच हे आपल्याला भाजून काढतील, तेव्हा आधीच पळून जावे असा विचार नामदेवांनी केला.

या प्रसंगाने घाबरेघुबरे झालेले नामदेव पांडुरंगाजवळ तक्रार करू लागले, ''मुक्ताबाईने तेथे माजविली कळी । हे संतमंडळी कपटी तुझी ।।'' [५] पुन्हा या साऱ्या भावंडांमध्ये मुक्ताबाईचे वागणेच नामदेवाला वारंवार झोंबत आहे असे नामदेवांच्या उद्‌गारावरून लक्षात येते.

''लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी । केले देशोधडी महान संत ।
सगळेची काखेसी येई ब्रह्मांड । नामा म्हणे पाखांड दिसते मज ।।'' [६]

इतक्या तीव्र शब्दात नामदेवांचा संताप येथे व्यक्त झाला आहे. 'सणकांडी म्हणजे तागावरील धागे काढून घेतल्यानंतर राहणारी तागाची काडी. ही काडी झरझर पेटते आणि इतर लाकडांना पेटवते. पेटवण म्हणून सणकांड्याचा उपयोग करतात.' [७] नामदेवांनी विरोधी भूमिकेतून हे उद्‌गार तिच्याबद्‌दल काढलेले असले तरी त्याच उद्‌गारातून तिचे श्रेष्ठत्वही नकळत प्रतीत होत नाही का ? विरोध स्तुतीचा हा एक उत्कृष्ट नमुनाच म्हणायला लागेल.

''भ्रांतीने तुझी पुरविली पाठी । सज्जनाच्या गोष्टी कडू झाल्या ।।'' [८] असे पांडुरंगाने नामदेवाला सांगितले आणि मुक्ताबाईचे वागणे योग्यच असल्याचा निर्वाळा दिला. मुक्ताबाईने नामदेवांना सद्‌गुरु करण्याविषयी जो सल्ला दिला होता त्याचा पुनरुच्चार पांडुरंगाने केला. ''देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावे वेगी ।।'' [९] अशी आज्ञा नामदेवाला केली. पुढे नामदेवाला विसोबा खेचरांचा अनुग्रह प्राप्त झाला. मुक्ताबाईचा हेतू पूर्ण साध्य झाला.

सद्‌गुरुप्राप्तीनंतर मात्र, मुक्ताबाईचे आपल्याबाबतीतले वागणे योग्यच होते याची जाणीव नामदेवांना झाली. तिच्याबद्‌दलची संतापाची जागा तिच्याबद्‌दलच्या आदराने घेतली. नामदेवांनी या सर्व संतांचे चरित्र वर्णन करताना मुक्ताबाईसंबंधी जे उद्‌गार वेळोवेळी काढले आहेत त्यातून हा आदरभाव जाणवतो. ज्ञानेश्वरसमाधिपूर्वीचे वर्णन करताना, त्या चौघा भावंडांनी विष्णूमूर्तीस ओवाळले हे सांगताना नामदेव म्हणतात, ''ज्ञान सोपान निवृत्ति । मुक्ताई प्रत्यक्ष ज्योती ।।'' [१०] ''धन्य चौघेजण । मुक्ताबाई ब्रह्मपूर्ण । यांनी

तारिले सकळ जन । दु:ख दारुण नासले ।।'' [११] यासारख्या उद्‌गारातूनही मुक्ताबाईचे वेगळेपण नामदेवांनी अधोरेखित केले आहे.

मुक्ताबाईच्या सत्य सनातन स्वरूपाचे ज्ञान भगवंतांनी करून दिले तेव्हा नामदेवांचे उद्‌गारही महत्त्वपूर्ण आहेत. ''निवृत्तिनाथ पायाळ पूर्ण । ज्ञानदेव ज्ञानांजन । सोपानदेव ब्रह्म जाणोन । जिही निधान जोडिले ।। शुद्धिभक्ती भावज्ञान । जोडिला विठोबा निधान । तेथीचे विभागी संपूर्ण । प्रेम जीवन ओसंडत ।।'' [१२] असे तिचे गौरवपूर्ण वर्णन नामदेवांनी केले आहे. लहानशी मुक्ताबाई असे जिचे एकेकाळी वर्णन नामदेवांनी केले होते त्याच मुक्ताबाईला आता तिची योग्यता समजून आल्यावर नामदेव माय म्हणून संबोधताना दिसतात. ''पाहिलेगे माय पूर्वभूमी आपुली । बहुत सन्मानिली वैष्णवांनी ।।'' [१३] यासारख्या उद्‌गारातून ही गोष्ट लक्षात येते.

पुढे मुक्ताबाईच्या एकाएकी गुप्त होण्यामुळे सर्वांचीच जी व्याकुळ मनोवस्था झाली आहे त्यामध्ये नामदेवही आहेत. ''नामा म्हणे देवा कैसे आता काही । आम्हा मुक्ताबाई बोलली नाही ।।'' [१४] या शब्दामध्ये नामदेवाचा शोक व्यक्त होतो आणि नंतर ''मुक्ताबाई मुक्त केली केशवराजे ।।'' [१५] असे तिच्याबद्‌दलचे धन्योद्‌गारही नामदेवांनी काढले आहेत.

निवृत्तिनाथांच्या समाधिनंतर सर्वांच्या आठवणीने व्याकुळ झालेले नामदेव मुक्ताबाईबद्‌दल म्हणत होते, ''नामा म्हणे देवा सांगुनिया काही । न ये मुक्ताबाई गुह्य तुझे ।।'' [१६]

गोरक्षभेटीचा निर्णायक क्षण ज्यामुळे मुक्ताबाईच्या आयुष्यात आला ती व्यक्ती म्हणजे नामदेव होती आणि जिच्यामुळे नामदेवांना सद्‌गुरुप्राप्ती घडून आली अशी नामदेवांच्या जीवनातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे मुक्ताबाई होती. दोघांचीही एकमेकांच्या आयुष्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका दोघांनीही निभावली. त्याबद्‌दल एक सार्थ जाण नामदेवांच्या अभंगामधून व्यक्त होते पण मुक्ताबाई मात्र नामदेवाबाबतीतल आपली भूमिका पार पाडून अलिप्त झालेली दिसते. नामदेवांचा साधा नामोल्लेखही तिच्या वाङ्‌मयात नंतर कोठे आढळत नाही.

नामदेव आणि मुक्ताबाई यांच्या अनुबंधाचे एक सुंदर चित्रण

उदाहरणाच्या माध्यमातून एका आरतीत केलेले आढळते. निवृत्तिच्या कोण्या दासाने केलेली ही आरती आहे. (ज्ञानेश्वर किंवा सोपानदेव यांनी केलेली ही रचना असावी असे वाटते.) त्या आरतीमध्ये म्हटले आहे, मुक्ताबाईच्या रूपाने अमृताचा ओघच जणू नामदेव आणि चांगदेव या तीरांना समृद्ध करत आहे आणि मध्यभागी देव वटेश्वर आहे.

'नामदेव चांगदेव तप्तीचे तीर । पूर्ण वोघ वाहे अमृतनीर ।
मध्यभागी शोभे देव वटेश्वर । धन्य वो मुक्ताई तुझा अवतार ।।' [१७]

संतमंडळींमधील मुक्ताबाईचे महत्त्वपूर्ण स्थानच या आरतीतून अधोरेखित होते.

**

# मुक्ताई सांगे खूण वटेश्वरा
## (मुक्ताबाई आणि वटेश्वर यांच्यातील अनुबंधाचा वेध)

'असो हे एका हेलावयाची मातु । आता तोचि श्रीगोरक्षनाथु ।
जो आदिनाथाचा नातु । मच्छेंद्रद्वारा ।।
तो तैसाचि रसु वोसंडला । तव मुक्ताबाईया प्राशया ।
प्राशुन तैसचि उरला । तो श्रीवटेश्वरां दिधला ।।' [१]

'नित्यांनदैक्यदीपिका' या ग्रंथात 'शिवकल्याण' यांनी मुक्ताबाईची गुरुशिष्यपरंपरा वरीलप्रमाणे सांगितली आहे. त्यामध्ये वटेश्वरांचा उल्लेख आलेला आहे. याठिकाणी वटेश्वर हा शब्द व्यक्तीवाचक आहे, येथे तो देवतावाचक नाही हे उघड आहे.

परंतु याच वटेश्वर शब्दासंबधांने चांगदेवांनी आरतीत एके ठिकाणी म्हटले आहे, ''वटेश्वर देवो तारक माझा । दैवाची उजरी दिनकरू शोभा ।।'' [२] किंवा ''मध्यभागी शोभे देव वटेश्वर । धन्य वो मुक्ताई तुझा अवतार ।।'' [३] यासारख्या अभंगांमध्ये वटेश्वराचा देव म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे. तेव्हा वटेश्वर म्हणजे नेमके कोण ? वटेश्वर नावाचे दैवत आहे की वटेश्वर नावाची कोणी व्यक्ती आहे ? यासंदर्भात काही प्रश्नचिन्ह अभ्यासकांच्या मनात आहेत. परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेतली की या प्रश्नाचा पुरेसा उलगडा होऊ शकेल. वटेश्वर हे देवाचे नाम म्हणूनही उपयोगात आलेले आहे. आणि हे नाव शंकराचे पर्यायी नाम आहे हेही चांगदेवकृत आरतीमधून लक्षात येते. ''जयजय आरती जय वटेश्वरा । निराकार साकार तूचि शंकरा ।।'' [४] या शब्दांमध्ये हा खुलासा चांगदेवांनी केला आहे. परंतु यामुळे वटेश्वर नावाची कोणती व्यक्तीच होऊन गेली नाही असे मात्र सिद्ध होत नाही.

वटेश्वर नावाचे एक महान भक्त ज्ञानेश्वरादी मंडळींच्या काळातच होऊन गेले असावेत याची साक्ष काही गोष्टीतून मिळत राहते. सोपानदेवांच्या समाधिबरोबरच या वटेश्वरांनीही समाधि स्वीकारल्याचा उल्लेख नामदेवगाथेमध्ये येतो. चांगदेवांच्या अभंगांमधूनही वटेश्वरांचा उल्लेख वारंवार येतो. ''वटेश्वरी सोय सांगितली ।।'' [५] यासारख्या चांगदेवांच्या अभंगांमध्ये येणारा उल्लेख हा

मात्र देवाचा नसून तत्कालीन वटेश्वर नामक व्यक्तीचा आहे हे लक्षात येण्याजोगे आहे. चांगदेव आणि वटेश्वर यांचे नाते असे काही विलक्षण आहे की या दोघांचे नाव एकत्रितपणे चांगावटेश्वर असे घेतले जाते. चांगदेव वटेश्वरांना गुरुस्थानी मानत होते परंतु असे एकदा गृहीत धरले की मग मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील गुरुशिष्य नातेसंबंधाचे काय ? असाही प्रश्न उपस्थित होतो. या साऱ्याचे उत्तर चांगदेवांच्याच अभंगामध्ये शोधणे इष्ट होईल. 'चांगा वटेश्वरी फळला । विज्ञानफळी परिपाका आला ।।' [६] या ठिकाणी याचे उत्तर मिळते. वटेश्वरामुळे चांगदेवाची साधना फलद्रूप झाली आणि मुक्ताबाईमुळे ते फळ परिपक्व झाले असे यावरुन लक्षात येते. आपल्या जीवनातील दोघांचे स्थान स्पष्ट करताना चांगदेवांनी म्हटले आहे, ''मुक्ताई सांगडी वटेश्वरु तारु । चांगा पैलपारु उतरिला ।।'' [७] वटेश्वरांचा शिष्य असलेल्या चांगदेवांचा उल्लेख मुक्ताबाईही वारंवार 'वटेश्वरसुता' असा करते.

मुक्ताबाई आणि वटेश्वर यांच्यातील अनुबंध लक्षात घेण्यापूर्वी वटेश्वरांच्या जीवनाचे इतर काही तपशील उपलब्ध होतात का ? हे पाहणे अगत्याचे आहे.

वटेश्वरांच्या स्थानासंबंधी काही अनुमान करता येणे शक्य आहे. सासवड येथे सोपानदेवांच्या समाधिला जाण्यापूर्वी साऱ्यांचा मुक्काम नदीच्या तीरावर पडलेला आहे. याठिकाणी त्रिवेणी संगम आहे. आणि हे ठिकाण निश्चितपणे वटेश्वराशी संबंधित असे असावे. 'निर्झर जीवन वाहती निरंतर । तेथे वटेश्वर उतरले ।।' [८] यावरून हा संबंध लक्षात येतो. आणि दुसरी गोष्ट अशी की इथे उतरल्यानंतर वटेश्वर आपला वृत्तांत सांगत आहेत असाही उल्लेख नामदेवगाथ्यात आला आहे. 'वटेश्वरे वृत्तांत सांगितला सकळ । पूर्वी आमचे स्थळ याची क्षेत्री ।।' [९] यावरूनही वटेश्वरांचे तेथे काही काळ वास्तव्य असावे ही गोष्ट उघड होते.

पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पूर नामक गावामध्ये वटेश्वराचा उल्लेख असलेला शिलालेख सापडला असल्याचे डॉ.रा.चिं.ढेरे यांनी नोंदविले आहे. [१०] 'चांगा वटेश्वराचा' असे या शिलालेखाचे वाचन केले गेले आहे. पूर या नावाचे जुने नाव नारायणपूर असल्याचे त्यांनी नोंदविले आहे.

तेथील नारायणेश्वराच्या यादवकालीन हेमाडपंथी मंदिरातच वरील शिलालेख सापडला आहे.

या सर्व माहितीचे धागेदोरे निळोबाकृत चांगदेवचरित्राशी काही प्रमाणात मिळतेजुळते आहेत. चांगदेवांचा जन्म कोठे झाला हे सांगताना निळोबांनी 'नारायणडोहो पुण्यक्षेत्र ग्राम' [११] असा उल्लेख केला आहे. याच ठिकाणी चांगदेवांचा चारी वेद, साही शास्त्रे, चौदा विद्या, चौसष्ट कला यांचा अभ्यास झाला आहे, असाही उल्लेख आहे. तेव्हा हे सारे ज्ञान चांगदेवांनी वटेश्वरांकडून तर संपादन केले नसावे ना ? अशी शंका येते. (तसा स्पष्ट नावाचा उल्लेख निळोबाकृत चरित्रात आलेला नाही हे मात्र येथे नमूद केले पाहिजे.)

नारायणपूर आणि नारायणडोह या गावांच्या नामसादृश्यामुळे हा अंदाज करण्यास प्रस्तुत लेखिका प्रवृत्त झाली आहे. त्याला पूरक असे इतरही काही पुरावे सापडतात. चांगदेवांनी हे सर्व ज्ञान ज्या गुरुंकडे घेतले आहे ते योगाभ्यास शिकविण्यास मात्र असमर्थ असल्याचे स्पष्टपणे चांगदेवांना निवेदन करतात. ''तव ते म्हणती आम्ही नेणो योगमार्ग'' [१२] असा स्पष्ट उल्लेख चांगदेवांच्या पूर्वगुरुंनी (आपल्या अंदाजाप्रमाणे वटेश्वरांनी) केलेला आहे. ''काय आम्हा चाड तया योगेविण । करु संध्यास्नान जपादितप ।।'' [१३] या त्यांच्या उद्‌गारावरून योगमार्गापेक्षा पारंपरिक लोकरूढ असा धर्ममार्गच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटत होता हे येथे स्पष्ट होते. आणि नामदेवगाथेमध्ये वटेश्वराचे नमन या शीर्षकाखाली आलेले नमन पाहिले तर तेही वरील विचारांशी मिळतेजुळते आहे.

तेव्हा वटेश्वरांकडून चांगदेवास पारंपरिक स्वरूपाच्या सर्व प्रकारच्या धार्मिक विद्या प्राप्त झाल्या असाव्यात. आणि या साऱ्या विद्यांना परिपक्वता ज्यामुळे प्राप्त होते ती अध्यात्मविद्या चांगदेवांना मुक्ताबाईने देऊ केली हा भाग लक्षात घेतल्यास 'चांगा वटेश्वरी फळला । विज्ञानफळी परिपाका आला ।' या ओळीतील मर्म लक्षात येऊ शकेल.

सोपानदेव आणि वटेश्वर यांचे समाधिस्थळ आणि समाधिवेळ ही नजिकची असल्याचे नामदेवगाथेवरून लक्षात येते. या दोघांमध्येही काही खास सख्यत्वाचा अनुबंध असावा असे अनुमान यावरून काढता येते.

'वटेश्वर म्हणे सोपान राऊळ । बुझाला सिंतरी शिवुचि केवळ ।।' [१४]

वटेश्वरांच्या अभंगामध्ये आढळणाऱ्या सोपानदेवांच्या वरील उल्लेखावरूनही त्या दोघांमधील अनुबंधाची कल्पना करता येण्याजोगी आहे.

आता मुक्ताबाई आणि वटेश्वर यांच्यातील अनुबंधाचा विचार करु. वटेश्वरांनी समाधिस्थ होण्यापूर्वी जे नमन केले आहे त्यामध्ये मुक्ताबाईलाही वंदन केले आहे. 'नमन मुक्ताबाई निर्झरा । सत्रावीच्या ।।' [१५] असे हे वंदन आहे. मुक्ताबाईचे सत्रावीच्या निर्झर रूपातील त्यांनी केलेले वर्णन विशेष लक्षणीय आहे. मुक्ताबाईच्या स्वरूपाविषयी काही निश्चित जाण असल्याखेरीज असे वर्णन करता येणे शक्य नाही.

चांगदेवाच्या निमित्ताने वटेश्वरही या चारही भावंडांशी संबंधित झाले असावेत असे वाटते. तीर्थावळीच्या काळामध्ये ज्याप्रमाणे मुक्ताबाई चांगदेव यांचा उल्लेख नामदेव करीत नाहीत त्याचप्रमाणे वटेश्वरांचा उल्लेखही येथे येत नाही, ही गोष्टही लक्षात घेण्याजोगी आहे.

मुक्ताबाईने वटेश्वरांना कोणत्या प्रकारचा बोध केला असेल याची कल्पना मुक्ताबाईकृत एका अभंगावरून येते, तो अभंग येथे विचारात घेऊ.

'ब्रह्मांडाच्या कोटी संसार अपार । तेही तू साचार नव्हेसि रया ।
सर्वांते जाणते सर्वभूती सार । तेही तू साचार नव्हेसि रया ।
महाभूत पंचक पाचा पंचवीसा गुण । तो स्थूल देहे पूर्ण नव्हेसि रया ।
पंचविसा कळाचे लिंग देह साचे । तेही वासनेचे नव्हेसि रया ।
अज्ञान निष्टंक देह जो कारण । तोही तू आपण नव्हेसि रया ।
देह हे चतुर्थ ज्ञानस्फूर्ति युक्त । तेही तू आपण नव्हेसि रया ।
मने जे जाणिजे बुद्धि जे भाविजे । तेही तू सहजे नव्हेसि रया ।
कर्म आणि कर्ता धर्माची हे वार्ता । हेही तू तत्त्वता नव्हेसि रया ।
ज्ञेय ज्ञाता ज्ञान ध्येय ध्याता ध्यान । त्रिपुटीचे भान नोहेसि रया ।
ब्रह्म परिपूर्ण चतुःशब्देविण । मुक्ताई सांगे खूण वटेश्वरा ।।' [१६]

वटेश्वरांना मुक्ताबाईने केलेल्या या उपदेशामुळे त्यांना आपल्या मूळ स्वरूपाची जाण आली आणि त्याचाच प्रकट आविष्कार म्हणावा असा त्यांचा हा पुढील अभंग आहे.

'मी नाही आलो मी नाही गेलो । मी आलो तेथेचि जालो ।

मी मायबाप चुलता । मीचि एकुलता नारायणा ।
बटू बीजाचा का बीजु वटाचा । वटेश्वरु म्हणे मी चांगदेवाचा ।।'[१७]

मुक्ताबाईच्या प्रभावळीत ज्या अनेक संतांचा समावेश होतो त्यामध्ये वटेश्वरांचेही काही निश्चित स्थान असल्याचे दिसून येते.

**

---

टीप : वरील प्रकरणाच्या संदर्भात असे म्हणावेसे वाटते की, उपलब्ध साधनांचा मेळ घालता, जी परिस्थिती जाणवून गेली त्याचे हे विवेचन आहे. वटेश्वरांशी निगडीत असलेल्या सर्वच बाबींचा अधिक विचार व्हायला हवा याची प्रस्तुत संशोधिकेस जाणीव आहे. पण पुढील संशोधनासाठी (Hypothesis) एक 'सिद्धान्तकल्पना' यादृष्टीने वरील विवेचनाचा विचार व्हावा ही एक नम्र अपेक्षा आहे.

# मुक्ताई जीवन चांगया दिधले

## (मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील अनुबंधाचा वेध)

चौदा विद्या आणि चौसष्ट कला पारंगत असणारे, चौदाशे वर्षांचे चांगदेव यांची योगी म्हणून सर्वत्र ख्याती होती. ज्ञानेश्वरांनी पैठणला जो चमत्कार दाखविला त्याची किर्ती ऐकून सिद्धाईचा बडिवार मिरवणाऱ्या चांगदेवांना मनोमन आश्चर्य वाटले. आणि या चारही भावंडांविषयी, त्यांच्या भेटीविषयी चांगदेवांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली. पुढे भेट होऊन चांगदेव हे मुक्ताबाईचे शिष्य बनले हा भाग आपणास ज्ञात आहेच. पण त्यापूर्वी त्यांची अवस्था कोणती होती हे त्यांच्याच शब्दामधून जाणून घेणे उचित ठरेल.

'चवदाशे वर्षे शरीर केले जतन । नाही अज्ञानपण गेले माझे ।
अहंकारे माझे बुडविले घर । झालो सेवा चोर स्वामीसंगे ।
तापत्रयी तापलो महा अग्नी जळालो । अविवेकी झालो मंदमती ।
काय माझा देह वायावीण व्यर्थ । आलो शरणागत पांडुरंगा ।।'

मुक्ताबाईच्या भेटीपूर्वी चांगदेवांचे जीवन कसे होते याचा स्पष्ट संकेत वरील अभंगामधून मिळतो. पुढे चांगदेव म्हणतात, ''अभिमाने आलो श्रीअलंकापुरी । अज्ञान केले दुरी मुक्ताईने ।।'' [१] चांगदेवांच्या जीवनातील मुक्ताबाईचे स्थान वरील एका ओवीत अगदी यथार्थपणे आले आहे.

मुक्ताबाईने केलेल्या उपदेशामुळे 'चांगा द्वैत होता तो अद्वैत जाला ।' [२] या अवस्थेप्रत जाऊन पोहोचला. मुक्ताबाईने चांगदेवाला ज्ञानदृष्टीने शांत केले आणि त्यामुळे आपल्याला जीवन प्राप्त झाल्याचा अनुभव चांगदेवांना आला. चांगदेवांना पैलपार उतरविण्यामध्ये मुक्ताबाईचे स्थान कोणते आहे याचा सुंदर संकेत चांगदेवांनी आपल्या अभंगामध्ये दिला आहे. ''मुक्ताई सांगाडी वटेश्वर तारु । चांगा पैलपारु उतरिला ।।'' [३] या शब्दामध्ये तिची थोरवी स्पष्ट केली आहे.

चांगदेव आणि मुक्ताबाई यांच्यातील नाते फक्त शिष्य व गुरु यापुरते मर्यादित राहत नाही. तर चांगदेवाला मुक्ताबाई ही 'गुरुमाऊली' या स्वरूपात भासमान होते. पुढे जाऊन त्यांच्यामध्ये माऊली व तिचे लेकरु असे हृद्य नाते

निर्माण झाले असल्याचे दोघांच्याही अभंगांमधून लक्षात येते. ''जो जो जो जो म्हणतसे माया । साकारातीत निजरे चांगया ।।'' [४] अशा शब्दामध्ये मुक्ताबाई चांगदेवाला उद्देशून पाळणा म्हणते. ''गुणातीत डहाळी पाळणा लाविला । तेथे सुत पहुडला मुक्ताईचा ।।'' [५] असे चांगदेव स्वत:बद्दल सांगतात. माता-बालक या नात्यामधील आणखी एक पैलू चांगदेवांच्या अभंगातून एके ठिकाणी दृश्यमान झालेला आहे. 'चांगा बाळ वटेश्वरी खेळत । मुक्ताबाई कवळ देत असे ।।' [६] आपण मुक्ताबाईचे पुत्र आहोत यासंबंधी चांगदेवांना जो धन्यतेचा अनुभव येतो तोही शब्दरुप धारण करतो. हा अभंग अभ्यासण्याजोगा आहे.

'चांगयाचे वऱ्हाड मुक्ताईने केले । मूळ जे फेडिले जन्मांतरीचे ।
आजवर होतो भाजियेले हाड । नाचे संतापुढे स्फुंदे स्फुंदे ।
चौदा शत जाली बुद्धि माझी गेली । सोय दाखविली मुक्ताईने ।
धन्य निवृत्तिदेवे धन्य सोपानदेव । परब्रह्म ठेव दाखविली ।
धन्य ज्ञानदेव धन्य मुक्ताबाई । चांगा म्हणे आई पोटी आलो ।।' [७]

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्या नात्याला किती वेगवेगळ्या छटा प्राप्त होतात ते आणखी एका अभंगाच्या आधारे समजावून घेऊ.

शांतिरुपी नवरी आणि चांगदेव हा नवरा यांच्या लग्नामध्ये मुक्ताबाई करवलीची भूमिका निभावत आहे असे दिसते. 'पर्णिली शांती बैसली पाटी । मुक्ताई करवली हळदुली वाटी ।।' [८] या सर्वामधून गुरुशिष्य नाते ओलांडून त्याहीपुढे सख्यत्वाचे संबंध दोघांमध्ये निर्माण झाले असल्याचे येथे दिसून येते. असे सख्यत्व असूनही एक शिष्य या नात्याने चांगदेवही आपली मर्यादा कधी ओलांडताना दिसत नाहीत. मुक्ताबाईच्या स्व-रूपाची त्यांना मनोमन पूर्ण जाण असल्याचे पुढील उद्गारावरून दिसून येईल. ''मुक्ताई मुक्तरुप मुक्तीची चित्कला । नित्य मुक्त लीळा दावी अंगी ।।'' [९] अशा शब्दामध्ये चांगदेवांनी मुक्ताबाईची स्तुती करून पाद्यपूजा केली असल्याचे निळोबाकृत चांगदेवचरित्रावरून समजून येते.

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्या नातेसंबंधामध्ये विविधता आहे. गुरु-शिष्य, माता-बालक, करवली-नवरदेव इ. विविध नात्यामधून हे भावबंध अभंगांच्या माध्यमातून उलगडत जातात. पण हे असे भावबंध कसे निर्माण होत

गेले असतील हे समजावून घेणेही महत्त्वपूर्ण ठरेल.

चांगदेव आणि ज्ञानेश्वरादी भावंडे यांचा पहिला संबंध येतो तो चांगदेवांनी पाठविलेल्या कोऱ्या पत्राच्या निमित्ताने. कोऱ्या पत्राला दिलेले उत्तर, निर्जीव भिंत चालविणे हे पाहून ज्ञानेश्वरांच्या योगसामर्थ्याने चांगदेवांचा अभिमान गळला आणि शरणागत भावाने त्यांनी मला शिष्य करून घ्यावे म्हणून ज्ञानेश्वरांना विनवणी केली. निळोबाकृत चांगदेव चरित्रातील संदर्भ येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

'मग निवृत्तिनाथे कृपेच्या सागरे । आणि ज्ञानेश्वरे सोपानदेवे ।
निरविला चांगा मुक्ताबाईप्रती । यासी करा प्रतीत आत्मज्ञानी ।।' [१०]

योगी म्हणून त्रिखंडात कीर्ती असणाऱ्या चांगदेवांना आत्मज्ञानी करावे असे निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव ही तिन्ही भावंडे मुक्ताबाईस एकमुखाने सांगत आहेत. चांगदेवांसारख्या योग्यालाही उपदेश करण्याइतकी मुक्ताबाईची योग्यता आहे यावरील तिघांचाही विश्वास येथे व्यक्त झाला आहे.

चांगदेवांनीही मग मुक्ताबाईचा सद्गुरु म्हणून सहजी स्वीकार केलेला दिसतो. येथे एक गोष्ट काहीशी अनाकलनीय वाटते ती अशी की, चांगदेव हे ज्ञानेश्वरांच्या योगसामर्थ्यावर लुब्ध होऊन त्यांच्या भेटीस आले होते. ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद वदविणे, चांगदेवांचे कोरे पत्र वाचून त्याचा अर्थ समजून घेणे व त्यानुरुप त्याला उत्तर देणे, भिंत चालवून त्यांच्या भेटीस येणे या ज्ञानदेवांच्या असामान्य गोष्टींमुळे भारावून जाऊन चांगदेव शरण आले होते. तेव्हा ज्ञानदेवांचे किंवा निवृत्तिनाथांचे गुरुत्व मान्य करण्याच्या मनोभूमिकेत असलेले चांगदेव मुक्ताबाईचे गुरुत्व एकदम कसे काय स्वीकारतात ? मुक्ताबाईच्या श्रेष्ठत्वाची काही कल्पना यावी असा काही प्रसंग घडल्याचे निळोबा नोंदवित नाहीत. की ज्ञानेश्वरादींच्या शब्दांवर विश्वास ठेवून ते मुक्ताबाईस शरण जातात याचा उलगडा होत नाही.

चांगदेव आणि मुक्ताबाई यांच्यातील भेटीचा प्रसंग निळोबारायांच्या शब्दामध्ये जाणून घेणेच अधिक उचित ठरेल.

'चांगदेवे चरणी न्यासिला मस्तक । मुक्ताबाई हस्त ठेवी माथा ।
न कळे ब्रह्मादिका सद्गुरुची हातवटी । केला उठाउठी निजबोध ।

स्वरूपी अढळ ठेली चित्तवृत्ती । इंद्रिया विश्रांती तेणे सुखे ।
न लाविची मुद्रा कष्ट नाही अंगी । केला राजयोगी जीवन्मुक्त ।।' [११]

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यामध्ये गुरुशिष्याचे अलौकिक असे नाते निर्माण झाले. मुक्ताबाईने चांगदेवांना पासष्टीचा अर्थ समजावून दिला. त्याचा अनुभव दिला. मुक्ताबाईचा गुरुपुत्र झाल्यामुळे मागच्या चौदाशे जन्मांतराचे आज खरे सार्थक झाले हा अनुभव चांगदेवांना आला.

'चतुर्वेद वक्ता षड्शास्त्री संपन्न । अष्टादश पुराणे मुखोद्गत ।
चतुर्दश विद्या कळा ही चौसष्टी । मंत्र सप्तकोटी विधी ज्याचे ।
स्थान मान कळा जाणे योगसिद्धी । अष्टादशौषणी रसायने ।
जड्या बुट्या जाणे रोगाच्या परीक्षा । पंचाक्षरी शिक्षा करीत भूतां ।
मणी मंत्र सिद्धी तोटके वेधका । साधका बाधका विद्या जाणे ।
चतुर हरिभक्त चौदाशे वर्षाचा । बहुविद्या सिद्धाच्या सिद्धजनी ।।' [१२]

असा सर्वविद्यासंपन्न चांगदेव मुक्ताबाईकडून कोणती विद्या शिकण्यासाठी तिचे शिष्यत्व पत्करता झाला ? मुक्ताबाईकडून नेमका कोणता उपदेश चांगदेवांना प्राप्त झाला ? याच्या खुणा चांगदेवांच्या अभंगांमधून जाणवतात.

'जेथे एक दुजे नाही । प्रपंचाची काहाणी तेथे काही ।
तेथे काहीच नाही तेथे काहीच नाही । सोय धरी आपुलीरे ।
वटेश्वरसुताते बोले मुक्ताई । सोहंभावे अखंडित राही ।।' [१३]

असा सोऽहम्भावाचा उपदेश मुक्ताबाईने चांगदेवाना केला असल्याचे चांगदेवांच्या अनेक अभंगांवरून लक्षात येते.

चांगदेवांनीही मुक्ताबाईच्या शिकवणीला प्रत्यक्ष रूप दिले. मुक्ताबाईने जे जे सांगितले त्याचे तंतोतंत पालन चांगदेवांनी केले. आणि ''चांगया भला । सांगितले ते अंगेचि जाला ।।'' [१४] अशी मुक्ताबाईकडून पावतीही मिळविली. चांगदेव हा मुक्ताबाईचा शिष्योत्तम असल्याने मुक्ताबाई ''मुक्ताई म्हणे चांगया नवल वितलें । असतां मीं माझें हारपलें ।।'' [१५] असे आपल्या अंतरीचे गुज चांगदेवाजवळ उघड करून दाखविताना दिसते. मुक्ताबाईला येणारे नवलपूर्ण अनुभवही ती चांगदेवांना सांगते. कधी कधी ''सुईचे अणीवर रचिले पाठार । मुक्ताई म्हणे चांगया सांग याचा विचार ।।'' [१६] असे म्हणून कूटप्रश्नही

विचारताना दिसते. तेव्हा या दोघांमधील नात्याला मित्रत्वाची हृद्यता प्राप्त होताना दिसते.

आता एका वेगळ्या मुद्याचा विचार येथे आपणास करावयाचा आहे. डॉ.रा.चिं.ढेरे यांना नाथपंथ गुरुपरंपरा हे चांगावटेश्वरकृत चौदा कडव्यांचे प्रकरण उपलब्ध झाले आहे. त्यात त्यांनी जी गुरुपरंपरा सांगितली आहे ती अशी –

'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला । पंथ सांगितला नाथाचा हा ।

मुक्ताई उपदेशी चांगा वटेश्वरा । नाथपंथ साचार आमुचा असे ।।' [१७]

यामध्ये गोरक्षांनी मुक्ताबाईस केलेल्या अनुग्रहाचे वर्णन आहे आणि गहिनीनिवृत्ति यांचा उल्लेख नाही.

मग असे आहे तर गुरुपरंपरेत मात्र गोरक्ष – गहिनी – निवृत्ति – मुक्ताबाई असा क्रम न येता गोरक्ष – मुक्ताबाई असा क्रम का आला असावा ? हा खरा प्रश्न आहे. 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' असा उल्लेख का येतो ? ते आता पाहू.

निवृत्तिनाथांकडून मुक्ताबाईस नाथपंथाची दीक्षा लाभली. गहिनी आणि निवृत्तिनाथ यांच्या माध्यमातून त्यांना कृष्णभक्तीची, सगुणभक्तीची जोड लाभलेली होती. निर्गुणामध्ये रमणारी मुक्ताबाई; तिने स्वत:च्या साधनेच्या जोरावर गोरक्षनाथांची कृपा साध्य करून घेतली आणि ज्याच्या आधारावर ही कृपा तिला प्राप्त झाली तो निर्गुण भक्तीचा उपदेशच मुक्ताबाईने आपल्या शिष्यवर्गाला दिला. संतांच्या ठिकाणी सगुणनिर्गुण हा भेद वास्तविक नसतो, तरीही मुक्ताबाईचा पिंड हा गोरक्षनाथांशी अधिक मिळताजुळता होता. दोघांनीही निर्गुण उपासनेला दिलेले महत्त्व लक्षात घेतले तर ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. तेव्हा निर्गुण उपासक चांगदेव परंपरा सांगतात ती गोरक्ष – मुक्ताबाई अशी का हे इथे अधिक स्पष्ट होईल. (मुक्ताबाईने आपल्या शिष्यवर्गाला निवृत्तिनाथांप्रमाणेच कृष्णनाम, सगुण भक्ती यांचा उपदेश केला असता तर मग मात्र कदाचित ती परंपरा नेहमीच्या ज्ञात परंपरेप्रमाणेच सांगितली गेली असती. व मग गोरक्षशिष्या मुक्ताई आणि ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई या दोन समजण्याचा प्रसंगही निर्माण झाला नसता. यासंबंधीचा अधिक तपशीलवार विचार 'पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस' या प्रकरणात केला आहे.)

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्या संदर्भात आणखी एक महत्त्वपूर्ण गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. नामदेवांनी याबाबत एक विधान केले आहे ते असे, ''संतसमागम फळला तुजला । एकांत फावला मुक्ताबाई ।।'' [१८] मुक्ताबाई आणि चांगदेव यांनी एकांतवासात राहून साधना केली असावी असा अंदाज यावरून करता येण्यासारखा आहे. आणि असे असेल तर आपण वरील सर्व जी चर्चा केली आहे त्याला एक आगळे महत्त्व प्राप्त होते. मुक्ताबाईने चांगदेवाला आपला पुत्र मानणे, त्याला अंगाईगीत आळविणे, आपल्या अंतरीचे गूज चांगदेवास तिने सांगणे किंवा तिला आलेले नवलपूर्ण अनुभव तिने इतरांना न सांगता चांगदेवांना सांगणे या गोष्टींचा संदर्भ या घटनेमुळे अधिक स्पष्ट होऊ शकतो. ज्ञानेश्वर आणि नामदेव जेव्हा तीर्थयात्रेसाठी गेले होते त्याच काळात मुक्ताबाई आणि चांगदेव आदी मंडळी एकांतवासात असावीत असा अंदाज आहे. (याचा सविस्तर विचार 'मुक्ताबाईचा अज्ञातवास' या स्वतंत्र प्रकरणात आधीच आलेला आहे.)

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील नात्याचे दर्शन घडविणारा एक महत्त्वपूर्ण प्रसंग म्हणजे चांगदेवांची समाधि होय. समाधिप्रसंगी चांगदेवांना आपल्या सर्व आयुष्याची, त्यातील पातकांची, अहंकाराची जाणीव होत आहे. त्याची आठवण होऊन दु:ख होत आहे. आणि या साऱ्यामधून आपल्यास बाहेर काढणारी मुक्ताबाई आहे याच्या जाणीवेने धन्यतेचा अनुभवही येत आहे. मुक्ताबाईबद्दल वाटणारी ही कृतज्ञता चांगदेवांनी अशी वर्णन केली आहे,

''अवघ्या विद्येचा अभ्यास । पावलो मी क्लेश देवराया ।
मुक्ताबाई योगे उतरलो भवसिंधु । तैशी दीनबंधु कृपा करी ।। [१९]
कृपावंत झाली जेव्हा मुक्ताबाई । स्वरूप दिशा दाही दाखविले ।
पाठी पोटी स्वरूप केले सद्गुरुने । तव अभिमान गेला माझा ।।'' [२०]

याप्रसंगी चांगदेवांनी सद्गुरु मुक्ताबाईची पूजा केली आहे. मुक्ताबाईने चांगदेवांना पोटाशी घेतले आहे. चांगदेव आणि मुक्ताबाई यांच्यातील प्रेमा असा काही विलक्षण आहे की चांगदेवांच्या समाधिप्रसंगी मुक्ताबाईला देखील आपले अश्रू आवरता आले नाहीत. ''यांच्या या ज्ञानाचा अंतपार नाही । भली मुक्ताबाई वोसंडली ।।'' [२१] या शब्दामध्ये नामदेवांनी याचे वर्णन केले आहे.

ज्ञानेश्वर आणि सोपानदेव यांच्या समाधिनंतर चांगदेवांनी समाधि घेतली आहे. स्वरूपाचे ओघ एकेक करून स्वरूपी मिळू लागले आहेत. चांगदेव हा आपला परमप्रिय शिष्य गेल्यानंतर आता मुक्ताबाईही निघून जाईल ही आंतरिक जाणीव नामदेवांना झाली आहे. म्हणून त्यांनी यासंदर्भात म्हटले की, ''गेले योगिराज राहिले ठायी ठायी । आता मुक्ताबाई जाईल की ।।'' [२२] आणि यानंतर खरोखरच मुक्ताबाईला स्वत:च्या समाधिचे वेध लागले असल्याचे नामदेवगाथ्यातील अभंगांवरून स्पष्टपणे जाणवते. मुक्ताबाईच्या स्वरूपाकार होत जाण्याची प्रक्रिया चांगदेवांच्या समाधिनंतर सुरु झालेली दिसते.

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील असे होते हे अलौकिक नाते !

चांगदेवांनी जेव्हा मुक्ताबाईचे शिष्यत्व पत्करले तेव्हा त्यांनी या चारही भावंडांची गुरुभावाने पाद्यपूजा केली असे वर्णन निळोबाकृत चांगदेवचरित्रामध्ये आले आहे. ''भगवद्‌भक्ती द्यावे सर्वभूती अन्न । हेचि मुख्य पूजन सद्‌गुरुचे ।।'' [२३] या भूमिकेतून चांगदेवांनी पंचक्रोशीतील सर्वांना भोजन दिले आहे. त्रिलक्ष भोजनाची अइत सरली, असे या प्रसंगाचे वर्णन निळोबा करतात. याप्रसंगी चांगदेवांनी आपल्या सद्‌गुरुंचे – मुक्ताबाईचे स्तुतिस्तोत्रच जणू आळवलेले आहे असे दिसते. आपला अनुभव व्यक्त करताना चांगदेवांनी म्हटले आहे,

''ज्याचिया प्रसादे पावलो हा बोधू । समूळ मायाकंदू तोडियेला ।
निजानंद पदी स्थापिलो सतत । केला जीवन्मुक्त क्षणामाजी ।
काय उतराई होऊ कवण्या अर्थे । अर्पिता नाशिवंते जीवादिके ।
काया वाचामने करुनि कुरवंडी । धरी ते न सोडी चरण याचे ।
येणे काळे सर्व लाभाचिया कसोटी । लाधलो या भेटी सिद्धाचिया ।
सकळ विद्यासहित करुन वोवाळणी । सांडीने वरुनी जीवप्राण ।
म्हणती चांगदेव कृतकृत्य झालो । चरणी राहिलो मुक्ताईचे ।।'' [२४]

**

# मुक्ताबाईबद्दल गौरवपर उद्गार

संतरुपी गगनाच्या गाभाऱ्यात आपल्या विलक्षण झळाळीने क्षणकाल झळकून गेलेली आणि जेथून आली तेथेच निमालेली विद्युल्लता म्हणजे मुक्ताबाई. काळाचे एवढे अंतर ओलांडल्यानंतर आज आपल्याला तिची प्रकाशमयता आणि दीप्तीच फक्त नजरेला जाणवून जाते. परंतु ती प्रकाशरेखा, तिचे अवकाशातील उद्भवणे, क्षणकाल आसमंत उजळवून पुन्हा नीलाकाशात शांतपणे विलीन होणे इत्यादी सर्व तपशील आपल्याला आज जसेच्या तसे स्पष्ट होतीलच असे नाही. तेव्हा तिच्या अस्तित्वाने उजळून निघालेल्या, प्रकाशमय झालेल्या व्यक्तींनी तिच्याबद्दलचे जे उद्गार काढलेले आहेत त्यातूनच आपल्याला या 'सौदामिनी'चे स्वरुप खऱ्या अर्थाने आकलन होऊ शकेल. मुक्ताबाईच्या सहवासातील आणि तिच्या मार्गदर्शनाने पुनीत झालेली संतमंडळी तिच्याबद्दल कोणते उद्गार काढतात ह्याचा सविस्तर विचार 'मुक्ताबाईची प्रभावळ' या भागात झाला आहेच. तिच्यामुळे प्रभावित झालेल्या इतरांनी तिच्यासंबंधी कोणते उद्गार काढले आहेत ते आता पाहू.

**जनाबाई –** संतांचे अभंग कोण उतरवून घेत असे हे सांगणारी एक महत्त्वपूर्ण माहिती जनाबाईने आपल्या अभंगामध्ये दिली आहे. त्यामध्ये मुक्ताबाईचा उल्लेख येतो. ''निवृत्तिचे बोल लिहिले सोपाने । मुक्ताईची वचने ज्ञानदेवे ।।'' [१] ज्ञानेश्वरांसारख्या योग्याला मुक्ताबाईचे अभंग लिहून घेण्याजोगे वाटावे यातच तिचे श्रेष्ठत्व सिद्ध होत नाही काय ? ''नव्याण्णवाच्या साली मुक्ताई देखिली । जनी म्हणे केली मात त्यांनी ।।'' [२] शके ११९९ मध्ये मुक्ताबाईचा जन्म झाला ही माहितीही येथे जनाबाईंनी पुरविली आहे. ''आदिशक्ती मुक्ताबाई । दासी जनी लागे पायी ।।'' [३] अशा शब्दामध्ये जनाबाई मुक्ताबाईबद्दलचा अभिप्राय नोंदविते. मुक्ताबाई ही आदिमाया असल्याची सर्वमान्य समजूतच इथे जनाबाईच्या अभंगांमधून पुन्हा व्यक्त होते. आता ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील इतर संतमंडळी मुक्ताबाईबद्दल काय म्हणतात ते पाहू.

**कान्होपात्रा –** ज्ञानदेवांची भेट झाल्याचा आनंद व्यक्त करताना

मुक्ताबाईचा संदर्भ येऊन जातो. ''शिव तो निवृत्ति । विष्णु ज्ञानदेव पाही । सोपान तो ब्रह्मा । मूळ माया मुक्ताई ॥'' [४] या शब्दात मुक्ताबाईचे वर्णन येते.

**सेना न्हावी –** येथे ''तिन्ही मूर्ती अवतार । धरुनि करिती जगाचा उद्धार । मूळ आदिमाया साचार । धरी अवतार मुक्ताबाई ॥'' [५] असे सेना न्हावी म्हणतात.

**संत चोखामेळा –** मुक्ताबाई ही आदिमायेचा अवतार असल्याची समजूतच पुन्हा चोखामेळाच्या अभंगामधूनही व्यक्त होते. ''आदिमाया मुक्ताबाई । चांगा उपदेशिला पाही ॥'' [६] असे ते म्हणतात. ''सप्रेम निवृत्ति आणि ज्ञानदेव । मुक्ताईचा भाव विठ्ठलचरणी ॥'' [७] असेही ते सांगतात. ते सर्व संतांच्या चरणी लोटांगण घालतात. पण मुक्ताबाईच्या बाबतीतला त्यांचा जिव्हाळा एका आगळ्याच रुपाने प्रकट होतो. ''कन्या ऐसी तरी देई । जैसी मीरा मुक्ताबाई ॥'' [८] असे एक हृद्य रुप या जिव्हाळ्याला प्राप्त होते.

**परसा भागवत –** ''निवृत्ति सोपान हे ज्ञानेश्वर । चांगदेव मुक्ताई वटेश्वर ।......हे एकचि मूर्ति पावलो अशेखा । सकळा चरणी परसा भागवत देखा ॥'' [९] या शब्दामध्ये परसा भागवत आपला आदरभाव व्यक्त करतात.

यानंतरच्या काळातील महत्त्वपूर्ण संत म्हणजे एकनाथमहाराज, ते मुक्ताबाईसंबंधी काय म्हणतात ते विचारात घेणे अगत्याचे आहे.

**एकनाथ महाराज –** एकनाथ महाराजांनी संतांची स्तुतीपर अशी अभंगरचना केलेली आढळते. यामध्ये 'मुक्ताईची स्तुती' या शीर्षकाखाली सहा अभंग आढळतात. मुक्ताबाईच्या अद्‌भुत जीवनचरित्राचा विचार ते येथे करतात.

''योगियांचे ध्यान पै विश्रांती । आदिशक्ती म्हणती तुम्हालागी ।
नित्य मुक्त तुम्ही सर्व जीवा वंद्य । अकार उकार मकार भेद मावळला ।
अहं सोहं कोहं तुमचा प्रकार । वेदशास्त्र सार तुम्ही जाणा ॥'' [१०]

या अभंगामध्ये तिचे आदिमायारुप पुन्हा उच्चारित झाले आहे आणि तसेच तिची आध्यात्मिक उच्च अवस्थाही निवेदन केली आहे. यापुढे जाऊन तिची कृपा प्राप्त व्हावी म्हणून विनवणी केली आहे. मुक्ताबाईचे जीवनचरित्र वर्णन करणारा हा अभंग पाहू –

'जगत्रय जननी मुक्ताबाई माते । कृपा करी वरदहस्ते मजवरी ।

आदिनाथे अनुग्रह नाथासी दिधला । नाथे हस्त ठेविला मस्तकी तुमच्या ।
बाळलीला केली जगी ख्याती मिरविली । चांगयाची हरली चौसष्ठ कला ।
कळा पासष्टावी ज्ञानदेवे दाविली । चांगयाची विराली अहंममता ।
चांगदेव शरण कायावाचामने । एकाजनार्दनी म्हणे तैशापरी ।।' [११]

मुक्ताबाईच्या जीवनकार्याचे एवढे नेमके वर्णन करणारा अभंग इतरत्र पाहावयास मिळणार नाही असा हा एकनाथांचा पुढील अभंग आहे.

'जगाच्या उद्धारा तुमचा अवतार । पावन हे साचार मूढ जन ।
अज्ञानासी बोध सज्ञानाची शुद्धी । तोडिली उपाधी सर्वत्रांची ।।' [१२]

मुक्ताबाईच्या समाधिसंबंधी काही बोध पुढील अभंगातून होण्यासारखा आहे.

'महाकल्पवरी चिरंजीव शरीर । किर्ती चराचरी त्रिभुवनी ।
आनंदे समाधि सदा ती उघडी । नामस्मरण घडोघडी मुखोद्‌गत ।।' [१३]

महाकल्पापर्यंत मुक्ताबाई शरीररूपानेही चिरंजीव स्वरूपात नांदणार आहे याचा स्पष्ट निर्वाळा वरील अभंगात येतो. नामदेवांच्या अभंगामध्येही याचा स्पष्ट उल्लेख येतो.

मुक्ताबाईच्या नामस्मरणाचे महिमान एकनाथ महाराजांनी लोकांना सांगून ठेवले आहे.

''मुक्ताबाई चतुर्विधा । जो जप करील सदा ।
तो जाईल मोक्षपदा । सायुज्य संपदा पावेल ।।'' [१४]

**मुक्तेश्वर** – एकनाथमहाराजांचा नातू मुक्तेश्वर याने मुक्ताबाईचे खरी शिष्या या स्वरूपात वर्णन केले आहे.

''तनुमनधन तिनी गुरुसी वोपी । तोचि एक शिष्य जनी रे ।
शिष्यमुद्रा हे तयासिच साजे । येर तो बाहिर मुद्रा नाणी रे ।
खरा तो अर्जुन उद्धव गोरख । निवृत्ति ज्ञानदेव गुणी रे ।
सोपान मुक्ताबाई एकनाथ सप्त । वाउगी येर ते काहाणी रे ।।'' [१५]

तनमनधन तिन्ही समर्पित करणाऱ्या सप्त शिष्यांपैकी एक म्हणून मुक्ताबाईचे येथे वर्णन केले आहे.

**निळोबामहाराज** – निळोबामहाराजांनी, ज्ञानेश्वरांनी दिलेल्या स्फूर्तीमधून चांगदेवांचे चरित्र लिहिले आहे. त्या चरित्रलेखनापूर्वी त्यांनी

निवृत्तिज्ञानेश्वरादींना नमन केले आहे.

‘‘नमो मुक्ताबाई त्रैलोक्य पावनी । आदित्रय जननी देवाचिय ।
जगदोद्धारालागी केला अवतार । मिरविला बडिवार सिद्धाईचा ।।’’ [१६]

या शब्दामध्ये त्यांनी मुक्ताबाईला वंदन केले आहे.

**महिपती –** मुक्ताबाईने आपल्याला दर्शन द्यावे अशी विनवणी करणारा महिपती यांचा एक अभंग पाहा.

‘माझे मुक्ताई मुक्ताई । लक्ष असे तुझे पायी ।
उचलुनि कडिये घेसी । सत्रावीचे स्तन्य मज देसी ।
अनुहात खुळखुळ वाजे । नादे सर्वही अंबर गाजे ।
नरहरी निष्ठुर माये । महिपतीलागी दाखवी पाये ।।’ [१७]

आपली गुरुपरंपरा सांगताना त्यांनी मुक्ताबाईचा केलेला उल्लेख महत्त्वपूर्ण आहे.

‘‘निवृत्तिचा ज्ञानी त्याचा सोपान ।
चौथी मुक्ताबाई ब्रह्म चि परिपूर्ण ।।’’ [१८]

**निरंजनमाधव –** ‘ज्ञानेश्वरविजय’ या चरित्रात निरंजनमाधवाने ‘नमो दिव्य मुक्ताभिधा मुक्तिरुपा’ [१९] याप्रकारे मुक्ताबाईला नमन केले आहे. भावंडांमधील मुक्ताबाईचे वेगळेपण वर्णन करणारा हा अभंगही पाहू.

‘श्रीज्ञानेश्वर श्रीनिवृत्ति तिसरा सोपान तो सद्गुरु ।
तिघेही मिळता प्रयाग म्हणिजे अत्यंत तीर्थेश्वर ।
मुक्ताई मणिकर्णिका विलसते काशी अळंदीपुरी ।
इंद्राणी सकळासंघशमनी भगीरथी दुसरी ।।’ [२०]

**श्रीआदिनाथभैरव –** ‘श्रीनाथलीलामृत’ या ग्रंथाचे ग्रंथकार आदिनाथभैरव हे नाथसंप्रदायाचे दीक्षित आहेत. नाथलीलामृत या ग्रंथामध्ये या चौघा भावंडांचे वर्णन आले आहे.

‘निवृत्ति ब्रह्मीचा बीजांकुर । शाखापल्लव ज्ञानेश्वर ।
सोपान सुमन मनोहर । मुक्त परिपक्व मुक्ताबाई ।।’ [२१]

ब्रह्मीच्या बीजांकुराचे पक्व फळामध्ये झालेले रुपांतर म्हणजे जणु काही मुक्ताबाई असा सार्थ गौरव येथे आदिनाथभैरवाने केला आहे.

**शिवदिनकेसरी –** ‘ज्ञानप्रदीप’ या ग्रंथामध्ये शिवदिनकेसरी यांनी

गुरुपरंपरा सांगितली आहे. मुक्ताबाईचा शिष्यसंप्रदाय यामध्ये सांगितला आहे. तो सर्व  भाग येथे विचारात घेणे जरुरीचे आहे.

'पूर्वजन्मि मुक्ताईस । गोरक्षकृपेचा सौरस ।
पुन्हा ज्ञानजन्मि सरस । सोपानदेवास कृपा तिची ।
दुजा शिष्य मुक्ताईचा । नाम विसोबा खेचर साचा ।
नामा शिष्य किं तयाचा । सद्‌भक्त किर्तीचा पंढरपुरी ।
तिजा शिष्य मुक्ताईचा । वरुशे चौदा शते साचा ।
चांगा वटेश्वर नामाचा । केला गर्वाचा सर्व भंग ।
देहबुद्धी सोडउन । जिवशिव द्वैत निरसुन ।
ब्रह्मानंदी समाध पूर्ण । दिधली संपूर्ण चांगदेवा ।
ऐसा शिष्यसंप्रदाय । मुक्त मुक्ताई पर्याय ।।' [२२]

मुक्ताबाईला 'गोरक्षनाथांची झालेली कृपा', याचा इतक्या स्पष्ट स्वरुपात झालेला उल्लेख इतरत्र क्वचितच आला आहे, यादृष्टीने हा भाग महत्त्वाचा आहे.

**गुरुदेव रानडे** – ''या तिघा भावंडांची धाकटी बहीण मुक्ताबाई सर्व पारमार्थिक स्त्री-संतांमध्ये श्रेष्ठ होती.'' [२३] असे श्रीगुरुदेव रानडे म्हटले आहे.

**धुंडामहाराज देगलुरकर** – ''श्रीसंतश्रेष्ठ मुक्ताबाई यांचे जीवनच सर्व अलौकिकतेने भरलेले आहे. आणि सूर्याचेनि प्रतापे । कोडिही नक्षत्र हारपे । ना तो तरी न लोपे । सचंद्री तीहि । तैसेनि आपुले प्रौढीगुणे । जगा या विस्मय देणे । आपण तरी न क्षोभणे । कासिसेनीही ।। ज्ञा. १८-८५८ हे जे तेजाचे लक्षण ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे ते श्रीमुक्ताबाई यांचे ठिकाणी पूर्णत्वाने दिसून येते.'' [२४]

ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईचे केलेले गौरववर्णन करूनच या प्रकरणाचा शेवट करणे उचित ठरावे.

''मुक्त प्रवाहाची नाव । निवृत्ति अवल्या सद्‌गुरुराव ।
सोपान वरी ज्ञानदेव । पार जाले ।।'' [२५]

ज्ञानेश्वरकृत या गौरवापेक्षा मुक्ताबाईचा अधिक गौरव कोणता असणार ?

**

# विभाग तिसरा

## मुक्ताबाईचे वाङ्मय

# सनद दिली स्वतंत्र सद्‌गुरुराजे
## (श्रीज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेली सनद)

''आदिनाथ शंकर गौरी मनोहर । खूण ही साचार मछिंद्रनाथ ।। १ ।। मछिंद्रे गोरक्षा सांगितले गुज । तें गैनीनाथें मज उपदेशिलें ।। २ ।। तेथूनी तारक निवृत्ति आम्हासी । जाणा त्रिवर्गासी उद्धरिले ।। ३ ।।'' [१] आपल्याला नाथसंप्रदायाची दीक्षा मिळाली, आपण केवढे भाग्यवान ही कृतार्थतेची भावना ज्ञानेश्वरांच्या मनात दाटून आली होती. आणि ती भावनाच ते सोपान व लहान्या मुक्ताबाईपाशी बोलून दाखवित होते.

वास्तविक, एव्हाना ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई तिघांनाही नाथसंप्रदायाची दीक्षा मिळाली होती. सर्वांची एकत्रितपणे साधनाही चालत असे. पण मुक्ताबाई आणि सोपान लहान असल्याने त्यांना पुन्हा एकवार ज्ञानेश्वर गुरुप्राप्त मार्ग समजावून देत होते. ते त्यांना सांगत होते, ''तें नयनाचे अग्रीं पहावे आपण । उजळिल्या जाण दाहीदिशा ।।'' [२]

लौकिक जीवनातील हे भाऊ-बहीण आता गुरुबंधुभगिनी बनले होते. निवृत्तिनाथांना, सद्‌गुरुला केंद्रस्थानी मानून त्यांच्याभोवती प्रेम, आदर, भक्ती, ज्ञान इ.ची गुंफण त्यांच्यामध्ये समानतेने घडत होती. त्यातूनच एका आगळ्यावेगळ्या सख्यत्वाचा त्यांना अनुभव येऊ लागला. त्यातही मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना अनेक शंका विचारत असे, अनेक गोष्टी समजावून घेत असे. आपल्या लहानग्या बहिणीच्या या शंका ऐकून ज्ञानेश्वरांना तिच्या आकलनक्षमतेची, बौद्धिक उंचीची खोली जाणवत असे. त्यामुळे ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्यामध्ये एक विलक्षण, अलौकिक अशी समजदार गुंफण होत चालली होती.

साधनेच्या आणि ग्रंथाध्ययनाच्या आधारावर जी काही एक समज 'विद्या अभ्यासितां ज्ञानेश्वरां'च्या [३] मनात उदित झाली होती तीच त्यांच्या बोलण्यातून मुक्ताबाई आणि सोपानांना प्रतीत होत होती. ज्ञानेश्वर सांगत होते, ''ज्याला रूप वर्ण गुण नाहीत असे सांगितले जाते, असा 'तो' मी आज डोळे

भरून पाहिला. मुक्ते, वीटेवर उभी दिसणारी ही मूर्ती म्हणजे साक्षात ज्योतीची निजज्योत आहे हे समजून घे आणि त्या भावनेने तिच्याकडे बघ.'' [४]

निवृत्तिनाथांनी दिलेल्या साधनामार्गावरून दोघेही सहप्रवास करीत होते. मुक्ताबाईला आलेल्या शंका तिने ज्ञानेश्वरांना विचाराव्यात आणि ज्ञानेश्वरांनी तिचे समाधान करावे, ज्ञानेश्वरांच्या मार्गदर्शनाने मुक्तेने पुढची वाटचाल सुरु करावी असे सारे चालले होते.

ज्ञानेश्वर जे सांगत असत ते मुक्ता स्वत:च्या अनुभवाच्या कसोटीवर पडताळून पाहात असे. आपल्याला आलेला अनुभव हा ज्ञानदादाला आलेल्या अनुभवासारखाच आहे की काही वेगळा आहे, आणि तो वेगळा असला तर तो तसा का यासारखे विचार ती करत असे. तसे ती ज्ञानदेवांना विचारतही असे.

आत्ताही तसेच घडले होते. समोर दिसणारी विठ्ठल मूर्ती ही ज्योतीची निजज्योत आहे, असे ज्ञानेश्वर म्हणाले होते. पण मुक्ताबाईला मात्र काही वेगळे जाणवत होते. मूर्ती तर सगुण दिसते पण ती केवळ सगुणही नाही. आणि निर्गुण म्हणावी तर निर्गुणही नाही. तिला सगुण म्हणावे की निर्गुण म्हणावे असा पेच तिला पडला. सखोल विचारांती तिच्या लक्षात आले की, ती मूर्ती सगुणही नाही आणि निर्गुणही नाही. पण आपल्या मनाने दिलेला ही निर्णय बरोबर आहे किंवा चूक याची खात्री ती ज्ञानेश्वरांना विचारून करू पाहते. म्हणून मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणते, ''म्हणे मुक्ताबाई सांग ज्ञानेश्वरा । विचार हा बरवा करूनियां ।।'' [५]

मुक्ताबाईचा हा प्रश्न खरोखरच गहन स्वरूपाचा होता. आता तत्त्वज्ञानाच्या खोल पाण्यात शिरण्यावाचून ज्ञानेश्वरांनाही गत्यंतर उरले नाही. त्यांनी निर्गुणातून सगुणाची उत्पत्ती कशी झाली हे सांगितले. मूळद्वारी मूळापाशीं स्थापिलेल्या गणपतीपाशी निर्गुणाची वस्ती कशी आहे तेही सांगितले. ''निर्गुणाचा बुंद सगुणीं उतरला । कर्दम तो झाला एकाएकी ।।'' [६] असे सुंदर उदाहरण देऊन ज्ञानेश्वर हा गहन विषय सोपा करून, उलगडवून दाखवित होते.

ज्ञानेश्वरांकडून आपल्याला समर्पक अशी उत्तरे मिळतात आणि आपले समाधान होते असे लक्षात आलेली मुक्ताबाई, स्वत:च्या ज्ञानात भर पडावी म्हणून, आता त्यांना रोजच काही ना काही प्रश्न विचारून, स्वत:चे

शंकासमाधान करून घेत असे.

‘‘मूळद्वारी दादा स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ती कैशी झाली ।।
मायेचा बंबाळ जाये एकसरा । इच्याही आधारा सांगा दादा ।।
ब्रह्मांड व्यापिले आकाश कवळिले । सर्व काही व्यापिले मायेनेचि ।।
माया कैशी दादा सांगता निर्गुण । मुक्ताबाई म्हणे भिन्न फोडा ।।’’ [७]

अशा प्रकारचे गूढ, गहन, गंभीर प्रश्न मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना विचारत असे.तिची जिज्ञासा पाहून ज्ञानेश्वरही तिला भरभरून ज्ञान बोध देत असत. अर्थात एक गोष्ट स्पष्ट होती की, मुक्ताबाईचे हे जे सारे गहन प्रश्न होते ते केवळ बुद्धिच्या वरवरच्या स्तरावरून आलेले, केवळ बौद्धिक भूक भागविण्यासाठी विचारलेले प्रश्न नव्हते. त्या प्रश्नांपाठीमागे प्रखर साधनेची भरभक्कम अशी पार्श्वभूमी होती. ज्ञानेश्वरांनी दिलेल्या उत्तरांच्या आधारे मुक्ताबाई रोजच्या रोज स्वत:ची उन्नती करून घेत होती.

तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास असणारे ज्ञानेश्वर मुक्ताबाईला तत्त्वज्ञान समजावून सांगत होते. रेणू म्हणजे निरंजन आणि अणू तीच माया; या दोन्हींच्या मिश्रणातून पण त्यातही मायेच्या आधिक्यातून देहाचा जन्म होतो. वेदांचे जन्मस्थान म्हणजे ज्ञानाचे उगमस्थानही कसे देहातच आहे हे ही त्यांनी मुक्ताबाईला सांगितले. शरीरांतर्गत दहा वायूंना रेणूचा म्हणजे त्या निरंजनाचा आधार असतो पण तरीही तो त्या सर्वांपासून वेगळा असतो, असे ज्ञानेश्वरांनी सांगितले. [८] (स्वामी स्वरूपानंदकृत ‘अभंग-ज्ञानेश्वरी’त दिलेल्या टीपेत ह्या दशवायुंचे वर्णन आले आहे. ते असे - शरीरातील चालकशक्ती जी ‘प्राण’ तिचे स्थानभेदांवरून आणि कार्यभेदांवरून दहा प्रकार केले आहेत. त्यातील प्राण, अपान, व्यान, उदान, समान ह्यांना ‘पंचप्राण’ असे नाव आहे. नाग, कूर्म, कृकर, देवदत्त व धनंजय ह्यांना ‘उपपंचप्राण’ म्हणतात. ह्यांची कार्ये अनुक्रमे शिंक, जांभई, ढेकर, उचकी व शरीराला पुष्टी देणे ही आहेत.)

आध्यात्मिक रसाचे नित्यनवे सेवन करणाऱ्या मुक्ताबाईला तत्त्वज्ञानाच्या रूक्ष प्रांतात विशेष रस नसावा आणि त्याचवेळी हटातटाने काही क्रिया करून ईश्वरप्राप्ती करून घेऊ पाहणाऱ्या लोकांच्या मार्गावरही तिचा फारसा विश्वास नसावा असे दिसते. ती ह्या दोन्ही विषयांमध्ये फारशी रमत नाही.

चौऱ्यांशी योनींचा येरझारा कसा चुकेल, सर्वांतून वेगळा असणारा 'तो' हाती कसा येईल हे जाणून घेण्यातच तिला रस आहे असे दिसते. तसे ती ज्ञानेश्वरांना विचारतेदेखील, ''सर्वांतुनि वेगळा हातीं कैसा येई । म्हणे मुक्ताबाई सांगा दादा ।।'' [९]

ज्यामधून 'तो' प्राप्त होत नाही अशी कोणतीही कृती करावयाची नाही अशी मुक्ताबाईची धारणा दिसते. हे जाणवूनच की काय ज्ञानदेव आता गुरुप्राप्त मार्गाचे महत्त्व प्रतिपादन करून सांगत आहेत. आसन, प्राणायाम इ. कितीही गोष्टी केल्या आणि जर गुरुकृपा नसेल तर तो हाती लागत नाही हे त्यांनी येथे स्पष्ट केले. वर वर्णन केलेल्या दशपवनांपेक्षा आपला गुरुप्रणित सोऽहम् कसा वेगळा आहे त्याची खुबी ज्ञानेश्वर इथे मुक्ताबाईला सांगत आहेत. ते म्हणतात, ''ब्रह्मांडी रेणू नांदे सदोदित । सोहं त्याचा आंत जात असे ।। दहा पवना वेगळा सोहं तो अचळ । रेणू त्याचा खेळ सदोदित ।। ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । गुरुकृपें सोई कळो येई ।।'' [१०] सोऽहम् साधनेची ज्याला उत्तम जाण आहे त्याला ज्ञानेश्वरांच्या या विधानातील मर्म विशेषत्वाने स्पष्ट होईल.

गुरुकृपेचे महत्त्व येथे मुक्ताबाईला जाणवले आहे पण तिला प्रश्न पडतात, एखाद्यावर गुरुकृपा झाली आहे किंवा नाही हे त्याने कसे ओळखावे ? दीर्घकाळ साधना करूनही आपण कोठे आहोत, नेमक्या कोणत्या अवस्थेत आहोत याचा अंदाज आला नाही तर ? तर अशा वेळी काय करावे ? व्यास, वाल्मिकी, वेद या साऱ्यांना देखील ज्याचा पार लागला नाही असा तो, इंद्रियावेगळा, मन बुद्धि निराळा तो, सर्वांमध्ये व्यापलेला आहे हे ओळखावे तरी कसे ? मुक्ताबाई ज्ञानदादाला स्वत:चा संदेह फेडण्यासाठी विनविते. [११]

गुरुकृपा कशी असते ते आता ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईला सुंदर उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. पौर्णिमेच्या दिवशी असलेला चंद्र गुप्त व्हावा तसा जीव मायेमध्ये भ्रांत जीवन जगत असतो. आकाशात अवचित बीजेच्या कोरीचा जसा उदय होतो आणि मग पुढे पुढे तो चंद्र कलेकलेने वाढत जातो तसा जीवही जन्मानुजन्मीच्या अनेक अनुभवातून वाढत असतो, शिकत असतो, पूर्णत्वाकडे जात असतो आणि मग योग्य वेळी त्याची गुरुशी गाठ पडते. मग ते अशा जीवाला दयादृष्टीने साधनामार्ग सांगतात, मूळाकडे जाण्याचा मार्ग सांगतात.

गुरुकृपा अशी असते बाई, असे ज्ञानेश्वर म्हणतात. [१२]

सनदीमध्ये असलेल्या येथपर्यंतच्या अभंगामध्ये एक प्रकारची विचारांची सलगता आहे. सुसूत्रता आहे. आत्तापर्यंत आपण ह्या भागाचा जो विचार केला त्यावरून काही गोष्टी जाणवून जातात. हा काळ म्हणजे ज्ञानदेव आणि मुक्ताबाई यांच्या या जीवनातील, अध्यात्मप्रवासाचा सुरुवातीचा टप्पा आहे. नाथसंप्रदायाची दीक्षा लाभली म्हणून त्याविषयी एक विशेष जिव्हाळा मनात आहे, साधनामार्ग नुकताच कळलेला असल्याने साधनेविषयीची एक उत्कट अशी आवड, उत्साह मनात आहे. ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची जोडही साधनेला मिळत आहे. मुक्ताबाई स्वतःच्या साधनेच्या आधारावर ज्ञानेश्वरांना काही विचारून, समजावून घेऊ पाहात आहे. गुरुकृपा कशी असते, ती कशी ओळखावी हे जे प्रश्न तिला पडलेले आहेत ते अध्यात्म-प्रवासाच्या सुरुवातीच्या काळात पडणारे प्रश्न आहेत. तेव्हा अशा या नवोदित अध्यात्म-दशेतून 'मुक्ताबाईस दिलेल्या सनदी' ची सुरुवात होते आहे असे दिसते.

मुक्ताबाईस दिलेल्या सनदीमध्ये खोलवर अवगाहन केले असता असे लक्षात येते की, हे लिखाण टप्प्याटप्प्याने झालेले आहे. आपल्याला जाणवत राहते की, सर्वांची साधना चालूच आहे. दीर्घकाळपर्यंत चालू आहे. तत्त्वज्ञानात वर्णिलेल्या गोष्टींचा स्व-अनुभूतीच्या आधारावर पडताळा घेण्याचे काम चालू आहे. अध्यात्मप्रांतातील नवनवीन टप्पे ओलांडले जात आहेत. त्या टप्प्यावरूनही विचारांची, अनुभवांची देवाणघेवाण चालू आहे. मुक्ताबाईला आता या नवीन टप्प्यावरही काही शंका भेडसावत आहेत. त्यासंबंधी ती आता ज्ञानदादाला काही विचारू पहात आहे.

पौर्णिमेच्या दिवशी चंद्राचा अस्त व्हावा तशी आपल्या देहाची अवस्था होत असल्याचे तिला जाणवले आहे. कर्ण बंद होतात, नेत्र झाकले जातात, देह विकळ होतो, दश पवनांची हडबड उडते तेव्हा सद्गुरु सहकार्याला कसे धावून येतात ? देहाला मोक्षगती कशी प्राप्त होते ? आणि त्यासाठी कोणते साधन करावे ? हे सारे प्रश्न आता मुक्ताबाई ज्ञानदेवांना विचारू पाहते आहे. [१३]

आता या ठिकाणी, प्रश्नांचे बदलेले स्वरूप हे तिच्या बदललेल्या उच्च स्तरावरील जाणीवेतून आलेले आहे हे स्पष्टपणे जाणवते. यातील 'देहासी कैसी

झाली मोक्षगती’ हा प्रश्न विशेष लक्षात घेण्याजोगा आहे. येथे मुक्ताबाई जीवाला मोक्षगती प्राप्त व्हावी म्हणून प्रश्न विचारत नसून देहाला मोक्षगती प्राप्त होण्याविषयी काही विचारत आहे. आणि त्यासाठी ‘कोणते साधन करू दादा’ हा तिचा प्रश्न आहे. याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. कारण मुक्ताबाईला नाथसंप्रदायाच्या दीक्षेने सोऽहम् साधना आधीच मिळालेली आहे. या साधनेच्या साहाय्याने ती काही एक विशिष्ट टप्पाही चढून आली आहे आणि तरीही ती अजून साधना कोणती करावी हा प्रश्न विचारत आहे. तेव्हा देहसुद्धा परिवर्तित करण्यासाठी कोणती साधना करावी असा तिचा प्रश्न आहे हे येथे स्पष्ट होते. प्राप्त केलेल्या अवस्थेवर ती समाधानी होऊन कधीच विसावताना दिसत नाही. अध्यात्मप्रांतातील वरचे वरचे उंच टप्पे तिला खुणावत राहतात असे दिसते. अंतिमत: मुक्ताबाईने स्वत:च्या जीवनात जो स्वरूपाकार होण्याचा आणि चिरकाळ अभंग शरीर प्राप्त करून घेण्याएवढा जो विकास दाखविला, त्याच्या काही पहिल्यावहिल्या पाऊलखुणा या प्रश्नामध्ये आपल्याला पाहावयास मिळतात.

ज्ञानेश्वर म्हणत आहेत, ‘‘बाळे, देहाला ज्यामुळे मोक्ष प्राप्त होईल ते साधन ऐक. मायेसी संकल्प करावा, वज्रासन घालावे, सद्गुरुचे ध्यान करावे. ॐ हाच गुरु आणि सोऽहम् तो शिव आहे असे ओळखून या दोन्हींच्या साहाय्याने किमया साध्य करून घे. नासाग्री दृष्टी ठेव, सोहंगासी गोष्टी कर. म्हणजे रेणू, ते निरंजन तत्त्व पाठीपोटी भरले असल्याचा प्रत्यय येईल. अशा रीतीने सच्चिदानंद भरला की त्यातून महाशून्याचा उदय होईल. त्यामध्ये लीन झाले की आपपर उरणार नाही. आणि असे झाले म्हणजे सद्गुरुची खरी पूर्ण कृपा झाली असे तू समज.’’ [१४]

परंतु या एवढ्या स्पष्टीकरणाने, मुक्ताबाईला या मार्गाचा नेमका उलगडा झाला नसावा असे दिसते. मुक्ताबाईने स्वत: याचा प्रत्यय घेण्याचा प्रयत्न केला असावा पण तिला ते जमले नसावे असे दिसते. आणि म्हणूनच तुम्ही ज्या गोष्टी सांगत आहात त्या प्रत्यक्षात कशा कराव्यात ते कृपा करून मला सांगा असे ती ज्ञानदेवाला विनवत आहे. ‘कैसे वज्रासन कैसे तें मनन । इंद्रियांसी दमन कैसे करूं ।। कैसे करू दादा सोहंगासी गोष्टी । नासाग्री दृष्टी कैसी

ठेवू ।।' ह्यासारखे प्रश्न तिला पडतात. ज्ञानदादाने एवढे सांगूनसुद्धा आपल्याला ते नीटसे आकलन झाले नाही, याच्याबद्दलचे एक प्रकारचे ओशाळलेपण तिच्या मनात आहे असे येथे दिसते. आणि म्हणून ''धाकुटे भावंड घेतलीसे आळ । मुक्ताबाई लडिवाळ तुमची दादा ।।'' १५ अशा लाघवीपणाने ती ज्ञानदेवांना येथे विनवताना दिसते.

ज्ञानदेवांनी तोच भाग येथे पुन्हा उलगडवून दाखविला. ते मुक्ताबाईला सांगत आहेत, ''ज्ञानदेव म्हणे ऐका मुक्ताबाई । सद्गुरुचे पायीं मन ठेवी ।। करी निजध्यास सोहंगाचा बाई । इंद्रियासी नाही रीघ तेथे ।। ...... करूनि उपोषण मूळद्वार बुजवोन । लिंगस्थानी चरण ठेवीं बाई ।। ब्रह्मांडाहूनि ओढावा सोहंग । त्रिवेणी आसन घाली बाई ।। ॐ तोचि गुरु । सोहं तोचि शिव । या दोहींचा लाघव करींवो बाई ।। ऐक्य झाल्यावरी उठेल बंबाळा । कोटी सूर्यकळा प्रकाशल्या ।। खेचरी हे मुद्रा नासाग्री दृष्टी । स्वयंभू पाठी पोटी भरला बाई ।। ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । यापरता नाही उपदेश आतां ।।'' १६

आता मात्र मुक्ताबाईला या मार्गाचा खरा बोध झाला; नेमका उलगडा झाला. तो उलगडा झाल्यावर त्याची साक्षात प्रचीती घेण्यासाठी ती झटू लागलेली असणार हे आता येथे उघड होते. या मार्गदर्शनाच्या आधारावर मुक्ताबाईने आता कठोर साधनेमध्ये स्वत:ला गाडून घेतले असणार हे आपल्याला जाणवायला लागते. अशा कठोर तपश्चर्येचा परिणाम म्हणून एकदिवस असा आला की जेव्हा ती अस्मितापूर्वक म्हणते, ''झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई.'' त्या अनुभवाबद्दल ती ज्ञानेश्वरांना सांगू लागली,

''सहज समाधि लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी न चले पुढे ।।
खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।।
गळाली इंद्रिये राहिलेसे मन । झाले महाशून्य एकाएकी ।।'' १७

मुक्ताबाईने इतक्या अल्पावधीतच प्राप्त करून घेतलेल्या उच्च दशेची जाणीव ज्ञानदेवांना झाली. मुक्ताबाईस त्यांनी अत्यंत समाधानाने म्हटले,

''म्हणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई । उघडी समाधी घेई जगामाजी ।।
आठवे समाधिचे अंग आले तुज । आता नाही काज आणिकांसी ।।''

मुक्ताबाईने सिद्ध करून घेतलेल्या अनुभवाचे वर्णन ऐकताना ज्ञानेश्वरांना आता

सिद्ध वारशाची आठवण झाली. या सर्व नाथांनी, योग्यांनी, निवृत्तिने आपल्याला उद्धरिले आहे याची त्यांना जाणीव होते. आणि ते मुक्ताबाईस म्हणतात,

ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । निवृत्तिचे पायी सर्व सुख ।।'' [१८]

'उघडी समाधी' घेण्याएवढी मुक्ताबाईची योग्यता आहे हे ज्ञानदेवांना आता जाणवले आहे.

आता येथे मुक्ताबाईच्या सनदीतील अखेरचा भाग येतो. यामध्ये ज्ञानेश्वर सांगत आहेत,

''अठरा अभंगांची करोनी सनद । ठेवावी अखंड आपणापाशी ।।
आता हेचि गोष्टी न करी प्रगट । ठेवावी हे गुप्त आपणापासी ।।
प्रगट करितां होय मात्रागमन । ज्ञानदेव म्हणे आण निवृत्तीची ।।'' [१९]

ज्या मुक्ताबाईला आता ब्रह्मप्राप्ती झालेली आहे तिला आता ही वरील गोष्ट सांगण्याची आवश्यकता नाही, हे आपल्या लक्षात येते. आणखी एक गोष्ट अशी की, हेच गुह्यज्ञान नामदेव व कबीरांनाही लाभले असल्याचा उल्लेख याच अभंगात आहे. तेव्हा येथे एक गोष्ट निश्चितपणे जाणवते की, हा जो अठरावा म्हणजे शेवटचा अभंग आहे तो ज्ञानेश्वरांनी नंतरच्या काळात कोणा दुसऱ्या गुरुपुत्राला उद्देशून सांगितला आहे. अध्यात्म प्रांतातील या गुह्य गोष्टी इतरांसमोर उघड करू नयेत असा शपथपूर्वक आदेश ज्ञानेश्वरांनी त्याला दिला आहे, असे दिसते.

'गुरुकृपा कशी असते' ह्या मुक्ताबाईच्या प्राथमिक प्रश्नांपासून ते 'झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई' या अवस्थांतरणापर्यंतचे अगदी सुस्पष्ट असे चित्र या सनदीमधून पाहावयास मिळते. आणि म्हणून मुक्ताबाईचा ब्रह्मप्राप्तीपर्यंतचा आध्यात्मिक जीवनप्रवास पाहावयाचा झाल्यास आपल्याला या सनदीकडेच अपरिहार्यपणे वळावे लागते.

ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईला येथे एक प्रकारे सनदच दिली आहे असे दिसते. 'तुमच्या सद्‌गुरुला म्हणजे मुक्ताबाईला मी स्वतंत्र सनद दिली आहे,' असे ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानदेव तेहतिशी' मध्ये चांगदेवाला सांगितले आहे. [२०]

'सनद' म्हणजे सरकारचे शिक्कापत्र किंवा दानपत्र किंवा अखत्यारपत्र. ज्ञानदेव किंवा मुक्ताबाईचे शब्दलाघव असे आहे की, एका शब्दाला अर्थाच्या

ज्या काही छटा असतात त्या सर्वच छटा त्यांनी वापरलेल्या संदर्भात योग्यच असतात. असे त्यांच्या वाङ्मयात अनेकवार आढळून येते. तसाच हा 'सनद' शब्दही आहे.

गोरक्षनाथकृपेचा प्रसंग जेव्हा पुढे मुक्ताबाईच्या आयुष्यात घडून आला तेव्हा ज्ञानेश्वरांना ही सनदीच्या वेळी झालेली त्यांची बोलणी आठवत असावीत असे दिसते. त्यांचा हा भाव मुक्ताबाईपाशी कसा व्यक्त होतो बघू.

'तुमची मिष्टामिष्ट बोलणी । ते दर्पणाहूनि विशेष देखणी । फार विसरलो थोडी मनी । धरली आहे ती ।। १ ।। तुम्ही अगम्य गोसावी । वस्तु सांगतां नित्य नवीं । आम्ही लेकुरे लाघवी । छांदिस्तचि ।। २ ।। आम्ही आळीचे आळुकी पूर्ण । आवडी मागावे आवडे मन । ते तुमचे आम्हां बोलणे । खेळ वाटे ।। ३ ।। तुम्हांसि जें आवडी बोलावे । ते अगम्य तुम्हां आधी ठावे । आम्ही बोलू हे होईल नवे । जुनाट जुने निवृत्तिमाये ।। ४ ।।' [२१] (निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई यांचा एकत्रित असा हा उल्लेख आहे. निवृत्ति आणि मुक्ताबाई यांत भिन्नता नाही असे ज्ञानेश्वरांनी इतरत्र एका अभंगात म्हटलेच आहे.)

मुक्ताबाईची योग्यता ओळखल्यानंतर ज्ञानदेवांना प्रश्न पडला असावा की, आपल्याला लहानपणी प्रश्न विचारणारी ती हीच का ? की तिचे प्रश्न विचारणे म्हणजे एक खेळ, लीला होती ? आपण जे काही बोलू जावे ते तिला आधीच माहिती आहे तेव्हा आता बोलावे तरी कसे हा प्रश्न ज्ञानेश्वरांना पडला असावा असे येथे दिसते.

मुक्ताबाई मात्र निवृत्ति आणि ज्ञानदेव यांच्याविषयी कृतज्ञ आहे. ज्यांच्यामुळे आपल्याला उच्च दशा प्राप्त झाली त्यांच्याबद्दल मुक्ताबाईच्या मनात मात्र अपार अशी कृतज्ञतेची भावना निर्माण होते. तिच्या मुखातून असे उद्गार सहजीच प्रस्फुटित झाले,

"निवृत्ति कृपेची पाउटी । ज्ञान सोपी कुसुमकांती ।
विराली मुक्तपणाची मुक्ति । आपुलिया ।।" [२२]

**

# ताटीचे अभंग : ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत

संख्येने अल्प पण आशयाने समृद्ध असणारे असे मुक्ताबाईचे ताटीचे अभंग. लहानग्या, लडिवाळ मुक्ताईने आपल्या थोरल्या भावाची - ज्ञानदेवांची अधिकारवाणीने घातलेली समजूत हे या अभंगांचे स्वरूप आहे. मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांची समजूत काढावी असा प्रसंग कधी निर्माण झाला असावा ? ज्ञानेश्वरांनी ताटी लावून बसण्याएवढे नेमके काय घडले असावे ? याविषयी लोकमानसाने तर्क केला तो असा -

'ज्ञानेश्वरांना कोरान्न मागताना दररोज समाजाची उणीदुणी, बोलणी, अवहेलना, उपेक्षा सहन करावी लागे. एकदा हा सर्व प्रकार असह्य झाला आणि त्यामुळे विषण्ण झालेले ज्ञानेश्वर झोपडीचे दार बंद करून बसले.' [१] तेव्हा या रुसलेल्या भावाची वडिलकीच्या नात्याने मुक्ताबाई समजूत घालते ती ताटीच्या अभंगांच्याद्वारा. अशी याबाबतीत रूढ समजूत आहे.

ही समजूत रूढ होण्यास ताटीच्या अभंगांमध्ये कोणता आधार मिळतो का? हे पाहू गेले असता - 'विश्वरागे झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी' हे विधान दृष्टीस पडते. आणि त्याच्या आधारे ही आख्यायिका निर्माण झाली असावी हे लक्षात येण्यासारखे आहे.

संतसाहित्याच्या पुष्कळशा अभ्यासकांनीही हीच आख्यायिका आधारभूत धरून त्यावरून काही विवेचन केले आहे.

या अभ्यासकांच्या विवेचनातून काही गोष्टी समानत्वाने आढळतात. त्या अशा - १) ताटीचे अभंग हे आशयदृष्ट्या फारच सघन आहेत. २) मुक्ताबाईचे एक आगळेवेगळे दर्शन यामधून घडते. ३) ज्ञानेश्वरांनी आपली नेहमीची संतत्वाची पातळी सोडली आणि ते सामान्य पातळीवर उतरले आहेत; असा हा अपवादात्मक प्रसंग होय की ज्यामधून त्यांचे माणूसपण उघड होते.

परंतु ह्या कोणत्याही कल्पना मनात न बाळगता एका मोकळ्या मनाने आपण या अभंगांना सामोरे गेलो तर एक वेगळेच दर्शन यातून घडू शकते.

वरील सर्व विवेचनांसाठी, कोरान्न न मिळाल्याने रुसलेले ज्ञानेश्वर ही जी आख्यायिका आधारभूत धरली आहे त्यात काही दुवे कच्चे आहेत आणि

त्यामुळे ताटीच्या अभंगाची पार्श्वभूमी म्हणून ती आख्यायिका महत्त्वपूर्ण मानता येत नाही. याचे एक कारण असे की, निवृत्ति- ज्ञानेश्वरांना दररोजच कोरान्न मागून आणावे लागत असे. दररोज लोकांच्या निंदेला तोंड द्यावे लागत असे. तेव्हा त्याची सवय झालेल्या आणि तो अपमान नेहमीच सहन करणाऱ्या ज्ञानेश्वरांना एका विशिष्ट दिवशीच त्या गोष्टीचा राग येण्याचे काय कारण; ते स्पष्ट होत नाही.

दुसरा मुद्दा असा की, संन्याशाची पोरं म्हणून हिणवले गेलेले ज्ञानेश्वर जर रूसून बसले तर त्यांना समजावण्यासाठी मुक्ताबाईला साधी सोपी भाषाही वापरता आली असती. त्यासाठी विश्वपट, ब्रह्मदोरा अशी उच्च पारमार्थिक भाषा वापरण्याची काहीच गरज नव्हती. ताटीच्या अभंगातील उच्चस्तरीय उपदेशावरून असे वाटते की एवढे क्षुल्लक कारण त्याची पार्श्वभूमी असू शकत नाही.

आणखी एक गोष्ट अशी की, मुक्ताबाई येथे ज्ञानेश्वरांची जी विनवणी करत आहे त्यामध्ये योगी, संत, साधु असा वारंवार उल्लेख आलेला आहे.त्यांची लक्षणे ती स्पष्ट करून दाखवित आहे. आणि असे करताना, ज्ञानेश्वर हे त्या संत,साधुंसारखे आहेत हा तिचा भाव आहे हे यात स्पष्ट जाणवते. ज्ञानेश्वरांकडे पाहण्याचा मुक्ताबाईचा दृष्टिकोण कोणता होता हे वरील शब्दांमधून स्पष्ट होते. तेव्हा आपणमात्र ज्ञानेश्वरांच्या या प्रसंगाकडे 'माणूस म्हणून त्यांचे वागणे' यादृष्टीने पाहणे चुकीचे आहे; हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

याबाबतीत आणखी एक महत्त्वाची बाब विचारात घेण्याजोगी वाटते. ज्ञानेश्वरादी चारही भावंडे ही अवतारी होती आणि म्हणूनच ती सर्वजण एका असामान्य पातळीवरूनच कायम वावरताना दिसतात. अवतारी व्यक्तींच्या जीवनाचे स्पष्टीकरण करताना अध्यात्मशास्त्र असे सांगते की, मानवाला विकासाचा मार्ग दाखविण्यासाठी; 'दिव्य शक्ती' अवतारी व्यक्तीच्या रूपाने मानवी देह धारण करते, ती शक्ती मानवी प्रकृतीही धारण करते. पण असे असतानाही त्या अवतारी व्यक्तींचे, स्वत:मधील दिव्यत्वाचे भान कधीही नाहीसे होत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या या प्रसंगाचे वर्णन 'केवळ स्वत:ला कोरान्न न मिळाल्याने ज्ञानेश्वर रुसले' असे करणे म्हणजे स्वत:मधील दिव्यत्वाचे भान ते विसरले असे मानणे होय. परंतु ज्ञानेश्वर या अवतारी व्यक्तीबाबत ते शक्य नाही असे आपण मान्य करू शकतो. तेव्हा लोकांच्या स्तुतीनिंदेपलीकडे गेलेले

ज्ञानेश्वर त्यांच्यावर झालेल्या टीकेमुळे रुसून बसतात ही कल्पना मान्य होण्यासारखी नाही.

एकदा ही मिथ्या कल्पना मागे सारली तरी पुन्हा एक प्रश्न शिल्लक राहतोच. कोणत्या निमित्ताने मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना समजावून सांगत आहे ? मुक्ताबाईचे त्यांना ताटी उघडण्यास विनवणे यामागे नेमके काय दडलेले आहे ? तेव्हा त्याचा शोध घेत असता प्रस्तुत संशोधिकेस असे आढळले की,

ज्ञानेश्वरांना त्यांच्या जीवनात ज्या कटुवास्तवाला सामोरे जावे लागले त्या त्यांच्या अनुभवातून त्यांना तत्कालीन समाजाचे वास्तव दर्शन घडले. संसारतापाने त्रस्त झालेले जीव बाह्यवेषधारी ढोंगी साधुंचा आश्रय करतात हे त्यांना दिसले. तसेच या जीवांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन स्वत:च्या शब्दपांडित्याच्या आधारावर त्यांना फसवू पाहणारे पढिकजनही त्यांना दिसले. तत्कालीन पंडित वर्गाचा कटुअनुभव स्वत: ज्ञानेश्वरांनाही आला होता, हे त्यांच्या चरित्रावरून आपल्याला माहीत आहे. ''मुक्तपणे ब्रीद बांधोनिया द्विज । नेणती ते बीज केशवहरी ।।'' [२] हा मुक्ताबाईप्रमाणेच ज्ञानेश्वरांचाही अनुभव होता. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीस पडले ते त्या पंडितांचे शब्दपांडित्य आणि त्या आधारावर परिपुष्ट झालेला त्यांचा अहंमन्य भाव. आपल्याला सारे काही कळते या त्यांच्या भूमिकेतून त्यांच्याकडून खऱ्या ज्ञानी व्यक्तींची होणारी उपेक्षा ज्ञानेश्वर पाहत होते, स्वत: अनुभवत होते.

आणि या सर्वांचा एक परिणाम म्हणून ज्ञानेश्वरांनी स्वत:च्या मनाशी असा निर्णय घेतला असावा की आता पुरे झाले, या लोकांचा संपर्कही नको आणि त्यांना काही सांगणे, शिकविणेही नको. आपण स्वत: आपल्या आत्मस्थितीत कायम राहावे हेच बरे. हा त्यांचा निर्णय म्हणजे ज्ञानेश्वरांनी ताटी लावून स्वत:ला बंदिस्त करून घेणे होय.

ज्ञानेश्वर येथे संतप्त झाले आहेत ही गोष्ट येथे उघड आहे. ''अहो क्रोधे यावे काठे । अवघे आपण निघोटे ।।'' [३] अशी समजावणी मुक्ताबाई येथे करताना दिसतात. यावरूनही ज्ञानेश्वर क्रोधाविष्ट झाले आहेत हे लक्षात येते. ती गोष्ट नाकारण्याचे काहीच कारण नाही.

यासंबंधी असेही एक मत आढळते, '... ज्ञानेश्वर खरोखरच कोणावर तरी

रागावले असतील आणि मुक्ताबाईने त्यांना उपदेश केला असेल हेच मुळी संभवनीय वाटत नाही.' [४]

परंतु हे मत जसेच्या तसे स्वीकारता येत नाही. ज्ञानेश्वर स्वत:च्या झालेल्या वैयक्तिक अपमानाने रागावणे संभवत नाही, हे मान्य. परंतु म्हणून संत झाला की तो रागावतच नाही असे नाही. मात्र ह्या संतापाचे स्वरूप फार भिन्न असते. स्वत:च्या संकुचित बुद्धीतून आलेला तो स्वार्थी संताप नसतो. तर संतांचे मन हे विश्वमनाशी तादात्म्य पावलेले असल्याने विश्वमनावरच जेव्हा काही आघात होण्यासारखी परिस्थिती समोर येते तेव्हाच ते संतापतात. खऱ्या शुद्ध ज्ञानावर शब्दपांडित्याची होणारी कुरघोडी ही एकंदर समाजमनावरच आघात करणारी घटना होती. आणि त्याचा संताप ज्ञानेश्वरांना येणे ही घटना संतत्वाच्या पातळीवरही सहज स्वाभाविक आहे. त्यात त्यांचा कमीपणा नाही किंवा त्यामुळे त्यांचे श्रेष्ठत्व तसूभरही कमी होत नाही.

सर्वत्र दिसून येणारे शब्दपांडित्य बघून संतप्त झालेले ज्ञानेश्वर ज्ञानाची कवाडे झाकून बसले ह्या कल्पनेला प्रत्यक्षात कोणता आधार मिळतो का ते आता आपण पाहू. ताटीच्या अभंगामध्ये अगदी सुरुवातीसच असा उल्लेख येतो, 'शब्दशास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।।' [५] यातील 'शब्दशास्त्रे' हा शब्द महत्त्वपूर्ण आहे. लोकांच्या शब्दांनी नव्हे, लोकांनी लावलेल्या बोलांमुळे नव्हे तर शब्दशास्त्रामुळे क्लेश व्हावा अशी काहीतरी परिस्थिती याला कारणीभूत झाली असली पाहिजे हे यामधून उघड होते. पोकळ शब्दशास्त्राच्या भाराने दडपून जाणारी व नागविली जाणारी सामान्य जनता पाहून ज्ञानेश्वरांचे अंत:करण कळवळले असणार ही जी कल्पना आपण केली ती यास धरून आहे हे येथे स्पष्ट होते.

स्वत: ज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंगातही त्यांच्या 'स्वत:ला बंदिस्त करून घेणे' या कृतीला पूरक असे विचार येतात. तो अभंग मुळातूनच अभ्यासण्यासारखा आहे.

'अज्ञान स्वरूप निज विचारिता । संदेह तत्त्वता घालिताती ।।
कैचि गा विश्रांति दुर्जनाच्या संगी । दाटोनिया भोगी नरक दु:ख ।।
विषयाकारणे जाहले गुरु शिष्य । अनुभव अभ्यास स्वप्नी नाही ।।

शब्दचि करूनि बोलताती ब्रह्म । अंतरीचे वर्म नेणतीच ।।
तयाची संगती त्यजी ज्ञानेश्वर । जाहला निर्विकार संतसंगे ।।' [६]

यातील शेवटच्या दोन ओळी यासंदर्भात विशेष मननीय आहेत. 'तयांची संगती त्यजी ज्ञानेश्वर' इतक्या भूमिकेपर्यंत ज्ञानेश्वर जाऊन पोहोचले आहेत. ज्ञानाची कवाडे त्यांनी मिटून घेतली आहेत. एका कोशामध्ये त्यांनी स्वत:ला बंदिस्त करून घेतले आहे. ताटी लावून घेतली आहे.

तेव्हा जनकल्याणाची व्यापक तळमळ मनात बाळगणारी मुक्ताबाई पुढे सरसावते. ज्ञानेश्वरांचे हे स्वत:ला बंदिस्त करून घेणे, ज्ञानाची कवाडे अशा रितीने मिटून घेणे हे जनसामान्यांच्या दृष्टीने हितावह नाही हे तिच्या लक्षात येते. शब्दशास्त्राच्या पोकळ डामडौलाने व्यथित झालेले, जगाकडे पाठ फिरवून स्वत:च्या आत्मोन्नतीचा विचार करणारे ज्ञानेश्वर जेव्हा तिच्या नजरेस पडतात तेव्हा ती त्यांना तसे न करण्याविषयी विनवते आहे. ही विनवणीच ताटीच्या अभंगांच्या द्वारा शब्दबद्ध झाली आहे.

स्वत:चे परिणत स्वरूपाचे ज्ञान लोकांसमोर खुले करावे अशी विनवणी शुद्ध लोककल्याणाच्या भूमिकेतून मुक्ताबाई करतात. आणि म्हणूनच स्वत:चा राग आवरावा अशी सीमित विनवणी त्या करीत नाहीत तर ज्ञानेश्वरांनी पुढे ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान मांडले आहे त्याचा अर्करूप विचारच जणू त्या ज्ञानेश्वरांसमोर मांडतात. हे समग्र तत्त्वज्ञान लोकांसमोर खुले करावे हीच विनवणी या अभंगांमध्ये आहे.

''सुख सागर आपण व्हावे । जग बोधे निववावे ।।
बोधा करू नये अंतर । साधुस नाही आपपर ।।'' [७]

असे त्या ज्ञानेश्वरांना सांगतात. ज्ञानेश्वरांच्या जीवितकार्याचीच जाणीव एकप्रकारे मुक्ताबाई त्यांना करून देतात असे दिसते.

स्वत:ला आत्मसुखामध्ये लीन करून घेणे, ज्ञानाची कवाडे अशा प्रकारे झाकून घेणे ही गोष्ट उच्च आध्यात्मिक पातळीवरून पाहता संकुचितपणाची आहे हेच मुक्ताबाई येथे ज्ञानेश्वरांना जणू समजावून सांगत आहेत.

यासंदर्भात अगदी अलिकडच्या काळातील समांतर असा प्रसंग लक्षात घेणे उपयुक्त ठरेल. स्वामी विवेकानंदांना अवतीभवतीच्या अज्ञानी जीवांच्या

कल्याणापेक्षाही निर्विकल्प समाधीची ओढ तीव्रतेने लागली होती यासंदर्भात रामकृष्ण परमहंसांनी त्यांना समज दिली, ''कुठे योग्यवेळी एखाद्या विशाल वटवृक्षासमान वाढून शेकडो हजारो लोकांना शांतीची सावली देशील ते सोडून स्वत:च्या मुक्तीसाठीच सारखी तडफड ? इतके क्षुद्र ध्येय तुझे ?'' [८]

ज्ञानेश्वरांच्या बाबतीत हे कार्य मुक्ताबाईने केले आहे.

''माया समूळ नुरे जेव्हा । विश्व ब्रह्म होईल तेव्हा ।
ऐसा उमज आदिअंती । मग सुखी व्हावे संती ।।'' [९]

असे मुक्ताबाई येथे म्हणतात. विश्व जेव्हा ब्रह्म होईल तेव्हाच संतांनी सुखी व्हावे. ते होत नाही तोपर्यंत मध्येच स्वत:च्या आत्मसुखामध्ये मग्न राहावे आणि विश्वाला मायेच्या हाती तसेच सोपवून द्यावे ही भूमिका संतांने घेणे योग्य नाही ह्याची स्पष्ट जाणीव मुक्ताबाई येथे देताना दिसतात.

ज्ञानेश्वरांच्या अवतारकार्याच्या प्रयोजनाचीच मुक्ताबाई येथे त्यांना जाणीव करून देत आहेत. ज्ञानेश्वर जर दीर्घकाळ अशा रीतीने आत्ममग्न अवस्थेत राहिले तर ते या भौतिक सृष्टीत देहाने फार काळ राहू शकणार नाहीत याचीही जाणीव मुक्ताबाईला असावी आणि तसे होऊ नये म्हणून मुक्ताबाई येथे विनवणी करत आहेत.

या सर्व प्रसंगामध्ये मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना उद्देशून जे संबोधन वापरले आहे तेही यासंदर्भात पुरेसे बोलके आहे. ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई यांच्या संवादामध्ये मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना 'दादा' म्हणून एरवी संबोधताना दिसतात. परंतु येथे मात्र ज्ञानेश्वरांना दादा म्हणून न संबोधता त्या ज्ञानेश्वर नावाचा स्पष्ट उल्लेख करताना दिसतात. 'ज्ञानाच्या ईश्वराने' असे ज्ञानाची कवाडे लावून बसणे योग्य नाही हेच त्यातून त्यांना सूचित करावयाचे असावे, नाही का ?

''जीभ दातांनी चाविली । कोणे बत्तिशी तोडिली ।।'' [१०]

असा रोकडा सवाल मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना करतात. मूठभर पंडितांच्या वागण्याचा परिणाम साऱ्या समाजाला का भोगायला लावावा ? त्याची शिक्षा म्हणून सारा समाज या ज्ञानापासून वंचित ठेवावा का ? असा गहन प्रश्न मुक्ताबाई येथे करताना दिसतात.

'एक आपण साधु झाले । येर कोण वाया गेले ।।' [११]

ही ज्ञानेश्वरांची याबाबतीतली भूमिका योग्य नसल्याचे मुक्ताबाई येथे स्पष्टपणे सांगतात. ज्ञानाची कवाडे बंद करून नव्हे तर शुद्ध ज्ञान सांगितल्यामुळे ती व्यक्ती इहपरलोकी सुखी होते हेही त्या स्पष्ट करतात.

''लोभ अहंता न ये मना । जगी विरक्त तोचि जाणा ।।
इहपरलोकी सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ।।'' [१२]

अशा शब्दात अगदी परखडपणे मुक्ताबाई येथे ज्ञानेश्वरांना समज देतात.

मुक्ताबाईच्या या सांगण्याचा परिणाम म्हणून ज्ञानेश्वर स्वत:च्या भूमिकेतून बाहेर आले असतील हे समजण्यासारखे आहे.

ताटीच्या अभंगांचे सामर्थ्य एवढे आहे की त्यामुळे समाजविन्मुख झालेले ज्ञानेश्वर विश्व तारण्यासाठी पुन्हा एकदा कटिबद्ध झाले आहेत. शुद्ध ज्ञानापासून वंचित झालेल्या जनसामान्यांमध्ये ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची प्रतिज्ञा करून ज्ञानप्रदानाला उद्युक्त झाले आहेत. यातून प्रेरित होऊन पुढे भावार्थदीपिकेची (ज्ञानेश्वरीची) निर्मिती झाली आहे, असे वाटते.

खरोखरच हे सर्व या पद्धतीने जर घडले असेल तर मुक्ताबाईचे श्रेष्ठत्व केवढी असामान्य उंची गाठते हे पाहून मन थक्क होते. भावार्थदीपिकेच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत या स्वरूपात मुक्ताबाईचे एक आगळेवेगळे दर्शन येथे घडते.

आणि एवढे असूनही, स्वत:च्या योग्यतेविषयी कोणतीही अहंता मुक्ताबाईच्या मनात नाही. उलट स्वत:ची योग्यता ज्ञानेश्वरांपेक्षा कमी आहे असे मनोमन जाणून कोणी कोणा शिकवावे असा प्रश्नही त्या करतात. आणि पुन्हा आपले म्हणणेही ज्ञानेश्वरांना विदीत करतात.

'तुम्ही तरुनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।' [१३]

**

# ज्ञानबोध ग्रंथ – एक ‘अपूर्व’ उपलब्धी

ग्रंथलेखनाची भूमिका मनात बाळगून तयार झालेली मुक्ताबाईकृत एक अपूर्व रचना म्हणजे ‘ज्ञानबोध’ हा ग्रंथ होय. निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई यांच्यातील संवाद हे या ग्रंथाचे बाह्यरुप आहे. तर ब्रह्म आणि माया यासंबंधीचे मुक्ताबाईचे आकलन हा या ग्रंथाचा आशय आहे. या ग्रंथाचा सखोल विचार करण्यापूर्वी त्याच्या उपलब्धीसंबंधी जाणून घेणे उचित ठरेल.

**ज्ञानबोध ग्रंथाची उपलब्धी –** ‘नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालय प्रकाशन’तर्फे संपादक श्री.सुरेश जोशी यांनी १९७६ साली ‘निवृत्ति-मुक्ताई संवादरुप ज्ञानबोध’ ग्रंथ प्रथमत: प्रकाशित केला. या ग्रंथासंबंधीचा तपशील श्री.जोशी यांनी पुरविला आहे तो असा की, हा ग्रंथ संस्थेच्या हस्तलिखित संग्रहातील आहे. या ग्रंथाची लांबी १७ सेमी व रुंदी १० सेमी असून तो चोपड्याप्रमाणे वरच्या बाजूस शिवलेला आहे. एकूण ११० पाने या हस्तलिखिताची आहेत.

या ग्रंथाच्या अखेरीस वा मध्ये कोठेही कालनिर्देश केलेला नाही. त्यामुळे ह्या मुळग्रंथाची रचना वा नक्कल निश्चित केव्हा झाली हे ठरविणे कठीण आहे.[१]

**ज्ञानबोध ग्रंथाची रचनापद्धती –** हा ग्रंथ अभंगात्मक असून त्याचे एकूण तीन भाग आहेत. पहिल्या भागात निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला १२६ अभंगांमधून काही प्रश्न विचारले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे मुक्ताबाईनी द्यावी म्हणून वारंवार विनवणीही केली आहे. दुसऱ्या भागात निवृत्तिनाथांनी विचारलेल्या प्रश्नांना मुक्ताबाईनी ५६ अभंगांमध्ये उत्तरे दिली आहेत. त्यावर पुन्हा निवृत्तिनाथांनी एका अभंगातून प्रश्न विचारावा त्याचे पुढील अभंगामध्ये मुक्ताबाईने उत्तर द्यावे या पद्धतीने एकूण २१ अभंग तिसऱ्या भागात आले आहेत.

**ग्रंथनिर्मितीचा काळ –** या ग्रंथामध्ये कोठेही रचनाकाळाचा निर्देश केलेला नाही हे आपण पाहिले. त्यामुळे या ग्रंथाची निर्मिती कधी झाली असावी यासंबंधी काही अंदाजच बांधावे लागतात. मुक्ताबाईच्या स्वरुपाकार होण्याच्या

काही दिवस आधी या ग्रंथाची निर्मिती झाली असावी असे या ग्रंथाच्या आशयावरून सूचित होते. या अंदाजाला काही प्रमाणे आधार म्हणून देता येतील.

१ ) याला सर्वात मोठा आधार सांगता येतो तो नामदेवगाथा आणि ज्ञानबोध ग्रंथ यातील आंतरिक सुसंगतीचा. ही आंतरिक सुसंगती पाहून मन आश्चर्यचकित व्हावे इतके विलक्षण साम्य या दोन्हीमध्ये आहे. त्याचा तपशील असा :

नामदेवगाथेमध्ये श्रीमुक्ताईची समाधी या शीर्षकाखाली जो भाग आला आहे त्यामध्ये ''निवृत्तिने एकांत केला मुक्ताईशी । गमन कोणे दिवशी आरंभिले ।।'' [२] असा प्रश्न निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला तिच्या समाधिसंबंधाने विचारलेला आहे असा उल्लेख येतो. निवृत्तिनाथांच्या नेमक्या याच प्रश्नाचा संदर्भ ज्ञानबोध या ग्रंथामध्ये असा येतो :

'धूपदीप नैवेद्य समिधा फळे सकळ । पाहु आता स्छळ समाधिचे ।।<br>
तीळ आणि तांदुळ गंध आणि अक्षता । रिघो आता माथां एकांताच्या ।।<br>
राहिल्या साहित्याची गुरु याद देरे । अनाथा हाते घेरे पुजा आपुली ।।<br>
निवृत्तिदेव म्हणे दीवस कवण । कोणते दीशे गमन तेही सांगा ।।' [३]

२ ) निवृत्तिनाथ मुक्ताबाईला तिने बोलावे म्हणून विनवणी करताना म्हणतात, ''क्षणभंगुर शरिर धरिले असे आम्ही । राहातिल बोलणि ऐकावयाचि ।। अधीर शरीर नेणो जायिल केव्हा । वासनेच्या शिमा आड आल्या ।।'' [४] आता हे शरीर फारा दिवसांचे सोबती नाही हाच निवृत्तिनाथांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. तेव्हा निवृत्तिनाथांच्या व मुक्ताबाईच्या समाधिच्यापूर्वी काही दिवस आधी हा ग्रंथ निर्माण झाला आहे हे उघड आहे.

३ ) निवृत्तिनाथ दीर्घकाळपर्यंत प्रश्न विचारत आहेत. परंतु या प्रश्नावर कोणतेही उत्तर मुक्ताबाई देत नाही हे पाहून तिने आपले मौन सोडावे, याविषयी निवृत्तिनाथ मुक्ताबाईची वारंवार विनवणी करताना दिसतात. असे असण्याचे काय कारण याचा विचार केला तर असे दिसते की, ''वेधली चित्तवृत्ती स्वरुपी निमग्न । नाही देहभान मुक्ताबाईला ।।'' [५] ही मुक्ताबाईची अवस्था आहे. मुक्ताबाई आपल्या स्वरुपामध्ये निमग्न असल्याने तिला देहभान

उरलेले नाही. स्वत:च्या अवस्थेमध्ये ती मग्न आहे. म्हणून प्रश्नांची उत्तरे देण्याच्या मनस्थितीत ती नाही असे दिसते. परंतु सद्गुरुंनीच बोलण्यास प्रवृत्त केले असल्याने मुक्ताबाई नंतर बोलताना दिसते व त्यातूनच या ज्ञानबोध ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

४ ) मुक्ताबाईच्या एका अभंगामध्ये ''न दीसावा ग्रंथ न दीसावे चरित्र । जैसे पात्रा श्रेष्ठ पात्र भोगावती ।।'' [६] असा भोगावती नदीचा उल्लेख आलेला आहे. भोगावती ही तापीची उपनदी असून ती वरणगाव व त्या जवळच्या परिसरातून वाहते. वेरुळ-घृष्णेश्वर करून ही मंडळी जेव्हा महत्ग्रामाच्या दिशेने निघाली तेव्हा या ग्रंथाची रचना झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

५ ) या ग्रंथामध्ये फक्त निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई यांचाच संवाद आहे. ज्ञानेश्वर आणि सोपानदेव यांचा संबंध येथे आलेला दिसत नाही. तेव्हा या दोघांच्या समाधिस्थ होण्यानंतरचा हा काळ असल्याचे येथे स्पष्ट होते.

वरील सर्व प्रमाणांवरून, ज्ञानबोध या ग्रंथाची रचना मुक्ताबाईच्या स्वरूपाकार होण्यापूर्वी काही दिवस आधी झाली असावी असा अंदाज करता येतो.

**ज्ञानबोध ग्रंथाचे 'लेखकु' निवृत्तिनाथ-** ज्ञानबोध या ग्रंथाचे स्वरूप लक्षात घेतले तर एक गोष्ट जाणवेल की यातील 'प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग' हा भाग मुक्ताबाईने कथन केलेला आहे. 'सममेळ बोलणे उभयताचे' ह्या संवादामध्येही मुक्ताबाईचा सहभाग आहे. अर्थात मुक्ताबाईने हे सारे मौखिक स्वरूपात सांगितले आहे हे आपल्या लक्षात येते. मग प्रश्न असा निर्माण होतो की ह्या साऱ्या बोधास लेखी स्वरूप कोणी दिले असावे ? मुक्ताबाई येथे जी बोलती झाली आहे ती सुद्धा खूप दीर्घकाळानंतर, खूप विनवणीनंतर. कारण ती त्या मन:स्थितीतच नाही. तेव्हा अशा परिस्थितीत ती स्वत: काही ह्याचे लेखन करून ठेवेल हे संभवत नाही.

मग विचार येतो की, ह्या बोधाच्या वेळी उपस्थित असलेल्या नामदेव इ.पैकी कोणी हे लेखन केले असावे का ? पण हा विचार लगेचच मावळतो कारण ह्या ग्रंथात निवृत्ति आणि मुक्ताबाई या गुरुशिष्यांचे खाजगी संवादही

आलेले आहेत. तेव्हा शक्यता शिल्लक राहते ती फक्त निवृत्तिनाथांचीच. निवृत्तिनाथांनीच ह्या ज्ञानबोधाचे महत्त्व ओळखून ते लिखित स्वरूपात नोंदवून ठेवले असावे अशी शक्यता आहे. पण आपल्या या अंदाजाला आधार काही मिळतो का ते पाहू.

नामदेव निवृत्तिनाथांच्या समाधीचे वर्णन करत आहेत. त्यामध्ये मुक्ताबाईसंबंधीच्या आठवणी निवृत्तिनाथांच्या मनात येत आहेत, हा सर्व भाग येऊन जातो. निवृत्तिनाथांनी समाधी घेण्यापूर्वीचे नमनही केले आहे. आणि आता उल्लेख येतो तो प्रत्यक्ष समाधीच्या वेळचा. ''निवृत्तिदेवें ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर विठोबाच्या ।'' [७] निवृत्तिनाथांनी या ज्ञानबोधाचे सार रूपात लिखाण केले असावे आणि तोच ग्रंथ विठोबाच्या पुढे ठेवला असावा. आपल्या अंदाजाशी मिळताजुळता असा हा उल्लेख आहे.

आता या ग्रंथाच्या अंतरंगाकडे वळूया.

**निवृत्तिनाथांनी केलेली विनवणी –** प्रथम १२४ अभंगांच्या माध्यमातून निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला प्रश्न विचारले आहेत. ज्ञानबोध या ग्रंथाची रचना अशी असावी असे अभ्यासांती जाणवते, चांगदेवांची समाधी झाल्यानंतर निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, नामदेव व इतर शिष्यमुदाय असे सर्व मुक्ताबाईच्या समाधिस्थानाकडे निघाले आहेत. मुक्ताबाई आता अधिकाधिक आत्ममग्न होत चालली आहे. निवृत्तिनाथांनाही आपला अंतकाळ जवळ आलेला जाणवत आहे. तेव्हा मुक्ताबाई, जी आध्यात्मिकदृष्ट्या आपल्यापेक्षाही प्रगत आहे तिला, काही प्रश्न विचारून त्या प्रश्नांची वेळीच उकल करून घ्यावी ही निवृत्तिनाथांची भूमिका आहे.

योग्याची जननी, सखी, मायबहीण, अनाथाची कासी, अनाथाची माऊली अशा अनेक स्वरूपात निवृत्तिनाथांना मुक्ताबाईचे दर्शन घडत आहे. वेदापासूनचा भेद तुला ठाऊक आहे, तू अरुपाच्या शेजारी होतीस म्हणून तुला हे सर्व ज्ञान प्राप्त झाले आहे. ''कोठे काय याचा पाहावा आद अंत । तुजवीण वाट उमजेना ।।'' [८] अशा भावनेतून निवृत्तिनाथ मुक्ताबाईला विचारू पाहत आहेत.

दीर्घकाळपर्यंत निवृत्तिनाथ प्रश्न विचारत आहेत. मुक्ताबाईची कृपा व्हावी अशी दीर्घकाळ याचना करत आहेत, विविध प्रकारे ही विनवणी ते करत

आहेत. ‘‘निवृत्तिदेव म्हणे करितो विनवणि । मस्तक चरणी ठेऊनिया ।।’’ [९] अशा तऱ्हेने निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला विनवले आहे. माता, बालक, गुरुशिष्य इ. भावनांनी त्यांनी तिला आळवले आहे. ती धाकटी बहीण असल्याने तिला भीड पडत असेल असे वाटून त्याचेही निराकरण निवृत्तिनाथ करतात, ‘‘लडीवाळ म्हणोनी सलगीचे चाड । बोलण्याची भीड वाटो नेदी ।। भिडेची ही चाड आम्हा नाही नाही । निभीड होऊनिया पाई जोडीयले ।।’’ [१०] असे ते सांगतात. तरीही ती काही उत्तर देत नाही हे पाहून का ‘‘धरिले गूढ बोलनास काही । मजविषयी संदेह काय जाला ।।’’ [११] असेही ते तिला विचारतात. ‘‘काही म्या मागुते केले नाही पुण्य । नायेके बोलणे सद्गुरुचे ।।’’ [१२] अशी शंकाही त्यांच्या मनात येते. बालकाची भूमिका, शिष्याची  भूमिका घेऊन ते विनवत आहेत. ‘दारीचा कुत्रा’ ही उपमादेखील त्यांनी स्वत:साठी योजली आहे. परंतु या सर्वावर  कोणतेच उत्तर मुक्ताबाई देताना दिसत नाहीत. त्यांचे मौन कायम आहे.

तेव्हा ‘मुक्ताबाईनेच जर आपल्याला हे ज्ञान दिले नाही तर ते दुसरे कोणीच देऊ शकणार नाही’ [१३] इतक्या निर्वाणीच्या विचारापर्यंत जाऊन ते मुक्ताबाईला विनवितात. दीर्घकाळपर्यंत वाट पाहूनही उत्तर मिळत नाही म्हणून निवृत्तिनाथ अधीर झाले आहेत असेही वर्णन त्यांच्या अभंगातून येते. मुक्ताबाई उत्तर देत नाहीत हे पाहून कधीकधी तिच्याबद्दल काहीसे अनुदार उद्गारही त्यांनी काढले आहेत. अर्थात हे उद्गार सारे बंधुप्रेमातूनच आलेले आहेत हेही आपल्या लक्षात येते. ‘‘उघडीले धन चांगदेवा वेळें । आम्हा वेळे फळे वसडुन गेली ।।’’ [१४] असेही ते बंधुत्वाच्या नात्याने सांगून पाहतात.

निवृत्तिनाथ मुक्ताबाईची करत असलेली विनवणी मुळातूनच पाहण्याजोगी आहे. अत्यंत हृद्य असे सारे ते वर्णन आहे. एक सद्गुरु शिष्याची महती जाणून स्वत:चे थोरपण विसरुन त्याच्या पायी कसा लीन होतो याचा हा एक आदर्श नमुना आहे. ‘थोरपणाचे सांडियले ब्रीद । जोडुनिया कर मागती पै ।।’ [१५]  ही आपली भूमिका असल्याचे ते स्पष्ट करतात. एवढे होऊनही मुक्ताबाई उत्तर देत नाहीत हे लक्षात येऊन आता ते उत्तर कदाचित कधीच मिळणार नाही हेही हळूहळू त्यांच्या लक्षात येत असलेले दिसते. मुक्ताबाई आपल्या आत्ममग्नतेतून आता बाहेर पडणे शक्य नाही अशी  आता  खात्रीच

जणू त्यांना पटत चालली आहे, असे दिसते. आणि म्हणून आता नाईलाजाने, स्वस्थ बसण्याशिवाय पर्याय नाही हे जाणवून शेवटी त्यांनी स्वत:च्या मनाची समजूतही घातली आहे.

**निवृत्तिनाथांनी विचारलेल्या प्रश्नांचे स्वरूप –** निवृत्तिनाथ जे प्रश्न विचारत आहेत त्यांची त्या प्रश्नांच्या स्वरूपावरून तीन भागात विभागणी होऊ शकते. (प्रश्न विचारत असताना निवृत्तिनाथांनी ते प्रश्न असे विभागश: विचारलेले नाहीत. विवेचनाच्या सोयीसाठी आपण त्यांचा विभागश: विचार करत आहोत, हे येथे नमूद करावेसे वाटते.) यातील काही प्रश्न अगदी साधे, सोपे असे आहेत की ज्यांची उत्तरे स्वत: निवृत्तिनाथांनाही माहिती असणार. परंतु केवळ समवेत असलेल्या इतर शिष्यवर्गाखातर त्यांनी ते विचारले असावेत. ते प्रश्न या शिष्यांचे असावेत. निवृत्तिनाथांच्या माध्यमातून त्यांनी ते प्रश्न मुक्ताबाईला विचारले असावेत. हे जे प्रश्न ते विचारत आहेत ते केवळ अवतीभवती असलेल्या शिष्यांच्या शंकासमाधानाखातर असावेत असे वाटते. मनाचे चंचलपण, प्रपंचात राहून परमार्थसिद्धीचा उपाय, वैराग्य यासंबंधीही साधकांना उपयुक्त प्रश्न निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला विचारले आहेत. निवृत्तिनाथांसारख्या व्यक्तीला भेडसावतील अशा प्रकारचे ते प्रश्न नाहीत. आणि हेच मुक्ताबाईला जाणवत असावे. ती त्यांना म्हणते, ''म्हणे मुक्ताबाई हे नासिवंत पुसणे स्वामीसी कारणे काय जाले ।।'' [१६]

दुसरे प्रश्न शुद्ध तत्त्वज्ञानपर आहेत. सृष्टीच्या उत्पत्तीचे गूढ आकलन करून घेण्याची जिज्ञासा त्यात स्पष्ट जाणवते. निराकार वस्तु आकारास कशी आली ? शीवाचे जीवपणात रुपांतर कसे झाले ? मरते ते काय जन्मा येते कोण ? हा अनाम गोसावी भ्रमला कैसा ? यासारखे तत्त्वज्ञानात्मक म्हणता येतील असे प्रश्न विचारले आहेत. हे सारे विचारण्यापाठीमागची निवृत्तिनाथांची भूमिका काय असावी हा प्रश्न मनात येतो.

एक गोष्ट येथे लक्षात घेण्याजोगी आहे. येथे निवृत्तिनाथ मुक्ताबाईकडे केवळ पाठची बहीण या नात्याने पाहत नसून ती साक्षात आदिमाया आहे, पराप्रकृती हे तिचे मूळ स्वरूप आहे या भावनेने तिला काही विचारत आहेत. 'वेदापासुनिया भेद ठावा तुला' [१७] यासारख्या निवृत्तिनाथांच्या वचनांमधून त्याची

कल्पना येते. आणि मग निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईस हे प्रश्न विचारावेत यामागील कारण लक्षात येते. एरवी जे सद्गुरुपदी आरुढ आहेत, जे सर्वज्ञानी आहेत त्यांनी हे प्रश्न विचारण्याचे काय कारण असा प्रश्न उपस्थित होऊ शकला असता. परंतु त्यांची वरील भूमिका लक्षात घेतल्यानंतर ही शंका शिल्लक राहू नये.

आदिमाया स्वरूप असलेल्या मुक्ताबाईने आपल्या स्वमुखाने ब्रह्म आणि माया यांच्या स्वरुपाची चिकित्सा करावी यापेक्षा विलक्षण गोष्ट दुसरी कोणती असू शकेल ? आणि हे जाणूनच निवृत्तिनाथ इथे मुक्ताबाईला बोलते करु पाहत आहेत.

तिसरे जे प्रश्न आहेत त्यांचे स्वरूप फार भिन्न आहे. ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि निवृत्तिनाथ यांनी तिघांनी ठरवून विधीपूर्वक समाधी घेतलेली आहे असे दिसते. पण मुक्ताबाईची समाधी इतरांपेक्षा भिन्न आहे. तिचे शरीर चिरकाळ अभंग निरंतर राहणार आहे. ती आपल्यापेक्षा काही वेगळ्या, अधिक प्रगत अशा मार्गाचे अनुसरण करत आहे याची सुस्पष्ट जाणीव निवृत्तिनाथांना आहे. तेव्हा अशा प्रगत मार्गाचे काही कवडसे मिळवण्याचा प्रयत्न येथे निवृत्तिनाथ करताना दिसतात. ते म्हणत आहेत, '' निवृत्तिदेव म्हणे सांग अणुभवासी । तुम्ही जे येके देसी नांदत आहां ।।''[१८] मुक्ताबाई ज्या उच्चस्थानी जाऊन नांदत आहेत तेथील अनुभव त्यांनी आपणास सांगावा ही इच्छा निवृत्तिनाथ येथे व्यक्त करतात. ह्या मार्गावर वाटचाल करण्यासाठी आपल्याला, मुक्ताबाईने मार्गदर्शन करावे अशी इच्छा व्यक्त करणारे निवृत्तीनाथांचे अभंग वारंवार येथे येताना दिसतात.

**गोरक्षनाथ भेटीविषयी तळमळ –** या संपूर्ण ग्रंथात एक अंत:सूत्र सहजी खेळले असल्याचे आपल्या लक्षात येते. त्याला पार्श्वभूमी आहे ती पुन्हा मुक्ताबाई–गोरक्षनाथ यांच्या भेटीची ! या अनुभवानंतर मुक्ताबाईची अवस्था बदलली आहे. बदललेल्या उच्च अवस्थेत ती आता पुढील वाटचाल करत आहे. या अमृतसंजीवनीचा हा जो अनुभव तिला आला, त्या अनुभवाच्या स्थिरीकरणाचे काम या कालखंडात मुक्ताबाईच्या अंत:जीवनात चालू असावे, असे दिसते.

निवृत्तिनाथांच्या तोंडी 'साधनाचे बीज कल्पना हे मनी, आम्हा आर्थे

स्वामी उठावला'[१९] असे विधान येते. गोरक्षनाथभेटीच्या क्षणांची आठवण निवृत्तिनाथांना येत आहे हे सूचित करणारे हे विधान आहे. गोरक्षनाथ भेटीच्या अनुभवाची आठवण निवृत्तिनाथांच्या मनात रेंगाळते आहे.

त्या अनुभवाच्या वर्णनानेच या ग्रंथाची सुरुवात होते आहे. ''तयाचिया प्रकाशे शोधीयले मन । माझे मज धन सापडले ।।''[२०] ह्या विधानात गोरक्षनाथ भेटीच्या वेळी जे अनुभवरुपी धन सापडले त्याचे हे वर्णन आहे. परंतु त्या धनाची उंची, खोली मला कळली नाही असे ते म्हणत आहेत. तेव्हा त्याबद्दल बोलण्यासाठी मुक्ताबाईशिवाय योग्य गुरु तो कोण मिळणार असा प्रश्न निवृत्तीनाथ करतात. ह्याबद्दलचे गुह्य निवृत्तिनाथ मुक्ताबाईस विचारत आहेत.

गोरक्षकृपेच्या अनुभवाबद्दल ते मुक्ताबाईस विचारत आहेत, ''काशावरुनि कळले हेचि परब्रह्म । मा जन्ममरण चुकविले ।।''[२१] (गोरक्षकृपेच्या अनुभवानंतरच मुक्ताबाईला मरण चुकविल्याची म्हणजे 'चिरकाळ अभंग' देहाची ग्वाही मिळालेली आहे.)

'येडा ना बावळा दीसतोये पीसा अशा जुनाटांची नांदणी ऐकावी' अशी तृषा आपल्या मनास लागली असल्याचे निवृत्तिनाथ येथे सांगत आहेत.[२२] नामदेवभेटीच्या वेळी जे वर्णन आले आहे त्यात 'गोरा जुनाट पै जुना' असेच गोरक्षनाथांचे वर्णन आले आहे.

गोरक्षकृपेचा हा अनुभव जेव्हा निवृत्तिनाथांना आला तेव्हा तो अकस्मात आला होता. त्यांची स्वत:ची तशी मागणीही नसताना, केवळ मुक्ताबाईच्या सहवासात असल्यामुळे त्यांना हा अनुभव आला होता. तेव्हा मनाची पुरेशी तयारी नसताना आलेला हा अनुभव सर्वच्या सर्व ग्रहण करता आला नाही अशी खंत निवृत्तिनाथांच्या मनात आहे. आणि आता तो अनुभव जाणीवपूर्वक पुन्हा घेता यावा यासाठी ते व्याकुळ झाले आहेत. आता आल्या वाटे जाण्याची इच्छा आपणास झाली असल्याचे निवृत्तीनाथ म्हणतात. आणि तथे कसे जावे त्याचे गुज कळत नाही म्हणून तुला विचारत आहे. कारण तू अरुपाच्या शेजारी होतीस असे निवृत्तिनाथ म्हणत आहेत.[२३]

''दीवा लावा दीवा लावा । प्रकाश दावा स्वरूपाचा ।। १ ।। लाउनि नंदादीप गुरु गुह्याचे घरी । स्वसुख वोवरी पाहु द्या मज ।। २ ।। माझे मज गुज पाहुं

द्या डोळां । येऊं द्या कळवळा सकळ दयेचा ।। ३ ।। भूतदया जेणे होती उत्पन्न । तें बीज कोण सांग माते ।। ४ ।। निवृत्तिदेव म्हणे सुखाचे हे सार । जेणे गुरुगुह्याचे मंदीर सापडते ।। ५ ।।'' [२४] गोरक्षकृपेचे वर्णन करताना मुक्ताबाईही नंदादीप उजळल्याचेच वर्णन करत आहे. [२५] तेव्हा मुक्ताबाईला हा अनुभव ज्यामुळे प्राप्त झाला, त्याचे बीज आपल्याला सांगावे अशी विनवणी येथे निवृत्तिनाथ करत आहेत.

आपल्या हाताने माझे मस्तक थापटावे अशी विनवणी येथे निवृत्तिनाथ मुक्ताबाईला करत आहेत. निवृत्तिनाथांना एका गोष्टीचे आश्चर्य वाटत आहे तेही ते तिच्यापाशी बोलून दाखवितात. ज्याला वर्णाश्रम नाही, ज्याला कुळ गोत्र वर्म नसल्याचे सर्वजण म्हणतात असा अनाम गोसावी तुमच्यामुळे भ्रमला कसा ? तुझ्या पाई गुंतला कसा ? हा तो आश्चर्यजनक प्रश्न आहे. [२६] अर्थात हे सारे वर्णन गोरक्षनाथांशी मिळते जुळते असेच आहे. 'परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पाल्हाळला ।।'[२७] हा संदर्भ आपल्याला येथे चटकन आठवून जातो. याचा आदिअंत कोठे कसा पाहावा हे निवृत्तिनाथांना उलगडत नाही आणि ते अगदी निर्वाणीने मुक्ताबाईला सांगतात, ''तुजविण वाट उमजेना ।।''[२८]

स्वामी (गोरक्षनाथ) काय बोलले, मुक्ताबाईचे आणि स्वामीचे काय बोलणे झाले हे विचारणे वास्तविक बरोबर नाही हे निवृत्तिनाथांना उमगत असूनही ते तसा प्रश्न विचारत आहेत.[२९] (या भावंडांच्या बोलण्यात गोरक्षनाथांचा उल्लेख 'स्वामी' असा येतो.)

निवृत्तिनाथ मुक्ताबाईला काकुळतीने विनवत आहेत, ''उघडा उघडा अभ्यासाची वोवरी । माझीं मज सोयरी भेटवा हो ।। १ ।। भेटल्या सोयरी दावीतील सोय । माझे मज ठाये सापडेल ।। २ ।। बोधुनिया ब्रह्म लावावे अभ्यासी । जेणे मुनी रुषी त्रुप्त जाले ।। ३ ।। शुकादीक गेले ऐकुनीया नीज । ती गुरुकृपा मज करीं माते ।। ४ ।। निवृत्तिदेव म्हणे पुरे नोहे नाम । बोधल्या वाचुन कळु नये ।। ५ ।।'' [३०] ही जी गुरुकृपा निवृत्तिनाथांना अपेक्षित आहे त्यासाठी केवळ नामस्मरण उपयुक्त नाही, ह्याची जाणीव त्यांना झाली आहे. आणि म्हणून मुक्ताबाईकडून बोधाची अपेक्षा ते करत आहेत.

मुक्ताबाईने आपल्याला खूण दाखवावी, गुरुकिल्ली द्यावी असे ते तिला विनवत आहेत. ''पवनाचिया पुढें मन उठी घाली । मन आपुले हे किल्ली सांग माते ।।'' [३१] अशी विनवणी ते करत आहेत.सत्य आपल्यापासून चोरून ठेऊ नये, लपवून ठेऊ नये, 'साबरी' विद्येने करू नये उदास, असेही ते तिला सांगतात. [३२]

स्वामीला (गोरक्षनाथांना) प्रकट रूप धारण करायला लावण्यास तूच एक समर्थ आहेस; तेव्हा स्वामीला तुझ्याशिवाय कोण उठवू शकेल असे ते मुक्ताबाईला म्हणतात. ते तिला म्हणत आहेत, मी तुझा पोसणा आहे, तुझ्यामुळे मिळालेल्या कृपेवर पोसला गेलो आहे. स्वत: तू जे अमृतभोजन करत आहेस त्यातील उच्छिष्ट मला द्यावे अशी विनवणी ते मुक्ताबाईला करत आहेत. [३३]

निवृत्तिदेव मुक्ताबाईला नाशिवंत शरीर अविनाश करण्याचा मार्ग विचारत आहेत. ''नासीवंत शरीर करा अविनाश । घडो द्या विलास भजनाचा ।। निवृत्तिदेव म्हणे सेवा ऐसी नेणे । सांगावे साधन आवडीचे ।।'' [३४] सद्गुरुला ज्यामुळे दया उत्पन्न होईल अशी भक्ती मला सांग, असे साधन मला सांग असे निवृत्तिनाथ मुक्ताबाईला विनवत आहेत. ''सोईचा हा घाट उफराटी वाट । चढावे हे नीट कळावे कैसे ।।'' असे ते विचारत आहेत.[३५]

स्वामी दयानिधी आहेत, त्यांना भेटविण्याची सिद्धी या बालकाला प्राप्त करवून द्या असे निवृत्तिनाथ मुक्ताबाईला विनवत आहेत. [३६] स्वामीच्या भेटण्याविषयी केवढी तळमळ निवृत्तिनाथांना लागली आहे हे पुढील अभंगावरुन लक्षात येईल. ऋतुची उपमा देऊन निवृत्तिनाथ म्हणत आहेत, ''तैसा जीवा रुतु आला सत्रावीचे वेळे । आत्मा ब्रह्मांड गोळ भेटवावा ।। निवृत्तिदेव म्हणे रुतुची उपमा । स्वामी आत्मारामा भेटवावे ।।'' [३७] ('सत्रावीचे वेळे' हा गोरक्षकृपेच्या वेळी आलेल्या अनुभवाचा उल्लेख आहे.)

या बाबतीत ते मुक्ताबाईच्या साहाय्याने वाटचालही करत आहेत. पण तरीही त्यामध्ये काही अडथळे येत आहेत. त्यावरील उपाय तिच्याशिवाय कोणीही सांगू शकणार नाही याची त्यांना खात्री आहे आणि म्हणूनच निवृत्तिनाथ मुक्ताबाईला बोलते करण्याचा हरप्रकारे प्रयत्न करताना दिसतात. ते महाधन मिळविण्याचा मी प्रयत्न करतो पण ते हाती गवसत नाही असा आपला अनुभव

निवृत्तिनाथ येथे सांगत आहेत. ''साधीतो शोधीतो परि हाता नये । याला उपाय मायें काय करु ।।'' [३८] असा प्रश्न ते मुक्ताबाईला विचारत आहेत. ज्यामुळे शरीर अविनाश होते ते कारण कसे साधावे हा त्यांना प्रश्न पडला आहे.

ज्यामुळे आपल्याला तो अनुभव पुन्हा प्राप्त होईल तो एकच मार्ग मला निश्चितपणे सांग, अभ्यासाकारणे ते शब्द मला ऐकवावे असे निवृत्तिनाथ मुक्ताबाईला म्हणत आहेत.[३९] ''स्वामीचिया गावी स्वामीचीच वार्ता । द्वैताची कथा ना ऐके मी ।।'' स्वामीव्यतिरिक्त (गोरक्षनाथांव्यतिरिक्त) इतर काहीही ऐकण्याची त्यांची इच्छा नाही असे ते म्हणत आहेत. ज्यामुळे स्वरूपाची तत्काळ भेट होईल असे अवीट ज्ञान मला सांगावे अशी विनवणी ते करत आहेत. [४०] योगीन्द्र (गोरक्षनाथ) तुझ्यावरील अगाध मायेपोटी कसा विस्तारला, ह्याचे गूज तू सांगावेस. असे ते म्हणत आहेत. सत्रावीच्या माथा प्रवेश कसा करावा ह्यासंबंधी ते विचारत आहेत. [४१]

संचिताची रेखा आडवी आली असावी म्हणून गुरुकिल्ली हाती सापडत नाही. असे आता निवृत्तिनाथांना वाटत आहे. ''स्वामीसी विणवीता फार जाला उसीर ।'' असे ते यासंदर्भात म्हणतात. [४२] स्वामीची विनवणी यापूर्वीच करावयास हवी होती.आता या गोष्टीला फार उशीर झाला असे त्यांना वाटत असावे.

गोरक्षनाथांच्या कृपेमुळे आलेल्या अनुभवाची तीव्रता कालांतराने आता कमी होत चालली असावी आणि म्हणून निवृत्तीनाथांना त्याची खंत वाटत आहे. 'अभ्राच्या छायेने माझी समाधी झाकोळली' असे त्याचे वर्णन निवृत्तिनाथ करतात. 'आता कोणे वेळे येईल अमृत योग । का ? माझा मला लाभ सापडेल ।।' अशा आतुरतेने ते त्या अनुभवाची वाट पाहत आहेत. [४३]

मुक्ताबाईने जर आपल्याला तो बोध दिला नाही तर ईश्वरही तो आपल्याला देऊ शकणार नाही हे त्यांनी ओळखले आहे. विनवणी करून थकलो तरी आता ते ज्ञान आपल्याला प्राप्त होत नाही असे त्यांना जाणवले आहे. शरीरातील शक्ती गळून गेली आहे फक्त शरीर तेवढे उरले आहे अशी त्यांची अवस्था झाली आहे. तरीही साधनमार्ग गवसत नाही म्हणून मग नंतर ते स्वत:च आपल्या जीवाला समजावू पाहत आहेत की, ' गेल्या धनाची खंती करू नकोस !' [४४] साधन सापडले नाहीतरी एकवेळ चालेल पण सद्‌गुरुचा शेजार

आपल्याला प्राप्त व्हावा असे त्यांना आता वाटते आहे. [४५]

निशीदिनी आपल्याला एकच एक ध्यास लागला आहे असे निवृत्तिनाथ म्हणत आहेत. स्वामीभेटीसाठी ते अगदी सावध होऊन बसले आहेत. ''न गमे कोठे घडी येक पळ । नेणो कोणे वेळे होईल दया ।। बैसलो जपुन पलख आणि पापनी । स्वामी क्षणक्षणी देती लाभ ।। मागे पुढे पाहता पडेल अंतर । ऐकीले अक्षर जाऊ नेदी ।।'' [४६] इतकी सावध सजगता निवृत्तिनाथ धारण करून आहेत.

स्वामीला आपली दया येत नाही हे त्यांच्या लक्षात येते. ''उदंड तळमळीतो हरुशाचे गावी । परी दैव नाही सानकुळ ।। १ ।। काही केल्या दया नये स्वामी मनी । नाचतो नाचनी अधीराची ।। २ ।। पीकले हे फळ फळाचिये देठी । अडानी लाळ चाटी हाता नये ।। ३ ।।'' तशी आपली अवस्था झाली असल्याचे निवृत्तिनाथ म्हणतात. [४७]

स्वामी दयानिधी आपल्यावर प्रसन्न होत नाही हे पाहून निवृत्तिनाथ अंतिमत: म्हणतात, ''निवृत्तिदेव म्हणे चोरीचे हे धन । जिरे किंवा दैन्य होईल नेणु ।।'' [४८] आपल्याला अनायासे प्राप्त झालेले जे चोरीचे धन (गोरक्षनाथकृपेतून आलेला अनुभव) होते ते जिरेल की व्यर्थ जाईल हे समजत नाही असे निवृत्तिनाथ म्हणतात. अशा खिन्नतेतच ही विनवणी संपते.

**प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग –** दीर्घकाळपर्यंत निवृत्तिनाथांनी जी विनवणी केली तिचा परिणाम म्हणून मुक्ताबाई आता उत्तर द्यायला प्रवृत्त झालेली दिसते. हे जे उत्तर आले आहे ते 'ज्ञानबोध' या ग्रंथाच्या माध्यमातून आले आहे.

आपण ग्रंथनिर्मिती करत आहोत असा आविर्भाव येथे आहे. आता हा जो ज्ञानबोध सांगितला जात आहे तो सर्व शिष्यसमुदायासमोर. ग्रंथाची जी पारंपरिक रचनापद्धती असते त्याचा अवलंब यामध्ये केलेला आहे. म्हणजेच गणपती, शारदा, सद्‌गुरु, श्रोते नमन इ.पद्धत येथे अवलंबलेली दिसते. फरक एवढाच की इतरत्र ज्याप्रमाणे गणपती, शारदास्तवन असते तसे येथे न येता परमेश्वराच्या निरालंब स्वरुपाला नमन केलेले आढळते. येथे श्रोत्यांचे भान तिच्या मनात असल्याचे आपल्याला येथे जाणवते.

आपला ज्ञानबोध पुढे चालवावा, आपल्याकडून वाणी वदवून घ्यावी

अशी विनवणीही ‘स्वामी’ला मुक्ताबाई करताना आढळते. त्यामधूनही ग्रंथरचनेच्या हेतूचे स्पष्ट भान असल्याचे जाणवते.

मुक्ताबाईची येथील भूमिकाही तितकीच मनोरम आहे. स्वत:च्या स्वरुपाचे भान असूनही आपण सद्‌गुरुपेक्षा अधिकाराने कमीच आहोत याचे मुक्ताबाईचे भान कोठेही सुटत नाही. म्हणून अतीव लीनतेने मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणते, ‘‘जे पुसीले ते की तुम्हा नाही ठावे । काय आम्ही द्यावे करुनी नवे ।। म्हणे मुक्ताबाई तुम्ही केली लावण । सेवकाते उगवण सहजचि आले ।।’’ [४९] लहान बालकाचे बोबडे बोल आवडीने ऐकावे म्हणून त्याला बोलावयास लावावे तसे आपल्या बाबतीत असल्याचे मुक्ताबाई येथे म्हणते. मुक्ताबाईला हा सारा प्रकार कसा भासमान होतो ह्याचे वर्णन समर्पक उपमा देऊन मुक्ताबाईने केले आहे.

‘पुत्राने पित्याते काय मती द्यावी । मा स्फुर्ती चालावी बाळकाची ।।
कन्येने मातेते काय सांगावा संसार । हा उफराटा विचार दिसत आहे ।।’ [५०]

असे इथे घडत असल्याचे तिला जाणवते. मात्र हा सारा भावनिक भाग लगेचच बाजूला सारुन ती तत्काळ आपल्या स्वत:च्या उच्च भूमिकेमध्ये शिरलेली दिसते.

सद्‌गुरु हा शिष्य बनून आपल्याच शिष्याला शंका विचारत आहे आणि शिष्य स्वत: सद्‌गुरु या भूमिकेतून आपल्याच सद्‌गुरुला काही सांगत आहे असे या ग्रंथाचे ‘अभिनव’ रुप आहे. इतर अध्यात्मग्रंथांप्रमाणे गुरुशिष्यसंवाद हेच याचेही बाह्यांग आहे परंतु गुरुशिष्यांच्या भूमिकांची अदलाबदल यात झाली आहे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

निवृत्तिनाथांच्या प्रश्नांना मुक्ताबाई उत्तर द्यायला प्रारंभ करते, तेव्हाच ही गोष्ट तिच्या ध्यानात आली आहे. मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणते,

‘‘तुम्ही आम्हा गुरु आम्ही तुम्हा गुरु ।
उत्तरा प्रतिउत्तरु सहज होय ।।
आम्ही तुम्हा शिष्य तुम्ही आम्हा शिष्य ।
परस्परे आसे भाव येक ।।’’ [५१]

मुक्ताबाईच्या पुढील अभंगांमध्ये मात्र गुरुशिष्य, बहिणभाऊ, दाता मागता या

कोणत्याही नात्यांच्या भावछटा डोकावत नाहीत. पुढे येते ती निखळ आत्मचर्चा, निखळ तत्त्वचर्चा.

**मुक्ताबाईने दिलेला प्रतिसाद –** मुक्ताबाईने निवृत्तिनाथांच्या प्रश्नांना जी उत्तरे दिली आहेत त्याचे स्वरूप आता पाहू. निवृत्तिनाथांनी ज्या तीन प्रकारचे प्रश्न विचारले आहेत त्या प्रत्येक प्रश्नाच्या प्रकारानुसार मुक्ताबाईची प्रतिसादाची पद्धत भिन्नभिन्न आहे.

निवृत्तिनाथांनी जे साधे साधे प्रश्न विचारले आहेत त्या प्रश्नांची उत्तरे जी दिली गेली आहेत ती उच्च दर्जाची आहेत. प्रश्न एकच असला तरी त्याची उकल वेगवेगळ्या आध्यात्मिक स्तरानुसार भिन्नभिन्न होते असा अनुभव अध्यात्मप्रांतात नवीन नाही. मुक्ताबाई त्या सामान्य प्रश्नांची जी उत्तरे देते तीही स्वत:च्या अलौकिक अशा पातळीवरून देते. म्हणून प्रश्न साधेसे पण त्यांची उत्तरे अत्यंत सखोल असा प्रकार येथे आढळतो.

दुसरे जे तत्त्वज्ञानात्मक प्रश्न विचारले गेले आहेत, त्याची अत्यंत सविस्तर अशी उत्तरे मुक्ताबाई देत आहेत. सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधी सखोल असे चिंतन या साऱ्यातून प्रकट झाले आहे. सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी असणारे निरालंब तत्त्व, त्याचे स्वरूप कसे होते याचा खुलासा मुक्ताबाई येथे अधिकारवाणीने करताना दिसते. त्यालाच धरून पुढे पंचमहाभूते, शरीर या साऱ्यांचे वर्णन येते. अंबऋषी आणि दुर्वास यांचा कथाभाग आधाराला घेऊनही मुक्ताबाईने सखोल विवेचन केले आहे. हे सारे सांगून झाल्यावर मुक्ताबाईने आपल्या स्वस्वरूपाची जाणच एकप्रकारे पुन्हा करून दिली आहे.

''प्रथम जे आंडे प्रतिबिंब माझे । माया आंडे दुजे उत्पत्तीचे ।।
तिजे आंडे समुळ माझा ब्रह्मगोळ । पूर्ण मायाजाळ बीज माझे ।।'' [५२]

अशी अस्मितापूर्वक वाणी तिच्या मुखातून बाहेर पडली आहे. उपनिषदांचा गाभाच म्हणता येईल इतक्या खोल स्वरुपाचे ज्ञान येथे शब्दबद्ध झाले आहे. येथे निरालंब स्वरूपाचे जे वर्णन आले आहे ते तर नासदीय सुक्तातील वर्णनाशी खूपच मिळतेजुळते आहे. एकंदर ५४ अभंगांतून हा संपूर्ण विषय मांडलेला आहे. आपले प्रमेय नीट स्पष्ट व्हावे यासाठी ती काही उदाहरणेही येथे देताना दिसते. हे गहन स्वरूपाचे ज्ञान कथन करण्यासाठी म्हणून मुक्ताबाईने रुपकांचा वापर

समर्पकतेने केला असल्याचे जाणवते. ब्रह्म आणि माया यांचे कार्य सांगत असताना पाण्यात वाढलेले शेवाळ पाण्यालाच झाकून टाकते हे योजलेले रुपक समर्पक आहे. जीवाचे सातत्याचे चालू असणारे येणेजाणे व जन्ममरण ही प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी पतंग आणि त्या पतंगाचा दुसऱ्याच्या हाती असलेला दोर याची दिलेली उपमा अगदी यथार्थ व अभिनव म्हणावी लागेल. एरवी सहसा उदाहरणे न देणारी मुक्ताबाई येथे मात्र श्रोत्यांपर्यंत तो विषय नीट रीतीने पोहोचावा म्हणून उदाहरणे देताना दिसते.

(दुसऱ्याला एखादा विषय पटवून देताना मुक्ताबाई समर्पक उदाहरणांचा अवलंब करते असे दिसते. नामदेवांना गुरुची आवश्यकता पटवून देताना तिने दिलेली उदाहरणेही आपल्याला येथे नकळत आठवून जातात. समर्पकता हे तिच्या उदाहरणांचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

मुक्ताबाईच्या अभंगरचनेमधून तिचे स्त्रीपण फारसे व्यक्त होताना दिसत नाही. 'सीजुनिया पाक पावला नाशाते त्यात जीवजंतु फार जाले' किंवा 'घरीचे भोजन होवो भलते रीती भरले उपवासाची खंती नाही जया' यासारख्या उपमांतून तिचे स्त्रीपण हळूच कोठे डोकावताना दिसते.)

येथे फक्त प्रतिपाद्य विषयाला धरूनच लिखाण आलेले आहे. निर्व्यक्तिक, वस्तुनिष्ठ अशा स्वरूपाचे ते सारे लिखाण आहे. त्यामध्ये मुक्ताबाईचा स्वत:चा आंतरिक अनुभव व्यक्त होत नाही. किंवा त्याचा साधा निर्देशही कधी होत नाही.

तिसऱ्या प्रकारच्या प्रश्नांबाबत मुक्ताबाईची काय भूमिका आहे ते पाहू. हे तिसऱ्या प्रकारचे प्रश्न म्हणजे अध्यात्ममार्गामध्ये प्रगत होण्यासाठी स्वत:साठी जे मार्गदर्शन निवृत्तिनाथांनी मागितले आहे त्याबद्दलचे आहेत. त्या प्रश्नांबद्दलचा सविस्तर विचार या प्रकरणात आधी केलाच आहे.

एवढी वारंवार विनवणी करूनही मुक्ताबाई त्या प्रश्नांबाबत काहीच बोलत नाही असे दिसते. मग मनात प्रश्न येतो की,'असे का ?' थोड्याशा विचारांती त्याचेही उत्तर आपल्याला लगेचच उलगडते. ज्ञानबोध-ग्रंथनिर्मिती शिष्यसमुदायासमोर व सर्वसामान्य लोकांसमोर चालू आहे आणि म्हणून येथे मुक्ताबाई मौन धारण करताना दिसते. मुक्ताबाईने मौन बाळगण्याचे कारण असे

की, हा सारा अध्यात्माचा आत्यंतिक खोलवर असा प्रांत आहे. तेव्हा हे सारे सखोल विवेचन सर्वसामान्यांसमोर करणे  शक्य नाही, किंबहुना योग्य नाही हे जाणवून मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणत आहे,

''चोरीचे धन जन्माची जोड ।
तुम्हांसाठी पोटफाड करणे आली ।।
आपले सख्य उघडे आपणची झांकावे ।
येरां न दाखवावे दांभीकाला ।।'' [५३]

चोरीचे धन जसे इतरांसमोर उघडले जात नाही तसे हे सखोल, गुह्य ज्ञान दांभिकांसमोर किंवा चारलोकांमध्ये उघड करण्यासारखे नाही असा सूचक निर्देश त्यातून मुक्ताबाई निवृत्तिनाथांना देताना दिसते.

आणि येथेच ज्ञानबोध ग्रंथातील तिसरा भाग येतो तो म्हणजे 'सममेळ बोलणे उभयतांचे' ! या भागामध्ये आता जो संवाद आहे तो निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई यांच्यातील आहे. तो त्यांच्यातील खाजगी संवाद आहे. येथे इतर श्रोत्यांची उपस्थिती जाणवत नाही. आणि म्हणूनच येथे निवृत्तिनाथांना संबोधन जे येते ते 'दादा' असे येते. (आधीच्या 'प्रतिउत्तर' भागात श्रोत्यांसमोर विवेचन चालले असताना निवृत्तिनाथांचा उल्लेख येतो तो 'गुरुदेव' असाच येतो. तेथे 'दादा' हे संबोधन एकदाही आलेले नाही.)

मुक्ताबाईच्या तोंडून 'प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग' या भागातील एवढे सारे विवेचन ऐकूनही निवृत्तिनाथांचे मन भरलेले नाही. 'ऐकावा हा अर्थ मुक्ताईच्या मुखी । आता ऐसी सखी कोणी नाही ।।' [५४] हे जाणूनच की काय निवृत्तिनाथ तिला पुन्हा पुन्हा काही शंका विचारुन बोलते ठेवायचा प्रयत्न करीत आहेत. यातून हे 'सममेळ बोलणे उभयतांचे' असे हे दोघांचे मिळून २१ अभंग आलेले आहेत.

**सममेळ बोलणे उभयतांचे –** येथे निवृत्तिनाथ मुक्ताबाईला एकेक प्रश्न विचारत आहेत आणि मुक्ताबाई लगेच त्याचे उत्तर देते आहे असा भाग आला आहे. हे जे प्रश्न निवृत्तिनाथ विचारत आहेत ते अत्यंत सखोल अशा स्वरूपाचे आहेत. निवृत्तिनाथांनी विचारलेल्या प्रश्नांची जी उत्तरे मुक्ताबाईने येथे दिलेली आहेत, त्या उत्तरांचा स्तर पाहता याची साक्ष पटते की, ती

निवृत्तिनाथांच्याही खूप पुढे निघून गेलेली असावी.

निवृत्तिनाथांचे प्रश्न ऐकून सुरुवातीला मुक्ताबाईला असे वाटते की गुरु आवडीने, विनोदाने प्रश्न करत आहेत. आपले सद्गुरुच आपल्याला काही विचारत आहे असे जाणवून तिला सुरुवातीला काहीशी भीड पडली असावी असे वाटते. ती म्हणते, ''आम्हासी तुम्ही केले परीवार । तारक विचार आपणापासी । म्हणे मुक्ताबाई परिवार कळेना । जेणे माझियां मना धीर होय ।।'' पुढे ती म्हणते, ''म्हणे मुक्ताबाई अनुभव असेल चित्ता । विनोदें पुसतां आवडीने ।।'' [५५] पण निवृत्तिनाथ खरोखर जिज्ञासेने प्रश्न विचारत आहेत हे लक्षात येताच ती लगेचच उच्च स्तरावर आरूढ होऊन उत्तरे देऊ लागते.

आता येथे मुक्ताबाई सद्गुरु या भूमिकेत स्वत: आरूढ झालेली आहे. आणि निवृत्तिनाथ या शिष्याला ती ज्ञानप्रदान करत आहे, मार्गदर्शन करत आहे. तेव्हा आता मात्र येथे निवृत्तिनाथ हे आपले गुरु ही भावना तिच्या विवेचनाच्या कोठेही आड येत नाही, असे दिसते.

निवृत्तिनाथ ह्या सगुण विश्वाबद्दलचे विचार बोलून दाखवितात तेव्हा मुक्ताबाई त्यांना सांगू पाहतात, ''बापुडा हा गुण बापुडी हे तनु । बापुडा बोभाट वाहु नये ।।'' [५६]

तारक अशा नामाची चर्चा निवृत्तिनाथ करू पाहतात. त्याचे महत्त्व पुन्हा पुन्हा मांडू पाहतात. तेव्हा मुक्ताबाई त्यांना सांगते, ''निर्विकार गुज अणुभविले आधी । नाम केव्हा कधी ठेविले होते ।।'' [५७]

निवृत्तिनाथ मायेची महती आधी स्पष्ट करून माया ही दुसरी तिसरी काही नसून वस्तुरुपच (ईश्वरच) आहे असे म्हणतात. तेव्हा मुक्ताबाई म्हणते, ''माया छाया दोन्ही जायाचे भांगार । त्यात का सर्वेश्वर विरु पाहतो ।। नेणु तुमच्या अर्था अणुभवीले भले । अमृतासि केले कडू दादा ।।'' [५८]

वेद, श्रुति, सिद्धी, विद्या यांचे श्रेष्ठत्व निवृत्तिनाथ वर्णन करू पाहतात तेव्हा त्यांचे ते म्हणणेही मुक्ताबाईस स्वत:च्या जाणीवेच्या उच्च पातळीवरून पाहता पटत नसावे असे दिसते. ''वेदाने ह्या विद्या होती जरी सार । तरी कां वेव्हार पाल्हाळ ते ।।'' [५९] असा प्रतिप्रश्न मुक्ताबाई येथे निवृत्तिनाथांना करतात. साधना हीच महत्त्वाची असे त्या सांगू पाहतात.

"निवृत्तिदेव म्हणे खरा बांधला येणे । ऐसा जीवे भ्रम धरिला आहे ।।" [६०] (जीवाने निराकार निर्गुण परमात्म्याला बंदी केले आहे आहे) असा प्रश्न निवृत्तिनाथ विचारत आहेत. तेव्हा मुक्ताबाई उदाहरण देते आणि म्हणते, "तळहातिच्या पाण्यात मुख दीसे खरे । त्यांत का घागर बुडुं पाहे ।।" [६१] "म्हणे मुक्ताबाई याचे बांधले व्हावे । मग अविनाशाचे गाणे गावे काशा ।।" [६२] असेही ती उलट निवृत्तिनाथांनाच विचारते.

मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ यांच्यातील हा संवाद खाजगी असल्यामुळे त्यामध्ये एक प्रकारचा विलक्षण मोकळेपणा आहे. सख्यत्वाच्या नात्यामधून आलेला हा मोकळेपणा दोघांच्याही बोलण्यात जाणवतो. मुक्ताबाईच्या बोलण्यात येथे एक प्रकारचा स्पष्टवक्तेपणा आहे. त्यामुळे 'नेणु तुमच्या अर्था अनुभविले भले अमृतासी केले कडू दादा' असे स्पष्ट सांगण्यासही ती कचरत नाही. मुक्ताबाई निवृत्तिनाथांना सांगत आहे, "म्हणे मुक्ताबाई विसरुनी सूत्रधारी । दीवसाला रात्री म्हणु नये ।।" [६३] "मृत्यु नाही जेथे मुक्ति कोणे वाहावी । कल्पनाही नवी स्छापुं नये ।।" [६४] "म्हणे मुक्ताबाई पाहाण्याच्या हातोट्या । प्रेमे दादा कांट्या कवटाळील्या ।।" [६५] गुरुतत्त्वाच्या भूमिकेत शिरून मुक्ताबाई हे सारे निवृत्तिनाथांना सांगत आहे. येथे मुक्ताबाई जे सारे सांगत आहे आणि ज्या स्पष्टपणाने सांगत आहे त्याची जातकुळीच वेगळी आहे. आणि म्हणूनच येथे वयाचा, शिष्यत्वाचा कोणताही अडसर तिला जाणवत नाही. निवृत्तिनाथांच्या स्तरावरून जे विचार त्यांना योग्य वाटत आहेत तेच विचार , स्वत:च्या उच्च पातळीवरून मुक्ताबाईला मात्र अयोग्य वाटत आहेत, असे दिसते. त्यामुळे स्वत:ची ही मते ती स्पष्टपणे, रोखठोखपणे मांडत आहे.

निवृत्तिनाथांच्याही वरील पायरीवर मुक्ताबाई उभ्या आहेत. आणि म्हणून मागून येणाऱ्या वाटसरूला, त्याची वाटचाल सुकर व्हावी म्हणून अगदी स्पष्ट शब्दात योग्यायोग्यतेची समज त्या देत आहेत असे येथे दिसते.

"पाण्याचा पानबुडा पाण्यात चेष्टा करी । हा निश्चय निर्धारी अवधारावा ।। ......रुपरेखा कारण विशादीचे मूळ । जळजळात कल्लोळे ऐसे जाले ।। म्हणे मुक्ताबाई चेष्टा साररुपी । माया जाण कणी सैंधवाची ।।" [६६] अशा मायेसंबंधीच्या खुलाशाने हे 'सममेळ बोलणे उभयतांचे' शेवटास जाते.

मुक्ताबाईचे 'माया' या विषयाचे चिंतनच यानिमित्ताने जणू व्यक्त होते. 'पाण्याचा बुडबुडा पाण्यात चेष्टा करी' असे मायेचे स्वरूप असल्याचे ती सांगते.

हा सर्व ग्रंथ वाचून पूर्ण झाल्यावरही एक गोष्ट चाणाक्ष वाचकाच्या लक्षात आल्यावाचून रहात नाही. ती अशी की, निवृत्तिनाथांनी स्वत:च्या आध्यात्मिक प्रगतीसाठी जे मार्गदर्शन मागितले आहे, त्यासंबंधी उत्तरादाखल कोणतेही विवेचन येथे येत नाही. ही सारी उत्तरे मुक्ताबाईने निवृत्तिनाथांना दिलेली असणार पण दांभिकांसमोर हे ज्ञान प्रकट करू नये असे मुक्ताबाईने सांगितले असल्यामुळे तो भाग मात्र निवृत्तिनाथांनी या ग्रंथात लिखित स्वरूपात शब्दबद्ध केलेला नसणार हेही आपल्या लक्षात येते. निवृत्तिनाथांना मुक्ताबाईने नेमकी काय उत्तरे दिली असतील याविषयीचे आपल्या मनातील कुतूहल तसेच शिल्लक राहते. आणि तेथेच हा ग्रंथ संपतो. आणि आपले मन मात्र नकळत निवृत्तिनाथांच्या प्रश्नांचा मागोवा घेत राहाते.

मुक्ताबाई जे विवेचन या ग्रंथात करत आहे त्या साऱ्या विवेचनातून 'आमुच्या स्वस्थानी नाही पां अंधार । अवघी चराचर प्रकाशत्वे ।। आम्ही कधी आलो स्वरूप सोडून । जावे पालटोन जेथिल तेथे ।।' [६७] ह्या भूमिकेमध्ये ती सातत्याने वावरत असावी असे जाणवत राहते.

यानंतर अगदी थोड्याच कालावधीमध्ये मुक्ताबाई स्वरुपाकार होऊन गेली. आपल्यासारख्या सामान्यांना तिच्या या निघून जाण्याची खंत मनात दाटून येऊ लागते तोच मुक्ताबाईचे अभंग आपल्याला सावध करतात, ''तव मरणाची वेथा सहज व्यापिली देही । जव अनुभव आपुले ठाई आला नाही ।।'' [६८] हा स्वरुपाचा अनुभव आपणही घ्यावा यासाठी ती आपल्याला ज्ञानबोध देत राहते.

**ज्ञानबोध ग्रंथाच्या वाचनातून मनात उदित झालेले तरंग –**

एकेकाळी ज्ञानेश्वरांना जिज्ञासेने प्रश्न विचारणारी मुक्ताबाई – ताटी उघडण्याविषयी त्यांना विनंती करणारी मुक्ताबाई – निवृत्तिनाथ आदी भावंडांचे मायपण स्वीकारणारी मुक्ताबाई – परमार्थमार्गावर सर्वांना खंबीरपणे मार्गदर्शन करणारी मुक्ताबाई – आणि आता स्वत:च्या सद्‌गुरुंनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देणारी, त्यांनासुद्धा अधिकारवाणीने चार शब्द सांगू पाहणारी मुक्ताबाई हा सारा तिच्या जीवनाचा चढतावाढता आलेख आहे.

‘ज्ञानबोध’ या ग्रंथामध्ये त्याने सर्वोच्च पल्ला गाठला असल्याचे लक्षात येते. आणि म्हणूनच मुक्ताबाई स्वरूपाकार होण्यापूर्वी तिची असलेली अवस्था समजावून घेण्याच्या दृष्टीने या ग्रंथाचे योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण आहे.

मुक्ताबाईच्या स्वरुपाकार होण्यापूर्वीचे जे वर्णन नामदेवांनी केले आहे त्यात जो उल्लेख येतो तो ज्ञानबोध ग्रंथासंबधीचा असावा असे वाटते. ‘‘गंधर्वे गायने आलापित सुस्वरी । केले स्पष्ट नयनीं गुह्य गौप्य । नामा म्हणे देवा मन झाले स्थिर । पडियेला विसर अविद्येचा ।।’’ [६९] ज्ञानबोधाच्या श्रवणाने नामदेवांची जी अवस्था झाली आहे त्याचे हे वर्णन आहे.

मुक्ताबाईने गायलेले हे ‘अविनाशाचे गाणे’ वेदकालीन स्त्रियांशी नाते सांगणारे आहे असेच म्हणावेसे वाटते.

**

# मुक्ताबाईचे अभंग

मुक्ताबाईच्या अभंगांचा आजवर जो काव्यदृष्ट्या विचार झालेला आहे तो अल्प आहे. परंतु काव्यदृष्ट्या मुक्ताबाईच्या अभंगांचा विचार करीत असताना सर्वांनी मुक्ताबाईचे प्रकाशित अभंग आणि ताटीचे अभंग यांचाच विचार केला आहे असे दिसते. मुक्ताबाईचे अप्रसिद्ध अभंग किंवा स्फुट रचना इत्यादींचा विचार फारसा कोणी केला आहे असे दिसत नाही. तेव्हा या पुस्तकात प्रथमच मुक्ताबाईच्या एकंदर सर्व रचनेचा काव्यदृष्ट्या विचार होत आहे, हे येथे नमूद करावेसे वाटते.

मुक्ताबाईच्या समग्र काव्यसंपदेचे अभ्यासाच्या सोयीसाठी काही गटात वर्गीकरण केले आहे. आणि त्या वर्गीकरणाला अनुसरुन येथे विचार केला आहे. मुक्ताबाईचे पंढरी किंवा पांडुरंगपर अभंग, नामपर अभंग, सद्‌गुरुपर अभंग, संतपर अभंग, स्वानुभव स्थितीचे वर्णन, साधनापर, उपदेशपर, रुपकात्मक अभंग अशा विविध विभागात त्याची वर्गवारी केली आहे. त्याचा विचार करु.

**पंढरी किंवा पांडुरंग माहात्म्य वर्णन करणारे अभंग –** मुक्ताबाईच्या सद्‌गुरुंनी मुक्ताबाईला तारक सम्यक असणारा विठ्ठल दाखवून दिला. त्या हरिने मुक्ताबाईला प्रेमकवळु दिला. [१] अशा या हरिचे दर्शन मुक्ताबाईला कसे होते ? हे येथे विचारात घ्यावयाचे आहे. इतर संतमंडळींनी ज्याप्रमाणे पंढरी क्षेत्राचा महिमा वर्णन केला आहे तसाच मुक्ताबाईनेही केला आहे. त्यामध्ये पुंडलिकाचा वाटा मोठा आहे याची सार्थ जाणीव व्यक्त होते.''युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । कर कटावरी ठेवोनिया ।।'' [२] असे पांडुरंगाच्या सगुण रुपाचे क्वचितच वर्णन मुक्ताबाईच्या अभंगात येते. (अर्थात हा अभंग मुक्ताबाईचाच आहे असे खात्रीशीरपणे सांगता येत नाही.) पांडुरंगाकडे पाहत असतानाही त्याच्या मूर्तीतून तिला जाणवते ते पांडुरंगाचे निर्गुण स्वरूप. आणि म्हणून मुक्ताबाई ज्ञानेश्वरांना प्रश्न करते, ''विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणू दादा ।।'' [३] आणि यातच मुक्ताबाईचे वेगळेपण सामावलेले आहे. मुक्ताबाई सगुणात रमत नाही. मुक्ताबाईच्या अभंगांमध्ये कोठेही सगुण साकार देवाचे वर्णन आढळत नाही. तिला ओढ आहे ती

परमेश्वराच्या निर्गुण स्वरुपाची. या श्रीहरीचे वर्णन करताना मुक्ताबाई म्हणते, ''सहस्त्रदळी हरि आत्मा हा कुसरी । नांदे देहाभीतरी अलिप्त सदा ।।'' [४] देह हे देऊळ आणि आत्मा हा पांडुरंग ही सर्वमान्य कल्पनाच येथे व्यक्त होते. परंतु ईश्वराचे निर्गुण स्वरुप सर्वांनाच आकलन होण्यासारखे नसते, ते सर्वांनाच पेलते असे नव्हे, यामुळे मुक्ताबाईने सामान्य जनांना जो उपदेश केला आहे त्यात नामाचे महत्त्व वर्णन कलेले आढळते.

**नामपर अभंग –** ''एकतत्त्व धरी हरिनाम गोड । येर ते काबाड विषय ओढी ।।'' [५] असा उपदेश मुक्ताबाई करताना दिसतात. रामकृष्णांमुळे अनेक जीव युगानुयुगी तरले, मुक्त झाले, असा दाखला येथे दिला आहे. एवढेच नव्हे तर स्वत:चेही उदाहरण त्यांनी लोकांपुढे ठेवले आहे. ''नाममंत्र आम्हा हरिरामकृष्ण'' [६] अशा नाममंत्राचा उच्चारही येथे नि:संदिग्ध स्वरुपात आला आहे. आणि या हरिनामामुळेच आपण मुक्त झालो, आदि अंत उरला नाही अशी आपली अवस्था झाली असे मुक्ताबाई सांगतात. ''मुक्ताई हरिनामे सर्वदा पै मुक्त । नाही आदि अंत उरला आम्हा ।।'' [७] असे यासंदर्भात त्या म्हणतात. आणि आपणच यामुळे मुक्त झालो असे नाही तर जो कोणी हरिनाम सेवन करेल तोही मुक्त होईल असेही त्या म्हणतात. ''मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित । अवघेचि मुक्त सेविता हरी ।।'' [८] हा विश्वास येथे व्यक्त होतो.

सर्वसामान्यांना सुलभ, सोपे म्हणून नामाचे महिमान थोर आहे परंतु अध्यात्मामध्ये अधिकारी आहे त्याने नामाच्याच पायरीवर खोळंबून राहू नये, नाम ही अलिकडची अवस्था आहे, नामरुप जेव्हा अस्तित्वात नव्हते त्याच्यापूर्वी ईश्वराचे निर्विकार असे स्वरुप अनुभवास येत होते. त्या स्वरूपाला कवळण्याचा प्रयत्न करावा असा मुक्ताबाईचा अभिप्राय आहे. श्रीनिवृत्ति-मुक्ताई संवाद यामध्ये निवृत्तिनाथांनी नाममहात्म्य वर्णन करुन सांगितल्यावर मुक्ताबाई म्हणते,

निर्विकार गुज अनुभविले आधी । नाम तेव्हा कधी ठेविले होते ।
आत्माराम नाम बोलताति मुनी । वोळखिल्या झणी नाम कैचे ।। [९]

**संतपर अभंग –** 'ताटीचे अभंग एक विवेचन' या पुस्तिकेमध्ये डॉ.सदानंद मोरे म्हणतात, ''वारकरी परंपरेत सर्वमान्य असलेल्या संतत्वाचा पहिला उच्चार मुक्ताबाईने केलेला आहे. हेच संतत्व पुढे ज्ञानदेवांनी आपल्या

ज्ञानेश्वरीतून शब्दांत व्यक्त केले आणि जीवनात प्रत्यक्ष जगून दाखविले.'' [१०] त्यांचे हे विधान यथार्थ कसे आहे हे पाहण्यासाठी मुक्ताबाईच्या अभंगांचा विचार करावयास हवा. संत हा शब्द अलीकडे फारच रुढ झालेला आहे. परंतु मुक्ताबाईच्या काळाच्या दृष्टीने विचार केला तर त्याकाळी अध्यात्मामध्ये प्रगत असणाऱ्या व्यक्तींना सिद्ध, योगी, नाथ, गोसावी अशा संज्ञा प्रचलित होत्या. त्या सर्वांपेक्षा वेगळेपण दाखविणाऱ्या संत या शब्दाची योजना मुक्ताबाईनी केलेली दिसते. आणि नुसता हा शब्द वापरुन त्या थांबल्या असे झाले नाही तर ताटीच्या अभंगाच्या निमित्ताने संतत्वाची लक्षणेच लोकांसमोर उघड केली.

प्रेम, दया, क्षमा, शांती ही संतत्वाची खास लक्षणे आहेत हे सांगताना त्या म्हणतात, ''आदि अंतु हरि सर्वांघटि पूर्ण । जाणोनि संतजन प्रेमभरित ।। रामनाम चित्ते प्रेम वोसंडत । नित्यानित्य तृप्त हरिभक्ती ।। शांती क्षमा दया सावध पै चित्ती । आनंदे डुल्लती सनकादिक ।।'' [११] त्यांनी सांगितलेल्या याच लक्षणांचा पुनरुच्चार ताटीच्या अभंगामध्ये होताना दिसतो. ''संत तोचि जगी । क्षमा दया ज्याचे अंगी ।।'' [१२] अशी संताची नि:संदिग्ध शब्दामध्ये व्याख्याच मुक्ताबाईनी येथे केली आहे. ''विश्व रागे झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ।।'' [१३] संतांचे जनसामान्यांशी वागणे बोलणे कसे असावे याचा एक वस्तुपाठच येथे घालून दिला आहे. आणि हे सारे कोठपर्यंत तर ''माया समूळ नुरेल जेव्हा । विश्व ब्रह्म होईल तेव्हा ।। ऐसा समज आदिअंती । मग सुखी व्हावे संती ।।'' [१४] जेव्हा समग्र विश्व ब्रह्म होईल तेव्हाच संतांनी सुखी व्हावे, तेव्हाच आपल्या कार्याची इतिश्री करावी, त्याआधी नाही, असा स्पष्ट खुलासा येथे केला आहे. मुक्ताबाईने सांगितलेल्या या संतत्वाच्या लक्षणांना आदर्श मानून त्याप्रमाणे जीवन व्यतीत करणाऱ्या संतांची एक मांदियाळीच पुढील काळात महाराष्ट्रात निर्माण झाली ही या अभंगाची ताकद आहे.

**योगिक अनुभवपर अभंग –** डॉ.सुहासिनी इर्लेकर यांनी मुक्ताबाईच्या अभंगांचे विवेचन करताना म्हटले आहे, ''मुक्ताबाईचा पिंड उपदेशकाचा आहे, अनुभाविकाचा नाही. ती मुळात बुद्धिनिष्ठ आहे. भावनिष्ठ नाही. त्यामुळे तिचा अनुभव भावानुभव होत नाही. ती ज्ञानाबद्दल बोलते, ज्ञानाचा अनुभव सांगत नाही...... त्यामुळे तिची कविता अनुभवाच्या पातळीवर

क्वचित जाते.'' [१५] हे त्यांचे विधान मुक्ताबाईचे आजवरचे प्रकाशित अभंग लक्षात घेतले असता यथार्थ आहे असे म्हणावे लागेल.

परंतु त्याव्यतिरिक्त इतर अभंगांचा विचार करता ही परिस्थिती भिन्न असल्याचे आपल्या निदर्शनास येते. 'मुमुक्षू' मे-जून १९२७ च्या अंकामध्ये मुक्ताबाईचे जे अभंग प्रकाशित करण्यात आले आहेत, त्यामध्ये मुक्ताबाईचा उच्च दर्जाचा योगानुभव व्यक्त होताना दिसतो. ''स्थावर कुंडलिनी । गुंफिली असे कळिका । आज याचि देखा । मूळमाया ।। अध उर्ध्व पाहता । मावळोनि जाय । पाहता पाहता होय सर्पाकार ।।'' [१६] किंवा ''प्रकाशाचे पाहणे प्रकाशचि राहणे । सिद्धसाधक ब्रह्म स्वये जाले ।।'' [१७] यासारख्या अभंगांमध्ये मुक्ताबाईचा स्वत:चा अनुभव शब्दबद्ध झालेला दिसतो. यामध्ये ब्रह्मांड भवानी देखणी कुंडलिनी जागृत झाल्यानंतर आलेले एकापेक्षा एक विलक्षण असे अनुभव आले आहेत.

अगदी क्रमबद्ध रीतीने एकामागून एक अनुभव घेत जावेत आणि त्याचे निवेदन करत जावे अशा पद्धतीने मुक्ताबाई या अनुभवांचे कथन करत असल्याचे येथे जाणवते. या सर्व अभंगांमध्ये भाषाशैलीचा एक वेगळाच अनुभव येतो. इतरत्र मुक्ताबाईच्या शब्दशैलीमध्ये एक प्रकारे ज्ञानाचे, उपदेशाचे ताटस्थ्य असते. त्यामुळे त्याला एक प्रकारचा कोरडेपणा असतो. परंतु या अभंगांमध्ये मात्र त्या साऱ्या वर्णनाला चित्रमयतेची विलक्षण जोड मिळालेली आहे. हा सारा अनुभव घेत असताना आपल्याला काही तरी विलक्षण असा अनुभव येत आहे याची जाणीव मुक्ताबाईला आहे असे दिसते आणि म्हणूनच 'ऐसे अपूर्व मज आढळले' [१८] असा मुक्ताबाईच्या अभंगांमध्ये क्वचितच आढळणारा आत्मपर उल्लेख येथे येतो. पण तोही किती संयमित रुपात ! या लोकविलक्षण अनुभवामुळे कोठेही ती हरखून जाताना दिसत नाही. ''मग गुरुवाक्य सत्य जाले । आत्मानुभवे घेतले । वरी माथा वाइले । पायवणी ।।'' [१९] असे म्हणत सद्गुरुचरणी तो अनुभव समर्पित करून ती पुढे निघून जाते. त्या अनुभवाशी घोटाळत राहणे, रेंगाळणे ही तिची प्रकृती नाही. त्यामुळेच असेल कदाचित पण मुक्ताबाईच्या अभंगांमध्ये अलंकरण फारसे आढळत नाही. आला अनुभव जसाच्या तसा व्यक्त करण्याकडे त्यांचा कल दिसतो. त्यामुळे त्यातून बरेचदा

त्यांच्या अभंगांमध्ये गद्यसदृश विधानात्मकता येताना दिसते.

आणि या साऱ्या अनुभवातूनच पुढे उदित होत जाणारी एक अवस्था म्हणजे 'अवघे वैकुंठ दिसताहे' [२०] ही अवस्था ! एकदा स्वरुपाचे दर्शन झाल्यानंतर विश्वरुपामध्ये भरलेला परमात्मा दिसू लागतो. ही सृष्टी, हे विश्व म्हणजे परमात्म्यापासून अलग नसून ते परमात्म्याचेच रुप आहे. परमात्मतत्व या चराचरसृष्टीमध्ये भरून राहिले आहे असा तो प्रत्यय असतो. हाही अनुभव मुक्ताबाईच्या अभंगामध्ये वारंवार व्यक्त झाला आहे. ''जग हे ब्रह्म दिसे उघडे । एकचि सोने नानापरी लेणे । बाळ्या आणि बुगडे ।। एकचि तंतु नानापरी पट्ट । चोळ्या आणि लुगडे ।।'' [२१] ह्या शब्दात हा अनुभव नि:संदिग्धपणे व्यक्त होतो.

**तत्त्वज्ञानपर अभंग** – 'ज्ञानबोध' या ग्रंथामध्ये निवृत्तिनाथांनी मुक्ताबाईला मायेसंबंधी विविध प्रश्न विचारले आहेत आणि मुक्ताबाईनी त्याची उत्तरे दिली आहेत असा भाग येतो. 'जेव्हा पाची गुण एका पुरुषा ठायी । माया तेव्हा काही भासली होती' [२२] 'म्हणे मुक्ताबाई नाही मायागुण । लाविले लांछन स्वरुपासी ।।' [२३] यासारख्या अभंगामध्ये मुक्ताबाईची मायेविषयक भूमिका स्पष्ट होते. डॉ.ग.ना.जोशी म्हणतात, ''मायावादाचे खंडन मंडन करण्यापेक्षा निखळ ब्रह्मवाद किंवा चैतन्यवाद मुक्ताबाईस अधिक आवडतो असे दिसते. बंधन आणि मोक्ष यांचे द्वैत नसलेली, येणे जाणे नसलेली अजातवादाची भूमिकाही तिच्या काही वचनात आढळते.''[२४] याचेच एक उदाहरण म्हणता येईल असा पुढील अभंग अभ्यासण्याजोगा आहे.

''पाण्याचा बुडबुडा पाण्यात चेष्टा करी । हा निश्चय निर्धारी अवधारावा ।
मायेचे वल्लभ रांजणाशेजारी । घट घटावरी लवंडीतसे ।।......
रुपरेखा कारण विषादाचे मूळ । जळ जळांत कल्लोळ ऐसे जाले ।
म्हणे मुक्ताबाई चेष्टा सार रुणी । माया जाण कणी सैंधवाची ।।'' २५

विशुद्ध अशा स्वरुपाची तत्त्वचर्चा करताना ज्ञानबोध ग्रंथात, मुक्ताबाईच्या वाणीला काही वेगळाच बहर आलेला आहे असे दिसते. त्याचा विचार 'ज्ञानबोध ग्रंथ एक अपूर्व उपलब्धी' या प्रकरणामध्ये केला असल्याने येथे त्याचा अधिक सविस्तर विचार केलेला नाही.

**मुक्तस्थिती वर्णनपर अभंग** – मुक्ताबाईच्या अभंगामधून स्वत:च्या

मुक्त अवस्थेचा वारंवार उच्चार होत राहतो. 'मुक्ताई चिंतने मुक्त पै जाली ।' [२६] 'मुक्ताई जीवन मुक्त हा संसार ।' [२७] किंवा 'मुक्तता पूर्णता मुक्ताई साधली ।' [२८] यासारख्या जवळपास प्रत्येक अभंगामध्येच म्हणावा इतक्या विपुलतेने स्वत:च्या मुक्तावस्थेचा उल्लेख मुक्ताबाई करताना दिसते. यामध्येही आपण कायमसाठी जीवनमुक्त आहोत हे सांगण्याकडे तिचा अधिक कल आहे. 'मुक्ताई जीवन्मुक्तची सर्वदा।' [२९] असे ती यासंदर्भात म्हणते. डॉ.इन्दुमती शेवडे यांचे याबाबतीतले मत लक्षात घेण्याजोगे आहे. त्या म्हणतात, ''इथे मुक्त या शब्दाची अनेक रुपे वापरून मुक्ताबाई आपल्याच नावाला अनेक रूपाने खेळवते आहे. तसे तर निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान या सर्वच नावांना आध्यात्मिक अर्थ आहे. पण त्या नामधारकांनी तो खेळ टाळला आहे. पण हे खेळवणे सढळ असले तरी निरर्थक नाही. ते शब्द मुक्ताबाईने मुद्दाम व नेमकेपणाने वापरले आहेत. त्यातून मुक्ताबाई आपला वेगळेपणा व्यक्त करू पाहते आहे असे जाणवते.'' [३०]

मुक्ताबाईच्या अभंगामध्ये वारंवार मुक्तावस्थेचा उल्लेख का येतो याचे कारण तिच्या मानी व्यक्तिमत्त्वामध्ये दडलेले असावे असे प्रस्तुत संशोधिकेस वाटते. पैठणला शुद्धिपत्र आणण्यास गेलेल्या भावंडांच्या नावावरून हिणवले गेले असल्याचे आपल्याला नामदेवगाथ्यावरून माहिती आहे. मुक्ताबाईच्या अंत:करणात मात्र तो अपमान कोठेतरी खोलवर जिव्हारी लागला असावा असे असेल कदाचित आणि म्हणून स्वत:चे मुक्ताबाई हे नाव सार्थ असल्याचे सांगावे असा भाव त्यापाठीमागे असेल, असे वाटते.

**संवादात्मक अभंग –** इतर सर्व अभंगांपेक्षा वेगळेपणाने उठून दिसणारे मुक्ताबाईचे संवादात्मक अभंग आहेत. मुक्ताबाईच्या अभंगापैकी बराचसा भाग हा संवादात्मक रीतीने व्यक्त झालेला आहे. निवृत्ति, ज्ञानदेव, नामदेव, चांगदेव यांच्याशी मुक्ताबाईचे झालेले बोलणे हे या अभंगांचे स्वरूप आहे. यातही विशेषत: नामदेवांशी जे बोलणे झाले आहे ते अभंग, जे नामदेवाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत येऊन पोहोचतात ते विलक्षण आहेत. आपले म्हणणे पटवून देण्यासाठी एकापाठीमागून एक दृष्टान्त देत जाणे ही जी ज्ञानेश्वरांची रचनापद्धती आहे त्याचा अवलंब मुक्ताबाईच्या या अभंगांमध्ये केलेला आपल्याला

पाहावयास मिळतो. परमेश्वराचा नित्य सहवास असूनही नामदेवाचे शिल्लक राहिलेले कोरेपण, अहंता या साऱ्याला समांतर अशी उदाहरणे मुक्ताबाई एकामागून एक देत राहते आणि उलट परमेश्वराशी सहवास असताना कोणती अवस्था असावयास हवा होता याचेही दाखले देत राहते.

चांगदेव या आपल्या शिष्योत्तमाशी संवाद साधणारे मुक्ताबाईचे अभंगही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आपल्या भावभावनांची अभिव्यक्ती टाळू पाहणारी मुक्ताबाई चांगदेवाच्या निमित्ताने मात्र जराशी मोकळी होताना दिसते. 'निजी निज बाळा न करी पै आळी । अनुहात टाळी वाजविते ।।' [३१] यासारख्या अभंगांमध्ये मुक्ताबाई चांगदेवांना उद्देशून अंगाई आळविताना दिसते. जरी हे सारे वर्णन आध्यात्मिक परिभाषेतील असले तरीही मुक्ताबाईने अंगाईचा काव्यप्रकार येथे अवलंबावा ही घटनाही विलक्षण वाटते. चांगदेवाबाबत असलेल्या वात्सल्यभावाचेच ते प्रकट रूप ठरते. मुक्ताबाई आपले सारे हृद्गत चांगदेवाजवळ व्यक्त करताना दिसते. कधी सहज खेळकर मनोवस्थेमध्ये चांगदेवाची परीक्षा पाहण्याच्या निमित्ताने त्याला कूट प्रश्नही विचारते. या संवादात्मक अभंगामधून एरवी कधीही न डोकावणारे मुक्ताबाईचे व्यक्तिमत्त्व किंचित प्रमाणात उलगडताना दिसते.

**कूट रचना –** 'मुंगी उडाली आकाशी । तिणे गिळिले सूर्याशी ।।'[३२] किंवा 'टेकावरी टेक त्यावरी टेकुली । तेथे एक बाळी विस्मो करी ।।' [३३] यासारखी मुक्ताबाईची कूट रचना प्रसिद्ध आहे. उच्च योगानुभवाचा भरभक्कम आधार असलेली ही रचना म्हणूनच सामान्य जनांना आकलनाच्या पलीकडची ठरते. डॉ.इन्दुमती शेवडे या अभंगरचनेबाबत म्हणतात, ''हा मुक्ताबाईच्या काव्याचा परमोच्च आविष्कार आहे. हा तिचा प्रत्यक्ष अनुभवाविष्कार असल्यामुळे इथे तिच्या काव्यात आगळे चैतन्य ओतप्रोत भरून आलेले दिसते. हे मुक्ताबाईचे नवे रूप आहे. कूट अभंगात मुक्ताबाईने अध्यात्म व काव्य दोहोत वरची पायरी गाठली.'' [३४] आणि खरंच हे विधान अगदी यथार्थ आहे. मुक्ताबाईचे अभंग म्हटले की तिची कूटरचनाच प्राधान्याने लक्षात येते, ती त्यातील काव्यगुणांमुळेच.

आशयदृष्ट्या मुक्ताबाईच्या अभंगांचा येथवर विचार झाला. आता या

अभंगांची कोणकोणती वैशिष्ट्ये जाणवतात ते पाहू.

- मुक्ताबाईचा एकूण पिंड हा भावुक असण्यापेक्षा विचारप्रधान अधिक आहे आणि त्यामुळे तिची रचनापद्धती काव्यापेक्षाही अधिक गद्याला जवळची ठरणारी आहे. तिची रचनापद्धती निबंधसदृश वाङ्मयप्रकाराला अधिक पोषक ठरली असती अशी आहे. परंतु त्या काळामध्ये अशा प्रकारचे गद्य लिखाण केले जात नसल्याने मुक्ताबाईनेही त्याकाळात रुढ असलेल्या काव्यरचनेचा प्रकार अवलंबला असावा असे वाटते. त्यामध्ये काव्यप्रकृतीला विरोधी ठरणारी अशी गद्यसदृश विधाने मुक्ताबाईच्या अभंगामध्ये डोकावतात.

- आपले म्हणणे आहे तसे समोर ठेवणे हीच मुक्ताबाईची भूमिका असल्याचे प्रामुख्याने लक्षात येते. त्यामुळे यथातथ्यता हा त्यांच्या लेखनाचा एक विशेष म्हणून सांगावा लागेल. यातूनच लेखनाला एक प्रकारची प्रांजळताही प्राप्त झालेली दिसते.

- मुक्ताबाईचे सारे लेखन हे तर्कशुद्ध आहे. बुद्धिच्या जोरावर पारखून, सुसंगतरीत्या मुक्ताबाई मांडणी करत जाते. यादृष्टीने नामदेवाशी तिचा झालेला संवाद पाहण्यासारखा आहे. बुद्धिला व अनुभवाला पटेल, रुचेल तेच मान्य करायचे व इतर सारे बाजूला सारायचे ही तिची प्रवृत्ती आहे. त्याचा प्रत्यय तिच्या अभंगामधूनही येतो.

- मुक्ताबाईची एकंदरच प्रकृती ही मौनामध्ये रमणारी आहे. आणि त्याला अनुसरुनच फार पाल्हाळ लावणे, आपले म्हणणे विस्ताराने मांडणे हा भाग येथे आढळत नाही. आपले म्हणणे कमीत कमी शब्दामध्ये मांडावे असा तिचा कल दिसतो. त्यामुळेच या साऱ्या अभंगांमध्ये विलक्षण आशयघनता असलेली दिसते.

- मुक्ताबाईची एकंदरच सारी कविता ही तिच्या स्वत:च्या प्रकृतीनुसार आत्ममग्न अशी आहे. ही तिची प्रवृत्ती या अभंगांमधूनही व्यक्त होते. सर्वसामान्यांना समजावे, त्यांच्या पातळीवर येऊन त्यांना काही समजावून सांगावे ही तिची भूमिका नाही. आणि म्हणून सामान्यांना दुर्बोध ठरेल अशी तिची बरीचशी रचना आहे. तिच्या पातळीवर येऊन जो समजून घेऊ शकेल त्याला मात्र ती भरभरून देईल.

- मुक्ताबाईला काव्यालंकार, उपमा, दृष्टान्त यांचा सोस नाही. याला अपवाद फक्त नामदेवभेटीचा सांगता येईल. त्यावेळी मात्र मुक्ताबाईच्या वाणीला एक वेगळेच तेज प्राप्त झाले असल्याचे दिसते. ज्ञानेश्वरांच्या काव्यप्रकृतीशी सादृश्य दाखविता येईल अशी ही सारी अभंगरचना आहे. ज्ञानबोधमध्येही अशी काही उदाहरणे सापडतात.

- मुक्ताबाईने आपले योगानुभव वर्णन केले आहेत त्या अभंगांमधील चित्रमयता वाखाणण्याजोगी आहे. विशेषत: कुंडलिनीचे केलेले वर्णन अभ्यासण्यासारखे आहे. रुपसंवेदनाचा आणि गतिमानतेचा विलक्षण उत्कट असा प्रत्यय देणारे हे सारे लिखाण आहे.

- 'संवादपरता' हे तिच्या अभंगांचे एक खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अरे रया, दादा, चांगया असे उल्लेख या अभंगांमधून येऊन जातात आणि बोली भाषेची एक सहज स्वाभाविकता त्याच्यातून सहज डोकावून जाते.

- इतर सर्व संतसाहित्याप्रमाणे आपल्या आत्मानुभूतीचा निखळ आविष्कार हे या अभंगाचे स्वरूप आहे. त्यामध्ये काव्यनिर्मिती करत असल्याची कोणती भूमिका दिसत नाही.

- विरोधी अर्थाचे शब्द एकापुढे एक मांडून त्यातून आपले म्हणणे व्यक्त करणे या मार्गाचा अवलंब मुक्ताबाई करताना दिसते. उदा.' जाणते नेणा नेणते जाणा । जाणते नेणते दोनी ही नेणा ।।' किंवा 'काही ते बाही बाही ते काही । काही काही ना बाही ते आम्ही आम्ही ।।' अशासारखी रचना मुक्ताबाईच्या अभंगांमध्ये विशेषत्वाने येते. व्यक्त करावयाचा अनुभव हा शब्दापलीकडचा असल्याने शब्दांची कसरत करत तो अनुभव व्यक्त करावा लागत असावा असे वाटते. परंतु केवळ शाब्दिक कसरत हे त्याचे स्वरूप नाही.

- सरळ, साधी भाषा असूनही आशयच इतका गहन आहे की त्यामुळे मुक्ताबाईची कविता सर्वसामान्यांपर्यंत जाऊन पोहोचत नाही. सामान्यांचा आणि मुक्ताबाईचा अनुभव कोठेही एका पातळीवर येऊ शकत नाही आणि त्यामुळेच इतकी समृद्ध काव्यरचना असूनही ही कविता अलक्षित राहिली असल्याचे आपल्याला जाणवत राहते.

**

**मुक्त जीव सदा होति पैं नामपाठे ।**
**तेंचि रूप विटे देखिलें आम्ही ।। १ ।।**
**पुंडलिके विठ्ठल आणिला पंढरी ।**
**आणूनि लवकरी तारिलें जग ।। २ ।।**
**ऐसें पुण्य केलें एका पुंडलिकेंची ।**
**निरसली जनाची भ्रमभूली ।। ३ ।।**
**मुक्ताई चिंतने मुक्त पैं जाली ।**
**चरणीं समरसली हरिपाठें ।। ४ ।।**

ज्याच्या नामस्मरणाने जीव कायमचा मुक्त होतो त्याचे रूप आम्ही विटेवर उभे असलेले पाहिले. पुंडलिकाने स्वत:च्या भक्तिसामर्थ्याच्या आधारावर विठ्ठलाला पंढरीस आणले, त्यामुळे जग तारले गेले. (जगाला तरण्यासाठी मार्ग सुलभ झाला.) एका पुंडलिकाने हे असे पुण्य केले की त्यामुळे लोकांची भ्रांतकल्पना निरसली गेली. मुक्ताबाई त्या विठ्ठलाच्या चिंतनामुळे मुक्त झाली आणि हरिपाठामुळे त्याच्या चरणाशी समरस झाली. (ऐक्यता पावली.)

*

**शून्यापरतें पाही तंव शून्य तेंही नाहीं ।**
**पाहातें पाहोनि ठायीं ठेवियलें ।। १ ।।**
**कैसागे माये हा तारकु दिवटा ।**
**पंढरी वैकुंठा प्रगटला ।। २ ।।**
**न कळे याची गती आदि मध्य अंती ।**
**जेथें श्रुति नेति नेति प्रगटल्या ।। ३ ।।**
**मुक्ताई सप्रेम विठ्ठल संभ्रम ।**
**शून्याही शून्य सम शेजबाज ।। ४ ।।**

शून्याच्या पलीकडे पाहू जावे तर शून्य ही अवस्थाही (म्हणजे काही नाही ही अवस्थाही) नाहिशी होते. (शून्यावस्थेच्या पलीकडे पाहू जावे तर पाहणारा,

पाहणे व जे पाहावयाचे ते, हे सर्व स्वतःच्या ठिकाणी स्थिर होतात. म्हणजेच द्रष्टा, दर्शन व दृश्य या त्रिपुटीचा लय होतो.) असे झाल्यानंतर डोळ्यांना पाहण्याची दृष्टी ज्याच्यामुळे प्राप्त होते ते परब्रह्म तत्त्व समोर दिसते. तेच परब्रह्म तत्त्व जे आपल्या ठिकाणी ज्योतीरुपाने विलसत आहे ते पंढरपूरी वैकुंठामध्ये प्रकटले आहे. त्याचा आदि, मध्य, अंत समजत नाही आणि म्हणून त्याचे वर्णन श्रुतीसुद्धा करू शकल्या नाहीत. त्यांनाही 'नेति नेति' असे म्हणून मौन बाळगावे लागले. (श्रीज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेल्या सनदीमध्ये मुक्ताबाईनी ज्ञानेश्वरांना जो प्रश्न विचारला होता त्याचा संदर्भ येथे लक्षात घेण्याजोगा आहे. – 'विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणू दादा ।।' अभंग ५) म्हणून विठ्ठल नेमका कसा आहे, तो साकाररुपात दिसतो म्हणून त्याला सगुण म्हणावे तर तो केवळ सगुण नाही. तो त्याही पलीकडचा आहे. निर्गुण म्हणावा तर तो केवळ निर्गुणही नाही. म्हणून त्या परब्रह्माबद्दल बोलावे तर संभ्रमच पडतो, असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**प्रकृति निर्गुण प्रकृति सगुण ।**
**दीपें दीप पूर्ण एका तत्त्वें ।। १ ।।**
**देखिलेगे माये पंढरिपाटणीं ।**
**पुंडलिका आंगणी विठ्ठलराज ।। २ ।।**
**विज्ञानेंसी तेज सज्ञानेंसी निज ।**
**निर्गुणेंसी चोज केलें सये ।। ३ ।।**
**मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल ।**
**निवृत्तिने चोखाळ दाखविलें ।। ४ ।।**

प्रकृती ही निर्गुणही आहे व सगुणही आहे. (बाह्य चराचर विश्व हे प्रकृतीचे निर्गुण तत्त्व आहे. प्राणशक्ती ही प्रकृति तर आत्मा हा पुरुष.) एका तत्त्वाच्या योगे म्हणजे त्याच्या निदिध्यासाने आपल्यामध्येच असलेली अंगुष्ठमात्र ज्योती (दीप) पूर्ण प्रकाशमान झालेली आढळते. त्याच आत्मज्योतीचे स्वरूप असा विठ्ठल पंढरीनगरीत पुंडलिकाघरी पाहावयास मिळाला. तेव्हा सज्ञानता निजली, म्हणजेच मी ज्ञानी आहे ही जाणीव लोप पावली. आणि ज्ञान – अज्ञान यांच्या

अतीत असणारे विज्ञान सतेज झाले. (अज्ञानाचा अभाव तसेच ज्ञानीपणाच्या जाणीवेचाही अभाव म्हणजे विज्ञान ) माझ्यामधीलच निर्गुण प्रकृती हाताशी धरली आणि त्यामुळे हे आश्चर्य घडून आले. असा सर्वजणांना तारक असणारा हा विठ्ठल, तो ज्यामुळे गवसेल असा मार्ग निवृत्तिनाथांनी मला दाखविला, असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**अलिप्त संसारीं हरिनामपाठें ।**
**जाईजे वैकुंठे मुक्तलग ।। १ ।।**
**हरिवीण मुक्त न करि हो सर्वदा ।**
**संसारआपदा भव तोडी ।। २ ।।**
**आशेच्या निराशीं अचेतना वारी ।**
**चेतविल हरी आप आपरूपें ।। ३ ।।**
**मुक्ताई जीवन्मुक्तची सर्वदा ।**
**अभिन्न पैं भेदा भेदियेलें ।। ४ ।।**

व्यक्ती संसारात राहूनच त्यातून हरिनामपाठामुळे अलिप्त होऊ शकते. आणि त्यामुळे वैकुंठाकडे जाण्याचा मार्ग लवकर गवसतो. तेव्हा या मार्गाने लगोलग जावे. या हरिशिवाय इतर कोणीही या भवबंधनातून मुक्त करु शकत नाही. हरि हाच एक संसारातील आपदा, दु:ख यांना तोडतो व भवबंधन तोडतो. या संसारामध्ये आशा ठेवून राहिले तर पदरी निराशाच येते. ही निराशा, अचेतना वारण्याचे, घालविण्याचे काम श्रीहरीच करतो. हरी स्वत:सारखाच तुम्हाला बनवेल आणि तुमच्यामध्ये चेतना निर्माण करेल. मुक्ताई देहामध्ये असूनही कायम मुक्त आहे. आंतरिकदृष्ट्या परमात्म्याशी कायम अभिन्न असल्यामुळे बाह्य नामरुपात्मक जगाचा भेद केला गेला असे मुक्ताबाई सांगतात.

*

**आधी तूं मुक्तचि होतासिरे प्राणिया ।**
**परि वासनें पापिणिया नाडिलासी ।। १ ।।**
**आधींचे आठवीं मग घेई परी ।**
**हरिनाम जिव्हारी मंत्रसार ।। २ ।।**

**आदि मध्य हरी ऊर्ध्व पैं वैकुंठ ।**
**जाईल वासना हरि होईल प्रगट ।। ३ ।।**
**एकतत्त्व धरीं हरिनाम गोड ।**
**येर तें काबाड विषय ओढी ।। ४ ।।**
**नानामतें सांडी वासना पापिणी ।**
**एक नारायणीं चाड धरी ।। ५ ।।**
**मुक्ताई मुक्तलग सांडिली हे वासना ।**
**मुक्तामुक्ती राना हरिपाठ ।। ६ ।।**

अरे प्राण्या (जीवा), तू आधी मुक्तच होतास पण पापी वासनेपायी तू नाडला गेलास. ते तुझे आधीचे मुक्त स्वरूप आठव आणि मग हरीनाम हे जे सर्व मंत्रांचे सार आहे त्याचे स्मरण कर. (जीभेने त्याचा उच्चार कर.) आदि, मध्य, ऊर्ध्व कोठेही जरी पाहिले तरी तेथे वैकुंठच (हरीचाच निवास) असल्याचा प्रत्यय येईल. गोड असणाऱ्या हरिनामाच्या योगे ते एकतत्त्व अंत:करणात दृढ धरले जाईल. इतर सर्व गोष्टी विषयवासनांकडे ओढणाऱ्या असतात. परमेश्वराविषयी जनमानसात रूढ असणारी नाना मते त्यजावी. पापिणी वासना सोडावी आणि एका नारायणाचीच इच्छा बाळगावी. मुक्ताबाई म्हणतात, मी वासना सांडली आणि भवारण्यात हरिपाठाच्या साहाय्याने मुक्ती मिळवली.

*

**नाम मंत्रें हरी निजदासा पावे ।**
**ऐकोनी यां धावे झडकरी ।। १ ।।**
**सुदर्शन करीं पावे लवकरी ।**
**पांडवां साहाकारी श्रीकृष्ण रया ।। २ ।।**
**निजानंद दावी उघड पैं वैकुंठ ।**
**नामेंचि प्रकट आम्हांलागी ।। ३ ।।**
**मुक्ताई जीवन मुक्त हा संसार ।**
**हरी पारावार केला आम्ही ।। ४ ।।**

हरीच्या नाममंत्रामुळे तो त्याच्या दासाला प्राप्त होतो. नाममंत्रउच्चार ऐकून तो त्वरित धाव घेतो. हातामध्ये सुदर्शन असलेला श्रीकृष्ण लवकर पावतो, की जो

पांडवांनाही सहाय्यकारी बनला होता. या नामामुळे स्वतःच्याच ठिकाणी असलेला आनंद दिसून आला आणि त्यामुळे येथेच वैकुंठ प्रकट झाले. हरी हाच पारावार आम्ही केला त्यामुळे या संसारातून जीवन्मुक्ती मिळाली, असे मुक्ताबाई म्हणतात.

✻

**भजनभावो देहीं नित्यनाम पैठा ।**
**नामेंचि वैकुंठा गणिका गेली ।। १ ।।**
**नाममंत्र आम्हां हरीरामकृष्ण ।**
**दिननिशीं प्रश्न मुक्तिमार्गु ।। २ ।।**
**नामचि तारकु तरले भवसिंधु ।**
**हरिनाम छंदु मंत्रसार ।। ३ ।।**
**मुक्ताई चिंतन हरिप्रेम पोटीं ।**
**नित्य नाम घोटी अमृत सदा ।। ४ ।।**

भजनाचा भाव मनात धरून गणिकेने स्वतःच्या देहातच नामाची वसती केली. आणि त्यामुळे तिला वैकुंठप्राप्त झाले. हरीरामकृष्ण हा आमचा नाममंत्र आहे. नामस्मरण आणि त्याला दिलेली चिंतनाची जोड (कोण मी ? कोठील ? का गा जन्मा आलो ? कासयासी ल्यालो नामरूप ? यासारख्या प्रश्नांच्या चिंतनाची जोड) यातूनच मुक्तिचा मार्ग गवसतो. भवसागर तरुन जाण्यास नामच तारक आहे. हरिनामाचा छंद ज्यांनी जपला ते भवसिंधु तरून गेले. हरिचे प्रेम मनात साठवून, सतत त्याचे चिंतन करत, नित्य नामस्मरण करत मुक्ताबाईने अमृत प्राशन केले.

✻

**मुक्त पैं अखंड त्यासि पैं फावले ।**
**मुक्तचि घडलें हरिच्या पाठें ।। १ ।।**
**रामकृष्णें मुक्त जाले पैं अनंत ।**
**तरले पतीत युगानयुगीं ।। २ ।।**
**कृष्णनामें जीव झाले सदा शिव ।**
**वैकुंठ राणिव मुक्त सदा ।। ३ ।।**

**मुक्ताई संजीवन मुक्तमुक्ति कोडें ।**
**जालें पैं निवाडें हरिरुप ।। ४ ।।**

मोकळ्या मनाने आणि अखंडपणे जो नामस्मरण करतो त्याला फायदा होतो तो असा की त्यामुळे तो मुक्तच होऊन जातो. रामकृष्णांच्या नामस्मरणाने असंख्य पतीत जीव उद्धरले गेले. कृष्णनामामुळे जीव जीवपणाने शिल्लक न राहता तो सदाशिवच होऊन जातो. जीवशिवऐक्य होते. अशा मुक्त झालेल्या व्यक्तीला वैकुंठाचे साम्राज्य सदा अनुभवायला मिळते. नामस्मरणामुळे मुक्तिरुपी कोडे उलगडले आणि सर्व रुपांमध्ये हरिचेच रुप दिसू लागले अशी अवस्था मुक्ताबाईला प्राप्त झाली.

*

**मुक्तामुक्त दोन्ही नाईकतो कर्णी ।**
**हरिनामपर्वणी सदा काळ ।। १ ।।**
**नाहीं काळ तेथें आम्हां वेळ कैची ।**
**हरिनामछंदाची गोडी थोरी ।। २ ।।**
**नाना विघ्न बाधा नाईकों आम्ही कदा ।**
**निरंतर धंदा रामकृष्ण ।। ३ ।।**
**मुक्तपणें मुक्त मुक्ताई पैं रत ।**
**हरिनाम स्मरत सर्वकाळ ।। ४ ।।**

आपण मुक्त आहोत की बंधनात आहोत हे आम्ही काहीच ऐकत नाही, लक्षात घेत नाही. त्याचा विचार न करता, आम्ही सदासर्वकाळ हरिनामाची पर्वणी साधलेली असते. हरिनामाच्या या छंदाची, त्याच्या गोडीची थोरवी अशी की त्यासाठी काळवेळाचे भान अप्रस्तुत ठरते. (कोणत्याही काळात, वेळेत हे नामस्मरण चालू राहते. 'हरिच्या दासा शुभकाळ दाही दिशा' याप्रमाणे) आम्ही रामकृष्णाच्या नामामध्ये निरंतर दंग असल्याने नाना तऱ्हेची विघ्न, बाधा यांची वार्ताही आमच्या कानी पडत नाही. मुक्तपणे मुक्त म्हणजेच मुक्त-अमुक्त यांच्या कल्पनेपासून मुक्त असणारी मुक्ताई हरिनामात रत होऊन सर्वकाळ त्याचे स्मरण करते.

*

**आदि मध्य ऊर्ध्व मुक्त भक्त हरी ।**
**सबाह्य अभ्यंतरी हरि एकु ।। १ ।।**
**नलगती तीर्थे हरिरूपें मुक्त ।**
**अवघेंचि सूक्त जपिनिलें ।। २ ।।**
**ज्याचेनि नामें मुक्त पैं जढमूढ ।**
**तरले दगड समुद्रीं देखा ।। ३ ।।**
**मुक्ताई हरिनामें सर्वदा पैं मुक्त ।**
**नाहीं आदि अंत उरला आम्हां ।।४ ।।**

हरीभक्ताला स्वत:मध्ये व बाहेर विश्वामध्ये एका हरीचेच दर्शन घडत असल्यामुळे तो भक्त आदि, मध्य, ऊर्ध्व या कल्पनांपासून मुक्त असतो. स्वत: हरिरुप बनल्यामुळे तो स्वत: मुक्त झालेला असतो. त्यामुळे त्याला तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पापमुक्तीसाठी जावे लागत नाही. हरिनामाच्या माध्यमातून सर्वच सुक्तांचा, वेदोक्तमंत्रांचा आपोआपच जप होऊन जातो. ज्याच्या नामाने समुद्रात दगड तरले, ज्याच्या नामाने जडमूढ असे जीव भवसागरातून मुक्त होतात त्या हरिनामाच्या स्मरणाने मुक्ताबाई मुक्त झाल्या. आदि, अंत असा भाग त्यांच्या ठिकाणी उरला नाही कारण अनादि अशा परमतत्त्वाशी सामरस्य प्रस्थापित झाले.

*

**आदि अंतु हरि सर्वांघटी पूर्ण ।**
**जाणोनि संतजन प्रेमभरित ।। १ ।।**
**रामनाम चित्तें प्रेम वोसंडत ।**
**नित्यानित्य तृप्त हरिभक्ती ।। २ ।।**
**शांति क्षमा दया सावध पैं चित्तीं ।**
**आनंदे डुल्लती सनकादिक ।। ३ ।।**
**मुक्ताई म्हणे नाम श्रीहरीचें जोडीं ।**
**नित्यता आवडी चरणसेवा ।। ४ ।।**

हरी हा सर्व घटांमध्ये म्हणजे सर्व देहांमध्ये पूर्णत्वाने वास करून असतो. हरी हा शब्द येथे दोन अर्थांनी आलेला आहे. हरि आदिपासून अंतापर्यंत सर्वत्र पूर्णत्वाने व्याप्त आहे असा एक अर्थ होतो. तर दुसऱ्या अर्थाने सर्वांमध्ये व्याप्त असणारा

हरी कसा आहे ? याचे वर्णन 'आदि अंतु हरि' याने केले आहे. हा हरि आदि अंत यांचे हरण करणारा आहे. ('मुक्ताई हरिनामे सर्वदा पैं मुक्त । नाही आदि अंत उरला आम्हां ।।') सर्वत्र हरीच आहे हे संतजन जाणून असतात त्यामुळे विश्वाबद्दल त्यांच्या मनात प्रेम असते. चित्ताच्या स्तरावरून ओसंडून वाहणाऱ्या प्रेमाने रामनाम स्मरले तर अशा हरिभक्तीने नित्य व अनित्य म्हणजेच आत्मा व देह यांना दोघांनाही तृप्तीचा अनुभव येतो. शांती, क्षमा, दया यांनी पूर्ण असलेले सनक, सनातन, सनंदन इ. ऋषी संत, मुनी आनंदाने डुलत असतात पण त्याचवेळी आत्म्याकडून चित्तावर होणाऱ्या या शुद्ध प्रक्षेपणाबद्दल ते सावध, सजग असतात. संतांच्या चरणसेवेची आवड असणाऱ्या मुक्ताबाई हरिनामामुळे हरिशी जोडल्या जातात, हरिरुप होतात.

*

**परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा ।**
**तया नाही कदा गर्भवास ।। १ ।।**
**उपजोनी जनीं धन्य ते योनी ।**
**चित्त नारायणीं मुक्तलग ।। २ ।।**
**अव्यक्ती पैं व्यक्तिं चित्तासि अनुभव ।**
**सर्व सर्वी देव भरला दिसे ।। ३ ।।**
**ज्ञेय ज्ञाता ज्ञान उन्मनी विज्ञान ।**
**चित्त नारायण झालें त्याचें ।। ४ ।।**
**आदि अंती हरि सर्व त्याचा जाला ।**
**परतोनी अबोला प्रपंचेसी ।। ५ ।।**
**मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त ।**
**हरि हेंचि संचित आम्हां घरी ।। ६ ।।**

परब्रह्माच्या ठायी निरंतर चित्त असणे हाच ज्याचा धंदा, उद्योग होऊन बसला आहे अशा व्यक्तीला पुन्हा गर्भवास नाही. जन्ममरणाच्या परंपरेत अशी व्यक्ती अडकत नाही. नारायणाच्या ठिकाणी आनंदाने चित्त एकाग्र करणारी व्यक्ती जन्माला येऊन धन्यता पावते असे म्हणता येते. त्यांना व्यक्तामधून अव्यक्ताचाच अनुभव येतो. सर्वांमध्ये देवच भरला आहे, सर्व काही देवच झाला

आहे असा त्यांचा प्रत्यय असतो; ज्यांचे चित्त अशा रीतीने नारायणस्वरूपच झाले आहे त्याच्या ठिकाणी ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान या त्रिपुटीचा लय होऊन उन्मनी अवस्था प्राप्त होते व त्यांना विज्ञान गवसते. ('उन्मनी ते निवृत्ति जाण । जेथे विरे जाणपण । विज्ञान ते ।।') आदि अंती सर्वत्र हरिच आहे. असा हरि ज्याचा झाला त्याचा प्रपंचाशी अबोला होतो. (म्हणजेच समाधि अवस्था उत्थान पावून जागृतीत परत आल्यावर, सर्व प्रपंचाकडे तो साक्षीभावाने पाहतो.) मुक्ताबाईचे चित्त प्रपंच कल्पनांपासून मुक्त आहे व त्यांचे संचित हे केवळ हरि हेच आहे. हरिचीच साठवण त्यांनी केली आहे.

*

**सर्वी सर्व सुख अहं तेचि दुःख ।**
**मोहममताविष त्यजियेलें ।। १ ।।**
**साधक बाधक करूनि विवेक ।**
**मति मार्ग तर्क शोधियेला ।। २ ।।**
**सर्वतीर्थ हरि दुभाळु धेनुवा ।**
**वोळला कणवा चातकाचा ।। ३ ।।**
**सूक्ष्ममार्ग त्याचा भक्त देहीं मायेंचा ।**
**आकळावयाचा सत्व धरीं ।। ४ ।।**
**वेद जंव वाणी श्रुति तुपें काहाणी ।**
**ऐको जाय कर्णी तंव परता जाय ।। ५ ।।**
**मुक्ताई सोहंभावे भरलें दिसे देवें ।**
**मूर्तामूर्त सोहंभावे हरि घोटी ।। ६ ।।**

सर्व सुखाचे आगर असणारा तो हरि सर्वांमध्ये भरून आहे. अहंकार हा दुःखरुप आहे. संतांनी मोहममतारुपी विषाचा त्याग केला. (अहंकार व त्याला जोडून येणारे मोहममता यांचा त्याग केल्यावर सर्वांमध्ये उपस्थित असणारा तो जाणवतो.) मुक्ताबाई म्हणतात, ''साधक बाधक विवेकाचा आश्रय करून, बुद्धीच्या तर्काच्या आधारे त्याचा शोध घ्यायचा आम्ही प्रयत्न केला.'' सर्व तीर्थ म्हणजे सर्वांना तारणारा हरि हा दुभत्या धेनूसारखा आहे. चातकाच्या आर्त भावाची कणव येऊन जणू तो स्वतः धावत येतो. त्याचा हा मार्ग सूक्ष्ममार्ग

असतो. देहामध्ये, मायेमध्ये असणारा भक्त त्याचे आकलन करून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो. वेद, श्रुती त्याचेच गुणगान करत असतात. परंतु ते ऐकून त्याचे आकलन करु पाहावे तर तो त्याही पलीकडे असल्याचे जाणवते. हे समग्र विश्व, मूर्त अमूर्त सारे काही देवाने भरून राहिले असल्याचा प्रत्यय सोहंभावामुळे मुक्ताबाईला येतो. मूर्त आणि अमूर्त यामधून एका हरिच्याच रसाचे मुक्ताई सोहंभावाने प्राशन करते.

*

**पूजा पूज्य वीते पूजक पैं चित्तें ।**
**घाली दंडवते भावशिळा ।। १ ।।**
**चंपक सुमनें पूजी कातळीनें ।**
**धूप दिप मनें मानसिक ।। २ ।।**
**भावातीत भावो वोगरी अरावो ।**
**पाहुणा पंढरीरावो हरि माझा ।। ३ ।।**
**मुक्ताई संपन्न विस्तारुनि अन्न ।**
**सेवी नारायण हरि माझा ।। ४ ।।**

पूजक (मानसपूजा करणारा) स्वत:च्याच चित्तामध्ये, मनामध्ये पूज्य दैवत व पूजेची क्रिया निर्माण करतो. भावपूर्णतेने तो मनातल्या मनात त्या दैवतास दंडवत घालतो. माझ्या घरी पाहुणा म्हणून आलेल्या पंढरीरायाचे भावातीत भावाने मी आतिथ्य करते, असे मुक्ताबाई म्हणतात. (मनामध्ये विठ्ठलाच्या झालेल्या आगमनामुळे भावातीत अवस्था निर्माण होते. भावातीत अशी अवस्था हाच जणू भाव.) पंढरीरायाला मी स्वत: वाढपी होऊन जेवू घालते. मी वाढलेले जेवण प्रत्यक्ष हरि सेवन करतो, ग्रहण करतो हे पाहून मुक्ताबाईला संपन्नतेचा अनुभव येतो. (षड्ऐश्वर्य गुणांनी मंडित असा पाहुणा ज्या यजमानाकडे जाणार तो यजमानही तेवढ्याच तोलामोलाचा असणार हे उघड आहे म्हणून मुक्ताबाईला संपन्नतेचा अनुभव येतो.)

*

**अविट न विटे हरिचे हे गुण ।**
**सर्व सनातन ध्यान रूपें ।। १ ।।**

**साध्य हे साधन हरिरूपें ध्यान ।**
**रामकृष्ण कीर्तन मुक्त आम्ही ।। २ ।।**
**असंगेचि नट्ट नटलों पैं साचे ।**
**नाहीं त्या यमाचें भय आम्हां ।। ३ ।।**
**मुक्तता पूर्णता मुक्ताई सधली ।**
**साधन दिधली चांगयासी ।। ४ ।।**

हरीचे गुण हे अविट आहेत, न विटणारे आहेत. असा हरि जो सर्वसनातन आहे त्याचे रूप ध्यानीमनी असते असे मुक्ताबाई म्हणतात. हरिरूप होणे हे साध्य पण तेच इथे साधन बनते. कारण ध्यान कसे केले जाते तर हरिरूप होऊनच हरिचे ध्यान असते. ('शिवो भूत्वा शिवम् यजेत्' या पद्धतीने) तेव्हा रामकृष्णाच्या कीर्तनाने आम्ही मुक्त झालो. नट वेगवेगळ्या भूमिका साकारत असतो पण त्याचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व त्या भूमिकेपासून निराळे आहे या गोष्टीचे त्याचे भान कधीही सुटलेले नसते. म्हणजेच तो नट असंगपणे नटतो तसे आम्ही या जगतरंगभूमीवर असंगपणे नटतो. (विश्वातील कोणतेही क्रियाव्यापार करत असताना स्वत:च्या स्वरूपाचे भान कधीही सुटलेले नसते.) आम्ही आत्मरुप आहोत याचे भान आम्हाला सतत असल्याने आम्हाला त्या यमाचे भय वाटत नाही. या साधनामार्गाचा अवलंब केल्यामुळे मुक्ताईला पूर्णता, मुक्तता लाभली आणि तोच साधनामार्ग त्यांनी चांगदेवाला दिला.

*

**व्यक्त अव्यक्तीचें रूपस मोहाचें ।**
**एकतत्त्व दीपाचें हृदयीं नांदे ।। १ ।।**
**चांगया फावलें फावोनी घेतलें ।**
**निवृत्तीनें दिधलें आमुच्या करी ।। २ ।।**
**आदि मध्य यासी सर्वत्र निवासी ।**
**एकरूपें निशी दवडितु ।। ३ ।।**
**मुक्ताई पूर्णता एकरूपें चित्ता ।**
**आदि अंतु कथा सांडियेली ।। ४ ।।**

अव्यक्त तत्त्व व्यक्त रूप धारण करताना ते मोहाचे रुप बनून व्यक्त होते.

(मोहमयी रूप धारण करते.) परंतु तरीही त्या सर्वांमध्ये, हृदयामध्ये दीपाचे एकतत्त्व नांदत असते. म्हणजेच सर्वांमध्ये ज्योतिर्मय आत्म्याचा निवास असतो. हे जे ज्ञान निवृत्तिनाथांनी आम्हाला दिले ते चांगयाला लाभले. त्याचा चांगदेवाने फायदा करून घेतला. हरिला आदि मध्य असे काही नाही कारण तो सर्वत्र निवासी आहे. अशा सर्वत्र निवास असणाऱ्या त्या एकमेव रुपाशी एकरुप झाल्यामुळे अज्ञानाची रात्र दूर पळाली. मुक्ताबाई चित्ताने पूर्णपणे त्याच्याशी एकरुप झाली आणि आदि अंत कथेचा त्याग केला. म्हणजेच आदि अंतविरहित आत्मतत्त्व मुक्ताबाईला प्राप्त झाले. नव्हे, ते आत्मतत्त्व ती स्वतःच झाली.

*

**मनें मन चोरी मनोमन धरी ।**
**कुंडली आधारीं सहस्त्रदळीं ।। १ ।।**
**मन हें वोगरु आदि हरिहरु ।**
**करी पाहुणेरा आदिरूपा ।। २ ।।**
**साविया विसरू घेसील पडिभरू ।**
**गुरुकृपा विरु विरे सदा ।। ३ ।।**
**मुक्ता मुक्त चित्तें गुरुमार्ग विते ।**
**पावन त्वरिते भवीं भाव ।। ४ ।।**

मनानेच मनाच्या मनपणाला चोरावे म्हणजे चंचलता हे जे मनाचे मनपण आहे ते चोरावे. आणि सुषुम्ना नाडीत मूलाधारापासून सहस्त्रादळापर्यंत असलेल्या ('नाभीपासून ब्रह्मरंध्रात सोहं ध्वनी असे खेळत' - स्वामी स्वरुपानंद, पावस) सोऽहम्‌ला मनात धारण कर. म्हणजेच सोऽहम्‌चे अनुसंधान राखावे. मग आदि अशा हरिहराचें मनरुपी यजमान आदरातिथ्य करेल. (मन त्या परमेश्वराच्या आगमनाची उत्सुकतेने वाट पाहते आणि मग अशा वेळी 'तो' ही मनाकडे धावून जातो. तेव्हा मनाला होणारा आनंद म्हणजे पाहुणेर असे येथे म्हणता येईल.) मनाचे मनपण सर्वथा विसरुन त्या श्रेष्ठाचेच ग्रहण केले तर गुरुकृपेच्या योगाने मनाचे मनपण कायमसाठीच विरुन जाईल. या भवसागरात जो भाव (सोऽहमभाव) त्वरित पावन करणारा आहे असा भाव प्रतिपादन करणारा गुरुमार्ग मुक्ताई मुक्त चित्ताने शिष्यांना देऊन संप्रदायाचा विस्तार करतात.

**सर्व रूपीं निर्गुण संचलें पैं सर्वदा ।**
**आकार संपदा नाहीं तया ।। १ ।।**
**आकारिती भक्त मायामय काम ।**
**सर्वत्र नि:सिम अंतरी आहे ।। २ ।।**
**वृत्तीचा उच्छेदु निवृत्ति तत्त्वता ।**
**सर्वही समता सांगितली ।। ३ ।।**
**मुक्ताई अविट मुक्तपंथरत ।**
**जीवीं शिवीं अनंत तत्त्वविद ।। ४ ।।**

निर्गुण तत्त्व सर्व रुपांमध्ये सदासर्वदा ठासून भरलेले आहे. त्याला कोणत्याही विशिष्ट अशा आकाराची मर्यादा नाही. भक्तांनी देहरुप धारण करणे हे केवळ मायामय काम आहे. वस्तुत: त्यांच्या अंत:करणात मात्र ते निर्गुण तत्त्वच भरून राहिलेले असते. वृत्तीचा उच्छेद होणे म्हणजेच निवृत्ति होय. त्या निवृत्त मनाच्या अवस्थेतून प्रतीत होणारी सार्वत्रिक समता निवृत्तिनाथांनी मला समजावून सांगितली. जीवाशिवाच्या ठिकाणी ते अनंतत्त्वच भरून राहिले आहे हे जाणून मुक्ताबाई मुक्तीच्या अविट पंथामध्ये रंगून गेल्या.

*

**उर्णाचिया गळां बांधिली दोरी ।**
**पाहों जाय घरीं तंव तंतु नाही ।। १ ।।**
**तैसें झालें बाई जंव एकतत्त्व नाहीं ।**
**दुजी जंव साई तव हें अंध ।। २ ।।**
**ऐसी मी हो अंध जात होतें वायां ।**
**प्रकृति सावया पावली तेथें ।। ३ ।।**
**मुक्ताई सावध करी निवृत्तिराज ।**
**हरिप्रेमें उमज एकतत्त्वें ।। ४ ।।**

कोळ्याच्या गळ्यामध्ये दोरी बांधली असावी आणि त्या दोरीच्या आधाराने तो सरळ खाली जातो, वर जातो असे भासते. परंतु प्रत्यक्षात पाहू गेले तर तो तंतू दिसत नाही. (अगदी सूक्ष्म असतो.) प्रकृति ही ज्याच्या हातातील कळसूत्री बाहुली आहे तीच पाहत राहिले तर तिचे नियमन करणारे सूत्र दिसू शकत नाही.

त्याबाबतीत अंधत्व आल्यासारखे होते. मुक्ताबाई म्हणतात, तसे माझ्याबाबत घडत होते. प्रकृतिचे नियमन करणारे एकतत्त्व माझ्या नजरेआड झाले होते. परंतु स्वत: प्रकृतिमाताच माझ्या साहाय्याला धावली.(समांतर संदर्भ – 'शिव स्वरुपाची । दावी ओळखण । निजांगे आटोन । शक्तिदेवी ।।' अभंग अमृतानुभव – स्वामी स्वरुपानंद) अशा प्रकारे प्रकृति, माया जी एरवी बंधनकारक असते तीच शिव-स्वरुपाची ओळख करून देणारी शक्ती बनून सहाय्य करते. निवृत्तिनाथांनी सावध केल्यामुळे, हरिप्रेमामुळे या साऱ्या विश्वात एकतत्त्वच भरून राहिले असल्याचे मुक्ताबाईना उमगले. (साम्यदर्शक ओव्या – जैसी ऊर्णनाभी तत्त्वाधारे । सहज खालती उतरे । मागती ग्रासूनी निर्धारे । स्वस्थानासी ये ।। १२३ ।। तैसे ब्रह्मसूत्र जाणूनी । प्रपंचाभास ग्रासूनी । सुचित्त राहे स्वस्थानी । स्वयं बोधे ।। १२४ ।। संदर्भ – ज्ञानेश्वरकृत उत्तरगीता.)

*

**सहस्त्रदळीं हरि आत्मा हा कुसरी ।**
**नांदे देहा भीतरीं अलिप्त सदा ।। १ ।।**
**रविबिंब बिंबे घटमठीं सदा ।**
**तें नातळे पैं कदा तैसा आम्हां ।। २ ।।**
**अलिप्त श्रीहरि सेवी कां झडकरी ।**
**सेवितां झडकरी हरिच होआल ।। ३ ।।**
**चंदनाच्या हती वेधल्या वनस्पती ।**
**तैसी आहे संगतीं या हरिपाठें ।। ४ ।।**
**मुक्ताई चिंतित चिंतामणी चित्तीं ।**
**इच्छिले पावती भक्त सदा ।। ५ ।।**

सहस्त्रदलामध्ये ज्या हरीचा निवास असतो तोच देहामध्ये आत्मरुपाने सतत अलिप्तपणे, कौशल्याने नांदत असतो. एकच सूर्यबिंब घटामध्ये, मठामध्ये सर्वत्र प्रतिबिंबित होते. (त्याचप्रमाणे एकच आत्मतत्त्व सर्वांमध्ये व्यापून आहे.) हे जसे आम्हाला समजत नाहीत तशी परिस्थिती आमच्याबाबतीत होते. अलिप्त असणाऱ्या श्रीहरीचे तुम्ही लवकर सेवन का करीत नाही (सेवी – सेवन करणे, सेवा करणे या दोन्ही अर्थाने हे विधान लागू पडते.) त्याचे सेवन करताना,

ताबडतोब तुम्हीच श्रीहरी बनून जाल. चंदनाच्या संगतीत असणाऱ्या वनस्पती चंदनाच्याच वासाने वेढल्या जाव्या त्याप्रमाणे या हरिपाठाची संगत आहे. मुक्ताई चित्तामध्ये (अंत:करणपूर्वक) चिंतामणीचे म्हणजे आत्मतत्त्वाचे चिंतन करतात; जो चिंतामणी भक्तांचे मनोवांछित सदा पूर्ण करतो.

✻

**नादाबिंदा भेटी जे वेळीं पैं जाली ।**
**ऐशी एके बोली बोलतीं जीव ।। १ ।।**
**उगेंचि मोहन धरूनि प्रपंची ।**
**त्यासी पैं यमाची नगरी आहे ।। २ ।।**
**जीव जंतु जड त्यासी उपदेशीं ।**
**त्यासी गर्भवासी घाली देवो ।। ३ ।।**
**मुक्ताई श्रीहरी उपदेशी निवृत्ति ।**
**संसार पुढती नाहीं आम्हां ।। ४ ।।**

ज्यामुळे नाद आणि बिंदू समरस होतात अशी एक बोली जीव सतत बोलत असतो. (ही बोली म्हणजे सोऽहम् ध्वनी) पण त्या ध्वनीकडे लक्ष न देता जो प्रपंचामध्ये मोह धरून राहतो त्याला हा प्रपंच म्हणजे यमनगरी आहे. असे प्रपंचासक्त, जड जीव जंतु जे आहेत अशा जीवांना देव पुन्हा गर्भवासी बनवितो. पण निवृत्तिनाथांनी श्रीहरीचा उपदेश केला त्यामुळे आम्हाला आता यापुढे पुन्हा संसारचक्रात फिरणे उरले नाही, असे मुक्ताबाई म्हणतात.

✻

**देउळींचा देवो घरभरी भावो ।**
**कळसेवीण वावो जातु असे ।। १ ।।**
**जाताती वाउगे नटनाट्यसोंगे ।**
**चित्तअनुरागें भजतीना ।। २ ।।**
**असोनि न दिसे उगयाचि पिसे ।**
**घेती वायां वसे सज्जनेविण ।। ३ ।।**
**रावो रंक कोहं न म्हणेचि सोहं ।**
**साकारलें ओहं न कळे तया ।। ४ ।।**

**भ्रमाचेनि भूली वायाचि घरकुली ।**
**माया आड ठेली अरे रया ।। ५ ।।**
**मुक्ताई परेसी दुभतें चहूंसी ।**
**सत्रावी सर्वरसीं एका देवें ।। ६।।**

कळसाकडे लक्ष जात नाही तोपर्यंत (देऊळ म्हणजे नरदेह आणि कळस म्हणजे ब्रह्मरंध्र.) देवळातलाच देव घरामध्ये सर्वत्र भरलेला आहे हे समजत नाही. देहाच्या कणाकणात भरलेला परमेश्वर कळत नाही. त्यामुळे त्याच्या बाह्यरुपाकडेच लक्ष गेल्याने (की जे 'त्या' नटाचे केवळ नाटकापुरते घेतलेले सोंग आहे, त्याकडेच लक्ष गेल्याने) फसगत होते. चित्ताच्या स्तरावरुन प्रेमभावाने भजन घडत नाही. राव, रंक सर्वजण कोऽहम् , कोऽहम् करत राहतात, त्याचा शोध घेत राहतात. पण सोऽहम् म्हणत नाहीत आणि त्यामुळे सर्व चराचरामध्ये ओंकारच साकारलेला आहे हे त्यांना कळत नाही. विश्वामध्ये सर्वत्र भरलेला असूनही 'तो' दिसत नाही आणि मग त्याला शोधण्यासाठी, त्याच्या प्राप्तीसाठी कितीही व्रतवैकल्ये केली तरी ती संतसंगतीशिवाय व्यर्थ जातात. (कारण सोऽहम् ही खूण सद्गुरु सांगतात. त्या भावाशिवाय देव कसा आढळणार ? म्हणून ती व्यर्थ जातात.) हे कळत नाही कारण तेथे माया आडवी येते. मुक्ताई मात्र परतत्त्वाचे दोहन करतात आणि सर्व रसांमधूनही सत्रावीचा अनुभव घेतात.

*

**विश्रांति मनाची निजशांति साची ।**
**मग त्या यमाची भेटी नाहीं ।। १ ।।**
**अधिकारी मन मग सारी स्नान ।**
**रोकडेंचि साधन आलें हातां ।। २ ।।**
**साधिलें साधन नित्य अनुष्ठान ।**
**चित्तीं नारायण मंत्र जपे ।। ३ ।।**
**मुक्ताई प्रवीण नारायण धन ।**
**नित्य मंत्रे स्नान करी वेगीं ।। ४ ।।**

निजशांतीमध्येच आपल्या मनाला खरोखर विश्रांती मिळते हा ज्याचा अनुभव आहे अशा व्यक्तीला यमाची भेट होत नाही. (मृत्यूसमयी अशा व्यक्तीला

यमयातना सोसाव्या लागत नाहीत.) असे 'अधिकारी मन' असेल तर सर्व पुण्यक्षेत्री स्नान केल्याचे पुण्य असाल तेथेच प्राप्त होते, आणि असे रोकडे साधन आमच्या हाती आले आहे, असे मुक्ताबाई म्हणतात. नित्य अनुष्ठानपूर्वक नारायणमंत्राचा चित्तातून जप करणे हे ते साधन होय. ते साधन आम्ही प्राप्त करून घेतले. असे नारायणरुप धन जोडण्यात मुक्ताई प्रवीण झाल्या आहेत. तुम्हीही नित्यमंत्रद्वारा स्नान करून वेगाने पवित्र व्हा, असे त्या सांगतात.

*

**मुक्तपणें सांग देवो होय देवांग ।**
**मीपणें उद्वेग नेघे रया ।। १ ।।**
**वाउगें मीपण आथिलें प्रवीण ।**
**एक नारायण तत्त्व खरें ।। २ ।।**
**मुक्ता मुक्ती दोन्ही करी कारे शिराणी ।**
**द्वैताची काहाणी नाहीं तुज ।। ३ ।।**
**मुक्ताई अद्वैत द्वैतीं द्वैतातीत ।**
**अवघाचि अनंतर दिसे देहीं ।। ४ ।।**

देवांग मूर्तिमंत देवच कसा बनेल हे मुक्ताई मुक्तपणे सांगत आहेत.(जीव हा ईश्वरी अंश असल्याने त्याला येथे देवाचे अंग - देवांग असे म्हटले आहे.) देहविशिष्ट मीपणा बाळगला की उद्वेग निर्माण होतो. चिंता, काळजी, दु:ख हे सर्व ईश्वरापासून विभक्त झाल्याने निर्माण होते. तेव्हा मीपणा धरून उद्वेग प्राप्त होईल असे करू नकोस रे बाबा ! हा मीपणा व्यर्थ आहे. एक नारायण तत्त्वच खरे आहे हे जाणणारा, त्या भावामध्ये प्रवीण असणारा हा भाग्यवान होय. मुक्ती ही मुक्ताईने दोन्ही हातांनी कवटाळली आहे. तेव्हा मुक्तीचे दुर्लभत्व कोठे शिल्लक राहिले ? (वर सांगितले आहे त्याप्रमाणे मीपणाचा त्याग केला तर) द्वैताची वार्ता तुझ्या कानी येणार नाही. तुला 'अद्वयावस्था' प्राप्त होईल. द्वैत जीवन-व्यवहारात राहूनसुद्धा द्वैतातीत, अद्वैत अवस्था मुक्ताबाईने प्राप्त करून घेतली त्यामुळे देहामध्ये सर्वत्र अनंतच भरलेला आहे असा त्यांना प्रत्यय येतो.

*

**अंतर बाह्य निके सर्व इंद्रियांचे चोज ।**

**निजीं निजबीज एकतत्त्व ।। १ ।।**
**आदि नाहीं अनादि नाहीं ।**
**तें रूप पाहीं अविट बाईये ।। २ ।।**
**मुक्ताई संजीवन तत्वता निर्गुण ।**
**आकार सगुण प्रपंचीचा ।। ३ ।।**

स्वत:मध्येच ते एकतत्त्व हे निजबीज या स्वरूपामध्ये प्रतिष्ठित असते. ते निजबीज (आत्मतत्त्व) हे अंतर्बाह्य पूर्ण असून, सर्व इंद्रियांना ज्याचे आश्चर्य, कौतुक, प्रेम वाटावे असे ते आहे. त्या रूपाला आदि नाही. ते तत्त्व अनादि म्हणावे तर ते तसेही नाही. असे हे अविट रूप (स्वत:च्याच अंत:करणात) पाहा. तत्त्वत: निर्गुण असणारे तत्त्वच प्रपंचाच्या रूपाने सगुण साकार होते हे जाणल्याने मला संजीवन प्राप्त झाले, असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**नामबळें देहीं असोनियां मुक्त ।**
**शांति क्षमा चित्त हरिभजनें ।। १ ।।**
**दया धरा चित्तीं सर्वभूतीं करुणा ।**
**निरंतर वासना हरिरूपीं ।। २ ।।**
**माधव मुकुंद हरिनाम चित्ती ।**
**सर्व पैं मुक्ति नामपाठें ।। ३ ।।**
**मुक्ताईचें धन हरिनामें उच्चारु ।**
**अवघाचि संसारु मुक्त केला ।। ४ ।।**

देहामध्ये असूनही जीव नामाच्या आधाराने मुक्त होऊ शकतो. त्यासाठी शांतिपूर्ण व क्षमायुक्त असे चित्त हरिभजनाकडे लावावे लागते. चित्तामध्ये सर्व भूतमात्रांविषयी करुणा, दया असली पाहिजे व सतत एका हरिचीच इच्छा मनात असली पाहिजे. माधव, मुकुंद, हरि इ. नामस्मरण चित्तामध्ये होत राहिले तर या नामपाठाने सर्व प्रकारची (सलोकता, सरुपता, समीपता, सायुज्य) मुक्ती लाभते. हरिनामाचा उच्चार हेच मुक्ताईचे धन आहे की ज्यायोगे त्यांची अवघ्या संसारापासून मुक्तता झाली.

*

**करणें जंव काही करूं जाये शेवट ।**
**तंव पडे आडवाट द्वैतभावें ।। १ ।।**
**राहिलें करणें नचले पैं कर्म ।**
**हरिवीण देहधर्म चुकताहे ।। २ ।।**
**मोक्षालागी उपाय करितोसि नाना ।**
**तंव साधनीं परता पडो पाहे ।। ३ ।।**
**मुक्ताई करि हरिश्रवण पाठ ।**
**तेणें मोक्षमार्ग नीट सकळ साधे ।। ४ ।।**

मोक्षप्राप्तीसाठी जे काही करायला जावे ते शेवटाला नेऊ पहावे तर द्वैतभावामुळे मनुष्य आडवाटेला लागतो. असा आडमार्गी माणूस एकदा फसला की मग करत असलेले कर्मही राहून जाते. ते उपयोगी पडत नाही. देहभावातून केलेले कोणतेही धर्मकर्म हरिशिवाय उपयोगास येत नाही. मोक्षासाठी तू नाना उपाय करतोस हे खरे, परंतु मोक्ष हा त्या साधनांच्या पलीकडे असल्याचे लक्षात येते. मुक्ताई हरिश्रवण पाठ करतात. (हरिश्रवण – 'सोऽहम्' हा आपल्या अंतरंगातील हरिचा नाद आहे, त्याचे श्रवण करते.) त्यामुळे मोक्षमार्ग नीट साधतो, आडमार्गाला जाण्याची भीती उरत नाही.

*

**मुक्तपणें ब्रीद बांधोनियां द्विज ।**
**नेणती ते बीज केशव हरी ।। १ ।।**
**ज्याचेनि मुक्तता सर्वही पैं मुक्त ।**
**करूनियां रत न सेविती ।। २ ।।**
**वेदीं बोलियेलें ब्रह्मार्पणभावें ।**
**सदा मुक्त व्हावें अरे जना ।। ३ ।।**
**मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित ।**
**अवघेचि मुक्त सेवितां हरी ।। ४ ।।**

'ब्रह्म जानाति इति ब्राह्मण:' हे ब्रीद द्विजवर्ग मुक्तपणे वागवतो, निश्चिंतपणे बाळगतो आणि त्या ब्रीदाचा, स्वत:च्या ब्राह्मणत्वाचा अभिमानही बाळगतो. परंतु ब्रह्म जाणण्याचे जे केशवहरी (नामस्मरण) हे बीज आहे ते मात्र त्याला

आकलन झालेले नाही. (असे मुक्ताबाईंना तत्कालीन द्विजवर्गाकडे पाहताना जाणवले.) ज्याची मुक्तता झाली असता सर्व मुक्त होते (देहभावात अडकलेला जीव आत्मभावात स्थिर होणे ही जीवाची मुक्ती.) त्याचे म्हणजे आत्म्याचे रतीभरही सेवन ते करत नाहीत. त्याच्या ठिकाणी ते अजिबात रत होत नाहीत. सर्व कर्म ब्रह्मार्पणाच्या भावाने केले असता जीव कायमस्वरुपी मुक्त होतो, असे वेदांनी सांगितले आहे. मुक्ताई मुक्तपणे हरिनामाचे सेवन करतात आणि त्यामुळे सर्वच मुक्त झाल्याचा अनुभव आपल्याला येतो असे त्या म्हणतात.(समांतर ओव्या – 'ज्या विप्रासी चारी वेदांचा अभ्यास । आणि सूक्ष्म ब्रह्माचा नाही लेश । तो अज्ञानभार वाहक सक्लेशु । गर्दभ जैसा ।।' संदर्भ – ज्ञानेश्वरकृत उत्तरगीता )

*

**उजिवडु कोडें घेतसो निवाडें ।**
**आपुलिये चाडे जीवनकळा ।। १ ।।**
**एकरूप दिसें सर्वांघटीं भासें ।**
**एक हृषिकेशें व्यापियेलें ।। २ ।।**
**त्रिपुटीं भेदुनी सर्वत्रगामिनी ।**
**एका रूपें मोहिनी तेही सदा ।। ३ ।।**
**नित्यता उन्मत्त अवघेंचि भरित ।**
**एकतत्त्वें दावित सोहं भावे ।। ४ ।।**
**मुक्ताई सांगती कैसेनि गुंपती ।**
**माया देवी समाप्ति निजतत्त्वीं ।। ५ ।।**

जीवनकळेमधील नेमकी प्रकाशाची बाजू कशी निवडून घ्यायची हे एक कोडे आहे. ही किमया साध्य झाली की सर्व घटांमध्ये, प्रत्येक देहामध्ये तो हृषिकेशच एकत्त्वाने भरून राहिला आहे हे दिसून येते. त्रिपुटी भेद करून जाणारी, सर्वत्रगामिनी मायादेवीही 'त्या' च्या रूपाने सदा मोहित झालेली असते. एकतत्त्वाने अवघा संसार भरलेला आहे, हे सोऽहम्‌भावामुळे कळून आले आणि त्यातून नित्य उन्मनी अवस्था प्राप्त झाली. मुक्ताई मायादेवीचा निजतत्त्वात कसा लोप होतो त्याचे गुपीत सांगत आहेत.

*

**विस्तारूनी रूप सांगितलें तत्त्वीं ।**
**कैसेनि परतत्त्वीं वोळखी जाली ।। १ ।।**
**सोहंभावें ठसा कोण ते पैठा ।**
**उभाउभी वाटा कैसा जातु ।। २ ।।**
**या नाहीं सज्ञान हा अवघा विज्ञान ।**
**आपरूप धन सर्वांरूपी ।। ३ ।।**
**मुक्ताई मुक्तता सर्वपणें पुरता ।**
**मुक्ता मुक्ति अपैता निजबोधें ।। ४ ।।**

या चराचर विश्वात त्या परमतत्त्वाचेच रूप कसे विस्तारलेले आहे, हे गुरुतत्त्वाने सांगितल्यामुळे परतत्त्वाची ओळख झाली. देहामध्ये सोऽहम्भावाने तो ठसावलेला आहे, त्याचा प्रवेश कसा होतो यासंबंधी गुरुतत्त्वाने सर्व काही सांगितले. तो पूर्णत: विज्ञानरूप आहे, ज्ञानाज्ञानातीत असा विज्ञानस्वरूप आहे. सर्वरूपांमध्ये आत्मतत्त्वाने विराजमान आहे हे जाणून मुक्ताबाई या निजबोधामुळे सहज मुक्तावस्थेप्रत आल्या.

*

**मुक्तामुक्त कोडें पाहिलें निवाडें ।**
**ब्रह्मांडा एवढें महतत्त्व ।। १ ।।**
**निजतत्त्व आप अवघाचि परिपाक ।**
**एका रूपें दीपक लावियेला ।। २ ।।**
**आदि मध्य निज निर्गुण सहज ।**
**समाधि निजतेज आम्हां रामू ।। ३ ।।**
**मुक्ताईचें धन आत्माराम गूण ।**
**देखिलें निधान हृदयघटीं ।। ४ ।।**

मुक्तीचे कोडे मुक्ताई उलगडून पाहू लागल्या तो त्यांना महतत्त्वच ब्रह्मांडाएवढे झालेले दिसले. आपलेच निजतत्त्व आपल्याला आकलन झाल्यावर अवघे विश्व हा त्या निजतत्त्वाचाच परिपाक असल्याचे जाणवते. हे सर्व आत्मज्योतीच्या दीपकाआधारे आकलन होते. स्वत:मधील निर्गुणतत्त्व सहजरितीने आदि मध्य अंत अशा अवस्था धारण करते याची शुद्ध जाण येते. म्हणजेच निर्गुण तत्त्वच

सगुण रूप धारण करते. समाधिच्या अवस्थेमध्ये जे निजतेज जाणवते तोच आमच्या दृष्टीने राम आहे. आत्मारामाचे जे गुण आहेत तेच अंगी बाणले गेल्याने तेच आमचे धन आहे. आणि हे निधान, हा साठा आम्हाला आमच्या हृदयातच अनुभवायला मिळाला असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**निर्गुणाची सेज सगुणाची बाज ।**
**तेथें केशीराज पहुडले ।। १ ।।**
**कैसें याचें करणें दिवसा चांदिणे ।**
**सबळें उठणे एक तत्त्वीं ।। २ ।।**
**नाहीं या ममता अवघीच समता ।**
**आदि अंतु बिंबतां नलगे वेळू ।। ३ ।।**
**मुक्ताई सधन सर्वत्र नारायण ।**
**जीवशिव संपूर्ण एकातत्त्वें ।। ४ ।।**

सगुणाच्या बाजेवर निर्गुणाची शय्या करून केशिराज त्यावर पहुडले आहेत. याची लीला कशी वर्णावी ? दिवसा चांदणे दृष्टीस पडावे अशी परिस्थिती त्याच्यामुळे निर्माण होते. आत्मतत्त्वाकडे दृष्टी वळल्यावर नादप्रकाशाचे जे विविध अनुभव येतात त्यातील अनुभवाचे वर्णन येथे मुक्ताबाई करत आहेत. त्याच्या ठिकाणी ममता नाही तर अवघी समताच आहे. ज्यावर ममता आहे त्यावर विशेष लोभ, तेथे गुंतवणूक असला प्रकार त्याच्याबाबतीत संभवत नाही. तर सर्व जीवजातरुपी अपत्यांवर त्याचे सारखेच प्रेम आहे. ते आत्मतत्त्व स्वत: आदिअंतविरहित आहे परंतु आदिअंताने बद्ध असणाऱ्या रुपाने ते प्रतिबिंबित होण्यास मात्र वेळ लागत नाही. म्हणजेच निर्गुण निराकार आत्मतत्त्व जीवामध्ये प्रतिबिंबित होण्यास वेळ लागत नाही. जीवशिवामध्ये तेच एकतत्त्व प्रतिबिंबित झालेले पाहून, सर्वत्र नारायणाचे दर्शन झाल्याने मुक्ताबाई धनवान बनल्या आहेत.

*

**दिवसा शीतळ निशियेसी बरळ ।**
**अधऊर्ध्व केवळ निजबीज ।। १ ।।**
**या आदि नाहीं अनादिही नाहीं ।**

**कैचा मोहप्रवाहीं दिसेचिना ।। २ ।।**
**शक्तीचे संपुष्टी मुक्ता मुक्त घट ।**
**अवघें वैकुंठ दिसताहे ।। ३ ।।**
**मुक्ताई परिपाक अवघें रूप एक ।**
**देखिलें सम्यक् सोहंभावें ।। ४ ।।**

साधनेतून येणारे अनुभव आणि त्यातून जाणवणारे परमात्म्याचे स्वरूप याचे वर्णन येथे मुक्ताबाई करत आहेत. दिवसाच्या उष्णतेमध्ये 'त्या'चा येणारा अनुभव हा शीतल तर रात्रीच्या वेळी तो प्रखर असा असतो. या समग्र चराचराला व्यापून, त्याच्या खाली व वर एकले एक निजबीजच भरलेले आहे. त्याला सुरुवात नाही पण तो अनादि आहे असेही नाही. (कारण तो द्वैतअद्वैताच्या पलीकडे, द्वंद्वातीत आहे.) असे असले तरी म्हणजे तो सर्वत्र व्यापून असला तरी या विश्वपसाऱ्यामध्ये, मोहप्रवाहात त्याला शोधायचा प्रयत्न केला तर त्यामधून तो गवसत मात्र नाही. शक्तीच्या, मायेच्या संपुटात, मोहप्रवाहात आलेल्या मुक्ताई मायेमध्ये असूनही मुक्त आहेत. (देहामध्ये प्रवेश हा मायेच्या संपुटात प्रवेश होय.) शक्तीला पुष्टी देणारा तो शिव परमात्मा प्राप्त झाल्यामुळे मायेमध्ये राहूनही मायातीत अशी अवस्था प्राप्त झाली. अशा या अवस्थेत माया ही माया म्हणून भासमान न होता, तेथे वैकुंठाचाच प्रत्यय येत राहतो. विश्व हे विष्णूचे निवासस्थान होय असा प्रत्यय मुक्ताबाईना येतो. विश्वामध्ये सर्वत्र तोच एक भरला आहे असा भावनेचा विकास कसा झाला याचे इंगित मुक्ताबाई येथे सांगत आहेत, 'देखिले सम्यक सोऽहम्भावे '

सोऽहम्भावाची साधना दोनस्तरावरून करावी असे अभिप्रेत आहे. एक 'एकांत साधना' - यामध्ये प्रत्यक्ष ध्यानाच्या बैठकीच्या वेळी सोऽहम्भावाने परमेश्वराशी एकरूप होण्याचा प्रयत्न करणे आणि दुसरा स्तर म्हणजे 'लोकान्त साधना'. यामध्ये तो परमेश्वर माझ्या अवतीभवती वावरणाऱ्या सर्व लोकांमध्ये भरुन राहिला आहे याचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करणे. या दोन्ही स्तरावरून जेव्हा साधना विकसित होऊ लागते तेव्हा विकासाच्या एका टप्प्यावर परमेश्वर सर्वत्र भरुन असल्याचा साक्षात प्रत्यय येतो. तो अनुभव येथे व्यक्त झाला आहे.

*

**जेथें जे पाहे तें तेथें आहे ।**
**उभारोनि बाहे वेद सांगे ।। १ ।।**
**सोमकांती झरा कोठील दुसरा ।**
**तत्त्वीं तत्त्व धरा निजदृष्टी ।। २ ।।**
**हेतु मातु आम्हां अवघाचि परमात्मा ।**
**सोहंभावें सोहं आत्मा सर्वी असे ।। ३ ।।**
**मुक्तलग खूण मुक्ताई प्रमाण ।**
**देहीं देहो सौजन्य निजतेजें ।। ४ ।।**

जे जे काही दृष्टीस पडते तेथे तेथे ते परमतत्त्वच भरून राहिले आहे असे वेद बाहू उभारून सांगत असतात. सोमकांत झरा दुसरीकडे कोठे नसून आपल्यामध्येच तो आहे. अंतदृष्टीने आपल्यातीलच परमतत्त्व दृढ धरण्याचा प्रयत्न केल्यावर त्याचे आकलन होते. परमात्म्यावाचून आम्हाला दुसरा हेतू शिल्लक राहिला नाही. सोऽहम्भावाने पाहिले असता स्वत:मधील आत्मतत्त्व सर्वांतर्यामी असल्याचा प्रत्यय येतो. सोऽहम्भाव ही गुरुखूणच मुक्ताईला प्रमाण आहे.

✲

**पूर्णपणे सार अविट आचार ।**
**सारासार विचार निजतेजें ।। १ ।।**
**निर्गुणीं आकार सर्वत्र साकार ।**
**एकरूपें विचार निजतेजें ।। २ ।।**
**मुक्ताई चैतन्य अवघें चिद्घन ।**
**आदि अंतु खूण निवृत्तिची ।। ३ ।।**

निजतेजाच्या आधाराने जो सारासार विचार करतो, तो जे स्वीकारतो ते पूर्णपणे सार असे असल्यामुळे त्याला असे लक्षात येते की, निर्गुण निराकार परब्रह्मच आकार धारण करून सर्वत्र पसरले आहे. सगुण, साकार व निर्गुण निराकार यात भेद नाहीच. हा ऐक्यरूपाचा विचार (हे दोन्ही एकरूप आहेत हा विचार) निजतेजाच्या प्रकाशाने दिसला. मुक्ताई चैतन्याशी एकरूप झाल्यावर हे अवघे विश्व चिद्घन असल्याचा प्रत्यय तिला आला आणि हे सर्व ज्याच्यामुळे घडले ती खूण आदिपासून अंतापर्यंत निवृत्तिने दाखविली.

**आदि मध्य अंतु न कळोनि भ्रांतु ।**
**असे जो सततु निजतत्त्वें ।। १ ।।**
**कैसेनि तत्त्वतां तत्त्व पैं अनंता ।**
**एकतत्त्वें समता आपेंआप ।। २ ।।**
**आप जंव नाही पर पाहासी काई ।**
**विश्वपणें होई निजतत्त्वीं ।। ३ ।।**
**माजि मजवटा चित्त नेत तटा ।**
**परब्रह्म वैकुंठा चित्तानुसारें ।। ४ ।।**
**मुक्ताई सांगती मुक्तनामपंक्ति ।**
**हरिनामें शांति प्रपंचाची ।। ५ ।।**

या विश्वामध्ये आदि, मध्य, अंती सर्वत्र ते निजतत्त्व सातत्याने भरून राहिले आहे पण ते कळत नाही म्हणून भ्रांती निर्माण होते. अनंत अशा विश्वामध्ये भरून राहिलेले एकतत्त्व जेव्हा दसू लागते तेव्हा आपोआपच समता निर्माण होते. (प्रत्येक जीव हा परब्रह्माचा अंश या दृष्टीनेच पाहू लागले की दोन जीवांमध्ये हा श्रेष्ठ, हा कनिष्ठ असा भेदभाव केलाच जात नाही व त्यामुळे आपोआप समता निर्माण होते.) परंतु स्वत:मध्ये जोपर्यंत त्या ईश्वराचे दर्शन घडत नाही तोवर इतरांमधील परमेश्वरही दिसणार नाही. निजतत्त्वाशी एकरुप होऊन तू स्वत:च विश्वरुप हो असे मुक्ताबाई सांगतात. माझ्यामध्येच असणारे चित्त मी पैलतटी न्यायचे. (चित्तावर एकीकडून इंद्रिये, मन, बुद्धि यांचे संस्कार होत असतात तर दुसरीकडून आत्म्याचे प्रक्षेपण त्यावर होत असते.) तेव्हा चित्तावरील इंद्रिय, मन, बुद्धीचे प्रक्षेपण कमी करत नेऊन आत्म्याचे प्रक्षेपण वाढवत नेणे म्हणजे 'चित्त नेत तटा' होय. त्यामुळे चित्त हेच परब्रह्माचे वैकुंठ बनते. मुक्त मनाने नामाची पंक्ती उच्चारणे, नामस्मरण करणे यामुळे प्रपंचाची शांती होते म्हणजे प्रपंचाचे शमन होते असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**मुक्तलग चित्तें मुक्त पैं सर्वदा ।**
**रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य ।। १ ।।**

**हरिहरि छंदु तोडी भवकंदु ।**
**नित्य नामानंदु जपें रया ।। २ ।।**
**सर्वत्र रूपडें भरलेंसे दृश्य ।**
**ज्ञाता ज्ञेयभास हरिमाजी ।। ३ ।।**
**मुक्ताई सधन हरीरूप चित्ती ।**
**संसारसमाप्ति हरिच्या नामें ।। ४ ।।**

रामकृष्णगोविंद या नामाचा वाणीने नित्य जप केला तर चित्त सर्वदा मुक्त होते. हरिहरि या छंदाने भवाचा कंद तोडून टाकावा. नित्य नामजपाने आनंदाचा अनुभव घ्यावा. सर्व चराचर विश्व, दृश्य असे हे विश्व 'त्या'चे रुपडे आहे. हरिमध्ये ज्ञाता, ज्ञेय भास मावळून जातात म्हणजेच त्रिपुटीचा लय होतो. चित्तामध्ये हरिरुप साठवून, हरिचे नामस्मरण केल्याने प्रपंचाची समाप्ती होते, त्यामुळे मुक्ताई सधन बनल्या आहेत.

*

**चित्तासी व्यापक व्यापुनियां दुरी ।**
**तेंचि माजिघरीं नांदे सदा ।। १ ।।**
**दिसे मध्य सुख मुक्तलग हरी ।**
**शांति वसे घरीं सदोदित ।। २ ।।**
**नाहीं या शेवट अवघाचि निघोट ।**
**गुरुतत्त्वें वाट चैतन्यासी ।। ३ ।।**
**मुक्ताई संपन्न मुक्त पैं सेजुळे ।**
**सर्वत्र उभविलें मुक्ति चोख ।। ४ ।।**

चित्ताला व्यापून असणारे ते परब्रह्मतत्त्व चित्ताला व्यापते व लगेच दूरही होते. पण ते सदोदितपणे माजघरात नांदत असते. आत्मतत्त्वाचे चित्तावर होणारे प्रक्षेपण काही काळापुरते असते पण चित्त, अहंकार यांच्या पलीकडे आत्मतत्त्वाची निरंतर वसती असते. सुखाच्या क्षणीही ज्याला 'त्या'ची आठवण होते, सुखाकडेही जो त्या ईश्वराचे रूप म्हणूनच पाहतो, त्याच्या घरी सदोदित शांतीचा वास असतो. तो स्वत: शांती प्राप्त करून घेतो. गुरुतत्त्वाच्या आधाराने ज्याला चैतन्याची वाट गवसली आहे आणि जो (परब्रह्माशी तदाकार झाल्यामुळे त्याच्याप्रमाणेच)

परिपूर्ण झाला आहे त्याचा शेवट संभवत नाही. कारण तो परब्रह्माप्रमाणेच आदिअंतरहित होतो. त्यानुसार मुक्ताबाई हरि प्राप्त झाल्याने संपन्न झाल्या, मुक्त झाल्या आणि त्यांनी सर्वत्र चोख मुक्ती उभविली.

*

**प्रालब्ध संचित आचरण गोमटें ।**
**निवृत्ति तटाकें निघालों आम्ही ।। १ ।।**
**मुळींचा पदार्थ मुळींच पैं गेला ।**
**परतोनि अबोला संसारासी ।। २ ।।**
**सत्यमिथ्याभाव सत्वर फळला ।**
**हृदयीं सामावला हरिराज ।। ३ ।।**
**अव्यक्त आकार साकार हे स्फूर्ती ।**
**जीवेंशिवें प्राप्ति ऐसें केलें ।। ४ ।।**
**सकाम निष्काम वृत्तीचा निजफेर ।**
**वैकुंठाकार दाखविलें ।। ५ ।।**
**मुक्तलग मुक्त मुक्ताईचें तट ।**
**अवघेंचि वैकुंठ निघोट रया ।। ६ ।।**

प्रारब्ध, संचित आणि आत्ताचे चांगले आचरण (क्रियमाण) यामुळे आम्ही निवृत्तीच्या किनारी येऊन पोहोचलो. मुळीचा पदार्थ म्हणजे आत्मा त्याच्या मूळस्थानी गेला. म्हणजेच आत्मवस्तूवर आलेले मायेचे पटल निघून गेले आणि आत्मरुपाची प्राप्ती झाली आणि त्याचा परिणाम म्हणून संसारात परत आल्यावर संसाराशी अबोला झाला. म्हणजेच त्याच्या चिकटाव्याशी, मायिकतेचा अबोला झाला. म्हणजे मायिकतेशी संबंध उरला नाही. हृदयामध्ये हरिराज सामावल्यामुळे सारासारविवेक, आत्म काय, अनात्म काय हा विवेक लगेच समजून आला व तो फळला म्हणजे अगदी सहज रीतीने व्यवहारात उतरविला गेला. सकाम, निष्काम या वृत्ती निजाकडे म्हणजे आत्म्याकडे  वळल्या. याचा परिणाम असा झाला की, सर्व विश्व हेच जणु काही वैकुंठ म्हणजे हरिचे निवासस्थान असल्याचे जाणवू लागले असे मुक्ताबाई म्हणतात.

*

**शांति क्षमा वसे देहीं देव पैसे ।**
**चित्त समरसं मुक्त मेळु ।। १ ।।**
**निर्गुणें उपरमु देव पुरुषोत्तमु ।**
**प्रकृति संगमु चेतनेचा ।। २ ।।**
**सज्ञानी दिवटा अज्ञानी तो पैठा ।**
**निवृत्तीच्या तटा नेतु भक्ता ।। ३ ।।**
**मुक्ताई दिवस अवघा हृषीकेश ।**
**केशवेंविण वास शून्य पैसे ।। ४ ।।**

शांति, क्षमा यांचा आढळ जेथे असतो तेथे, त्या देहामध्ये देवाची वस्ती असते. त्या देहांतर्गत परमात्म्याशी चित्त समरस झाले की त्याला मुक्तीचा मेळ झाल्याचा अनुभव येतो; मुक्ती मिळाल्याचा अनुभव येतो. पुरुषोत्तमाच्या निर्गुण स्वरुपाशी एकरुप झाल्याने प्रकृतिच्या मायिकतेचा उपरम होतो, शमन होते आणि त्याच प्रकृतीशी चैतन्याचा संगम होतो. म्हणजे प्रकृतीचे मायिक कार्य मायिक स्वरुपाचे न घडता तीच प्रकृती ही परमेश्वराची शक्ती आहे, प्रभूचा चिद्‌विलास आहे याची आतून जाण येते.अशा रीतीने ज्ञानी झालेली व्यक्ती ही अज्ञानग्रस्त जीवांच्या पेठेमध्ये मार्गावरील दिवट्याप्रमाणे मार्गदर्शन करते. आणि सर्व भक्तांना निवृत्तीच्या तटावर घेऊन जाते. एका केशवाविण जगणे शून्यवत् आहे, असे मुक्ताबाईला वाटते. केशवाशी, परमात्म्याशी कायम समरस झाल्यामुळे दिवसच हृषिकेश बनल्याचा अनुभव मुक्ताबाईंना येतो.

*

**देउळाच्या कळशीं नांदे एक ऋषी ।**
**तया घातली पुशी योगेश्वरी ।। १ ।।**
**दिवसा चांदिणें रात्रीं पडे ऊष्ण ।**
**कैसेंनि कठिण तत्त्व जालें ।। २ ।।**
**ऋषी म्हणे चापे कळिकाळा पैं कापें ।**
**प्रकाश दिपे निघोन जाय ।। ३ ।।**
**ठायींच्या ठायीं असें पहातां न दिसे ।**
**मनाच्या धारसें एक होय ।। ४ ।।**

**एकट एकलें वायांचि पैं गुंफलें ।**
**मुक्त पैं वरिलें सहज असे ।। ५ ।।**
**वैकुंठ अविट असोनि प्रकट ।**
**वायांचि अडवाट मुक्ताई म्हणे ।। ६ ।।**

मानवी देह हे देऊळ असून त्याच्या कळसामध्ये एक ऋषी नांदतो. सहस्त्रदलाच्या ठिकाणी परब्रह्माची वस्ती आहे ते तत्त्व म्हणजेच ऋषी. त्यालाच योगेश्वरीने विचारले. (योगमार्गाने जी व्यक्ती जाईल तिलाच देवळाच्या कळसामध्ये नांदणारा ऋषी उमगेल व ती व्यक्तीच त्या ऋषीला काही विचारण्यासाठी सक्षम असेल.) योगमार्गाने जाणाऱ्या व्यक्तीला एक अनुभव येतो तो म्हणजे दिवसा चांदणे आणि रात्री उष्णता जाणवते. हे कसे ? असा प्रश्न मुक्ताबाईने विचारला. तेव्हा त्या ऋषीने उत्तर दिले, चांदणे व उष्णता ही ज्याची प्रकाशरूपे आहेत त्या प्रकाशाचा जो दिप (परब्रह्म) त्या मार्गाने निघून जा. त्या मार्गाने जो कोणी निघून जाईल, त्याला पाहून कळि, काळाचाही थरकाप उडतो. ते परब्रह्म आपल्या स्वत:च्याच ठिकाणी आहे. परंतु डोळ्याने पाहावयाचा प्रयत्न केला तर ते दिसत नाही. परंतु मनाने त्याचाच ध्यास घेतला तर त्याच्याशी एकरुपता प्राप्त होते. एकले एक असणारे परब्रह्म मायेच्या निमित्ताने व्यर्थच गुंतले गेले. त्याची मौज अशी की ते गुंतले गेले आहे असे भासते परंतु ते तत्त्व सर्वांच्या वर, अतीत सहजपणे या सर्वांपासून मुक्त असे दिसते. अशा तत्त्वाची आपल्यामध्ये सहस्त्रदलामध्ये वसति असते. ते वैकुंठ दुसरीतिसरीकडे कुठे नसून आपल्यामध्येच ते प्रकट स्वरूपात असते. त्याची गोडी अविट आहे. असे असताना त्या वैकुंठाचा इतरत्र शोध घेत राहणे ही आडवाट आहे, त्या मार्गाने जाऊ नये असे मुक्ताबाई सांगतात.

✻

**मुंगी उडाली आकाशीं ।**
**तिणें गिळिलें सूर्याशीं ।। १ ।**
**थोर नवलाव जाला ।**
**वांझे पुत्र प्रसवला ।। २ ।।**
**विंचु पाताळाशीं जाय ।**

**शेष माथा वंदी पाय ।। ३ ।।**

**माशी व्याली घार झाली ।**

**देखोन मुक्ताई हांसली ।। ४ ।।**

मुक्ताबाईच्या प्रसिद्ध अभंगांपैकी ही एक प्रसिद्ध अशी कूटरचना. त्यातील प्रतिकात्मकता लक्षात घेणे आवश्यक आहे. अंत:करणातील सारी चित्तवृत्ती जेव्हा आत्मसाक्षात्कारार्थ ऊर्ध्वगामी होते तेव्हा मुंगीसदृश्य अशा जीवाच्या कवेत आत्मसूर्य आल्याप्रमाणे अवस्था होते. 'ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटी वेगळा । सहस्त्रदळी उगवला सूर्य जैसा ।।' (ज्ञानेश्वरमहाराजांचे अभंग, सकलसंतगाथा, खंड १, अभंग ८२२) असा अनुभव त्या व्यक्तीस येतो. वांझ अशी जी माय म्हणजे माया (माया – जी नाही ती) तिला आत्मानुभूतीचा पुत्र प्रसवला, हे नवल घडले. याचा परिणाम म्हणून अहंकाररुपी विंचु पाताळात गेला. त्याचा बिमोड झाला. अशा व्यक्तीच्या मस्तकापर्यंत म्हणजे सहस्त्रदलापर्यंत कुंडलिनीरुपी शेष जाऊन पोहोचलेला असतो. माशीप्रमाणे घाणीतच घोटाळत राहणारी जी इंद्रिये ती प्रसवली आणि त्यामधूनच घार जन्माला आली म्हणजे इंद्रियांनादेखील तो परमोच्च स्वरूपाचा आत्मदर्शनाचा अनुभव प्राप्त होऊ शकला. हे सर्व (एरवी अशक्य वाटणारे शक्य झालेले पाहून) मुक्ताबाईला हसू आले.(आधार– श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद, ले.बा.त्र्यं.शाळिग्राम)

**

# मुक्ताबाईचे संकलित अभंग

श्रीज्ञानेश्वरांची मुक्ताबाईस सनद या प्रकरणग्रंथामध्ये मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना विचारलेले प्रश्न आणि त्याची ज्ञानेश्वरांनी दिलेली उत्तरे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यातील फक्त मुक्ताबाईकृत अभंगांचा समावेश येथे केला आहे.

१

विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणूं दादा ।। सगुण जरी म्हणूं दिसते निर्गुण । वाचेचें भिन्न पडलें दादा ।। वचन बुडालें स्तब्ध झालें मन । सगुण निर्गुण दोन्ही नाहीं ।। म्हणे मुक्ताबाई सांग ज्ञानदेवा । विचार हा बरवा करूनियां ।।

२

मूळद्वारीं दादा स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ति कैशीं झाली ।। मायेचा बंबाळ जाये एकसरां । इच्याही आधारा सांग दादा ।। ब्रह्मांड व्यापिलें आकाश कवळिलें । सर्व कांही व्यापिलें मायेनेचि ।। माया कैशी दादा सांगतां निर्गुण । मुक्ताबाई म्हणे भिन्न फोडा ।।

३

सर्वांतुनि वेगळा हातीं कैसा येई । म्हणे मुक्ताबाई सांगा दादा ।। दहा पवनांचा खेळ योगी खेळती । ओढोनियां नेती ब्रह्मांडांत ।। कुंडलिनी निवटोनि करिती आकर्षण । रेणूचें दर्शन झालें कीं नाहीं ।। म्हणे मुक्ताबाई सांगा ज्ञानेश्वरा । चुके येरझारा चौऱ्यांशीचा ।।

४

गुरुकृपा झाली प्रत्ययासी आली । कैशी ती कळली सांग दादा ।। लेखा नाहीं आला साधन करितां । तो कैसा येईल हाता सांग दादा ।। व्यास ते वाल्मीकी वर्णिती अपार । तयांसी हा पार कळला नाहीं ।। वेदासि नाकळे श्रुति वेडावले । तो कैसेनि हाता येईल सांगा दादा ।। इंद्रियां वेगळां मन बुद्धि निराळा । सर्वांत व्यापिला कळे कैसा ।। मुक्ताबाई म्हणे कैसे ज्ञानराजा । संदेह हा माझा फेडोनियां ।।

५

पूर्णिमेचे दिवशी चंद्र झाला अस्त । देहाचीही गत तैशी होई ।। कर्ण बंद होती नेत्र आच्छादिती । मग कैशी गती होय दादा ।। देह झाला विकळ जिव्हा ते खुंटली । दश पवनां झाली हडबड दादा ।। तेथें कोण कळा सद्‌गुरुनें दिली । देहासी कैंसी झाली मोक्षगती ।। म्हणे मुक्ताबाई फेडावें हें भिन्न । कोणतें साधन करूं दादा ।।

६

कृपा झाली आतां आली प्रत्ययासी । कैसें या मनास करूं दादा ।। कैसें वज्रासन कैसें तें मनन । इंद्रियांसी दमन कैसें करूं ।। कैसे करूं दादा सोहंगासी गोष्टीं । नासाग्रीं दृष्टी कैसी ठेवू ।। रेणूमध्यें कैसी मिळे ज्ञानेश्वरा । सांगा या विचारा कृपा करुनि ।। धाकुटें भावंड घेतलीसे आळ । मुक्ताबाई लडिवाळ तुमची दादा ।।

७

सहज समाधि लागली निर्गुणीं । खुंटलीसे वाणी न चले पुढें ।। खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।। गळालीं इंद्रियें राहिलेंसे मन । झालें महाशून्य एकाएकीं ।। विरालीसे शक्ती झालीसे निवृत्ति । झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई ।।

*

श्री.बहिरट व श्री.राहिरकर संपादित ‘ओळीचे अभंगाची सकलसंतगाथा’ यामध्ये श्रीमुक्ताबाईचे ताटीचे अभंग समाविष्ट करण्यात आले आहेत.

## ताटीचे अभंग

८

संत जेणे व्हावे । जग बोलणे सहावे ।। तरीच अंगा थोरपण । जया नाही अभिमान।। थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया वसे ।। रागे भरावे कवणासी । आपण ब्रह्म सर्व देशी ।। ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

९

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ।। विश्व रागें झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ।। शब्दशास्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ।। विश्वपट

ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१०

सुखसागरी ठाव झाला । उंच नीच काय त्याला ।। आपण जैसे व्हावे । देवे तैसेची करावे ।। ऐसा नटनाट्य खेळ । स्थिर नाही एक पळ ।। एकापासूनी अनेक । त्यात आपपर लोक ।। शून्य साक्षित्वे समजावे । वेद ओंकाराच्या नावे ।। एके उंचपण केले । घर अभिमानाने गेले ।। द्वैत टाकून शांति धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

११

वरी झाला भगवा जाण । अंतरी वश्य नाही मन ।। त्याला म्हणू नये साधू । जगी विटंबना बाधू ।। आपआपणा शोधुनि घ्यावे । जगी तैसे विरक्त व्हावे ।। विष ग्रासोग्रासी प्यावे । विवेक नांदे त्याच्या सवे ।। आशा दंभ दूर करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१२

संत तेचि जाणा जगीं । दया क्षमा ज्यांचे अंगी ।। लोभ अहंता नये मना । जगीं विरक्त तेचि जाणा ।। इहपरलोकी सुखी । शुद्धज्ञान ज्यांचे मुखी ।। मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१३

एक आपण साधु झाले । येर कोण वाया गेले ।। उठे विकार ब्रह्मीं मूळ । अवघे मायेचे गबाळ ।। माया समूळ नुरे जेव्हां । विश्व ब्रह्म होईल तेव्हा ।। ऐसा उमज आदिअंती । मग सुखी व्हावे संती ।। चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१४

ब्रह्म जैसें तैशापरी । आम्हां वेढिले भूते सारी ।। हात आपला आपणां लागे । त्याचा करु नये राग ।। जीभ दातांनी चाविली । कोणें बत्तिशी तोडिली ।। थोडे दुखावले मन । पुढे उदंड साहाणे ।। चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदी नाचे ।। मन मारुनि उन्मन करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१५

सुख सागर आपण व्हावे । जग बोधे निववावे ।। बोधा करु नये अंतर । साधुस नाही आपपर ।। जीव जीवासी पैं द्यावा । मागे करु नये हेवा ।। तरणोपाय चित्ती

धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१६

सांडी कल्पना उपाधी । तीच साधूला समाधी ।। वाद घालावा कवणाला । अवघा द्वैताचा घाला ।। पुढे उमजेना काय । बुडत्याचे खोल पाय ।। एक मन चेष्टा करी । भूते बापुडी संसासरी ।। अवघी ईश्वराची करणी । काय तेथे केले कोणी ।। पुन्हा शुद्‌ध मार्ग धरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१७

गिरी गव्हर कशासाठी । रागे पुरविली पाठी ।। ऐसा नसावा संन्यासी । परमार्थाचा होय द्वैशी ।। घर बांधिले डोंगरी । विषय हिंडे दारोदारी ।। काय केला योगधर्म । नाही अंतरी निष्काम ।। गंगाजळ हृदय करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१८

क्रोध यावा कोठे । अवघे आपण निघोटे ।। ऐसे कळले ज्याला पूर्ण । जनी तोचि जनार्दना ।। ब्रीद बांधिले चरणीं । नीच दाविला करणी ।। वेग क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ।। ऐसी दूर् दृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

१९

अवघी साधने हातवटी । मोलें मिळत नाही हाटी ।। शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाही देव त्याला ।। अवघी साधन हातवटी । मोलें मिळत नाही हाटीं ।। कोणी कोणा शिकवावे । सार साधूनिया घ्यावे ।। लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुदल ठायींचे ठायीं ।। तुम्ही तरुनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

*

सकलसंतगाथेमध्ये मुक्ताबाई–चांगदेव संवाद या शीर्षकाखाली काही अभंग आले आहेत. त्यातील मुक्ताबाईचे अभंग फक्त येथे उद्‌धृत केले आहेत.

२०

स्वप्नींचा आत्मा केउता आहे । मागुता ये हें नवल काई ।। चांगा म्हणे बाई सांग मुक्ताबाई । लटिकें साच वर्ततें देहीं ।। मुक्ताई म्हणे चांगया भ्रमिस्त देहीं । निर्धारी राहीं स्वप्न कैचें ।।

## २१

नाहीं सुखदु:ख पापपुण्य नाहीं । नाहीं कर्मधर्म कल्पना नाहीं ।। नाहीं मोक्ष ना भवबंधन नाहीं । म्हणे वटेश्वरा ब्रह्म नाहीं ।। सहजसिद्ध बोले मुक्ताई ।।

## २२

हेमीं हेम प्रचित पाहीं । अनुभव आलिया सांगावें तें काई ।। सोहंकार मन न सोडी साचें । मी नाहीं तेथें तूं कैचें ।। अहंतेसी सोहं तें गूज । मुक्ताई म्हणे चांगया बूझ ।।

## २३

मी माझें दुरित आशापाश चित्तीं । मोह ममता भ्रांति अहंभावें ।। हरितसे तेज अभिमान ताठा । एकतत्वें वैकुंठा हरिपाठें ।। नाशिवंत देह पंचतत्त्व मोळी । वायांचि वाहाटुळी उडोनि जाये ।। मुक्ताई जीवन चांगया दिधलें । निर्गुणीं साधिलें घर कैसें ।।

## २४

ऐकें चांगया फळ फळासि आलें । येऊनियां नासूनी गेलें ।। सोडीं सोडीं भवाची भ्रांती । तेणें होय अज्ञान निवृत्ति ।। चांगा वटेश्वरी फळला । विज्ञानफळीं परिपाका आला ।।

## २५

गुण ना निर्गुण शब्दातीत । तेथें तूं निश्चित बाळा निज ।। पाळणा लाविला ह्रदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते ।। शांति क्षमा विदेह पैं वर्णिती । नांव पैं ठेविती अद्वैतासी ।। वटेश्वरसूत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवित ज्ञानदृष्टी ।।

## २६

गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला । तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ।। निजी निज बाळा न करीं पैं आळी । अनुहात टाळी वाजवितें ।। निद्रा ना जागृति भोगी पैं उन्मनीं । लक्ष ते भेदुनि निज पाटीं ।। निभ्रांत आतां पाळणा विणवुनी । मन हें बोधोनी पवन दोरा ।। एकविससहस्त्र श्वास वेळोवेळां । बाळा तोही डोळा स्थिर करी ।। निद्रा ना जागृति निजसील काई । परियेसी चांगया बोले मुक्ताई ।।

## २७

बाळक चुकलें सुकुमार तान्हुलें । त्यानें पैं सांडिलें मायाजाळ ।। जो जो जो जो पुत्रातें निजवी । अनुहात ओवी नि:शब्दाची ।। मावळली दिशा वाचा पैं खुंटली ।

माया पैं भेटली मुक्ताबाई ।। मुक्ताई म्हणे नांव पैं ठेवीन । सुता बोलवीन वटेश्वरा ।।

२८

आपुलिया मारुनी येई कां भेटी । मग गोल्हाटीं सांठवीन ।। शांति धाया मेळवीन तुज । मग तूं बूझ सोहंकारी ।। सोहं सोहं सोहं हाचि धरीं छंदु । सुखें निद्रा करीं अद्वैतीं रे ।। तेथें जाग पां जाग नीज पां नीज । मग तुज चेवो केचा ।। तेथें ओळखी नाहीं विसरु नाहीं । चिदानंदी पाहीं रूप तुझें ।। द्वैताद्वैत भासले पाई । वटेश्वरसुता बोले मुक्ताई ।।

२९

अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला । तेथें पहुडला योगिराज ।। जो जो जो जो म्हणतसे माया । साकारातीत निजरे चांगया ।। सोहं सोहं षट्चक्रीं न्यासे । तुज परिये देतां मीच न दिसे ।। ऐशीं निद्रा तुज लागोरे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रा ।।

३०

रूप ना छाया त्रिगुणरहित । ज्योतिस्वरूप हें पां नित्य ।। जाणें येणें नाहीं ते निर्गुण पाही । चैतन्य होई शुद्धबुद्ध ।। मुक्ताई म्हणे चांगया वटेश्वरा । निरुता पाहें स्वयें साकारा ।।

३१

चांगा जन्मला माध्यान्ह काळीं । मायबापें दोन्ही नाहीशीं जालीं ।। मुळींच चांगा नाहींसा जाला । मुक्ताई म्हणे चांगया भलाभला ।। वटेश्वर चांगा मुळीं लागला । पोसणा घेतला मुक्ताईने ।।

३२

सुखाचे शेवटीं दुःख आलें भेटीं । भेटलियासाठीं तेंही नुरे ।। सुख तें कवण दुःख ते कवण । दोहीं अज्ञान करीं पारे ।। मुक्ताई म्हणे चांगया चेई । स्वयंभू चेइला वटेश्वरीं ।।

३३

जेथें एक दुजें नाहीं । प्रपंचाची काहाणी तेथें कांही ।। तेथें कांहीच नाहीं तेथें कांहीच नाहीं । सोय धरीं आपुलीरे ।। वटेश्वरसुतातें बोले मुक्ताई । सोहंभावे

अखंडित राहीं ।।

३४

राउळींचे कर चुकले जाण । गिवसिताती साहीजणें वेळोवेळीं ।। करीं कर धरियला मुष्टीं । करें सामाविलें आपुल्या दृष्टीं ।। मुक्ताई करें लेईलें अंजन । चांगया निधान उपदेशिलें ।।

३५

टेंकावरी टेंक त्यावरी टेकुली । तेथें एक बाळी विस्मो करी ।। तिचें नांव काय त्याचें नांव काय । विचारोनि पाहे मनामाजी ।। डोळियांतील बाहुली जालिसे गरुवारू । तिशी सुईण मेळवा अरुवारु ।। सुईचें आणीवर रचिलें पाठार । मुक्ताई म्हणे चांगया सांग याचा विचार ।।

३६

आकाशाचा शेंडा घार रांधी मांडा । काउळा वाढी कांदा कुल्लाळ भोजन करी ।। दिहा पडे चांदणे रात्रीं पडे ऊष्ण । चोर घरटी घाली तराळ घाली खाण ।। सासुनें खादलें उंडे सुन तरळे । लेकी लासिली जांवाई गडबडा लोळे ।। धमकत घुसळण घातलें पारी । वटेश्वरसुता म्हणे मुक्ताई अवधारी ।।

३७

दृश्य आणि द्रष्टा हे पैलीकडे । बाहिजु पाहतां आत्मज्ञान खडे ।। इकडे तिकडे माया हे सांढे । न देखती तरी पैलही मूडे ।। मुक्ताई म्हणे चांगया भला । जें दाविलें तें आपण भला ।।

३८

वेदश्रुति ठक पडियेले वाचा । तेथें कवण पाड तुझिया बोलाचा ।। कांही बोलसी तरी अबोलणें बोल । बोलणें बोलसी तरी तितुकें खोल ।। अनिर्वाच्य ब्रह्म न वर्णवे वाणी । बोलों म्हणती ते न लजती मनीं ।। बोलणें अबोलणें वटेश्वरीं गूज । मुक्ताई म्हणे चांगया तू बुझ ।।

३९

बुथिचेनि बोले नाहीं मविले । सेखि पाहे तंव कांही ना जाले ।। बुद्धि बुडाली वासना खुंटली । तैसी परी जाली काय सांगों ।। मुक्ताई म्हणे चांगया नवल वितलें । असतां मीं माझें हारपलें ।।

४०

अहंकार अविद्या हेंचि पैं घोंगडी । पांगुरता गोडी नाहीं मज ।। घोंगडे नेलें नारायणा । अछिप होतो बोल कोणा ।। आशा तृष्णा दोघी बहिणी । लोळती धरणीं घोंगडीया ।। हिंसा निंदा चिंता या तिघी जणी । घोंगडीया आटणी होतसे ।। घोंगडे माझें फाडलें पोरी । काम क्रोध दोघीं सहोदरी ।। मुक्ताई म्हणे घोंगडें सांडी । वटेश्वरीं मांडी ठाण आतां ।।

४१

मुक्त होतासि तो कां बद्ध झालासी । आपल्या बंधने आपण बांधलासी ।। सांडी बंधन सोय धरीं गव्हारा । जाईं मूळस्थाना आपुलिया ।। तेथींच्या तेथें राहीं परियेसी । चांगया बोले मुक्ताईशी ।।

*

चांगदेवांच्या गाथेमध्ये असे काही अभंग आहेत की जे मुक्ताबाईकृत आहेत असे वाटते. ते अभंग पुढे देत आहे.–

४२

भावें भक्ति करूनि वैराग्य जोडसी । तरी तूं पावसी ब्रह्म सुखा ।। ज्ञानतत्त्वीं करीं करीं हा विचार । निर्गुणीं आकार निरामय ।। चांग्या सोय धरी ज्ञान वटेश्वरी । मुक्ताई जिव्हारीं बोध करी ।।

४३

देवी देवो जाला भावासी अबोला । निमोनि उरला आपपरें ।। आधीं आप पाही मग पडे वाही । प्रपंचे डोहीं बुडों नको ।। जंव नाही कृपा गुरु फळीं बापा । तंव कैसेनि दीपा पावशील ।। मुक्ताई चांगया तत्त्वें तत्त्व लया । हरिभावीं माया हारपली ।।

४४

नोवरीचे पोटीं नवरा जन्मला । सोहळा जाला काय सांगो ।। नोवऱ्यानें नोवरी देखिलिचि नाहीं । सोहळा होतो सांगों काई ।। तो नोवरा नातुडे कोणा । मुक्ताई चांगया सांगतसे खुणा ।।

४५

वऱ्हाडी आले संसारनगरा । चांगा नोवरा केळवला ।। हातीं कांकण उभा वटेश्वरीं । शांति हे नोवरी पर्णाविया ।। पर्णिली शांति बैसली पाटीं । मुक्ताई करवली हळदुली वाटी ।।

✻

डॉ.ग.वा.जोशी यांच्या 'भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास' खंड ७ यामध्ये मुक्ताबाईचा एक अभंग असा दिला आहे.

४६

जग हे ब्रह्म दिसे उघडे । एकचि सोने नापरी लेणे । बाळ्या आणि बुगडे ।। एकचि तंतू नानापरी पटु । चोळ्या आणि लुगडे ।। एकचि माती नानापरी भिंती । परळ आणि सुगडे ।। म्हणे मुक्ताई ऐक चांगया । खरे आणि रोकडे ।।

४७

लटकीच खटपट रे प्राण्या । मृगजळ डोही घातले तारु । जळचि नाही तेथे कैचा उतारु ।। वांजेच्या पुत्राचा मांडिला विवाहो । पुत्रचि नाही तेथे कैचा उच्छावो ।। स्वप्नीच्या धना कळंत्र काई । धनचि नाही तेथे कैची सवाई ।। निवृत्ति-प्रसादे म्हणे मुक्ताबाई । बोलचि नाही तेथे पेरण काई ।।

✻

श्री.ल.रा.पांगारकर यांच्या संपादनाखाली तयार झालेल्या 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' या ग्रंथात मुक्ताबाईचे काही अभंग व स्फुट रचना समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

४८

अवघाचि संसार केला आम्ही गोड । झाडे आणि झूड ब्रह्मरुप ।। माता आणि पिता गण आणि गोत । कन्या आणि सुत ब्रह्मरुप ।। वापी कूप सिंधू आणि सरोवर । दरे आणि खोरे ब्रह्मरुप ।। हत्ती आणि घोडे बैल आणि रेडे । मुंगी आणि माकडे ब्रह्मरुप ।। आनंदाचे लेणे मुक्ताबाई ल्याली । पालवू लागली चांगयासी ।।

✻

लेखक डॉ.वि.रा.आपटेकृत 'सोन्याच्या पानाचा प्रवास' नावाचे पुस्तक सहज वाचनात आले. त्यामध्ये एका गायनशिक्षकांचे चरित्र आहे. गायनामध्ये जी पदरचना गायली जाते त्यामध्ये मुक्ताबाईची मुद्रा असलेले खालील पद या पुस्तकामध्ये आढळून आले. त्या पदातील आशयावरुन ते पद मुक्ताबाईचे असण्याची शक्यता बरीच आढळते. ते पद असे –

४९

धन्य धन्य सद्‍गुरु राय माझ्या देही दाविला देव । देह देवाचे देऊळ केले । आत्मतत्त्व प्रकाशिले ।। त्रिगुणांच्या वळल्या वाती । सर्वांगाची लाविली ज्योती ।। पंचप्राणाची आरती । मुक्ताबाई ओवाळिती ।।

भारत इतिहास संशोधक मंडळ अहश १८३३ शके १८३४ विजयादशमीच्या अंकामध्ये वि.का.राजवाडे यांनी वरील अभंग पुढीलप्रमाणे दिला आहे. पाठभेद असल्याने तोही येथे देत आहे.

धन्य धन्य सद्‍गुरुराव । माझ्या देही दाविला देव ।। माझ्या देहाचे देऊळ केले । आत्मलिंग प्रतिष्ठिले ।। सत्रावीचे जळ आणी । तेणे देवा अखंड न्हाणी ।। त्रिगुणाच्या वळल्या वाती । साक्षी तुर्या लावी ज्योती ।। पंचप्राण आरती । मुक्ता गुरुला वोवाळिती ।।

*

'हिंदीको मराठी संतों की देन' या ग्रंथाचे लेखक आणि सुप्रसिद्ध हिंदी विद्वान आचार्य विनय मोहनजी शर्मा यांनी मुक्ताबाईचे एक हिंदी पद संकलित केले आहे.

५०

वाह वाह साहबजी सद्‍गुरुलाल गुसाईजी । लाल बीच मो उडला काला ओंठ पीठसों काला । पीत उन्मनी भ्रमर गुंफा रस झूलनवाला । सद्‍गुरु चेले दोनों बराबर एक दस्तयो भाई ।। एकसे एक दर्शन पाये महाराज मुक्ताबाई ।।

डॉ.अशोक कामत यांच्या 'ज्ञानदेव भगिनी मुक्ताबाई' या पुस्तिकेमध्ये मुक्ताबाईची हिंदी रचना समाविष्ट करण्यात आली आहे. तो सर्व भाग मूळ पुस्तिकेनुसार जसाच्या तसा येथे देत आहे. डॉ.कामत या पुस्तकामध्ये लिहितात,

यातील भाषेवरुन अर्थातच हे प्राचीन वाटत नाही. परंतु ज्ञानदेव आणि मुक्ताबाई यांचे नावावर हिंदी पद प्रचलित असणे ही गोष्ट सूचक आहे. शर्माजींनी या पदाचा जो संदर्भ दिला आहे त्यावरून हे पद उत्तरेत प्रचलित असावेसे वाटते. वामन दाजी ओक यांनी संकलित केलेले एक पद वरील पदापेक्षा अर्थपूर्ण वाटते. कदाचित हे पदच मूळचे पद असू शकेल.

वाहवा साहेब जी । सद्‌गुरुलाल गुसाईजी ।। लाल बीच मों उदीला काला, औठ पीठसों नीला । पीत उन्मनी भ्रमरगुंफा रस झूला बाला ।। सहस्त्रदल मों अलख लिखाये, आज लौं परमाना । जहॉ तहाँ साधु, दसवा आप ठिकाना । सद्‌गुरु चेले दोनों बराबर, येक देसमों भाई ।। एकसे ऐसे दरसन पायो महाराज मुक्ताबाई ।।

*

ह.भ.प.निवृत्ती दौलत वक्तेकृत 'ब्रह्म चित्कलादर्शन अर्थात मुक्ताबाई चरित्र व गाथा' या ग्रंथामध्ये मुक्ताबाईच्या प्रचलित अभंगांव्यतिरिक्त काही वेगळे अभंग आढळून आले. ते येथे मूळाबरहुकूम देत आहे. मूळ लेखनात बरीच अशुद्धता आहे असे वाटते.

संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक कै.भा.पं.बहिरट यांनी वरील ग्रंथाला अभिप्राय देताना म्हटले आहे, ''याचे लेखक निवृत्तिबुवा वक्ते, मुक्ताबाई मठ, पंढरपूर हे आहेत... यात शेवटी मुक्ताबाईचे अभंगाची गाथा दिली आहे. त्यात पूर्वी उपलब्ध असलेल्या अभंगांपेक्षा काही अधिक अभंग दिले आहेत. ते महत्त्वाचे आहेत. हे नवीन अभंग लेखकाला कोठे आढळले याचा कोणताच नमानिर्देश या ग्रंथामध्ये केलेला नाही. परंतु वारकरी परंपरेत हे अभंग पूर्वापार चालत आले असावेत असे त्यांच्या आशय व अभिव्यक्तीच्या शैलीनुसार जाणवते.''

**५१**

अनंती अनंत श्रुतींचा इत्यर्थ । ते रुप समर्थ पंढरिये ।। पुंडलिके गोविला भुलोनिया ठेला । न बैसे वहिला अद्यापि जो ।। नाना बागडियाचे किर्तन साबडे । तेची तया आवडे प्रेमभरित ।। मुक्ताई अवघा झाला परमानंद । सुखाचा उद्‌बोध सुखरुप ।।

## ५२

जयालागी योगी शिणती साधनी । तो हा चक्रपाणी पंढरिये ।। युगे अठ्ठाविस उभा विटेवरी । कर कटावरी ठेवोनिया ।। दक्षिण वाहिनी भिमा प्राणिया उद्धार । स्नाने नारी नर मुक्त होती ।। संत मुकुटमणी पुंडलिकराव दरुशने ठाव वैकुंठाचा।। निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । मुक्ताई तया ओवाळिती ।।

## ५३

मंगल ते नाम मंगल ते धाम । मंगल पुरुषोत्तम मंगलची ।। मंगल ते तिर्थ मंगल ते क्षेत्र । मंगल पवित्र नामघोष ।। मंगल ते भक्त मंगल किर्तनी । मंगल चक्रपाणी गाती नाम ।। मंगल सोहळा वैष्णवाचा हाट । मंगल ती पेठ पुंडलिक ।। मंगल नरनारी ओवाळती हरी । मुक्ताई उभी द्वारी मंगलाच्या ।।

(वरील अभंग मुक्ताबाईकृत वाटत नाही.)

## ५४

अकार उकार मकार नि:शून्य साकार । परें परता पर पंढरिये ।। ते रूप सावळे उभे कर कटी । पुंडलिका पाठी विटेवरी ।। भू वैकुंठ क्षेत्र भिवरेचे तीरी । संत भार गजरी टाळ घोळ ।। दिंड्या गरुडटके पताकांचे भार । किर्तन गजर वाळवंटी ।। निवृत्ति ज्ञानदेव सोपान सावता । जगन्नादी तत्त्वता गाती नाम ।। मुक्ताई पूर्ण हरिपाठी रंगली । विठ्ठली रातली पूर्णपणे ।।

## ५५

## सासुरवास

बाई मी जाते माहेराला । माझ्या मूळ घराला ।। माझ्या मुळीचे तीन सासरे । त्यात दोन वाईट आहेत खरे । एक आहे गरिब बिचारा । मानित नाही मी त्याला ।। माझ्या मुळीचे सहा दीर । काय सांगू मी त्यांचा कुविचार ।। काम क्रोध मद मत्सर गर्व अहंकार । गांजिती मजला ।। आशा मनशा इच्छा कल्पनेने । घात केला या चौघी जणीने । वासना नांदुली मोठी धांगडी । हिला प्रपंचाची गोडी ।। येता जाता थापडी । धरिती गालाला ।। मोठ्या हौसेने पति म्या केला । जाऊनी राहिली त्यांच्या घराला । परि तो उगा मौनचि ठेला । बोलत नाही मजला ।। ऐसी मुक्ताई गांजली । या साधुसंतांसी शरण गेली । जाऊनी तेथेचि राहिली । मूळ स्वरूपाला ।।

(वरील अभंग मुक्ताबाईकृत वाटत नाही.)

५६

उबगले संसारा मजला कोणी माहेरासी न्यावो । चुकवा एवढा जाच तुमच्या पडते पाया वो ।। प्रपंच हा सासरा मजला उगाची गांजितो । भेद भयंकर भाव हा तर मजला उगाचि जाळितो ।। सासु ही कल्पना मजला जाच करिते नाना । अविद्या ही तर नणंद माझी उगीच राहिना ।। क्रोध माझा दीर मजला भलतेचि बोलितो । काम माझा दादला मजला भलतीकडे नेतो ।। आशा ममता जावा यानि मांडियेली दैना । कुठवर सोसू जाच हो तर कदापि राहवेना ।। जो माझे माहेर दाखविल त्यासी देह समर्पिन । म्हणे मुक्ताबाई गेली माझी लज्जा उडोन ।।

*

'अनेक महाराष्ट्र कविकृत पदसंग्रह' भाग पहिला या ले. वामन दाजी ओक यांच्या ग्रंथामध्ये मुक्ताबाईची पाच पदे समाविष्ट करण्यात आली आहेत.

५७

उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खासी । भरला पुर मायेचा लोंढा वाहुनिया जासी ।। भव नदीचे पाणी सखया मोठे ओढीते । भल्या भल्या पोहणारा उलथून खाली पाडिते ।। या अविद्येचा पूर वेगी वसरेना ।। कल्पना सुसरी इची मीठी सुटेना ।। क्षणभंगुर संसार याचा भरवसा नाही । दुर्लभ नर तनु गेल्या मग तू पडशिल पस्ताई ।। म्हणे मुक्ताबाई चांग्या अंतरीची खूण । धरी सद्गुरुचे पाय तुजला नेतील उतरुन ।।

(वरील अभंगातील भाषा प्राचीन वाटत नाही. आशय साधर्म्य राखून कालौघात त्या भाषेत बदल झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.)

५८

निष्काम राम जपा रे । स्वर्गीचे जे ज्ञानी रामा इच्छिती मेदिनी । अमृत प्राशुनी आम्हा नाही नफा रे । निवृत्तिकृपे बोले मुक्ताबाई । नाही आम्हा भवभयधोका रे ।।

५९

व्यर्थ भुललासी काय राया । देह जाईल वाया ।। म्हणसी संपदा माझी किती । अंबाऱ्या हत्ती ।। हत्ती घोड्यांचि होईल माती । यम तुजला नेती ।। म्हणसी पालखी माझा घोडा । कां भुललासि मूढा ।। अंती काळाचा पडेल खोडा । म्हणुन

राम जोडा ।। म्हणसी गाई ह्या माझ्या म्हैसी । आणि बटकी दासी ।। अंती काळाचे पडसिल फांसी । मग काय करिसी ।। झां झां झांगड नौबत वाजे । वाजंत्रे वाजे ।। लोडा तीवशा बसले राजे । हे येथेचि साजे ।। भजनी क्रमावे राजा । परउपकारी होई ।। मुक्ताबाईने केली सोई । हरिभजनी राही ।।

६०

भाव एक । मी सद्गुरुची लेक ।। बाई मी उदास धांगडी । पाडी प्रपंचाची बेडी ।। नाकी नाही वेसण काडी । माझे नाव ठेवा आवडी जगभुली देख ।। सद्गुरु माझा चंद्रमौळी । काखे देऊनिया झोळी ।। मज हिंडवी आळोआळी । जगही म्हणती सुकाळी मोठे सुख ।। मज पाजोनिया भांग । मग घडला संतसंग ।। गुरु गुह्य मजला सांगे । मारुनि हाक ।। ऐसी म्हणे मुक्ताबाई । जा शरण गुरुचे पायी ।। पुन्हा जन्ममरण नाही । ऐसी भाक ।।

६१

का रे अनाथबंधू । येवढे का केले निर्वाण ? किती अंत पाहसिल माझा कंठी राहिला प्राण ।। ब्रह्मादि वंदित पाय तू त्रैलोक्या धनी । तुझा मी म्हणवितो मला चिंतेची काचणी ।। सुवर्णाची लंका घेऊन दिधली शरणागता । जगदीशा जगन्नायका । तुझी कळिकाळावरी सत्ता ।। कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशी। वितभर पोटासाठी कवणा तोंड वासू ? मुक्तीच्या माहेरासी रिद्धीसिद्धी तुझ्या दासी । क्षीरार्णवा । रंक मी तो मरतो उपवासी ।।

*

चिमड संप्रदायातील एक अधिकारी व्यक्ती श्री.रघुनाथ हणमंत कोटणीस यांनी ‘कैवल्यवैभव’ या ग्रंथामध्ये अनेक संतांचे निवडक अभंग संग्रहित केले आहेत. त्या ग्रंथामध्ये मुक्ताबाईचे पुढील अभंग समाविष्ट करण्यात आले आहेत. महत्त्वपूर्ण ठरावेत असे हे अभंग आहेत.

६२

निर्गुणाचा संग मला आजि लाभला । पूर्व दिशे भानु जसा आता उगवला ।। दर्पणात दीप जसे तेज देखिले । पंचभूत प्रपंची फार पीडिले ।। काम क्रोध सर्व कर्म दंडिले बळे । सूत्र धरुनि मध्यभागी वरि चालिले ।। त्रिवेणीचा ओघ तेथे अंग

धुतले । अनुहात झणझणाट नाद ऐकिले ।। सहस्त्रदळी अढळपदी पुरुष पाहिले । दिव्य स्फटिक मंदिरात त्यासि भेटले ।। म्हणे मुक्ताबाई आता बोल राहिला । पहा ठाई ठाई तोचि उभा ठाकला ।।

६३

झालासी तटस्थ नव्हे ती समाधि । उपायाची शुद्धि नेणोनिया ।। काष्ठा ऐसा जड तैसा तू झालासी । स्वरुप नेणसी श्रमोनिया ।। बोलता चालता देखता ऐकता । ढळेना सर्वथा तेचि साधी ।। ब्रह्मादिक ऐसी समाधि इच्छिती । तयासि हे स्थिती प्राप्ती नाही ।। ऐकरे चांगया ग्रासी हे कल्पना । पावसी त्या खुणा मुक्ताई म्हणे ।।

६४

असत्य न बोलों तोंडे रे खेळ्या । मुंगीने मेदिनी धरियली माथा, वायूची बांधिली मोट ।। सशाने सिंह फाडून खादला, तिळान फोडिली लाठ ।। शीताने सूर्य बांधला पायी, चंद्रससि झोंबला ताप ।। गाईने व्याघ्र फाडियला, तेणे बेडके गिळिला साप ।। वाळुची वेंटी थोट्याने विणली, तोंडाळ झाले मुके ।। पांगुळ चढला गिरिच्या माथा, गगनी फोडिले टाके ।। वांझेच्या पुत्राने उदिम केला, कुपान खादले शेत ।। स्त्रीविणे पुरुष बाळक व्याला, पुरला त्याचा अंत ।। मुक्ताबाई म्हणे गुरुपुत्रा । आम्ही बांधली गगनी वाट ।। सकळ ब्रह्मांडे घेऊनि हाती, भरिला त्याचा घोट ।।

६५

अक्षराचे नाव काय । अक्षर कोठून आले पाहे ।। त्रिपदा ती कैशी काय । तिचा सांगा चवथा पाय ।। ओंकाराची कोठे जागा । मूळ वेदाचे उमगा ।। सिद्ध चैतन्य सिद्धाचा बाळ । नाळ मोठा एकचि कळ ।। हे मी हे तू प्रचीत पाही । अकारा आलिया भेदावे काई ।। मी नाही तेथे दुजे कैचे । सोहं सोहं भजन सांडी साचे ।। अहं ते मी सोहं ते गूज । म्हणे मुक्ताई चांगया तू बुझ ।।

६६

एका समुद्राचे तीरी । मुंगी पावे निर्धारी ।। मुंगी पैल तीरा जाये । वाळवंटी साखर खाये ।। तिकडून आला एक गज । मुंगी सवे करी झुंज ।। पाच अकरा पंचवीस । सेना मिळाली छत्तीस ।। पांचा जणांनी झगडा केला । गज मुंगीने ग्रासिला ।। मुक्ताबाई सांगे खूण । ज्ञानदेव सत्य जाणे ।।

डॉ.शं.गो.तुळपुळे यांच्या ‘संतांच्या सहवासात’ या ग्रंथामध्ये मुक्ताबाईच्या अभंगांचा विचार करण्यात आला आहे. त्यामध्ये मुक्ताबाईकृत खालील दोन अभंग नवीन आढळले.

६७

मकाराचे माथा काय वस्तु असे । पक्षी देही वसे कोण्या ठायी ।। अर्धी मात्रा बापा कोण्या ठायी राहे । तिच्या पुढे आहे काय सांगा ।। ऐसे सुख कोणी लुटिले आपण । पुसावे जाऊनी कोणापाशी ।। रंगाची हो खूण कोणे दाखविली । म्हणे मुक्ताबाई ज्ञानदेवा ।।

६८

मकाराचे माथा झळकेचि चांदणी । पक्षी हो नयनी तटस्थले ।। अर्धी मात्रा स्थान महा हो कारण । तयामाजी जाण ज्योतिरुप ।। ते सुख आपण आपुले लुटावे । जाऊनी पुसावे गुरुपाशी ।। चौरंगाची खूण मुक्ताई बोलली । सर्वकाळ झाली ब्रह्मरुप ।।

✻

‘भारत इतिहास संशोधक मंडळा’च्या वाइतिश १८३८ शके १८३९ ज्येष्ठ या अंकामध्ये श्री.शं.श्री.देव यांनी मुक्ताबाईचा पुढील अभंग दिला आहे.

६९

थै थै म्हणका रे गोपाळा । भेदु जाणे तो विरुळा ।। आशा मनसा हे गाई थोरी । इचें दुभते घरोघरी ।। सिद्धा साधकांसी चारी । इने नाडिले ब्रह्मचारी ।। गाये चरणाविण धावे । तीस बहुता जनाची सवे ।। वाहीसारिखा घेतला जीवें । तऱ्हीं त्या रावणासी नव्हते ठावे ।। गाईने हाटीली इंद्रासी सींगे । त्याचे सर्वांगी पाडिली भगें ।। अहील्या गौतमें श्रापिली रागें । तरी त्या चंद्रासी कळंक मागे ।। गाय वोथरली ईश्वरासी । सींगे रोविली दोही कुसी ।। त्राहे त्राहे रुसीकेसी । कही या गाइवेगळे करीसी ।। गाये लागली शुकदेवापाठी। त्याने फिरोन हाटीली काठी।। लपों गेला गिरीकपाटी । त्यास मोक्ष जाला वैकुंठी ।। गाये नामदेव त्रासिली । हृदयीणे खुटा सोडिली ।। ज्ञानदेवें भोवडीली । इतुके देखोनी मुक्ताई हासिली ।।

✻

नामदेवगाथेतील ‘श्रीनामदेव व श्रीज्ञानेश्वर यांची भेट’ या शीर्षकाखाली एकत्रित करण्यात आलेल्या अभंगांमध्ये मुक्ताबाईचे म्हणणे स्पष्ट करणारे पण नामदेवकृत अभंग आहेत. त्यातून मुक्ताबाईच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख अधिक चांगल्या रीतीने पटते. यादृष्टीने ते अभंग महत्त्वपूर्ण आहेत. तसेच उपदेश करण्याची एक आगळीवेगळी पद्धत येथे मुक्ताबाईनी अवलंबिलेली दिसते. ती शैलीही येथे पाहण्याजोगी आहे. म्हणून येथे त्याचा समावेश करत आहे.

७०

अखंड जयाला देवाचा शेजार । कारे अहंकार नाहीं गेला ।। मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असतां दिवा हातीं घेसी ।। परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ । आंधळ्या डोळे डोहळे कां बा झाले ।। कल्पतरू तळवटीं इच्छिली ते गोष्टी । अद्यापि नरोटी राहिली कां ।। घरीं कामधेनू ताक मागूं जाय । ऐसा द्वाड आहे जगामाजी ।। म्हणे मुक्ताबाई जाई ना दर्शना । आधीं अभिमाना दूर करा ।।

७१

झालासी हरिभक्त तरी आम्हां काय । आंतली ती सोय न ठाऊकी ।। घेऊनी टाळ दिंडी हरिकथा करिसी । हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणें ।। गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष । होशील मुमुक्षु साधक तूं ।। आत्मतत्त्वीं दृष्टी नाहींच पां केली । तंववरी ब्रह्मबोली बोलुनी काय ।। तुझें रूप तूवां नाहीं ओळखिलें । अहंतेते धरिलें कासयासी ।। आमुचें तूं मूळ जरी पुसतोसी । तुझें तूं आपैसी पाहुनी घेईं ।। ऐक रे नामया होई आत्मनिष्ठ । तरीच तूं श्रेष्ठ ज्ञानी म्हणे ।।

७२

बोलोनियां येणें वाढविला डांगोरा । अंतरींचा कोरा गुरुवीण ।। संतांचा सन्मान कळेना जयासी । राहुनी देवापाशीं काय केलें ।। परिसा झांकण घातलें खापर । नाहीं झालें अंतर बावनकस ।। खदिरांगारी शृंगारी हिलाल । अंतरीचें काळें गेलें नाहीं ।। म्हणे मुक्ताबाई अभिमानानें नेलें । सर्पा पाजियेलें विष तेंचि ।।

७३

अमृत टाकून कांजीची आवडी । साजेना झोंपडी काय त्याला ।। खरासी अखंड गंगेचें स्नान । गेलें वायांवीण जिणें त्याचें ।। पोंवळ्याहून अधिक दिसती रानगुंजा । शृंगाराच्या काजा विटंबिल्या ।। आनारा परिस चोखट इंद्रावन । चवी

कडुपण हीन त्यांचे ।। रंगाची बाहुलीं दिसती साजिरीं । बेगडाचे वरी नग ल्यालीं ।। म्हणे मुक्ताबाई पुरे तें दर्शन । गुरुवीण संतपण आहे कोठे ।।

७४

उसाचे शेजारी येरंडाचे झाड । नाहीं त्याचे पाडें गोडी आली ।। कर्पुरासी झाला दीपाचा शेजार । काय गुणें हीं राहिल त्याचा ।। सागरीं लवण टाकिलें नेऊन । काय गुण खडेपण उरलें त्याचें ।। तैसा नामदेव विठोबाच्या जागां । काय गुणें दादा कोरेपण ।। म्हणे मुक्ताबाई चंदनाचे झाड । अहंता सर्प वेढे गुंडाळिले ।।

७५

संत पाहुणेरा सज्जनाचे घरीं । पूजा करितां बरी डोई काढी ।। करितां सन्मान अंगी भरे ताठा । देवा पैं करंटा असुनी काय ।। अहंता हा खुंट वाढविला चित्तीं । न साहे संगती सज्जनाची ।। पंढरीचे भूषण सांगतों जनासी । नाहीं या मनासी तीळ बोध ।। म्हणे मुक्ताबाई चांगदेवा वाणीं । भजावा सज्जनीं नामदेव ।।

७६

चौदाशें वरुशें शरीर केलें जतन । बोधाविण शीण वाढविला ।। नाहीं गुरुमंत्र नाहीं उपदेश । परमार्थासी दोष लावियेला ।। स्वहिताचें कारण पडियेलें जेव्हां । शरण आला तेव्हां अलंकापुरीं ।। गैनीनाथें गुज दिलें निवृत्तीला । निवृत्तीचा झाला ज्ञानदेव ।। ज्ञानदेवीं बीज वाढलेंसे जनीं । तेंचि आम्हीं तुम्हीं संपादिलें ।। म्हणे मुक्ताबाई तिहीं लोकीं ठसा । नामदेव ऐसा राहिला कां ।।

७७

कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती । काय साहे संगती पाणियाची ।। मेणाची पुतळी घेतां करीं बरी । अग्नीचे शेजारीं राहे कैशी ।। तैसा अधिरासी काय संतसंग । मृगजळा तरंग येतील कैसे । तें आजि नवल देखिलें डोळां । दगड जैसा जळा वेगळेपण ।। म्हणे मुक्ताबाई जाऊं देऊं नये । ऐसें सरिसें काय भांडे करा ।।

७८

कुलाल आपुल्या घरीं भाजवी भाचरीं । म्हणे जैं होईल हरि कृपावंत ।। हरीसी वरदळ लावितो निशिदिनीं । धाडिला म्हणोनी तुम्हांपाशी ।। तुम्ही संतजन उद्धराल तत्काळ । नामा लडिवाळ विठोबाचा ।। राखावें तें ब्रीद करावें

पावन । धाडा बोलावणे गोरोबाला ।। म्हणे मुक्ताबाई भाजलें की कोरें । काकाचे उत्तर सत्य मानूं ।।

७९

गोरा बोलाविला जुनाट पैं जुना । हातीं थापटणें अनुभवाचें ।। परब्रह्म म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पाल्हाळला ।। सोहं शब्दें विरक्ती उरली अंबरी । पाती अणुभरी पाहिलें पण ।। म्हणे मुक्ताबाई घालूं द्या लोटांगण । जाऊं द्या शरण अव्यक्तासी ।।

८०

अंतर बाहेर भाजूं आम्ही कुंभ । भरूं निरालंब सगळेची ।। अहं सोहं दोन्ही ऊर्ध्व लावूं फुंकणी । नवद्वारें फुंकोनी जाळ करूं ।। जीवित्व काढुनी शिव घडूं अंगा । प्रिय पांडुरंगा आवडेल ।। म्हणे मुक्ताबाई पळायाचा पाही । आसन स्थिर नाहीं नामयाचें ।।

८१

## मुक्ताबाईकृत पांडुरंग स्तुती

मुक्ताबाई म्हणे देवा । तूं विसावा जिव शिवा ।। गुण गौरवा अनुभवा । आम्ही जाणों तुज ।। सत्य सत्य जनार्दन । सत्य सत्य नारायण ।। सत्य सत्य तूं आमुचें धन । जगज्जीवन जगदाकार ।। तुजवांचानी त्रिभुवनी । दुजा न देखो नायकों कानी ।। वेदशास्त्र पुराणीं । अगाध महिमा तुझा ।। तूं देवादी देव उत्तमा । तूं निज भक्तांचा विश्राम ।। शंकराचा आत्माराम । ऐसा नेम वेदाचा ।। तरीच भक्तांचा केंवसा । पावसी तू ऋषीकेशा ।। नाही तुजविण भरंवसा । निश्चय ऐसा साच तू ।। तूं परत्रीचें तारु । तुझा आगम निगम विचारु ।। तुझ्या चिंतने पार । उतरे संसारु दुर्घट ।। विठोजी म्हणे मुक्ताबाई । मन समर्पिले माझे ठाई ।। तयासी जन्म मरण नाहीं । सत्य पाही निर्धारे ।। नामा म्हणे करुनी स्तुती । मुक्ताबाई चरण वंदिती ।। तंव संत महंत विनविती । आदिमूर्ती विष्णूची ।।

✻

या पुस्तकात अनेक संतांची भारुडे एकत्रित करण्यात आली आहेत, त्यातच मुक्ताबाईची काही पदे आहेत. ती येथे समाविष्ट करत आहे.

८२

उघडी होऊनि फुगडी घाली लक्ष निराकारी ।। सद्भावाचा हात धरुनि जाय मुळीच्या घरी ।। चाल निरंजना सुख होईल मना ।। वरत्या बाह्या सार पोरी देह सुपली वारी ।। आत्मयोगे साधुसंगे बैस निराकारी ।। मी माझे हेचि आता शोधोनिया पाहे ।। मीपणाची शुद्धि येता तू पण उडूनि जाये ।। फुकट विषय गोड आता सांडी जग झोडी ।। सद्गुरुकृपेने मुक्ताबाई घेत स्वरुपी गोडी ।।

८३

मी सद्गुरुची लेक । भाव एक ।। बाई मी निसंग निधडी । फेडिली प्रपंच लुगडी ।। नाकी नाही नथ काडी । माझे नाव म्हणती आवडी ।। जग भुलवी । मी सद्गुरुची लेक ।। सद्गुरु माझे चंद्रमौळी । माझ्या काखे देऊन झोळी ।। मजला हिंडवी आळोआळी । जन म्हणती मज सुकाळी ।। बहु सुख । मी सद्गुरुची लेक ।। गुरुने मज पाजिली भांग । मज घडला संत संग ।। गुरु गुह्य मजला सांगे । मारुनी हाक ।। मी सद्गुरुची लेक ।। ऐसी म्हणे मुक्ताबाई । जा हो शरण गुरुचे पायी ।। पुन्हा जन्म मरण नाही । ऐसी भाक ।। मी सद्गुरुची लेक । भाव एक ।।

८४

आरते ये ग धाकटे मुली । हीच का ग तुमची बोली ।। घरंदाराचे हितकर्ते । फुटक्या मडक्याचे भोक बुजविते ।। अटक मटक नऊ वाटा । येऊन बसे सदा दारवंटा ।। सदा दारवंटा ते कोण । तुझ्यात गेले दोन ।। फटक माझें सवती । तुला सहाजण झोंबती ।। पडले षडविकारांच्या हाती । षट्विकार कशाने जाती ।। सद्गुरुचे पाय धर चित्ती । सद्गुरु काय देईल ग मला ।। तन मन धन अर्पण करीन तुला । संसार जाईल सारा ।। उद्या येईल काळाचा फेरा । आम्ही नरनारी पतिव्रता । विष्णुवर करु सत्ता ।। मुक्ताबाईने केला संग । योगी खेळवला पांडुरंग ।।

८५

अगं बाई बाई । बाई या जगात काय हालत । तेच पंचप्राणात चाळीत । ते कोठे गे राहत । तुझ्या हृदयीं खेळत ।। मला दिसेना का गे । आंतरदृष्टीने पाहा गे ।।

आंतरदृष्टी करूनि पहाते । मग का गे ऐसे होते ।। सद्‌गुरु देईल तुला । तन मन धन अर्पण कर त्याला ।। आंतरदृष्टी ती कैसी । जाऊनि सद्‌गुरुसी पुसी ।। आता बाई काय करु । चौढाळे तुझे नाक चिरु ।। का गे बाई रागे भरलीस । जाय परते मरून गेलीस ।। चाल बाई हात धरून जाऊ । पर पुरुषाचे घर घेऊ ।। परपुरुष कोणाचा । आत्माराम गड्याचा ।। सारा खेळ याचाच काय गे । खेळ खेळूनी निराळाच की गे।। जनाबाई मुक्ताबाई इणे केला संग । त्याजसवे खेळे पांडुरंग ।।

*

मार्च-एप्रिल १९२७ (माघ-फाल्गुन १८४८)च्या मुमुक्षूच्या अंकामध्ये श्रीज्ञानेश्वरमंडळाचे अप्रसिद्ध अभंग या शीर्षकाखाली मुक्ताबाईचे अभंग दिले आहेत. ते असे -

८६

मातीचीं भिंताडें चालवितो मढी । सांडोनियां वेडी तीर्था जाती ।। आहे याच देहीं शोधुनिया पाही । रिता ठाव नाहीं तयावीण ।। वेदाचिये मतें तीर्थी देव आहे । देशोदेशी काय उणा जाला ।। अष्टोत्तरशे तीर्थे जयाच्या भीतरीं । तो तुझे अंतरी आत्माराम ।। मुक्ताबाई म्हणे झकविले दर्शन । दिवसा नागवण नागविती ।।

८७

ब्रह्मांडाच्या कोटी संसार अपार । तेहि तू साचार नव्हेसि रया ।। सर्वांते जाणते सर्वभूतीं सार । तेहि तू साचार नव्हेसि रया ।। महाभूत पंचक पाचा पंचवीसा गुण । तो स्थूल देहे पूर्ण नव्हेसि रया ।। पंचविसा कळाचे लिंग देह साचे । तेही वासनेचे नव्हेसि रया ।। अज्ञान निष्टंक देह जो कारण । तो ही तूं आपण नव्हेसि रया ।। देह हे चतुर्थ ज्ञानस्फूर्ति युक्त । तेही तूं आपण नव्हेसि रया ।। मनें जें जाणिजे बुद्धि जें भाविजें । तेही तू सहजे नोहे रया ।। कर्म आणि कर्ता धर्माची हे वार्ता । हेही तूं तत्वता नोहेसी रया ।। ज्ञेय ज्ञाता ज्ञान ध्येय ध्याता ध्यान । त्रिपुटीचें भान नोहेसि रया ।। ब्रह्म परिपूर्ण चतुःशब्देविण । मुक्ताई सांगे खूण वटेश्वरा ।।

८८

निवृत्तीनें दिली शक्ति । चित्त पावलें विश्रांति ।। विसावािया आलें मन । मन

जाहलें उन्मन ।। धन्य जीविताची थोरी । एकविध चराचरी ।। भास मावळला ठायीं । सुखी झाली मुक्ताबाई ।।

८९

आत्मरूपीं पडली दिठी । चांगया पाहे सर्व सृष्टी ।। चर्मचक्षूनें न लक्षी । ज्ञानदृष्टीनें परीक्षी ।। सहजासहजीं लाभ जाला । मोल घेया कोण उरला ।। सरली हातवटी खेप । कोणें घेतलें अमूप ।। मुक्ताईची अंतरकळा । कळा विरु नी विकळा ।।

९०

विरक्त म्हणवी आणि इच्छेचा पाइकू । तयाचा विवेकू जाळी परता ।। षट्शास्त्रवक्ता आणि वितंडवादकू । तयाचा विवेकू जाळी परता ।। योगिया म्हणवी आणि इंद्रियांचा रंकू । तयाचा विवेकू जाळी परता ।। मुक्ताई म्हणे ज्याचा परमार्थ माइकु । तयाचा विवेकू जाळी परता ।।

९१

घटामधें पाणी पाण्यामध्यें घट । शेंडा मूळ देठ नाहीं ज्याला ।। बीजवटी रायी रायीची ही रायी ।। रायीचा ही नाहीं पोटीं वाटा ।। अणुहूनि बारीक त्यांत ही स्वरूप । विश्व ब्रह्मांड देख त्याचे पोटी ।। कुबुद्धि कल्पना परतलीया जाणा । मग फुटे पान्हा धणीवरी ।। खडकासी पाझर उफराटे झरे । दृष्टीचे अंकुरें फिरुनि जाती ।। मुक्ताबाई म्हणे ऐसें हें स्वरूप । जाणे तेचि मुक्त होति प्राणी ।।

९२

जाणते नेणा नेणते जाणा । जाणते नेणते दोनी ही नेणा ।। जाणते कायी जाणते कायी । जाणते सांडुनी नेणते ध्यायी ।। जाणते ठेविले नेणते ठायीं । नेणते तया लावियले सोई ।। सोहं शब्द सद्गुरुचे सोयी । नेणते बुझाले म्हणे मुक्ताई ।।

९३

गगनामाजी झरे लागले पाण्याचे । कोणा पानड्याचे सांगणे हे ।। टाकिया कुदनी न लगति धन । डबडबी गगन पाणियानें ।। न लगे मोट नाडा न लगे रेडा पाडा । ब्रह्मांडा एव्हढा मळा शिंपी ।। हाव धरीन तरी वृत्ति उताविळ । जाली केवळ मुक्ताबाई ।।

९४

पहिली माझी ओवी । परतुनि पाहिलें । दृष्टीने देखिलें । निजरूप ।। दुसरी माझी ओवी । दुजें नाहीं मनीं । लक्ष तुझे चरणीं । लागीयेलें ।। तीसरी माझी ओवी । श्रीसरूपता । हात तुझा माथा । सद्गुरुनाथा ।। चवथी माझी ओवी । शून्य जेथें आटे । वस्तु घन दाटे । मागें पुढें ।। पांचवी माझी ओवी । पांच ही अणुरवाचा । पंचवीसीयांचा । रीघ नाहीं ।। सहावी माझी ओवी । सादृष्ट देखणें । वरकड बोलणें । फोल जालें ।। सातवी माझी ओवी । साच वाटे मनीं । अंतरीच्या खूणीं । काय सांगू ।। आठवी माझी ओवी । आठव नाहीं जरा । निर्गुण सोयरा । पर्णियेला ।। नववी माझी ओवी । नांदू जे लागले । परपुरुषा रतले जीवेंभावें ।। दहावी माझी ओवी । धालें माझे मन । डोळां दिसे ऊन । रात्रीमाजी ।। म्हणे मुक्ताबाई । निवृत्तीचे देणें । योगियाचे खूणे । योगी जाणे ।।

९५

अव्यक्त व्यक्तीचे रूपस मोहाचें । एक तत्त्व दीपाचें हृदयी नांदे ।। चांगया फावलें फावोनि घेतलें । निवृत्तीनें दिधलें आमुच्या करी ।। आदिमध्य यासी सर्वत्र निवासी । एक रूपेनिसी दवडितु ।। मुक्ताई पूर्णता एक रूपें चित्ता । आदि अंतु कथा साधियेली ।।

९६

आम्ही कर्मी ना धर्मी निष्कर्मी जालों । जिताचि मेलों आपोआप ।। जिताचि मरणें उफराटे पाहणें । साहित्य बोलणें मुक्ताईचें ।। मुक्ताई म्हणे चांगया सांडी हे भरणें । आम्हां तव राहणें निरालंबी ।।

९७

पैल पैल ते कांही नाहीं । तेचि तूं गा पाही आपणिया ।। आम्हां नाम नाहीं आम्हां रूप नाहीं । नामरूप नाहीं तेचि आम्ही ।। मुक्ताबाई म्हणे चांगया तू बुझ । अंतरीचे गुज सांगितलें ।।

९८

आहे आहे म्हणून पाहों गेलों । कांही नाहीं तें पाहुनि आलों ।। कोठें गेलों कोठें धाविन्नलों । कोठें नाहीं ते पाहुनि आलों ।। खेचरविसा म्हणे मुक्ताबाई । कांही

नाहीं तें दाउनि देई ।।

९९

आतां सांगु मी सांगु मी काय । सांगू जात परी दाविता नये ।। दुजेंपण पाहतां कांहींच न दिसे । उपमेचे भाषे कांही न भाषे ।। मुक्ताई म्हणे विसोबा खेचरा । मी तूं नाही तेथें कैचा दुसरा ।।

१००

वेदश्रुति ठक पडियेले वाचा । तेथे कोण पाड तुझा बाळाचा ।। कांही बोलसी तरी अबोलणें बोल । बोल बोलसी तरी तितुके फोल ।। अनिर्वाच्य ब्रह्म बोलवे बोलणी । बोलू म्हणतां बोलणी लाजू जाय ।। बोलणें न बोलणें वटेश्वरी गुज । मुक्ताई म्हणे चांगया तू बुझ ।।

१०१

तिखट माथा शेंडा जे । जाणितले परि परते घे ।। परते घे परते घे । परते घे रे चांगोबा ।। मुक्ताई म्हणे चांगया भला । सांगितले ते अंगेचि जाला ।।

*

## ‘चांगा वटेश्वराचा संवाद’ या नावाखाली आलेले अभंग

१०२

तेथें एकलें एकलेंचि जाणे । तेथें दुजेपणा तया न बोलणें ।। तेथें कांहीच नाही काहींच नाहीं । सोय धरी कांही आपुलिया ।। वटेश्वरसुता बोले मुक्ताई । सोहंभावें चांगा अखंड पाही ।।

१०३

अंतरीचे सुख कैसें पै सांगावें । सूर्यानें पहावें कवणे दृष्टी ।। पतीचा संयोग केवि बोले नारी । साक्षित्वें अंतरी तेचि जाणे ।। आत्मतत्त्व दृष्टी जयासी फावली । त्याची पै निमाली बाह्यक्रिया ।। तेव्हां पै मुक्ताई चांगया तुज भेटे । तेव्हांची कोल्हाटे सत् चित्सुखें ।।

१०४

नयनांत नयन पाहे त्रिभुवन । चिन्मात्र निधान तेंचि आहे ।। तेंचि निजतत्त्व पाहतां एकत्व । सर्वत्र समत्व एकरूप ।। एकरूप पाही नर पशु पक्षीं । सर्व तूं हे

लक्षी एक डोळा ।। एक डोळा सर्व विश्व हे पाहत । देखणा दाटत घनानंदी ।। मुक्ताबाई डोळा दाखवी चांगया । अंग नाहीं तया ऐसें केलें ।।

१०५

साकारिलें ब्रह्म रूपासि आलें । आंत बाहेर विश्व एक फुललें ।। भेदुचि नाहीं तेथें भेदसी कायी । वटेश्वरसुता बोले मुक्ताई ।। सांगेन सुता बोलू नको कांही । आपुले मानुनी निज तेंचि होई ।। चांगा बाळ वटेश्वरी खेळत । मुक्ताबाई कवळ असे देत ।।

१०६

कांही तें बाही बाही तें कांहीं । कांहीं ना बाहीं तें आम्ही आम्ही ।। आम्हां नांव नाहीं आम्हां नांव नाही । आम्हा नांव नाहीं रें भाई ।। आमुचे नांव कायी पुससी रे भाई । परियेसी चांगया बोले मुक्ताई ।।

१०७

सांडी ते मांडी मांडी ते सांडी । सांडणे मांडणें दोन्ही सांडी ।। सोहं शून्य बुझारे भाई । सांगते ऐकते दोन्हीही नाहीं ।। मी ते कायी माझें ते कायी । परियेसी चांगया बोले मुक्ताई ।।

✻

मुमुक्षू मे-जून १९२७ च्या अंकात श्री.ल.रा.पांगारकर यांनी 'आरत्या सोळा' या शीर्षकाखाली संतमंडळींच्या काही आरत्या प्रकाशित केल्या आहेत. श्रीज्ञानदेव, निवृत्ति, सोपान, मुक्ताबाई, वटेश्वर, चांगदेव, नामदेव, विसोबा खेचर हे संत तीर्थयात्रेचे वेळी तापीतीरी आले त्या वेळच्या या आरत्या आहेत असे पांगारकर म्हणतात. त्यातील मुक्ताबाईकृत वाटतील व ज्यामध्ये त्यांच्या नावाची मुद्रा आहे अशा आरत्या येथे देत आहे.

१०८

अष्टभाव किरणें फाकती प्रभा । चंद्रसूर्य जैसी तारांगण नभा ।। तैसा हा सद्गुरू मजमाजी उभा । आदिनाथा आरती गोरक्षराजा ।। जय जय आरति येथे चंद्रमाळी । कृपाकरी देवभक्ता सांभाळी । जटा जूट गोदा वाहे कल्लोळी । तेचि प्रेमसुख या भक्तांजवळी ।। कमळा कमळ जैसे ज्योतिस्वरूपा । निरंजनी दीप

चांग्या पाहे पां । व्यक्त अव्यक्तरूपा अरूपा । सद्‌गुरुप्रसादें अनुभव सोपा ।। प्रात:काळ माध्यान सायंकाळ आरति । अखंड न खंडे प्रेमाच्या ज्योति । अंतरा अंतर सोहंभाव प्रीति । प्रेमे ओवाळिले गिरजेचे पति ।। अमूर्तरूप हे मूर्तीसी आलें । नवें नित्य भरूनि चांग्या फावले । साधुसंत कृपावंत वटेश्वर बोले । बिजवट सामावलें मी माझें हरपलें ।। अव्यक्त लहरी प्रेमाचा पूर । तेथे पहुडला चांगा वटेश्वर । अनुहात ध्वनी सोहं नामें गजर । मुक्ताबाई म्हणे पुढती नाहीं संसार ।।

१०९

भोईचे मार्दव । सांगे कोंभाची लवलव । चालिले प्रेमभाव वैराग्याचे । धन्य हे राउळी धन्य हे राउळी । प्रेम ते कमळीं विसंचेना ।। जय जय आरति । परतले प्रेमभाव । अलक्षा ठाव । उरेचिना ।। दृश्याच्या दृष्टी ज्योतिप्रकाशा अव्यक्ताचा ठसा परब्रह्मी ।। मज मारुनि जिवविले श्रीगुरुराया म्हणोनि लवलाह्या पाय धरा ।। तप्ति वाळुवंट रत्नाचा विखुरा । येथे याचक चकोरा तृप्ति जाली ।। राजहंस चारा निवडती क्षीरनीर । आपण वटेश्वर पुरवितसे ।। हिरियाच्या खाणी दिव्य तेज झळकत । मकरंद उधळत पुष्पयाति ।। ध्यानाचें ध्यान विसरले भ्रमर । आपण नारायण कळिका जाला ।। उपसतां विहिरां अमृताचा झरा । त्यानें ते शंकरा पूजा करिती ।। मुक्ता मुक्त तुमचे लडिवाळ बाळक । मानिती कौतुक साधुसज्जन ।।

*

इ.स. १९२७ च्या मुमुक्षूच्या अंकामध्ये (फेब्रुवारी आणि मे-जून) ज्ञानेश्वरमंडळाचे अप्रसिद्ध अभंग प्रकाशित झाले आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ग्रंथालयात हे अंक जीर्ण अवस्थेत उपलब्ध होऊ शकले. वाचकांच्या सोयीसाठी ते अभंग (फक्त मुक्ताबाईचे) येथे जसेच्या तसे देत आहे. या अभंगांच्या पूर्वी संपादक ह.भ.प.ल.रा.पांगारकरांनी एक टीप दिली आहे ती अशी - 'पुढील ९७ अभंग सासवड येथील सोपानदेवांच्या मठात मिळाले. त्यात प्रत्येकाचे २५ याप्रमाणे शंभर अभंग असावेत असे शेवटी दिलेल्या आकड्यावरून वाटते. ज्ञानेश्वरांचा एक व सोपानदेवांचे दोन असे तीन अभंग कमी आहेत. अभंग अशुद्ध लिहिले गेले आहेत.'

## (समाधि–रहस्य) सममेळ बोलणे चौघांचे

### ११०

मंगलमूर्ति मंगलध्यान । सर्व सुखाचे सार धन । गम्य आपुलाले मन । करीत जावे ।। १ ।। आसनाचिया पाउटी । प्रौढ व्हावे सद्गुरुचे पोटी । तेथें आत्मगुह्याचिया गोष्टी संपादाव्या ।। २ ।। दृष्टी लावूनि आंतुलीकडे । निकट चंद्र घ्यावा अग्र पुढें । अजानवृक्षी छाया पडे । ऐसे व्हावे ।। ३ ।। तेथें अंगसंगा हालू नय । कानकोच बोलूं नये । चेष्टा जाल्या चळू नये । भलतीकडे ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । हे सार समाधि । ब्रह्मादिका नादी । लाविले इनें ।। ५ ।।

### १११

आपुले धरील धैर्या । पावे सद्गुरुराया । निघाले उपाया । साधनाच्या ।। १ ।। घ्यावें वसंगळा । गुरुमाय बापा । निटावलो अर्था । अनुभवाचिया ।। २ ।। तूचि आश्रय तूचि सुखधाम । नव्हे येथें काम । आणिकाचे ।। ३ ।। चुकली पाउलें । नीट करावी तुम्ही । सुनिश्चित आम्ही । जालो असो ।। ४ ।। कल्पनेचा वारा । न लागू द्यावा आम्हां । स्वामीस प्रार्थना । केली असें ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई राजविद्येचे साधन । अढळपद येणें प्राप्त होय ।। ६ ।।

### ११२

अहं सोहं दोन्ही । स्वामीची अक्षरें । याजपुढें शास्त्रें । मंद जाली ।। १ ।। वेदाचे अवगतत्व । मरूनि निमे जेव्हां । आसन स्वहित तेव्हां । ऐसे होय ।। २ ।। जेव्हां आणिकांचे । करावें स्मरण । त्यासि बोलावण सद्गुरुचे ।। ३ ।। निश्चळ निश्चळ । जाले सर्व काळ । अमृत उदय वेळ । पातली असें ।। ४ ।। तेथें घट मठ आकाश । राहिले डोलतां । अगम्याचे माथा । रिघाले तेव्हां ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई । सद्गुरु वाटाड्या भला । हाताहात दिला । साधनाचा ।। ६ ।।

### ११३

येकां अधिकार । येकयेकांपुढें । सांगावे निवाडे । स्वसुखातें ।। १ ।। कोणी कोणा येथें । चोरू नये कडसणी । निधान देखोनी । अनुभवा आणा ।। २ ।। कोणी देखण्याचा । करील अनमान । तेथें असें आण । निवृत्तिची ।। ३ ।। जलंधराचा पडदा । फोडोनिया चढा । तेथेंचि निवाडा । पडिला असें ।। ४ ।। देह देखण्याचा । सोडा अनुमान । निधान पाहणें । आहे जेथें ।। ५ ।। म्हणे

मुक्ताबाई । राखा राखा समाधि । आदीचिया आदी । खूण असें ।। ६ ।।

### ११४

स्थावर कुंडलिनी । गुंफिली असे कळिका । आज याचि देखा । मूळमाया ।। १ ।। भेडसाविले तेथें साधुयोगियाते । हिनें महामहा संत । झकाविले ।। २ ।। अध उर्ध्व पाहतां । मावळोनि जाय । पाहतां पाहतां होय सर्पाकार ।। ३ ।। ते मुरडून असतां तळी । नाना रंग सावळी । अकार संचली । घालोनि बैसा ।। ४ ।। पुढें उदय होतां । पद्माचें ठसें । गगनी अवनी दिसे । ऐसे वाटे ।। ५ ।। त्यावरी वामसव्य । द्यावा पद्मवरु । तेथें राहोनि संहार । निववावे ।। ६ ।। म्हणे मुक्ताबाई । गुह्या द्यावी गवसणी । मनोहर आसनी । निवाडु द्यावा ।। ७ ।।

### ११५

भासा आभासाची दर्पणाची दळे । जैसी डोळियां बुबुळें मावळूनि जाती ।। १ ।। नानापरी झळकती पालव निशाणें । तेथें तयाच्या अवसानें आसन द्यावें ।। २ ।। उदय अस्ताची खूण मागें पुढें घ्यावीं । त्रिपुटी माया द्यावी जीवनकळा ।। ३ ।। जेथें जनिता जननी स्मरति मनीं । ते विसरा कहाणी जन्मदु:ख ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई साधुसाधक येकला । तो आकांत आपुला अनुमानावा ।। ५ ।।

### ११६

पुढें धूम्रकारी उदय होवुनि मावळती । नाना सांज होती संहार तेथें ।। १ ।। तरी तेथें आपुली न करावी समाधि । व्हावें गूढ संधि अवसानाचे ।। २ ।। जीवें भावें तेथें व्हावे नित्य नवे । लक्ष टाकुनि जावे अलक्षासी ।। ३ ।। भेदावे वरुते मनाचिये खालीं । मुरडावी पाउली अपसव्यें ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई सुरंगीचा वारा । सारूनि अंगुळे बारा परता होईजे ।। ५ ।।

### ११७

जेथें निजध्यास सद्गुरुचा घडे । नि:संग निवाडे सांपडला ।। १ ।। येकांतीचें गुज गुजावले जेणें । बोला अबोलणें सहज आले ।। २ ।। कोणी कोणा उठा म्हणो नेदी चला । तेथे उदय जाला पहिला दिवस ।। ३ ।। प्रकाशाचे राहणें प्रकाशचि पाहणें । सिद्धसाधक ब्रह्म स्वयें जालें ।। ४ ।। मग आपुली गोपुरी शृंगारिली सारी । सुनीळ वोवरी वाफा देती ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई जीवशिव आत्मा । समूळ पुसलिया खुणा मागें यांच्या ।। ६ ।।

## ११८

जीवाचा हा शिव जाला प्राणनाथ । हा विश्वाचा एकांत जाणवावया ।। १ ।। मग शिवासी जीवाचे नाहीं पां स्मरण । जेथें जन्ममरण उरले असे ।। २ ।। शिवमाया तनु जालिया सारी । केला उद्योग आवरी पंचभूतें ।। ३ ।। मग आसनाची विद्युल्लता जाये नयनावरून । चुकले स्मरण बळेचि देई ।। ४ ।। गुरुपुत्रालागी सांपडला निवाडू । आत्मागुह्य गुढ सोपा जाला ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई वेदोनारायण खूण । ज्याचे त्याने मन आटोपिलें ।। ६ ।।

## ११९

निवांताचे ठायी सद्गुरु कृपेच्या छायीं । देही विदेही सहज जालो ।। १ ।। कैवल्य सुखधाम देही जाले निकट । चढावया वाट सोपी जाली ।। २ ।। सद्गुरु समर्थ निजसखा आश्रम । सुनीळ भव्य देखणे साम्य जाले ।। ३ ।। वाफेल निर्वासा सुईचिये अग्री । दृष्टी त्याजवरी कांपूं लागे ।। ४ ।। तेथें देहशक्ति हरपली । नवी ज्ञानशक्ति जाली । वरी विस्तारिली धृति माया ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई करार केला चित्ता । थापटिला माथा सद्गुरुनें ।। ६ ।।

## १२०

कमलकंद चतुरानन अतुळी निजाची सकळ साधन । सार स्वहिता मन गुजावलें ।। १ ।। फुलली आदित्याची नानाचक्रें ते मावळली आपुल्या विकारें । मग उर्वरीत उरे निवळ ते ।। २ ।। कुंकुमाकार कुंडलिनी दिसत होती ठायींठायीं । ते त्रिपुटी संगम देही जडोनि गेली ।। ३ ।। स्वयें सुकृताचे सारिले आसन । निकट निवाडे देखणे पुढेपुढें जाले ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई राहिला निपुण । साधनाची खुण सोज्वळ जाली ।। ५ ।।

## १२१

बाप भाग्याचा योगिंद्र । नभ गोसावी स्वयें सार । सुनीळ गुह्याचे विवर । उघडिले असे ।। १ ।। मूळमध्यें टाकिला । वरी अग्रभाग घेतला । प्रकाश गुह्य तेथिला । मूर्तिमंत ।। २ ।। मग पाहिला प्रात:काळ । सुनीळ प्रकाशली शामनीळ । अवघा चिदानंद प्रांजळ । ऐसे जाले ।। ३ ।। तेथें अनंत विद्युल्लता नयनीं । शुद्धत्व रूपें गोसाविणी । ब्रह्मांड भवानी देखणी । प्रगटली ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई भरित आले भरे । तेथे डोलती स्वरुपाची गिरिवरें । येती देहाच्या सामोरे भेटावया ।। ५ ।।

## १२२

मग रोमांच शृंखळा । तटस्थ पाती लागला डोळा । आकार छिद्र पडले बुबुळा । सिद्ध वेळा अनुभवा ।। १ ।। तेथें कडसणीचे नव्हें काम । शरीर केले पाहिजे राम । स्वयें सद्गुरु पुरुषोत्तम थांपटूं लागे ।। २ ।। तेथें सुखत्व सुखत्वा मुकले । बोला अबोलणें जाले । पुढें बिंदुले वगळे । शुद्ध गोण्य ।। ३ ।। तेथे नर ना ईश्वर । ब्रह्म जाले नश्वर । सडसडती तुषार । अनुभवाचे ।। ४ ।। तेथे दाविता न देखतां । पोटी जाली येक येकता । दया सद्गुरु समर्था । ऐसी केली ।। ५ ।। म्हणे मुक्ताबाई । तेथें अग्र ना मूळ । प्राप्तिचे फळ । वंचू लागे ।। ६ ।।

## १२३

मग चक्राकाराची बुंथी । पांघरला शामकांती । दिव्यांबरे लखलखिती गोमटेपणें ।। १ ।। उदय होऊनि मावळे । दादा आरिसा खेळे । तेथे पापणी एक पळे । हालो नेदी ।। २ ।। तेथे देहा भरोनि ताट । ढळती कळस कुंभाचे कांठ । तेथे सद्गुरु समर्थ भेट । रक्षु लागे ।। ३ ।। तेथें शरिराचे पिसे । नेणो निवारिले कैसे । येकसरा मानसें । धावूं आले ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । येकांताचे पाहणे । समाधीची चिन्हें । येणे रिती ।। ५ ।।

## १२४

तेथे मताची उजरी । भरित साठविले अंतरी । उत्सव गुढिया अंबरी उदय जाल्या ।। १ ।। तेथे नभ डोहो उसळे । सुरंगी मनु खेळे । जैसी प्रवाळयाची दळे । कालवती ।। २ ।। वज्रासनाची मिठी द्यावी । कडसणी करावी नित्य नवी । सुखिया अनाम गोसावी । डोलू लागे ।। ३ ।। उल्हाट कोल्हाटाचिया अंगे । उन्मनी सुस्तावली संगे । मग तरंगात तरंगे । मावळो लागे ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । इंद्रिये बांधोनि ही दाही । सुख सागरी पाही । बुडी दिली ।। ५ ।।

## १२५

तेथे अजपाचे जे कुळ । शरीर सुगंध चर्चिले । त्रिकोण आसन उदय जाले । आदिपुरुषाचे ।। १ ।। तेथे तीन शून्य लावणी । दीप कलिका सपूर देखणी । मयूर माथा मुगुटमणी । झळकू लागे ।। २ ।। मुक्तापळाची मौन्य माळा । ढाळ देती ढळढळा । दिसो लागे अळोमाळा । ऐसे जाले ।। ३ ।। घोरावले घोर । भासले नाना विकार । तेथे प्रतिबिंबचक्र । झडू लाहती ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । ही देखणी

अनुमानाची । त्यावरी समाधि साची । निवडू दादा ।। ५ ।।

**१२६**

नाना रंगाचे अर्क । डांभिक संपादी देख । तेथे अवसानाचें एक । काम आहे ।। १।। द्यावा सद्गुरु संगनेटा । धरावा निश्चयाचा कासवटा । नेटें उल्लंघावा उंबरठा । तया आसनाचा ।। २ ।। तेथे वारा वाजू विसरे । अवघा प्रकाश पसरे । आदित्य मावळोनी उरे । निजरूप ते ।। ३ ।। तेथें अंधार नांदणे । दिशा दिसती भिन्न भिन्न । संपादली पाहिजे खूण । सद्गुरुची ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । तेथे न ये बोलतां । रिगालिया माथा । अगम्याच्या ।। ५ ।।

**१२७**

तेथे सुख परम धाम । जीवा सरले ध्यान । संगि या चेपले मन । पुढें केले ।। १ ।। मग राउळा आतील वाडे । चिदानंदाची पाऊले पडे । तेथे धैर्यासी धसा पडे । करुणाकर ।। २ ।। आतां सांभाळिले । स्वामी समर्थ आपुले । किंवा गुह्य साधन केले । नमनाचे ।। ३ ।। कां मनी निजध्यास आला जाण । स्वामी दिल्हे कीं फार श्रम । की त्या जपणे जाण । जी आम्ही ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । सुखिया ऐसा जाला । भेटी लागला । अगम्याच्या ।। ५ ।।

**१२८**

वरी झळफळीत ढवळे । जैसी आभास कंदाची दळे । ढळढळती सुकृत भालें । अरंगरूपें ।। १ ।। तेथें अनंत बाळाची हातवटी । सद्गुरु बांधिली गांठी । सुकृत आपुले हे निवटी । ऐसे जाले ।। २ ।। विरक्तियोगाने शोधिलें । दया तुमची मन बांधिले । जाणो भाग्य आमुचे उरले । आजि बापा ।। ३ ।। सोहं ब्रह्माची काठी करी । प्रळये निवळली सारी । तुमच्या बोधाची शिदोरी । बांधिली वरुती ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई खचिला माजीवटा । पाहू घातला पायीं धाकुटा । वरी लागू पाहाती सखा । तुझा तूं सारेचा ।। ५ ।।

**१२९**

तेथे आउतापरी । अनन्य कृपा केली वरी । मग पाहिली वेधलो पायरी । अगम्याची ।। १ ।। आतां जी तुम्ही अंजन । पैल दाविले निधान । ते गुह्य की ब्रह्म । म्हणूं आता ।। २ ।। ते निवांता निवांत राहिले । मना पाहिले होते ते पाहिले । वरीवर्णन वहिले । काय करूं ।। ३ ।। दुजया पायरीच्या पायावर ।

पाय ठेविला भक्तिज्ञान धीर । पुढे स्थूल गिरीवर । उल्लंघू जाता ।। ४ ।। म्हणे मुक्ताबाई । अग्र भागाचा दिवटा । नाचूं पहुडला सुखवाटा । आपुले पुढें ।। ५ ।।

**१३०**

पैल राऊळ महाद्वार । आकार निराकार विकार । दुजे आरक्त दिसे घोर । कुंडलनिये ।। १ ।। तेथे पायरी चपळ । निसरू पाहे दृष्टीचे पडळ । वरी साधिले घनवट बळ । कृपा आपुली ।। २ ।। तेथे हाडतां केला माथुला । पाहिला विश्वविभूतीचा बापुला । निजला कांही उठिला । दिसू लागे ।। ३ ।। वरी निवृत्तिकृपा । पुढे ज्ञाननंदादीपा । सोय जाली मूल सरिता । लंघावया ।। ४ ।।

**१३१**

सुई अग्र भागाते नेणवे । म्हणो नये जीवशिव । सदीव रायाचे सदैव । उघडे ते ब्रह्म गुह्याचे ।। १ ।। तो एकटपणी येकला । सदेह विभागा मुकला । सुप्रभवा वावरी त्याला । मिरउ लागे ।। २ ।। श्वेत पीत वर्णाकार । आरक्ती सिंधूर चक्र । ते मावळोनिया विरे । दिव्य प्रभा ।। ३ ।। तेथें शून्य मोकटेपणें । निर्झर वाहती निकट जीवनें । ती जाली मोहन मौन्ये । येकुली येकी ।। ४ ।। निवृत्ति कृपेची पाउटी । ज्ञान सोपी कुसुमकांति । विराली मुक्तपणाची मुक्ती । आपुलिया ।। ५ ।।

**१३२**

पुढति देखावया सार । धरिला सद्गुरु करुणाकर । निश्चय मनाचा निर्धार । थोर केला ।। १ ।। ऐसे अपूर्व मज आढळले । गगन गगनावरी खेळे । की प्रळयानळ उचंबळे । ऐसे जाले ।। २ ।। मग समाधि सार शेवटी । पक्व फळ लागे देठी । पुढे भासू लागे आणिक कोटी । ते बळे लोटी आपुलिया ।। ३ ।। मग गुरुवाक्य सत्य जाले । आत्मअनुभवें घेतले । वरी माथा वाइले । पायवणी ।। ४ ।। तो हा निवृत्ति जाला घुरु । जीवरूपें कुंडलाकारु । सोपमुक्तिचे माहेरू । वेधूनि गेले ।। ५ ।।

**१३३**

सत्वगुणा विचारली आपणा । कीं सद्गुरु पुण्यपावना । भेटविलें मूळिचे सुखधामा । ऐसे जाले ।। १ ।। तुम्ही प्रगट ईश्वराच्या विभूती । आम्ही मंदमती नेणती। तुम्ही विचारली जी युक्ति । ते कैसी काय ।।२।। हेचि समाधि समाधन। कीं वरी गोमटे राहिले देखण । धन्य तुमचे सर्वज्ञपण । कामा आले ।।३।। आतां निवृत्ति ईश्वरु। ज्ञान सोपा परात्परु। कीं मुक्त गुह्य शून्य धरु। थोडे पाहिलें।।४।।

१३४

तेथें आदित्य टाकुनी उमळे । अगम्य पुरुषाचे अगम्य स्थळ । तेथील अवस्था अचळ । गुह्य बोल ।। १ ।। अल्याड ओंकार विकारु । त्याजपरिता ईश्वर नरेंद्रु । तेथें अवघा प्रकाशकारु । सद्‌गुरुकृपे ।। २ ।। ते ध्यानाचे परमध्यान । कीं निर्गुणाचे अबोलण । इच्छा विरहित गुण । व्यापिलें असें तेथे थडके ।। ३ ।।

✻

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, १२.४, चैत्र शके १८५४, पृ. १७९-१८१ यामध्ये पां.मा.चांदोरकर यांनी श्रीमुक्ताबाईची अप्रसिद्ध कविता प्रकाशित केली आहे. ती पुढीलप्रमाणे -

१३५

पहिली माझी ओवी । प्रात:काल होतां । गाईला विधाता । त्रिकूटीचा ।। त्रिकूटीचा देव । आचार क्रियाशक्ति । स्थूलदेहीं वर्तती । रक्तप्रभा ।। रक्तप्रभा पृथ्वी । आउट हात जाण । आउट ताल गगन । दिसताहे ।। दिसताहे लिंग । गुरु तो सूक्ष । अंगुष्टमात्र वर्ण । शुभ्र वर्ण ।। शुभ्र वर्ण आपण । ज्ञानशक्ति पाहे । श्रद्धाहीन राहे । विष्णुभक्त ।। भक्त रुद्र तिसरा । सिवलिंगा कारण । द्रव्यशक्ति स्थान । तेजतत्त्व ।। तेजतत्त्व पाही । महाकारण तो । ईश्वर करतो । सेवा त्याची ।। सेवा त्याची घेतो । नीलकंठ ओंकार । प्रमाण मसूर । दीसताहे ।। दीसताहे लिंग । अति गौर वर्ण । बायोचें स्फुरण । तयांतूनी ।। तयांतूनी वाटे । पुण्यादी पर्वत । भ्रमरगुंफानाथ । पाहावया ।। पाहावया जावें । प्रसादलिंगासी । विराटनिवासी । पीतवर्ण ।। पीतवर्ण पाही । कैवल्य धारक । महत्‌शक्ति देख । त्याचे स्थळीं ।। त्याचे स्थळीं उभा । लक्षीत बैसला । लक्षातीत जाला । अलक्ष तेथें ।। दशदिशां वेगळा । नित्य निरंतर। नि:शब्दी खूण । वोळखावी ।। निवृत्तिप्रसादें । बोले मुक्ताबाई । अनुभवाचे डोहीं । स्थिरावली ।

✻

सकलसंतगाथेमध्ये ज्ञानेश्वरांच्या गाथेमध्ये एक अभंग आढळतो की जो मुक्ताईचा असावा असे वाटते. म्हणून येथे तो देत आहे. प्रस्तुत अभंग ज्ञानदेवांच्या समाधिनंतरचा असावा असे त्या अभंगाच्या आशयावरुन वाटते.

१३६

आवेगे ज्ञानजननी ज्ञाना आईगे । ज्ञाननाथेगे ज्ञानें काम धेनु तूं माझीयेगे ।। ज्ञानाई तूं माय माझीगे । ज्ञानाई तूं बाप माझागे ।। ज्ञानाई गुरुदेव ज्ञान ध्यान । साधन परत्रपावन ।। इह तुज वांचून आन मज कोणगे । बाई नुपेक्षीगे ज्ञानबहिणी ।। राउळींचे कऱ्हे हारपलें हाटीं । माणूसप्रति झाडा घेताती वोठी ।। नवल विपरीत देखिलें सृष्टीं । माणुसप्रति झाडा घेताती वोठी ।।

*

नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालय प्रकाशनातर्फे १९७६ साली संपादक श्री.सुरेश जोशी यांनी 'निवृत्ति-मुक्ताई संवादरुप ज्ञानबोध' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. निवृत्तिनाथ मुक्ताबाईला काही प्रश्न विचारतात आणि मुक्ताबाई त्याची उत्तरे देत आहेत असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. ग्रंथाच्या सुरुवातीला निवृत्तिनाथांनी १२४ अभंगांमध्ये प्रश्न विचारले आहेत व त्या प्रश्नांना मुक्ताबाईने ५४ अभंगांमध्ये उत्तरे दिली आहेत. हे अभंग पुढीलप्रमाणे - (या अभंगांवरून निवृत्तिनाथांनी विचारलेल्या प्रश्नांचीही कल्पना करता येण्याजोगी आहे म्हणून विस्तारभयास्तव ते प्रश्न येथे समाविष्ट केलेले नाहीत.)

१३७

तुम्ही विवेकाविवेक बरा केला प्रष्ण । तरुणोपाय येणें होय जगी ।। जे पुसीले ते की तुम्हा नाहीं ठावे । काय आम्ही द्यावे करूनी नवे ।। नव्याची नवाळ आहे सर्वभूती । ते का तुम्हा ज्योती मावळली ।। तुम्ही आम्हा गुरु आम्ही तुम्हा गुरु । उत्तरा प्रतिउत्तरु सहज होय ।। आम्ही तुम्हा शिष्य तुम्ही आम्हा शिष्य । परस्परे आसे भाव येक ।। म्हणे मुक्ताबाई तुम्ही केली लावण । सेवकाते उगवण सहजची आलें ।।

१३८

पूर्वी ज्या उजेडी शोधीयले मन । तेही तुम्ही धन्य स्वरूप आसा ।। स्वरूपाचा अरुप स्वामी हा अकार । त्यचा हा प्रकार आथिला असे ।। मुळीची बोलणारीं बिंब आणि प्रतिबींब । ते हे निरालंब पुजुं आतां ।। अरुप स्वरुप हेचि परब्रह्म ।

कळलीयां जन्ममरण नाही बापा । जनाचा जनीता मायेचा भोक्ता । सूत्रधारी सत्ता जया हाती । म्हणे मुक्ताबाई उत्पत्तीचे मुळ । आश्वत्थ हा प्राजंळ अविद्येचा ।।

१३९

विद्येची अविद्या जाली आदिमाया । त्या निर्गुणाची छाया वोतिली असे ।। तिन्ही जळाबंब होते येक मोहरे । तेव्हा सर्वेश्वर निमग्न होता ।। अखंड समाधिस्त होता निरालंब । तेव्हां हे पाखांड वोतीले नवते ।। नीर हे निर्गुण नव्हता पवनलेंश । तेव्हां जगदीश समाधिस्त होता ।। येथुनी तेथुनी अवघा होता सम्य फुगारा । निगम हा नगारा बंद होता ।। म्हणे मुक्ताबाई कोण्ही नवते कोठे । येथुनी तेथुनी आमुट धुप होता ।।

१४०

चाऱ्ही बरोबर युगे हे समान । तोंड आणि बोलणे नवते जगी ।। रुप आणि रेखा नवता देहभान । तंवरी हा देव वोळखीला नाही ।। आप वायो तेज नवतें तिन्ही गुण । तेव्हा हा भगवान जीवन होता ।। मन आणि माया नवती काममुर्ती । तेव्हा जाण प्रकृती पर पुरशाची ।। रजगुण तमगुण नव्हता सत्वगुण । तेव्हा निर्गुण निर होता ।। म्हणे मुक्ताबाई पाण्याची प्रतीमा । शक्ति होती कोण्हा बोलवावया ।।

१४१

आकाशी अवकाश नवते हे जाण । तेव्हा हा भगवान पाणी होता ।। आंधारीची नांदनुक कोण्ही वोळखीना केव्हा । तेव्हा तारंगणा ठाव नवता ।। नवता उदय आणि अस्तु तेथे कैचा दिवस । आभाशाचा भास सांगु आता ।। गुरुदेव देवा बरे द्यावे कान । चूकल्या स्मरण तुम्ही द्यावे ।। तेव्हा बुद्धी कान हेही नव्हती जाली । मा वाणी कोठली विस्तारेल ।। म्हणे मुक्ताबाई सकळ तुम्हा ठावे । आवडीने बोलावे बोबाड्याते ।।

१४२

पुत्राने पीत्याते काय मती द्यावी । मा स्फुर्ती चालावी बाळकाची ।। कन्येने मातेते काय सांगावा संसार । हा उफराटा विचार दिसत आहे ।। आवज्ञा करुनी बोलतो वचन । ते गोड करोनि आपण स्विकारावे ।। आम्हा काय कळे कैसे हे पुसता । नेणु तुमच्या अर्था पुरे न पुरे ।। नेणु पुसीलयाचा होईल न होईल प्रष्ण । हासतील सज्जन विवेकाचे ।। म्हणे मुक्ताबाई गुरु बंधुभावा । नेणो तुम्ही देवा निंद्य

करिता ।।

१४३

सागरी रिघो मनाचिया तर्कें । आसावे सख्य अवसानासी ।। वाचेने वाचाळ बोलु नये उदंड । कुतर्काचे पाखांड कराल तुम्हीं ।। आपुली हे ब्रीदे वाया न जावी । ऐसी मज द्यावीं स्फुर्ती देवा ।। ऐक त्यागात्याची पाहा त्याची नांव । केवळ उपाय जडा मुढा ।। कोठे गुंता नाही यावे जावे नीट । धीट आणि पाठ प्रसाद द्यावा ।। म्हणें मुक्ताबाई वदवावी वाणी । श्रोता संजीवनी अमृताची ।।

१४४

गुरु मंकळमुर्ती द्यावा दर्शणलाभ । माझा ज्ञानबोध पुढे न्यावा ।। न दीसावी कथा न वाटावे अधीर । अरुपाचे सार वोतुनी काढा ।। न दीसावा ग्रंथ न दीसावें चरीत्र । जैसे पात्रा श्रेष्ठ पात्र भोगावती ।। न होतीले अभंग न होती हें पदे । अभेदाचा भेद रुप करा ।। म्हणे मुक्ताबाई समाधि हे गोजिरी । श्रोत्या करा उजरी उपायाची ।।

१४५

वेदासी हे पुरेना श्रुतीसही ठरेना । ते अवीट गुरुगम्यां मौन्य जाले ।। तेथे आम्हा अज्ञानाची काय चाले स्फुर्ती । स्वामी ज्ञानमूर्ती चित्त द्यावे ।। नववीधा भक्तीचा पूर्ण बोध आला । तो तुम्ही आपुला सांठवावा ।। पुजा प्रदक्षणा करीतो नमस्कार । वाणी करा पार दयानीधी ।। चंचळ वंचळ न करावे मन । ब्रह्मी अनुसंधान पुरे लावा ।। पुजीला गुरु श्रोत्यासी नमन । संताचे चरण वंदीयलें ।। म्हणे मुक्ताबाई जाणली न जाणती । असो सर्वभूतीं नमन माझे ।।

१४६

नव्हे हा शब्द नव्हे हे वाणी । हे जाणा सकळ धनी कलपतरुची ।। नव्हे हा बोल बोलाचा व्यापार । बोले सर्वेश्वर विस्तारिल्या ।। जेव्हा शब्द होते काय करावे कोण्ही । वासना ज्याची त्यानी उठवीली ।। पुर्वी तुम्ही पुसीले कोण बोलनारी । ते त्यांचेचि शरीरी उद्भवली ।। मागे प्रष्ण केला सिद्ध कोण कोण । तेही त्यातुनीच वाढीनले ।। म्हणे मुक्ताबाई कोण कोणाचा गुरु । त्याचाही प्रकारु येणे रुपे ।।

१४७

आता सींधुचें मंथन करु तुमच्या वचने । आपण जन्म मरण विचारीले ।। चुकती येणी जाणी हाही प्रश्न केला तुम्ही । योग्याची जननी विचारीले ।। अरुपाचे

शेजारी होतो येक दीशे । हाही आपणास संदेह जाला ।। काम कीं माया कोण कोणा आधी । जीव शिव कधी वाढीनलें ।। म्हणे मुक्ताबाई तुम्हासी चोरावे । मग कोणा द्यावे तुम्हा मागे ।।

१४८

मरते ते काय जन्मा येते कोण । हाही पुन्हा प्रष्ण केला होता ।। गती कोणत्याला मुक्तीं कैसी जाली । हे स्वमुखे बोली बोलीयलें ।। बैसला विमानी गेला नर्कलोकी । हे आशंका चित्ती जाली होती ।। येक्या जीवाची येक्याही गती आगती । उत्पन्न मागुती विचारीली ।। म्हणे मुक्ताबाई येणे जाणे काये । हे ही देवराये उच्चारिलें ।।

१४९

चोरीचे धन जन्माची जोड । तुम्हांसाठी पोटफाड करणे आली ।। आपले सख्य उघडे आपणचीं झांकावे । येरां न दाखवावे दांभीकाला ।। शाखा वृक्षाचे उन्मळी उन्मळीते मुळ । हेचि अमृतवेळ जाण बापा ।। अमृतसिद्धी योग स्वामी हा जोगींद्र । आज पहिला चंद्र उदये जाला ।। म्हणें मुक्ताबाई हात जो शरीरी । तो आंगसंग्यासी चोरी काय जाणे ।।

१५०

शिष्याचे स्वहीत चोरुं नये गुरुने । हा आधी प्रष्ण तुम्ही केला ।। कोण्हासी चोरावे कोण्हासी द्यावे । आपण जावे आल्यावाटें ।। मार्ग सांगायाचा गुरु अधीकारी । ज्याचे जे शरीरी लेववीतो ।। गुरु न करी पराचे न म्हणे आपुले । अविनाश संचले तेची दावी ।। म्हणे मुक्ताबाई रोगी धरिना तोंड । मग सत्याचे पाखांड सहजची होये ।।

१५१

स्वये विचारिली पातके सुतके मित्र पाट पिंडदाने । स्वये हीत येणें जाणवीले ।। नाना प्रकारिके भय केले त्याला । ठरला किंवा गेला बोलती जगी ।। लेकाच्या पोटी म्हणती बाप आला । हा येक संदेह तुम्हाला जाला होता ।। शोधीता श्रमाचे होईल मोठे आले । सामर्थे मृगजळे शोधू नये ।। लटक्याचें खरे होईना कदा काळे । जे अवतीले काळे ते काय वाचु ।। म्हणे मुक्ताबाई नव्हे हे

सुखाचे । शरिर हे दुःखाचे वोतिले आहे ।।

**१५२**

शरीर भावना निवेदीते तुम्हा । अरुप पुरुशाला भ्रमना यणे जाली ।। येकाकारी नवता पापाचा लेश । लटिका हा क्लेश वाढीनला ।। निराकारीं बुद्धी म्हणता कोणे दील्ही । भ्रमे चेष्टवीली पंचभूते ।। म्हणे मुक्ताबाई उत्पत्तीचे मुळ । पाण्यात गोंडाळ विस्तारीलीं ।।

**१५३**

त्याच्या शाखा मुळ्या आसती अधीर । त्याने पाणी सकळ झाकीनले ।। औट कोट चक्रे होती परात्पर । ऐसा हंस वर विस्तारीला ।। तया हंसाचा गळाला येक पंख । तेणे हे त्रैलोक्य त्रिखंड केले ।। तया पंखाचे उपमेरहीत रोमावळ । तेणे अनंत ब्रह्मांडे समुळ वेष्टियेली ।। म्हणे मुक्ताबाई ऐसी हे गौसनी । तेची जाण उत्पत्ती परपुरुषाची ।।

**१५४**

घेउनी विकाराचे हाती भवर जाळे । तेणे माया पडळे उद्भवली ।। येकाया हाताचा मारीयला फाग । तेणे जिवन जागजाग अटकवीले ।। ते हे स्वरुपाचे समाधीस्त जाले । अक्षई काळोकाळ अवलोकावे ।। साधुसज्जनाला नवता जेव्हां ठाव । त्यासाठी उपाव आथिला असे ।। मागे सिद्धसाधु पुसीला जो प्रष्ण । त्याचे संभाषण करुं आतां ।। म्हणे मुक्ताबाई स्तुती हे करावी । कोठवर अवरावी मायाजाळे ।।

**१५५**

चिकट बोरांटीने त्रिभुवन कोंदाटे । तेणे पोटी उठे कामक्रोध।। तयाची हे नामे शुंभ निशुंभ दोन्ही । वाद जगी त्याणी वाढवीला।। शुंभ तो शिव निशुंभ तो जीव। द्वैत येणे नावे स्छापीयले ।। तयाचिया पोटी जाला अहंभाव । ते खंडाया देव उद्भवला ।। म्हणे मुक्ताबाई निर्गुणाचा गुण । अनाम भगवान नामा आला ।।

**१५६**

अर्धमात्रुकेण कोण्ही द्रिष्ट केली । वासना आरंभीली माया तेणे ।। सर्पाकार बीज व्योमाकार दर्पण । त्यात मनाचा मन उठावला ।। करी घेता मन जळी वाट

जाली । ते प्रतिबिंब साउली आदीमाया ।। मनाचे हे मन जाला येकांत । तेथे जगजोत आरंभिली ।। म्हणे मुक्ताबाई कोण चेष्टवी त्याला । हा मने उठीणला आपुलीया ।।

**१५७**

पाण्यामाजी पाणी पावक अढळला देख । ते विराट स्वरुप विस्तारीले ।। प्रथम ते स्वरुप चिन्मय संचले । त्यातळी वोतीले चक्राकारु ।। सुक्षमते चक्रे राईचे प्रामान । येणेरुपे जाण स्वरुप हेची ।। तयाचिया पोटी कंचनाचे मणी । मुक्ताफळावानी ढाळ देती ।। तयाच्या तळवटी स्छूळ चक्राकार । त्यातळी आकार अथीलासे ।। म्हणे मुक्ताबाई दृश्य अदृश्य जाण । मिथ्या आणि प्रमाण हेची असे ।।

**१५८**

नेमीला जो सिद्धांत आता विस्तारावा । जीवा आणि शीवा उत्पत्ती येणे ।। काम आणि क्रोध माया उत्पत्तीच्या योगे । आता सोडा लोभ परस्परे ।। येका रुपे यावे पुरुष माया सवे । मुळी दादा नावे विस्तारीली ।। सत्य जळातुनी मृगजळ उठी । वायो पाण्यापोटी जन्मवीला ।। म्हणे मुक्ताबाई रुपारुप जाले । तेची नामे ठेले सृष्टिकर्ते ।।

**१५९**

सवंत्याचे घरी विस्तारीली गोडाळ । तिचें प्रतीबींब जळें धरीयेंले ।। जळामाजी झ्याक झुकविली जेणें । डळमळिता जिवन उठावले ।। तेणे हे तोयेचि धरीयले शरीर । पाणीयाचा आकार स्छापीयेला ।। तेणे येकायेकी वरी दृष्ट केलीं । कैसी उठीनली वासना हे ।। होउनी भ्रमिष्ट मारीयली हाक । तेणे तीन्ही लोक जागे केले ।। म्हणे मुक्ताबाई हा वाढीनला पसारा । मध्ये माईक वेव्हारा स्छापीयले ।।

**१६०**

तियेचिया नादें जग नादावला । प्रतिउत्तर तिला कोणे द्यावे ।। कोठेही कोणाची दुजी नाही कीर्ती । मी येकायेकी आले कैसी ।। कोठे माझी जनिता कोठे माझा ताता । मारीतसे हाका हुताषणी ।। होउनियां तरुतळी दील्ही अरोळी । तेणे उमळीली मुळी आदीपुरुषाची ।। जगाचा जनीता करी अवलोकण । अकस्मात तेणे हाक दील्ही ।। म्हणे मुक्ताबाई साक्षा दावीयेली येणे । निराकार वटाचे पान गाळीयले ।।

१६१

येके हाके सारिसे आले गळितपत्र । वृक्ष ऐसा वर आहे कोठे ।। पान हे केवढें वृक्ष हा केव्हढा । तयावरी बुडबुडा पाणीयाचा ।। हसाचे हे औंबु पादित्याची वाणी । चकचकिली चांदणी उपमेरहीत । बिंदु हा कोठीला कोठीली हे हाक । म्हणें मुक्ताबाई ॐकार उठीणाला । ..या मकार केला मायारुपे ।।

१६२

बोलला तो कोण दिसों नेंदी मला । मुख्य भाशीणला दोन्हीं शब्दी ।। शब्द तो स्तब्ध वाढीला फुगारा । निगम हा नगारा वाजीनला ।। माझ्या ब्रह्मांडांत तैसाची शब्द उठे । तेचि औटपीठ दुमदुमिले ।। तिचा शब्द नवता होईना उटाळा । मकार सत्रावेळा बोभावले ।। तेणे सिंक माझ्या उठीलीं कपाळा । ते जिविका कळा सत्रावीची ।। म्हणे मुक्ताबाई जाणवीचा प्रकार । येणे रुपे आकार ठरावला।।

१६३

धावेना हे मुळ कळेना हा वृक्ष । मग दीक्षादीक्ष कोठे द्यावी ।। कळेना हे काये कळेना हे कोण । अवडींचे कारण तो फार जाले ।। बोलावे खेळावे माझेसंगे येणे । मग मायेने नारायण नाम ठेविले ।। नातळे मायेसी नातळे भ्रमा । त्यासी काय उपमा नांव आले ।। नाही हातपाये नाही हे शरीर । उगाचि पत्रावर सांचीला आसे ।। आतां काय करुं यासी होईना येकांत । मग दुजा जगन्नाथ स्छापीयेला ।। म्हणे मुक्ताबाई हा नव्हे अवतार । द्वैताचा चोर जाण बापा ।।

१६४

द्वैताद्वैत केले हे निर्माण । प्रतीमेंवाचुन भाष्य कैसा ।। गळितपत्र काया पोट केले माया । मग मस्तक उपाया आणीयेले ।। ऐसा हा स्छापीला अनाम सर्वेश्वर । मग पुढे आकार आरंभीला ।। कपाट हे कपाळ नेणु याचा पार । त्यांत बुद्धीचा विकार उठीनला।। बुद्धीसी बुद्धीचे नाही देहभान। मग श्रोतत्वे कान सख्य केले ।। म्हणे मुक्ताबाई काय देखती कान । मग जोतीस्वरुप येणे चक्षु केले ।।

१६५

हातापायावीण दीसतोहे लोद । मग ब्रह्मी ब्रह्म बोध होय कैसा ।। मस्तकी हस्तक पाहीजे ठेवाया । तेही या उपाया उठीनलें ।। सिद्ध आणि साधक केले दोन्ही

हात । हे अनादि संत विस्तारीले ।। मस्तक तो शिष्य हस्तक तो गुरु । या दोहींचा विचारु अनारीसा ।। आता अवीट होया आप आपणात पाहया । पायाविण पाया सापडे कैसा ।। शुद्धाशुद्ध केल्या दोन्ही जांघा । न्याही त्या आंगा वाढीनल्या ।। पोट हे पोटरिया केल्या उद्‌देणासाठी । मायेची हे घरटी तेथे ठेली ।। म्हणे मुक्ताबाई पलारण पाडली । अंगुष्टमात्रे ठेली सकळ तीर्थे ।।

१६६

नव्हे ती अंगुष्ट अमृतसंजीवनी । तो हा मोजनी डोळीयाच्या ।। ते ही बीज आहे तनुचि उत्पन्नी । आदि पुरुषाने वदनी घातिला असे ।। तो हा डोळीयाचे पाहावा मोजनी । अंगुष्ट मात्र चिन्ही वोळखावा ।। अंगुष्टावरी होता निरा निराकार । वटपत्रावर ठेवीयेला ।। तयाचे हे नाम वड्या जगन्नाथ । तो हा जळा आत आरंभीला ।। तेणे हे जळात स्वये केली उत्पत्ती । वासनेण उठी कामक्रोध ।। त्याची हे नाम शुंभ निशुंभ दैत्य । आले जीवदशे तरंगरुपे ।। तरंगावरी तरंग वड्या जगन्नाथ । हा तीना सिद्धांत ठरावीला ।। म्हणे मुक्ताबाई हे सृष्टीची उत्पत्ती । ते दोघे वेवादती मिथ्या वादे ।।

१६७

गुरुदेव देवा आवडीचे भाषण । आपण अणीक येक प्रष्ण केला होता ।। मरते ते काये जन्मा येते कोण । हे लटकी नागवन माईकाला ।। आता याचा प्रष्ण करू येचि अर्थी । चुकलिया मती द्यावी तुम्ही ।। माया नारायण वड्या जगन्नाथ । शुंभ निशुंभ दैत्य भासवीले ।। हेची पांची तत्त्वे हेचि पंचभुतें । तेचि आदिनाथे उठावीली ।। म्हणे मुक्ताबाई जन्ममरणाकारण । श्रोती द्यावे कान येची अर्थी ।।

१६८

शुंभनिशुंभ दोन्ही हेचि जन्ममरण । अधीर हे दोन आधार केले ।। येणे वादेरुपे केली ही बत्तीसी । ते आखंड त्यासी वाद सांगे ।। जिव्हा हें जिविका केली ती आरोळी । तिणे थोर कळी मातवीली ।। शुभाशुभ आहे तिचेची बोलणी । मानअपमान दोन ईचेंचि मुखी ।। साधन वैराग्य ईची हीं वार्ता । दृष्ट अरिष्टा ईनेचि केले ।। म्हणे मुक्ताबाई वाचाळ हे धन । तर्कातर्कईने आरंभीले ।।

१६९

गुरु आदिमूर्ती सिद्धाय नायेका । येणे तुझ्या अथी प्रष्ण होये ।। नानाप्रकारे रचीले

हे शरीर । लटीक्याचे खरे काय होय ।। शुंभनिशुंभ नावे धरीयली यानी । हेचि जाण जनी मायाममता ।। मायेंचा पाश ममता ही विशेष । ईनें विषयाचा क्लेश वाढवीला ।। विषयानें विशेष द्वैत प्रारंभिलें । येणे मदे जालें रेत बीज ।। म्हणे मुक्ताबाई हें नासिवंत पुसणें । स्वामीसी कारणें काय झालें ।।

१७०

आणि ममता पाश आणि भ्रमना काया आणि कल्पना । शडवैरी जाणा अहंकाराचे ।। तुर्या आणि अवस्छा ह्या अष्टपांकुळिका । ह्या नासिवंताच्या आर्था उठीणल्या ।। तुर्या आणि अवस्छा हें भक्ती । हे गतीचिये गती परममुक्त ।। जिवन्मुक्त कारण कारण माहा कारण ।। ह्या च्याऱ्ही मुद्रा जाण आलक्षाच्या ।। म्हणे मुक्ताबाई पाह्याची लक्षणे । हे साधु कारणे उपाये केले ।।

१७१

नवल हे आवमाने हेचि नवद्वारे । विदारिले शरीर येणे रुपे ।। मग वायो सर्वभुती पुरुष जगज्जोती । ह्या नवनाडी हाती सत्रावीच्या ।। म्हणुनी तीचे नाव आकळीत कळा । ती आटोपिता पुतळा नाशा पावे ।। सोडीला पतंग दोर पराहाती । तो आटोपिता मागुती धाव घेई ।। न पुरेचि वरी ठिकाणापावेतो । ती माघे येतो योनीसाठी ।। म्हणे मुक्ताबाई पराचें आधीन । म्हणुनी येणे जाणे लागले असे ।।

१७२

आटीले वेठीले रोमांच शरीर । हे त्याचिया आधारे चालत आहे ।। त्रिपुठीचे आग्र मनु गुप्त ठेला । ते गुरुपुत्रा तुला साक्षा दाऊ ।। नासीक सरळे औठपीठाची राऊळे । तेथे या दयाळे वस्ती केली ।। आस्ती नारायण रज्जु हेची माया । हे आशुद्ध उपाया मुसमुर्ती ।। म्हणे मुक्ताबाई अंतरबाहेर सेवट । छाती आणि पोठ वोतीले असे ।।

१७३

एक नळकंठ धुळीचे शरीर । काळजीने अंतर व्यापिले असे ।। नेणु जाउ राहु नित्य ध्यास करी । नाभी नाभी घरी येणे सुते ।। कांचे चुळमुळी वळील्या चुंभळी। वाचेची टकळी ध्यासे धरिली ।। आखंड धडाडी नभीचिया ध्यासें । कधी सुटे पाश अधीराचा ।। मागलिया सुखे धुकधुका करी । आटोपेना दोरी जन्मांतराची ।। म्हणे मुक्ताबाई आधी केले राज्य । आता वाटें लाज दरीद्राची ।।

१७४

वरी खाले पाहे जेथे तेथे आढळे । नासीवंता नातळे गुरुपुत्रा ।। जातो जातो म्हणे पाहे त्याजकडे । वेंचीतसे खडे त्याच्या दु:खे ।। नाना प्रकारीची केली रंजवन । तरितो त्याचे गाणे विसरेना ।। ईछीले तो देतो पडाया वीसर । हाची निरंतर तेची वाहे ।। त्याजवीण याचे न फिटेची पारणें । काय रंजवन जाय जनी ।। म्हणे मुक्ताबाई लांचावले मनी । अचेतन धन कस्यासाठी ।।

१७५

त्याच्या रागे रोगे जीव जीवा खाये । तरी याचि खाये धडाडीति ।। जठराग्नीमध्ये पळपळ पावक उठें । न चलेंची बोभाट मायेंपासी ।। जोंवरी हे छाया तळवटी दीसे । तंवरी कैचे अभास भासा येते ।। चेष्टीला मायेने उत्पत्तीच्या पाशे । आशेची निरास येणे केंली ।। घालुनिया डोळा करी नाना रंग । मायेचिया संगे चेष्टे उठी ।। आपण चमके चमके तिच्या भया । भुती भुत काया दचकवीली ।। म्हणे मुक्ताबाई आपणची पींगळा । घाला घातवेळा याचे हाती ।।

१७६

जाईना शरीर आज्ञेवीण खरे । जंवरी हे विहरे सत्ताबळे ।। सत्याचे असत्य त्याचे त्याने केले । भ्रमे आपुले म्हणु नये ।। आज्ञेचा व्यापार आज्ञेनेचि वागे । आपण त्याचा लोभ धरुं नये ।। जरी लोभ करुं सत्ता आपली काये । नाथीले ते वाहें आपुल्या बळे ।। प्रकृती पुरुषा न माया लोभ केला । आंगे उठीनला आपुलीया ।। उन्हाळींची अभ्रे कीती येती जाती । कोण त्यांची खंती करुं पाहे ।। तैसे या जीवाचे अधीत येणे जाणे । तो कां याच्या भ्रमे मरुं पाहतो ।। म्हणे मुक्ताबाई आले तैसे गेले । नाही ते राहीले खंतीमाजी ।।

१७७

रचोनिया घट कारण ते उत्पत्ती । जैसी उदकी माती विरुनी जाये ।। पाण्याचा बुडबुडा पाण्यामाजि भंग । तव कैचे तरंग जमु पाहाती ।। ऐसी माया तनुबीजाची वोतीली । लटक्याची भासलीं स्वप्नवत ।। विषयाची भोक्ति आदिपुरुषाची शक्ति । वासने न उठी जळामाजी ।। जळमय पाण्यात शुंभ निशुंभ दोघे । होते स्नेहलोभे एकरुप ।। म्हणे मुक्ताबाई दोघांचे हे सख्य । सांगते मी तुते चित्त द्यावे ।।

### १७८

होते स्नेहरुपे मायवीण लोभे । तेथे कैचा खेद द्वैताचा ।। दोघाजनी राहावे मनाच्या येकाते । येकाचिये मृत्यें एक मरे ।। जरी तुटपडे होती कासावीसी । येकावाचुनी येकासि गमु नेदी ।। जीवा जीव प्रपंचावीण । द्वैताचे भान नवते जगी ।। सुखाचे वैराग्य दोघे विरक्त जनी । निशी आणि पाणी भंगले नवते ।। होत्या येकाकार उपाद नवती । दोघे येक दु:खी स्नेहार्थे ।। स्नेहाळु कृवाळु होते ज्ञानी अचळ । येकायेक पळ गमु नेंदी ।। म्हणे मुक्ताबाई दोघेही अवीट । अहंतेची वाट पडली नवती ।।

### १७९

जे येकी करावे ते येक करी । दोघा उपमा दुसरी जगी नवती ।। ऐसी च्यार युगें आचळ आढळ । येकरुपे विशाळ वाढीनले ।। येकांती होते मनाच्या येकातें । मायेने द्वैत आरंभीले ।। येक येकाचे शरीरी होते क्रीडत । दिवस आणि रात उपमा नवती ।। लावण्यस्वरुपी माया जगज्जोती । ते कनिष्ठाचे हाती सापडली ।। सहजामध्ये तुटे दोही स्नेहलोभ । माझे आणि तुझे वाढीनले ।। जन्मली ते काळी उपाधीचे सार । द्वैताचा पार न कळे तेथे ।। म्हणे मुक्ताबाई जाले स्नेहचोर । पाडीले अंतर येकांतासी ।।

### १८०

वेव्हारे मातले विषयाच्या लोभे । उपमेरहीत माझे तुझे वाढीनले ।। येकयेकावर येउनी पडती । तेथे जाण उत्पत्ती मेदनीची ।। स्नेह टाकुनियां होती उछंगळ । ते पाहो खळबळे जळाबंब ।। येकयेकावर मस्तकाचा मार । पुरुष हे अगोचर वेवादती ।। निठावले नीठ भेदीले गगन । जगन्नाथाचे पान डोंलविले ।। बाळत्वे क्रीडे स्वामी हा आनाम । त्याचे त्रासे चरण झिडकावींला ।। भंगले मस्तक दोहीचे जुनाट । माया मध टेक वाढीनले ।। म्हणे मुक्ताबाई दोही उस्वासाने । रवी नारायणे उडवीला ।।

### १८१

वरील्या आधारे धरीला आचळ । क्रोधे तो प्रज्वळे तप्त जाला ।। माझी समाधिस्त भंगवीली कोण्ही । अवलोकन जनी तेणे केले ।। माझे प्रेम नेले घेईन त्याचा प्राण । शास्त्राची कीर्णे वर्शावली ।। चेतल्या पुरुषाते कोण करी शांत ।

मायेने जगन्नाथ शृता केला ।। मारीयली हाक सोळावर सत्रावी । तो अनाम गोसावी खुणावीला ।। म्हणे मुक्ताबाई तेणे सम्य केला । ते ऐक्य दोघांला येक होते ।।

**१८२**

वरी नारायण अचळ हा अधीर । अगोचरीचे दोरे लोंबवीला ।। तळीं जगन्नाथ प्रकाशानें वागे । मायेने विभाग वाटीनले ।। धुपती भुचरीं परती अगोचरी । स्वरुप ते खेचरी चांचरी रुपे ।। शांति ही मुद्रा वरुता पुरुष नारायण । त्यालाही देखणे तोचि जाले ।। म्हणुनि गुरुपुत्रा पाहावा नारायण । आपणासीही जाणें तेची वाटे ।। म्हणे मुक्ताबाई अगम्य हे कारण । सज्जना पारण समाध केली ।।

**१८३**

प्रथम हा पाया निजगुज दावाया । मार्ग हेरया अनेक केले ।। प्रथम हा शिष्य गुरु अंबरुशी । देखणे येकदीशी व्रतनीष्ठ ।। तेणे सिद्धसिद्धांत हरीहरा केला । विद्येने स्छापीला ब्रह्मरुप ।। पुढे हे उत्पत्ती मायेचीये कानी । बीज बीजाची उत्पन्नी सांगीतीली ।। मायेने आज्ञा माणिली प्रमाण । वंदीले चरण सद्‌गुरुचे ।। म्हणे मुक्ताबाई घालीती प्रदक्षणा । नासीवंत कारण सिद्‌ध जालीं ।।

**१८४**

हा यो योग करीता लागला उसीर । मदाते विकार उठावला ।। सीजुनीया पाक पावला नाशातें । त्यात जीवजंत फार जालें ।। अधमाची उत्पत्ती मदाचीया योगे । स्त्रीयेचे लोभे काममुर्ती ।। जीव जीवा न वोळखती जाली मंदमती । तेव्हा स्वरुपाची वोळखी कैची त्याला ।। वोळखीनात साधु नेणती व्रत नेम । अधमाचे अधम विकारीले ।। येउनीया येथे होती सावधान । सुखाचे हे गमन केले होते ।। व्योमाकार पावतो पावले नेति नेति । त्या व्योमाने मागुती ढकलीले ।। अंतरले सुख पडली म्हणती चुकी । आली नर्कलोकी पाय पोटी ।। म्हणे मुक्ताबाई हेचि येणे जाणे । जवरी विस्ताराने नाही नेले ।।

**१८५**

छायेची हे माया आसुंचे ही बीज । वाढवीले तेज स्वरुपाचे ।। स्वरुपी स्वरुप आहे येकाकार । माया भ्रमद्वारे वेष्टिलासे ।। न वोळखीती माया न वोळखीती नीती । अधमपणे रमती विषयचोर ।। म्हणे मुक्ताबाई अमंगळ फळ । नाशाचे हे मुळ

विस्तारीले ।।

१८६

नाही त्याला धर्म वैराग्याची स्छीतीं । मग क्रियाकर्मे वाढवीली ।। आधी पित्रपाट करीति पिंडदानें । वरी गेलियाचा धर्म विस्तारीला ।। न जाय वरी आश्रमा पावती । नाही त्यांना गती यावीण ।। मस्तकाची उत्पत्ती विषादाचे घर । राहीले जे जहर इंद्रियाचे ।। त्याच्या मदे वेवादती निर्जीव कळिवरे । मायेचि ही चित्रे विचित्रा आंगी ।। ते तारावया आनामाचे नाम । आंगी सहज प्रेम उठीनले ।। सदा व्रत नेम असे अंबरुशी । साधन द्वादसी पर्व आलें ।। दुरी दुरावला स्वरुपाचिया प्रेमे । ते नारायण गुजावीले ।। आतांचि खंडीतो येणे जाणे शक्ती । कार्य याच्या हाती घेने आहे ।। म्हणे मुक्ताबाई उठावला फांश । नारायण दुर्वास होउनी आला ।।

१८७

स्वरुपी गळित पत्र तुळसीपत्र जाण । सोडीलें पारण जन्मधाके ।। जेववि आलक्ष साधीयले व्रत । तो हा तर्वास अंतरसाक्ष अंतर जाणे ।। स्वरुप स्वमेळा उठीला अतीत्य । आम्हांवीण व्रत सोडिले कैसे ।। आम्ही आदमध्ये त्वां अगम्ये जावे । कोणाचिया नावे पार होसी ।। आमुची ही उत्पत्ती उपाया कारणे । आम्हाविण पारणे सुटे कैसे ।। धरावे कोण्ही सोडावे कोण्ही । निजला रुषी आज्ञा त्याची ।। चोरुनी द्वैत आरंभिले । पाहायासाठी दाहा जन्म धरी ।। म्हणे मुक्ताबाई गुरु देवराया । तपेची वीलया रुषी गेले ।।

१८८

होउनी कासाविस काय अन्याय केला । मां नर्क मज आला जन्मकाळ ।। काय सत्तेवीण आवज्ञा केली । आम्हा कोपीयेली गुरुमुर्ती ।। नाही अन्नपाणी भक्षीला पवन । मां तेणे पारणे वरीष्ट जाले ।। जेंथुनीयां आलो ते पारखे आम्हासी । ऐसे तुम्ही अभिळासी परद्रव्याचे ।। पराच्या धनाचा श्रापे घेता भाग । ऐंसा माया लोभ वाढीनला ।। मायेच्या येकांते झाकवीसी समाधी । दुर्वास दुर्बुद्धी कर्कु आला ।। लटिके मायेचा दावीसी लोभ अर्थ । या दोषे शापला हे तुला ।। कळवळीतां अंतरी आदिनारायण । तुजसाठी जन्म आपण वाहुं ।। म्हणे मुक्ताबाई माया

मदमासी । हे व्यापी ती त्यासी जन्म होतो ।।

१८९

अर्था अर्थ करून सामोखीले भगवाने । अंबरुषीचे आसन अमर केले ।। बरे सांतोडीले मायेचिया पाशा । आम्ही शोधु दीशा भ्रमनेच्या ।। पाहुनीया तप जाला सद्‌गदीत ।। बरा तुझा आर्थ पूर्ण जाला ।। कुर्मदृष्टी केले साधु अवलोकण । तोची जळी जाण अवतार जाला ।। वरुनि दृष्टि केली बीज तळवटी । जे आदउत्पत्ती वटवृक्षाची ।। कैस्या माझ्या शाखा विस्तारिल्या वरी । स्वरुपाची सारी अवलोकीली ।। आगम्यासी गम्य तुझ्या आधाराने । वाळीली जे आपण तुम्ही सेवा ।। जळामध्ये आम्ही तळी असा तुम्ही । पाळीली जे चरणी अवीट करा ।। म्हणे मुक्ताबाई निवृत्तिदेवा आंडी । हे हांडातिले हांडी विरुनी ठेली ।।

१९०

प्रथम जे आंडे प्रतिबिंब माझे । माया आंडे दुजे उत्पत्तीचे ।। तिजें आंडे समुळ माझा ब्रह्मगोळ । पूर्ण मायाजाळ बीज माझे ।। वड्या जगन्नाथ शुंभनिशुंभ दोन्ही । जिवशीव उत्पन्नी बीज माझे ।। अंबरुषी दुर्वास आदिनारायण । हे दिव्य आसन जाण बीज माझे ।। गाळीली जे आंडी तुझीये तळवटी । धुप समुद्राचे वाळवंटी पाळन करी ।। म्हणुनी कर्मदृष्टी करावया कारणे । आपत्य स्वधर्मे सांडु नका ।। म्हणे मुक्ताबाई पतीत पावन । आदगुरुने जाण दया केली ।।

१९१

वेष्टीली जे माया तेचि विष्णुरुप । अनाथाचा नाथ उदय जाला ।। तया वृक्षाची केली ही प्रार्थना । अणुमानीले जाणा ब्रह्मांड तेणे ।। वटाचें सेजारी ठेंवीला तो कुर्म । सृष्टी स्वधर्म वाढवीला ।। अचळ हा समुद्र वरी उचंबळे । म्हणुनि हा ढिसाळ स्थापीयला ।। जुनाट कुमंडल उगविला तेणे । पाये पुरातन दिसो आले ।। नव्हे हे नव्हे दाही आवतार । जुनाट हा वेव्हार नाथिला असे ।। सागरी पर्वत बुडती भरती वेळे । सरलीयास मुळ उघडे होती ।। म्हणे मुक्ताबाई जुनाट नांदणे । हे आदिनारायणें करुनी ठेले ।।

*

ज्ञानबोध ग्रंथात ‘सममेळ बोलणे उभयतांचे’ हा भाग आला आहे. आणि तोच भाग मुमुक्षू मार्च १९२७ च्या अंकामध्ये श्रीनिवृत्ति-मुक्ताई संवाद या

शीर्षकाखाली आला आहे. तो सर्व भाग जसाच्या तसा येथे देत आहे. (मुक्ताबाईच्या अभंगांनाच फक्त येथे क्रमांक दिले आहेत.)

१९२

पूजा प्रदक्षणा जाली पंचभूतीं । गुरु दयाळमूर्तीं दया करा ।। घरींचे भोजन होवो भलते रीती । भरले उपवासाची खंती नाही जया ।। लेकरा जे केले वडिलिया पोसिले । आले न आले चवी दादा ।। संतसज्जना केली स्वादनी हे रसनी । ते वाढीली रसनी निवृत्तीची ।। हे समाधा येक हे बोलणे अनेक । सांगतील समर्थ बाळकातें ।। आम्हासी तुम्ही केले परिवार । तारक विचार आपणापासी ।। म्हणे मुक्ताबाई परिवार कळेना । जेणे माझिया मना धीर होय ।।

*

रंगा रंग भासे तरंगाचे मीसें । अदृश्याची कणसें दृष्य जाली ।। नव्हता आंगासंगे संग जाला तेथे । पाणीयाचा आप निवडिला ।। आपाचिये पोटी जन्मला आपण। नीराचे निर्गुण स्थापीयेले ।। बीजाचा ॐकार बीजाची हे माया । तर कां जाति लया सांग मज ।। पाण्याचे हे अभ्र निर्गुणाची छाया । तर कां जाती लया सांग मज ।। निवृत्तिदेव म्हणे आभ्यासाच्या ठाया । तर कां जाति वायां बोलणी हे ।।

१९३

अणुभउनी सार ज्याचें त्यानीं पाहावें । जुनियाला नवें म्हणुं नये ।। आरंग उगवे तरंग मावळे । राहिलो निवळ निजरूप ।। दिसे ते नासेल आभाशाचा भास । निर्गुण हंस निर्गुणाचा ।। आप आपणांत ओळखील जेव्हा । खुण राहील तेव्हा देखण्याची ।। तेव्हा पुरुष छाया सत्य कैसी होती । ज्याची त्याने शक्ति आटोपिलीयां ।। म्हणे मुक्ताबाई अणुभव असेल चित्ता । विनोदे पुसतां आवडीने ।।

*

धन्य त्याची माया धन्य हे त्रीगुण । धन्य ते पावन नाम जालें ।। नामेचि पाल्हाळ नामेचि ढिसाळ । नामे कळवळे माया त्याची ।। नामेंचि प्रकृति नामे आली ध्याना । नाम हेंचि आम्हा जीवन्मुक्त ।। नाम आम्हां सार नामेचि भजन । नामे हे महाण विस्तारिले ।। निवृत्तिदेव म्हणे नामेची कळवळा । नाम हा जिव्हाळा अमृताचा ।।

१९४

मन माया नव्हति तै कैची प्रकृति । नाम सार चित्तीं अणुभविलें ।। निर्विकार गुज अणुभविलें आधी । नाम तेव्हां कधी ठेविले होतें ।। नामचि हे चर्या सांचल्याला मुळ । नाही तऱ्ही ब्रह्मांडगोळ नाम कैचें ।। आत्माराम नाम बोलत्यात मुनी । वोळखिल्या झणी नाम कैचें ।। म्हणे मुक्ताबाई हातोटीच्या नेटा । वारीयाला चेष्टा लाऊ नये ।।

*

मज येक गूढ माया मोठी भली । येकाचि हे केलीं पंचभूते ।। तिही या गुणानें नटली विलासे । तिच्यानें प्रकाश देखण्याचा ।। तिच्यानें साधनें वाढीलीं स्वहीत । तिच्यानें आवारी रीघ जाला ।। तिचियानें सूर्य तिचियानें आकार । तिचियानें सर्वेश्वर वोळखिला ।। तिचियानें समाधि समाधान जालें । सज्जनानीं केलें माया गूढ ।। निवृत्तिदेव म्हणे माया हे संचली । ते नव्हे कां आपुली वस्तुरूप ।।

१९५

जेव्हां पांची गुण येका पुरुषाठाइ । माया तेंव्हा कांही भाशली होती ।। येका सत्वगुणें आपुलेसें केलें । मायेसि तेथीले काय ठावें ।। चर्मचक्षूचें हे सांगतां देखणें । मायाबीज कोणे विस्तारिलें ।। माया छाया दोन्ही जायाचे भांगार । त्यांत का सर्वेश्वर विरू पाहतो ।। नेणुं तुमच्या आर्था अणुभविलें भले । अमृतासि केलें कडू दादा ।। म्हणे मुक्ताबाई प्रकृति साधन । जायाचें नीधान पडेल तेथें ।।

*

सत्ता सूत्रधारी बैसला निश्चळ । मायेचा कां खेळ वाखाणितो ।। जेथें छाया आसे तेथें पुरुष दीसे । कैसा वरुनि उदास म्हणु त्याला ।। निर्वराचा भास बोलतीस बाई । छाया तेथें आहे पुरुष वाटे ।। दर्पणाचे अंगी पाहाता अनेक । कशानें अद्वैत म्हणू त्याला ।। निवृत्तिदेव म्हणे दीप तेथें छाया । पुरुष तेथें माया लागली आहे ।।

१९६

स्वामी दयामूर्ति स्वता अंतरंग । कैशासाठी तरंग सत्य केलें ।। संग्रामी शूरानें काढू नये अंग । अणुभवासि नं ग लागे येणें ।। असत्याचे ठायीं सत्य मेळवीतां ।

सूर्य टाकुनि घेता दीप हातीं ।। शृंगारिले मढे नाना अलंकारें । काय त्याला खरें लेणें वाटे ।। म्हणे मुक्ताबाई विसरूनि सूत्रधारी । दिवसाला रात्री म्हणू नये ।।

✻

वैभवाचे गूढ तनूच्या विकारें । आपुल्या विचारे अनुभविलें ।। फळाफुलाविणवृक्षा कैची शोभा । समाधिवीण योगा रीघ कैचा ।। भक्तीविण मुक्ति कैची हे सादर । शक्तिहिनासि उत्तर म्हणू कैसे ।। भजनाविण प्रेम येईल कैसे अंगा । तरंगाविण संगा भेटी कैची ।। पाहाण्याविण देखणे कैचें येते ध्याना । देहावीण प्राणा वोळखी कैची ।। निवृत्तिदेव म्हणे आकार विलासे । तो नासलिया नासे सर्व बाई ।।

## १९७

बीजावीण वृक्ष कैचा तो पाल्हाळ । प्राप्तीविण फळ येतें कैचें ।। मृत्यु नाहीं तेथें मुक्ति कोणे वहावी । कल्पना ही नवी स्थापूं नये ।। जालें समाधान तेथें कैचें प्रेम । अंगा अंगपण मुकले दादा ।। टाकिल्या उपाधि तेथे कैची हे समाधि । गुह्य म्हणतां वेदीं मौन्य केलें ।। फुटली बुदबुदें नाशाचीं विलासें । त्यांत ब्रह्म कैसें मावळलें ।। म्हणे मुक्ताबाई पाहाण्याच्या हातोट्या । प्रेमें दादा काट्या कवटाळिल्या ।।

✻

आढळलें मज थरारिलें मनी । त्या वासना ह्या कोणी मिथ्या केली ।। शब्दावीण गूढ येतें कैचें रूप । म्हणूनि येकांता जाणें आलें ।। बोधक हा जीव शोधक तो शिव । दोहीविण उपाव मंद जाले ।। रश्मीविण कैची सूर्यालागी शोभा । ज्ञानाविण प्रभा फांके कैसी ।। लेण्याविण नग नटवावे कोठे । अंगेंचि निघोट आपुलियां ।। निवृत्तिदेव म्हणे दाता तंव मागता । आपुलाल्या अर्था सिद्ध जाले ।।

## १९८

विकल्पाचा गुण कोण्हा तरी साहे । म्हणुनि देवरायें धि:कारिलें ।। नि:संगासि संग नलगे तें कल्पना । भूस टाकुनि कणां सांभाळिलें ।। तैसे जीवशिव करिती भ्रमणा । जागृतींत स्वप्ना नेटावले ।। दाता हा मागता तोचि त्याला जाला । पुरुष त्या दोहीला नातळे तो ।। म्हणे मुक्ताबाई तीक्ष्ण हे शस्त्र । तृणाचे हे शूर ठरू पाहती ।।

✻

विश्वाचा जनिता सखा विश्वेश्वर । त्याचेनि आकार निटावले ।। अभ्रामुळें छाया दिसती तरंग । माया जाण अंग आदिपुरुषाचे ।। सत्य हे ही रश्मी सत्य हा ही भानू । सत्य हेही तनु भासा आली ।। गुणाचे पाल्हाळ विस्तारीले गुणें । गुणेंचि निर्गुण भासा आले ।। गुणेचि स्वरूप गुणावले मज । गुणें हे स्वतेज भासा आले ।। निवृत्तिदेव म्हणे गुण सार विधान । गुणेंचि भगवान भासां आला ।।

१९९

भासा आभासाचें काय येथें काज । कळल्या गुज लाज येणें वाटे ।। माया संगे तरंग काय कैचा आर्थ । चित्राचा प्रताप वानूं नये ।। भासे भासावलें अहंकाराचे हेतें । ऐकुनिया मात स्वप्नीचिया ।। गुह्यें गूढ येणें ठेविलें लपून । नांव याला कोणें ठेवावें येथें ।। बापुडा हा गुण बापुडी ही तनु बापुडा बोभाट वाहु नये ।। म्हणे मुक्ताबाई नाहीं मायागुण । लाविले लांछन स्वरूपासि ।।

*

आमोखाची झाडें विस्तारिल्या शाखा । तैसे आम्हां अर्था वेद आले ।। पर्जन्याचे बीज समुद्रीं हे भरिता । तैसे आम्हां अर्था श्रुति आल्या ।। इच्छेचें हे फळ अनुभविलें चित्ता । तैसे आम्हां अर्था सिद्धी आल्या ।। साधनाचें बीज पुढील स्वहीत । तैसी अम्हा अर्था विद्या आली ।। साधनाचें बीज कल्पना हे मनीं । आम्हां अर्थे स्वामी उठावला ।। निवृत्तिदेव म्हणे शिष्याची कल्पना । ते पुरवाया तुम्हां विचारिले ।।

२००

वेदानें ह्या विद्या होती जरी सार । तरी कां वेव्हार पाल्हाळतो ।। सागर भरिलनें पडती पर्जन्य । तरी कां गगन अवलोकिती ।। चिंतेची अचिंता कल्पतरूनें होती । तरी कां शरण जाती सद्गुरुला ।। दगड चिंतामणी हरिता जरी चिंता । तरी कां निघती माथां अमृताच्या ।। फळा श्रेष्ठ फळ शांति तेचि विद्या । साधनाविण वंद्या होति कैसी ।। म्हणे मुक्ताबाई स्वामी दयामूर्ति । पुसावया चित्तीं अर्थ होता ।।

*

सुखाचें सार उत्पत्तीचें मूळ । गोजिरें सलिल अविट संगे ।। ऐसे आसतां आवीट

अंतरीं । तरी कां शरीरीं खेद वाहती । मरणाची हे चिंता लागलाहे घोर । ऐसें निरंतर आथिलें आहे ।। सतासत कर्मे लिहिलीं ब्रह्मयानें । हें खरें किंवा भ्रम आहे माते ।। देहासि दुर्घट काम क्रोधाचे झट । हे खरें कीं खोटें सांग माते ।। निवृत्तिदेव म्हणे खरा बांधला येणे । ऐसा जीवें भ्रम धरिला आहे ।।

२०१

तळहातिच्या पाण्यांत मुख दिसे खरें । त्यांत कां घागर बुडूं पाहे ।। नखावरी बिंदु संचलें जीवन । तेथें काय ब्रह्म्यानें कर्म ल्याहावें ।। कामक्रोध झट हे कल्पनेची बाधा । द्वैत आपुल्या जागा उद्भवलें ।। तव मरणाची व्यथा सहज व्यापिली देहीं । जव अनुभव आपुले ठायीं आला नाहीं ।। म्हणोनि सुखाचे गौप्य गिवसावें । दगडासंगे जीवें जाऊं नये ।। म्हणे मुक्ताबाई याचे बांधले व्हावे । मग अविनाशाचें गाणें गावें काशा ।।

✻

एक्या दिवसामाजी घडीमोडी दुनी । ऐसे तिजला कोणी शिकविले ।। योगाचारामध्यें होता निरंजनी । विषय त्याला कोणी शिकविले ।। रूपरेखेविण होता तो निपुण । यासि अन्नभ्रम लाविला कोणे ।। सत्यासत्य बोलावें बोलणें । ऐसें काय कारण पडलें होतें ।। मुक्ती गतीची साधावी हातोटी । कोठे काये गोठी भुलुनी गेली ।। निवृत्तिदेव म्हणे माया सर्व साधन । जिनें परब्रह्म ऐसें केलें ।।

२०२

पाण्याचा पानबुडा पाण्यांत चेष्टा करी । हा निश्चय निर्धारी अवधारावा ।। मायेचे वल्लभ रांजणाशेजारी । घट घटावरी लवंडीतसे ।। रांजणाचे पाणी रांजणातचि भरी । लवंडिता माघारी घडमोड जाली ।। तैसे जिवा शिवाचे बुदबुद कारण । सत्याचें यानें असत्य केलें ।। म्हणूनि कारण भक्षावया मूळ । जीव जीवा समूळ आटविले ।। रूपरेखा कारण विषादीचें मूळ । जळ जळांत कल्लोळे ऐसे जालें ।। म्हणे मुक्ताबाई चेष्टा साररुपी । माया जाण कणी सैंधवाची ।।

✻✻

# विभाग चार

## परिशिष्ट

# पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस

## ( मुक्ताबाई एक की दोन या प्रश्नाचा चिकित्सक विचार )

मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांच्या भेटीचा अन्वयार्थ कसा उलगडता येतो याचा विचार आपण 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' या प्रकरणात केला. पण ही उकल आजवर झाली नसावी त्यामुळे मुक्ताबाई दोन असाव्यात असे विचार प्रसृत झाले होते. यास आधार होता डॉ.रा.चिं.ढेरे यांचा गुरुमाऊली १९८९ च्या अंकातील 'शिवयोगिनी मुक्ताई' हा लेख ! या संपूर्ण लेखामध्ये गोरक्षशिष्या मुक्ताई या ज्ञानेश्वरभगिनी असलेल्या मुक्ताबाईपेक्षा भिन्न असून गोरक्षशिष्या मुक्ताईचा पुढील जन्मातील अवतार म्हणजे ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई असे मत लेखकाने मांडले आहे. पुढील काळात अनेक अभ्यासकांनी या लेखाची दखल घेतली आहे. या लेखाच्या विरोधी मत नोंदविण्यासाठी का होईना पण या लेखाचा आवर्जून उल्लेख इतर लेखकांनी केलेला आढळतो. एवढेच काय पण विश्वकोशकारांनीसुद्धा या गोष्टीची दखल घेतली आहे. या लेखात इतके पुरावे दिलेले आहेत की ते पाहून अशी खरंच एखादी गोरक्षशिष्या मुक्ताई असावी असा भास निर्माण होतो.

'गोरक्षशिष्या मुक्ताई आणि ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई या भिन्न आहेत' या मताकडे पाहण्याची प्रस्तुत संशोधिकेची दृष्टी अगदी स्वतंत्र आहे. या दोन विभिन्न मुक्ताबाई नसून त्या दोघीही एकच होत्या हे सिद्ध करण्याइतपत पुरावा उपलब्ध होऊ शकतो. आणि त्याचाच विस्ताराने विचार या प्रकरणामध्ये करू.

'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात डॉ.रा.चिं.ढेरे काय म्हणतात तो विचार आधी समजावून घेऊ.

१ **शिवयोगिनी मुक्ताई** – या लेखात म्हटले आहे, ''ज्ञानदेवांची कनिष्ठ भगिनी असलेल्या या मुक्ताबाईची गुरुपरंपरा आदिनाथ – मत्स्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – मुक्ताबाई अशी आहे, असे सर्वांना परिचित आहे. याबाबतीत संशयाला मुळीच जागा नाही. परंतु मुक्ताबाईच्या परंपरेत जे अनेक मराठी ग्रंथकार होऊन गेले, त्या सर्वांनी अगदी एकमुखाने मुक्ताबाईला गोरक्षनाथांची शिष्या मानले आहे......पुण्यापासून

बऱ्हाणपूर-सुरतेपर्यंत आणि पानखेडपासून बेलखेडपर्यंत पसरलेल्या अनेक परंपरा एकमुखाने जेव्हा मुक्ताबाईला गोरक्षनाथांची शिष्या मानतात, तेव्हा आपले मन संभ्रमात पडते.'' [१]

मुक्ताबाईची परंपरा तिला गोरक्षनाथांची शिष्या मानते आणि मुक्ताबाई मात्र स्वत:ला निवृत्तिनाथांची शिष्या म्हणवते. ही या दोन्हीमध्ये तफावत आहे; ही वस्तुस्थिती आहे. याचे विवरण डॉ.रा.चिं.ढेरे यांनी कसे केले आहे ते पाहू.

''वाटते, निवृत्ति-ज्ञानदेवांसारखे निवृत्ति नि ज्ञानाचे पुतळे बंधुत्वाचे नाते घेऊन समोर वावरत असताना, ही मुक्ताबाई त्यांना डावलून - एवढेच नव्हे तर त्यांच्या गुरुलाही डावलून गोरक्षनाथांची शिष्या कशी बनली ? या मुक्ताईच्या काळी गोरक्षनाथ तर विद्यमान नसणार. मग प्रत्यक्षातील अधिकारी व्यक्ती टाळून गोरक्षनाथांचा अप्रत्यक्ष उपदेश घेण्याची पाळी तिला का यावी ? ज्ञानदेवांची भगिनी मुक्ताबाई ही तर नि:संदिग्ध शब्दात आपले गुरु निवृत्तिनाथ असल्याचे प्रकट करते, तर मग गोरक्षनाथांची शिष्या असलेली मुक्ताबाई तिच्यापूर्वी होऊन गेलेली अन्य व्यक्ती तर नसावी? अशी स्वाभाविक शंका मनात उदय पावते.'' [२]

२ **'ज्ञानप्रदीप' ग्रंथाचा आधार -** 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात दोन मुक्ताबाईच्या कल्पनेला आधार म्हणून एक दुसरा पुरावा देण्यात आला आहे. तो असा की, ''मग मुक्ताबाईचे गुरु निवृत्तिनाथ की गोरक्षनाथ ? की निवृत्तिनाथांची शिष्या मुक्ताबाई आणि गोरक्षनाथांची शिष्या मुक्ताबाई या एकाच नावाच्या दोन व्यक्ती आहेत ? गुरुभेदामुळे निर्माण होणारा हा मुक्ताबाईविषयक प्रश्न प्राचीनांनाही जाणवला असला पाहिजे. ज्ञानदेवांच्या नाथपंथी परंपरेतील एक संतकवी 'शिवदिनकेसरी' यांनी आपल्या 'ज्ञानप्रदीपा'त या प्रश्नाची सोडवणूक आपल्या परीने करण्याचा प्रयत्न केला आहे. 'पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस' लाभला होता असे त्यांचे म्हणणे. याचा अर्थ असा होतो की, गोरक्षशिष्या मुक्ताबाई हा निवृत्तिनाथशिष्या मुक्ताबाईचा पूर्वावतार होय. श्रद्धेच्या पातळीवरची ही अवतारकल्पना मानली तरी या दोन वेगळ्या मुक्ताबाई असल्याचे शिवदिनकेसरींचे मत स्पष्टपणे दिसून येते.'' [३]

३ **चक्रधरांना भेटलेली मुक्ताबाई आणि भर्तृहरीची मुक्ताबाई -** 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात पुढे दीर्घ विवेचनाच्या आधारे

षट्स्थल (विसोबा खेचरकृत शड्स्छळि) आणि लीळाचरित्र यां ग्रंथाच्या आधारे असे मत मांडले आहे की, 'मुक्ताबाई ही विदर्भातील अचळपूरची राजकन्या, ती दुर्दैवाच्या फेऱ्यात वेश्या बनली. योगायोगाने राजा विक्रमादित्याची जाया बनली. भर्तुहरी या आपल्या दिराच्या योगामुळे तिला गोरक्षनाथांचा अनुग्रह लाभला आणि ती वास्तव्यासाठी श्रीपर्वतावर, श्रीशैल्यावर साधना करू लागली. त्यातच दीर्घ काळ लोटला. या मधल्या कालावधीतच तिची (वयोवृद्ध मुक्ताबाईची) महानुभवीय चक्रधरस्वामींशी भेट झाली. हे सर्व ज्या मुक्ताबाईचे वर्णन आहे ती मुक्ताबाई खरी गोरक्षशिष्या आहे आणि ती ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईचा पूर्वावतार होय.'

४ **भर्तृहरीची मुक्ताबाई हीच चांगदेवांची गुरु –** भर्तुहरीची मुक्ताई हीच गोरक्षशिष्या मुक्ताई असून तिनेच चांगदेवांना अनुग्रह दिला होता असे प्रतिपादन पुढे 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात आले आहे.

५ **गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईचा पूर्वावतार –** 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात गोरक्षशिष्या मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. तो असा, ''चांगदेवांना बोध केल्यानंतर गोरक्षनाथांची शिष्या असणारी ती वृद्ध योगिनी दिवंगत झाली असावी आणि त्याच वेळी महाराष्ट्रभर गाजत असलेल्या ज्ञानेश्वरमंडळातील बालयोगिनी मुक्ताबाईला त्यांनी गुरु म्हणून स्वीकारली असावी. नावही तेच, योगाधिकारही तोच......आद्य मुक्ताबाईच्या योगाचा संवाद त्यांना या द्वितीय मुक्ताबाईमध्ये आढळला आणि म्हणूनच त्यांनी तिचा सर्वभावे स्वीकार केला अर्थात आद्य मुक्ताबाईचा पुनरावतार म्हणूनच. आद्य मुक्ताबाई महाराष्ट्रात अल्पकाळच राहिली असावी आणि चांगदेवांना बोध करण्यावाचून तिच्या जीवनात महाराष्ट्राशी संबद्ध अशी कोणतीच घटना घडली नसावी. त्याचमुळे तिच्या शिष्यपरंपरेने सारा महाराष्ट्र व्यापलेला असूनही तिची स्मृती महाराष्ट्रात लोप पावली. खरे म्हणजे तिने आपले सर्व तेज ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईच्या ठायी संक्रमित केले. आपले सर्व श्रेय तिने नव्या मुक्ताबाईला समर्पित केले.'' [४]

मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांच्या भेटीच्या प्रकाशात वरील साऱ्या

विवेचनाकडे पाहिले असता, दोन मुक्ताबाईंचे अस्तित्व मान्य करण्यासारखी परिस्थिती नाही असे आपल्या लक्षात येते. इतके दिवस या भेटीचे गूढ उकलले नसल्यानेच दोन मुक्ताबाईंचा विचार आजवर टिकून राहिला होता.

'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांचा काही वेगळ्या अंगाने विचार करता येतो का ते पाहू. या सर्व मुद्द्यांचा आता क्रमशः विचारात घेऊ. वरील सर्व प्रश्नांची उत्तर देताना, मुक्ताबाई – गोरक्षनाथ भेटीची काही पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१ **मुक्ताबाई–गोरक्षनाथ भेट –** नामदेवांच्या परीक्षेच्या प्रसंगी मुक्ताबाईने गोरोबाला जे बोलावणे धाडले ते बोलावणे म्हणजे प्रत्यक्ष गोरक्षनाथांनाच दिलेले आमत्रंण होते. (ह्याचा सविस्तर विचार आपण 'धाडा बोलावणे गोरोबाला' या प्रकरणात आधी केला आहेच.) मुक्ताबाईचे हे धगधगीत वैराग्य पाहून आणि तिचा निदिध्यास पाहून अव्यक्त असणारे गोरक्षनाथ पाल्हाळतात, प्रकट होतात. गोरक्षनाथांच्या अनुभवाच्या या थापटण्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच कमी अधिक उच्च दर्जाचे अनुभव आलेले आहेत. पण त्यातही मुक्ताबाईचे स्थान वेगळेच आहे. गोरक्षनाथांच्या थापटण्याने, त्यांनी केलेल्या शक्तिपातामुळे मुक्ताबाईस अमृतसंजीवनी उतू आल्याचा अनुभव आला आहे. गोरक्षनाथांनी मुक्ताबाईस प्रदान केलेला हा अनुभव म्हणजे गोरक्षनाथांनी तिच्यावर केलेला अनुग्रह आहे. गोरक्षनाथांची तिच्यावर कृपा आहे हे दाखविणारा हा अनुभव आहे. या दृष्टीने मुक्ताबाई ही गोरक्षनाथांची शिष्या आहे. (ह्याचा विस्ताराने विचार 'गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला' या प्रकरणामध्ये केला आहे.)

आजवर या सर्व प्रसंगाचे सूत्रधार गोरोबा म्हणजे गोरा कुंभार असे मानले जात असल्याने मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांच्या संबंधाचा उलगडा होत नव्हता. पण वरील विवेचनावरून ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई ही गोरक्षनाथांची शिष्या कशी याची उकल होऊ शकेल.

- 'अनुग्रह' हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. एखाद्या व्यक्तीला सद्गुरु अनुग्रह देतात आणि त्या संप्रदायाची साधनापद्धती देऊ करतात. या अनुग्रहामुळे व्यक्तीचा अध्यात्मप्रांतात प्रवेश होतो असे मानले

जाते. गुरुशिष्यपरंपरा सांगताना ज्या सद्‌गुरुंनी अनुग्रह दिला त्यांचे नाव सद्‌गुरुस्थानी आलेले असते. यादृष्टीने निवृत्तिनाथांनीच मुक्ताबाईला नाथसंप्रदायाची दीक्षा दिली असल्याने मुक्ताबाईच्या अभंगामध्ये सद्‌गुरुस्थानी निवृत्तिनाथांचे नाव येणे स्वाभाविकच आहे.

परंतु अनुग्रह याचा अर्थ 'कृपा' असाही होतो. मुक्ताबाईला गोरक्षनाथांची कृपा लाभली होती या अर्थीही मुक्ताबाईला गोरक्षनाथांचा अनुग्रह होता असे म्हणण्यात येते. एका शिष्याला त्याच्या गुरुपरंपरेतील पूर्वाचार्यांची कृपा लाभली तर त्यात वावगे काहीच नाही आणि त्यामुळे या दोन व्यक्ती आहेत अशी समजूत करून घेण्यातही काही अर्थ नाही.

- या सर्व प्रसंगामध्ये मुक्ताबाई निवृत्ति-ज्ञानदेवांना डावलून गोरक्षनाथांची शिष्या बनलेली नाही. निवृत्तिनाथांनी दिलेल्या साधनेच्या आधारावर आणि ज्ञानेश्वरांनी विवरण केलेल्या ज्ञानाच्या आधारेच मुक्ताबाईनी पुढील झेप घेतली आणि आणि आपल्या संप्रदायातील मूळपुरुषाचा कृपाशीर्वाद संपादन केला आहे. आणखी असे की, ही कृपा फक्त स्वत:पुरतीच संपादन केली आहे असेही नाही, तर गोरक्षकृपेच्या या वर्षावामध्ये तिने आपल्या इतर तिन्ही भावंडांनाही समाविष्ट करून घेतले आहे. म्हणजे तिने इतरांना डावलून गोरक्षनाथांची भेट घेतलेली नाही हे स्पष्ट होते.

- मुक्ताबाई निवृत्तिनाथांची शिष्या असून तिला गोरक्षनाथांची कृपा लाभली होती. यातील पूर्वार्धाचा उच्चार मुक्ताबाई स्वत: करताना दिसते तर त्यातील उत्तरार्धाचा उच्चार तिची शिष्यमंडळी करताना आढळतात.

येथे एक गोष्ट लक्षात येते की, मुक्ताबाई देत असलेली गुरुपरंपरा आणि त्यांच्या शिष्यांनी दिलेली परंपरा यात वस्तुत: तसा काही भेद नाही. गोरक्षकृपा ह्या एकाच वस्तुस्थितीचे, मुक्ताबाईने केलेले स्पष्टीकरण आणि तिच्या शिष्यमंडळींनी केलेले स्पष्टीकरण यात फरक असल्याने दोन मुक्ताबाईंची कल्पना प्रसृत झाली असल्याचे आपल्या लक्षात येते.

शिष्यमंडळी नेमक्या कोणत्या प्रेरणेने मुक्ताबाईला गोरक्षशिष्या म्हणतात याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. शिष्यवर्गाची सर्वसामान्य मनोभूमिका लक्षात घेतली तर त्याचे कारण सहज लक्षात येईल. आपल्या

सद्गुरुंची ओळख करून देताना आपली गुरुपरंपरा कोणता संपन्न वारसा बाळगणारी आहे हे सांगण्यामध्ये शिष्यांना एक प्रकारचा गौरवाचा अनुभव येत असतो. (एकीकडे निवृत्तिनाथ आणि दुसरीकडे गोरक्षनाथ या दोघांचीही सारखीच कृपा लाभलेल्या) मुक्ताबाई आपल्या सद्गुरु आहेत असे सांगताना निवृत्तिनाथांपेक्षा त्याकाळी कितीतरी पटीने सुविख्यात असणाऱ्या गोरक्षनाथांच्या परिचयाने मुक्ताबाईचे स्थान शिष्यांनी वर्णन करावे ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. आणि म्हणूनच मुक्ताबाईच्या साऱ्याच परंपरा एकमुखाने त्या गोरक्षशिष्या असल्याचे सांगतात, ही गोष्ट येथे संभ्रमात टाकणारी ठरत नाही.

● गोरक्षकृपा प्राप्त झाल्यानंतर मुक्ताबाईच्या साधनेने एक वेगळीच उंची गाठल्याचे जाणवते. गोरक्षकृपेच्या आधारे आता तिची पुढील आध्यात्मिक वाटचाल चालू आहे. आणि त्यामुळेच त्या मार्गाचे स्पष्टीकरण करताना, त्या अनुभवाचा निर्देश शिष्यमंडळींसमोर होत असावा हेही समजण्यासारखे आहे.

२ **‘ज्ञानप्रदीप’ ग्रंथाचा आधार –** ज्या शिवदिनकेसरींच्या मताचा निर्वाळा ‘शिवयोगिनी मुक्ताई’ या लेखात देण्यात आला आहे त्या शिवदिनकेसरींचे यासंदर्भातील विधान पूर्णतया लक्षात घेणे जरुरीचे आहे. शिवदिनकेसरी ‘ज्ञानप्रदीप’ या ग्रंथात लिहितात,

‘गोरक्षनाथ कृपा पूर्ण । गयनिनाथासि संपूर्ण ।
गयनिनाथ कृपे धन्य । निवृत्ति आपण ज्ञानरुपि ।
पूर्वजन्मि मुक्ताईस । गोरक्षकृपेचा सौरस ।
पुन्हा ज्ञानजन्मि सरस । सोपानदेवास कृपा तिची ।।’ [५]

‘पूर्वजन्म’ आणि ‘ज्ञानजन्म’ या शब्दांचा सखोल अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. तो लक्षात घेतला न गेल्यामुळे मुक्ताबाई दोन असल्याचा गैरसमज निर्माण झाला असावा. पूर्वजन्म हा शब्द ‘गतजन्म’ या अर्थाने रुढार्थाने वापरला जातो हे खरे; पण येथे वापरलेला जन्म हा शब्द वाच्यार्थाने वापरलेला नसून आध्यात्मिक आशयाची सघनता घेऊन आलेला तो शब्द आहे. एक अवस्था बदलून दुसऱ्या अधिक उच्चतर अवस्थेत प्रवेश होणे या गोष्टीला अध्यात्मप्रांतामध्ये जन्म असे म्हणण्यात येते. आजवर अज्ञानामध्ये भरकटणाऱ्या

जीवाला जेव्हा संप्रदायाची दीक्षा लाभते तेव्हा त्याचा नवीन जन्म झाला असे समजण्यात येते. स्वत:च्या साधनेचा विकास करीत करीत जेव्हा शिष्य स्वत: सद्‌गुरुपदावर आरुढ होतो तेव्हा त्याचा तो 'ज्ञानजन्म' असतो. ही आध्यात्मिक परिभाषा लक्षात घेतली तर शिवदिनकेसरींच्या वरील म्हणण्याचा अर्थ आपल्या नीट लक्षात येऊ शकेल आणि शिवदिनकेसरींना अशा दोन मुक्ताबाईंचे अस्तित्व सुचवायचे नसल्याचेही लक्षात येते.

निवृत्तिनाथांची शिष्या असणारी मुक्ताबाई जोपर्यंत शिष्यत्वाच्या पातळीवरच होती, साधकावस्थेच्या पातळीवरच होती, त्या अवस्थेमध्येच म्हणजे पूर्वजन्मामध्येच तिला गोरक्षनाथांची कृपा प्राप्त झाली असे म्हणण्याचा येथे हेतू आहे. गोरक्षकृपेमुळे परिणाम झाला तो असा की मुक्ताबाईचा आध्यात्मिक स्तर पालटला. शिष्यत्वाची पातळी ओलांडली गेली आणि मुक्ताबाईची सद्‌गुरुपदावर आरुढ होण्याइतकी योग्यता झाली. हा जो जन्म होता तो 'ज्ञानजन्म' होता. आणि या ज्ञानजन्मानंतर मुक्ताबाईचे सोपान, विसोबा खेचर आणि चांगदेव हे तीन शिष्य झाले असे शिवदिनकेसरी म्हणतात. म्हणजे या तिघांना त्या मार्गाचे अनुसरण करण्याविषयी मार्गदर्शन मुक्ताबाईने केले असावे.

**३ चक्रधरांना भेटलेली मुक्ताबाई आणि भर्तृहरीची मुक्ताबाई –** या संदर्भात शिवयोगिनी मुक्ताई या लेखातील मत आपण लक्षात घेतले आहेच. आता त्याचा विचार येथे करू. त्या लेखामध्ये वर्णन केलेल्या मुक्ताबाईच्या जीवनातील घटना इतक्या वैचित्र्यपूर्ण आहेत की या सर्व घटनांची जुळणी एकाच मुक्ताबाईच्या जीवनात करण्याचा अट्टहास का याचा उलगडा होत नाही. विक्रमादित्याची पत्नी असणारी मुक्ताबाई, चक्रधरांना भेटलेली मुक्ताबाई, गोरक्षकृपाप्राप्त झालेली ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई या सर्वांची एकत्र सांधेजोड करण्याची आवश्यकताच काय ? असा प्रश्न वरील विवेचनावरून निर्माण होतो. या सर्वांमध्ये कोणतेही एक सलग असे जीवनसूत्र शोधता येत नाही. त्यामुळे गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरशिष्या मुक्ताबाईपेक्षा वेगळी होती हे मत मान्य होण्यासारखे नाही.

- 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखात 'षट्‌स्थल' या ग्रंथाचा आधार घेतला गेला आहे. त्या ग्रंथामध्ये ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईप्रमाणेच,

भर्तृहरीशी संबंधित असलेल्या मुक्ताबाईचाही उल्लेख आलेला आहे. गोरक्षनाथांनी जिला मुक्ताई हे नामाभिधान देऊ केले आहे ती मुक्ताई म्हणजे भर्तुहरीची पत्नी पिंगला ही असावी असे वाटते. षट्स्थल या ग्रंथातील या कथेचे धागेदोरे काही प्रमाणात 'नवनाथभक्तिसार' या ग्रंथाशी आणि 'नाथलीलामृत' या ग्रंथाशी मिळतेजुळते आहेत. या दोन्ही ग्रंथांमध्ये पिंगलेचे निर्वाण, तिचे श्रेष्ठत्व वर्णन करण्यात आले आहे, तसे ते विक्रमादित्याच्या राणीचे म्हणजे सत्यवतीचे आलेले नाही. (या दोन्ही ग्रंथात ती विक्रमादित्याची राणी नसून माता असल्याचे उल्लेख आहेत, ही गोष्टही लक्षात घेण्याजोगी आहे.) तेव्हा विक्रमादित्याची पत्नी सत्यवती हीच गोरक्षशिष्या मुक्ताई हे 'शिवयोगिनी मुक्ताई' या लेखातील प्रतिपादन विपरीत वाटते. उलट भर्तुहरीची पत्नी पिंगला हिलाच तिचे निर्वाण पाहून गोरक्षनाथांनी मुक्ताई नाम देऊ केले असण्याची शक्यता अधिक आहे.

● असे म्हणण्याचे आणखी एक कारण असे की, ही कथा षट्स्थल या ग्रंथामध्ये ज्या पद्धतीने आली आहे त्या पद्धतीवरून, ती कथा संपूर्ण आहे असे वाटत नाही. त्यातील काही ओव्या गहाळ असाव्यात असे वाटते. उदाहरणार्थ, ''तेचि तप देखा लाधले । अंनदानाचे ।।'' या ओवीनंतर एकदम ओवी येते ती अशी – ''यानि शरीर कृश जाले देखा ।।'' [६] या दोन लगतच्या ओव्यांचा परस्परसंबंध लागत नाही. तेव्हा मधल्या गहाळ ओव्यांमध्ये भर्तुहरीच्या पत्नीसंबंधी कथाभाग आला असावा असा अंदाज करता येण्यासारखा आहे.

**४ भर्तृहरीची मुक्ताबाई हीच चांगदेवांची गुरु ? –** भर्तुहरीची सर्व कथा सांगून झाल्यावर विसोबा 'षट्स्थल' या ग्रंथात म्हणतात,

'' हे उजनिये नगरीस वितले । मुक्ताईस अनुक्रमे लाधले ।
शिवयोगज्ञान कथिले । सिव अहीक्याचे ।।
तू मुक्ताई चांगयाचा गुरु । आणि प्रसन्न असे वटेश्वरु ।
तेथूनिया विस्तारला संप्रधारु । वटेश्वराचा ।।'' [७]

याठिकाणी विसोबांच्या सांगण्याचा अर्थ असा की, भर्तुहरीची कथा उज्जयनीस घडली. तेथे पिंगलेला उर्फ मुक्ताईला जे शिवयोगज्ञान गोरक्षनाथांनी दिले तेच ज्ञान ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताईस 'अनुक्रमे' म्हणजे परंपरेने लाभले. तेव्हा

भर्तुहरीपत्नीने म्हणजे आद्य मुक्ताबाईनेच चांगदेवास अनुग्रह दिला हे मतही मान्य करता येत नाही.

चांगदेवांच्या अभंगांमध्ये ज्ञानेश्वरांच्या समकालीनांचे उल्लेख येतात मात्र भर्तुहरी किंवा त्यांच्या संबंधितांपैकी कोणाचेही उल्लेख येत नाहीत ही गोष्ट दुर्लक्षित करून कसे चालेल ? भर्तुहरीपत्नी पिंगला उर्फ मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई यांच्यातील नामसादृश्यामुळे आणि त्यांच्या 'षट्स्थल' या ग्रंथातील एकत्रित उल्लेखामुळे मध्यंतरीच्या काळात यासंबंधी बरेचशी मतमतांतरे निर्माण झाली असल्यानेच केवळ येथे त्याचा इतका सविस्तर विचार करावा लागला.

**५ गोरक्षशिष्या मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईचा पूर्वावतार ? –** यासंबंधी जे विवेचन शिवयोगिनी मुक्ताई या लेखात आले आहे, ते जर खरे मानायचे असे गृहीत धरले तर, चांगदेव आपल्या या आधीच्या गुरुचा (गोरक्षशिष्या मुक्ताईचा) म्हणजे आद्य मुक्ताबाईचा एकदाही उल्लेख कसा करत नाहीत, हा प्रश्न निर्माण होतो. आणि त्यामुळे ते सारे विवेचन तर्कदृष्ट्या सुसंगत वाटत नाही.

यातील आणखी एका मुद्याचा येथे विचार करायला हवा. चांगदेव आपली गुरुपरंपरा गोरक्षनाथ – मुक्ताबाई – चांगा वटेश्वर अशी का सांगतात ? हा तो प्रश्न होय. सर्वसामान्य शिष्यांच्या मनोभूमिकेचा विचार आपण मघाशी विवेचनाच्या ओघात केला. परंतु चांगदेव हे मुक्ताबाईचे कोणी सामान्य शिष्य नव्हते. तर मुक्ताबाईचा तो 'भला' शिष्य होता. त्यांनी मुक्ताबाईला गोरक्षशिष्या म्हणणे यामागे काही सखोल अर्थ अभिप्रेत आहे का ? ह्याचा विचार करू.

येथे मुक्ताबाईनी आपल्या शिष्यांना, त्यातही विशेषत: चांगदेवांना जो गुरुपदेश केला आहे, त्याचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. मुक्ताबाईला निवृत्तिनाथांकडून जो वारसा लाभला होता त्याचे स्वरूप हरिनाम, विठ्ठलभक्ती यांनी परिपुष्ट झालेली साधनापद्धती असे होते. या साधनापद्धतीला निवृत्तिनाथांच्या माध्यमातून कृष्णभक्तीची, ईश्वराच्या सगुण भक्तीची जोड मिळालेली होती. मुक्ताबाईना निवृत्तिनाथांकडून मिळालेला वारसा असा होता. 'मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल । निवृत्तिने चोखाळ दाखविले ।।' [८] यासारख्या

मुक्ताबाईच्या अभंगामधून या सगुणभक्तीवर अधिष्ठित असलेल्या साधनापद्धतीची ओळख पटते.

पण मुक्ताबाईचे मन या सगुण भक्तीमध्ये फारसे रमलेले दिसत नाही. स्वत:च्या साधनेच्या आधारावर निर्गुणाचा स्तर त्यांनी अल्पावधीतच गाठला आणि त्या सामर्थ्याच्या योगेच त्यांना गोरक्षनाथांची कृपा प्राप्त झाली. निर्गुणाच्या सामर्थ्याचे बळ ओळखलेली मुक्ताबाई स्वत:च्या शिष्यांना उपदेश करते तो, सोऽहमसाधनेचा आणि निर्गुण कवळण्याचा. मुक्ताबाईचे सारे अभंग सगुणाच्या रसमयतेने रसाळ होण्यापेक्षा निर्गुणाच्या ज्ञानतीक्ष्ण धारेने तळपताना दिसतात. मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्या संवादातील निर्गुणाच्या साधनेचा उपदेशही पाहण्यासारखा आहे. या सर्व उपदेशामध्ये गहिनी आणि पुढे निवृत्ति यांच्याकडून लाभलेल्या कृष्णभक्तीच्या वारशापेक्षा, गोरक्षप्रणित निर्गुण अशा सोऽहमसाधनेचा पुरस्कार केला असल्याचे वारंवार जाणवते. आणि यामुळे चांगदेवांनी आपली परंपरा सांगताना निवृत्तिशिष्या मुक्ताबाई अशी न सांगता गोरक्षशिष्या मुक्ताबाई अशी सांगितली तर ते तात्त्विक बैठकीच्या आधारेही पटण्यासारखे आहे.

**निष्कर्ष** – गोरक्षशिष्या मुक्ताबाई आणि ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाई या दोन भिन्न व्यक्ती नव्हत्या किंवा त्या एकमेकींचा अवतारही नव्हत्या ही गोष्ट वरील विवेचनावरून सुस्पष्ट होते. ज्या प्रश्नांच्या आधारे दोन मुक्ताबाईचे अस्तित्व मानण्यात आले होते त्या प्रश्नांची वेगळ्या पद्धतीने वरीलप्रमाणे उकल झाल्यामुळे त्यातील पेचप्रसंग शिल्लक राहत नाही आणि म्हणून दोन भिन्न मुक्ताबाई मानण्याची गरज आता शिल्लक राहू नये असे वाटते.

ज्ञानेश्वरभगिनी असलेल्या मुक्ताबाई ह्या निवृत्तिनाथांच्याच शिष्या होत्या मात्र स्वत:च्या आध्यात्मिक साधनेच्या जोरावर त्यांनी गोरक्षनाथांची कृपा संपादन केली होती, ही गोष्ट येथे स्पष्ट होण्यास हरकत नसावी.

**

# लोकसाहित्यातील मुक्ताबाई

स्वत:ची उच्च पारमार्थिक अवस्था लोककल्याणाकरता बाजूला सारुन लोकांमध्ये रममाण होणारी संतमंडळी. विश्व मोहरे लावावे या हेतूने झटणारी ही संतमंडळी. हिमालयासारख्या उंचीच्या त्या संतांचे ते वागणे, त्यामागील त्यांचा त्याग, त्यांची तळमळ या वागण्याचे गमक काय हे आजच्या काळात सर्वांना कदाचित आकलन होत नसेलही परंतु त्यांचे थोरपण सर्वसामान्यांना नक्कीच कोठेतरी जाणवून जाते.

आणि म्हणूनच या सर्व संतांबद्दल विलक्षण जिव्हाळ्याने 'निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई, एकनाथ, नामदेव, तुकाराम' असा जयघोष करत सारेजण जीवनाची वाटचाल करत राहतातच ना ? सगळा सूर्यच हातात कवळण्याचे सामर्थ्य नसले म्हणून काय झाले ? प्रत्येकाने सूर्याचा एकेक कवडसा आपल्या हाती बाळगण्याचा जरुर प्रयत्न केलेला असतो. लोकसाहित्यामध्ये दिसून येणारे चित्रण हे या कवडशाच्या स्वरुपाचे असते. कवडशाच्या निमित्ताने दूरस्थ सूर्यच आपल्या अंगणात यावा तसे काहीसे येथे होते आणि म्हणूनच जनमानसाने मुक्ताबाईचे कोणते रुप स्वत:च्या हृदयात साठवून ठेवले आहे हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

ज्ञानेश्वरांची बहिण मुक्ताबाई, चांगदेवाला वठणीवर आणणारी मुक्ताबाई, सौंदर्यवान मुक्ताबाई, आदिमाया मुक्ताबाई, आपली आप्त असणारी मुक्ताबाई अशा विविध तऱ्हेने मुक्ताबाईचे चित्रण लोकसाहित्यामध्ये आलेले आहे. त्या एकेक अंगाचा विचार करू.

**लहानगी मुक्ताबाई –** तिच्याबद्दल एक विलक्षण असे कौतुक जनमानसामध्ये आहे. तिचे लहानुगेपण, तिचे लडिवाळपण, तिचे देखणेपण स्त्रियांना विलक्षण भावते असे दिसते.

'माझ्या मुक्ताचं चांगुलपण गं
जसं केवड्याचं पान' [१]

असे कोणी तिच्याबद्दल म्हणते. तर कोणी तिच्या नेणत्या वयाने आणि

उडणाऱ्या जावळाने मोहून जाते.

'ग्यानोबा मुक्ताबाई दोघं हिंडती धीरानं
नेणत्या ग मुक्ताबाईचं जावळ उडतं वाऱ्यानं' [२]

**ज्ञानेश्वरभगिनी** – ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई हे लोकमानसाला सर्वाधिक आकळलेले तिचे रूप आहे असे जाणवते.

'आताच्या योगामंदी भावाला बहीने नगं
मुक्ता ग्यानोबाच्या मागं राही कीर्तनाला उभं' [३]

आजच्या काळाच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वर मुक्ताबाईचे सख्यत्व या मनाला जाणवून गेले असल्याचे लक्षात येते.

'देव ज्ञानुबा तोंड धुतो इंद्रायणीच्या झऱ्याला
मुक्ताबाई त्याची भैन मोती गुंपीती तुऱ्याला
गेनुबा देव बोलं मला कशाला व्हावी रानी
भैनी मुक्ताबाई आंगुळीला दे ग पाणी' [४]

आपल्या कुटुंबातील लोकांना काय हवं काय नको ते पाहून त्याप्रमाणे त्या गोष्टींसाठी स्वत: झिजणाऱ्या प्रेमळ स्त्रीचे चित्रण या काव्यात आले आहे. मुक्ताबाई आपला सांभाळ करत असताना इतर कोणाचीही आपल्याला आवश्यकता नाही असा ज्ञानेश्वरांचा भाव येथे व्यक्त होतो.

आदर्श बहीणभाऊ या स्वरुपात या दोघांना जनमानसाने लक्षात ठेवलेले दिसते. अहिराणी लोकसाहित्यात म्हटले आहे,

'बहीण ना भाऊ बायपननी पिरीत
ग्यानबाना जोडे मुक्ताबाईनी सुरत' [५]

दोघांमधील बालपणीच्या प्रेमाचे हे वर्णन आहे.

'भावाबहीणीचे बाळपणाचे प्रेम
उभे राहिले दोघे मुक्ताई ज्ञानोबा प्रेमाने' [६]

लहानपणीचे भावाबहिणीचे आत्यंतिक प्रेम पाहिले की आठवण येते ती ज्ञानेश्वर मुक्ताईची. इतके ते जनमानसात लोकप्रिय आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रच या दोघा भावंडांच्या प्रेमाने, त्यांच्या कर्तृत्वाने मोहरून

गेला आहे. नाहीतर कोठे अहिराणी बोली बोलणारा खानदेशातील समाज आणि कोठे पुण्याजवळील 'आसदे' हे एक छोटेसे गाव. प्रस्तुत संशोधिका त्या गावी गेली असताना तेथील स्त्रियांनी मुक्ताबाईसंबंधी खालील लोकगीत ऐकविले.

'चला सया ग जाऊ　　आपुन आळंदी बाई
　　आळंदी पायी पायी
बहिण मुक्ताबाई　　ज्ञानेश्वराची बहीण
　　चालती भित्त दावी' [७]

मुक्ताबाई ही इतरांच्या दृष्टीने महान संत असेल पण एखाद्या सासुरवाशिणीला ती आपल्या माहेरची व्यक्ती वाटते इतके जवळिकीचे नाते तिचे मुक्ताबाईबरोबर असते.

'चांदीची घागर बाई मोत्यांची चुंबळ
चुंबळ तरंगती बाई घागर बुडविती ।।
सासऱ्याची पायरी ग कवा मला सुटंल
बाप माजा विठ्ठल ग कवा मला भेटंल
सासूची पायरी ग कवा मला सुटंल
आई माजी रुक्मिणी ग कवा मला भेटंल
नणदेची पायरी ग कवा मला सुटंल
भैन माजी मुक्ताई ग कवा मला भेटंल
दिराची पायरी ग कवा मला सुटंल
भाऊ माजा ज्ञानदेव ग कवा मला भेटंल' [८]

विठ्ठल रुक्मिणी आणि ज्ञानेश्वरमुक्ताई यांच्या विरहाने व्याकुळ होणारी ही सासुरवाशीण आहे.

आपल्या बंधुरायाबद्दल मुक्ताबाईचे प्रेम व्यक्त करणारे हे आणखी एक लोकगीत पाहा.

'निघे पाण्याला मुक्ताई　　गोदा म्हणे थांब जाई
मीच येते दारावर　　तुझी भराया घागर
जळ म्हणे सांग माय　　कुठे तुझा भाऊराय
माझे आतुरले मन　　त्याचे धुवावया पाय

मुक्ता बोलली थकला      भिंत चालवून आला
सर्व हटवाद्यांपुढे      रेडा वदवून आला
बोल मुक्ताचे ऐकून      गोदा आली लोटांगण
तिला घडवी मुक्ताई      आपेगावी तीर्थाटन' [९]

**माय मुक्ताई –** बहीणभावंडांमधील विलक्षण प्रेमाबरोबरच मुक्ताबाईचे एक आई, माय म्हणून दर्शन वरील गीतामध्ये घडविले आहे. गोदावरीला मातृवत असणारी मुक्ताबाई हे दर्शच फारच विलक्षण आहे.
मुक्ताबाईचे हे आईपण कसे ? ते बहिणाबाईंच्या शब्दातच पाहू.

'आपेगावचे दूध तापे      दुधावरली पिव्वी साय
अशी माझी मुक्ता माय ।।' [१०]

**आदिमाया मुक्ताबाई –** मुक्ताबाई ही आईच आहे असे नव्हे तर ती साक्षात आदिमाया आहे अशी समजूत लोकांमध्ये रुढ आहे. आळंदीजवळ असलेल्या 'सोळू' गावामध्ये मुक्ताबाईचे मंदिर आहे. तेथल्या लोकांनी सहज बोलताबोलता सांगितले, कंसाच्या हातून जी आदिमाया विजेसारखी सटकली तीच मुक्ताबाई बनून पुन्हा आली.

याच सोळू गावात तेथील ग्रामस्थांना पुस्तकातील मुक्ताबाईसंबंधी काही संदर्भ प्रस्तुत संशोधिका दाखवित असताना तेथे आजूबाजूला वावरणाऱ्या शाळकरी मुलांची प्रतिक्रिया विलक्षण बोलकी होती. संशोधिकेचे ग्रामस्थांशी चाललेले बोलणे ऐकून ती मुले आपापसात म्हणत होती, ''अरे, आपली मुक्ताबाई पुस्तकात कशी काय गेली ?'' यातील 'आपली मुक्ताबाई' हा जिव्हाळा कसा आणि कोठून निर्माण होतो ?

**कर्तृत्ववान मुक्ताबाई –** लहानग्या मुक्ताबाईचे अचाट कर्तृत्व पाहून आश्चर्याने तोंडात बोटं घालावी असे हे एक गीत पाहा.

'माझी मुक्ताई मुक्ताई
दहा वर्साचं लेकरु
चांगदेव योगीयानं
तिले मानला रें गुरु' [११]

मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्या संदर्भातला चमत्कारसदृश असा कथाभाग

लोकमानसाने अधिक प्रमाणात जतन केला आहे असे दिसते. ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाईच्या जीवनचरित्रातील कोरे पत्र वाचणे, भिंत चालविणे या घटनांचे सर्वाधिक चित्रण लोकसाहित्यात आले आहे.

'वैकुंठावरुनी घेतली धावु चंद्रभागातीरी पंढरी जाऊ
पुंडलिकाचा पाहुनी भाऊ मायाबापाची करितो सेवू'

या लोकगीतामध्ये वरील कथेचा संदर्भ आला आहे. त्यात म्हटले आहे,

'चांगदेव आले येवगी होऊन जासूदा हाती दिले पत्र लिहून
मुक्ताबाईनं ते पाहिलं वाचून विचार मनाशी केला तिनं
अजून न्हाई गेली बा चांग्या तुझी भरांती
चौघं भावंडं करिती विचार तोंड धुवायला बसले भिंतीवर
निर्जीव भिंत चालली सत्वर चांगदेव पाहता पडे धरणीवर
निवृत्ति सोपान काका भैन मुक्ताबाई
पुढे समाधि बा मागं विठ्ठल रुक्माई' [१२]

'तुम्ही लावावी आपल्या घरी, पोथी ऐकावी तुम्ही ज्ञानेश्वरी' या गीतामध्ये वरील प्रसंग आला आहेच. पण पुढं मुक्ताबाई काय म्हणते ते ऐकण्यासारखे आहे.

'नेवरती सोपान ज्ञानदेव मुक्ताबाई
भेटी झाली बैसून भिंतीवरी
अहो ही मुक्ताबाई बोलती माया हो ऐका
लबाडीचा संसार करु नका' [१३]

मुक्ताबाईच्या जीवनातील इतरही काही घटना शब्दबद्ध झाल्या आहेत. त्यातील एक म्हणजे मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांच्या पाठीवर मांडे भाजण्याची घटना.

'ज्ञानदेवांच्या घरात एक किमया घडली
तव गुणगुणे ओवी रुखमाई लाटे पोळी
म्हणे मुक्ताई देवीला व्यर्थ शिणवीशी चूल
कैवल्याच्या पाठीवर भाजले ग मी मांडे काल' [१४]

ज्ञानेश्वरांना मुक्ताबाई ताटीचे अभंग ऐकविते आणि त्यांची समजूत काढते हा प्रसंगही लोकमानसाला भावतो. त्याचे अतिशय अप्रतिम वर्णन बहिणाबाईच्या कवितेत आले आहे.

‘अरे असं माझं तोंड
कसं लावू मी लोकाले
ताटी लाई ग्यानदेव
घरामधी रे दडले

उबगले ग्यानदेव
घडे असंगाशी संग
कयवयली मुक्ताई
बोले ताटीचे अभंग

घेती हिरीदाचा ठाव
ऐका ताटीचा अभंग
एका एका अभंगात
उभा केला पांडुरंग

गहयरले ग्यानदेव
होये गेले भरीसन
असा भाग्यवंत भाऊ
त्याची मुक्ताई बहीन’ [१५]

गोरक्षभेटीतून निर्माण झालेले मुक्ताबाईचे वेगळेपण, अमृतसंजीवनाचा अनुभव येथे बहिणाबाईंना सूचित करावयाचा आहे असे वाटावे अशा याच गीतातील पुढील ओळी पाहा.

‘देख ग्यानियाच्या राजा
आदिमाया पान्हावली
सर्व्याआधी रे मुक्ताई
पान्हा पियीसनी गेली’ [१६]

मुक्ताबाईला आलेला श्रेष्ठ स्वरुपाचा आध्यात्मिक अनुभव शब्दबद्ध झाला आहे.

मुक्ताबाईचे सारे आयुष्यच इतके नाट्यमय प्रसंगांनी घडलेले आहे की तिचे समग्र जीवन हेच साहित्याचा विषय ठरू शकेल. मुक्ताबाईचे सारे जीवन एका छोट्याशा गाण्यात किती समर्थपणे व्यक्त झाले आहे पाहा. मुक्ताबाईच्या स्वरुपाकार होण्याचा लोकमानसाने लावलेला अर्थ किती मनोहारी आहे हे पाहण्यासारखे आहे. आजच्या स्त्रीमुक्तीच्या काळातील स्त्रियांनी रचलेली कविता –

‘मुक्त मने मुक्तपणे गाऊ या चला ।
मुक्ताई घरी मुक्त होऊ या चला ।। धृ ।।

संन्यासी बापाची चार ही मुले ।
माळ्याविण माळावर चढली फुले ।।
ज्ञानाचा भक्तीचा वेल लावला ।
मुक्ताईपरी मुक्त होऊ या चला ।। १ ।।
ज्ञानदेव बंधुराज रुसून बसले ।
ताटीच्या गाण्याने शांत बनविले ।।
अग्नीला पाण्याचा मार्ग दाविला ।
संताला शांतीचा मार्ग दाविला ।।
मुक्ताई घरी मुक्त होऊ या चला ।। २ ।।
चांगदेव व्याघ्रावर बसुनि भेटला ।
बालबुद्धि म्हणूनि त्यास जवळ घेतला ।।
पोर असूनि थोरला शिष्य बनवला ।
मुक्ताईपरी मुक्त होऊ या चला ।। ३ ।।
बंधु तीन असून बहिण दीन जाहली ।
मर्यादा लोकांना मुळी न राहिली ।।
निंदेला कंटाळून गाव सोडला ।
मुक्ताईपरी मुक्त होऊ या चला ।। ४ ।।
रानामधी मुक्तेला वीज भेटली ।
कळवळुनी लेकीला मिठीत घेतली ।।
ज्योतीला तेजातच ठाव लाभला ।
मुक्त मने मुक्त खरे गाऊ या चला ।। ५ ।।' [१७]

**

# मुक्ताबाईचा जीवनपट

जन्म– अश्विन शुद्ध प्रतिपदा, घटस्थापना (शके ११९९ किंवा शके १२०१)

ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा

मातापित्यांचा देहोत्सर्ग

ज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेली सनद

विसोबा खेचर शरण आले

शुद्धिपत्र मिळविण्यासाठी पैठणला

ताटीच्या अभंगांद्वारे ज्ञानेश्वरांना विनवणी

ज्ञानेश्वरांकडून ज्ञानेश्वरीची निर्मिती

मुक्ताबाईने चांगदेवांना 'पासष्टी'चा अर्थ सांगितला.

मुक्ताबाईचा पहिला शिष्य – चांगदेव

नामदेवांची भेट

गोरक्षनाथ कृपेचा वर्षाव

अमृतसंजीवनीची प्राप्ती

चिरकाळ निरंतर अभंग शरीराचे मिळालेले वरदान

निवडक शिष्यांसमवेत अज्ञातवास

तीर्थयात्रेवरून परतलेल्या ज्ञानेश्वरादींची भेट

ज्ञानेश्वरांची समाधी – आळंदी

सोपान व वटेश्वरांची समाधी – सासवड

चांगदेवांची समाधी – पुणतांबे

आपेगावी मुक्काम

वेरूळ, घृष्णेश्वर मुक्कामी

'ज्ञानबोध' ग्रंथाची निर्मिती

तापीतीरी स्वरूपाकार झाली – वैशाख वद्य दशमी (वयाच्या अठराव्या वर्षी)

**

# मुक्ताबाईच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या स्थळांचा नकाशा




# मुक्ताबाईची जन्मकुंडली

केशव भिकाजी ढवळे संस्थेतर्फे प्रकाशित झालेल्या 'कुंडली संग्रह' याच्या पहिल्या भागातून खालील कुंडली घेतली आहे.

**जन्म :** शके १२०१ आश्विन शुद्ध प्रतिपदा, शुक्रवार, मध्यान्ही
**जन्मस्थळ :** आळंदी

मुक्ताबाई आणि तिची भावंडे ही सारी जन्मापासूनच अलौकिक जीवन जगली. त्यांच्या या असामान्य जीवनाचे पडसाद त्यांच्या जन्मकुंडलीमध्ये कोठे पडलेले दिसते का ? याचा शोध ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासकांना घेता यावा या भूमिकेतूनच केवळ या कुंडलीचा येथे समावेश केला आहे.




**स्पष्ट ग्रह :**

लग्न ०२-५४, चंद्र १४-२७, रवी ०८-३७, मंगळ २८-११, बुध ०४-१२, गुरु ०१-३६ शुक्र ०६-२७, शनी ११-१५, राहु ०१-३०, हर्षल २१-२४, नेपच्युन २७-२४, प्लुटो ०५-४२

**

# सार्थ अभंगांची सूची


| | अभंग | पान |
|---|---|---|
| मुक्त जीव सदा होति पैं नामपाठे | १ | १८० |
| शून्यापरतें पाही तंव शून्य तेंही नाहीं | २ | १८० |
| प्रकृति निर्गुण प्रकृति सगुण | ३ | १८१ |
| अलिप्त संसारीं हरिनामपाठें | ४ | १८२ |
| आधी तूं मुक्तचि होतासिरे प्राणिया | ५ | १८२ |
| नाम मंत्रें हरी निजदासा पावे | ६ | १८३ |
| भजनभावो देहीं नित्यनाम पैठा | ७ | १८४ |
| मुक्त पैं अखंड त्यासि पैं फावले | ८ | १८४ |
| मुक्तामुक्त दोन्ही नाईकतो कर्णी | ९ | १८५ |
| आदि मध्य ऊर्ध्व मुक्त भक्त हरी | १० | १८६ |
| आदि अंतु हरि सर्वांघटी पूर्ण | ११ | १८६ |
| परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा | १२ | १८७ |
| सर्वी सर्व सुख अहं तेचि दु:ख | १३ | १८८ |
| पूजा पूज्य वीते पूजक पैं चित्तें | १४ | १८९ |
| अविट न विटे हरिचे हे गुण | १५ | १८९ |
| व्यक्त अव्यक्तीचें रूपस मोहाचें | १६ | १९० |
| मनें मन चोरी मनोमन धरी | १७ | १९१ |
| सर्व रूपीं निर्गुण संचलें पैं सर्वदा | १८ | १९२ |
| उर्णाचिया गळां बांधिली दोरी | १९ | १९२ |
| सहस्त्रदळीं हरि आत्मा हा कुसरी | २० | १९३ |
| नादाबिंदा भेटी जे वेळीं पैं जाली | २१ | १९४ |
| देउळींचा देवो घरभरी भावो | २२ | १९४ |
| विश्रांति मनाची निजशांति साची | २३ | १९५ |
| मुक्तपणें सांग देवो होय देवांग | २४ | १९६ |
| अंतर बाह्य निके सर्व इंद्रियांचे चोज | २५ | १९६ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| नामबळें देहीं असोनियां मुक्त | २६ | १९७ |
| करणें जंव काही करूं जाये शेवट | २७ | १९८ |
| मुक्तपणें ब्रीद बांधोनियां द्विज | २८ | १९८ |
| उजिवडु कोडें घेतसो निवाडें | २९ | १९९ |
| विस्तारूनी रूप सांगितलें तत्त्वीं | ३० | २०० |
| मुक्तामुक्त कोडें पाहिलें निवाडें | ३१ | २०० |
| निर्गुणाची सेज सगुणाची बाज | ३२ | २०१ |
| दिवसा शीतळ निशियेसी बरळ | ३३ | २०१ |
| जेथें जे पाहे तें तेथें आहे | ३४ | २०३ |
| पूर्णपणे सार अविट आचार | ३५ | २०३ |
| आदि मध्य अंतु न कळोनि भ्रांतु | ३६ | २०४ |
| मुक्तलग चित्तें मुक्त पैं सर्वदा | ३७ | २०४ |
| चित्तासी व्यापक व्यापुनियां दुरी | ३८ | २०५ |
| प्रालब्ध संचित आचरण गोमटें | ३९ | २०६ |
| शांति क्षमा वसे देहीं देव पैसे | ४० | २०७ |
| देउळाच्या कळशीं नांदे एक ऋषी | ४१ | २०७ |
| मुंगी उडाली आकाशीं | ४२ | २०८ |


**

# संकलित अभंगांची सूची


| अ | अभंग | पान |
|---|---|---|
| अमृत टाकून कांजीची आवडी | ७३ | २२६ |
| अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला । | २९ | २१५ |
| अंतर बाहेर भाजूं आम्ही कुंभ | ८० | २२८ |
| अंतरीचे सुख कैसे पै | १०३ | २३३ |
| अवघाचि संसार केला | ४८ | २१८ |
| अवघी साधने हातवटी । | १९ | २१३ |
| असत्य न बोलों तोंडे | ६४ | २२४ |
| अकार उकार मकार नि:शून्य | ५४ | २२१ |
| अहं सोहं दोन्ही । | ११२ | २३६ |
| अहंकार अविद्या हेंचि पैं घोंगडी । | ४० | २१७ |
| अव्यक्त व्यक्तीचे रूपस | ९५ | २३२ |
| अखंड जयाला देवाचा शेजार | ७० | २२६ |
| अष्टभाव किरणें फाकती | १०८ | २३४ |
| अगं बाई बाई । | ८५ | २२९ |
| अक्षराचे नाव काय । | ६५ | २२४ |
| अर्था अर्थ करून | १८९ | २५६ |
| अर्धमात्रुकेण कोण्ही द्रिष्ट | १५६ | २४८ |
| अनंती अनंत श्रुतींचा इत्यर्थ । | ५१ | २२० |
| अनुभवूनी सार ज्याचें | १९३ | २५७ |
| **आ** | | |
| आणि ममता पाश | १७० | २५१ |
| आम्ही कर्मी ना धर्मी | ९६ | २३२ |
| आरते ये ग धाकटे मुली । | ८४ | २२९ |
| आवेगे ज्ञानजननी ज्ञाना | १३६ | २४३ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| आत्मरूपीं पडली दिठी | ८९ | २३१ |
| आकाशाचा शेंडा घार रांधी मांडा । | ३६ | २१६ |
| आकाशी अवकाश नवते | १४१ | २४४ |
| आहे आहे म्हणून पाहों | ९८ | २३२ |
| आपुलिया मारुनी येई कां भेटी । | २८ | २१६ |
| आपुले धरील धैया | १११ | २३६ |
| आटीले वेठीले रोमांच | १७२ | २५१ |
| आता सींधुचें मंथन | १४७ | २४६ |
| आतां सांगु मी सांगु मी | ९९ | २३३ |
| **उ** | | |
| उबगले संसारा मजला | ५६ | २२२ |
| उलट उलट माघारा प्राण्या | ५७ | २२२ |
| उघडी होऊनि फुगडी घाली | ८२ | २२९ |
| उंसाचे शेजारी येरंडाचे झाड | ७४ | २२७ |
| **ए** | | |
| एक आपण साधु झाले । | १३ | २१२ |
| एक नळकंठ धुळीचे | १७३ | २५१ |
| एका समुद्राचे तीरी । | ६६ | २२४ |
| ऐकें चांगया फळ फळासि आलें । | २४ | २१४ |
| **क** | | |
| कमलकंद चतुरानन | १२० | २३८ |
| का रे अनाथबंधू । | ६१ | २२३ |
| कुलाल आपुल्या घरीं | ७८ | २२७ |
| कुलालाचे कुंभ भाजल्याविण | ७७ | २२७ |
| कांही तें बाही बाही तें कांहीं | १०६ | २३४ |
| क्रोध यावा कोठे । | १८ | २१३ |
| कृपा झाली आतां आली | ६ | २११ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| **ग** | | |
| गगनामाजी झरे लागले पाण्याचे | ९३ | २३१ |
| गिरी गव्हर कशासाठी । | १७ | २१३ |
| गुरु मंकळमुर्ती द्यावा | १४४ | २४५ |
| गुरु आदिमूर्ती सिद्धाय | १६९ | २५१ |
| गुरुकृपा झाली प्रत्ययासी आली । | ४ | २१० |
| गुरुदेव देवा आवडीच | १६७ | २५० |
| गुण ना निर्गुण शब्दातीत । | २५ | २१४ |
| गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला | २६ | २१४ |
| गोरा बोलाविला जुनाट | ७९ | २२८ |
| **घ** | | |
| घटामधें पाणी पाण्यामध्यें घट | ९१ | २३१ |
| घेउनी विकाराचे हाती | १५४ | २४७ |
| **च** | | |
| चाऱ्ही बरोबर युगे हे | १४० | २४४ |
| चिकट बोरांटीने त्रिभुवन | १५५ | २४७ |
| चोरीचे धन जन्माची | १४९ | २४६ |
| चौदाशे वरुशें शरीर केलें जतन | ७६ | २२७ |
| चांगा जन्मला माध्यान्ह काळीं । | ३१ | २१५ |
| **छ** | | |
| छायेची हे माया | १८५ | २५४ |
| **ज** | | |
| जयालागी योगी शिणती साधनी । | ५२ | २२१ |
| जग हे ब्रह्म दिसे उघडे । | ४६ | २१८ |
| जाईना शरीर आज्ञेवीण | १७६ | २५२ |
| जाणते नेणा नेणते जाणा | ९२ | २३१ |
| जीवाचा हा शिव जाला | ११८ | २३८ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| जे येकी करावे ते | १७९ | २५३ |
| जेव्हां पांची गुण एका | १९५ | २५८ |
| जेथें निजध्यास सद्गुरुचा | ११७ | २३७ |
| जेथें एक दुजें नाहीं । | ३३ | २१५ |
| **झ** | | |
| झालासी हरिभक्त तरी | ७१ | २२६ |
| झालासी तटस्थ नव्हे ती समाधि | ६३ | २२४ |
| **ट** | | |
| टेंकावरी टेंक त्यावरी टेकुली । | ३५ | २१६ |
| **त** | | |
| तळहातिच्या पाण्यांत | २०१ | २६१ |
| तियेचिया नादें जग | १६० | २४८ |
| तिखट माथा शेंडा | १०१ | २३३ |
| तुम्ही विवेकाविवेक बरा | १३७ | २४३ |
| तेथे मताची उजरी | १२४ | २३९ |
| तेथे आउतापरी | १२९ | २४० |
| तेथे अजपाचे जे कुळ | १२५ | २३९ |
| तेथे एकले एकलेचि जाणे | १०२ | २३३ |
| तेथे सुख परम धाम | १२७ | २४० |
| तेथें आदित्य टाकुनी | १३४ | २४२ |
| त्याच्या रागे रोगे | १७५ | २५२ |
| त्याच्या शाखा मुळ्या | १५३ | २४७ |
| **थ** | | |
| थै थै म्हणका रे गोपाळा । | ६९ | २२५ |
| **द** | | |
| देवी देवो जाला भावासी | ४३ | २१७ |
| दृश्य आणि द्रष्टा हे पैलीकडे । | ३७ | २१६ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| द्वैताद्वैत केले हे | १६४ | २४९ |
| **ध** | | |
| धन्य धन्य सद्गुरु राय | ४९ | २१९ |
| धावेना हे मुळ | १६३ | २४९ |
| **न** | | |
| नयनांत नयन पाहे त्रिभुवन | १०४ | २३३ |
| नवल हे आवमाने | १७१ | २५१ |
| नव्हे हा शब्द नव्हे | १४६ | २४५ |
| नव्हे ती अंगुष्ट | १६६ | २५० |
| नाही त्याला धर्म | १८६ | २५५ |
| नाहीं सुखदु:ख पापपुण्य नाहीं । | २१ | २१४ |
| नाना रंगाचे अर्क | १२६ | २४० |
| निवृत्तीने दिली शक्ति | ८८ | २३० |
| निवांताचे ठायी सद्गुरु | ११९ | २३८ |
| निष्काम राम जपा रे । | ५८ | २२२ |
| निर्गुणाचा संग मला आजि | ६२ | २२३ |
| नेमीला जो सिद्धांत | १५८ | २४८ |
| नोवरीचे पोटीं नवरा जन्मला | ४४ | २१७ |
| **प** | | |
| पहिली माझी ओवी । | ९४ | २३२ |
| पहिली माझी ओवी । | १३५ | २४२ |
| पाण्यामाजी पाणी पावक | १५७ | २४८ |
| पाण्याचा बुडबुडा पाण्यांत | २०२ | २६१ |
| पुत्राने पीत्याते काय | १४२ | २४४ |
| पुढति देखावया सार | १३२ | २४१ |
| पुढें धूम्रकारी उदय होवुनि | ११६ | २३७ |
| पूर्णिमेचे दिवशी चंद्र झाला अस्त । | ५ | २११ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| पूर्वी ज्या उजेडी शोधीयल | १४९ | २२२ |
| पूजा प्रदक्षणा जाली पंच | १९२ | २५७ |
| पैल राऊळ महाद्वार | १३० | २४१ |
| पैल पैल ते कांही नाही | ९७ | २३२ |
| प्रथम हा पाया | १८३ | २५४ |
| प्रथम जे आंडे | १९० | २५६ |
| **ब** | | |
| बाई मी जाते माहेराला । | ५५ | २२१ |
| बाळक चुकलें सुकुमार तान्हुलें । | २७ | २१४ |
| बाप भाग्याचा योगिंद्र | १२१ | २३८ |
| बीजावीण वृक्ष कैचा | १९७ | २५९ |
| बुथिचेनि बोले नाहीं मविले । | ३९ | २१६ |
| बोलला तो कोण दिसा | १६२ | २४९ |
| बोलोनियां येणें वाढविला | ७२ | २२६ |
| ब्रह्म जैसें तैशापरी । | १४ | २१२ |
| ब्रह्मांडाच्या कोटी संसार | ८७ | २३० |
| **भ** | | |
| भाव एक । मी सद्गुरुची लेक | ६० | २२३ |
| भावे भक्ति करूनि वैराग्य जोडसी | ४२ | २१७ |
| भासा आभासाचें काय | १९९ | २६० |
| भासा आभासाची दर्पणाची | ११५ | २३७ |
| भोईचे मार्दव । सांगे | १०९ | २३५ |
| **म** | | |
| मन माया नव्हति | १९४ | २५८ |
| मरते ते काय जन्मा येते | १४८ | २४६ |
| मकाराचे माथा काय वस्तु | ६७ | २२५ |
| मकाराचे माथा झळकेचि चांदणी | ६८ | २२५ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| मग रोमांच शृंखळा | १२२ | २३९ |
| मग चक्राकाराची बुंथी | १२३ | २३९ |
| मातीचीं भिंताडें चालवितो मढी | ८६ | २३० |
| मी माझें दुरित आशापाश चित्तीं । | २३ | २१४ |
| मी सद्गुरुची लेक । | ८३ | २२९ |
| मुक्त होतासि तो कां बद्ध झालासी | ४१ | २१७ |
| मुक्ताबाई म्हणे देवा | ८१ | २२८ |
| मूळद्वारीं दादा स्थापिला गणपती । | २ | २१० |
| मंगल ते नाम मंगल ते धाम । | ५३ | २२१ |
| मंगलमूर्ति मंगलध्यान | ११० | २३६ |
| **य** | | |
| येकां अधिकार । | ११३ | २३६ |
| येके हाके सारिसे | १६१ | २४९ |
| योगी पावन मनाचा । | ९ | २११ |
| **र** | | |
| रचोनिया घट कारण ते | १७७ | २५२ |
| राउळींचे कर चुकले जाण । | ३४ | २१६ |
| रूप ना छाया त्रिगुणरहित । | ३० | २१५ |
| **ल** | | |
| लटकीच खटपट रे प्राण्या । | ४७ | २१८ |
| **व** | | |
| वरी खाले पाह | १७४ | २५२ |
| वरी झळफळीत ढवळे | १२८ | २४० |
| वरी झाला भगवा जाण । | ११ | २१२ |
| वरी नारायण अचळ हा | १८२ | २५४ |
| वरील्या आधारे धरीला | १८१ | २५३ |
| वऱ्हाडी आले संसारनगरा । | ४५ | २१८ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| वाह वाह साहबजी | ५० | २१९ |
| विरक्त म्हणावी आणि इच्छेचा | ९० | २३१ |
| विकल्पाचा गुण कोण्हा | १९८ | २५९ |
| विटेवरी मूर्ती दिसते सगुण । | १ | २१० |
| विद्येची अविद्या जाली | १३९ | २४४ |
| वेष्टीली जे माया | १९१ | २५६ |
| वेव्हारे मातले | १८० | २५३ |
| वेदश्रुति ठक पडियेले वाचा | १०० | २३३ |
| वेदश्रुति ठक पडियेले वाचा । | ३८ | २१६ |
| वेदासी हे पुरेना श्रुतीसही | १४५ | २४५ |
| वेदानें ह्या विद्या होती | २०० | २६० |
| व्यर्थ भुललासी काय राया | ५९ | २२२ |
| **श** | | |
| शरीर भावना निवेदीत | १५२ | २४७ |
| शिष्याचे स्वहीत चोरुं नय | १५० | २४६ |
| शुंभनिशुंभ दोन्ही हेचि | १६८ | २५० |
| **स** | | |
| सर्वत्याचे घरी विस्तारीली | १५९ | २४८ |
| सर्वांतुनि वेगळा हाती कैसा येई । | ३ | २१० |
| सत्वगुणा विचारली आपणा | १३३ | २४१ |
| सहज समाधि लागली निर्गुणीं । | ७ | २११ |
| साकारिलें ब्रह्म रुपासि आलें | १०५ | २३४ |
| सागरी रिघो मनाचिया | १४३ | २४५ |
| सुई अग्र भागात | १३१ | २४१ |
| सुख सागर आपण व्हावे । | १५ | २१२ |
| सुखसागरी ठाव झाला । | १० | २१२ |
| सुखाचे शेवटीं दु:ख आलें भेटीं । | ३२ | २१५ |

| | अभंग | पान |
|---|---|---|
| संत पाहुणेरा सज्जनाचे घरीं | ७५ | २२७ |
| संत जेणे व्हावे । | ८ | २११ |
| संत तेचि जाणा जगीं । | १२ | २१२ |
| सांडी कल्पना उपाधी । | १६ | २१३ |
| सांडी ते मांडी मांडी | १०७ | २३४ |
| स्थावर कुंडलिनी | ११४ | २३७ |
| स्वये विचारिली पातके | १५१ | २४६ |
| स्वरुपी गळित पत्र | १८७ | २५५ |
| स्वप्नींचा आत्मा केउता आहे । | २० | २१३ |
| स्वामी दयामूर्ति स्वता | १९६ | २५८ |
| **ह** | | |
| हा यो योग करीता | १८४ | २५४ |
| हातापायावीण | १६५ | २५० |
| हेमीं हेम प्रचित पाहीं । | २२ | २१४ |
| होउनी कासाविस काय | १८८ | २५५ |
| होते स्नेहरुपे मायवीण | १७८ | २५३ |


**

# प्रकरणशः संदर्भसूची

## विभाग एक

मुक्ताबाईचे जीवन

### चित्कला मुक्ताबाई


१ दिव्योन्मेष त्रैमासिक, जुलै-ऑगस्ट १९९४, स्वामी विद्यानंद

२ ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई, डॉ.अशोक कामत

३ मुक्ताबाई अप्रसिद्ध अभंग, अभंग १, आसनाचिया पाउटी...

४ श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद, अभंग ६

५ श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद, अभंग १६

६ श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद, अभंग १७

७ मुक्ताबाई अप्रसिद्ध अभंग २१, पैल राऊळ...

८ मुक्ताबाई अप्रसिद्ध अभंग २१, पैल राऊळ...

९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ६९३, ऐकोनी ऐसी नावे..

१० श्रीज्ञानदेव यांचे चरित्र, ले.भिंगारकर, द्वितीय आवृत्ती, पान ६७

११ श्रीज्ञानदेव यांचे चरित्र, ले.भिंगारकर, द्वितीय आवृत्ती, पान ६५

१२ ताटीचे अभंग

१३ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १५५४, ऐसा बहुत...

१४ मुमुक्षू, मार्च-एप्रिल १९२७, मुक्ताबाईचे अभंग, अभंग ५, विरक्त ...

१५ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चांगदेव चरित्र

१६ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चांगदेव चरित्र

१७ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चांगदेव चरित्र

१८ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चांगदेव चरित्र

१९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०१, अखंड जयाला

२० सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०३, झालासी हरिभक्त..

२१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०६, उसाचे शेजारी...

२२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०६, उसाचे शेजारी...

२३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०६, उसाचे शेजारी...

२४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०७, संत पाहुणेरा...

२५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०९, निवृत्तिदेव म्हणे...

२६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११०, कुलालाचे कुंभ...

२७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११०, कुलालाचे कुंभ...

२८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १११, कुलाल आपुल्या...

२९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर ...

३० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११२, गोरा बोलाविला ...

३१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११५, परस्परे गुह्य ...

३२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२३, हातात नरोटी ...

३३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२३, हातात नरोटी ...

३४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११६, हांसोनी सोपाने ...

३५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११६, हांसोनी सोपाने ...

३६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११७, जव्हारियाचे पुढे...

३७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२०, अंतर बाहेर ...

३८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२१ व १२४, उद्विग्न मनी ...

३९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४८, तेथे माय...

४० मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५६, अहो जी...

४१ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ९५, त्रिविध...

४२ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग ३९, आता सांगू मी...

४३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७, लय ना ..

४४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ८, मृत्तिकेचेनि ...

४५ ज्ञानदेवकृत मुद्राप्रकरण, ओवी १२ व १३

४६ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २३४, नुघडी तो दृष्टी...

४७ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३९, प्रालब्ध संचित...

४८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ४०, शांति क्षमा...

४९ ज्ञानेश्वरी, अध्याय १, ओवी ६०

५० मुमुक्षू ,मार्च-एप्रिल १९२७, श्रीमुक्ताई अभंग १, मातीची भिंताडे...
५१ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १०, आदि मध्य ...
५२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २४, मुक्त होतासि ...
५३ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ४२, मुंगी उडाली ...
५४ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १८, टेकावरी टेक ...
५५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ६६८, कृपेच्या सागरे ...
५६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७६४, पंढरीचा पोहा ...
५७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८५१, निवृत्ति म्हणे ...
५८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८५१, निवृत्ति म्हणे ...
५९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७५३, सत्य सत्य जनार्दन ...
६० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७५८, भगवंत म्हणे ...
६१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७९३, फार आठवते ...
६२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७९३, फार आठवते ...
६३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८१८, निवृत्तिदेव म्हणे ...
६४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८४८, सोपान वटेश्वर ...
६५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८६४, निवृत्ति मुक्ताईने ...
६६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८७७, नाना दु:ख ...
६७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८७९, कृपावंत झाली ...
६८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८८७, नमो अनादि ...
६९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८९२, भूचरी खेचरी ...
७० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८९९, निवृत्ति मुक्ताईने ...
७१ ज्ञानबोध ग्रंथ, संपादक - श्री.सुरेश जोशी
७२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०७, निवृत्तिने एकांत ...
७३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०८, आमुच्या स्वस्थानी ...
७४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१२, उघडिल्या दिशा ...
७५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९११, ऋषि म्हणती ...
७६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१४, पूजियेली तापी ...

७७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१९, जे जे सुख ...

७८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१८, अविट बोलणे ...

७९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१८, अविट बोलणे ...

८० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९३८, गेले दिगंबर ...

## धाडा बोलावणे गोरोबाला

१ सकलसंतगाथा, संपा.जोशी, खंड २, अभंग १३३७, अखंड जयाला..

२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १०९, निवृत्तिदेव म्हणे ...

३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १११, कुलाल आपुल्या ...

४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११२, गोरा बोलाविला...

५ ज्ञानेश्वरांची प्रभावळ, ले. ल.रा.पांगारकर

६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २१९९, आषाढी पर्वणी...

७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११७, जव्हारियाचे पुढे ...

८ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १०, निवांताचे ठायी ...

९ श्रीज्ञानेश्वरदर्शन, भाग १, संपा.ना.ब.देशमुख, ज्ञानदेवांचा नाथपंथ, ले. श्री.ना.य.मिरीकर

१० श्रीज्ञानेश्वरदर्शन,भाग १, ज्ञानदेवांचा नाथपंथ, ले.- श्री.ना.य.मिरीकर

११ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९३०, नमो गणपति ...

१२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर ...

१३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर ...

१४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग २४, सत्वगुणा...

१५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ३३८, जो जो जो जो रे ...

१६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २२३७, राईयेवढे पाखरू ...

१७ सकलसंतगाथा, संपा.जोशी, खंड २, अभंग १३५०, निवृत्तिदेव ...

१८ गुरुमाऊली, १९८९, संपा.डॉ.रा.चिं.ढेरे, पान १२९

१९ गुरुमाऊली, १९८९, संपा.डॉ.रा.चिं.ढेरे, पान १२९

२० शिवकल्याणकृत नित्यानंदैक्यदीपिका, प्रकरण १०, ओवी ५४-५६

२१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११७, जव्हारियाचे पुढे...

## गोरक्षे अनुग्रह मुक्ताईस केला

१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११०, कुलालाचे कुंभ...

२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११०, कुलालाचे कुंभ...

३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १११, कुलाल आपुल्या...

४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर...

५ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, अभंग १३४८, गोरा जुनाट..

६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १८, तेथे सुख ...

७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १९, वरी झळफळीत...

८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११२, गोरा बोलाविला ...

९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग २४, सत्वगुणा विचारली ...

१० ज्ञानबोध, प्रतिउत्तर मुक्ताबाइचे अभंग, अभंग १, पूर्वी ज्या उजेडी ...

११ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती १,अष्टभाव किरण...

१२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर...

१३ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती १,अष्टभाव किरण...

१४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ०५, स्थावर कुंडलिनी ...

१५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४२, मेरुमांदार गण गोपुरे ...

१६ सकलसंतगाथा, संपा.जोशी, खंड २, अभंग १३५०, निवृत्तिदेव...

१७ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, अभंग १३५०, निवृत्तिदेव...

१८ मुमुक्षू , मे-जून १९२७, श्रीमुक्ताबाईचे अभंग ०४, येका अधिकार ...

१९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११५, परस्परे गुह्य...

२० सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२३, हातात नरोटी ...

२१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११६, हांसोनी सोपाने...

२२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११६, हांसोनी सोपाने...

२३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४७, सव्यभागी दिसो ...

२४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ३१, अहो जी बैसा ...

२५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७४, कैसी मनाची भ्रांती ...

२६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५६, अहो जी तुम्ही..

२७ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती ३,प्रथम आरति...

२८ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ६५, मग निर्गुण ...
२९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ६९, जे अगम्याचे...
३० मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७३, अनंत जन्मीचे ...
३१ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरती ५, तप्ति तप्तेश्वरी ...
३२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७१, आणि देखिले ...
३३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७८, कुसुमकांती अगम्य...
३४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ८३, ऐसा डोळियां डोळा ...
३५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११७, जव्हारियाचे पुढे...
३६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ३, अहं सोहं दोन्ही...
३७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग २, आपुले धरील ...
३८ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १३, मग रोमांच शृंखळा...
३९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १२, बाप भाग्याचा ...
४० मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १२, बाप भाग्याचा ...
४१ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग २०, तेथे आउतापरि ...
४२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ८, जेथे निदिध्यास ...
४३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १७, नाना रंगाचे अर्क ...
४४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १४, मग चक्राकाराची ...
४५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १३, मग रोमांच शृंखळा...
४६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १०, निवांताचे ठायी ...
४७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १२, बाप भाग्याचा ...
४८ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १३, मग रोमांच शृंखळा...
४९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७५८, भगवंत म्हणे ...
५० श्रीज्ञानदेवकृत मुद्राप्रकरण, ओवी १२, १३
५१ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, अभंग १३४८, गोरा जुनाट..
५२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११५, परस्परे गुह्य...
५३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४०, तो मोहितपणे पाही ...
५४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११६, हासोनि सोपानें ...
५५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११७, जव्हारियाचे पुढे...

५६ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, अभंग १३५५, उद्विग्न ...
५७ सकलसंतगाथा,  खंड २, अभंग १२०, अंतर बाहेर...
५८ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरती १४, गुण आणि गंभीर ...
५९ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती ७, लय ना लक्ष ...
६० मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती १०, वटेश्वर देवो ...
६१ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती ११, भोईचे मार्दव...
६२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४८, तेथे माय मी ...
६३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५६, अहो जी तुम्ही ...
६४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ९५, त्रिविध ताप ...
६५ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती १,अष्टभाव किरण...

## मुक्ताबाईचा अज्ञातवास

१ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग १, मातीची भिंताडे ...
२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १०, आदि मध्य ...
३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८८९, पुंडलिके धरिला ...
४ मुमुक्षू , मेजून १९२७, आरती क्र. ५, तप्ती तप्तेश्वरी...
५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७२७, भक्त अमर ....
६ मिथकवाणी, १९९५, मुक्ताबाईचे नवे गाणे ...
७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७६४, पंढरीचा पोहा...

## तववरी तिचे शरीर अभंग चिरकाळ निरंतर

१ नामदेवगाथा, शासकीय प्रत, अभंग १०२४, तरी नाथाचा हात ...
२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ९११, ऋषी म्हणती ...
३ सकलसंतगाथा, संपा.जोशी, खंड २, अभंग ११९४, अविट बोलणे...
४ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४६, नाथाचे आश्रमी ....
५ चांगदेव वटेश्वरकृत तत्त्वसार, ओवी क्र. ६६ ते ६९
६ विविधा मधून उद्धृत, दीपरत्नाकर, ४.८५-८७

७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०७, निवृत्तिने एकांत ...

८ दि ग्रेट वुमेन ऑफ इंडिया, अनुवाद - डॉ.सौ. शरयु बाळ

९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९११, ऋषी म्हणती हरि..

१० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१३, ज्ञानेश्वरा तुम्ही निरविले ...

११ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१४, पूजियेली तापी ...

१२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०७, निवृत्तिने एकांत ...

१३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९११, ऋषी म्हणती हरि ...

१४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०८, आमुच्या स्वस्थानी ...

१५ श्रीज्ञानेश्वरांची मुक्ताबाईस सनद, अभंग १२, पूर्णिमेचे दिवशी ...

१६ श्रीज्ञानेश्वरांची मुक्ताबाईस सनद, अभंग १६, सहज समाधि ...

१७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १४, मग चक्राकाराची...

१८ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरत्या सोळा, आरती १४,भोईचे मार्दव...

१९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १९, वरी झळफळीत...

२० ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १०, बीजाविण वृक्ष ...

२१ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १८, तळहातिच्या ...

२२ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग २, अणुभउनी सार ...

२३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ९, जीवाचा हा शिव...

२४ सकलसंतगाथा, संपा.जोशी, अभंग ११८५, ११८६, टाळ विणे ... निवृत्तिराज म्हणे...

२५ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, अभंग १३८७, आप तेज...

२६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१४, पूजियेली तापी ...

*

## विभाग दोन

### मुक्ताबाईची प्रभावळ

### मुक्ता सख्यत्व आम्हा अर्था प्रसवू लागे

### (मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ अनुबंध)

१ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३५, पूर्णपणे सार ...

२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३, प्रकृति निर्गुण ...

३ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग ११, आढळले मज...

४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११३, मोतियांचा चूर ...

५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ३३, तेथे पुत्रपणाची पवित्रता...

६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५, भासा आभासाची ...

७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४१, संचयाचा साचा ...

८ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४१, संचयाचा साचा ...

९ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४१, संचयाचा साचा ...

१० मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४६, मग लोळू लागे ...

११ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४८, तेथे माय मी प्रांजळ ...

१२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४६, मग लोळू लागे ...

१३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ३७, नवविध परमानंदु ...

१४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४८, तेथे माय मी ...

१५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ४९, अहो जी पूजा ...

१६ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५०, अनेक परीचा अनेग ...

१७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९२०, गहिनीनाथे मज ...

१८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१७, टाळ हे मृदंग ...

१९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१८, अविट बोलणे ...

२० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८१८, निवृत्तिदेव म्हणे सांगतो ....

### ज्ञानराज ओवाळी अहो मुक्ताबाई

### (मुक्ताबाई आणि ज्ञानेश्वर अनुबंध)

१ मुक्ताबाईस सनद, अभंग १० ...

२ मुक्ताबाईस सनद, अभंग १५ ...

३ मुक्ताबाईस सनद, अभंग १६ ...

४ मुक्ताबाईस सनद, अभंग १७ ...

५ सकलसंतगाथा, खंड ५, ओवी ६४, चालिले ब्राह्मण ...

६ ज्ञानराज मुक्ताई विशेषांक, १९८०

७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७१, आणि देखिले स्वप्नी ...

८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ८१९, विश्व ब्रह्म ...

९ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १२४, देहभाव ठेवावे ....

१० सकलसंतगाथा, खंड १, अभंग १३२, अनुभव खूण ...

११ श्रीज्ञानदेवकृत कल्याणपत्रिका

१२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ९४४, लक्ष चौऱ्यांशी ...

१३ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग १, मातीची भिंताडे ...

१४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७२८, मग संतोष झाला ...

१५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७९३, फार आठवते निवृत्तिचे ...

१६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८१६, देव म्हणे ऐसे ...

१७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८२६, निवृत्तिने बाहेर ...

१८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २१९, आवेगे ज्ञानजननी ...

१९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २७६, ज्ञानेश्वर अभंग ...

२० मुमुक्षू , मे-जून १९२७, आरती ३, अहो मुक्ताबाई ....

## सोपानदेवास कृपा तिची

### (मुक्ताबाई आणि सोपानदेव यांच्यातील अनुबंध)

१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८९९, निवृत्ति मुक्ताईने ...

२ ज्ञानप्रदीप, ले. शिवदिनकेसरी

३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ९१, ते निराकाराची ...

४ मुमुक्षू , मे-जून १९२७, आरती ४, सप्तमुखे गोदा ...

५ मुमुक्षू , मे-जून १९२७, सोपानदेवांचे अभंग, मुक्तिकेचेनि घटेविण ...

६ मुमुक्षू , मे-जून १९२७, सोपानदेवांचे अभंग, तप्ती तप्तेश्वरी ...

७ मुमुक्षू , मे-जून १९२७, सोपानदेवांचे अभंग, तप्ती तप्तेश्वरी ...

८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८६४, निवृत्ति मुक्ताईने धरियले ...

## मुक्ताईने बोध खेचरासी केला

## (मुक्ताबाई आणि विसोबा खेचर यांच्यातील अनुबंध)

१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १४४, श्रवणी सांगितली मात ...

२ गुरुमाऊली, १९८९, पान १७८

३ गुरुमाऊली, १९८९, पान १७८

४ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ११, अविनाश पाळणा ...

५ गुरुमाऊली, १९८९, पान १७८

६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १३५, सर्वकाळी परमात्मा ...

७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १४७, आधी चैतन्य अपैते ...

८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९२०, गहिनीनाथे मज ...

९ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग १३, आहे आहे ...

१० मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग १४, आता सांगू ...

११ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७, लय ना लक्ष ...

१२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ८, मृत्तिकेचे घटेविण ...

१३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ९, भला रे भला ...

१४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११५, परस्परे गुह्य ...

१५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १४२, सुखाचे सुखरुप ...

१६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १४९, येथोनि तेथवरी ...

१७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १४२, सुखाचे सुखरूप ...

१८ विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ८१, ८४

१९ विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ३९,४३,४४

२० विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ३५

२१ विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ५२

२२ विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ५३

२३ विसोबा खेचरकृत शडुस्छळि, गुरुमाऊली, ओवी ५४

## लहानसी मुक्ताई जैसी सणकांडी

### (मुक्ताबाई आणि नामदेव यांच्यातील अनुबंधाचा वेध)

१ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४५, मुक्तपणे मुक्त ...
२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ६५, सोय सांडिली ...
३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९८, उठले निवृत्ति...
४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ११८, संतसमागम फळलारे ...
५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२१, न पुसता संता ...
६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२४, म्हणती घेतल्या ...
७ ज्ञानराज, मुक्ताई विशेषांक
८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १२८, संतांसी विन्मुख ...
९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग १३२, देव म्हणे ...
१० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७४२, ऐसे अलंकापूर ...
११ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७५७, क्षणक्षणा पंढरीनाथ ...
१२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ७५८, भगवंत म्हणे ...
१३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९००, पाहिलेगे माय ...
१४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१२, उघडिल्या दिशा ...
१५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१३, ज्ञानेश्वरा तुम्ही ...
१६ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९३८, गेले दिगंबर ...
१७ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५, तप्ती तप्तेश्वरी ...

## मुक्ताई सांगे खूण वटेश्वरा

### (मुक्ताबाई आणि वटेश्वर यांच्यातील अनुबंधाचा वेध)

१ शिवकल्याणकृत नित्यानंदैक्यदीपिका, प्रकरण १०, ओवी ३५४, ३५५
२ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग १०, वटेश्वर देवो तारक माझा ...
३ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ५, तप्ती तप्तेश्वरी ...
४ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग २, तप्ती तीरी देव ...
५ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३४, एकवीस सहस्त्र ...
६ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ६, ऐके चांगया ...

७ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३९, वळे ना वरुशे ...

८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८४४, भक्ताचे ते साह्य ...

९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८४७, वटेश्वरे वृत्तांत ...

१० गुरुमाऊली १९८९, पान १८६

११ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १५५३, ॐ नमो सिद्धासि ...

१२ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १५५३, ॐ नमो सिद्धासि ...

१३ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १५५३, ॐ नमो सिद्धासि ...

१४ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग ५, सोहं साहाकार ...

१५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८६१, नमो नमो गणपति...

१६ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग २, ब्रह्मांडाच्या कोटी ...

१७ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग ९, मी नाही आलो ...

## मुक्ताई जीवन चांगया दिधले

### (मुक्ताबाई आणि चांगदेव यांच्यातील अनुबंधाचा वेध)

१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८७६, चवदाशे वर्षे ...

२ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३३, पतिव्रता नारी ...

३ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३९, वळे ना वरुशे ...

४ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ११, अविनाश पाळणा ...

५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८६०, नमो ज्योतिर्मय ...

६ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग ३, साकारिले ब्रह्म ...

७ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग २९, चांगयाचे वऱ्हाड ...

८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ७३, वऱ्हाडी आले ...

९ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

१० सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

११ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

१२ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

१३ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

१४ मुमुक्षू , मार्च-एप्रिल १९२७, अभंग १६, तिखट माथा ...

१५ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २२, चांगदेवांचे अभंग, बुथिचेनि ...
१६ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १८, टेकावरी टेक ...
१७ गुरुमाऊली १९८९, पान २१५, ओवी १३, १४
१८ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८८९, पुंडलिके धरिला ...
१९ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८७८, अवघ्या विद्येचा ...
२० सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८७९, कृपावंत झाली ...
२१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८८९, पुंडलिके धरिला ...
२२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ८९२, भूचरी खेचरी ...
२३ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...
२४ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग २५५७, चालिले ब्राह्मण ...

## मुक्ताबाईंबद्दल गौरवपर उद्गार

१ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २७६, ज्ञानेश्वर अभंग ...
२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २८०, शालिवाहन शके ...
३ सकलसंतगाथा, खंड २, अभंग २७७, सदाशिवाचा अवतार ...
४ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग ३, शिव तो निवृत्ति ...
५ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १३९, पुण्यभूमी आळंकावती ...
६ श्रीसंतचोखामेळा यांचे चरित्र व अभंगगाथा, पान १८८
७ श्रीसंतचोखामेळा यांचे चरित्र व अभंगगाथा, पान १६८
८ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग ११, ऐसा पुत्र देगा देवा ...
९ मुमुक्षू ,फेब्रुवारी १९२७, आरती १५, क्षार उदक...
१० सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४४, योगियांचे ध्यान ...
११ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४३, जगत्रय जननी ...
१२ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४५, मुक्तपणे मुक्त ...
१३ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४६, नाथाचे आश्रमी ...
१४ सकलसंतगाथा, खंड ३, अभंग ३५४८, तीन अक्षरे ...
१५ मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये, डॉ.वा.के.लेले, पदसंग्रह
१६ सकलसंतगाथा, खंड ५, अभंग १५५२, नमो ज्ञानेश्वरा ...

१७ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, शके १८३३
१८ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, शके १८३३
१९ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १७, १९२४
२० भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १७, १९२४
२१ श्रीनाथलीलामृत, अध्याय २८, ओवी ५५
२२ शिवदिनकेसरीकृत ज्ञानप्रदीप, अ. १० ते १४
२३ मराठी संतवाङ्मयातील परमार्थ मार्ग, गुरुदेव रानडे
२४ श्रीमुक्ताबाई चरित्र व गाथा, अभिप्राय - धुंडामहाराज देगलुरकर, १९८०
२५ मुमुक्षू , मे-जून १९२७, अभंग ७१, आणि देखिले स्वप्नी ...

*

## विभाग तीन

मुक्ताबाईचे वाङ्मय

### सनद दिली स्वतंत्र सद्‌गुरुराजे

**( श्रीज्ञानेश्वरांनी मुक्ताबाईस दिलेली सनद)**

१ सनद, अभंग १, आदिनाथ शंकर ...
२ सनद, अभंग २, तें नयनाचे अग्रीं ...
३ मुमुक्षू , मेजून १९२७, अभंग ५१, दोही देहाचे...
४ सनद, अभंग ३, सत्यज्ञान तेचिं ...
५ सनद, अभंग ४, विटेवरी मूर्ती ...
६ सनद, अभंग ५, ज्ञानदेव म्हणे ...
७ सनद, अभंग ६, मूळद्वारी दादा ...
८ सनद, अभंग ७, रेणू तें निरंजन ...
९ सनद, अभंग ८, सर्वांतुनि वेगळा ...

१०  सनद, अभंग ९, कुंडलिनी निवटोनी ...
११  सनद, अभंग १०, गुरुकृपा झाली...
१२  सनद, अभंग ११, गुरुकृपा कैशीं ...
१३  सनद, अभंग १२, पूर्णिमेचे दिवशीं ...
१४  सनद, अभंग १३, देहा मोक्ष ...
१५  सनद, अभंग १४, कृपा झाली ...
१६  सनद, अभंग १५, ज्ञानदेव म्हणे ...
१७  सनद, अभंग १६, सहज समाधि ...
१८  सनद, अभंग १७, म्हणे ज्ञानदेव ...
१९  सनद, अभंग १८, हेंचि गुह्यज्ञान ...
२०  ज्ञानदेव तेहतिशी, ओवी क्र. २५
२१  मुमुक्षू , मेजून १९२७, अभंग ५७, तुमची मिष्टामिष्ट...
२२  मुमुक्षू , मेजून १९२७, अभंग २२, सुई अग्र ...

**ताटीचे अभंग : ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा प्रेरणास्त्रोत**

१  ज्ञानराज मुक्ताई विशेषांक, १९८०, मुक्ताई - श्री.लक्ष्मीबाई पटवर्धन
२  सकलसंतगाथा, खंड १, अभंग २८, मुक्तपणे ब्रीद ...
३  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
४  महाराष्ट्र संतकवयित्री, १९३९
५  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
६  सकलसंतगाथा, खंड १, अभंग ९०३, अज्ञान स्वरुप ...
७  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
८  स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, श्रीरामकृष्ण आश्रम १९७४
९  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१०  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
११  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१२  ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१३  ताटीचे अभंग, मुक्ताबाई

## ज्ञानबोध ग्रंथ – एक अपूर्व उपलब्धी

१ ज्ञानबोध ग्रंथ, प्रस्तावना – श्री.सुरेश जोशी

२ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०७, निवृत्तीने एकांत केला ...

३ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ११८, सकळ हे साहित्य ...

४ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १७, का धरिले गुढ ...

५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०२, निवृत्तिराज म्हणे ....

६ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, अभंग ७, गुरु मंगळमुर्ती..

७ सकलसंतगाथा, जोशी संपादित, खंड २, श्रीनिवृत्तिनाथमहाराजांची समाधी, अभंग १२०७, धूप पंचारती...

८ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग २३, आंगेचि कोल्हाटी ...

९ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १७, का धरिले गुढ ...

१० ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ९, मागे जरी सिद्ध ...

११ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १७, कां धरिले गूढ...

१२ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ५७, काही म्या ...

१३ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १०२, भाग्याभाग्याची आड ...

१४ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १०४, राहीले शरीर...

१५ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ५, वंदोनी पाउले ...

१६ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, अभंग ३२, गुरू आदिमूर्ती...

१७ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ६, जंजाळाची माया ...

१८ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ६, जंजाळाची माया ...

१९ ज्ञानबोध ग्रंथ, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १५, आमोखाची...

२० ज्ञानबोध ग्रंथ, लाउनीया दीप ...

२१ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १, मुळी हा वृक्ष...

२२ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग २, मुक्तीचीये चाडे ...

२३ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ७, निराकार बीज...

२४ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १५, दीवा लावा ...

२५ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०८, आमुच्या स्वस्थानी ...

२६ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग २३, आंगेचि कोल्हाटी...
२७ सकलसंतगाथा, संपा.जोशी, खंड २, अभंग १३४८, गोरा जुनाट पै...
२८ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग २३, आंगेचि कोल्हाटी...
२९ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग २६, येरी पर्जन्य...
३० ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ३०, उघडा उघडा...
३१ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ४१, मनें जे धरावी...
३२ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ५२, सद्‌गुरुने बैसावे...
३३ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ५९, न लगे मजला ...
३४ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ६१, माझे भक्ती...
३५ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ६२, सद्‌गुरुला दया...
३६ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ७६, आवडीचे धन ...
३७ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ७७, अनाथ दीनबंधु...
३८ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ८१, आगत्य कारण ...
३९ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ९१, भूतमात्र येक ...
४० ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ९२, जेणे सूत्र ...
४१ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ९३, अगाध मायेचेवरी ...
४२ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १००, स्वामीसी विणवीता ...
४३ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १०१, नेणो ही अभ्राची ...
४४ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १०६, नसो आता साधन...
४५ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १०६, नसो आता साधन...
४६ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग ११२, निसीदिनी मज ...
४७ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १२०, उदंड तळमळीतो ...
४८ ज्ञानबोध ग्रंथ, अभंग १२४, नेणु ज्वरवाल्या ...
४९ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, तुम्ही विवेकाविवेक ...
५० ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, अभंग ५, पुत्राने पित्याते..
५१ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, तुम्ही विवेकाविवेक ...
५२ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, अभंग ५३, प्रथम जे...
५३ ज्ञानबोध ग्रंथ, प्रतिउत्तर मुक्ताबाईचे अभंग, अभंग १२, चोरीचे धन...

५४ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९१७, टाळ हे मृदंग ....
५५ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग २, अणुभउनी सार ...
५६ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १४, भाशा आभाशाचे...
५७ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग ४, मन माया नव्हती ...
५८ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग ६, जेव्हां पाची गुण ...
५९ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १६, वेदाने ह्या विद्या ...
६० ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १७, सुखाचे सार ...
६१ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १८, तळहातिच्या...
६२ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १८, तळहातिच्या...
६३ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग ८, स्वामी दयामूर्ती...
६४ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १०, बीजावीण वृक्ष...
६५ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १०, बीजावीण वृक्ष...
६६ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग २०, पाण्याचा पानबुडा...
६७ सकलसंतगाथा, खंड २, अभंग ९०८, आमुच्या स्वस्थानी ....
६८ ज्ञानबोध, सममेळ बोलणे उभयतांचे, अभंग १८, तळहातिच्या...
६९ सकलसंतगाथा, जोशी संपादित, अभंग ११८२, उदित कमळे ....

## मुक्ताबाईचे अभंग

१ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २३९, तव आनंदला हरी ...
२ ब्रह्मचित्कला दर्शन अर्थात श्रीमुक्ताबाई चरित्र व गाथा, जयालागी...
३ मुक्ताबाईस दिलेली सनद
४ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २०, सहस्त्रदळी हरि ...
५ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ५, आधी तू मुक्त ...
६ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ७, भजनभावो देही ...
७ सकलसंतगाथा, खंड १, अभंग १०, आदि मध्य ...
८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग २८, मुक्तपणे ब्रीद...
९ मुमुक्षू, मार्च एप्रिल १९२७, अभंग ५, मन माया नव्हती ...

१०	ताटीचे अभंग : एक विवेचन, डॉ.सदानंद मोरे.
११	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ११, आदि अंतु हरि ...
१२	ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१३	ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१४	ताटीचे अभंग, मुक्ताबाई
१५	प्राचीन मराठी संतकवयित्रींचे वाङ्मयीन कार्य - डॉ.सुहासिनी इर्लेकर
१६	मुमुक्षू, मे-जून १९२७, अभंग ५, स्थावर कुंडलिनी ...
१७	मुमुक्षू, मे-जून १९२७, अभंग ८, जेथे निजध्यास ...
१८	मुमुक्षू, मे-जून १९२७, अभंग २३, पुढति देखावया ...
१९	मुमुक्षू, मे-जून १९२७, अभंग २३, पुढति देखावया ...
२०	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३३, दिवसा शीतळ ...
२१	भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड ७, डॉ.ग.वा.जोशी,जग हे..
२२	मुमुक्षू , मार्चएप्रिल १९२७, अभंग ७, जेव्हा पाची गुण ...
२३	मुमुक्षू , मार्चएप्रिल १९२७, अभंग १५, भासा आभासाचे ...
२४	तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास खंड ७, ले.डॉ.ग.ना.जोशी, पान ३७८
२५	मुमुक्षू , मार्चएप्रिल १९२७, अभंग २१, पाण्याचा बुडबुडा ...
२६	सकलसंतगाथा, खंड १, अभंग १, मुक्त जीव सदा ...
२७	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ६, नाममंत्रे हरी ...
२८	सकलसंतगाथा, खंड १, अभंग १५, अविट न विटे ...
२९	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ४, अलिप्त संसारी ...
३०	संतकवयित्री, डॉ.इन्दुमती शेवडे
३१	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ८, गुणातीत डाहाळी ...
३२	सकलसंतगाथा, खंड १, अभंग ४२, मुंगी उडाली ...
३३	सकलसंतगाथा, खंड १, अभंग १८, टेकावरी टेक ...
३४	संतकवयित्री, डॉ.इन्दुमती शेवडे, पान ७९

*

# विभाग चार

## परिशिष्ट

### पूर्वजन्मी मुक्ताईस गोरक्षकृपेचा सौरस

### ( मुक्ताबाई एक की दोन या प्रश्नाचा चिकित्सक विचार )


१ गुरुमाऊली १९८९, ले. डॉ.रा.चिं.ढेरे, पान १२९

२ गुरुमाऊली १९८९, पान १२९

३ गुरुमाऊली १९८९, पान १२९

४ गुरुमाऊली १९८९, पान १३७

४ श्रीशिवदिनकेसरी विरचित ज्ञानप्रदीप, शके १८५६

५ गुरुमाऊली १९८९, पान १९०, ओवी ५९, ६०

६ गुरुमाऊली १९८९, मधून उद्धृत, शडुस्छळि ग्रंथ, ओवी ५९,६०

७ गुरुमाऊली १९८९, पान १९१, ओवी ७४, ७५

८ सकलसंतगाथा, खंड १, अभंग ३, प्रकृति निर्गुण...


### लोकसाहित्यातील मुक्ताबाई


१ मराठीतील लोकगीत, संपा. सरोजिनी बाबर, १९७५

२ लोकसाहित्य साजशिणगार, संपा.सरोजिनी बाबर, मार्च १९६५

३ लोकसाहित्य साजशिणगार, संपा.सरोजिनी बाबर, मार्च १९६५

४ मराठीतील स्त्रीधन, संपा. सरोजिनी बाबर, १९५६

५ अहिराणी लोकसाहित्य दर्शन, खंड २, संपादक कृष्णा पाटील

६ अहिराणी लोकसाहित्य दर्शन, खंड २, संपादक कृष्णा पाटील

७ आसदे गावातील स्त्रियांनी सांगितलेली गाणी

८ मराठीतील स्त्रीधन, संपा. सरोजिनी बाबर, १९५६, पान ६६

९ दिंडी जाय दिगंतरा, ले. श्री.दि.इनामदार

१० आदिशक्ती मुक्ताई, डॉ.सुशीला पाटील, जानेवारी १९९६

११ बहिणाबाईची गाणी, पॉप्युलर प्रकाशन

१२ मराठीतील स्त्रीधन, संपा. सरोजिनी बाबर, १९५६, पान २६
१३ एक होता राजा, संपा. सरोजिनी बाबर, १९५६, पान ११३
१४ दिंडी जाय दिगंतरा, ले. श्री.दि.इनामदार
१५ बहिणाबाईची गाणी, पॉप्युलर प्रकाशन
१६ बहिणाबाईची गाणी, पॉप्युलर प्रकाशन
१७ मिथकवाणी, संपा.डॉ.उषा बंबावाले, सुमित्रा भावे, मार्च १९९५

**

# संदर्भ ग्रंथ सूची


१ सकलसंतगाथा, गाथापंचक, संपा.डॉ.रा.चिं.ढेरे, वरदा बुक्स, १९८५

२ श्रीनामदेवगाथा, महाराष्ट्र शासन, १९७०

३ श्रीनिवृत्ति-मुक्ताई संवादरूप ज्ञानबोध, संपा.श्री.सुरेश जोशी, नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालय प्रकाशन, १९७५-७६

४ मुक्ताबाईची अभंगवाणी, डॉ.अशोक कामत, अतुल प्रकाशन, १९८०

५ ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाई, डॉ.अशोक कामत, अतुल प्रकाशन, १९८०

६ श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद, संपा.श्री.बा.त्र्यं. शाळिगग्राम, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, ऑक्टोबर १९७७

७ आदिशक्ती मुक्ताई, डॉ.सुशीला पाटील, गुरुमाऊली परिवार, कोल्हापूर, १९९६

८ ब्रह्मचित्कला दर्शन अर्थात श्रीमुक्ताबाई चरित्र व गाथा, श्रीनिवृत्ति दौलत वक्ते, १९८०

९ चांगदेव वटेश्वरकृत तत्त्वसार, प्राच्य ग्रंथसंग्रहालय, उज्जयिनी, संपा.डॉ.ह.रा.दिवेकर, १९३६

१० महासाधु श्रीज्ञानदेव यांचे चरित्र, भिंगारकर बुवा, प्रसाद प्रका. १९६२

११ सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या तत्त्वपरंपरेतील लघुग्रंथत्रयी (कल्याणपत्रिका, मुद्राप्रकरण, श्रीज्ञानदेव तेहतिशी), श्रीवामनराज प्रकाशन, संपा.श्री.शिरीष कवडे, १९९७

१२ ज्ञानेश्वरांची प्रभावळ, ले.ल.रा.पांगारकर, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, द्वितीय आवृत्ती, पुनर्मुद्रण, १९८५

१३ ताटीचे अभंग एक विवेचन, डॉ.सदानंद मोरे, श्रीभागवत प्रबोधन संस्था, १९९४

१४ विविधा, डॉ.रा.चिं.ढेरे, नीलकंठ प्रकाशन

१५ श्रीशिवकल्याणकृतश्रीअमृतानुभवविवरण, नित्यानंदैक्यदीपिका,१९३३

१६ यादवकालीन महाराष्ट्र, श्री.मु.ग.पानसे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, १९६३

१७ Integral Yoga , श्रीअरविंद आश्रम ट्रस्ट, द्वितीय आवृत्ती, १९९६
१८ श्रीशिवदिनकेसरी विरचित ज्ञानप्रदीप, संपा.श्री.द.वा.पोतदार, शके १८५६
१९ मिथकवाणी, संपा.डॉ.उषा बंबावाले, सुमित्रा भावे, मार्च १९९५
२० The great women of India , अद्वैताश्रम रामकृष्ण मठ, अनुवाद – डॉ.शरयू बाळ
२१ On The Mother , के.आर.श्रीनिवास अय्यंगार, आ.तीन १९९४
२२ दिव्य जीवन, श्रीअरविंद घोष, श्रीअरविंदाश्रम, पाँडिचेरी, १९६२
२३ श्रीज्ञानदेवविरचित अथ श्रीस्वात्मानुभव, संपा.डॉ.वि.य.कुलकर्णी, इंद्रायणी साहित्य, १९९४
२४ महिपतीकृत भक्तविजय
२५ महाराष्ट्र सारस्वत, संपा.श्री.वि.ल.भावे
२६ श्रीसंतचोखामेळा यांचे चरित्र व अभंग, संपा.श्री.स.भा.कदम
२७ मुक्तेश्वरकृत स्फुटकाव्ये, डॉ.वा.के.लेले
२८ श्रीनाथलीलामृत, संपा.डॉ.रा.चिं.ढेरे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, चतुर्थ मुद्रण, शके १९०४
२९ मराठी संतवाङ्मयातील परमार्थमार्ग, श्रीगुरुदेव रानडे
३० बहिणाबाईंची गाणी
३१ ओळीचे अभंगांची सकलसंतगाथा, संपा.श्री.बहिरट व श्री.राहिरकर, भो.भा.कंपनी, नोव्हेंबर १९५५
३२ अनेक महाराष्ट्र कविकृत पदसंग्रह, भाग पहिला, वा. दा.ओक, १९०७
३३ कैवल्यवैभव, संपा.श्री.रघुनाथ हणमंत कोटणीस
३४ संतांच्या सहवासात, डॉ.शं.गो.तुळपुळे
३५ भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड ७, डॉ.ग.ना.जोशी
३६ अभंग ज्ञानेश्वरी, स्वामी स्वरूपानंद, नववी आवृत्ती, शके १९१२
३७ महाराष्ट्र संतकवयित्री,श्री.ज.र.आजगावकर, १९३९
३८ रामकृष्ण आणि विवेकानंद, डॉ.वि.रा.करंदीकर, द्वितीयावृत्ती, १९९१
३९ स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, रामकृष्ण आश्रम, नागपूर, आवृत्ती,चार

४०	लोकसाहित्य साजशिणगार, संपा.सरोजिनी बाबर, १९६५
४१	मराठीतील स्त्रीधन, संपा.सरोजिनी बाबर, १९५६
४२	अहिराणी लोकसाहित्य-दर्शन, संपा.श्री.कृष्णा पाटील
४३	दिंडी जाय दिगंतरा, ले.श्री.दि.इनामदार
४४	मराठीतील लोकगीत, संपा.सरोजिनी बाबर
४५	एक होता राजा, संपा.सरोजिनी बाबर
४६	प्राचीन मराठी संतकवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, डॉ.सुहासिनी इर्लेकर
४७	संतकवयित्री, डॉ.इन्दुमती शेवडे

*

## नियतकालिकांची सूची

१	ज्ञानराज, मुक्ताई विशेषांक, संपा.श्री.राम करंदीकर, १९८०
२	गुरुमाऊली, संपा.डॉ.रा.चिं.ढेरे, १९८९
३	मुमुक्षू , संपा.श्री.ल.रा.पांगारकर, मार्च एप्रिल १९२७, मे जून १९२७
४	प्रतिष्ठान, जुलै १९६७
५	भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, शके १८३३
६	भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १७, शके १९२४
७	भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वाइतिश १८३८
८	प्रसाद, जानेवारी १९९१

**

मुक्ताबाईच्या चरित्राचा आजवर जो विचार झाला आहे तो केवळ 'ज्ञानेश्वरभगिनी' म्हणूनच ! पण तिच्या जीवनचरित्राचा, कार्यकर्तृत्वाचा, तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार 'कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं ' या पुस्तकात होत आहे.

मुक्ताबाई आणि गोरक्षनाथ यांची भेट हा महाराष्ट्राच्या आध्यात्मिक इतिहासातील अद्वितीय असा प्रसंग आहे. ही भेट हा मुक्ताबाईच्या जीवनातील असा केंद्रवर्ती भाग आहे की ज्यामधून मुक्ताबाईची अवस्थाच बदलली आणि त्यातून तिच्याकडे पाहण्याची इतरांची दृष्टीही ! मुक्ताबाई आता 'माय' या स्वरूपात सर्वांना जाणवू लागली. ह्या भेटीचे गूढ आजवर उलगडले नसल्यामुळे मुक्ताबाई एक की दोन यासारखे वाद निर्माण झाले होते. त्याचाही परामर्श यात घेण्यात आला आहे.

मुक्ताबाईच्या प्रकाशित बेचाळीस अभंगांचा अर्थ लावण्याचे कामही या पुस्तकाच्या निमित्ताने प्रथमच होत आहे. मुक्ताबाईच्या अलक्षित अभंगांचे संकलनही यात करण्यात आले आहे. मुक्ताबाईचा समग्र व साक्षेपी परिचय होण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरावे.

डॉ. अशोक कामत
प्रमुख, संत नामदेव अध्यासन,
संत अध्ययन व संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठ